## अनुक्रमणिका

### खंड पहिला


| प्रवचन क्रमांक | पृष्ठ क्रमांक | स्थान | विषय |
|---|---|---|---|
| 1. | 1 – 5 | डिसेंबर 1980 माटुंगा | "दत्ता मजला प्रसन्न होसी" |
| 2. | 6 – 13 | एप्रिल 1981 हरेश्वर | भगवद्गीता |
| 3. | 14 – 16 | एप्रिल 1981 हरेश्वर | "रसज्ञा वशाद्‌तारकं...." स्त्रोत्राचा अर्थ |
| 4. | 17 – 22 | एप्रिल 1981 हरेश्वर | "धर्मे प्रितीम् ....." श्लोकाचा अर्थ |
| 5. | 23 – 25 | ऑगस्ट 1984 जालना | "धर्मे प्रितीम्.... श्लोकाचा अर्थ |
| 6. | 26 – 31 | नोव्हेंबर 1985 पुणे | त्रिपुरी पौर्णिमा माहात्म्य |
| 7. | 32 – 34 | मार्च 1985 नारेश्वर | "धर्मे प्रितीम्...." श्लोकाचा अर्थ |
| 8. | 35 – 50 | मार्च 1984 माटुंगा | "अखंड आत्मा अविनाशी दत्त । तया पदी...." स्तोत्रावर प्रवचन |


### खंड दुसरा


| प्रवचन क्रमांक | पृष्ठ क्रमांक | स्थान | विषय |
|---|---|---|---|
| 9. | 51 – 60 | मे 1986 येऊर | समर्थांची शिकवण |
| 10. | 62 – 71 | जानेवारी 1985 निंबोरा | ईश्वरभक्ती |
| 11. | 72 – 80 | एप्रिल 1980 येऊर | "दिगंबरा दिगंबरा...." या महामंत्राचा अर्थ |
| 12. | 81 – | जुलै 1986 बोरीवली | "अविनय अपनय विश्णो..... या श्लोकाचा अर्थ |

।। श्री. गुरु: शरणम् ।।
-:-:-

मुकम् करोती वाचालम्
पंगुम् लंघायते गिरिम्
यत्कृपा तम हम् वन्दे
परमानन्द माधाव ।।

भागवत् भक्त माहात्मे अखंड ईश्वर चिंतन करण्याचा प्रयत्न करीत असतात. सर्वही दु:ख आपली दूर व्हावीत, पूर्ण सुख आपल्याला मिळाव ही सर्वांचीच इच्छा आहे. मोक्ष, मोक्ष म्हणजे हाच मोक्ष आहे. दु:खाची कायमची निवृत्ती. पुन्हा दु:ख कधीही न उत्पन्न न होणे आणि पूर्ण आनंद प्राप्त होणं. त्या आनंदामध्ये कमी जास्तीपणा काहीही नाही.

आनंदाचे अनेक प्रकार उपनिषादामध्ये सांगितलेले आहेत. मनुष्यांचा आनंद, गंधार्वांचा, देवांचा. एकापेक्षा एक अधिक आनंदाची सीमा उपनिषादकारांनी दाखाविलेली आहेत. पण हे सर्वही आनंद एक जो महात्मा महत् श्रोत्रिय -त्याला मिळतात अस सांगतात. कोणतीही मनामध्ये इच्छा राहीलेली नाही. निष्काम अंत:करण झालेल आहे. आणि पूर्ण ज्ञानही झालेल आहे. अज्ञान काहीही शिल्लक नाही. अहंकारादी विकार ज्याचे पूर्ण दूर झालेले आहेत असा जो ज्ञानी महात्मा, त्याला हे सर्व आनंद मिळतात. त्याच्या आनंदामध्ये सर्वही आनंदाचा अंतर्भाव होतो, असं उपनिषादामध्ये सांगितलेल आहे.

तर ही मोक्षाची इच्छा सर्वांनाच आहे. मनुष्य, देव, गंधार्व पशु-पक्षी देखिल यातून कहीही सुटलेले नाहीत. याच साधान म्हणून महात्मे या भाक्ति-मार्गाकिडे वळले आहेत. ईश्वराच्या भजनाने, सेवेने हा मोक्ष मिळतो.

ईश्वराची सेवा म्हणजे काय? काय करावं? मोक्षाकरिता कोणती साधना करावी? हा ही प्रश्न आहे

त्या बद्दल सद्गुरु श्री. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच एक पद आहे- भजनाच्या वेळी वगैरे म्हणतात. त्याच्या हा खुलासा केलेला आहे:-

दत्ता मजला प्रसन्न होसी
जरी तू वर देसी
तरी मी आन न मागे तुजसी ॥
निर्धारुनी मानसी

असा उपक्रम केलेला आहे. दुसर मला काहीही मागायच नाही.

स्मरण तुझे मज नित्य असावे
तव गुण गावे भावे

ईश्वराचं स्मरण अखंडीत राहील पाहिजे. "तुझा विसर न व्हावा" तुकाराम महाराजांनी सुध्दा हेच सांगितल आहे. विस्मरण कधीही होऊ नये. अखंड स्मरण अत:करणात राहायच म्हणजे संसाराची आस चित्तातली कमी झाली पाहिजे.

सर्व भाक्तिमध्ये स्मरणभाक्ति मोठी [श्रेष्ठ] म्हणून सांगतात. श्रवण, अर्चन, वंदन, दास्य, आत्मनिवेदन असे भाक्तिचे अनेक प्रकार आहेत- शरीराने केली जाणारी, वाणीने होणारी, मनाने होणारी. या भाक्तिमध्ये स्मरण हे मोठे आहे. चित्ताला ईश्वराच स्मरण राहणं.

२ ....

ईश्वराची अनंत नावे आहेत. ही अनंत नावे त्याच्या गुणावरुन उत्पन्न झालेली आहेत. दामोदर आहे. गोविंद म्हणतो आपण. गायींचा इंद्र -म्हणजे गायींवर काही संकट आल होतं. इंद्राने पाऊस पाडायला सुरुवात केली. सर्व गोकुळाचा नाश करायचा ठरविला. त्यावेळी हातावर गोवर्धन पर्वत धारण करून त्याच्या खाली सर्व गायीं, गोकुळवासी लोक यांचे संरक्षण केले. म्हणून त्या कामधेनुने "आमचा इंद्र तू आहेस" [गायींचा इंद्र म्हणून] गोविंद हे नाव देवाला दिले.

अशा या लिला, चरित्र जे घडलेल आहे. त्याचे स्मरण करुन देणारी अशी नांवे आहेत. "गौण" नांवे म्हणतात त्यांना. गुण प्रवृत्त नांव. त्या नामाच स्मरण म्हणजे त्यापाठीमागे घडलेल्या सर्वही लिलांचे, चरित्राचे स्मरण हे त्या वेळेला अनायासे घडते आहे.

त्याचप्रमाणे अनंत कर्मे ईश्वराची आहेत. म्हणजे कितीतरी लिला झाल्या आहेत. ईश्वराला कालमर्यादा नाहीये. आपल आयुष्य एक ठरलेल आहे. ते सगळच्या सगळसुध्दा पदरात पडत नाही. त्यांतही ज्योतिष शास्त्राने गडांतर म्हणून लिहिलेल असत. म्हणजे आयुष्य असल तरी सुध्दा मध्येच जाण्याचा संभाव असतो. त्याचा परिहार करण्याचे उपाय आहेत. तस ईश्वराला कालमर्यादा नाहीये. ब्रम्हदेवालाही कालमर्यादा आहे. इतरांच्या पेक्षा जास्ती काल राहू शकेल. परंतु त्याचाही काल मर्यादित आहे.

देव जातात स्वर्गलोकामध्ये पुण्य करून, पण "क्षीणे पुण्ये मर्त्यलोकम् विशन्ती" त्यांच्याही पाठीमागे आहे. पुण्य संपल की तिथ राहता येत नाही. पुन्हा कुठतरी जन्माला जावे लागते. ही कालमर्यादा ईश्वराला नाहीये. कालातीत तो आहे. म्हणून अनेक जीवांच्या करीता, भक्तांकरीता, संतांकरीता, पुष्कळ चरित्रा, लिला भागवंताकडून घडत असतात.

त्या सर्वही कर्मांचे स्मरण करणे हा मोठा विषय आहे. किती वेळ स्मरण भक्ती करायची, किती वेळ नाही। वेळच पुरा पडत नाही. अनंत नाम, अनंत कर्मे अनंत रुप।. ईश्वराची अनेक रुप, अनेक अवतार आहेत. अशा सर्वही ईश्वरासंबंधी नाम, रुप, कर्म या सर्वांच स्मरण करणे हा मोठा भक्तिविषय आहे.

स्मरण तुझे मज नित्य असावे
तव गुण भावे गावे ।।

चित्ताला हा विषय मिळावा, अखंड भागवंताच स्मरण घडाव, आणि वाणीने तुझ्या गुणांचे वर्णन करावे - वाणीला हा विषय आहे. म्हणजे दुसरा व्यवहारात वाणीचाही काही विनियोग नाही, आणि मनाचाही विनियोग नाही. हे सगळ घडण्याकरिता पुढे सांगताहेत महाराज-

अनासक्तिने मी वागावे
ऐसे मन वळवावे ।।

मन जर संसारामध्ये आसक्त झालेल असेल तर ईश्वराचे स्मरण, भक्ति वगैरे कशी घडणार ? मन तिकडेच जाणार। स्मरण भक्ति अतिशय कठीण आहे. वाणीने एखादे वेळेला काही भजन करणे वगैरे, मन दुसरीकडे गेल तरी चाललेले असते. अखंड स्मरण घडायचे, म्हणजे त्याला मन दुसरीकडे जाऊन उपयोगी नाही. इतकी मनाची भूमिका होण्याकरता अनासक्ती, मनातली विषयांची आवड कमी झाली पाहिजे. "तया सत्कर्मी रति वाढो" ही रति उत्पन्न होण्याकरिता अनासक्ती हे एक साधन मागितले आहे.

सर्व इंद्रिये आणि मन हे
तुझे हाती आहे ।।

प्रयत्न मी करु शकणार नाही, हे सांगताहेत महाराज. पयत्नांनी कदाचित बाकीच्या गोष्टी मिळतील. अभ्युदय ज्याला म्हणतात. उन्नती. एकापेक्षा एक पदार्थ आपल्याला जगात दिसतात. संपत्तीमध्ये, सत्तेमध्ये श्रेणी आहेत. किर्ती आहे. परंतु ह्या मिळवण्याकरीता नाना प्रकारची कर्म म्हणजे प्रयत्न आहेत. ते करतात, आणि त्याप्रमाणे त्या भूमिका मिळू शकतात. प्रयत्न हा मनाने, शारीराने, इंद्रीयांनी होऊ शकतो. त्याचे कर्तृत्व आपले असे आपण समजतो. कदाचित ग्राह्य धारता येईल. संसारात सुध्दा कर्तृत्व आपल आहे असे मान्य केल तरी त्या कर्तृत्वाचा, प्रयत्नांचा या मार्गात उपयोग होईल की नाहीं, हे सांगता येत नाही. मन विषयातून बाजूला काढायच. इंद्रियावर ताबा मिळवायचा, आणि ईश्वराचे अखंड स्मरण करायचे, म्हणून वस्तुस्थिती सांगताहेत महाराज -

सर्व इंद्रिये आणि मन हे
तुझे हाती आहे।
वास्तव आता तू लवलाहे
स्वपदी मन रमवावे।।

कर्तृत्व शक्ती ईश्वराची आहे. तिथे अहंकार काहीही चालत नाही. मी करणार आहे. मी सगळ करु शकेन, नाही।

परि मने वाचा देहे। ऐसा तो व्यापार नोहे।
तो मी करीत आहे। ऐसे न म्हणे।।

ज्ञानेश्वर महाराजांनी तरी मुद्दाम सांगितले आहे. अहंकाराचा, कर्तृत्व अभिमानाचा काहीही उपयोग नाही. इंद्रियांचा अधिपति परमेश्वर आहे. हृदयस्थ म्हणतात त्याला अंतर्यामी म्हणून उपनिषादामध्येही सांगितले आहे.

पंचमहाभूतांच्या देवता शास्त्राकारांनी मानलेल्या आहेत. हे केवळ जड पदार्थच नाहीत. पृथ्वीचे नियमन करतो तो- जडाचे तेजाचे, वायूचे, प्रकाशाचे, सूर्य चंद्र सर्वांच्याही अंतर्यामी तो आहे. पण हे मात्र कोणी त्याला जाणू शकत नाहीत. आपला नियामक कोणी आहे याचे ज्ञान त्यांना नाहीये. ही मोठी शक्ती ईश्वराची आहे. ज्ञानशक्ती तर मोठी आहेच, सर्वज्ञ आहे तो. आणि नियामक शक्ती आहे. हृषिकेश म्हणतात ईश्वराला. हृषिक म्हणजे इंद्रिय. इंद्रियांचा तो स्वामी आहे. त्याने आमची इंद्रिये, मन आपल्याकडे लावावे ही सुध्दा प्रार्थना केली आहे. आणखी साधन सांगताहेत महाराज -

विवेक आणि सत्संगती हे
नेत्रव्दय बा आहे।
वासुदेवा निर्मल देहे
जेणे त्वत्पदी राहे।।

विवेक आणि सत्संगती। ही एक मोठी साधना आहे. दुर्लभ आहे. संतांची संगति होणे कठीण आहे. जाणीव झाली पाहिजे. नाहीतर संतांच्या बद्दल मनात अनादर असेल तर ही संगती घडणारही नाही आणि घडली तरी उपयोगही होणार नाही.

तर हा जर अज्ञानाचा पडदा आहे तो अविवेक आहे. अविवेक म्हणजे मोह. तो मोह चित्तामध्ये असल्यामुळे आपल्याला संतांचे ज्ञान होत नाही. कुठे आहेत संत अस आपण म्हणतो पण संत भेटले तरी त्यांच्यापासून आपला फायदा होईल असे काही सांगता येत नाही. दुर्योधनाच्याकडे पुष्कळ ऋषी येत होते. तो पूजा अर्चाही करीत होता. पण काय। त्याच्या मनावर कांहीच परिणाम झाला नाही. श्रीकृष्णांच सुध्दा त्याने ऐकले नाही.

४ /-..........

ईश्वरशक्ती बद्दल विश्वास नाहीये. ईश्वराचे सर्व कर्तृत्व आहे ही जाणीव नाहीशी झाली म्हणजे अभिमान हा जास्ती जास्ती वाढीस लागतो. पण त्या अभिमानाने सर्व आपल्या मनाप्रमाणे घडून येते असे मात्रा नाहीये. मनाच्या विरुध्द झाले, प्रयत्न निष्फळ झाला तरीसुध्दा मनावर परिणाम होत नाही. पुन्हा करावे, पुन्हाते करु असे चालले आहे.

तर विवेक पाहिजे। नित्य अनित्य हा विवेक पाहिजे. जगात स्थिर काय आहे, अस्थिर काय आहे। हा विवेक पाहिजे. क्षेत्राक्षेत्राज्ञ विवेक पाहिजे. शारीरादिक पदार्थ आणि त्यांचा द्रष्टा – आत्मा, जीवात्मा मी वेगळा आहे. शरीर म्हणजे मी नाही हा ही विवेक पाहिजे. काय घ्यावे आणि काय सोडावे हे समजले पाहिजे. बुध्दिची तयारी इतकी झाली पाहिजे. हे सगळे विवेकाचे प्रकार जर जवळ असतील म्हणजे विवेकसंपन्न बुध्दि झाली तर तो जीवात्मा सर्वत्रा सुखी आहे.

आणि त्याकरता सत्संगती। विवेक सांगणारे, विवेक दाखविणारे असे महात्मे भेटले पाहिजेत. त्यांच्या संगतीमध्ये राहिले म्हणजे आपोआप ज्ञान होते त्यांचे आचरण पाहून – ते कसे बोलतात, काय करतात त्यावरुन तो विवेक आपल्या चित्ता-मध्ये जर जिज्ञासा असेल तर आपल्याला मिळतो. त्याला "नेत्राव्दय " म्हणतात महाराज. दोन नेत्रा आहेत. हे नेत्रा मिळाले म्हणजे जीव आपल्या ठिकाणी स्थिर होईल. ईशभक्ती त्याच्या चित्तामध्ये निर्माण होईल.

म्हणून ईश्वराचे स्मरण असावे इथून सुरवात केली महाराजांनी. आणि त्याच्याकरता विषयांचे स्मरण सुटावे ही दुसरी प्रार्थना केली. अनासक्त व्हाव. इंद्रियावर ताबा मिळावा. कारण इंद्रिये विषयांकडे जाणारच. विषयांचे स्मरण सुटावे, संग सुटावा म्हणून ईश्वराने आपल्या शक्तीचा उपयोग करावा म्हणजे इंद्रिये आपल्या ताब्यात येतील. आणि त्या बुध्दिमध्ये विवेकाची उत्पत्ती व्हावी आणि सत्संगती मिळावी हे मागणे मुख्य आहे.

त्यामुळे संसारही सुखाचा होतो. परमार्थाचे फळ तर आपल्या पदरात पडते आहेच. ज्ञानेश्वर महाराज संसारी नव्हते तरीसुध्दा सर्व विश्वाचा संसार त्यांनी केला, विश्वाला मार्गदर्शन त्यांनी केले. एकनाथ महाराज। हे तर अगदी गृहस्थाश्रमी होते. संसार हा ईश्वराचा आहे आपले काहीही नाही ही त्यांची भूमिका होती. विवेक संपन्न असल्यामुळे संसाराची आसक्ती गेली होती. अखंड ईश्वराचे स्मरण चालले होते. असे महात्मे ईश्वराजवळ हे गुण मागतात आणि त्या गुणांनी संपन्न होऊन ईश्वराची कृपा त्यांच्यावर झाली असल्यामुळे भगवंताचे अखंड स्मरण त्यांना घडले.

पूर्ण सुख, दु:ख निवृत्ती ही विवेकाने होते आहे. दु:ख होत नाही असा अर्थ नाही त्याचा. तुकाराम महाराजांना दु:ख नव्हती असं पहाणाऱ्याला तरी वाटत नाही. काय घरामध्ये काहीही नाही। शिवाजी महाराजांनी सोन्या-नाण्यांनी भरलेली ताटे त्यांच्या घरात पाठवून दिली आहेत, त्यांना समजल्यावर त्यांनी ती परत पाठवून दिली. नको, म्हणाले. सुखाची साधन म्हणून जी समजली गेली आहेत ती काही नाहीत घरामध्ये म्हणजे दु:ख आहे असा अर्थ नाहीये. "चित्ती असू द्यावे समाधान" हा जो उपदेश करतात तुकाराम महाराज तो काही कुठे वाचून नाही। स्वत:चा अनुभव आहे तो.

तर हा जो विवेक मनामध्ये आहे त्यामुळे अंत:करणात पूर्ण समाधान आहे, म्हणजे सुख आहे. सुखाची साधन पुष्कळ आहेत पण मानसिक स्वस्थता नाही, काय त्या साधनांचा उपयोग? सुबत्ता आहे पण काहीही उपयोग नाही.

साधने नसतानाही विवेकाने जीव सुखी राहू शकतो , समाधान मानू शकतो. साधने असतानाही विवेक नसला म्हणजे असमाधान, दुःख आहे. सुखदुःखाची कल्पनाच वेगळी आहे व्यावहारीक दृष्टीने।

म्हणून ही जी साधना आहे – विवेक, सत्संगती वगैरे याने अनासक्ती प्राप्त होते, इंद्रियावर ताबा मिळतो, मन ताब्यात येते. आणि त्या मनाला एक भगवंताचे 'अखंड स्मरण' हा विषय मिळाला कि झा पूर्ण आनंद आहे. दुःख नाही. मोक्ष या ठिकाणीच मिळाला. मोक्ष म्हणजे ही जागा सोडून कुठे दुस-या जागेत जायचे असा त्याच्या अर्थ नाही. स्वर्ग जिंकला इथेच.

ही स्थिती आपल्याला मिळावी म्हणून महाराजांनी ही प्रार्थना केली आहे. महत्वाचे पद्य आहे पंचपदी नंतर मुद्दाम म्हणायची पध्दत संप्रदायामध्ये आहे. देवाजवळ हे मागणे मागायचे आहे. तशी स्थिती आपल्याला प्राप्त व्हावी. संपत्ती मिळते आहे, खर्च होतो आहे, चाललेल आहे. त्या संपत्तीचा काहीतरी विनियोग ईश्वराप्रित्यर्थ जितका होईल तितका करण्याचा प्रयत्न करायचा आहे. तर हे सर्व भगवंताने आपल्याला द्यावे.

तुझा विसर न व्हावा।

अविस्मरण नेहमी असावे. त्याचे फलही शास्त्राकारांनी भागवतात सांगितले आहे.

अविस्मृती: कृष्ण पदारविन्दयो:<br>
क्षीणोती अभद्राणी क्षमत्वनोतीच।<br>
चित्तस्य शुध्दिम् परमात्म भक्तीम्<br>
ज्ञानं च विज्ञान विरागयुक्तम्।।

ईश्वराच्या भक्तीने इतके गुण मिळतात. अभद्र- सर्व पापक्षय होतो. हृदयस्थ हरि असल्यावर पापे राहतीलच कशी? मनच शुध्द होऊन जातय. मन शुध्द झाल्यानंतर शरीर वाणी यांनी पापकर्मे घडणारच नाहीत. क्रियमाण शुध्दी झाली, पूर्व पातकांचा क्षय झाला, कर्म संपल्यानंतर पुन्हा जन्माचा संबंध उरलेला नाही. म्हणूनच विवेक संपन्न महात्म्यांनी हेच मागणे मागितले –

पहा ते पांडव अखंड वनवासी<br>
परि त्या देवासी आठविती।

स्मरण भक्तिचे प्रतिपादन तुकाराम महाराज करताहेत –

प्ल्हादासी पिता करीतो जाचणी।<br>
परि तो स्मरणी म्हणे नारायणा।<br>
सुदामा ब्राम्हण दरिद्रे पिडीला।<br>
नाही विसरला पांडुरंगा ।<br>
तुका म्हणे देवा तुझा न पडावा विसर।।

हीच मागणी आपण ईश्वराजवळ करायची आहे, प्रार्थना करायची आहे. त्याची कृपा मोठी आहे. आमची कर्म कितीही असली , कितीही दुर्दम्य मन असले तरी सुध्दा ते त्याच्या कृपेने अनुकूल होऊ शकते, त्याचे दमन होऊ शकते.

आपल्याकडून काहीतरी सत्कर्म घडावे. सद्वासना असणे आणि त्याप्रमाणे कर्म घडणे यातही अंतर आहे. इच्छा जरी असली तरी चांगली असावी. "काशीस जावे नित्य वदावे" म्हणतात. निदान इच्छा करावी. काही इच्छाचनाही सत्कर्माची असे नको.

किंबहुना सर्व सुखी पूर्ण होऊनी तिन्ही लोकी।<br>
भजी जो आदि पुरुषी। अखंडीत।।

ही ज्ञानेश्वर महाराजांनी केलेली प्रार्थना करुन हे निवेदन संपवू।

अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त।।

-:-:-:-:-

भगवत् गीता हा प्रसिध्द ग्रंथ आहे. त्यात अनेक विषय भगवंतांनी अर्जुनाला सांगितले आहेत. त्याच्या मनामध्ये जो मोह उत्पन्न झाला होता – ज्याला आपण अविवेक म्हणतो – तो दूर झाला पाहिजे, म्हणजे त्याचे कर्तव्य तो बरोबर करु शकेल या उद्देशाने आत्मज्ञाने, भगवद्भक्ती आणि कर्तव्य कर्म हे तीन उपाय व चौथा अष्टांग योग सांगितला आहे. बुध्दीची तयारी करायची आहे. सर्वही कार्यात, संसारात बुध्दिचे सहाय्य आवश्यक आहे. बुध्दिच जर ठिकाणावर नसेल, स्थिर नसेल तर संसारही व्यवस्थित होऊ शकत नाही. या दृष्टीने शास्त्रकारांनी बुध्दितत्व हे फार श्रेष्ठ मानले आहे.

त्या बुध्दिची सुधारणा करायची आहे. ती स्थिर करायची आहे. तिची योग्यता वाढवायची आहे. ईश्वरदर्शन किंवा आत्मदर्शन हे बुध्दिने होणारे आहे. पण त्यासाठी संस्कृत बुध्दि झाली पाहिजे. संस्कार म्हणजे बुध्दिमध्ये असणारे दोष दूर करणे आणि विशेष गुण तिच्यामध्ये उत्पन्न करणे, हा संस्कार शब्दाच अर्थ आहे. त्या योगाने बुध्दिची योग्यता अधिकाधिक वाढत जाते.

आपल्या या डोळ्यांनी आपण फार लांब काही पाहू शकत नाही. आपल्या दृष्टीला मर्यादा आहेत. समुद्राच्या पलीकडे काय आहे हे आम्हाला दिसणार नाही. पण घारी, गिधाडे वगैरेंची दृष्टी दूर दर्शन करु शकते. निसर्गत:च ईश्वराने त्यांच दृष्टीमध्ये तशी योग्यता दिली आहे. लांबचा पदार्थ सुध्दा ते पाहू शकतात. आम्हाला लांबचे तारे वगैरे पदार्थ दिसत नाहीत. त्या करिता माध्यम म्हणून एक दूर्बिण निर्माण झालेली आहे. त्या माध्यमाचे साहाय्य घेतल म्हणजे याच दृष्टीने दूरचा पदार्थसुध्दा आपण पाहू शकतो. त्याचप्रमाणे बुध्दिमध्ये योग्यता निर्माण करण्यासाठी आणखी काही सहाय्य घ्यावे लागते. बुध्दिने विचार करायचा झाला तर महात्म्यांनी करून ठेवलेले ग्रंथ, त्यांचा उपदेश यांचे सहाय्य घ्यावे लागते.

शास्त्राचे सहाय्य घ्यावे म्हणून भगवान् सांगतात. नुसत्या बुध्दिने विचार होऊ शकत नाही. मानवाची बुध्दि अतिशय मर्यादित आहे. व्यवहारात सुध्दा आपल्याला बुध्दिने योग्य निर्णय येत नाहीत. एका कोर्टाने दिलेला निर्णय पुढच्या कोर्टात फिरवला जातो. म्हणजे एकाची बुध्दि कमी पडली, दुसऱ्याची बुध्दि जास्ती झाली. पुन्हा त्यांच्यावर सुप्रिम कोर्ट आहे. तर जसे जसे बुध्दिला शास्त्राचे सहाय्य मिळत जाईल तस तशी ती बुध्दि सूक्ष्म तत्वाचे विवेचन, स्पष्टिकरण, निर्णय करु शकते. म्हणून प्राचीन सर्व ऋषिमुनी आपल्या बुध्दिची योग्यता वाढवण्याच्या प्रयत्नात होते.

चंद्रलोकापर्यंत जाणे ही सुध्दा बुध्दिची योग्यताच आहे. पण त्यालासुध्दा बुध्दिची स्थिरता पाहिजे. मनामध्ये निराशा उपयोगी नाही. काय इतके प्रयत्न केले पण काही साधत नाही, अशक्य आहे अशी निराशा उत्पन्न झाली असती तर शक्य झालं नसत हे कार्य.

आणखी काही जे सिध्दांत आहेत शास्त्र म्हणून, भौतिकशास्त्र हे सिध्दांतही अगोदर मान्य करून त्याबरोबर चिकाटी, धैर्य, उत्साह अशा सगळ्या गुणांनी युक्त होऊन विचार केल्यावर चंद्रलोकापर्यंत जाणे अशक्य नाही हे सिध्द झाले.

तेव्हा त्या दृष्टीनेही बुध्दिची योग्यता वाढावी अशी शास्त्रे म्हणजे योग-शास्त्र, मंत्रशास्त्र ही ऋषिंनी निर्माण करून ठेवली आहेत. त्या सगळ्या प्रयोगांनी बुध्दिचा विकास करून घ्यायचा आहे. सिध्दी तरी काय मानसिक शक्तीचा विकासच आहे. सूक्ष्म ग्रहण करण्याची शक्ती बुध्दित आहे. तिचा विकास होऊ शकतो. शास्त्राच्या विरुध्द वागल्याने असलेली बुध्दितली शक्तीही नाहीशी होते. उन्नती किंवा अधोगती–दोन्हीही आपण आपल्या वर्तनावरुनच मिळवून घेतो

म्हणून भागवत् गीतेसारख्या ग्रंथात ही सर्व अमोल साधने भगवंताने सांगितली आहेत. सांगणारे फार मोठे आहेत. ऐकणारा अर्जुनही थोडासा गोंधळलेल्या मन:स्थितीत होता. काय करावे, काय करू नये या बद्दल त्याची मन:स्थिती फार बिकट झाली होती. आणि संसारामध्ये सर्वांचीच अशी स्थिती होते. प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाल्यावर गोंधळून जाते आपले चित्त. यातून मार्ग कसा काढायचा यासाठी गीता अर्जुनाला सांगितली म्हणजे सर्वानाच सांगितली आहे. म्हणून भागवद्गीतेचाही विचार शंकराचार्यांनी थोडक्यात सांगितला आहे.

ध्येयम् गीता नाम सहस्त्राम्
ध्येयम् श्रीपतीरूप मजश्रम् ।
नेयम् सज्जन संगे चित्तम् ।
देयम् दीनजनायच वित्तम् ।।

चार साधने थोडक्यात सांगितली आहेत. यात बुध्दिची सुधारणा व्हावी, ईश्वराचा प्रसाद व्हावा याकरता गीतेचाही विचार व्हावा, चिंतन व्हाव अस मुद्दाम सांगितले आहे.

उपास्य देवतेच्या स्वरूपाचे ध्यान व्हावे हा एक बुध्दिला संस्कार आहे. एकाग्रतेचा तो अभ्यास आहे. जोर बैठका काढल्या कि लगेच शक्ती येते असे थोडेच आहे। काढणारे काढत असतात. हळूहळू शरीर कार्यक्षम होत असते. तसे बुध्दिमध्ये असणारे दोष दूर करण्याकरता ध्यानाचा अभ्यास सांगितला आहे. सज्जनांची संगती किंवा त्यांनी केलेल्या ग्रंथाचे वाचन म्हणजे त्यांचीच वैचारीक संगती आहे.

देयम् दीनजनाय च वित्तम ।

वित्त म्हणजे द्रव्य. धानधान्य. आपल्याला ईश्वराने दिलेले असेल. त्यातला काहीतरी त्याग आपल्याकडून झाला पाहिजे "न मम" हा अभ्यास झाला पाहिजे.

आत्मरूप जे आहे ते असंग आहे. त्याचा कशाशीही संबंध नाही. अगदी निर्विकार आहे ते. निर्विकार अशा आत्मस्वरूपाचा असा मी हे जर कळले तर सुखाही नाही आणि दु:खाही नाही. मानापमान नाही. त्यासाठी हा एक त्यागाचा अभ्यास आहे. ममता उत्पन्न झाली आहे. हे माझा म्हणून प्रत्येक लहान मोठ्या वस्तूवर ममता आहे. फाटक वस्त्र असल तरी ममता आहे. ते सुध्दा सोडवत नाही आपल्याला. ही ममता, आसक्ती कमी करण्याच्या दृष्टीने त्यागाचाही अभ्यास आहे. त्याग अल्प होवो किंवा जास्त होवो, त्याला महत्व नाही. त्याग किती करावा, दान किती करावे हे काही शास्त्राकार सांगत नाही पण मनाने "मम" म्हणून जी वस्तू मानलेली आहे ते "इदं न मम" हे तुम्हास दिले आहे, कोणाला तरी ईश्वराला दिले आहे. आवश्यकतेप्रमाणे. आता माझे याच्यामध्ये महत्व नाही. ही मनातून "स्वत्व" निवृत्ती झाली पाहिजे. दान किंवा त्याग याला म्हणतात. एकेक ममता सोडण्याचा जर आपला अभ्यास झाला तर कशाशीही आपला संबंध नाही, हे आपोआप कळून येते. आणि ही मनाची तयारी होण्याकरीता म्हणून "देयम् दीनजनायच वित्तम् " हे भगवान शंकराचार्यांनी सांगितलेले आहे.

संन्यासाश्रम तर अगदी त्यागाची मूर्तिच आहे. सर्व सोडलेले आहे म्हणजे अगदी देहाचीसुध्दा काही आसक्ती नाही. "सारखे फिरावे" असे त्यांना सांगितलेले आहे. एका ठिकाणी कुठे जास्ती राहायचे नाही. फक्त चातुर्मासात मात्र पाऊस पडतो, किडे प्राणी निर्माण होतात त्यांची चालताना हिंसा होऊ नये ह्या दृष्टीने एका ठिकाणी राहायची आज्ञा आहे. हा अभ्यास मानवधर्मामध्ये करायचा आहे. त्यापैकी गीता हे प्रथम सांगताहेत आचार्य.

३ /-..........

भागवत् गीतेमध्ये अनेक विचार मांडले आहेत. अनेक सिध्दांत आहेत. ती प्रत्यक्ष भागवंतांनीच सांगितलेली आहे. त्यामुळे ती दुसऱ्या कोणी सांगितली, ती खरी कि खोटी वगैरे संशोधन करायची गरज नाही. सर्वही ईश्वराच्या मुखांतून आलेले आहे.

अर्जुनासारखा ग्राहक मिळाला. जितेंद्रिय आहे, श्रध्दाळू आहे, भागवत् भक्त आहे. त्यामुळे त्याला हे सर्व भगवंतांच्या मुखातून ऐकायला मिळाले. गीतेमधील पुष्कळ विषय आलेले आहेत. यावर आपण थोड फार चिंतन करायचे आहे. एकाने चिंतन करायचे, सर्वांनी मिळून करायचे.

महत्वाचा सिध्दांत जो शंकराचार्यांनी मांडलेलं आहे तो ऐकल्यावर एकदम मोठ-मोठया विचारी माणसांनासुध्दा हा बरोबर नाही असे वाटते. सर्व सामान्य प्राथमिक अवस्थेमध्ये तो बरोबर नाही असे वाटते. पण बरोबर वाटणारेच सांगितले पाहिजे, तोच सिध्दांत असतो, असे कुठे आहे? रोग्याला फक्त आपल्याला गोड पाहिजे तसे औषध, सर्व खाण्यापिण्याची परवानगी दिली पाहिजे. आणि त्याच्या विरुध्द डॉक्टरने, वैद्याने सांगितले, हे खायचे नाही, ते खायचे नाही, कि त्याला बरोबर वाटत नाही ते, म्हणून काय डॉक्टरांनी तसे सांगायचे? हिताकडे लक्ष दिले पाहिजे. प्रिय निराळे आणि हित निराळे आहे. आम्हाला वाटते ते प्रिय आहे पण हिताचा विचार करण्याची सवय मनाला व्हावी. त्याचा विचार महात्मे नेहमी करत असतात. आणि त्याप्रमाणे त्यांचा हितोपदेश, क्रियोपदेश आहे.

त्याकरिता मुख्य सिध्दांत असा आहे --ईश्वर दर्शन आपल्याला व्हावे त्यासाठी प्रयत्न करायचा, त्याकरिता भक्तीमार्ग आहे. साधन-भक्ती, साध्य-भक्ती असे अनेक प्रकार त्यात आहेत. उपासनामार्ग आहे. उपासना करणारा हा भक्त, ज्याची उपासना करायची तो ईश्वर. पण खरे जे ज्ञानी तत्वदर्शी महात्मे आहेत ते म्हणतात उपास्य व उपासक यांच्यात अव्दैतच आहे मुळात. ते एकच आहेत. "अहम ब्रम्हास्मि" हे समजावून घ्यायचे आहे. हा सिध्दांत आहे. पण सिध्दांतापर्यंत एकदम बुध्दि जाऊ शकत नाही. त्याकरिता आरंभाला भेदच आहे. आपण कितीतरी जीव आहोत आणि प्रत्येकाच्या बुध्दि निरनिराळ्या आहेत. ईश्वर जर एक आहे तो सर्वज्ञ पूर्ण शक्तीमान आहे मग तो आणि मी एक कसा होईन?

आरंभाला संशय येतो. बरोबर आहे. त्या करीता ते सगळे संशय दूर व्हावेत, बुध्दिमध्ये तशा प्रकारची योग्यता निर्माण व्हावी म्हणून ही सर्व साधने सांगितली आहेत. करीत राहायचे आपण. कर्म मार्ग आहे.- पूजा वगैरे तरी कर्ममार्गातच येते. साधनभक्ती ज्याला आपण म्हणतो-- गंध, फूल, धूप, दीप, नैवेद्य सर्व ईश्वराला समर्पण केले जाते. --तेही कर्मच आहे. पूजाकर्म पण त्यावेळेला ईश्वराचे आवाहन करून, ईश्वराचे सानिध्य मानून मनाने भावनेने हे सर्व करावे लागते.

संसार तरी काय भावनाच आहे. खर काय आहे! आमच्या बुध्दीची जी काही कल्पना म्हणा, भावना म्हणा, आहेत, त्या भावना हाच संसार आहे. स्त्री-पुरुषांचे भौतिक शरीर पंचमहाभूतांपासून तयार झालेले आहे--तत्वविचार या दृष्टीने. पण भौतिक शरीर एकाच तऱ्हेने बनलेले असताना त्या शरीराच्या ठिकाणी भावनेने मात्र वेगवेगळी रूप तयार झाली आहेत. त्या स्त्रीच्या मातेला ती आपली कन्या म्हणून आहे. पतीला ती भार्या आहे. पुत्राला ती माता आहे. त्याचप्रमाणे आणखी संबंधीत पुष्कळ लोक आहेत. सासूला ती सून वाटत आहे. भावाला बहीण वाटते आहे. शरीर [पंचभौतिक] एकच आहे. पण एकाच शरीराच्या ठिकाणी प्रत्येकाने आपले एक भावनात्मक-रूप वेगवेगळे तयार केले आहे. त्यामुळे संसार चाललेला आहे. भावनेवर संसार चाललेला आहे. खर भौतिक रूप एकच आहे. त्याप्रमाणे आपल्या मनाची भावना ही तशी व्यवस्थित ठेवली म्हणजे प्रेम निर्माण होत आहे. प्रेमामुळे काहीतरी समाधान लाभते. हाच संसार आहे दुसरे काय ?

तसच ईश्वराची स्वरूप अनेक आहेत. जीवाची स्वरूप अनेक आहेत. अशी प्राथमिक भूमिकेवर हीच भावना होते. पण या वेळेला आपण ह्या भूमिकेमध्ये काय करायचे आहे? कोणती भावना निर्माण व्हावी? आपल्या मनात कोणती भावना वाढावी याकरीता प्रयत्न आहेत.

रावणानेही पुष्कळ अभ्यास केला. योगाभ्यास केला, मंत्रशास्त्राचा अभ्यास केला, वेदाभ्यास केला, पण तरीसुध्दा त्याच्या भावनेची सुधारणा झाली नाही. शंकराची मोठी उपासना केली. पण एक तपस्वी पुरुष राम अरण्यात राहणारा. ह्या रामाच्या स्त्रीचे त्याने हरण केले. बुध्दीवर चांगले संस्कार झाले नाहीत उलट हे बाकीचे कुसंस्कार मात्र वाढत राहीले. तिकडे लक्ष दिले नाही. बिभीषणाने सांगितले, "अरे ही परस्त्री आहे, तिला तू आणू नकोस, देवून टाक." त्याने सांगितले "परस्त्री आम्हाला कोणतीच नाही. जगातल्या सर्व स्त्रीया आमच्याच आहेत." ही भावना आहे. पण ही भावना जगाला घातक ठरलेली आहे. ही भावना धर्मानुकूल नाही. धर्माचे पालन व्हायला पाहिजे. ही भावना व तिचे अनुयायी वाढत राहीले तर सगळ्या जगाचा नाश होईल. म्हणून रामरायांना तो जरी ब्राम्हण ऋषीकुमार होता. तरी मारावे लागले. त्याच्या सर्व अनुयायांना मारावे लागले. ती शक्ती त्यांनी मिळविली आहे. परंतु ही जी भावना आपल्यामध्ये असते. ती सुरक्षीत ठेवली पाहिजे. धर्मभावना वाढत जाऊन शेवटी ईश्वराच्या कृपेने ईश्वराचे दर्शन झाले म्हणजे सर्वही चित्तांच्या वृत्तीचा लोप होतो. सर्व भावना संपून जातात. भावना आहे. काय करायचे धर्म-पालन करून? चंद्रावर लोक आता गेले आहेत. कशाला हवय धर्माचरण. पण ते जगाच्या भल्याकरिता. उन्नती करता पाहिजे. सगळ धर्मशास्त्र या करीता आहे.

धर्मानुकूल भावनांची वृध्दी आपल्या मनामध्ये करणारे जे महात्मे आहेत, त्यांच्या संरक्षणासाठी ईश्वराचे अवतार होतात. आपल्याला जे काही धर्मशास्त्राने सांगितले आहे त्याचे पालन करायचे. दहावीतला मुलगा म्हणायला लागला, मला हा अभ्यास नको. मी बी.ए. का का करू नये? काय उत्तर द्यायचे? हा अभ्यास करून झाल्यानंतर सोड बाबा! मग पुढचा अभ्यास कर. आत्ता सोडून दे. तुझ्या इच्छे-प्रमाणे वाटेल तसे कर म्हटले तर काय होईल?

धर्माचा त्याग म्हणजे धर्म भावनांचे परिवर्तन. एका भावनेवरून पुढच्या भावनेवर जायचे आहे. धर्म हा अविचल आहे. कायम आहे. त्या त्या भूमिकेवर राहणाऱ्या लोकांना तो तो धर्म आहे. ती भावना दृढ करून त्याप्रमाणे वागायचे आहे. जीव अनेक आहेत. ईश्वर एक आहे. मग हे दोघे एक कसे होऊ शकतील असे आरंभाला वाटते आपल्याला. खरं आहे. परंतु ईश्वराचे दर्शन घ्यायचे झाले म्हणजे आरंभाला एक मूर्ति करूनच आपल्याला भक्ति करायची आहे. ईश्वर सर्वत्र आहे असे ऐकतो आपण पण सर्व ठिकाणी ईश्वर आहे. हे काही कळत [जाणवत] नाहीये. नुसते सांगणे सोपे आहे.

नामदेवांसारखे महान भक्त --ईश्वराबद्दल विलक्षण प्रेम ज्यांच्या चित्तामध्ये आहे --त्यांना सुध्दा ईश्वर दर्शन होण्याकरीता सद्गुरुंच्या कृपेची आवश्यकता लागली. संतांच्या सभेमध्ये त्यांना कच्चे ठरविले गेले. नामदेव पांडुरंगांच्याकडे आले. पांडुरंग बोलत होते, जेवत होते त्यांच्याबरोबर. फार मोठी भक्ती! कमीपणा वाटला त्यांना पांडुरंगानीही सांगितले, "बाबा खरं आहे. कच्च म्हणजे काय मी इथे राऊळामध्येच आहे एवढेच तुला माहित आहे. राऊळाच्या बाहेर सर्व ठिकाणी पांडुरंग आहे हे तुला माहित नाही." त्यासाठी त्यांना विसोबा खेचरांकडे पाठविले. आणि तिथे त्यांना ज्ञान व्हायला वेळ लागला नाही. बुध्दिचा विकास अगदी तयार झाला होता. त्यामुळे एकदम ज्ञान झाले.

५/-.........

तेव्हा ईश्वराचे दर्शन म्हणजे सर्वत्र ईश्वर आहे. "वासुदेव सर्वम्." सर्व दिशामध्ये आहे. आत बाहेर सर्व ठिकाणी इश्वर आहे. त्याचप्रमाणे सर्व कालामध्ये ईश्वर आहे. कालमर्यादा ईश्वराला नाहीये. आयुष्य-मर्यादाही जीवांना आहे. पण कालमर्यादारहित असा परमात्मा म्हणून त्याचे महत्व आहे. पूर्ण शक्ती त्याची आहे. अनेक ब्रम्हांड उत्पन्न होताहेत, जाताहेत चाललय सारखे. त्याला काही धक्का नाही.

आणि त्याच्या पुढची भावना म्हणजे "वासुदेव सर्वम." सर्व देशात आहे, सर्व कालात आहे. एवढच नव्हे तर सर्व रूपच तो आहे. "आता विश्वात्मके देवे येणे वाग्यज्ञे तोषावे ------ " ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. विश्वात्मक देव आहे. ज्ञानेश्वरीचा कर्ताही तोच आहे. म्हणजे विचार करणारा जो अहम आहे तोही जीव शेवटी विलीन होऊन गेला म्हणजे सर्वत्र एकरूप झाला. अव्दैत ज्ञान झाले म्हणजे पूर्ण शांती आहे. सद्‌गुरु वासुदेवानंद महाराजांनी आचार्य महाराजांच्या सिध्दांता-प्रमाणे सर्व विवेचन आपल्या ग्रंथात केले आहे. तर हे जे ज्ञान आहे. "सकलम् इदम् अहम च वासुदेव:" दृष्य दिसणारे सगळे चेतन असो वा अचेतन असो मी पहाणारा आहे हे काहीच नाही. एक वासुदेव सत्य आहे. इतकी बुध्दी विशाल झाली पाहिजे.

आमची बुध्दी अतिशय लहान आहे, संकुचित आहे. ती विशाल होण्याकरीता ही सर्व साधने अनंत काल पर्यंत करावी लागतात. किती काल करायची याला उत्तर नाही. ते फळ मिळाले कीं, साधना संपली. बुध्दी विशाल होणे विकसीत होणे हे आपण अनुभावाने पाहू शकतो. त्याकरता तेराव्या अध्यायात भागवंतांनी हा सगळा विवेक मांडला आहे. क्षेत्राक्षेत्रज्ञ विवेक म्हणून त्या अध्ययाचे नाव आहे. क्षेत्र म्हणजे काय, क्षेत्रज्ञ म्हणजे काय।

देहादिक जे सगळे पदार्थ आहेत त्यांना क्षेत्र असे नाव दिले आहे. शरीर, इंद्रीये यापेक्षा आत्मा वेगळा आहे, हे समजून घ्यायचे आहे. आचार आणि विचार। आचारांनी बुध्दी शुध्द होते आहे आणि त्याजबरोबर विचारही चांगले पाहिजेत. तेव्हा शरीरापेक्षा मी वेगळा आहे हे समजून घेणे याला "क्षेत्र-क्षेत्रज्ञ विवेक" त्यांनी म्हटले आहे. पण हेच कळत नाही. समजून घेणे फार कठीण आहे. शरीराशी इतके तादात्म्य होऊन गेले आहे की शरीर म्हणजेच मी असे समजल्यानंतर शरीराच्या [जन्माच्या] पूर्वी काही नाही आणि नंतरही काही नाही. शरीर हे विनाशी मानावेच लागते. शरीराचा नाश झालेला आपण पहातो. प्रत्यक्ष डोळ्यांनी ते दिसते म्हणून मान्य करावे लागते. पण तरीसुध्दा शरीर मी आहे ही जी भावना आहे. ही भावना काही कमी होत नाही. ---

त्याकरीता शरीरापेक्षा मी काही वेगळा आहे, ही दुसरी भावना त्यांनी सांगितली आहे. तत्व सिध्दांत आहे, विचारांतीसुध्दा बुध्दिला पटू शकत पण बुध्दि-मध्ये स्थीर राहू शकत नाही आणि शरीर म्हणजे मी नाही म्हटल्यानंतर शरीराचा संबंधही आपल्याला सोडायला लागतो. शरीरापेक्षा आपण वेगळे आहोत. काही काळानंतर शरीराचा संबंधसुध्दा तोडणे अपरिहार्य आहे. यावरून कोणती तरी एक विलक्षण शक्ती कार्य करणारी आहे यांची सामान्य कल्पना येते. ही सगळी व्यवस्था करणारा कोण आहे? शरीरात आणून सोडणारा कोण आहे? शरीरातून बाहेर घालवणारा कोण आहे?

कोणती शक्ती आहे याची सामान्य कल्पना आल्यानंतर त्यांची जिज्ञासा उत्पन्न झाली की, त्याच्या ज्ञानसाधनेला आरंभ होत आहे. त्यातही शरीर म्हणजे मी आहे अशी बुध्दी जास्त वाढू लागली तर तो आरंभ झाला तरी त्याचे फळ लवकर दृष्टीस पडत नाही. हीच भावना की शरीरापेक्षा निराळे काही नाही. तेंव्हा मी शरीर म्हटल्यानंतर त्या शरीराच्या सुखाकरीता [माझ्या सुखाकरता] प्रयत्न

केला पाहिजे. आणि तो प्रयत्न चांगला की वाईट म्हणायचे कारण नाही. आपल्याला सुख होण्याकरता आपण प्रयत्न करतो. त्यात पाप-पुण्य, निती-अनितीचा विचार करण्याचे कारणच काय? हेही विचार मनांत येतात. आणि शरीराच्या आसक्तीबरोबर हेही वाढत जातात. विचार संपला. आपण सुखी व्हाव!

शरीरामध्ये नियंत्रण करणारी, सर्वांचे नियंत्रण करणारी कोणी शक्ती आहे याची कल्पना आल्यानंतर त्याचे दर्शन व्हावे, कृपा व्हावी अशी तळमळ उत्पन्न झाल्यावर त्यासाठीही प्रयत्न करावा लागतो. तो प्रयत्न जास्त होतो की हा प्रयत्न जास्त होतो इकडे लक्ष द्यायला पाहीजे. त्याकरीता मनाचे, बुध्दीचे सहाय्य फार महत्वाचे आहे. आणि त्या मनाचे नियंत्रण करण्यासाठी त्या शक्तीची प्रार्थनाही आपल्याला करावी लागते. तरच ते खरे ज्ञान होते, मनामध्ये स्थीर होते. आणि अज्ञान, मोह, आसक्ती वगैरे हळूहळू कमी होतात.

म्हणून या अध्यायामध्ये क्षेत्र-क्षेत्रज्ञ विवेक हा फार मोठा विषय भागवंतानी अर्जुनाला समजावून सांगितला आहे. अर्जुनाला सुध्दा शरीर आणि आत्मा वेगळा आहे ही कल्पना नाहीये. अधून मधून येते आपल्या सुध्दा आपण शरीर नाही आहोत. पुस्तक समोर आहे आणि मी पुस्तक पाहतो आहे असे कसे म्हणायचे? हे पुस्तक म्हणून जर मी पहातो तर पाहणारा वेगळा आणि ज्याला पाहतो तो पदार्थ वेगळा हे सिध्दच आहे.

तसे माझा देह आहे, हात पाय आहेत. हे जर आपण पहातो तर त्यालाच मी कसे म्हणायचे? पण होतय खरं! शरीराचा दृष्टा मी असून शरीर मी असे कसे म्हणायचे? बरोबर नाही. पण मी शरीर आहे. फुलाची माळ घातली की समाधान झाले. कोणी अपशब्द बोलले तर असमाधान होतय. कशाच लक्षण आहे? शरीराशी तादात्म्य झालेले आहे. शरीराला उद्देशून स्तुती झाली कि, माझी स्तुती झाली. निंदा झाली. मनाचा क्षोभ होणे, मनाची प्रसन्नता होणे हे त्यांच्यावर अवलंबून आहे.

पण क्षेत्र-क्षेत्रज्ञ विवेक ज्यांना झालाय त्यांचे तिकडे लक्षही नाहीये. "मानापमानमोस्तुत्य:" असे त्यांना राहाता येत कस? हा विचार आपण करतो. अशक्य आहे. शरीर एक दृश्य वस्तु प्रमाणे विनाशी आहे. टिकाऊ असते तर त्याच्याबद्दल आसक्ती बाळगायला हरकत नव्हती. टिकणार आहे, राहू दे. पण नाही. अस्थिर आहे. कोणत्या वेळी शरीर जाईल याचे ज्ञान शरीरशास्त्रज्ञांनाही नाहीये. अंदाजाने कल्पनेने, बुध्दीने आपले ठरवतात.

पण इतक्या अस्थिर अशा शरीरामध्येसुध्दा स्थिरता निर्माण करता येणे शक्य आहे. अभ्युदय-भौतिक उन्नतीसुध्दा शास्त्रामार्गाने करता येते. शरीर इतके अस्थिर असतानासुध्दा चांगदेवांनी १४०० वर्षे आयुष्य टिकविले की नाही! पण त्याही पेक्षा एकज्ञाने शक्ती वेगळी आहे. हे त्यांच्या लक्षात आले. ज्ञानेश्वर महाराजांना शरण जावे लागले त्यांना. ज्यांनी १४०० वर्षे योगबलाने शरीर टिकवले त्यांनाही शरीरापेक्षा मी वेगळा आहे हे ज्ञान झाले नाही. ज्ञानेश्वर महाराजांना पत्र लिहीतांना नमस्कार लिहू कीं, आशिर्वाद लिहू? या संशयात कोराच कागद पाठविला त्यांनी. ज्ञानेश्वर महाराजांना, मी मोठा असल्यामुळे नमस्कार कसा लिहायचा? बर आशिर्वाद तरी कसा लिहायचा? ते गुरु म्हणून त्यांना शरण जायचे आहे, ज्ञान मिळवायचे आहे. ज्ञानेश्वर महाराज लहान आहेत कीं मोठे आहेत हा निर्णय त्यांनाही घेता आला नाही. मोठेपणा किंवा लहानपणा हा शरीराचा धर्म आहे.

मी वयाने मोठा किंवा तू लहान आहेस. वय वगैरे हे शरीराचे आहे. ज्या शरीराला जास्ती कालाचा संबंध आला असेल ते मोठे आणि ज्या शरीराला कालाचा संबंध कमी आला असेल ते लहान आहे, ही भावना आहे. सगळा भावनेने भरलेला व्यवहार. वास्तविक पंचमहाभूतापासून उत्पन्न झालेल शरीर लहान किंवा मोठे ठरविणार कसे? पण चांगदेवांच्या सुध्दा बुध्दीमध्ये हा भ्रम निर्माण झाला. ज्ञानेश्वर महाराज लहान आहेत. वीस वर्षांचे वय आहे. आणि १४०० वर्षांचा मी आहे. मी म्हणजे शरीर-शरीर १४०० वर्षांचे आहे. ज्ञानेश्वर महाराजांचे शरीर २० वर्षांचे आहे. पण शरीरधारी जो आहे, ज्ञानी आत्मा किंवा १४०० वर्षांच्या शरीरात राहणारा आत्मा एकच आहे. तो काही जन्माला आलेला नाही. किंवा विनाशीही नाही. त्यामुळे त्याला इतकी वर्षे झाली म्हणून तो लहान आणि हा आत्मा मोठा असे म्हणताच येणार नाही.

राष्ट्रपती असो किंवा पंतप्रधान असो, कोणातही आयुष्य एक सेकंदाने वाढवायची शक्ति नाही. वेळ आली की, जाणारच. लौकिक सत्ता मोठी असेल पण इथे त्याचा काही उपयोग नाही. पण या ठिकाणीसुध्दा चांगदेवांनी आपल्या कतृत्वाने म्हणा, शास्त्राने सांगितलेले प्रयोग करुन म्हणा, अभ्यास तपश्चर्या करुन ते वाढविले. पण त्यांना सुध्दा आपल्या बुध्दीमध्ये न्युनता असल्याची, शरीरापेक्षा पलिकडे गेलो नाही. याची जाणीव झाली. याकरता किती अभ्यास केला पाहिजे! काय विलक्षण आहे! सांगता येत नाही. श्रध्दा ठेवून आपल करत राहायचे.

तर शरीर हे क्षेत्र आहे. शरीर, मन, बुध्दी ही शरीरात राहणारी तत्वे आहेत. वेदांत शास्त्राप्रमाणे या शरीरामध्ये एक सुक्ष्म शरीर त्यांनी मानले आहे. स्पर्शज्ञान करुन देणारे त्वचेंद्रिय आहे. रसाचे ज्ञान करुन देणारे रसनेंद्रिय आहे. त्याच प्रमाणे क्रिया करणारी कर्मेंद्रिये आहेत. आणि जिच्यामुळे सर्व हालचाली, क्रिया इत्यादी होताहेत ती क्रियाशक्ती म्हणजे प्राणशक्ती आहे. शरीराच्या निरनिराळ्या भागात राहणारे पंचप्राण आहेत. वास्तविक एकच वायू आहे. पण एकाचे ठिकाणी निरनिराळी कार्ये कल्पिल्याने निरनिराळी नावे त्याला दिली आहेत. मन आणि बुध्दी तत्व एकच आहे. पण त्याला वेगवेगळया रुपाने नावे दिली आहेत मात्र.

पंचज्ञानेंद्रिये, पंचप्राणेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये, मन, बुध्दी असे १७ पदार्थ साधनरुप आहेत. वेदांत शास्त्राप्रमाणे या सगळया साधान वर्गाला मिळून सूक्ष्म-शरीर म्हणतात. हे मात्र टिकणारे आहे. स्थूल शरीरापेक्षा जास्त टिकणारे आहे. शेवटी जाणार आहे. स्थूल शरीरात सूक्ष्म शरीर येऊन राहिले की चेतना, संवेदना सुरु झाली. जीवदशा असे पर्यंत त्याचे कार्य चालते.

पूर्व कर्म काही वेळा आड येतात, म्हणून आमचे प्रयत्न काही वेळा अयशस्वी होतात. अशा वेळी पुनर्जन्म किंवा त्याचे नियंत्रण करणारा कोणीतरी आहे, असे मानावेच लागते. पूर्वीची कर्मे तरी आम्हीच केली, ती तरी आम्हाला दूर का करता येऊ नयेत? तर त्या त्या कर्माप्रमाणे फळ देणारी नियामक कोणीतरी शक्ती आहे. ऑफिसमध्ये वेळच्या वेळी जातो, चांगले काम करतो, रजा कधी घेत नाही, त्याच्या कमनि प्रमोशन मिळत नाहीये. त्याचा व्यवस्थितपणा जाणणारा वरचा अधिकारी ज्ञाता - त्याच्या दृष्टीला आल्या नंतर हा योग्य आहे. असे समजून प्रमोशन मिळते आहे. कर्म हे अचेतन आहे. सेवा चेतन नाही. सेवेला जाणणारा चेतन आहे. त्याची बुध्दी अचेतन आहे. बुध्दिने निर्णय होतो. म्हणून आपले सगळे प्रयत्न नेहमी यशस्वी होत नाहीत. म्हणजे आमच्या प्रयत्नांनी आम्हाला सगळे करता येईल असे म्हणता येणार नाही. डॉक्टर सगळयांना बरे करु शकत नाहीये. त्याची ज्ञानशक्ती कमी आहे असा अर्थ नाही त्याचा. उत्तम ज्ञान आहे. त्याने रोग बरोबर जाणला आहे. औषधाही योग्य आहे. हजार हजार रुपयांची औषधे, इंजेक्शनस परदेशातून आणतात. ती दिल्यानंतर एकाचा रोग बरा

झालेला आहे. उत्तम आरोग्य प्राप्त झालेल आहे. पण तोच रोग दुसऱ्याला झाल्यानंतर औषध देणाराही तोच आहे, औषधही तेच आहे. पण याला लागू पडले नाही. डॉक्टर चुकला किंवा त्याची ज्ञानशक्ती कमी पडली असा त्याचा अर्थ नाही. पण यावेळेला मानवाच्या बुध्दीशक्तीच्या पलिकडे काहीतरी घडल आहे. कर्माचे फळ भोगायला लावणारा कोणीतरी आहे, असे मानावे लागते.

तर स्थूल-शरीर, सूक्ष्म-शरीर इत्यादि बद्दलचे वेदात सिध्दांत मधून मधून ऐकायचे आहेत. त्याच्यावर विचार करायचा. मराठीत संतांनी ग्रंथात हे विचार लिहून ठेवले आहेत. आणि हे सगळे सिध्दांत ज्याच्या मनांत बरोबर ठसले आहेत, त्यांना कधीही मोह होत नाही.

रामचंद्रांना वनात जाण्याची आज्ञा झाल्यावर त्यांना काही त्रास झाला नाही. राज्याभिषेकाची तयारी झाली, वसिष्ठ ऋषिंचे बोलावणे आले. तिकडेही निघाले. निर्विकार, शांत आहेत. तत्वज्ञानी आहेत. मोह नाही त्यांना. देहासक्ती नाहीये त्यांना. तिथे गेल्यानंतर आपली काय सोय होणार, बंगला, बागबगीचे आहेत का, असले विचार मनांत नाहीत. तेव्हा ही निश्चिंत अवस्था, निर्विकार अवस्था हे ज्ञानाचे महत्व आहे. हे ज्ञान मिळवण्याकरता कितीतरी जन्म घालवावे लागतात. कितीतरी जन्म साधनेचा अभ्यास करीत राहिले पाहिजे. ईश्वराची कृपा संपादन करण्याकरीता, ईश्वराची भक्ती केली पाहिजे. तत्व विचार केला पाहिजे. आणि शास्त्राने सांगितलेले कर्तव्यकर्म करीत राहिले पाहिजे. साधनमार्गात निरंतर राहिल्याने हळूहळू आपली बुध्दीही दोषरहीत होते. विशिष्ट गुण संपादन करता येतात. एखाद्या ज्ञानी महात्म्याची गाठ पडून जास्तजास्त मार्गदर्शन मिळून विकास होतो.

तेव्हा हे ज्ञान संपादन करण्याकरीता कोणत्या गुणांची आवश्यकता आहे, कोणते दोष घालवले पाहिजेत हा विचार या आध्यायात केला आहे. दोष कोणते टाकायचे, गुण कोणते घ्यायचे याला ज्ञानच त्यांनी म्हटले आहे. ज्ञान, ज्ञान दुसर काय? हेच ज्ञान आहे. ज्ञानाची साधना हेच ज्ञान आहे. ही साधना इतकी पक्की झाली पाहिजे. मनांत, बुध्दीत इतकी मुरली पाहिजे की त्या बुध्दीमध्ये पूर्ण समाधान आहे. ज्ञानाने जे मिळवायचे ते मिळूनच गेले असते. त्या करीता ही साधन. आपल्याला या साधनांचा विचार करावयाचा आहे.

।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।

-:-:-:-:-

रसज्ञावशा तारकं स्वादुलभ्यम्
गृहीतम् कदाचिन्न ते नाम दत्त
क्षामस्वापराधाम् क्षामस्वापराधाम् प्रभो क्लिन्नचित्त ।।

ईश्वराजवळ या स्तोत्रात अपराधांची क्षमा मागितली आहे. अपराध कोणते याचा उल्लेख करताहेत महाराज, "गृहीतम् कदाचिन्न ते नाम दत्त। " हे दत्तात्रेया आपल नांव मुखातून मी कधीही घेतल नाही. हा अपराध आहे. "तारकं स्वादु लभ्यम्" अस नांव आहे. तारक नांव आहे. नामस्मरण जर स्थल असत तर त्याच्या योगाने सर्व दु:खातून मी सुटलो असतो. आणि "स्वादु" म्हणजे अत्यंत मधूर आहे. समाधान देणार आहे. "रसज्ञा" म्हणजे जीभ ताब्यात आहे माझ्या. वाटेल ते बोलू शकतो, पण आपल नांव तेवढ घेऊ शकत नाही. म्हणून हा अपराध झालेला आहे. वाणीही ताब्यामध्ये आहे. वाणीने पुष्कळ बोलणे होते आहे. पण ईश्वराचे नांव तेवढे घेतले जातनाही. हा अपराध माझ्याकडून झालेला आहे. याची आपण क्षमा करावी. क्षामस्वापराधाम्..... अत्यंत दयाळू ज्यांचे अंत:करण आहे असे आपण आहात. म्हणून या अपराधांची आपण क्षमा करावी. या पहिल्या श्लोकात मी नामस्मरण कधीच केलेले नाही असा उल्लेख केलेला आहे. केव्हा घेता येईल तेही सांगताहेत महाराज पुढच्या श्लोकात.

वियोन्यन्तरे दैव दार्व्याद्विभो प्राग्गृहीतं कदा.......

या जन्मांत केव्हांही घेतले नाही. या पूर्वीच्या जन्मात मी दुसऱ्या योनीत गेलो होतो तेव्हाही माझ्याकडून नामस्मरण झाले नाही. दैव हे इतक बलवत्तर आहे की, त्यावेळेस काही कल्पनाही नाहीये. ईश्वराचे नांव घ्याव म्हणजे आपला उध्दार होईल असे अज्ञान योनीत असताना कधीही वाटले नाही. पण तेव्हा नामस्मरण घडले नाही ही सबब सांगण्याचे काय कारण आहे। दैव तरी तयार कोणी केले? म्हणून स्वत:कडेच अपराध घेतला आहे. त्या अपराधाची क्षमा करावी

"मया मातृगर्भस्थितीप्राप्त कष्टात गृहीतं..... ।।

गर्भवासामध्ये असतांना मला फार कष्ट झाले. त्या अवस्थेची सध्या आपल्याला जाणीव नसल्यामुळे त्या कष्टांची कल्पना येत नाही. पण गर्भवासासारखे दुसरे दु:ख नाही असे म्हणतात. पण त्यावेळीही नामस्मरण घडल नाही. कारणे असतील त्याची, पण तो अपराधच आहे. परंतु त्यावेळी कष्टामुळे तरी नाव घ्यायला पाहिजे होते. पण वेदनेमुळे दु:खामुळे ईश्वराचे स्मरण होत नाही. पण दु:खातही ईश्वराचे स्मरण करणारे भक्त आहेत.

"मया जात मात्रेण संमोहितेन गृहीतं....... ।।"

जन्माला आल्यानंतर मोहामध्ये मी पडलो. गर्भामध्ये असताना जीव ईश्वराची स्तूती करतो. अतिशय वेदना झाल्यावर विस्मरणाही होते आहे. पण जन्माला आल्यानंतर मोहात पडल्याने सगळे ज्ञान गेल। त्यामुळे ईश्वराच नामस्मरण काहीच घडले नाही. हा जन्माला आल्यानंतरचा अपराध आहे. त्या त्या अपराधाची क्षमा करावी. पूर्वीच्या जन्मी ज्यांनी चांगली ईश्वराची भक्ती केलेली असते अशा ज्ञानी जीवांना जन्माला आल्यावरही विस्मरण घडत नाही. पण मी तितका भाग्यवान नसल्यानें इतर सामान्य लोकांप्रमाणे मी मोहात पडलो आणि विस्मरण घडले.

"मया क्रीडनासक्तचित्तोन बाल्ये गृहीतं .......।। "

बाल्यावस्थेत खेळातच माझे मन आसक्त झाल्याने नामस्मरण कुठून घडणार? प्रल्हाद, ध्रुवासारखे एखादेच असतात. लहान वयातसुध्दा बाल क्रीडा करण्याकडे त्यांचे लक्ष नाही. लहानपणापासूनच ईश्वराची भक्ती करा.

असे प्रल्हादजींचे सांगणे असे. भागवंताच्या नामाचे महात्म्य, आत्मानात्म विचार त्यांनी आपल्या सवंगडयांना सांगितला आणि त्या मुलांना तो पटला. तेव्हा बालवयांत नामस्मरण घडले नाही या अपराधाची आपण क्षमा करावी.

" मया यौवनेज्ञानतो भोगतोषाद गृहीतं .....।। "

यौवनांत विषयभोगाकडेच लक्ष गेलेले आहे. विषयभोगांचाच आनंद मिळवावा असे वाटून, त्या आनंदात अज्ञानाने सापडलो. त्यामुळे नामस्मरण घडले नाही. विषयभोगाकरता द्रव्यार्जन पाहिजे. त्याच्या मध्ये आयुष्य जाते. म्हणजे संपूर्ण यौवन नामस्मरण रहित गेले, त्या अपराधाची आपण क्षमा करावी. तारुण्यातही ईश्वराची भक्ती करणारे भरतासारखे आहेत. आईने राज्य मिळवून दिले, पण रामराज येत नाहीत. त्यांना चौदा वर्षे वनांत रहावे लागेल. हे दोघांचे कर्तव्य आहे. असं सांगितल्यामुळे अगदी ऐन तारुण्यामध्ये भरताने सर्व भोग सोडून दिलेले आहेत. ईश्वरनिष्ठा, ईश्वरप्रेम यामुळे सर्व इंद्रीयावर ताबा आहे. भरताचा . तेव्हायौवनांत अज्ञानाने विषय भोगाकडे लक्ष गेल्यामुळे आपले नांव घेतले नाही. हा अपराधच आहे, त्याबद्दल आपण क्षमा करावी.

"मया स्थाविरेनिघ्न सर्वेंद्रियेण गृहीतं ......।।

"स्थाविर" म्हणजे वृध्दावस्था म्हातारपण प्राप्त झाले आहे. म्हातारपणामध्येही नामस्मरण घडले नाही. इंद्रिये ताब्यात राहिलेली नाहीत. इंद्रियांच्या शक्ती कमी झाल्यात – मानसीक शक्ती, शारिरीक शक्ती सगळच कमी झाल. त्या शक्ती असतानाही घेतले नाही. [नाम] आणि आता तर शक्तीच गेली. पूर्वी तशी तयारी करून ठेवली नाही. प्रल्हादजींच्या उपदेशा प्रमाणे बालपणापासूनच नामस्मरण करण्याचा अभ्यास केला असता तर वृध्दावस्थेतही ते घडू शकले असते. पहिल्यापासूनच चुकलेल आहे. म्हणून त्याबद्दल आपण क्षमा करावी.

हृषिकेश मे वाङ्.मनकायजातम् ।
हरे ज्ञानतो ज्ञानतो विश्वसाक्षीन् ।
क्षमस्वापराधाम –......

आतापर्यंत "गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त" हाच अपराध पुढे मांडला होता. बाल्यावस्थेत नाही, तारुण्यावस्थेत नाही, वृध्दावस्थेत नाही, दुसऱ्या योनीत – पशुपक्षांच्या जन्मांत घेतल नाही, असं म्हटलं होते.

आता या श्लोकामध्ये नामस्मरण न घडणं म्हणजे वाणीचा अपराध ही कल्पना करताहेत. वाणीने, मनाने आणि शरीराने या तिघांकडूनही अपराध झालेले आहेत. ज्ञानत:– बुध्दीपूर्वक अपराध घडलेले आहेत आणि अज्ञानत: ही अपराध घडलेले आहेत. ते सगळे अपराध मी केलेले नाहीत असे म्हणून काही भागणार नाही. कारण आपण विश्वसाक्षी आहांत. त्यामुळे माझ्या सर्व अपराधांची नोंद आपल्याकडे आहे, असे कबूल करायचे आहे. शिवाय त्यांनी देवाला हृषिकेश म्हणून संबोधन केले आहे. "हृषिक" म्हणजे इंद्रिय. शरिराच्या सर्व इंद्रियांचे आपण स्वामी आहात. आणि असं असतांना माझ्या हातून अपराध घडलेले आहेत. म्हणजे आपले जर लक्ष असते, तर माझ्याकडून अपराध कदाचित घडलेही नसते, असेही सुचवायचे आहे त्यांना. परंतु माझ्या पूर्व दुष्कर्माने म्हणा अपराध झाले खरे माझ्या हातून. तरीही वाणी, मन, शरीर या तिघांकडून झालेल्या अपराधांची आपण क्षमा करावी.

स्मृतो ध्यात अवाहितो स्यर्चितो वा ।
न गीत: स्तुतो वंदितो वा न जप्त: ।।
क्षमस्वापराधान् ........

३/-...

अपराध काय काय घडलेत ते सांगताहेत. मनान आपल स्मरण सुध्दा केल नाही, ध्यान केल नाही, आपले मी कधी साधो अवाहनही केले नाही आणि अर्चनही घडले नाही. आपले गुणानुवादही मी गीतांच्या माध्यमातून वर्णन केले नाहीत. स्तुतीही केली नाही. वंदन केलेनाही. जप म्हणजे नामस्मरण केलेनाही. पण यापैकी काहीही माझ्याकडून घडले नाही.

बार्शीला जोगा परमानंद म्हणून होऊन गेले. श्री. भागवंत मंदिराजवळ त्यांची समाधी आहे. भागवद्गीतेतला एक श्लोक म्हणून एक साष्टांग नमस्कार घालायचा. असे रोज सातशे श्लोक म्हणायचे आणि सातशे नमस्कार घालायचे. कोणाकडे काही मागायचे नाही काही नाही. ही वंदनभक्ती चालू होती. कोणी त्यांना एक पितांबर नेसायला दिला एकदा. नेसले ते. आणि त्या दिवशी त्या पितांबराकडे लक्ष गेले. नमस्कार घालताना पितांबराला माती तर लागणार नाही ना असा विचार मनांत आला. त्यामुळे नमस्कार घालायला वेळ लागला. मग त्यांनी स्वत:ला काहीतरी शिक्षा करून घ्यायचे ठरविले. चूक झाल्याचे त्यांना जाणवले. सकाळची वेळ एक शेतकरी बैल घेऊन निघाला होता. त्याला त्यांनी बोलावून सांगितले तुला हा पितांबर देतो. बैलाच्या दोरीला माझे पाय घट्ट बांध आणि बैलाला चाबूक मार. त्या शेतकऱ्याला पितांबर मिळाल्यावर ह्यांनी सांगितल्याप्रमाणे केले. फरपटत गेल्याने ह्यांचे शरीर रक्तबंबाळ झाले. देवांने सोडविले त्यांना. शरीराने सुध्दा इतकी सेवा करीत होते ते. म्हणून स्वत:च शासन करून घेतले.

नरसोबावाडीला एक सेवेकरी होते. त्यांना पिशाच्च बाधा होती. ते देवाला रोज फुले आणून घालायचे. रात्री बाहेर पडून ५/१० मैलावरच्या आसपासच्या गावात जाऊन पुष्कळ फुले घेऊन यायचे. हार तयार करून घातले की समाधान मिळायचे, दुसरे काही नाही. माधुकरी मागून आणायची. कोणी दिला तर चहा वगैरे घ्यायचा अशी त्यांची भक्ती होती.

तेव्हा अशा तऱ्हे माझ्या हातून कोणतीच भक्ती घडली नाही. या स्तोत्रामध्ये सगळा पश्चाताप व्यक्त केलेला आहे. अशी सेवा घडण्याचा योग असताना अशी सेवा घडली नाही, याबद्दल मनाला अत्यंत व्यथा होत आहेत. याचा पश्चाताप होऊन त्या अपराधाची क्षमा मागितली आहे.

> दयाब्धिर्भवाहङ न सागाश्च मातृश ।
> भवत्यस्तसंतोर्भवान्ये शरण्य: ।।
> यथा लंबनम् भूर्हि भूनि:सृतांघ्रेरिती ।
> प्रार्थितम् दत्त शिष्येण सारम् ।।

शेवटची प्रार्थना करताहेत. आपल्यासारखो दयासागर दुसरे कोणीही नाही. दयेला काही आपल्याकडे कमी नाही. माझ्यावर जर आपण दया केलीत तर दया संपून जाईल असे नाहीये. आणि माझ्यासारखा अपराधी कोणी नाही. म्हणजे दया करायला मी पात्र आहे, असे ह्या श्लोकात म्हटले आहे. माझ्यासारख्या अपराध्याला आपण संरक्षण देणारे आहांत. त्याला दृष्टांत [उदाहरण] देताहेत महाराज.

जमिनीवर चालताना पाय घसरला तर त्याला आधार कोणाचा? जमिनीचाच. त्याप्रमाणे मी ह्या संसारात चुकलेलो आहे, मला दुसरा आधार कसला असणार? कोणाकडे जायचे? आपलाच. अपराधाची जाणीव आहे, पश्चाताप झालेला आहे. अत्यंत तळमळीने ही प्रार्थना केली आहे. ईश्वराने आमचे रक्षण करायचे आहे. दूसरे कोणीही करू शकत नाहीये. कारण आमचे रक्षण करायची आम्हाला बुध्दी असती तर असं घडलच कस असत? सगळी इंद्रिये आमची वाटेल तशी दुसरीकडे जाऊ शकतात. आम्ही त्यांना जाऊ देतो. पण देवांचे वंदन, अर्चन इत्यादि करणे मात्र घडत नाही. म्हणजे आम्ही स्वत:सुध्दा आमचा उध्दार करू शकत नाही. आपण सर्वज्ञ आहात, हृषिकेश आहात, आणि दयासागर आहात. त्यामुळे आपणच उध्दार करावा अशी तळमळीने प्रार्थना आहे. "अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त".

।। श्रीगुरु:शरणम्।।

पापम् तापम् व्याधिमाधिंच दैन्यम्।
भीतिम् क्लेशम् त्वम् हरा शुत्वदन्यम्।
त्रातारम् नो वीक्ष ईशात्सजूर्ते।
घोरात्कष्टादुध्दरास्मान नमस्ते।।

सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांनी भगवान दत्तात्रेयांची प्रार्थना केली आहे. सर्व जीवांनी देवाजवळ काय मागावे हे यात सुचविलेले आहे. जीवांना त्याची आवश्यकता आहे. असेच हे मागणे आहे. ज्याच्याजवळ मागायचे त्याचीही योग्यता मोठीच आहे. आपल्याला जे मागायचे ते देणारा ईश्वरच आहे. म्हणून इतरांजवळ मागण्यापेक्षा ईश्वराजवळ मागायला हरकत नाही, आणि हे [ वर सांगितलेले ]मागावे असे महाराजांचे म्हणणे आहे. सकाम भक्ती आणि निष्काम भक्ती असे भक्तीचे प्रकार आहे.

प्रल्हादजीच्या सारख्या निष्काम भक्ताला नृसिंहांनी पुष्कळ सांगितले, काही तरी वर मागुन घे बाबा. त्यावर प्रल्हादजी म्हणाले, "देवा मी तर अकाम आहे. काहीही न मागणारा भक्त आहे." देवांनी फारच आग्रह केल्यानंतर प्रल्हादजींनी " माझ्या मनात कोणतीच इच्छा उत्पन्न होऊ नये हा वर द्या " असे शेवटी मागून घेतले. म्हणजे प्रल्हादजींची इतकी भूमिका तयार झाली होती. अभ्यास होता. प्रत्यक्ष बाप जीवावर उठलेला असतांनासुध्दा त्यांनी देवाजवळ कधीही काही मागितले नाही. " मला वाचवा " असे म्हटले असते तर देवाने वाचविले असते. पण काही न मागतांच देवाने त्याची इच्छा पूर्ण केली. म्हणजे जीवनाबद्दलसुध्दा आसक्ती नाहीये, असे फार मोठे भक्त होते. पण ही भूमिका व्हायला अनेक जन्मांचा अभ्यास पाहिजे, सद्गुरुंची कृपा पाहिजे. भगवंताची भक्ती घडण्याकरिता, काहीतरी [illegible] स्वास्थ पाहिजे त्यासाठी हे [ स्तोत्र ] मागणे मागितले आहे.

पापम्, तापम्, व्याधीम् - -- - --

हे सर्व आप्रण दूर करा अशी प्रार्थना आहे.

पापम् हर। पाप हे मूळ कारण आहे. दु:ख जी आपल्याला भोगावी लागतात त्याच कारण आपल्याकडूनच घडलेली पाप। दैवयोग आपण म्हणतो. सुख दु:ख दैवाने मिळतात. दैव याचा अर्थ पूर्व आपल्या हांतून घडलेली कर्मे। दैव आणि प्रयत्न वेगळे आहेत असे नाही. पूर्वी केलेला प्रयत्न म्हणजे दैव आणि सध्या चालू असलेला प्रयत्न म्हणजे कर्म असे म्हणतात. आणि ते जे कर्म घडलेले आहे - पुण्य किंवा पाप - त्याचे फळ हे निश्चित मिळते. ईश्वरानेच त्या कर्माची शक्ती निर्माण केली आहे. किंवा कर्म करणाऱ्याच्या " मी करतो आहे. ""अशा अहंकारामुळेही कर्मात शक्ती निर्माण होते आहे. आणि त्याचे फळ हे निश्चित मिळते. तेव्हा दु:खाला कारण म्हणजे पाप.

ताप म्हणजेही दु:खच - आध्यात्मिक, आधिदैवी आणि अधिभौतिक - असे तीन प्रकार त्या तापात, दु:खात आहेत. आध्यात्मिक दु:ख म्हणजे शरीरामध्ये काहीतरी रोग उत्पन्न होणे, त्यामुळे निर्माण होणारी दु:ख किंवा मनाच्या विरुध्द जरी घडले तरी दु:खच आहे ते. ही दु:ख जायची असतील तर शरीरामध्ये कधीही रोग उत्पन्न होता कामा नये. पण असं तर प्रपंचामध्ये होत नाही. इंद्रासहीत सर्वानाही ही दु:ख/ताप आहेत. दैत्यांनी युध्द करायचे, देवांचे राज्य काढून घ्यायचे, देवांनी निर्वासित म्हणून स्वर्गातून निघून जायचे इत्यादी, पुष्कळ गोष्टी मनाच्या विरुध्द घडतातच आहेत.

पानं २ .....

शरीरामध्ये काहीच विकार उत्पन्न व्हायचा नाही म्हणजे अध्यात्मिक ताप [ म्हणजे दुःख ] नाही. पण शरीरामध्ये कधीही विकृती उत्पन्न न होणे हे कसं शक्य आहे? कफ, वात, पित्त यांनी शरीराचे साम्य बिघडले. साम्य म्हणजे आरोग्य आणि वैषम्य उत्पन्न झाले म्हणजे अनारोग्य. शरीर नेहमी आरोग्य संपन्न राहीले म्हणजे रोगामुळे [ उत्पन्न ] होणारा ताप दूर होतो. पण हे शक्य नाही. योग-शास्त्रकारांनीसुध्दा ईश्वराची भक्ती करायला सांगितलेली आहे. योग म्हणजे प्रयत्न आहेत . प्रयत्नांनी सर्व काही मिळवता येते. अनेक सिध्दी त्यांनी सांगितल्या आहेत. मानसिक शक्तींचा विकास म्हणजे सर्व सिध्दी आहेत. अभ्यासाने मानसिक शक्तींचा विकास करता येतो. पण त्यांनीसुध्दा ईश्वराची उपासना आवश्यक आहे. असे मान्य केले आहे. अभ्यास करून वज्रासारखे शरीर करणे वगैरे सिध्दी मिळवता येतात. पण तो अभ्यास पूर्ण झाल्याशिवाय कसे चालणार? मध्येच विघ्ने येतात. ती दूर कशी करणार? त्या करीता ईश्वराची उपासना आवश्यक आहे असे त्यांनीही मान्य केले आहे. शरीरामध्ये विकृती उत्पन्न होणे, आळस निर्माण होणे, नैराश्य येणे काय उपयोग आहे साधना करून, एखादा दिवस साधना नाही केली तर काय होणार आहे इत्यादि-- असे जे प्रतिबंध निर्माण होतात. त्यामुळे साधनाभ्यास नियमाने आणि दीर्घकाळ होत नाही आणि अभ्यास नियमाने आणि दीर्घकाळ न झाल्याने मानसिक, शरीराचे आरोग्य राखता येत नाही. त्यामुळे ताप होतो. अध्यात्मिक दुःख सर्वांनाच अपरिहार्य आहेत. ती दूर करावी अशी प्रार्थना प्रथम केली आहे. पाप, ताप, व्याधी आधि इत्यादी सात दोष ईश्वरानेच दूर करावेत. कारण तो या दोषापासून अलिप्त आहे. त्यामुळे या दोषांनी जर्जर झालेल्या जीवांचे दोष तो दूर करतो म्हणून ही प्रार्थना प्रथम केली आहे- आमच्या हातून घडलेली जी काही पाप असतील, पूर्वीचे प्रतिबंधक दैव आहे ते आपण नाहीसं करावे.

"आशु हर " म्हणतात. आता त्याच [ पूर्व कर्माच ] फळ म्हणजे काय? कर्म तर होऊन गेलेल आहे. ते हरण करायचे म्हणजे ज्यावेळेला त्याचे फळ मिळायला सुरवात झाली आहे त्यावेळेला काही हरण होऊ शकत नाही. फळ देऊन ते मोकळे होणार, तुरुंगवासाची शिक्षा होण्यापूर्वी जर वकीलाने बचावाचा प्रयत्न केला तर अपराध्याला निर्दोषी ठरवता येऊ शकते. पण एकदा न्यायाधिशांनी निर्णय दिला. त्याप्रमाणे तो तुरुंगात जाऊन शिक्षा भोगायला लागल्यावर काय करणार? शिक्षा संपल्यावरच बाहेर यायचे.

त्याप्रमाणे आता ताप सुरु झाला आहे. पण पूर्वीचे संचित कर्म भोगणे सुरु होण्यापूर्वी ती तरी आपण दूर करा. फळ देण्याची शक्ती ईश्वरानेच कर्मामध्ये निर्माण केलेली आहे. आणि त्या पूर्वीच्या पाप कर्मामुळे दुःख/ताप हा सुरु झालेला आहे. आता ते दुःखरूपी [ कर्माचे ] फळ नाहीसे करायचे म्हणजे त्या कर्माची शक्तीच नाहीशी केल्यासारखे होणार। पण त्या प्रारब्ध कर्माचीही शक्ती नाहीशी करा अशी प्रार्थना यात दिसून येते.

एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा।
हरिकृपे त्याचा नाश आहे।।

हरिकृपेमध्ये अशी फार मोठी शक्ती आहे. जी केलेली कर्म आहेत त्यांचा अजून विचार व्हायचा आहे. पण ती कर्मही नाहीशी होऊ शकतात. ज्या कर्माचा विचार झालेला आहे. आणि त्याचे फळ भोगायला सुरुवात झालेली आहे, तेही नाहीसे होते. त्याकरता तीही प्रार्थना केली आहे. ईश्वराची शक्ती अमर्याद आहे.

पान ३ .......

व्याधिंम्, आधिम् च दैन्यम्

ही सगळी पापकर्माची फळे आहेत. "तापम् हर" यात पापाचाच अर्थ आहे. व्याधीम् म्हणजे रोग. व्याधीमुळे ताप होतो. पापकर्म भोगायला सुरवात झाल्यानंतर ज्या व्याधी होतात त्याही दूर करा.

आधिंम् म्हणजे मानसिक व्यथा. मनाविरुध्द घडल्याने निर्माण होणारे क्लेशदायक विचार मानसिक व्यथा निर्माण करतात. मनाविरुध्द घडल्यानंतर तेच तेच विचार सारखे मनांत येतात. आणि त्यांचे मनांत येणे आपण थांबवू शकत नाही. आणि त्यामुळे होणारा मन:स्ताप आपण सहन करु शकत नाही.

दैन्यम् म्हणजे दारिद्र आणि मनाची अत्यंत निराशाजनक अवस्था की, ज्या अवस्थेत आपल्या हातून चांगले कांही घडत नाही. "माझ्या हातून काय घडणार, नशिबच माझ्या विरुध्द आहे" असे म्हणून मनुष्य निराश होतो. ध्रुवासारखा प्रयत्नवादी काही निराश झाला नाही. आईने सांगितल्यावर लगेच त्याने वनाचा रस्ता धरला. इतक्या लहान वयातसुध्दा "काय नशिबच आमच असं आहे, राजेसाहेबांची आमच्यावर कृपाच नाही." असं म्हणत तो बसला नाही. नारदांनी त्याच्या मनाची परिक्षा पाहिली. नारदांनी त्याला सांगितले कि तुला सिंहासनावर बसण्यासाठी मी राजाला सांगतो. पण ध्रुव निश्चयाने म्हणाला नाही, मी आता येणार नाही. ईश्वराच्या कृपेने स्वतंत्र स्थान मला पाहिजे आहे म्हणून तप करण्यासाठी मी निघालो आहे.

तेव्हा हे दैन्य जर मनात उत्पन्न झाल तर व्यवहारही होत नाही परमार्थही होत नाही. तेही दैन्य मनातून दूर होऊन उत्साह निर्माण व्हायला पाहिजे.

भीतिम् क्लेशम् -----

ही सगळी पापाची फळ आहेत. अनेक प्रकारची भीति आहे. देवादिकांनासुध्दा भीती आहे. हातात सत्ता असतानाही ती टिकेल कीं नाही, ही भीती आहे. काय त्या सत्तेचा उपयोग! सुख कस होणार! इंद्रादिक सर्वही जीवांना सुख प्रत्यक्ष उपभोगात असतानाही जर " हे आपल सुख जाणार तर नाही ना " असे वाटले कीं संपल! तर ही अशी भीती नसणं हे दैवी प्रकृतीचे [कृपेचे] लक्षण आहे. भीतीम हरं म्हणजे माझी मन:स्थिती निर्भय करा. भागवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायात दैवी संपत्ती वर्णन केली आहे. त्यात "अभय" हे प्रथम वर्णन केले आहे. निर्भय असणं, आजारी असतांना, पैसा नसताना, इतर कोणतीही अनुकुलता नसतानाही निर्भयता असणं म्हणजे उत्तम सात्त्विक दैवी प्रकृतीचे लक्षण आहे. ते मागणं यांत मागितले आहे.

क्लेश आणि ताप हा एकच अर्थ आहे असे वाटते. पण क्लेश शब्दाचा अर्थच योगशास्त्रात थोडा निराळा केलेला आहे. पुण्याला सुध्दा वेदांत शास्त्राप्रमाणे पाप असच नांव आहे. बंधन होते आपल्याला. पूर्वीच्या पुण्यकर्माप्रमाणे सुख भोगायचे आहे आपल्याला. ध्रुवाने चार-पाच महिने खडतर तपश्चर्या केली आणि भगवंताच्या कृपेने त्याला सर्वोच्च स्थान मिळाले. आणि नंतर त्याला पश्चाताप झाला. " काय मागितल " म्हणाला मी! आता या सर्वोच्च स्थानात राहायचे म्हणजे इतर हेवा करणारच. पुण्य असेपर्यंत ईश्वराच्या कृपेने ते सुख भोगायला मिळेल म्हणा. पण व्देष करणारी मंडळीही असणारच विरोध झाला म्हणजे पुन्हा मनांत शंका येणार--- हे सुख टिकेल की नाही. हे असे जे प्रतिबंध निर्माण होतात त्यामुळे सुख कसे लाभणार! शिवाय याच्या मध्ये अर्थ तरी काय आहे, म्हणाला अपमान धुवून निघाला, सर्वोच्च स्थान मिळाल पण त्यामुळे अहंकारही होण्याचा संभव आहे. इतरांपेक्षा मी मोठा आहे असे वाटू लागणार. म्हणजे ईश्वराकडे लक्ष कमी होणार.

पान ४.....

ज्याच्या कृपेने हे आपल्याला मिळाले त्याची आठवण राहील की नाही हा एक पुन्हा प्रश्न आहे. असे अनेक दोष ध्रुवाच्या लक्षात आल्यावर त्याला पश्चाताप झाला. चुकलो म्हणाला पण आता कांही इलाज नाही. पुण्य केले आहे आता त्याचे फळ भोगलेच पाहिजे.

म्हणून सकाम कर्म नको जे म्हणतात, ते या करता. पण तशी आपली एकदम भूमिका होत नाही. तर क्लेश म्हणजे मनात सतत उत्पन्न होणाऱ्या इच्छा, राग, व्देष, अज्ञान हे सर्व दोषच आहेत. देह म्हणजे मी आहे. ही गैरसमजूत, भ्रांती आहे. त्यामुळे ही पुढची सर्व दुःख निर्माण होतात. देहात्मवादाने सर्व ज्ञानी पंडीतही ग्रासलेले आहेत ते पांडीत्य दाखवतात. पण मी देह आहे ही बुध्दी काही जात नाही. मी काळा आहे, मी गोरा आहे, मी सुंदर आहे- मी म्हणजे शरीर आणि शरीराला उद्देशूनच तो हे सर्व समजतो. असा हा देहात्मवाद बळावला की, इतर कुठे लक्ष जात नाही. फार काय, घरातल्या माणसाकडेही लक्ष जात नाही. तो फार मोठा अभिमान उत्पन्न होतो- मी मिळवणारा आहे. मी कुटुंब प्रमुख आहे. माझ्या आज्ञेत सर्वांनी राहीले पाहिजे. ज्यांचे पालनपोषण आपण करतो त्यांच्याबद्दल सुध्दा अभिमान आहे. त्यांनी जरा आपल्या मनाविरुध्द केले की, आपल्याला राग येतो. मग ईश्वर, संत इत्यादी बाजूलाच राहिले. हे स्वाभाविक क्लेश मानलेले आहेत. आणि यामुळे सगळी कर्महीं दोषी होतात. शुध्द कर्म होत नाही. या सगळयाला मी देह आहे ही भ्रांती, अज्ञान कारणीभूत आहे. देहापेक्षा मी निराळा आहे, मी अजरामर आहे, आत्मा अविनाशी आहे असे अनेक देह मी धारण केलेले आहेत. देहाचा आणि माझा संबंध काही काळापुरता आहे. अशी जर भावना असली तर कोणी मानसन्मान केला तरी त्याच्याबद्दल मैत्री वाटणार नाही. निंदा केली तर त्याच्याबद्दल शत्रुत्व वाटणार नाही.

पण मुळामध्येच अविद्या, भ्रांती आहे त्यालाच क्लेश मानले आहे. देहात्मवाद सुटल्याशिवाय निर्भयता उत्पन्न होत नाही. आपल्या कर्माबद्दल विचारही होऊ शकत नाही. देहात्मवादापुढे दैववादाला काही थारा नाही. आपण आता कर्म करायच आणि आपण सुखी व्हायच म्हणजे देहाला सुखी करायचे. पूर्वीच्या कर्माचा, पापपुण्याचा, नितीअनितीचा कशाचा विचार नाही, संबंध नाही. मला सुख मिळाले पाहिजे. न्याय अन्याय काही पाहिले जात नाही. आणि अशी कर्मे होऊन जातात. एकाला असे कर्म करताना पाहून दुसराही तेच .. करतो. त्याला जर या अशा वागण्याने सुख मिळते मग मीही तसेच का करू नये? पण त्यामुळे सामुदायिक दुरीत तयार होतात. वैयक्तिक दूरीत तर आहेतच त्यात आणखी सामुदायिक दुरीते तयार झाली की त्याचा एकदम परिणाम होतो. सत्तर हजार वस्तीचे हिरोशिमा शहर एक बॉम्ब पडल्यावर भस्मसात झाल की नाही! सगळयांचे दूरीत एकवटून आले. अशी दूरीत तयार झाली समाजात, राष्ट्रात व शेवटी विश्वात सुख नाहीसे होते म्हणून ज्ञानेश्वर महाराज म्हणतात-

दूरीतांचे तिमीर जावो

वैयक्तिक सामुदायिक इत्यादि सर्वही दूरीतांचा क्षय व्हायला पाहिजे. त्याशिवाय काही नाही. आणि त्याकरता ईश्वराची प्रार्थना व्हायला पाहिजे. ही दूरीत ज्या राग, व्देष, मत्सर, शत्रुत्व इत्यादि ज्या दुर्गुणांमुळे घडतात ते दुर्गुण नष्ट झाले पाहिजेत. म्हणून ही प्रार्थना केली आहे.

आणि मग बुध्दी शुध्द व्हावी, निर्भय व्हावी म्हणून पुढची प्रार्थना केली आहे. ती तशी झाली म्हणजे प्रपंच काय परमार्थ काय सुखाचा होतो.

पान नं. ५.......

त्वम हर आशु

म्हणजे हे पाप, ताप, व्याधि इत्यादी लवकर आपण दूर करा.

त्वद नो त्रातारम् नो वीक्ष

ईशात्सजुर्तो ----८

आपल्याशिवाय दुसरा कोणीही त्राता नाहीये. हे सर्व दूर करण्याची शक्ती आपल्याशिवाय कोणाच्यातच नाही. लौकिक जगतातला राष्ट्रपति, सेनापती, पंतप्रधान इत्यादी कोणीही सर्वोच्च पदाचा अधिकारी असला तरी त्याच्याकडेही ही शक्ती नाही, चालू झालेल दुःख दूर करण हे डॉक्टरला सुध्दा शक्य नाहीये. औषध देईल तो पण थांबाव लागेल त्याला . रोग कोणता आहे ते जाणणे, औषधात कोणती शक्ती आहे हे ज्ञान डॉक्टरला आहे. पण त्यामुळे तात्काळ तो दुःख, वेदना दूर करु शकेल अस नाहीये. श्रीगुरु चरित्रातल्या कथेत सांगितल्याप्रमाणे नुसत्या कृपादृष्टीने पाहिल्यावरच राजाचा रोग बरा झाला. [त्यापूर्वी केलेले सर्व मानवी प्रयत्न असफल ठरले होते, ] अशा या शक्तीवर ज्यांचा विश्वास आहे, त्यांना या शक्तीचा महिमा पटलेला आहे. ते म्हणतात आपण हे दुःख लवकर दूर करा. आपल्याशिवाय दुसरा कोणीही त्राता नाही. आणि त्यांची तशी मनाची खात्री आहे.

भक्तांची सर्व दुःख, पीडा दूर करण्याचे आपले सामर्थ्य आहे. म्हणून

घोरात् कष्टात ........

ही नम्र प्रार्थना/भावना या स्तोत्रामध्ये केलेली आहे. या एकाच जन्मात नव्हे तर अनेक जन्मामध्ये या सर्व गोष्टी आपल्याला भोगाव्या लागणार आहेत पशुच्या योनीत गेल्यावर चाबकाचे फटके खाल्ले तरी चालायचे. कारण त्यावेळी कांही जाणच नाहीये. हे दुःख आहे अशी कल्पनाच नाहीये. पण मनुष्य किंवा देव योनीत आल्यावर विचारशक्ती प्राप्त झाल्यावर हे सर्व दुःख घालवणं आपल्याला शक्य नाही. हे जाणवते. यज्ञयाग, तीर्थ-यात्रा इत्यादि सारखी पुण्यकर्मे करुन पाप जात. पण ती पुण्यकर्मे जर मध्येच बंद पडली तर ! काय करायचे? हाही प्रश्न आहे.

साधना सुरु झाल्यानंतर साधनेत जी विघ्ने येतील त्यापासून सर्व बाजूंनी आमचे संरक्षण करा अशी प्रार्थना केली आहे. त्यातूनही साधना पूर्ण झाली व तिचे फल मिळालेतर "मी हे केले अता अहंकार उत्पन्न होतो." ईश्वर बाजूलाच राहतो. पहिल्यापासून शेवटपर्यंत जीवाची बुध्दी निर्दोष ठेवणारा, फल मिळाल्यानंतरही त्याचा अभिमान उत्पन्न न होऊ देणारा आपल्याशिवाय कोणीही नाही. खऱ्या भागवत् भक्तांनीच हे जाणलेल आहे. त्यांच्याजवळ हे ज्ञान आहे. भगवंताच्या शक्तीची जाणीव आहे. म्हणून त्यांना कधीही अहंकार उत्पन्न होत नाही.

अहंकाराचा वारा न लागे
माझिया विष्णू दासा ।।

~~नामदेवांनी ही प्रार्थना सुद्धाप केलेली आहे. की, भाविक भक्तांना~~ अहंकाराचा वारा कधी लागू देऊ नका. नाहीतर अहंकारामुळे केलेली भक्ती, साधना फुकट जाते. व्यवहारातसमजले जाणारे सत्तेचे, संपत्तीचे, किर्तीचे सन्मानाचे जे सुख समजले जाते ते तात्कालीक आहे. किंवा असे सुख असताना तशाच प्रकारचा अधिक सुख असलेला माणूस बघितला की पुन्हा वैषम्याचे दुःख आहे. प्रांताचा मंत्री झाल्यावर केंद्राचा मंत्री कधी होईन अशी इच्छा असतेच. त्यासाठी पक्ष बदलायची सुध्दा तयारी आहे. अशा सगळ्या वासना नाहीश्या करणं, आहे त्या परिस्थितीत सुख मानणं, मन शांत ठेवणं हे सर्व इश्वराच्या कृपेने जमू शकत.

पान नं. ६......

ह्या सर्व भावना लक्षात घेऊन महाराजांनी ही प्रार्थना केली आहे. पाचच श्लोक आहेत. पण फार महत्वाचे श्लोक आहेत. रोज त्याचे पठण केले पाहिजे. त्यांतल्या त्यात हा श्लोक फारच महत्वाचा आहे. जपाला फार चांगला मंत्र आहे.

।। "अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त" ।।

धर्मे प्रितीम् सन्मतिम् देवभक्तिम्
सत्संगाप्तिम् देही भुक्तिम् च मुक्तिम् ।
भावासक्तिम् च अखिलानंद मूर्ते
घोरात् कष्टादुध्दरास्मानमस्ते ।।

ईश्वराजवळ काय मागाव हे श्लोकात महाराजांनी सुचविले आहे, आणि ईश्वरच ते देऊ शकतो. यांत "धर्मे प्रितीम्" ही पहिली मागणी त्यांनी मागितली आहे. धर्माबद्दल प्रेम असावे. आपला जो काही आचार विचार आहे तो प्रमाने आपण केला पाहिजे. लोकांना दाखवण्याकरतां किंवा लोकांनी चांगल म्हणाव म्हणून करायचानाही. धर्मराज धर्माचा आदर्श म्हणून प्रसिध्द होते. धर्माचरणाचे फळ मिळो अथवा न मिळो पण जस ईश्वरान सांगितले आहे त्याप्रमाणे वागायचे. बारा वर्षे वनांत व एक वर्ष अज्ञातवासात राहायच कबूल केल त्यांनी. पराजय झाला होता त्यांचा. त्याप्रमाणे वनांत राहयला गेल म्हणजे सत्य आपण जे कबुल केले आहे ते शेवटपर्यंत पाळले पाहिजे. असे धर्माबद्दल अत्यंत प्रेम मनांत ठेवून धर्माचरण केले म्हणून ईश्वराची कृपा त्यांच्यावर झाली. श्रीकृष्णांनीसुध्दा पांडवांचा पक्ष घेण्याचे कारण हेच आहे. पांडव हे धर्मशील होते.

धर्मराजांची एक गोष्ट महाभारतात दिलेली आहे. धर्मराजांना तहान लागली म्हणून भीम पाणी आणायला गेला. मोठा तलाव होता त्याला पण तहान लागली. आणि तो पाणी पिणार इतक्यात समोर एक मोठा धिप्पाड पुरुष आला. तो म्हणाला, "हा तलाव माझा आहे. प्रथम माझ्या प्रश्नांची उत्तरे दे आणि पाणी पी. " भीमाने ऐकलेनाही त्याचे. तो पाणी पिताच गतप्राण होऊन गेला. त्यानंतर अर्जुन, नकुल, सहदेवांचीही तिच अवस्था झाली. नंतर धर्मराजांनी आल्यावर जेव्हा आपली चारही भावंडे मरुन पडल्याचे पाहिल्यावर त्यांना वाईट वाटले. यक्ष पुरुषाने काय झाले ते सांगून त्यालाही तेच प्रश्न विचारले. चारही बंधू मरुन पडले असतानाही धर्मराजांनी मन शांत ठेवून सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. यक्षप्रश्न म्हणून एक प्रकरणच महाभारतात आहे. यक्ष म्हणजे साक्षात यमदेवच होते. उत्तरे ऐकून समाधान झाल्यावर ते म्हणाले, "माझ्या सर्व प्रश्नांची तू बरोबर उत्तरे दिलीस, म्हणून मी प्रसन्न झालो आहे. आता या चौघांपैकी कोणत्या तरी एका भावाला मी जिवंत करीन. कोणाला करु?"

धर्मराजांनी नकुलाला जिवंत करायला सांगितले. यमराज म्हणाले, "नकुलाचा काय उपयोग होणार तुला? लहान मुलगा आहे तो। भीम किंवा अर्जुन जिवंत झाला तर तुझ्या उपयोगी पडेल. तुला पुढे राज्य मिळवायचे आहे, तर नकुलाला जिवंत करा असे का म्हणतोस?"

धर्मराज म्हणाले"मला कुंती आणि माद्री अशा दोन माता आहेत. कुंतीचा मी मुलगा जिवंत आहे. त्याप्रमाणे माद्रीचा मुलगा नकुल जिवंत झाला तर तिला समाधान मिळेल, म्हणून त्याला जिवंत करा. "

धर्माने वागायचे हा नियम. कोणत्या भावाचा उपयोग होईल आणि कोणत्या भावाचा नाही हा व्यावहारिक विचार धर्मराजांनी न केल्याने यमदेव प्रसन्न झाले आणि त्यांनी चौघांनाही जिवंत केले. अशी मोठी धर्मनिष्ठा। धर्माबद्दल अत्यंत प्रेम। म्हणून महाराजांनी देवाजवळ हे पहिले मागणे मागितले आहे.

.....पान नं. २........

त्याच्यानंतर सन्मतिम्। उत्तम बुध्दी पाहिजे. भीम, अर्जुन इत्यादी भावंडांना कौरवांनी दिलेला त्रास पसंत नव्हता. कौरवांबरोबर युध्द करून आपण राज्य घेऊ असे ते म्हणत. धर्मराज़ वाचगे कधीही वागत नसत. ही धर्मबुध्दीही त्यांना ईश्वराच्या कृपेनेच मिळाली होती. बाकीचे पांडव म्हणत. काय तुमच्या धर्माचरणाचा उपयोग? अधर्माने वागणारे कौरव राजे झाले. तुम्ही धर्माने वागून राज्य घालविले. तुम्हाला वनवास मिळाला. पण शेवटी धर्मराजांच्या धर्मबुध्दीचा सर्वांवर परिणाम झाला व ते धर्मराजांच्या इच्छेला मान देऊ लागले.

"सन्मतिम्" हे मागणे देवाजवळ मागितले आहे. आपण प्रयत्न करून तशी सन्मती होईलच असे नाही. ईशकृपेनेच शुध्द न्यायाने जाण्याची बुध्दी मिळते.

तिसरे म्हणजे "देवभक्तिम्" ईश्वराची भक्तिही ईश्वराजवळच मागितली आहे. आपल्या प्रयत्नांनी आपण भक्ति, प्रेम करू म्हटल तर होत नाही, आणि झालंच तर त्याला व्यापारी स्वरूप येत. रावणाने, हिरण्यकश्यपूने तपश्चर्या केली. देव प्रसन्न झाले. वर दिला. परंतु देवाबद्दल भक्ती, प्रेम नसल्याने आपले काम झाल्यावर त्यांनी तपश्चर्या वगैरे सर्व सोडून दिले. आपल्या तपश्चर्येच फळ देवान दिले. स्वत:चे असे काही दिले नाही, अशी त्यांची बुध्दी होती. ही खरी भक्ती नाही. म्हणून ईश्वराजवळच त्याची भक्ती मागावी लागते. तरच उत्तम बुध्दी, प्रेम आणि भक्ति मिळते.

चौथी मागणी आहे " सत्संगाप्तिम् " संतांची संगती घडावी. ज्यांच्या जवळ सद्बुध्दी आहे, धर्माचरण आहे, जे देवाची खरी भक्ति करतात त्यांची संगती धरली कीं, आपोआप सर्व दैवी कृपा मिळते. ईश्वराच्या कृपेने सत्पुरूषांची संगती घडून येते. मार्गदर्शन होते आणि त्याप्रमाणे वागण्याची बुध्दी होते. म्हणून आम्हाला नेहमी सत्संग घडावा हे मागणं मागितले आहे.

आणि शेवटी " देही भुक्तिंच मुक्तिम् "। भुक्ती म्हणजे संसार. संसारही मागा म्हणाले. हरकत नाही पण देवाजवळ मागा. मुक्ती तर हवीच आहे. सर्व दु:खाची निवृत्ती हाच मोक्ष आहे. हा मोक्ष मागायचा. परंतु त्यापूर्वी आपल मन जे विषयभोगांकडे जात असत त्यासाठी विषयभोगही मागायला हरकत नाही. पण देवाजवळ मागा. अढळपद मिळविण्यासाठी ध्रुवाने उग्र तपश्चर्या करून ते पद प्राप्त करून घेतले आणि देवाच्याच कृपेने त्यातून तो सुटला आहे.

आधी जरी संसारातील वासना उत्पन्न झाली आणि त्यासाठी देवाकडे मागणी केली तर त्याच्या कृपेने ती पूर्ण होते. हळूहळू वासना कमी होतात. ही सुध्दा ईश्वराचीच कृपा व्हावी म्हणून महाराजांनी मुद्दाम या स्तोत्रामध्ये भुक्ती हेही मागणे देवाजवळ मागून घेण्यास हरकत नाही, असे सांगितले आहे.

आणि मुक्ती तर घ्यायचीच आहे मागून. ती ईश्वराशिवाय दूसरे कोणीही देऊ शकत नाही. सर्वही दु:ख कायमची जाण याला मोक्ष म्हणतात. आमची व्याधीरूपी दु:ख औषधाने जरी बरी झाली, तरी ती पुन्हा कधीही होणार नाहीत असे सांगता येत नाही. पुढे केव्हाही दु:ख उत्पन्न न होणे याच नांवच मुक्ती. आणि केव्हाही दु:ख उत्पन्न होणार नाही असे हवे असेल , तर जन्म कायमचा बंद झाला पाहिजे. देहाचा संबंध सुटला पाहिजे. देह म्हटला कीं, दु:ख आलीच. बर देहाचा संबंध सुटायचा म्हणजे कर्म संपली पाहिजेत. आपल्या कर्माचे फळ म्हणून देहाचा संबंध म्हणजे जन्म येतो. या करता सर्व पाप-पुण्य कर्माचा ईश्वरकृपेने क्षय झाला म्हणजे जन्म मृत्यु व दु:ख कायमची संपली. ही अवस्था अनेक जन्मानंतर मिळते.

पान नं. ३. .......

अनेक जन्म साधना करून , ईश्वराची कृपा संपादन करायची आणि ईश्वराचे दर्शन, आत्मज्ञान झाले कीं, सर्व कर्मांचा क्षय होतो. पण तेही देवानेंच द द्यावयाचे आहे.

आणि सर्वात शेवटी " भावासक्तीम् ":मागणं मागितल आहे. भाव म्हणजे प्रेम. ते अधिकाधिक वाटत जावे हीही प्रार्थना केली आहे. पण " " भावासक्ती " म्हणून स्वतंत्र मागणं मागितले त्यांनी. श्रीगुरुचरित्रातल्या चाळीसाव्या अध्यायात जी कथा सांगितली आहे, त्यात आपल्याला भावासक्तीचे दर्शन घडते. ही भावासक्तीसुध्दा त्याच्याच कृपेने मिळते. म्हणून या सातही गोष्टी ईश्वराने आपल्याला दान कराव्यात म्हणून ही प्रार्थना [स्तोत्र] केली आहे.

।। अवधूत चिंतन श्री-गुरुदेव दत्त ।।

-:-:-:-

त्रिपुरी पौर्णिमेच्या दिवशी भगवान शंकरांनी त्रिपूर राक्षसाचा वध केला. दैत्यांनी तपश्चर्या करून तीन पूर मागून घेतली. तीन पूर म्हणजे तीन विमाने त्यांना करून दिली. एकाच बाणाने जर तीनही पूरांचा नाश झाला तर त्यांचा नाश होणार होता. अशी काही योजना त्यांनी केली होती. त्या विमानामध्ये अमृतकुंड त्यांनी केले होते. युध्दामध्ये नाश पावलेल्या दैत्यांना ते तिथे आणून अमृत पाजून जिवंत करीत. त्यामुळे त्यांची शक्ती बरीच वाढली होती. विष्णूनी शंकरांना त्यावेळी पुष्कळ सहाय्य केल आहे. विष्णूंनी गायीचे ब्रम्हदेवांनी वासराचे रूप घेतले आणि त्या त्रिपुरात जाऊन अमृतकुंडातील सर्व अमृत त्यांनी पिऊन टाकले. मेलेल्या दैत्यांना पुन्हा जिवंत करायची शक्ती त्यामुळे कमी झाली. दैत्य माहित झाले. हा काय प्रकार आहे त्यांना कळेना. एकाच बाणाने तीनही [पुरांचा] विमानांचा नाश व्हावा अशी वर योजना देवांनी केली होती.

असूरही तपश्चर्या करून आपली शक्ती वाढविणारे आहेत. शास्त्रीय मार्गावर विश्वास असो अगर नसो पण तपश्चर्या करून तात्पुरता संयम पाळून आपले बल ते वाढवितात. परंतु त्यांच्या तपाचा उद्देश केवळ स्वत: सुखी होणे एवढाच असतो. अर्थ आणि काम हे दोन सुखाचे पुरुषार्थ मानले गेले आहेत. पुष्कळ अर्थ आणि विषयभोग मिळावा या सार्वत्रिक वासना आहेत. देवसुध्दा या वासनेतून सुटलेनाहीत.

ईश्वराने निर्माण केलेल्या स्वर्गलोकात सुखाची साधने पुष्कळ आहेत. शास्त्र प्रमाण पाहून आपल्याला त्याबद्दल समजते. ऋषिमंडळी वगैरे सर्व लोकात फिरून प्रत्यक्ष पाहू शकतात. साधे हिमालयात चढल तर आपल्याला दम लागतो. तर तिथल हवामान लोसवेल की नाही याचा भरवसा नाही. पांडव तीर्थयात्रेला निघाल्यावर रोमश नावाचे ऋषि त्यांच्या बरोबर होते. हिमालयात एका विशिष्ट प्रदेशात ती मंडळी येऊन पोहोचल्यावर त्या ऋषिंनी सांगितले आता यापुढे तुम्ही काही येऊ शकणार नाही, माझा मी जातो. आणि ते आकाश-मार्गाने पुढे गेले. भीम म्हणाला पुढे जायला काय हरकत आहे. आणि पुढे निघाला एवढ्यात वारा सुटला. कुठून तरी मार्गात मोठेमोठे दगड येऊन पडू लागले, आणि त्याला पुढे जाता आले नाही.

तेंव्हा स्वर्गामध्ये पुष्कळ सुखाची साधने उपलब्ध असली तरी मानसिक दु:खाही आहेतच. कारण प्रत्येकाच्या पुण्याप्रमाणे सुखभोग कमी अधिक प्रमाणांत मिळणार. विषमतेमुळे मानसिक दु:ख होते. आपल्याला पगार कमी व दुसऱ्याला जास्ती हे नुसत पाहूनसुध्दा दु:ख होत आपल्याला. पण ही विषमता टाळता येत नाही ना। ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे सर्व मिळत असत. तेव्हा इहलोकाप्रमाणे स्वर्ग-लोकातही विषमता आहे. पण सुखाची सर्व साधने तिथे असल्याने आकर्षित होऊन जीव तिथे जातात, जाण्याकरता शास्त्राप्रमाणे प्रयत्न करतात.

त्याचप्रमाणे दैत्यही निरनिराळ्या विद्येच्या सहाय्याने स्वत:च्या सुखासाठी तपश्चर्या/प्रयत्न करतात. आपण आपल्याला अनुकुल बनणं एवढच त्यांना माहिती. बाकीच्याकडे लक्ष नाही. म्हणून त्यांना

....... २ ......

असुर म्हणतात. असु म्हणजे प्राण, आपल्याच प्राणाला जपणारे आपल्या विषयीच विचार करणारे. तेव्हा शास्त्राप्रमाणे प्रयत्न करून स्वर्गलोकही जिंकतात ते. ही त्रिपूर जी त्यांनी निर्माण केली होती वर मागून तिथे स्वर्गाप्रमाणेसर्व सुखासोयी त्यांनी मिळवल्या होत्या. आणि त्या त्रिपूरांचा नाश करण्याचा सर्व देवांनी पुष्कळ प्रयत्न केला, पण त्यांना कांही यश आले नाही. एका बाणाने तीनही विमानांचा नाश करायचा हे कसे शक्य आहे ? मग सर्व देवांनी शंकराच्यावर ही कामगिरी सोपविली. शंकराच सामर्थ्य मोठ आहे. तीनही विमाने नष्ट करण्याचा बाण कसा मिळवायचा. मग विष्णूनी त्या बाणाचे रूप घेतले. ब्रम्हदेव त्यांचे सारथी झाले. आणि शेवटी आजच्या दिवशी त्या तीन पुरांचा नाश केला व दैत्य आपआपल्या स्थानी निघून गेले. दैत्यासाठी सुध्दा स्वतंत्र स्थान ईश्वराने निर्माण केलेलेच आहे. देवांसाठी जसा स्वर्गलोक तसा दैत्यांसाठी रसातल नावाचा लोक आहे. तरीही ते अधून मधून स्वर्गलोक मिळवण्यासाठी प्रयत्न करतात. आणि मग ब्रम्हा, विष्णू, महेश एकत्र येऊन त्यांचा नाश करतात. नाश झाला तरी पूर्ण नाश होणे शक्य नाही. पुन्हा त्यांना अनुकुल काळ आला की, त्यांच्या पैकी कोणी तपश्चर्या करतो. स्वर्ग लोकात जाण्याचा प्रयत्न करतो हे रहाट गाडगे चालूच आहे. देव-दैत्यांचे युध्द कधीही संपत नाही म्हणतात.

त्यांना सुख मिळाव का ? आपल्याला का सुख मिळू नये ? उलट त्यांना सुख मिळू नये, अशाही ईच्छा असतात. मत्सर ज्याला आपण म्हणतो. दुसऱ्याच चांगल पाहिल्यावर मनात व्देष उत्पन्न होतो आहे. अगदी तामसी वृत्ती आहे. दुसऱ्याचे सुख पाहिल्यावर आप ल्याला सुख व्हायला लागल म्हणजे त्याला सात्त्विक वृत्ती म्हणतात. तो अभ्यास केला पाहिजे. मुलाला परिक्षेत फ्रस्ट क्लास मिळाल्यावर आपल्याला सुख मिळत... म्हणजे पास झालाय तो ! आपल्याला सुख मिळायच कारण काय ? त्याचप्रमाणे दुसरा एखादा मुलगा फर्स्ट क्लासमध्ये पास झाल्यावर कस वाटल पाहिजे ? तर ही वृत्ती जोपर्यंत बदलता येत नाही, तोपर्यंत व्यर्थ आहे सर्व.

मैत्री, करूणा, मुदिता, उपेक्षा वगैरे उपाय योगशास्त्राकारांनी मनाला स्थीर करण्याकरिता, शुध्द करण्याकरिता सांगितले आहेत. त्याच्या पुण्याईने तो सुखी आहे. त्याच्याबद्दल मैत्री वाटली पाहिजे आपल्याला. तो आपला मित्र झाला पाहिजे. त्याच्याबद्दल प्रेम वाटले पाहिजे. दुर्योधनाला कांही पांडवांना पाहून प्रेमाची भावना निर्माण झाली नाही. त्यांना बाजूला करण्याचा त्याने प्रयत्न केला. राजनीतीला धरून ते कपट क्षम्य आहे. त्यांना वनवासात पाठवले. नुसती बारा वर्षे वनवासातच नाही तर एक वर्ष अज्ञातवासाची अट घालून जन्मभर पांडव वनवास भोगतील अशी व्यवस्था केली त्याने अज्ञातवास म्हणजे जर ते उघडकीस आले की, पुन्हा बारा वर्षे वनवास आणि पांडव उघडकीला येणार. पांडवाचे गुण कांही लपून राहणार नाहीत. शिवाय पांडव वनवासात [वनांत] जायला निघाल्यापासून त्याचे हेर त्याच्या मागावर होते. प्रयत्नवादी होता तो दैववाद किंवा ईश्वर निष्ठेपेक्षा प्रयत्नवाद श्रेष्ठ आहे असे त्याला वाटत होते.

........३ ....

म्हणून कृष्णाची शक्तीसुध्दा त्याने ओळखली नाही. दुःशासनाने द्रौपदीची विटंबना करण्याचा प्रयत्न केला. सगळे गप्प बसले. पण द्रौपदीची निष्ठा कृष्णावर असल्यामुळे तिने धावा केल्याबरोबर गोपाळकृष्णांनी सर्व वस्त्रा तिला दिली. ही ईश्वरशक्ती आहे. कशी दिली ? काय दिली? कोणत्या गिरणीतला माल आला? हे काही सांगता येत नाही. ईश्वरशक्ती ईश्वरइच्छा स्वतःच सांगता येईल. वास्तविक पाहता, वस्त्रासाठी कापसाचा धागा, यंत्र वगैरे सर्व लागत. पण द्रौपदीच्या मनामध्ये कृष्णा कृष्णाच्या सामर्थ्याबद्दल शंका बिलकुल नाहीये.

दुर्योधान द्रोणाचार्यांचा शिष्य असला, राजाअसला तरी ईश्वराच्या शक्तीबद्दल त्याला काही कल्पना नाहीये. म्हणून पांडवांच्या सुखाकडे पाहून त्याला मत्सर निर्माण झाला. तर सुखी माणसाबद्दल आपल्या मनामध्ये मैत्री निर्माण व्हायला पाहिजे. दुःखी माणसाला पाहिल्यावर मनामध्ये दया उत्पन्न व्हायला पाहिजे. म्हणजे त्याला मदत करणे, उपयोगी पडणे ही कार्ये होतात. याने सुध्दा मनाला शांती मिळते.

त्यानंतर शास्त्राकारांनी तिसरा मार्ग सांगितला आहे. पुण्यवान माणसाच्याबद्दल मैत्री, करुणा आणि आनंद वाटला पाहिजे. आपल्याला काही जमत नाही. पण तो जे चांगल करतोय, त्याला सहाय्य कराव हा एक अभ्यास आहे.

आणि पापी लोकांची उपेक्षा करावी असे त्यांनी सांगितले आहे. पाप करणाऱ्याला शासन व्यक्तीने करायचे की समाजाने हाही एक प्रश्न आहे. व्यक्तीला आपल्या मनाची भूमिका तयार करायची आहे. त्या दृष्टीने त्याने पापी माणसाची उपेक्षा करायची. म्हणजे पाप करणाऱ्या दुर्जनांची उपेक्षा करावी असा त्याचा अर्थ नाही. आपण जेव्हा आपल्याला चांगली मनोभूमिका मिळावी म्हणून जेव्हा अभ्यास करतो त्यावेळी हे सांगतात. अर्जुनाला भगवंतांनी त्या विशिष्ट वेळी तुला उपेक्षा करुन युध्द सोडून जाता येणार नाही असे सांगितले.

वर सांगितलेला अभ्यास केल्याने आपले चित्त प्रसन्न होते. परंतु या भावनांचा अभ्यास होण्याकरिता सुध्दा ईश्वराची कृपा पाहिजे. ईश्वरी सहाय्याशिवाय कसे होणार। प्रयत्नांनी प्रेम उत्पन्न करु, आनंद मानू हे सर्व म्हणणे सोपे आहे. मनाला तसे वाटले पाहिजे. मृच्छकटिक नाटकातला चारुदत्त श्रीमंत असतो आणि पुष्कळ दानधर्म करायची त्याला सवय असते. त्याच सर्वस्व जाऊन तो दरिद्री झाला. दारिद्र आल्याचे त्याला वाईट वाटले नाही, पण आपल्याकडे कोणी याचक आला तर द्यायला आपल्याकडे काही नाही. याचे त्याला वाईट वाटले. आम्हाला तसे वाटत नाही. आम्हाला दारिद्र्याने सुखोपभोग मिळत नाहीत, म्हणून आम्हाला दुःख होते. वसंतसेना वेश्या असली तरी ती चांगली गुणग्राहक असल्याने तिचे त्याच्यावर प्रेम असते. एकदा तिने तिचे दागिने चारुदत्ताकडे ठेव म्हणून ठेवायला दिले. रात्री नेमके चोराने ते दागिने चोरून नेले. सकाळी उठल्यावर त्याच्या मित्राने दागिने चोरीस गेल्याचे सांगितले. वा! वा! चोर दागिने मिळाल्याने कृतार्थ झाला. त्याची झोप फुकट गेलीनाही. अशा शब्दात आनंद व्यक्त

....... ४ ....

केला चारुदत्ताने. तो मित्रा म्हणाला अरे तो चोर कृतार्थ झाला असे कसे म्हणतोस ? पण, चारुदत्ताची निसर्गत:च तशी वृत्ती आहे.

आपल्याच मनामध्ये देव-दैत्य आहेत. असे उपनिषादामध्ये सांगितले आहे. सात्त्विक वृत्ती म्हणजे देव आणि तामसी वृत्ती म्हणजे दैत्य. यांचे युध्द नेहमी चालू असत. एखादे वेळी सात्त्विक वृत्तीचा जय होतो. त्याप्रमाणे आपल्या हातून पुण्यकर्म घडतात. दुस-या वेळेस तामसी वृत्ती प्रबल होऊन मनुष्याचा अध:पात होतो. शेवटपर्यंत दुर्योधनाने काही माघार घेतली नाही.

आपल्या महाभारत पुराणे इत्यादीत वर्णन केलेल्या प्रसंगात कोण कोण कसे वागले, त्यांना दैवी सहाय्य कसे झाले, याचा अभ्यास केला म्हणजे आपल्यात धैर्य उत्पन्न होत, निराशा कमी होते. पांडव वनवासात असतांना व्यास महर्षिंनी मुद्दाम अर्जुनाला जाऊन मंत्रा दिला आणि तपश्चर्या करून शंकरांना प्रसन्न करून घेऊन अस्त्र विद्या मिळवायला सांगितले. म्हणजे ही महर्षि मंडळी नुसती "अहिंसा परमोधर्म:" म्हणून गप्प बसत नाहीत प्रत्येक वेळी प्रतिकूल काळ आला म्हणून तो कायम राहील असे नाही. प्रतिकूल काळात मंत्राचे सहाय्य घेऊन संकटांना तोंड देणे अनुचित नाही. पांडवांनी वनवासात असतांना कितीतरी व्रतवैकल्ये केली.

अर्जुन देवलोकातून सर्व अस्त्रा विद्या शिकून आल्यावर बाकीच्या पांडवांनी त्या विद्येचे त्याला प्रात्यक्षिक दाखवायला सांगितले आणि तो दाखवणार इतक्यात व्यास महर्षी तिथे येऊन म्हणाले, ही अस्त्रा विद्या दाखविण्याकरिता नाही, म्हणजे अस्त्रा विद्या शिकायची पण त्याच्याबरोबर संयमही पाहीजे. भारतीय संस्कृतीत संयमाला महत्व आहे अर्जुनाचे मत होते समोर खारोखार तुल्यबळ योध्दा आला तरच अस्त्राचे प्रयोग करायचे, उगीच नाही. युध्दामध्ये हिंसा निराळी. तिथे ती अपरिहार्य आहे. संयमाचा उपयोग व्यक्ती व समाज यांनाही खूप होऊ शकतो.

अर्जुन जयद्रथाला मारण्याकरता चक्रव्युहात गेलेला आहे. त्याचा शिष्य सात्यकीही मोठा पराक्रमी होता. तो अर्जुनाला सहाय्य करीत होता. इतक्यात कौरवाच्या एका मोठ्या योध्दयाने त्याला अडवले. दोघांचे तुंबळ युध्द सुरु झाले. शेवटी तरवारीने युध्द सुरु झाले व त्यात त्याने सात्यकीची तलवार मोडून टाकली आणि त्याला मारायला स्वत:ची तलवार उपसली. अर्जुन त्यावेळी पुढे गेलेला होता. श्रीकृष्णाने अर्जुनाला तुझा शिष्य मरतो आहे असे सांगितले. तो होता तिथेही [अर्जुनाचे] भयंकर युध्द चाललेच आहे. इतक्यात पाठीमागे वळून अर्जुनाने एक बाण सोडला आणि सात्यकीला मारायला आलेला हातत्याने तोडून टाकला. सात्यकीची सुटका झाली. कौरव योध्दा अर्जुनाची निंदा करु लागला. तो अर्जुनाला म्हणाला मी दुस-याबरोबर लढाई करत असताना तू माझा हात तोडलास हे काय धर्मयुध्द झाले का? अर्जुनाने त्याला उलट विचारले, माझी प्रतिज्ञा तुला माहित नाही का? माझ्या बाणाच्या टप्प्यात असलेला माझा मनुष्य मी कधीही मरु

देणार नाही. मग तो कौरव योध्दा गप्प बसला. म्हणजे सामर्थ्याचा असा वेळेला उपयोग केला पाहिजे. संयम संयम करत काहीही अनर्थ घडला तरी संयम करायचा म्हणजे त्यालाही काही अर्थ नाही. पण हे सर्व क्षत्रिय राजनितीज्ञ इत्यादींसाठी सर्व आहे.

पण ज्याला आपली पारमार्थिक उन्नती करुन घ्यायची आहे. व्यवहार कमी कमी करत आणायचा आहे, त्याच्या करता हे सगळे उपाय आहेत . ----मैत्रि, करुणा, मुदिता, उपेक्षावगैरे यांच्या अभ्यासाने मनोवृत्ती पुष्कळ शांत होतात. ह्याने असं केल, तो तसबोलला, त्याचे वागणे असे आहे, या सगळ्या गोष्टींचाच आपल्याला राग येतो, त्याचा उपयोग काय आहे? त्यावर उपेक्षा हा एकच इलाज आहे. तुम्हाला जर मन:शांती हवी असेल तर तुम्ही उपेक्षेचाच अभ्यास केला पाहिजे. तुम्ही एकटे कांही प्रतिकार करु शकत नाही. त्याकरता काळ वेळही पहायला पाहिजे. आपली वृत्ती आधी व्यवहार सोडायला तयार आहे का? हे आधी तपासले पाहिजे. आणि तो व्यवहार सोडण्याच्या दृष्टीने हे सर्व उपाय आहेत. योगशास्त्र हे प्रयोगशास्त्री आहे. हा अभ्यास म्हणजे अध्यात्मिक प्रयोग आहे. तो प्रयोग करुन पहायचा आहे. काम, क्रोध, लोभ वगैरे जे भयंकर विकार आहेत त्यांनीच मन:शांती नाहीशी होते ना. त्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून जर[करुणा, मुदिता,... ] या साधनवृत्तींचा अभ्यास जर केला तरच त्या भयंकर विकारांवर जय मिळू शकतो. ज्या मुंबाजी-बाबाने तुकाराम महाराजांना बडवून काढले, त्याचेच हातपाय दाबून द्यायला तुकाराम महाराज त्याच्या घरी गेले. प्रल्हादाला त्याच्याच पित्याने ठार मारण्याचे पुष्कळ प्रयत्न केले पण प्रल्हादाची चित्तवृत्ती शांतच रा राहिली. नृसिंहांनी पित्याचा वध केल्यावर प्रल्हादजी म्हणाले मला कांही वर वगैरे नको पण माझ्या पिताजींनी आपली पुष्कळ निंदा केली आहे त्यांना आपण क्षमा करा. केवढे विशाल मन आहे!

आपआपल्या कर्माप्रमाणे जग चालले आहे. हा एक मोठा सिध्दांत आहे. कोणाची कर्मे कशी असतील काय माहिती. तेव्हा आपण मुद्दाम कशाला पक्षपातीपणा करायचा , याचा किंवा त्याचा पक्ष घेऊन ! काय करायचय आपल्याला ! आणि तसा घेऊन कार्य होतच असं नाहीये. जगामध्ये कीतीतरी पक्ष होतात आणि जातात चाललेल आहे. म्हणून नियामक कोणीतरी आहे असा विश्वास ठेवून शास्त्राने संतांनी सांगितलेल आपल कर्तव्य आपण करीत राहायचं. दौष्यवर्ग आहे. इतर समाज आहे. या सगळ्यांसाठी आपल्या शक्तीप्रमाणे सेवा कार्य करायचे थोडस आपण कोणाच्या उपयोगी पडल तर आपल्याला केवढा अहंकार निर्माण होतो. पण शंकर सर्व जगाचे पालन करूनसुध्दा त्यांना स्वत:ला त्याची जाणीव नाहीये. व्याघ्रचर्म पांघरून स्मशानात समाधी लावून बसले आहेत. म्हणून शंकराची प्रार्थना मुद्दाम केली जाते. सन्मार्गावरुन चालताना जर बुध्दी शुध्द झाली नाही तर योग्य विचार होणार नाही. आमची तामसी वृत्ती शंकरांनी नाहीशी करावी. आणि आम्हाला योग्य बुध्दी द्यावी. ईश्वराच्या निरनिराळ्या आवतारांच्या चरित्रांच्या किंवा त्यांच्या भक्तांच्या चरित्रांच्या चिंतनानेही मनाला शांती मिळू शकते. मैत्री, करुणा, मुदिता वगैरे साधनांचा अभ्यास निराळा. राजस तामस असे अनेक विचार सतत मनात येत असल्याने, मनाची शांती जाते.

......६.....

ज्याप्रमाणे जेवायला बसल्यानंतर [जावाई आला, मंत्री आला तर ] जरा थांबा, पोळी व्हायची आहे, असे म्हणतो का आपण? नाही. कारण जेवणाची सर्व सिध्दता आधीच करून ठेवलेली असते. त्याचप्रमाणे पूजेला बसण्यापूर्वी सर्व तयारी करून बसले पाहिले. आत्मिक बल, सन्मार्गाने कर्तव्यकर्म करून वाढविले पाहिजे. ईश्वराच्या शक्तीवर श्रध्दा ठेवून आपल्याला उपासना करता येईल तेवढी करायची आहे. "उपासनेला दृढ चालवावे" समर्थांनी सर्व एका श्लोकात सांगितले आहे. संतांना भूदेव मानून त्यांचा आदर केला पाहिजे. जेवढी सत्कर्मे करता येतील, तेवढी केली पाहिजेत. "सत्कर्म योगे वय घालवावे" म्हणतात. जन्मभार सत्कर्म घडली पाहिजेत. उगीच एक दोन दिवसांनी काही होत नाहीत. उत्सवाच्या वगैरे निमित्ताने आपण भजन वगैरे करतो तेवढया पुरत, एरव्ही काही नाही. अखंड जन्मभार स्वत: सत्कर्म करणं, इतरांकडून करून घेणं, दुसऱ्याने केले तर त्याला अनुमोदन देऊन अभिनंदन करणं हे सर्व सत्कर्म आहे. सर्वांनाही त्या मार्गाने नेण्याचा प्रयत्न करायचा. गेले ठीक. नाही गेले तरी हरकत नाही. सर्वामुखी मंगल बोलवण्याचा प्रयत्न करायचा.

" अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त "

-:-:-:-:-:-

क्लेश जीवाला जरी नको असले तरी त्यांचा त्याग जीव काही करु शकत नाही. जीवाला ते भोगावे लागतात. म्हणून सद्गुरु महाराजांनी देवाजवळच मागितलेल आहे " त्वम् हर आशु " लवकर या सर्व क्लेशातून मुक्त करा. " त्वदम् नो त्रातारम् वीक्षे " ही देखील भावना आहे. या सर्व पदार्थांचा परिहार करून जीवांचा त्राता, संरक्षक आपल्याशिवाय दुसरा कोणीही दिसत नाही. ईश्वराशिवाय दुसरा कोणीही त्राता नाही. सर्वेश्वर आपण आहात. सर्व नियामक आपण आहात. आणि भक्तांच्या सर्वही पीडा आपण दूर करता आहात केलेल्या आहेत. म्हणून आपल्या शिवाय दुसरा कोणीही त्राता नाही. या करता या सर्व हेय दु:खांचा परिहार आपण करावा ही प्रार्थना केली आहे.

आता उपादेय म्हणजे दोषांचा परिहार करून गुणांचा संग्रह करायचा हा बुध्दिचा संस्कार मागितला आहे देवाजवळ. जे जे दोष आहेत ते सर्वही गेले पाहिजेत आणि गुणांचा संग्रह झाला पाहिजे.

शेवटच्या श्लोकामध्ये महाराजांची " धर्मे प्रितीम ..... " ही प्रार्थना आहे. " धर्मे प्रितीम् " हे एक प्रथम उपादेय आहे. धर्माबद्दल अत्यंत प्रेम मनात उत्पन्न होऊन प्रेमपूर्वक धर्माचे आचरण होण म्हणजे त्याच फळ - शुध्द बुध्दिरूपाने मिळत आहे. "सन्मतिम्" या शब्दाने दुसरे उपादेय मागितले आहे. धर्म, प्रेम आणि सन्मती. धर्म, प्रेमही सन्मतिच आहे. तरीसुध्दा आरंभाचे आहे ते. त्याचे फळ म्हणजे त्या बुध्दिचे जे काही शुध्दिकरण चालू आहे. जास्ती जास्ती आणखी बुध्दि चांगली होत जावी हे एक उपादेय आहे.

त्याच प्रमाणे "देव भक्तीम् देहि" । अंत:करणामध्ये भक्ती जी आहे ती उत्पन्न व्हावी हे मागणे देवाकडेच मागावे लागते. जीवाच्या प्रयत्नाने हे साध्य नाहीये.

धर्मेप्रितीम्, सन्मतिम् आणि देव भक्ती उत्पन्न होण याच्याकरता "सत्संगाप्तिम्" पाहिजे. संतांची संगती आम्हाला मिळावी. संत हे व्यक्त अवस्थेमध्ये असे पर्यंत ज्यांना संगती झाली त्यांना त्यांच्या सुकृतानुसार वरील सर्व उपादेय वस्तुंचा लाभ होतो. पण कदाचित अव्यक्त अवस्थेमध्ये जरी संत असले तरीसुध्दा त्यांच्या तपाचा प्रभाव असा आहे. त्यांच स्थानही अत्यंत पवित्र होत. ते स्थानही संतस्वरूप होऊन जात. त्यामुळे त्या स्थानाच्या दर्शनाने, त्या स्थानात निवास करण्याने, श्रध्देने या सर्वही उपादेय वस्तुंचा

लाभ होतो. म्हणून सत्संगाप्तिम् देहि असे मागणे मुद्दाम मागितले आहे.

आणि मुक्तिम् च मुक्तिम् । भुक्ति म्हणजे भोग आणि संसारही मागितलेला आहे. कारण संसार दूर करा असे देवाजवळ मागायचे म्हणजे तितका अधिकार पाहिजे. संसार नको असे अपातत: जे म्हटले जाते परंतु संसार सोडायची खरी जी इच्छा आहे ती अंत:करणामध्ये उत्पन्न होत नाही. रजकाला श्रीपादांच्या जवळ राहून श्रीपादांची संगती घडलेली आहे कुठपर्यंत ? यवनराजाचे ऐश्वर्य पाहिले नाही तो पर्यंत, श्रीपादवल्लभांची संगती असावी असे वाटत होते त्याला. परंतु त्या यवनराजाचे ऐश्वर्यपाहून अंत:करामध्ये असणाऱ्या वासना प्रबल झालेल्या आहेत आणि श्रीपादवल्लभांच्या सान्निध्यात असतानासुध्दा त्या यवनाच्या वैभवाचे चिंतन चालू आहे. त्यापेक्षा देवाजवळच मागावे म्हणतात महाराज. मागून घ्या देवाजवळ. भोग नुसत्या तपाने मिळेल. नाही असं नाही. परंतु तपाने मिळालेल्या भोगामुळे अहंकारही उत्पन्न होतो. भोग हा उपादेय आहे. अर्थात कोणता भोग उपादेय आहे तर ईश्वराजवळ जर मागून घेतला, शुध्दबुध्दिने देवा माझ्या वासना काही जात नाहीत मला भुक्ती पाहिजे. तर ती भुक्तीसुध्दा त्याला त्याच्यातून मुक्ती देणारी होते. सुदामजींनी मागितले नाही त्यांच्या पत्निने मागितले. परंतु तेही त्यांना गोपालकृष्णांनी दिलेलं आहे. पण त्या भोगात असतानासुध्दा गोपालकृष्णांचे अखंड चिंतन आहे. हे देवाचे देणे आहे ही भावना आहे. अहंकारादिक विकार उत्पन्न झालेले नाहीत. म्हणून भुक्तिम् च देहि आणि मुक्तिम् देहि असं महाराज म्हणताहेत.

त्या मुक्तिच्याही पुढचे मागणे म्हणजे भावासक्ती. अंत:करणात नितांत प्रेम उत्पन्न व्हाव. भक्तीपेक्षाही अत्यंत श्रेष्ठ उपादेय वस्तु भावासक्ती मानली आहे. ही भावासक्ती जर अंत:करणामध्ये उत्पन्न झाली तर सर्वही कल्याण होत. मुक्ती आली काय आणि गेली काय. तेव्हां भावासक्ती आम्हाला मिळावी असे शेवटी महाराजांनी मागितलेलं आहे.

नवविधा भक्तीही अपरा भक्ती आहे आरंभाला साधनात्मक आहे आणि साध्य जी आहे ती परा भक्ती आहे. या भक्तीमुळे सर्वही क्लेश दूर होताहेत. संसारातून मुक्ति मिळते. सर्वही कष्टांचे निवारण होते आहे. तर या परा भक्तीमध्ये भावासक्ती हे श्रेष्ठ उपादेय म्हणून सांगितलेले आहे. हेय आणि उपादेय वैयक्तिक व्यक्ती करता मागितलेले नाही. परंतु सर्व संतहितरत: असतात म्हणून जगाचे कल्याण होत. याप्रमाणे सदगुरू महाराजांनी हेयोपादेय विवेक मांडलेला आहे. तीच प्रार्थना आपण करायची आहे.

प. पू. रंगवधूतमहाराज परमहंस आहेत. सर्व संकल्प संन्यासी । परंतु सर्व भूतांचे कल्याण होण्याकरता म्हणून अव्य-तरूपाने आहेत. मूर्ति हा सुध्दा भगवंतांचा अवतारच आहे. मूर्ति रूपाने महाराजांचा निवास इथे आहे. आमच्या सारख्या अज्ञानी जीवांच्या अंत:करणात हेयोपादेय विवेक ठसावा, हेय दूर होऊन त्यांच्या कृपेने उपादेयाची प्राप्ती व्हावी अशी प्रार्थना करून ही वाङ:मय सेवा त्यांच्या चरणी समर्पण.

अवधूत चिंतन श्रीगुरुदेव द-त.

---

सद्गुरु वासुदेवानंद सरस्वतिस्वामी महाराजांनी "गुरुस्तोत्र" म्हणून एक स्तोत्र केलेले आहे. गाणगापूर क्षेत्रामध्ये त्याची रचना झाली आहे, शेवटी त्यांनी दिले आहे "गाणगापूर क्षेत्री उदेले हे स्तोत्र हारी आधी, व्याधी कुधी." एक ब्राम्हण त्या ठिकाणी अनुष्ठान करीत असताना त्याला हे स्तोत्र करून दिलेले आहे. गुरुस्तुति असे याला म्हणतात. आठ श्लोकांचे अष्टक आहे. त्यापैकी एका श्लोकाचा आज विचार करायचा आहे.

अखंड आत्मा अविनाशी दत्त।
तया पदी लाविती जे स्वचित्त ॥
चित्त भ्रमा सोडीती ते कृथार्थ।
तो पूर्ण आनंद गुरु समर्थ ॥

सद्गुरु दत्तात्रेय, श्रीपादवल्लभ, नरसिंह सरस्वति स्वामी-महाराज हे तिन्ही अवतार एकच आहेत. दत्तात्रेयांचेच अवतार श्रीपादवल्लभ आणि नरसिंहसरस्वति हे आहेत. आणि हे सद्गुरु अवतार आहेत. ईश्वरावतार निराळे आणि सद्गुरु अवतार निराळे. शंकराचार्य महाराज हे सद्गुरु स्वरूप अवतार आहेत. दैत्यांना शासन करण्याकरिता म्हणून ईश्वराचे झालेले अवतार हे वेगळे. आणि तेही अवतार ईश्वराचेच आहेत. पण हे गुरुस्वरूप अवतार आहेत.

आज्ञान दूर करायचे आहे. अंतःकरण म्हणून जे काही तत्व ईश्वराने निर्माण केले आहे, त्याला मन किंवा बुद्धी असे म्हणतात. अवस्था भेदाप्रमाणे नावे आहेत. प्राथमिक अवस्थेमध्ये निर्णय काही नाही. अशा अवस्थेमध्ये त्याला 'मन' असे म्हणतात. संदेहात्मक बुध्दी आहे. आणि 'बुध्दी' ही अवस्था निर्णयात्मक आहे. तो निर्णय चांगला अथवा वाईट, कसाही असो, निश्चय झाला म्हणजे त्याला 'बुध्दी' असे नांव आहे. रावण, दुर्योधन सुध्दा बुध्दीमान आहेत. याचा अर्थ काही तरी त्यांचा निश्चय आहे. जो मार्ग त्यांनी आपल्या बुध्दीने निश्चित ठरविलेला आहे, त्यातून ते मागे सरत नाहीत. अर्थात ती सद्बुध्दी, असद्बुध्दी हा वेगळा विचार आहे. पण निश्चय हे बुध्दीचे लक्षण आहे. आणि निश्चयात्मक बुध्दी जी आहे तिचे साहाय्य घेऊन मनाचे चांचल्य दूर करावे असे करायचे आहे. अमूक मार्गाने जायचे आहे, अमूक अनुष्ठान करायचे आहे असे जो म्हणतात

ते बुध्दीचे स्वरूप आहे. आणि त्या बुद्धी स्वरूपाचा आपल्याला जितका जितका म्हणून उपयोग करून घेता येईल, नेहमीच संदिग्ध स्थितीमध्ये रहाणे म्हणजे ही मनाची अवस्था आहे.

तर हे सद्गुरूंचे स्वरूप किंवा हा जो ईश्वराचा अवतार आहे, ही मनोवस्था जी आहे — मनोनाश ज्याला आपण म्हणतो — चंचल स्थितीमध्ये नेहमी अंतःकरण रहाणे. त्याच्यातून त्याला पुढे न्यायचे आहे. काही तरी करायचे आहे, असा निश्चय झाला पाहिजे. योगाचा उपदेश करीत असताना भगवंतांनी अर्जुनाला हेच सांगितले आहे. 'योग' म्हणजे उपाय, साधन. हे साधन निश्चयाने केले पाहिजे म्हणजे बुद्धीचे सहाय्य पाहीजे. बुध्दीची ही अवस्था आपल्याला कितपत आहे हे आपण विचार विचार करून ठरवू शकतो.

निश्चय एक पाहिजे. साधनेच्या वेळेला आणि मनामध्ये निराशा उपयोगी नाही. उत्साह कायम टिकला पाहिजे. ही दोन साधने योगाभ्यासाला, साधनाभ्यासाला आवश्यक, पोषक म्हणून भगवंतांनी सांगितली आहेत. त्यात निश्चय सांगितलेलाच आहे.

निश्चयाचे बळ ।
तुका म्हणे तोचि फळ ॥

निश्चय जर करता आला तर फळ मिळाले म्हणून समजायला हरकत नाही. तर ही जीवांची अवस्था अगोदर तयार करायची आहे. अनेक जीवांची अवस्था अशी नाही आहे. एक दृढ निश्चय झालेला आहे की, हा या मार्गाने जायचा आहे. ईश्वराची भक्ती म्हणजे तुकाराम-महाराजांसारखे मोठे मोठे महात्मे होऊन गेले त्यांचा एक निश्चय झालेला आहे.

देह जावो अथवा राहो ।
पांडुरंगी दृढ भावो ॥

नामदेवांचा निश्चय सांगतात, देहाचेच काही तरी कमी जास्ती होणार ना! देहाकडे लक्ष दिले नाही म्हणजे देहाला काही तरी पीडा, नाश वगैरे होणार. तर दोन्हीही अवस्थेत माझा देह राहील किंवा जाईल ही संदिग्ध स्थिती नाही त्यांची. ती दोन्ही त्यांनी सोडून दिली. निश्चय असा आहे —

त्यामुळे देह जावो अथवा राहो या दोन्हीही अवस्था त्यांनी झुगारून दिल्या आहेत. माझा देह राहील कि जाईल अशी संदिग्ध स्थिती नाही आहे. गेला तरी हरकत नाही, राहिला तरी हरकत नाही. निश्चयात्मक बुध्दी त्यांना ईश्वरकृपेने मिळाली आहे. दृढ भक्ती ईश्वराची करायाची आहे. एक ध्येय त्यांनी ठरविलेले आहे. त्यामुळे त्यांना देह राहिला तरी काही वाटत नाही. निश्चय पाहिजे पण चांगला पाहिजे. केवळ स्वार्थ, परपिडा असा उद्देश नाही.

ही स्थिती जेव्हा जीवाला प्राप्त होईल त्यावेळेला साधक-दशा त्यांना मिळणार आहे. साधकदशेमध्ये जर संदिग्ध अवस्थाच राहिली. बुध्दी अवस्था (निश्चयात्मक) जर मिळालीच नाही आम्हाला, काही दिवस हे साधन करावे, पुन्हा त्याच्या बद्दल काहीसंशय येऊन मनानेच निर्णय घेतला की याचा काही उपयोग नाही आणि दुसरे साधन करायला घ्यावे किंवा करूच नये. अशी जर साधकाची स्थिती असेल तर साधना होणार कशी ?

म्हणून त्याच्यात योग्यता निर्माण करायची आणि मग त्याच्याकडून साधनाभ्यास करून घ्यायचा. हे कार्य सद्गुरू अवताराकडून सतत चाललेले आहे. दत्तात्रेयांचे किती भक्त असतील याचा आपल्याला पत्ता नाही, जरी काही चरित्रे उपलब्ध असली तरी सर्व चरित्रे कशी मिळाली असणार ? तरी सर्व चरित्रे कशी मिळाली असणार ? आणि ते तो सांगणार कसा ? अनंत चरित्रे आहेत. अमर्याद शक्ती आहे. अमूक एका विशिष्ट देशामध्येच कार्य चाललेय असे नाही ना ! संपूर्ण विश्वामध्ये योग्यतेला पोहचलेले भक्त असतील किंवा जे अधिकारी बनवता येणे शक्य आहे त्यांच्याकडे आधि लक्ष द्यायचे. तसे भक्त तर अनेक ठिकाणी असणार. त्यांना मार्गदर्शन करणे, प्रतिबंध दूर करणे, त्यांची वृत्ती निश्चयी बनविणे, ही कार्ये करण्याचे काम सर्व ठिकाणी चालू आहे. सर्वत्र ईश्वर शक्ती आहे. तेव्हा अशा अनेक जीवांचा उद्धार करण्याची कार्ये चालली आहेत.

गजेंद्राचे आख्यान आपण ऐकतो, मनुष्य एवढेच जीव नाहीत. माणसांची लोकसंख्या किती आहे याची गणना करण्यात किती तरी काळ जातो आहे. आणि ती सुध्दा बरोबर होते की नाही कोणाला ठाऊक ! मग बाकीचे किती तरी

जीव आहेत. पुढच्या कोणत्याही जन्मात पहिल्या जन्माचे संस्कार राहू शकतात. मागच्या जन्मात अपूर्ण राहिलेला अभ्यास पुढच्या जन्मातही चालू रहातो. हा निश्चय बुध्दीचा असला पाहिजे. बुध्दी अवस्था प्राप्त करून घेतली पाहीजे. ही अवस्था त्या राजाने भगवत् भक्ती करून मिळवली आहे. योगाभ्यास त्याचा झाला आणि ऋषिंच्या काही शापामुळे त्याला हत्तीचा जन्म आला. तरी त्याची भगवत् भक्ती कायम राहिली. बुध्दीचे हे वैशिष्ट्य आहे. हा खरा बुध्दीवाद आहे.

तर भक्तांना उत्कर्षाची साधने मिळवून द्यायची आणि मग इतर कार्ये त्यांच्याकडून करून घ्यायची. अर्जुनाच्या मनाची तयारी करावी लागली भगवंतांना. गीतासार तेवढ्यासाठी तर आहे ना!

तेव्हा महाराजांनी या स्तोत्रात दत्तात्रेयांचे वर्णन केलेले आहे —

अखंड आत्मा अविनाशी दत्त ।
तया पदी लाविती जे स्वचित्त ।
चित्तभ्रमा सोडिती ते कृतार्थ ।
तो पूर्ण आनंद गुरू समर्थ ॥

सद्गुरूचे स्वरूप वर्णन करताना महाराज म्हणतात ते पूर्ण रूप आहे, आनंद आहे. आणि समर्थ आहेत. दत्तात्रेयांचे सगुण स्वरूप षड्भुज आहे, द्विभुज आहे, चतुर्भुज आहे. वेगवेगळी स्वरूपे त्यांनी दाखविली आहेत. पण मुख्य जे रूप आहे ते अखंड आहे. त्याच्यामध्ये काहीही भिन्नता नाही. अभिन्न, एक अशाप्रकारचे स्वरूप आहे. त्यालाच अखंड आत्मा म्हणतात. आणि ते अविनाशी आहे. विनाश नाही त्याला! म्हणजे प्रत्येक ठिकाणी भिन्न भिन्न असणे म्हणजे खंडित असणे, खंडश: विभागश: असणे म्हणजे विशिष्ट देशापुरते आहे असे नाही. सर्व देशामध्ये आहे. आणि अविनाशी आहे. म्हणजे काही मर्यादित कालापुरते आहे असे नाही सर्व कालात आहे. हे आत्मस्वरूपाचे वर्णन आहे. परमात्मा हा कसा आहे, दत्तात्रेयांचे मुख्य स्वरूप कसे आहे, तर सर्वत्र व सदैव आहे. ईश्वराची उपासना करणाऱ्याला किती सुलभ (गम्य) आहे हे त्यांनी दाखवून दिलेले आहे.

सर्व ठिकाणी असणाऱ्या ईश्वराची उपासना करणाऱ्याला काय कठिण आहे वस्तुत: ? पण मनाची तयारी नाही ना!

ईश्वर सर्व ठिकाणी कसा असू शकेल ? असे शक्य तरी आहे का ? पहिला प्रतिबंध निर्माण झाला. सर्वत्र असणारा जगात कोणताही पदार्थ नाही. देशमर्यादा प्रत्येक वस्तुला आहे. आकार जिथे आहे तिथे देशमर्यादा ठरलेली आहे. पांच भौतिक पदार्थ आकारधारी आहेत. कांही द्रव्य आकार आहेत, पण ज्या ठिकाणी आकार आला त्या ठिकाणी देशाची मर्यादा आली. आणि कालाची! सर्व कालात आहे असे म्हटल्यानंतर आपण हा जन्म सोडून पुढच्या जन्मात गेलो तरी त्या कालातही ईश्वर आहे.

म्हणजे उपासकाला हे जे ईश्वराचे वर्णन केलेले आहे ते उपासनामार्ग सोपा आहे हे पटवून देण्यासाठी केलेले आहे. पण उपासना ज्या साधनांनी व्हायची त्या साधनांत दोष आहे. असे कसे असू शकेल ? सर्वत्र असणारा जगात कोणताही पदार्थ नाही म्हणून ईश्वरही सर्वत्र असू शकणार नाही. कोणीही नाही हे खरे आहे पण या दृष्टान्तावरून तोही असाच आहे हे आपण कसे ठरवायचे ? पण ही मनाची अशी भूमिका तयार झालेली आहे.

पण तिकडेच लक्ष दिले पाहिजे म्हणतात महाराज. " यापदी लाविली जे स्वाचित्त !" जे काही आपल्याला मिळवायचे ते मिळावे अशी उपासना घडली पाहिजे. परमात्म स्वरूपाचे चिंतन अखंड आपल्याला घडले पाहिजे. पण त्याचे स्वरूप असे आहे अशी आपली खात्री निश्चित झाली पाहिजे. आणि बद्दल जर संदिग्ध अवस्था झाली, हे आहे किंवा नाही, उलट नाही असाच निश्चय होतो.

केवळ दृष्टान्तावरून किंवा बाह्य स्वरूपावरून जर त्याचे तत्वस्वरूप आपण ठरवायला गेलो तर ते ठरू शकत नाही. एक तर संशयामध्येच पडावे लागते किंवा ईश्वर नाहीच आहे या भ्रमामध्ये पडावे लागते. निश्चय आहे, नाही असे नाही, पण तो घातकी आहे. तर या अशा अवस्थेतून पुढे जाऊन ईश्वराचे स्वरूप निश्चित ठरल्याशिवाय त्याची उपासना कशी होणार! उपासनेला तर आस्तित्व पहिल्या प्रथम मान्य आहे. 'शून्यम शून्य' हा वाद तिथे नाही. 'शून्या'ची उपासना होऊ शकत नाही. चिंतन कसे करायचे ? शोध करायला गेली बुध्दी आणि हाताला काही लागलं नाही म्हणा, किंवा नको ते संस्कार पुढे आल्यामुळे सर्वच शून्य होऊन गेलं. काहीच नाही! काहीच नाही तर हे आलं कुठून ? नसताना येतं कसं ?

म्हणून अगोदर सर्व देशामध्ये सर्व कालामध्ये असणारे जे आत्मस्वरूप आहे त्याच्या ठिकाणी "लाविली जे स्वाचित्त" असे हे ईश्वर स्वरूप आहे याची चित्ताला जाणीव होणे म्हणजे तिथे चित्त स्थिर होणे. आणि असा जर चित्ताला अभ्यास झाला – म्हणजे अगोदर ते सर्व ईश्वराचे अस्तित्व पटले पाहिजे आणि त्या स्वरूपाचे ज्ञान आपल्याला करून घ्यायचय असा उत्साह, पूर्ण आशा ही निर्माण झाली पाहिजे. आणि त्या प्रमाणे साधनाचा अभ्यास अखंड चालला पाहिजे. पण हे जे स्वरूप आहे त्याचे चित्ताने चिंतन करणे कठिण आहे. सर्व देशात व सर्व कालात असणाऱ्या ईश्वराचे चिंतन करायचे आहे. म्हणून चिंतनाची चित्ताला योग्यता येण्या-करिता ईश्वराने सगुण साकार स्वरूपे धारण केली आहेत. सगुण साकार करणे म्हणजे मर्यादित स्वरूप आहे. मर्यादित स्वरूपाच्या ठिकाणी चित्त स्थिर होणे म्हणजे निश्चय होणे, संदेह जाणे ही सगुण साकार रूप आहेत, आणि त्या रूपाच्या ठिकाणी एकदा चित्त स्थिर झाले, म्हणजे मग त्या चित्ताचा विकास जसजसा होत जाईल तस तसे ईश्वर सर्वत्र आहे हे ध्यान, चिंतन करता येईल. चित्ताचा विकास व्हायला पाहिजे. "वासुदेव: सर्वम्" हे जे ज्ञान आहे, वासुदेव स्वरूप हे पूर्ण आहे, सर्वरूप आहे, त्यात कमी जास्त-पणा, भेद काहीही नाही, ही तिसरी अपरि-च्छिन्नता सांगितली आहे.

सर्व देशामध्ये आहे, सर्व कालामध्ये आहे आणि सर्वरूपीही तोच आहे. सर्व रूपी तो आहे म्हटल्यानंतर त्याच्या-शिवाय आणखी दुसरे काहीही रूप नाही. म्हणजे ज्यांनी मर्यादा आणली आहे ते देश कालसुद्धा जर निघून गेले, एक अखंड रूप जर राहिले तर त्या अखंड पूर्ण स्वरूपाला पहाण्याकरिता बुध्दीची योग्यता फार वाढली पाहीजे. मनाची अवस्था निघाली पाहीजे. समर्थांनी मनोबोध केला आहे; तर ती मनाची अवस्था टाकून देऊन निश्चयात्मक बुध्दी झाली पाहिजे. मन बुध्दीरूप व्हावे आणि मग बुध्दीरूप झालेल्या मनाला हे सर्व करता येते. बुध्दी विकसित होऊ शकते आणि शेवटी सर्व कालात आहे, सर्व देशात आहे असे करता करता सर्वस्वरूपच तो आहे, एकरूप आहे याची जाणीव (ज्ञान) होते. "जो जो भेटेल भूत ---- भगवंत" हे जे सांगतात ज्ञानेश्वर महाराज हे काही नुसते लेखन नाही त्यांचे!

अशा रितीने भगवान् श्रीहरीचे, दत्तात्रेयांना अखंड ध्यान लागणे आणि याच रूपाने दर्शन होणे हा साधना अभ्यास आहे. ईश्वर अखंड, सर्व कालात आहे. ईश्वर पूर्णरूप आहे! द्वैत नाही. द्वंद्वातीत अवस्था. अशी ग्रहण करणारी निश्चित बुध्दी बनवणे ही शेवटची अवस्था आहे. ईश्वर दर्शन होण्याकरिता नामदेवांना देखिल मानहानी पत्करावी लागली. कच्चे मडके म्हणून सर्व संतांनी ठरवले. मला सगळ्यांनी कच्चे म्हटले आहे. अशी तक्रार घेऊन नामदेव पांडुरंगाकडे गेले. पांडुरंग म्हणाले, खरं आहे. नामदेवांनी विचारले, "कच्चा कसा मी? माझ्याशी तुम्ही नेहमी बोलणं-चालणं करता; मी आणून दिलेले जेवण करता. साक्षात्कार झालाय मला तुमचा. आता राहीले काय? पांडुरंग म्हणाले, पांडुरंग फक्त राऊळातच आहेत, असे तू समजतोस. सर्व ठिकाणी अजून तुला पांडुरंगाचं दर्शन व्हायचं आहे. म्हणून कच्चं म्हणाले. आणि त्याकरता ज्या महात्म्यांची अशी बुध्दी विकासित झाली आहे. महात्मा म्हणजे इथे आत्मा या शब्दाचा अर्थ बुध्दी. खदी विशाल ज्यांची बुध्दी झाली आहे तो बुध्दीलला सर्व भेद निघून गेलेला आहे. "वासुदेवः सर्वम्" हे पूर्ण ज्ञान ज्यांना झालेले आहे. अशा महात्म्याकडे — विसोबा खेचरांकडे नामदेवाला पूर्ण ज्ञान होण्याकरता पाठवून दिलेल आहे. अशा सर्वांना माहीत आहे ही कथा.

हे पांडुरंगाचे स्वरूप आहे ही सुध्दा निश्चित बुध्दी झाली पाहिजे. पण असे असूनही साक्षात् पांडुरंगांनी ज्यांच्याकडे पाठवून दिले त्यांच्या बद्दल पुन्हा खालच्या भूमिकेवर आले आहेत. विसोबा खेचरांची बाह्यावस्था पाहिल्यावर, हे गुरु!? असा विचार मनात आला. शिव-लिंगावर पाय ठेवून झोपणारे हे कसे गुरु असतील! म्हणजे नामदेव पुन्हा संदेह अवस्थेत आले की नाही? ईश्वराने (पांडुरंगांने) प्रत्यक्ष सांगितले, हे तुझे गुरू आहेत, ह्यांच्याकडे जा, तरीही, हे योग्य मार्गदर्शन कसे करु शकतील, असा संदेह निर्माण झाला. आणि नामदेव विसोबांना म्हणाले, असे कसे देवावर पाय ठेवता तुम्ही? विसोबा म्हणाले, "म्हातारा झालोय मी. मला काही समजत नाही. जिथे देव नसेल तिथे माझे पाय ठेव." पाय उचलल्यावर सर्वत्र शिवलिंगच दिसू लागली नामदेवांना.

मनाच्या अवस्थेत खाली आलेल्या नामदेवांना ते सर्व दिसल्यानंतर पाय कुठे ठेवायचे असा प्रश्न पडला. शिवाय

ठेवताना शिवालिंगावर पाय ठेवला म्हणजे चूक झाली हे कोणी ठरवायचं? "वासुदेवः सर्वम्" पायही तोच आहे, डोकेही तोच आहे, दूध्यही तोच आहे, वहाणाराही तोच आहे. सर्वच तो आहे. सर्वच ब्रम्ह आहे. ही भावना ज्या महात्म्याची झालीआहे त्याने पाय ठेवले काय नि डोके ठेवले काय!

पण नामदेवांना सगुण साक्षात्काराचे फळ नामदेवांना एकदम मिळून बुध्दी तत्क्षणाचि विकसित झाली. निश्चिल एकदा आपल्याला समजल्यानंतर सुध्दा तो निश्चय आपला कायम टिकत नाही ना. बुध्दी अवस्था मिळत नही असे नाही पण मिळाली तरी टिकत नाही. ईश्वराची माहात्म्यांची एकदा कृपा झाल्यावर त्या बुध्दीमध्ये पुन्हा कधी चांचल्य येत नाही.

तर "अखंड आत्मा अविनाशी दत्त।" त्या पदीलाविती ने स्वचित्त।" त्याचे स्वरूप असे अखंड आहे. तो अविनाशी आहे. सर्व कालामध्ये आहे ज्याचा आपल्याला आश्रय घ्यायचाय तो सर्वत्र आहे. मी प्रवासास निघालोय, देव तर देवळात राहिला आता इथे संकट आले तर माझे संरक्षण कोण करेल? पुन्हा ती संदिग्ध मानासिक अवस्था आहे. ईश्वर सर्वत्र आहे ही जर दृढ बुध्दी मिळाली तर त्याला कुठेच भय रहाणार नाही.

दुर्योधनाने द्यूतात सर्व जिंकून घेतले. मूळातच चांगली बुध्दी नसल्याने विजय मिळाल्याची संधि साधून पांडवांची मानहानी करायचे त्याने ठरवले. त्यांच्या पत्नीची प्रतिष्ठा घालवल्याचे समाधान त्याला हवे होते. अशा बुध्दीला कोणीही सुधारू शकणार नाही. शेवटपर्यंत त्याची ती बुध्दी टिकली. अगदी मृत्युच्या वेळेसही तो म्हणाला, "जा तुम्ही, करा राज्य. युध्दात मृत्यु आल्याने मी निश्चित स्वर्गाला जाणार आहे. शेवटपर्यंत तुम्हाला राज्य न करू देण्याचे माझे ध्येय मी मिळवलं आहे." द्रौपदीला दुःशासनाने ओढून दरबारात आणले. भिष्माचार्य, द्रोणाचार्यांसारखे अतिरथी - महारथी वीर तिथे बसलेत. पण सगळे स्वस्थ बसलेत. राजाची संमती आहे असे समजून दुर्योधनाच्या आज्ञेने दुःशासनाने द्रौपदीचे वस्त्रहरण करायला सुरूवात केली. तिला कोणाचाही आधार आला नाही. अशा वेळी अनन्य भक्ती निर्माण होऊन श्रीकृष्णांना ती हाक मारते आहे, "गोविंद, द्वारकानाथ, हे कौरव माझ्या अब्रूवर उठलेत माझे रक्षण करा."

हाक मारणाऱ्या द्रौपदीची बुद्धी निश्चित आहे. श्रीकृष्ण जर द्वारकेत आहेत असे तिला वाटले असते तर तिने हाक मारली असती का? आणि इतक्या लांब हाक त्यांना पोहोचणार कशी? एका पाठीमागे एक, संशय उत्पन्न होतात. लांब आहे श्रीकृष्ण अर्थात त्यांना माझी हाक ऐकू जाणार कशी? काहीही उपयोग नाही. यावेळेला, माझा मृत्युच जवळ आला आहे असे वाटून निराश झाली असती. परंतु भगवंताचे स्वरूप हे सर्वत्र आहे. त्याची शक्ती फार मोठी आहे. अशी तिला खात्री असल्यामुळे ती हाक मारते आहे. दुर्योधन, दुःशासनाला काही वाटले नाही. कृष्ण कुठे असणार, आला तरी काय करणार आहे. असेच त्यांना वाटले. पण द्रौपदीच्या मनाची खात्री पटलेली आहे कि, सर्वत्र भरून राहिलेला परमात्मा माझे संरक्षण करणार आहे. ईश्वराचे नुसते अस्तित्व मान्य करून भिती जात नाही. अनेक प्रकारच्या भिती प्रपंचामध्ये असतात. परमार्थामध्ये काही भितीचे कारण नाही. तिथे मान अपमान सगळे सोडून द्यावे लागते.

द्वारकाधीश जसे द्वारकेत आहेत तसे इथेही आहेत. भगवान दत्तात्रेय जसे गाणगापुरात आहेत तसे वाडीमध्येही आहेत. स्मर्तृगामी त्यांना म्हणतात. देशपरिछिन्न जरी स्वरूप मानले तरी केवढी योग शक्ती आहे! स्मरण केल्याबरोबर त्या ठिकाणी हजर होऊ शकतात. दुसऱ्या ठिकाणी आहेत म्हटल्यावर ते इथे कसे येतील? येऊ शकतात. त्यांची ती शक्ती आहे. अशा एका विशिष्ट प्रेम भावनेने ती हाक मारते आहे आणि तिचे कार्य होऊन गेलेले आहे. द्रौपदी भावासमक्षीमध्ये मग्न आहे. निर्भय होऊन अखंड चिंतन चाललेले आहे. एक वस्त्र त्याने ओढल्यावर दुसरे वस्त्र तिथे येते आहे. शेवटी तो दमून आपल्या जागेवर जाऊन बसला. आता धृतराष्ट्राच्या मनावर परीणाम झालेला आहे. त्याने बोलावून द्रौपदीला पाहिजे तो वर मागून घ्यायला सांगितले, तिने सांगितले, पांडव हे दास्यातून मुक्त व्हावेत एवढाच मला वर द्या. त्यांची जिंकलेली शस्त्रे तुम्ही परत करा. बाकी आम्हाला काही नको. आम्ही कुठेही जाऊ, कुठेही राहू. कुठेही गेलो तरी परमेश्वर आमच्या बरोबर आहेत.

आमचे राज्य आम्हाला परत द्या असा तोंडातून शब्दही काढलेला नाही. द्रौपदीमुळे अशा रितीने पांडव सुटले

त्या वेळेला. शस्त्र मिळाली परत. निघाले लगेच. धृतराष्ट्राला चांगली बुध्दी त्यावेळेपुरती (प्रसंगापुरती) मिळाली; ती पुन्हा परत गेली. दुर्योधनादिक आल्यावर त्यांनी सांगितले, पिताजी, एक डाव आणखी खेळायला आम्हाला परवानगी द्या. पुन्हा पांडवांना बोलवा. त्याप्रमाणे बोलावल्यावर पांडव परत आले. आणि तो डाव शेवटचाच ठरलेला आहे. दुर्योधनाने सांगितले, याच्यामध्ये ज्याचा पराभव होईल त्याने बारा वर्षे वनवासात जाऊन एक वर्ष अज्ञातवासात जावे. बुध्दी कशी चालविलेली आहे पहा. बुध्दी आहे, पण शेवटपर्यंत तशीच आहे. पांडवांना तो काल अनुकूल नव्हता. एक वर्ष अज्ञातवासाची अट म्हणजे इतकी भयंकर आहे की, अज्ञातवासात पांडव उघडकीला आले तर पुन्हा बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास, हे त्याने योजनापूर्वकच केलेले आहे. पांडवांना केव्हाही आपण शोधून काढू असे त्याला वाटले. त्याप्रमाणे निघाल्यापासून पांडवांच्यामागे हेर होते. दुर्योधनाने त्याला मिळालेल्या निश्चयात्मक बुध्दीचा असा दुरुपयोग करून आपले भौतिक वैभव मिळाले. द्रौपदीही पांडवांबरोबर वनामध्ये गेली. ज्या द्रौपदीने पांडवांना दास्यातून मुक्त केलेले आहे, परमात्मा सर्वत्र आहे या केवळ एका निश्चयाने, आपली सुटका करून घेतली. आपलीही अब्रू सुरक्षित ठेवली आणि पांडवांनाही दास्यातून मुक्त केले. परंतु प्रारब्ध फार विलक्षण आहे की बारा वर्षे वनामध्ये जाण्याची पाळी आली.

ईश्वराने दिलेली बुध्दी, त्या बुध्दीचे संरक्षण करायचे आहे, मनाच्या अवस्थेमध्ये जायचे नाही आपल्याला. पण केव्हा जातो काही कळत नाही. ही बुध्दी मात्र निश्चयात्मक ठेवायची आहे. ईश्वराला कालमर्यादा नाही. सर्वात अधिक आयुष्य ब्रम्हदेवांचे असले तरी त्याला कालमर्यादा आहे. चार हजार युग म्हणजे ब्रम्हदेवांचा एक दिवस बारा तास आणि चार हजार युग म्हणजे रात्र आहे. अशी त्यांची शंभर वर्षे आहेत, आयुष्याची. आत्ता पन्नास वर्षे झालेली आहेत. अजून पन्नास वर्षे व्हायचीत. किती स्थिर आहे, वैभव किती आहे, ज्ञानशक्ती किती आहे पण त्यालासुध्दा शेवट आहे. त्यांचे आयुष्यसुध्दा संपणार आहे! परंतु ईश्वर मात्र कालातीत आहे. असे अनेक ब्रम्हदेव त्याच्या सृष्टीत होऊन गेलेले आहेत, होणार आहेत,

ही निःसीम भावना, निश्चित बुद्धी द्रौपदीला अनेक जन्मांच्या पुण्यकर्माने मिळालेली आहे, भक्तीने, सुकृताने आणि भगवत् कृपेने. त्यामुळे जरी वनवासाला जाण्याचा प्रसंग आला तरी ती बुद्धी सांभाळून घेते आहे. आपली बुद्धि सांभाळण्याकरितां वनांतही तिने स्वतः उपाशी राहून अन्नदान केले. दुर्योधनाची कितीही भयंकर असली तरी ईश्वराची कृपा विलक्षण आहे. यमधर्माचे दर्शन झालेले आहे. भगवती दुर्गादेवीचे दर्शन झालेले आहे, धर्मराजाला.

'वित्तभ्रम' मोठा कठीण आहे. विद्या, उपासनेलाही दैववित्त असे म्हणतात. सगुण असो किंवा अन्य कोणती उपासना असो, त्या उपासनेबद्दल भ्रम निर्माण होतो. हा वित्ताचा. म्हणजे साधनेचा, उपासनेचा भ्रम गेला पाहिजे असा मुद्दाम महाराजांनी उल्लेख केला आहे. ईश्वराच्या स्वरूपाचे चित्तात अखंड चिंतन करणे, तो सर्व ठिकाणी आहे आणि सर्व कालातही आहे. म्हणजे कोणत्याही जन्मात मी गेलो तरी ईश्वर आहे. स्वर्ग-नरक, इ. सर्व देशात तो आहे. अशी भूमिका असूनही जर तो वित्तभ्रम निर्माण झाला तर साधक त्याच्या निश्चयापासून ढळतो. त्याला मिळालेली बुद्धि-अवस्था जाते.

द्रव्याचा भ्रम आहे. मानुष्य द्रव्य तर प्रसिद्धच आहे. अनेक रूपांनी आहे स्थावर, जंगम इ. सर्व द्रव्यच आहे. त्या द्रव्याबद्दलही अधिकाधिक मिळावं, मिळालेलं सुरक्षित रहावं. योग आणि क्षेम. अप्राप्याची प्राप्ती व्हावी. प्राप्ती असलेल्याची संरक्षण व्हावे हा सगळा भ्रमच आहे. संरक्षण आम्ही करतो, अशीही एक भ्रांति आहे.

संतांच्या अंतःकरणामध्ये हा भ्रम नाही आहे. संपूर्ण संसार, ज्याला आपण वित्त समजतो. सर्व स्थावर जंगम, आप्त इष्ट हेही वित्तच आहेत. एकत्र जमलेले मानुष वित्त आहे. याची उत्पत्ती कोणी केली? नाश कोण करणार आहे? हे काही आपल्याला माहीत नाही. जड असो चेतन असो, जे काही आपले समजले गेले आहे संसारातले, त्याची उत्पत्ती आपण केली नाही किंवा नाशही आपण करू शकत नाही. पण संरक्षण मात्र आम्ही करतो हा एक भ्रम आहे. तो गेला पाहिजे. कड्या कुलुपात, इतर बंदोबस्तात धन आम्ही सुरक्षित ठेवू शकतो हे खरे आहे का? रोज वर्तमानपत्रात आपण बातम्या वाचतो. या बँकेतून त्या बँकेत पैसे ठेवायला नेताना मधल्या मधे जातात. उत्पत्ति आणि विनाश करणारी शक्ती वेगळीच आहे. एवढे ईश्वराचे आम्हाला अधिक ज्ञान आहे, पूर्ण नाही. संरक्षण करणारा

ईश्वरच आहे ही जर निश्चित बुद्धी झाली की सर्व संपले. मग भिती नाही. पण हे अर्धवट आहे संरक्षणाचा अहंकार आम्ही आमच्यावर घेतल्यामुळे आम्हाला भ्रांति निर्माण होते. हा चित्तभ्रम गेला पाहिजे.

तुलसीदासजींच्या घराला म्हणे कड्या-कुलुपे नसायची. त्यांचे दरवाजे नेहमीच उघडे. देवांना उत्तम सुवर्णालंकार असायचे. काही चोरांना हे समजले. त्यांनी जाऊन सगळे दागदागिने काढून घेतले, गाठोडी बांधून घेतली. आणि परत जायला निघाले. पहातो तो वाटेत दोन धनुर्धारी बसलेले दिसले. ते म्हणाले, आता हे दोन पहारेकरी कुठून आले. पाठीमागच्या दरवाजाने जाऊ तिथे जाऊन पहातात तो तिथेही दोघेही धनुर्धारी बसलेले. परत फिरले. तोपर्यंत पहाटेची वेळ झाली काकड आरती करण्यासाठी तुलसीदासजी उठले त्या चोरांची वृत्ती बदलली. त्यांनी तुलसीदासजींची क्षमा मागितली. तुलसीदासजी म्हणाले, तुम्हाला जे पाहिजे ते घेऊन जा. चोर म्हणाले, बाहेर पहारेकरी असल्याने आम्हाला जाता येत नाही. तुलसीदासजी म्हणाले, दरवाजे जिथे उघडे असतात, तिथे पहारेकरी कसे असतील? बरं कसे आहेत ते तरी सांगा. "तरुणौ रूपसंपन्नौ सुकुमारौ महाबलौ" हे वर्णन ऐकून तुलसीदासजी म्हणाले, केवढे भाग्य आहे तुमचे! तुम्हाला देवाचे दर्शन झाले. तेव्हा ईश्वरशक्ती सर्वत्र रक्षण करणारी आहे. हे तर्क दृष्ट्याही ~~पोषण करणारी~~ त्यांनी मांडली आहे. माता जरी बालकाचे पोषण करणारी असली, दुधाची उत्पत्ती कोणी केली? "न मातुः पर दैवतम्" हे शास्त्रकारही मानतात. ती कितीही वंदनीय असली तरी आपल्या पुत्रासाठी दुधाची उत्पत्ती करू शकत नाही.

तर गर्भापासून जी शक्ती जीवाचे रक्षण करते ती बाहेर आल्यानंतर नसते असे कसे म्हणता येईल, ज्या ठिकाणी दुसरा कोणीही संरक्षण करू शकणार नाही अशा ठिकाणी संरक्षण करण्याची ज्याची शक्ती आहे तो बाहेर संरक्षण करू शकत नाही का! तोच रक्षण करणारा आहे. ही तुलसीदासजींची धारणा पक्की आहे. संरक्षण करणारा आणि नाश करणारा एकच आहे. ही निश्चयात्मक बुद्धी असल्याने कोणत्याहि परिस्थितीत त्यांना भिती वाटत नाही. "ठेविले अनंते तैसेचि रहावे. चित्ती असु द्यावे समाधान" यात म्हटल्याप्रमाणे समाधानी अवस्था त्यांना यामुळे

मिळालेली आहे. तर हा एक बाह्य विसभ्रम आहे.

साधनाकालामध्ये आपल्याकडून काही तरी साधना होत आहे त्याबद्दल भ्रांति आपल्याला उत्पन्न होते. माझ्या साधनेत मला असे असे अनुभव येतात, माझी अशी अशी प्रगती झाली, अशी माझी चांगली तयारी झालेली आहे, असे मनात विकल्प होतात परंतु हाही भ्रम गेला पाहिजे. ईश्वराच्या उपासनेने खरे ईश्वर दर्शन होते. तो ईश्वर सर्वत्र आहे, सर्व कालात आहे, उत्पत्ती, स्थिती आणि लय करणाराही तोच आहे. सर्व स्वरूपी तो आहे. त्याच्या खऱ्या दर्शनाने कोणत्याही परिस्थितीत टिकेल असे समाधान मिळते. पण साधना-अभ्यासाच्या वेळी मात्र जर आपल्या मनांत भ्रांती निर्माण झाली कि मी मोठा उपासक आहे, माझी उपासना अशी चालू आहे, प्रगती आहे, तर नाही. हा भ्रम गेला पाहिजे. ईश्वराची साधना करणे हे आपले कर्तव्य आहे, कशी का घडेना, कमी घडेल जास्ती घडेल तिकडे लक्ष द्यायचे नाही. कारण आपल्या सर्व ज्ञानेंद्रियांना, मनाला, बुद्धिला प्रेरणा देणारी एकच शक्ती आहे. (अर्थात् ईश्वराची) हे जर का एकदा पटले असेल, निश्चित बुद्धी झालेली असेल तर कमी चाललेले आहे याचा विचार तरी कशाला करायचा! साधकाचे स्वरूपही परमात्मस्वरूपाप्रमाणे अनादि, अनंत आहे. "वासुदेव: सर्वम्" हे शेवटी कळायचे आहे. आरंभाला साधकदशा आहे. शेवटी सिद्धावस्था - परमात्मदशा आहे. पण साधकदशेत सुद्धा जर ईश्वरच सर्व आहे हे जर पटलेले असेल आणि तशी जर बुद्धि निश्चित झाली असेल तर खरे ईश्वरदर्शन होऊ शकते. आणि त्या ईश्वर दर्शनापर्यंत जो महात्मा गेलेला आहे तो ईश्वरापेक्षा भिन्न राहिलाच नाही. अहम् पूर्ण गेलेला आहे. "तो पूर्ण आनंद गुरु समर्थ" ही त्याचीच अवस्था आहे सर्वांचे हित करण्याकडे त्याचे लक्ष आहे. कारण तो समर्थ बनलेला आहे. स्थितप्रज्ञ अवस्था मिळालेली आहे. तिथून बुद्धि आता खाली येणारच नाही. सगळा मनोभाव गेला आहे. मनाने निर्माण केलेला द्वैतभाव निघून गेलेला आहे. ईश्वराने निर्माण केलेले द्वैत तितके बाधक नाही. आम्हीच मनाने द्वैत निर्माण करतो. पांचभौतिक शरीर एकच आहे. ईश्वराने निर्माण केलेले आहे. एकाच स्वरूपाच्या ठिकाणी प्रत्येकाने निरनिराळे रूप तयार केले आहे. आईला वाटते ही माझी कन्या आहे. बंधूला वाटते ही माझी भगिनी आहे. पांच भौतिक ईश्वराचं स्वरूप एकच आहे. पतिला वाटते ही माझी पत्नी आहे. अशा तऱ्हेने मनाने निर्माण केलेले मनोमय द्वैत फार वेगळे आहे. आणि त्या मनोमय द्वैताच्या पाठीमागे जाणारे मन हे तर जास्तीच

वेगळं आहे. मनोनाश व्हावा लागतो म्हणतात त्या मनाच्या सर्व अवस्था बंद होणं म्हणजे बुध्दि अवस्था प्राप्त होणं स्थिरता येणं. स्थितप्रज्ञ अवस्था मिळाली. त्या शिवाय दृढ ज्ञान होत नाही. तशी बुध्दि आपल्याला मिळाली म्हणजे आपण कृतार्थ झालो असे म्हणतात महाराज.

आपण मनाच्या अवस्थेमध्ये किती काळ असतो? बुध्दिच्या अवस्थेत किती काळ असतो? ईश्वराचे मूळ एकच असलेले रूप निरनिराळ्या रूपाने सर्व देशात, सर्व कालात आहे. सर्व वस्तू - स्वरूप तो आहे. अशा विविध रूपामध्ये आपले चित्त किती काळ राहू शकते त्यावरून आपल्याला मिळालेली बुध्दिची अवस्था किती टिकणारी आहे हे कळून येतं. कोणत्याहि काळामध्ये जर मनाची ही अवस्था कायम राहिली तर तशी ठेवणारे तशी मिळविणारे ईश्वराजवळ तेच मागणारे आहेत -

बुध्दि दे रघुनायका।

ही निश्चयात्मक बुध्दि आम्हाला द्या. भ्रांति आमच्या मनातली सगळी काढून टाका. आपल्या स्वरूपाबद्दल आमच्या मनाची वृत्ती करा, एवढेच मागतो आहे समर्थांचे।

तर यापैकी आपली मनोवृत्ती आहे कि बुध्दिवृत्ती आहे हे आपले आपण तपासायचे, मनोवृत्तीमध्ये आपला काल किती जातो, बुध्दिवृत्तीमध्ये किती असतो. बुध्दिवृत्ती ईश्वरस्वरूपाबद्दल कशी असते. बाह्यप्रपंचाबद्दल आपली निश्चयात्मक बुध्दिवृत्ती असू शकेल - असं वागायचं, तसं वागायचं, प्रयत्न करायचा, हे करू शकतो. ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल, त्याच्या शक्तीबद्दल आपली निश्चयात्मक बुध्दि किती टिकते हे पाहिले पाहिजे, तशी प्रार्थना त्या ईश्वराजवळच करायची आहे. ती बुध्दि ईश्वराने आपल्याला द्यावी. पण ईश्वराच्या कृपेने ही बुध्दि मिळविण्यासाठी पुष्कळ काळ जातो. हा अभ्यास किती तरी काळ चालतो. अशा प्रकारची कितीतरी साधने जमवावी लागतात. तेराव्या अध्यायात (भगवद्‌गीतेच्या) भगवंतांनी ही साधने सांगितली आहेत. या वीस साधनांची प्राप्ती होऊन त्या साधनावस्थेत स्थिर व्हाणं, त्या बुध्दिचा विकास करणं ही साधना आहेत, हा सर्व साधनाभ्यास आपला मनोभाव कमी करून करायचा. बुध्दिवृत्तीने — निश्चयात्मक बुध्दिने करायचा. आपला प्रयत्न कितीसा पुरा पडणार पण निश्चयाने अभ्यास अभ्यास केला पाहिजे असे महाराज सांगतात. ईश्वराची प्रार्थना त्या करिताच आहे. त्या बुध्दिवृत्तीमध्ये ईश्वराने आपल्याला न्यावे अशी तळमळ लागली

पाहिजे म्हणजे निर्भयता प्राप्त होणार आहे. स्वर्गाचा राजा इंद्र त्याच्यापासून ते राष्ट्रपति, पंतप्रधानापर्यंत सर्वांना भिती आहे. त्यांना किती भिती असते याची आपल्याला कल्पना आहे. भिती उत्पन्न झाली की उत्साह, आशा वगैरे सगळं निघून जातं, आणि दौर्बल्य उत्पन्न झालं की सर्व संपलं. आपण जर सगळ्या लोकांना मारलं तर नरकात जाऊ अशी अर्जुनाला भिती वाटू लागली. सामर्थ्य जवळ असूनही मला काही युद्ध करायचे नाही. असे सांगून मोकळा आला. परंतु त्याने मोकळेपणाने सांगितलं, बाबा माझ्या मनात भ्रम निर्माण झाला आहे. काही निर्णय घ्यायची माझी अवस्था राहिलेली नाही.

ही अहंकार रहित बुद्धि आहे. मनोभावामध्ये जर अर्जुनाचा अहंकार मिसळला असता तर केवढा अधःपात झाला असता. कौरव जाणार होतेच कौरवांचा नाश होणारच होत. विश्वरूप दाखवल्यानंतर श्रीकृष्णांनी त्याला बजावलेलं आहे, "तुला जायचंय का अर्जुना? जा. सर्व लोकांचा संहार करायचा संकल्प माझा कधीच झाला आहे. आणि तू निघून गेलास तरी हे कोणीही जिवंत रहाणार नाहीत. माझ्या संकल्पाप्रमाणे तुला करायचं आहेत, वागायचं असेल, आज्ञा पालन करायचं असेल तर कर तुझ्या दयेचा काहीही उपयोग नाही". हे मुद्दाम त्याला बजावले आहे.

एक शक्ती विलक्षण आहे हे त्यानं पाहिलं आणि मग त्याचा मोह गेला. मनोभावातच तो गुंतलेला होता. हे चांगलं, ते वाईट हे आपल्या मनानेच ठरवून टाकलं त्याने. पण केवळ अहंकारातून मोकळा होता म्हणून वाचला तो. हे सद्गुरूचे कार्य आहे, सगळ्यांचा संहार होणार आहे तू युद्धात किंवा राहिलास तरी हे कोणी जिवंत रहाणार नाहीत". पण त्याची बुद्धि सुधारायची आहे. त्याच्या बुद्धिची स्थिरता करायची आहे. त्याचा मोह दूर करायचा आहे. इतकी त्या सद्गुरु स्वरूपाच्या ठिकाणी दया आहे. अर्जुनसुद्धा मोठा अधिकारी महात्मा आहे. त्याच्यावर असा प्रसंग आलेला आहे परंतु ईश्वराची दया आहे. सद्गुरूरूपाने मार्गदर्शन करून त्याचा मोह दूर केलेला आहे. शेवटी कबूल केलं त्याने. "तुम्ही होतात म्हणून माझ्या कर्तव्याची जाणीव मला झाली. माझा निश्चय मला कळलेला आहे. निश्चयात्मक भूमिका मला मिळालेली आहे. संदेहात्मक मनोभाव गेला माझा. चांगलं-वाईट, हिंसा-अहिंसा याचा विचार करायचा मला अधिकार नाही. तुमची आज्ञा आहे मी तयार आहे."

अर्जुनाला आलेला मोह ...

निणय दिलेला आहे —
तो धृतराष्ट्राचा मंत्री असूनही त्याने

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्री विजयोभूति ध्रुवः नीतिर्मतिर्मम ॥

तुम्हाला विजय मिळणार नाही त्याच्याच मंत्र्याने सांगितले. मनामध्ये दृढ विश्वास तर असा एक अभ्यास झाला पाहिजे. त्याची प्रार्थना निर्माण झाला पाहिजे. चिंतन अखंड झाले पाहिजे तर किती अखंड झाली पाहिजे. आपल्याला जर कळ पाहिजे तर करीत दिवस प्रार्थना करायची याचा विचार कराला करायचा रहायचे ।

"अखंड — — — — — — — — — — समर्थ ॥"

अवधूत श्रीगुरुदेवदत्त

शुकासारीखे पूर्ण वैराग्य ज्याचे।
वसिष्ठापरि ज्ञानयोगे तयाचे।
कवि वाल्मिकासारीखा मान्य जैसा।
नमस्कार माझा सद्गुरु रामदासा।।

जय जय रघुवीर समर्थ ।।

समर्थांच्या तप: प्रभावाने महाराष्ट्र प्रांतामध्ये जागृती झालेलीच आहे. त्यांनी केलेली आहे. सज्जनगडावरून प्रतिवर्षी समर्थांच्या पादुका मद्रास प्रांतामध्येही जातात. कर्नाटक वगैरे निरनिराळ्या प्रांतामध्येही जातात. सर्वही ठिकाणी समर्थांचा संचार झालेला आहे.

धुळ्याच्या माननीय शंकरराव देवजींनी सर्व भारतामध्ये प्रवास करून जेवढ समर्थांचे वाड.मय त्यांना मिळाले ते सगळही त्यांनी तिथे एकत्र करून ठेवलेले आहे. समर्थांचे विचार किती आहेत ते आत्ताच आपल्या माननीय श्री राजदत्त यांनी सांगितलय. काय लिहीले नाही समर्थांनी? सर्वही विषयांचे त्यांनी मार्गदर्शन केलेले आहे. तर ते एक मोठ काम आहे. तिथे त्यांनी समर्थांच्या मूर्तिची स्थापना मागच्या महिन्यात केलेली आहे. आणि त्या ठिकाणी इतक वाड.मय समर्थांचे, आयुष्यभर हिंडून शंकररावजी देवांनी गोळा करून ठेवलेले आहे. ते पहाण, त्याचा अभ्यास करण, त्यानंतर त्याचा प्रसार करण हे कितीतरी मोठं काम आहे. ती मंडळी करताहेत. कार्य त्यांचं चालू आहे. हळूहळू.

त्यांनी [समर्थांनी] स्वत: सर्व एकंदर संसाराचा त्याग केला असे आरंभाला तरी दिसत आहे. "हे विश्वची माझे घर" हे त्यांना दाखवायचे होते. म्हणून आपल स्वत:च घर आहे ते सोडून दिल. मातेला सुध्दा सोडून दिलं. सगळ सोडून बाहेर पडले. रामरायांची कृपा संपादन करावी, ब्राम्हतेजाची अभिवृध्दि करावी, त्या करता गायत्री पुरश्चरण केल. मधुकरी मागून हे सगळ केल. आणि नंतर सर्वही भारतामध्ये संचार त्यांनी केलेला आहे.

लोकस्थिती काय आहे? लोकांची मन कशी आहेत? तयार आहेत का अपूर्ण आहेत? हे सगळही त्यांनी पाहिलेल आहे. पायांनी संचार केला. त्यांना काही आणखी वाहनांची सोय राजशासनाकडून झाली नव्हती. त्यावेळेला कुठल राजशासन? "मतामतांचा गलबला" म्हणून त्यांनी सांगितलेलं आहे. आत्ताही तशीच स्थिती आहे. पण समर्थ मात्र प्रत्यक्ष नाहीयेत. ही फक्त एवढी उणीव आहे.

अशा प्रकारचे महात्मे स्मर्तृगामी असतात. स्मरण केल्या बरोबर येऊन, अव्यक्त रूपाने, बुध्दिला प्रेरणा देतात. ज्यांची बुध्दि अशा प्रकारे चांगली सात्विक, संस्कार-संपन्न असेल, त्या बुध्दिलाही जास्तीत जास्त उन्नत करून आणखी कार्य करण्याची शक्ती त्यांच्याकडे आहे. " तनु त्यागिता किर्ती मागे उरावी " हा मोठा सिध्दान्त त्यांनी सांगितलेला आहे. शरीर असेपर्यंत किर्तीची अपेक्षा करु नये हाही त्याचा अर्थ आहे. कार्यरत असले पाहिजे. " यत्न तो देव जाणावा " हा आणखी एक सात्विक प्रयत्न आहे- ईश्वराला, शास्त्राला संमत अशा प्रकारचा. समाज हितकारी अशा प्रकारचा प्रयत्न हाच देव आहे. नियमानुसार शास्त्राचा हाच सिध्दांत आहे. "तस्मै नम:कर्मणे" म्हणतात. कर्म हेच नमस्कारार्थ आहे. कर्म हाच ईश्वर आहे.

तर ते कर्तव्य कर्म करीत असले पाहिजे. त्यावेळेला किर्तीची अपेक्षा असू नये. किर्तीची अपेक्षा मनामध्ये उत्पन्न झाली की कर्मामध्ये न्यूनता येते, आणि अपूर्णता कायम राहाते. गुणज्ञ अशा प्रकारची जी सात्विक प्रकृतिची मंडळी आहेत, प्रत्येक आणखी गावामध्ये असतात, नाही अस नाही. अनुकूल काळ, प्रतिकूल काळ सर्वही व्दंव्दात्मक विश्व आहे. त्यामध्ये प्रतिकूलही परिस्थिती असेल, काळ असेल पण अनुकूलही असतो.

बुध्दि अनुकूल आहे. त्याच प्रमाणे सर्वही कार्य - चांगली कार्य - त्या बद्दल आस्था आहे. आणि सत्कार्य घडावी. प्रगट करता आली नाही तरी अप्रगट रीतीने का होईना करावी, अशा प्रकारची मानवांची बुध्दि आहे. छत्रपति राजे ज्या वेळेला होऊन गेले त्या वेळेला ते कुठतरी आणखी महादेवाच्या मंदिरात बसून, आपल्या बरोबरची दहा पांच मंडळी मिळवून त्यांच्या बुध्दिला ते पटवून देऊन अस आणखी कराव लागल.

तर हे जरी आणखी अशा प्रकारच असल तरी समर्थांची ज्ञानशक्ती आणखी छत्रपतिंची क्रियाशक्ती ह्या दोन्हींचा समन्वय झाल्यामुळे आणि तशाही कठीण परिस्थिती मध्ये इतकी कठीण परिस्थिती असतानाही हे लोकशाही आहे अस म्हणतात, राजशासनही तसच आम्ही लोकशाहीने वागतो आहोत अस सांगताहेत. तशा या स्थितीमध्ये आणि तितकी कठीण परिस्थिती नाहीये. कुठ शिबिर घ्यायची, काय घ्यायची, कल्पनाही नाही लोकांना. जो तो अगदी भीतिग्रस्त झालेला आहे. गांवामध्ये आत्ता आपण आहोत, पुन्हा काय कोणत्या क्षणी, कित्येक तासांनी काय होत, कुणाचा एकंदर हल्ला होतोय काय होत, अशा प्रकारची कठीण परिस्थिती आहे. त्या वेळेला होती. तरी धैर्य होत शिवाजी राजांना समर्थांची प्रेरणा मिळाली. त्यांची ही दैवी प्रकृति होती. त्या दैवी प्रकृतिच पहिल लक्षण -

अभयं सत्त्वसंशुध्दिर्ज्ञानयोगव्यवस्थित: ।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ।।

भगवान् सांगत आहेत कि दैवी प्रकृतिचे पहिले लक्षण म्हणजे निर्भयता आहे. ही निर्भयता त्यांची लहानपणापासून आहे. विजापूर राजधानीमध्ये एका खाटकाचा हात त्यांनी रस्त्यामध्ये तोडून टाकलेला आहे. त्यांचे पिताजी तर त्या राजाचे आणखी सचीव होते म्हणा, नोकर होते. पण काही विचार नाही. अन्याय दिसल्यानंतर क्षमा नाहीये. पुढे काय होईल याचा विचारही नाही आहे.

हे सात्त्विक धैर्याचे लक्षण आहे.

धृत्या यया धारयते मन:प्राणेंद्रियक्रिया: ।
योगेनाव्यभिचारिण्या धृति:सा पार्थ सात्त्विकी ।।

सात्त्विक धैर्याचे लक्षण भगवान् सांगत आहेत. ते सात्त्विक धैर्य आणखी मनामध्ये असल पाहिजे. व्यक्त जरी झाल नाही तरी हरकत नाही. एखादा कुणीतरी महात्मा महापुरुष येतो. भगवान् शंकराचार्यांचा तोही अवतार होऊन गेला. सर्वही वैदिक धर्माचा लोप होण्याची पाळी आलेली होती. कुठ कालडी क्षेत्र केरळमध्ये आहे. कुठे झाले इकड बद्रीनारायणापर्यंत येऊन, ग्रंथ लिहून, सगळ्या लोकांमध्ये स्वत: जाऊन, चर्चा, वादविवाद करून, त्या त्या आणखी पक्षाचे, त्या त्या मताचे लोक आहेत, त्यांच्या बरोबर वादविवाद करून एकंदर वैदिक संस्कृतिचे सिध्दान्त त्यांनी आणखी स्थापन करून दिलेले आहेत. त्यामुळे पुढे होऊन गेलेली सगळीही संत मंडळी प्राय: त्यांचीच आणखी अनुयायी अशा प्रकारची आहेत. त्यांच्याच मतांचा आणखी पुरस्कार करणारी सगळी ही संत मंडळी आहेत.

" भाष्यकाराते वाट पुसतो " म्हणून ज्ञानेश्वर महाराजही म्हणतात. त्यात बुध्दिवादाने काहीतरी अर्थ काढायची पध्दती आहे सध्या. भाष्यकार अनेक झालेले आहेत. हेच भाष्यकार कशावरून? म्हणजे भेदनितीने प्रत्येक ठिकाणी आणखी भेद उत्पन्न करण्याचा बुध्दिवाद हा आहे. असू दे. परंतु दैवी प्रकृतिचे जे महात्मे, जीवात्मे जन्माला आलेले असतील त्यांचा बुध्दिभेद कधीही होत नाही. त्यांना अशा प्रकारचे माहात्मे, सत्पुरुष भेटतात. त्यामुळे त्यांची बुध्दि आणखी स्थिर राहाती. स्थिर बुध्दिच्या लोकांकडूनच काहीतरी कार्य होते. अस्थिर बुध्दि असल्यानंतर काही कार्य होऊ शकत नाही.

आजच्या काळामध्ये आणखी समर्थ वाड.मयाचा अभ्यास हा अधिकाधिक झाला पाहिजे. समर्थांनी जे विचार मांडलेले आहेत वेदांत शास्त्रामध्ये व्यवहार सत्ता निराळी असे आणखी वेगळे वेगळे प्रकार त्यांनी केले आहेत. स्वप्नामध्ये असे पर्यंत त्यावेळची सत्ता निराळी आहे. त्यावेळेला ते खर आहे. पण नंतर ते असत्य आहे. अनुभवाने सिध्द होत. तसे काही सिध्दान्त आहेत. परंतु ते सिध्दांत व्यवहारामध्ये आणखी आपल्याला व्यवहारही करु देणार नाहीत आणि परमार्थ तर प्राप्त होणेच शक्य नाही. म्हणून वेदान्ताचे चिंतनसुध्दा कोणी कराव, त्याचाही अधिकारी कोण आहे हेही त्यांनी ठरवून ठेवलेल आहे.

साधनचतुष्टय संपत्ति म्हणून जी सांगितलेली आहेत शास्त्राने – विवेक, वैराग्य इ. ही सगळी साधन ज्यांच्याजवळ आहेत त्यांनी वेदांताचा विचार करावा आणि आपली उन्नती त्या क्षेत्रामध्ये करुन घ्यावी. पूर्ण तत्व जे आहे त्या पूर्ण तत्वापर्यंत जाण्याचा प्रयत्न करणाऱ्याला तो मोकळा आहे. त्याला व्यवहारातूनही शास्त्राने मोकळीक दिलेली आहे. परंतु सर्वसामान्य जीवांची अवस्था तशी नाही आहे. संसारात राहूनच सगळ करायच आहे. व्दैतातूनच अव्दैताकडे जायच आहे. व्दैतात राहूनच आणखी आपली बुध्दि सात्विक बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सात्विक बुध्दिमध्ये हे सर्वही गुण येतात. दैवी संपत्ति ज्याला म्हणतात ते सगळेही गुण सात्विक बुध्दिमध्ये येऊ शकतात.

ती बुध्दि सात्विक बनवायची. सात्विक याचा अर्थ म्हणजे काही पूर्ण शांति, पूर्ण अहिंसा असा त्याचा अर्थ नाहीये. पूर्ण अहिंसा कोणीही करु शकत नाही. पूर्ण झालेला ईश्वरस्वरुप झालेला जो आहे त्यालाच फक्त पूर्ण अहिंसा माहीती आहे. तो करु शकतो. आचरण करु शकतो. इतरांना तशी अहिंसा शक्य नाही आहे.

द्रोणाचार्य अनावर झाले, रागावले. पांडवाचा विनाश होण्याची पाळी आली. अशा वेळेला श्रीकृष्णाने आणखी त्या भीमाला सांगून एक अश्वत्थामा नांवाचा कौरवांच्या सैन्यांतला हत्ती मारला, मारविला त्याने आणि अश्वत्थामा मेला मेला म्हणून सगळीकडे आणखी धून उठविली आहे. द्रोणाचार्यांच्या कानामध्ये हे जाव आणि त्यांचा युध्दाचा आवेश काही कमी व्हावा असा त्याचा उद्देश आहे. युध्दाच्या क्षेत्रामध्ये आल्यानंतर त्याप्रमाणे वागल पाहिजे. द्रोणाचार्यांना आणखी समजल. हे शक्य नाही. असंभवनीय आहे. अश्वत्थामा मारला कसा जाईल?. इतकी अस्त्रविद्या त्याला दिली. त्याला आणखी पूर्ण तयार केला. हा कसा गेला? धर्मराज कुठे आहेत? अजातशत्रू धर्मराज आहे. जरी कौरवाचे सेनापति द्रोणाचार्य होते तरी द्रोणाचार्यांचा विश्वास धर्मराजांवर आहे. धर्मराजांनी जर सांगितल अश्वत्थामा मेला तर शस्त्रसंन्यास करावयाचा.

गोपाळकृष्णांनी धर्मराजाला विचारल, काय सांगणार, बाबा, तू आता? द्रोणाचार्यांनी जर तुला विचारल कि अश्वत्थामा मेला हे खर आहे काय तर तू काय सांगणार? तो म्हणाला काय खर असेल ते मी सांगणार. हत्ती मारलेला आहे.

खरं मग इथ कशाला आलास? बारा वर्षे नाही आणखी तिथ वनातच रहायच होत। तुला जर सत्याच पालन करायच असेल, इतकी सगळी मंडळी आज जर तुला सांगताहेत आणि तू जर सांगितलस कि अश्वत्थामा जिवंत आहे व हत्ती मारलेला आहे तर हा म्हातारा इतका संतापून उठेल कि तुम्हा पांडवापैकी कोणीही जिवंत राहाणार नाही. हे सत्य आहे काय? सत्य म्हणजे भूतहित आहे. " सत्यं भूतहितं प्रोक्तं " म्हणतात. तेव्हा सत्याच पालन– पूर्णव्रत ज्याला म्हणतात ते महान्व्रत – तुला करता येणार नाही. अल्पोव्रत आहे. बाकीची ही सगळी मंडळी आहेत म्हणजेसत्य सर्वथा सोडून द्याव अस नाही. सत्याचाही अभ्यास बाकिच्या व्यवहारातल्या सगळयाही अपूर्ण जीवांनी करायचा आहे पण तो अल्पव्रत म्हणून करायचा आहे. केव्हाही मी खोट बोलणार नाही, कोणत्याच दिवशी नाही, कोणत्याही ठिकाणी मी खोट बोलणार नाही

अस शक्यच नाही. निदान अशा शिबिराला गेल, मंदिरात गेल म्हणजे तिथे असेपर्यंत खोट बोलणार नाही एवढ तरी व्रत पाळाव. अल्पव्रत म्हणतात त्याला. अभ्यास करण्याकरता. अभ्यासी स्थिती आहे तुमची, म्हणून त्याला सांगितल. शेवटी त्याने काय सांगायच ते सांगितलच. संदेह म्हणजे ही स्थिती. गोपाळकृष्णांनासुध्दा सांगाव लागल त्याला.

सत्याच पालन पूर्ण होऊ शकत नाही, पूर्ण अहिंसेच पालन पूर्ण होऊ शकत नाही, आणि काही तरी मनाचा गोंधळ झाल्यामुळे आणखी सगळया समाजामध्ये वाताहात होऊन जाते. म्हणून व्यवहार व्यवस्थितरीतीने आपल्याला करता आला पाहिजे. " आधि प्रपंच करावा नेटका " म्हणतात. प्रपंच म्हणजे सगळा व्यवहार! नुसता वैय्यक्तिक प्रपंच नाही. सामाजिक प्रपंचामध्ये सुध्दा आपली बुध्दि कशी स्थिर राहिली पाहिजे. व्यवस्थित राहिली पाहिजे हे समजले पाहिजे.

दामाजीपंतांनी आपखी दुष्काळाच्या वेळेला बादशाहाच सगळ धान्य सर्व जनतेला देऊन टाकलेल आहे. बादशाहांची आज्ञा मिळेल, त्यांच्याकडे पाठवू, आता अर्ज करु आणि त्यांची आज्ञा मिळाल्यावर धान्य देऊन टाकू. तोपर्यंत हे जिवंत राहतील कशावरुन? कोणाकरता धान्य साठवलेल आहे हाही विचार त्यांनी केलेला आहे. शिवाय त्या बादशाहाच धान्य आपल स्वत:च धान्य, आपल्या मोठेपणाकरता त्यांनी दिलेल नाही. तर बादशाहाचही कल्याण व्हाव आणि जनतेचही स्वास्थ जनतेला मिळाव या करता ते धैर्याने देऊन टाकलेल आहे. परिस्थिती काय होईल ते भोगण्याची मनाची तयारीही ठेवलेली आहे. अशा प्रकारचा अधिकारी जर असेल तर जनतेचही कल्याण होईल. आणखी शासनकर्ते जर गुणज्ञ असतील तर ते त्यांच्या गुणांच चीज करणारे भेटले तर त्यांच कल्याण होतच आहे.

तर व्यवहारामध्ये अस आपल्याला वागता आल पाहिजे. कोणी नियामक असो, नियम्य असो सर्वही स्थितीमध्ये व्यवहार आपला कसा ठेवला पाहिजे हे सगळही आणखी शास्त्राला अनुसरुन सामाजिक परिस्थितीसुध्दा बिघडू नये या करता अस शिक्षण पाहिजे. व्यवहारात राहूनही हे सगळही समर्थांनी आपल्या अप्रतिम बुध्दिच्या व्दाराने भगवंताचे अधिष्ठान ठेवून ते सांगितलेल आहे.

शिवाजी राजांना राज्याभिषेक झाला, राज्य स्थापना झाली. पुन्हा काही तिकडे लक्ष नाही. त्या देवीला प्रार्थना केली, " तुझा तू वाढवी राजा " तुझा राजा आहे, म्हणाले. तू शक्ती आहेस. सर्व एकंदर सृष्टीचा प्रलय करणारी तू शक्ती आहेस. तुझ्या कृपादृष्टीने प्रेरणेन हा राजा झालेला आहे. तेव्हा त्याची अभिवृध्दि करण म्हणजे समाजाची अभिवृध्दि करण्यासारख आहे. संरक्षण कर्तृत्व जे ईश्वराला आहे ते यामुळे आहे. अशाच प्रकारचा नेताही त्यांनी बनविला पाहिजे. त्याच्या कृपेशिवाय नेता, हा स्वत:च्या प्रयत्नांनी होऊ शकत नाही. त्याला आणखी ईश्वरी कृपा पाहिजे, असे महात्मे भेटले पाहिजेत. माहात्म्यांची भेट झाली तरीसुध्दा त्यांचे म्हणणे योग्य आहे. हे समजण्याची आपली बुध्दि पाहिजे. अहंकाररहित बुध्दि पाहिजे. तर त्यांच्या मार्गदर्शनाचा उपयोग होऊ शकेल. बुध्दि जर चांगली नसेल तर माहात्म्यांची भेट होऊन काही उपयोग नाही.

भरताने राज्य केल, आणि दुर्योधनानेही राज्य केल. चित्रकूट पर्वतावर प्रभुरामचंद्र जिथे राहात होते तिथे भरत आलेला आहे. त्याला सगळ समजल. मातेन सगळ हे केल. वाईट वाटल त्याला. आणखी रामचंद्रांना परत आणाव म्हणून तो चित्रकूट पर्वतावरती गेला असताना लक्ष्मणाच्या मनांत संशय उत्पन्न झाला. हा भरत सगळ सैन्य घेऊन येतो आहे. त्याला राग आलेला आहे. तो म्हणाला, हा तुम्हाला काहीतरी कैद करण्या करण्यासाठी येत आहे. "नाही," रामचंद्र म्हणाले, "त्याची बुध्दि चांगली आहे." कुणाची बुध्दि वाईट आहे, कुणाची बुध्दि चांगली आहे हे सगळ समजण्याची शक्ती पाहिजे. त्यागी माहात्मा जो आहे तो हे सगळ ओळखू शकतो.

आलेला आहे भरत. प्रार्थना केली, "महाराज, हे राज्य आपल आहे आपण घ्या"
"नाही" म्हणाले, "पित्याची आज्ञा आहे ना! त्याला धर्मसंकटातून मुक्त करण्याकरता तू
तुझ कर्तव्य केल पाहिजेस आणि मी माझे करणार. वनवासामध्ये चौदा वर्षे मला रहाव
लागेल" रामचंद्र चौदा वर्षे वनाच्या हद्दीतच राहिले आहेत. सुग्रीवाने राज्याभिषेक
करण्याच्या वेळेला त्यांना प्रार्थना केली "आपण किष्किंधानगरीत राजधानीमध्ये या"
"नाही", म्हणाले "मला येता येत नाही. वनाची हद्द सोडून मला जाता येत नाही.
लक्ष्मणाला घेऊन जा तुम्ही. होऊ दे राज्याभिषेक".

याप्रमाणे ज्यांनी पित्याचे वचन पालन केल आहे, मर्यादा पुरुषोत्तम म्हणतात त्यांना
असा नेता आणखी राष्ट्रापुढे समर्थांनी मुद्दाम ठेवलेला आहे. वाल्मिकींनी मुद्दाम
ठेवलेला आहे. भरताला सांगितल, तुझ कर्तव्य राज्य करायच आहे. तुझ्या आईने तुला
राज्य मिळवून दिलेल आहे. त्याला पित्याची संमती आहे. तुला वनामध्ये येता येणार
नाही. तू राज्यच केल पाहिजे." हे जरी स्वत: रामचंद्रांनी सांगितलेल असल तरी
भरताची सात्विक बुध्दि आहे. दैवी प्रकृती आहे भरताची. "पादुका द्या" म्हणाला.
पादुका घेऊन गेलेला आहे.

सिंहासनावरती पादुका प्रतिक रामचंद्रांच ठेवलेल आहे. मी एक सेवक आहे.
रामचंद्रांच्या राज्याचा मी एक विश्वस्त आहे. पालक आहे. चौदा वर्षे पर्यंतच. म्हणजे
ज्यावेळी राज्य सुरु केले त्यावेळेस राज्य केव्हा सोडायच हाही मनाचा निश्चय त्याने
बोलून दाखवलेला आहे. चौदाव्या वर्षाचा शेवटचा दिवस संपला, रात्र संपली, पंधराव्या
वर्षाचा सूर्योदय होईपर्यंत भरत जिवंत राहील. एवढच त्याने स्पष्ट सांगितले. म्हणून
रामचंद्रांना आणखी लवकर याव लागल, लंकेच कार्य आटोपून.

तर चौदा वर्षे ज्याच्या ताब्यामध्ये राज्य होत, रामाने दिलेल होत, ते राज्य
रामचंद्र आल्यावर जसेच्या तसे व्यवस्थितपणाने सुरक्षित ठेवून आणि त्यांच त्यांना अर्पण
केल आहे. ही जी मनाची आणखी निस्पृह स्थिती आहे-

दु:खेष्वनुद्विग्नमन: सुखेषु विगतस्पृह: ।

हे एक मोठ लक्षण स्थितप्रज्ञाच्या लक्षणांमध्ये घातलेल आहे. सुख येतील पुष्कळ पण स्पृहा
नाहीये. "दु:खेषु अनुद्विग्न मना:" हे जस पालन करायच तसच "सुखेषु विगतस्पृह:" हे
सुध्दा मुद्दाम सांगितलेल आहे.

ती आणखीमनाची भूमिका असणारे महात्मे जगामध्ये झालेले आहेत. रामरायांना
सुध्दा आणखी बोलून दाखवाव लागल- रामांचा त्याग जास्ती कि भरताचा त्याग जास्ती
आहे? कोणाचा त्याग जास्ती आहे? मिळालेल राज्य ज्याने देऊन टाकलेल आहे.
रामचंद्रांना अजून राज्य मिळायच होत. राज्याभिषेक व्हायचा होता. इतक्यात आज्ञा
झाली- वनामध्ये चौदा वर्षे जायच आहे. निघाले राम! त्यांचा त्याग मोठा आहे.
काही नाही! अभिषेकाला बोलावण

वसिष्ठ महर्षि म्हणतात, काय आणखी मनोवृत्ती आहे! कोणताही विकार नाही. हर्ष
पाठवल तरीसुध्दा मनामध्ये काही नाही. हर्ष नाही. काही विचारल नाही.
हाही एक विकार आहे. वनात जायचे तरीही तयारी आहे. अंगावरची वस्त्रेही काढून ठेवली. इतका मोठा
सगळे अलंकार उतरवून दिलेले आहेत. माझ्यापेक्षा भरताचा त्याग मोठा आहे.
त्याग केलेला आहे, तरीसुध्दा राम म्हणतात पित्याची अनुज्ञा मिळालेली

मिळालेल राज्य जे आहे, आईने मिळवून ठेवलेल आहे, वनवासाला चौदा वर्षाची अट
आहे. पण याला काही चौदा वर्षाची अट नव्हती. पण त्याने ते सोडून दिलेल आहे.
घातलेली होती. म्हणजे कायमच राज्य भरताकडे होत. पहिल्या दिवशी राज्य ग्रहण
हे नेतृत्व आहे. रामचंद्रांच्या नेतृत्वाचा हा प्रभाव आहे.
करताना जी बुध्दि आहे ती शेवटी अर्पण करतानाही कायम राहिली होती.

आणि दुसरे उदाहरण दुर्योधनाचे आहे. कपटाने जिंकून राज्य घेतले. तरी आणखी वनवासामध्ये पांडव गेलेले आहेत. अज्ञातवासासारखी भयंकर अट त्याने घातलेली होती. अज्ञातवासात जर पांडव प्रकट झाले तर पुन्हा बारा वर्ष वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास. म्हणजे संपूर्ण आयुष्य पांडवाने वनामध्येच रहाव अस आपल बुध्दिच चातुर्य कौरवांनी प्रगट केलेल आहे. आपल्याला शेवटपर्यंत राज्य मिळाल पाहिजे. "लोभंमूलानि पापानि" . परंतु पांडवांना शेवटपर्यंत वनवासामध्ये ठेवण्याची व्यवस्था केली खरी कौरवांनी परंतु सज्जनांच जे काही महत्व आहे ते महत्व दुर्जनांनासुध्दा मान्य कराव लागत. अज्ञातवासामध्ये पांडव अज्ञात राहू शकणार नाहीत, खात्री आहे कौरवांना. त्यांना आपण केव्हाच शोधून काढू किंवा ते प्रगट होतील. त्यांच्या गुणांनी म्हणजे पांडव गुणी आहेत याला मान्यता दिल्यासारख आहे. अज्ञातवासाची अट घालणे म्हणजे पांडवाचे गुण मान्य करण्यासारख आहे.

तेरा वर्ष राज्य ताब्यामध्ये आहे. सगळी सत्ता आहे. त्याचप्रमाणे सगळा खजिना आहे. सैन्य आहे. सगळ आहे. तरी कबूल केल्याप्रमाणे आणखी बारा वर्ष वनवास झाला. अज्ञातवास झाला. द्यायला पाहिजे राज्य. एकेक गाव दिल जरी तरी पुरे आहे, म्हणाले धर्मराज. म्हणाले नाही. तो जो काही अभिमान म्हणा किंवा अभिनिवेश जो आहे, लोभाने बुध्दि व्याप्त झाल्यामुळेसुध्दा. शिवाय राज्य नाही. केवढा भयंकर प्रसंग आहे! सगळ राष्ट्र, राष्ट्रातली सगळी तरुण पिढी नाहीशी झाली त्या युध्दामध्ये. तर ही स्थिती आहे. भरतानेही राज्य घेतले. राज्य केले. दुर्योधनाने राज्य घेतले. घेतानाच ते कपटाने घेतले. तर देताना आणखी अशा प्रकारच युध्द करून, सर्वनाश करून दिलेल आहे, स्वत:चाही.

तेव्हा ही बुध्दि कोणती बुध्दि चांगली आहे. व्यवहारामध्ये अस वागल पाहिजे. आरंभाला जरी दु:ख झाल तरी सुध्दा सात्त्विक प्रयत्नशील महात्मा, जीवात्मा हा शेवटी सुखी होतो आहे. आणि सुखदु:खेही मनुष्यावरती आहेत. कर्तव्यकर्म करणेहेच आणखी सुख आहे. सुख निराळ कशाला मानायच आहे! असे विचार शिकवण्याकरता आणखी समर्थांचा अवतार मारुतीरायांनी घेतलेला आहे. स्वत: "बुध्दिमतां वरिष्ठम्" त्यांनी जगात येऊन हे सगळे शिकवले आहे. स्वराज्य स्थापना त्याच काळात करून दाखवलेली आहे. आपली बुध्दि सांभाळण्याचा प्रयत्न ज्यांनी केला आहे त्यांना राज्य राखता येऊ शकते. आपल्या बुध्दिकडे दुर्लक्ष करून आणि त्या बुध्दिमध्ये लोभादिक विकार उत्पन्न झाल्यानंतर शिवाजी राजांनी मिळवून दिलेले राज्य पुढे कसे ॰ टिकणार? पुढे तर आणखी उन्नतीचे सगळे मार्ग बंद झाले. बुध्दिच बंद झालेली आहे त्याला काय करणार? परंतु हे अशा प्रकारच त्यांनी [समर्थांनी] दाखवलेल आहे. आणि आपल्या ग्रंथरूपाने सगळ आणखी मार्गदर्शन करून ठेवलेल आहे.

ते मार्गदर्शन पहाण्याकरता म्हणून आणखी वर्षातून काही दिवस आपण जमायच आहे इथ. ही योजना जी केलेली आहे निदान हे विचार चांगले आहेत. चांगले विचार ऐकण्याची इच्छा होणे हे सुध्दा आणखी चांगल लक्षण आहे. ईश्वराची ही कृपाच आहे अस म्हणायला हरकत नाही. आपण आज विचार करु शकतो हे करतो. तशी काही त्या वेळेसारखी परिस्थिती नाहीये.

तेव्हा जास्तीत जास्त या विचारांचा आणखी प्रसार होण. प्रसार याचा अर्थ बुध्दिमध्ये ते राहिल पाहिजे. बुध्दिमध्ये असलेले जे काही आणखी दोष आहेत ते दूर झाले पाहिजेत. मनावर संस्कार करायचा. "संस्कार" याचा अर्थ आचार्यमहाराजांनी "दोषमायां गुणाधारं च संस्कार" असा सांगितला आहे. मनामध्ये काय काय दोष आहेत, समष्टीच्या मनामध्ये, व्यष्टीच्या मनामध्ये, कोणकोणते दोष आहेत, याच निरिक्षण करणे आणि ते दोष दूर करण्याचे उपाय काय सांगितले आहेत. ज्यांच निर्दोष मन आहे त्यांनी सांगितलेले उपाय कोणते आहेत त्याप्रमाणे आचरण करण.

व्यष्टी आणि समष्टी या योगाने मन हे सुसंस्कृत होऊन जात आहे. आता सगळे दोष मनातले दूर झालेआणखी गुणाधार जर मनामध्ये झाला आहे, हे संस्कृत मन जर झाल तर त्या संस्कृत मनाने सर्वही कार्यसिध्दी होऊ शकते. हे आणखी आपल्या पूर्वीच्या, एकंदर मारुतीरायांच्या उदाहरणावरुन आपल्याला दिसून येत आहे. काही भीती नाही. लंकेत जाऊ शकतो मी. बाकी सगळे वानर. शंभर योजने विस्तिर्ण समुद्र आहे. एवढया पलिकडे जायच कुणाची शक्ती आहे? अंगद म्हणाला, "मी जाईन. पण परत येता येणार नाही." जायच, परत यायच दोन्ही शक्ती पाहिजे. हे जातो म्हणाले. गेलेले आहेत. मी एकटा आहे, मला सहाय्याला कोणी नाही.

अभिमन्यु एकटा जायला निघाला त्या चक्रव्यूहात. नुसती चक्रव्यूहात तेवढी जायची माहिती होती. जा बाबा, पाठीमागे तुला सहाय्य आहे. मारला गेला अभिमन्यु.

तशी नाही, जाण्याचीही शक्ती आहे, परत येण्याचीही शक्ती आहे. कोण आहे रावण काही पत्ता च नाही. काही माहीती नाही. किती बलाढय आहे किती त्याच सामर्थ्य आहे. काही नाही. रामचंद्रांची सीता घेऊन जाणारा म्हणजे तर मोठा असला पाहिजे. काहीही असेल, जाऊन त्या सीतेचा शोध करुन, सीतेच समाधान करुन आणि ते आलेले आहेत. तर हा जो आत्मविश्वास आहे. आत्मशक्तीच्या संबंधी अपूर्ण जीवात्मा परंतु पूर्ण शक्तीशी जर त्याचा संबंध जोडला गेला, "भगवंताचे अधिष्ठान" पाहिजे म्हणतात, त्या भगवंताच्या पूर्ण शक्तीशी आपला संबंध जर जोडला जाईल तर ती ईश्वराचीच शक्ती होत आहे. एक जीवात्मा अशा प्रकारचे अलौकिक कार्य करु शकतो, अशी उदाहरणे आहेत.

परंतु समष्टीरुपाने का होईना "संघे शक्ती: कलीयुगे" म्हणतात. कलियुगात एकाच व्यक्तीची शक्ती काही कार्यकारी ठरत नाही म्हणून समुदाय शक्तीला त्यांनी विशेष महत्त्व दिले आहे. ती समुदायाची मन:शुध्दि झाली पाहिजे. ती मन:शुध्दि, ती बुध्दि, त्या बुध्दि तत्वाचा विकास हा मुख्य मानला आहे. शास्त्रकारांनी, ऋषिमंडळींनी बुध्दिला प्राधान्य दिलेले आहे. आणि ती बुध्दि जर उत्तम राहीली तर सगळ राष्ट्र राहाणार आहे. स्वराज्य मिळवून आणखी बुध्दि जर कायमचीच खाली खाली जात चालली कोणते गुण आहेत कोणते दोष आहेत ह्याचा सुध्दा बुध्दिला काही विचार राहीला नाहीये. कोणत्या वेळेस आणखी राग आला पाहिजे, कोणत्या वेळेला दया, कृपा केली पाहिजे-हाही विचार जर बुध्दिमध्ये राहिला नाही तर राष्ट्राच कार्य होणार कसं? परमार्थाला अविरोधी व्यवहार हा आहे. तो सगळा व्यवहार उत्तम शिकवून नंतर परमार्थाकडे न्यायच आहे.

समर्थांची दृष्टी असा उत्तम व्यवहार करणारा कर्तव्यकर्म हाच परमेश्वर आहे अस समजून कार्य करणारा जो कर्मयोगी महात्मा आहे तो निर्माण झाला पाहिजे. लोकमान्यांचासुध्दा हाच उद्देश होता. कर्मयोग सुटला म्हणाले. त्यांनी शंकराचार्यांवर काही आक्षेप घेतले असतील त्याचा उद्देश निराळा आहे. उगीच वेदांत वाचून उगीच हे करु. हेही नाही आणि तेही नाही. संसार सोडू शकतो का? शक्य आहे का? म्हणून केवळ आपल्या कर्तव्यकर्माकडे लक्ष दिल पाहिजे, प्रत्येकाने. हाच मुख्य उद्देश आणखी श्रेष्ठ पुरुषांचा आहे. भगवान श्रीकृष्णांचाही हाच उद्देश आहे. अर्जुनाला त्यांनी मुद्दाम तयार केले. श्रेष्ठ पुरुषांची बुध्दि अशी आणखी हीन होऊन उपयोग नाही. श्रेष्ठ पुरुषांची बुध्दि जर मार्गभ्रष्ट झाली तर समाजाच कल्याण होणार नाही. म्हणून अर्जुनाच कल्याण करण्याकरता गीताज्ञान प्रगट केलेल आहे आणि ते ज्ञान फक्त अर्जुनाकरता झालेले नाही सर्वांकरता प्रगट झालेल आहे. भगवान् आचार्य महाराज सांगताहेत अर्जुन निमित्त आहे.

असे अनेक उत्तमोत्तम ग्रंथ संतांनी ज्यांच विवरण केलेल आहे अशा प्रकारचे संतांचे ग्रंथ, समर्थांचे ग्रंथ आज आपल्या समोर आहेत.

त्या ग्रंथांच मनन झाल पाहिजे. आत्ताच आपल्या राजदत्तांनी सांगितल जस जस मी पहायला लागलो तस तस नविन प्रकाश त्या दासबोधामध्ये व्हायला लागला; समर्थांच्या ग्रंथामध्ये. ही एक आस्थाच आहे. आदरबुध्दि पाहिजे. जिज्ञासा पाहिजे. तर त्या ग्रंथातून नविन नविन काय आहे ते समजू शकेल. बुध्दिमध्ये प्रकाश होण हे सत्वगुणांच लक्षण आहे. आणि तशा प्रकारचा सत्वगुण बुध्दिमध्ये उत्पन्न झाला, बुध्दिगत झाला तर वैयक्तिक कार्य नाही, सामुदायिक कार्य संपूर्ण विश्वालासुध्दा तो मान्य अशा प्रकारचा नेता होऊ शकतो. रामराज्य पाहिजे नुसते म्हणतो आपणयाही काळामध्ये. काय रामराज्य होते, कसे होते, त्यांनी केलेल वर्णन नुसत पाहिल म्हणजे आश्चर्य वाटते. मृत्युची इच्छा ज्याला नाही त्याला मृत्यु येत नसे रामराज्यामध्ये हे त्यांनी लक्षण राम राज्याचे दिलेले आहे. इथच रहायचय मला. रहा. काही हरकत नाही. मृत्युसुध्दा नेऊ शकणार नाही. ही इतकी सत्ता जी आहे, हा जो दरारा आहे, नुसत्या मानवाला नाही यमधर्म वगैरे त्यांना सुध्दा आणखी दरारा यांच्यावरती आहे. अशा प्रकारचे जे राज्य आहे ते राज्य म्हणजे ह्या सात्विक यत्नाचे हे फळ आहे. धर्मसयांदेचे पालन शेवट पर्यंत रामरायांनी केल आहे. एकही मनुष्याच मत माझ्याविरुध्द असून उपयोगी नाही. बिभीषणाने आणली सीतेला. घेऊन चला महाराज. ही शुध्द आहे सीता. लंकेमध्ये रावणाचा नाश झाला. सीतेने अग्निप्रवेश केला. अग्निनारायण प्रगट झाले. त्यांनीच स्वत: सांगितले सीता शुध्द आहे म्हणून.

याचा अभिप्राय काय आहे? त्यांना आणखी पत्निबद्दल प्रेम नाही? आणखी नुसत्या राज्याकडे लक्ष आहे असा अर्थ नाहीये. जो आणखी अपराधी असेल समाजामध्ये स्वत:ची पत्नि जरी असली तरी त्यांनी आपल निरपराधित्व सिध्द करुन दाखवायला पाहिजे. दुसऱ्या कोणाचा फोन आला आणि अमूक आता निर्दोष सुटला अस होऊन उपयोगी नाही. हे समाजाला पटवण्याकरता म्हणून त्यांनी पत्निचा त्याग केला अस दाखवलेल आहे.

इतकी आणखी त्यागी पत्नि, वनामध्ये राहाण्याकरता राम निघाले. मीही येणार, म्हणाली. ते म्हणाले, तिथे काय नोकर चाकर आहेत? तू जा म्हणाले. तुझ्या माहेरी जा. नाही, म्हणाली. आपल्या जवळ राहाणार. तिथेच माझी राजधानी आहे. सगळ आहे.

इतक्या त्यागी पत्निबद्दल संशय येईल कसा? परंतु समाजाला शिकवायला लागेल. नेत्याचे कर्तव्य आहे हे. स्वत:च्या कोणत्याही वैय्यक्तिक गोष्टीकडे लक्ष द्यायचे नाही. काही व्यथा नाही मला. जानकीला सोडाव लागल तरी मी सोडून देईन मी. लोकांची आराधना करायची आहे. लोकांचमन हे सुधारायच आहे. या करीता त्यांनी आणखी हे केलेल आहे. तोच नेता आपल्या समोर असला पाहिजे, म्हणून समर्थांनीही आणखी तेच ठेवलेल आहे चरित्र. त्यांचाच आदर्श आपल्या पुढ ठेवला आहे. मारुतीरायांचाही आदर्श ठेवलेला आहे. हे अशा प्रकारचे कार्य "आधी केले मग सांगितले". श्रेष्ठ पुरुष होऊन गेले त्यांच स्मरण केल्यानंतर ते आणखी बुध्दिला प्रेरणा करु शकतात, अव्यक्त रुपाने आपला सिध्दांत आहे. हे आणखी जीवात्मे अविनाशी आहेत. हा सिध्दांत गीतेच्या आरंभी भगवंतांनी सांगितलेला आहे. ईश्वर तर अविनाशी आहेच.

तर हे सगळे सिध्दांत दासबोधामध्ये कळून येतील. आणखी व्यवहारसुध्दा कसा उत्तम केला पाहिजे कि ज्या योगाने स्वत:च्या समाजाचे, राष्ट्राचे सगळ्यांचेही हित करता येईल. " भूता परस्परे पडो मैत्री जीवांचे " म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनीही प्रार्थना केलेली आहे. सर्व लोकांनी आणखी मैत्रीने रहाव, ही त्यांची जीवाभावाची मैत्री सगळ्या लोकांची असावी अशी प्रार्थना म्हणजें राष्ट्राला केवढी उपयोगी आहे! प्रत्येकाचा अभिप्राय निराळा, प्रत्येकाची मत निराळी, पक्ष निराळे, हे निराळे तें असू नये. एकमेकांच्या मैत्रीने आणखी जीण चांगल होईल, ही प्रार्थना संतांची आहे.

तेव्हा या प्रमाणे हे संतांचे विचार, या विचारांची संगती यां रूपानी आपल्याला निरंतर घडावी. आणि अशाच प्रकारची त्यालाही जी साधना आहे. एकत्र राहून काही का ळ का होईना थोडा काळ तरी आणखी त्याच्यासाठी एक सप्ताह म्हणा, दहा दिवस आठ दिवस काय होईल ते. पुन्हा पुन्हा पुन्हा आणखी ते संस्कार आपल्यावर झाले पाहिजेत. वाणीने, शरीराने, मनाने सगळया दृष्टीने आणखीसंस्कार उत्पन्न झाले म्हणजे त्या संस्कारांनी बुध्दिच संवर्धन होत आहे. बुध्दिच संवर्धन होत आहे. बुध्दिच संवर्धन करण्याकरिता हा मानवजन्म आहे. बाकीच संवर्धन होईल, जाईल. त्याच्याबद्दल काही नाही. पण बुध्दिही चांगली घेऊन जायचय पुढ सुध्दा आपल्याला म्हणून हे बा बौध्दिक कार्य जे आहे बुध्दि संवर्धन करण, बुध्दि सात्त्विक करण, बुध्दिचा विकास करण याकरता संतांनी मुद्दाम लक्ष दिले आहे.

समर्थांचे तर लक्ष आणखी सर्व दृष्टीने इकडे आहे. त्यांनी किती शिकवले आहे, लिहिले आहे! ते विचार आपल्याला ऐकायला मिळावेत, आपल्या मनामध्ये दृढमूल रहावेत या करता प्रयत्न करायचा आहे. आज समारोपाचा दिवस आहे. समारोप झाला म्हणजे संपले. घरी जाऊन आपल पुन्हा पहिल्याप्रमाणे रहायचे असा अर्थ नाहीये. ही सात्त्विक संस्कार बुध्दि सत्त्वपक्षपाती आहे. "मना सज्जना भक्तिपंथेची जावे" मनाला "सज्जना" म्हणताहेत समर्थ! दुर्जन म्हणत नाहीयेत. मूलत: मनाची निर्मिती सात्त्विकच आहे, उपनिषदामध्ये सांगितल्याप्रमाणे. सत्वगुणाच्या अंशापासून मन झालेले आहे. त्याच्यामध्ये बाकीचे अंश येतात ते दूर करायचे आणि सात्त्विकता त्याची वाढवायची आहे. या करता अशा प्रकारचे हे कार्यक्रम या ठिकाणी योजलेले आहेत. हे सद्गुरु सेवा मंदिर तयार झालेले आहे. त्याच्या नंतर बालकांच्या शिक्षणाचेही स्थान आहे. निरनिराळ्या प्रकारची शिबिरेही होत आहेत. त्या पैकी हे एक शिबीर महत्वाचे आहे. बुध्दिचे संवर्धन करण्याकरता म्हणून हे केलेले आहे. आपले समर्थ, राष्ट्र-संत त्यांना म्हणतात त्यांची आणखी प्रेरणा आपल्याला समजून घ्यायची आहे. इथे जे जे कांही सात दिवसात आपल्याला शिक्षण मिळाले ते घरी चालू ठेवायला हरकत नाहीये. इथ आपल अगोदर सांगतात अमूक वेळेला अमूक ठिकाणी चला. योगासने होणार आहेत. अमूक प्रार्थना म्हणा. तस जरी तिथे कोणी सांगायला नसले तरी सात आठ दिवस अशी सवय झाली आहे. त्याप्रमाणे घरी जेवढे चालू अस ठेवता येईल तेवढे चालू ठेवायला हरकत नाही. म्हणजे पुन्हा जर दुस-या खेपेला दुस-या वर्षी इथ येता आल तर जास्ती आपला विकास होईल.

ही अशा प्रकारची कृपा समर्थांच्या आणखी पुण्याईने त्यांची कृपा आपल्यावर व्हावी. त्यांच्या तप: प्रभावाने आपल्या राष्ट्रामध्ये जे कांही मनोदौर्बल्य निर्माण झालेले आहे, मोठे मोठे आणखी श्रेष्ठ पुरुष सुध्दा पदाधिकारी असलेले दुर्बल मनाचे झालेले आहेत. मनाच दौर्बल्य हे सुध्दा कळून येत नाही. आपल्या मनातला दोष आपल्याला कळून न येणे याच्यासारिखे दुसरे दुर्दैव कोणते नाही. नाही, आम्ही चुकतच नाही. आम्ही नेहमी बरोबरच वागतो, अशी आणखी दृष्टी उत्पन्न होते.— ते सगळे आपले दौर्बल्य दूर झाले पाहिजे. खंबीर बनण्याची शक्ती आपल्या मनामध्ये आली पाहिजे.

काय, कोणी सहाय्य केले होते? समर्थांना सांगायला कोणी होते काय? त्यांना काय राजशासनाची मोटार होती? असे आणखी कोणत्याही प्रकारचे सहाय्य नसले तरी एक बुध्दिचे सहाय्य आहे. "बुध्दि दे रघुनायका" ज्याच्यापासून ती बुध्दि त्यांना मिळालेली आहे. आणि त्या बुध्दिने सर्व राष्ट्रामध्ये त्यांनी चैतन्य त्या वेळेला निर्माण केलेल आहे. अजूनसुध्दा त्यांच्या वाणीमध्ये आणखी ते सगळ चैतन्य निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे.

६० ........

तेव्हा ईश्वराच्या कृपेने अशा संत माहात्म्यांचे विचार आपल्याला ऐकायला मिळाले पाहिजेत. आणि आपल चित्त हे निर्मल झाल पाहिजे. शुध्द झाल पाहिजे. आपला बुध्दि विकास हा भारत राष्ट्राचा खरा विकास आहे. बाकीचे विकास कर्ज काढून करावे लागतात. काही विकास होतात. काही एकदम धरणच्या धरण फुटून जातात. सगळी गाव शहराच्या शहर वाहून जातात. अस चाललेल आहे. चालू दे काही हरकत नाही. परंतु बुध्दिचा विकास ज्यांचा झालेला आहे ते राष्ट्र हे कायम आहे. त्याच्या-कडे कुणीही वक्रदृष्टीने पाहू शकणार नाही.

तो बुध्दि विकास भगवान् रामचंद्रांनी, समर्थांनी, मारुतीरायांनी करवून घ्यावा. भारत राष्ट्राचे वैभव अनादि आहे. किती काल झालेला आहे। भारतीय संस्कृती किती काळाची आहे कोणी सांगू शकणार नाही. टिकलेली आहे. टिकणार आहे, अजूनही. टिकवणारी अशा प्रकारची मंडळी वारंवार येत आहेत. त्यांच्या तपः प्रभावाने, त्यांच्या आणखी बुध्दिसामर्थ्याने हे सगळ राष्ट्र आजपर्यंत टिकलेल आहे तसच पुढही टिकाव हा बुध्दिविकास कायम रहावा आणि खरे हे बुध्दिविकासाने भारताचे महत्व वाढाव एवढी आणखी समर्थांच्या चरणी प्रार्थना आहे.

।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ।।

-:-:-:-:-:-

॥ श्रीगुरुदेव दत्त ॥

ईश्वरस्वरूप सर्वही संत माहात्म्यांनी भगवत्‌भक्ती योगाचाच संपूर्ण जीवन असे पर्यंत अभ्यास केला. भक्ती केली भगवंताची. पापक्षाय झाल्याशिवाय आत्मज्ञान होणार नाही आणि पापक्षाय हा भक्तियोगाने होतो, असाही सिध्दांत भागवतकारांनी सांगितला आहे.

केवळ भक्तियोग आहे, कर्मयोग आहे, परंतु जर भगवंताची नुसती भक्ती केली - केवळ भक्ती तर त्या केवळ भक्तीच्या योगाने सर्वही पापांचा क्षाय होतो. दुरित क्षय झाला पाहिजे असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात ना। अनेक दुरित, अनेक जन्मांची पापझाली असतात - वैय्यक्तिक सामुदायिक. आणि त्यामुळे आपल्याला प्रतिबंध पुष्कळ निर्माण होतात.

ऐहिक असो किंवा पारमार्थिक असो. आपल कल्याण करुन घ्याव अस सर्वांना वाटत. सर्वांचे प्रयत्न चालू आहेत. पण त्याप्रमाणे आपल्या पदरात काही फळ पडत नाही. जीव हा असमर्थ आहे. इच्छेप्रमाणे त्याला फळ प्राप्त करुन घेता येत नाही. सुख पाहिजे आणि दु:ख सगळी जावीत अशी इच्छा आहे. हेच फळ आहे. पण ते आपल्या इच्छेप्रमाणे घडून येत नाही.

कुणीही असो. एक व्यक्ती असो किंवा अनेक व्यक्ती. व्यक्तींचा समुदाय - लोकशाही म्हणतो त्याला. आपण. सर्व समुदाय मिळून राज्य करायचे. आणखी चांगल. सर्वांना सुखी करायचे हे त्यांना सुध्दा शक्य नाही. ईश्वर या करता मानावा लागतो म्हणतात.

सद्‌गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी एका ठिकाणी हा मुद्दाम उल्लेख केलेला आहे. ईश्वर आहे कशावरुन, म्हणाले, तर तुमच्या इच्छेप्रमाणे तुम्ही आपल कल्याण करुन घेऊ शकत नाही. म्हणून ईश्वर मानला पाहिजे. कुणाही व्यक्तिचे सामर्थ्य नाही दिसून येत. काही ना काही आणखी प्रतिबंध उत्पन्न होतात. सुखाला प्रतिबंध आहे. दु:ख निराळे नाही तर केवळ आपल्या सामर्थ्याने काही हे दूर करता येत नाही.

वाढील्या उव्देग दु:खची केवळ ।
भोगणे ते फळ संचिताचे ॥

तुकाराम महाराजांनी सिध्दान्त सांगितलेला आहे केव्हां जाईल दु:ख, केव्हा जाईल दु:ख? नुसते म्हणून काही उपयोग नाही. जे आपल्या हातून कर्म झालेले आहे त्याचे फळ आपल्याला भोगावे लागते हा एक मोठा सिध्दान्त आहे आणि तो आपल्याला मान्य करावा लागतो.

आजारी पडलेला आहे, मोठा रोग आहे. आणि औषध देणारा डॉक्टरही मोठा आहे. हजार हजार रुपयांचे इंजेक्शने आणतात. त्या औषधांनी एक रोगी बरा होतो आणि दुसरा बरा होत नाही. दुसऱ्यालाही तोच रोग झालेला आहे. आणि एका रोग्याला बरा करणारा डॉक्टर दुसऱ्या रोग्यालाही तेच औषध देतो. काय कमी झाले काय औषध चुकलेले आहे का? का औषध देणाऱ्याचे ज्ञान कमी झालेले आहे? काय, कमी काय आहे? तर तिथे हा सिध्दान्त आहे - "भोगणे ते फळ संचिताचे."

कर्म मानाव लागत. पुनर्जन्म मानावा लागतो. एकाला फळ मिळते आणि दुसऱ्याला फळ मिळत नाही. यावरुन काहीतरी प्रतिबंध आहे तो दिसत नाही. पण गुणही येत नाही यावरुन पूर्वीच काहीतरी त्या जीवाच कर्म आहे अस मानण भाग पडते. पण कर्मांनि फळ मिळत. कर्मशक्ती ईश्वराने निर्माण करुन ठेवलेली आहे. ईश्वर कशाला पाहिजे? ज्याने जशी कर्म केली असतील चांगली कर्म केली सुख मिळेल, पापकर्म केली तर दु:ख मिळेल. चांगली कर्म करावी आणि सुख मिळवाव ईश्वराचा काय संबंध आहे? कर्मांनि फळ मिळते हे मानाव लागत आपल्याला. पण कर्माला स्वत:ला फळ देण्याचे काही ज्ञान आहे का?

यांनी ऑफिसात वर्षभरात केव्हांही रजा घेतली नाही, रोज वेळच्या वेळेला येऊन आपखी काम केलेल आहे हे जाणणारा कोणीतरी वरचा अधिकारी लागतो. त्याने कर्तव्यकर्म उत्तम केलेल आहे. कधीही गैरहजर राहिलेला नाही हे खर आहे. पण त्याच हे कर्म जाणणारा जो वरचा अधिकारी तो शिफारस करतो त्यामुळे प्रमोशन मिळू शकते.

म्हणजे कर्म तरी मान्य कराव लागल, त्या फलावरुन.

हा त्यांनी सिध्दान्त सांगितलेला आहे. आम्ही सगळे जीव असमर्थ आहोत याच कारण सुखदु:ख आमच्या इच्छेवर अवलंबून नाहीये. म्हणून आमच सामर्थ्य नाहीये.

मीमांसाकारांच म्हणण हेच आहे. ईश्वर ईश्वर कशाला म्हणायचा? काही जरुरी नाहीये. आपण चांगल वागावे चांगल फळ मिळत. पण त्या कर्मांना कुठे ज्ञान आहे? ते अचेतन आहे. क्रियाहीन. त्यांनी चांगल कर्म केलेल आहे हे जाणणारा कुणीतरी पाहिजे. म्हणजे तो त्याच फळ देतो. कोणत्या वेळेला कोणत्या कर्माच फळ द्यायच, काय करायच हे स्वत: आम्हालाही समजत नाही ना! आम्ही जरी कर्म केली – सत्कर्म किंवा दुष्कर्म केली तरी ते आम्ही विसरुन जातो. आणि विसरुन जरी गेलो नाही तरी आमच्या कर्माच आत्ता फळ मिळाल पाहिजे. आमच्या इच्छेवर काही अवलंबून नाही. कर्मशक्ती जरी असली तरी त्या कर्मशक्तीला जाणणारा कुणीतरी पाहिजे. अर्थात तो सर्वज्ञ ईश्वर सिध्द होतो. आपोआप मान्य कराव लागत. सर्वांच्याकडून झालेली जी कर्म आहेत त्याच त्याला ज्ञान आहे. सर्वांचा तो बुध्दिसाक्षी आहे. अंतर्यामी म्हणतात त्याला. सर्वही जीवांच्या अंतर्यामी तो आहे, प्रेरणा करणारा तो आहे. म्हणजे या जीवाकडून होणारी सगळी कर्म त्याला माहीती आहेत. त्या कर्माच फल केव्हा द्यायच वगैरे सगळ माहीती आहे. पण अलीप्त आहे. इतक्या अनंत जीवांची कर्म तपासून आणि त्या प्रमाणे त्यांना त्यांच फल व्यवस्थितपणाने पोहोचवणे हे काम काही सोप नाहीये! तर हे काम चाललेल असूनसुध्दा त्याच्याबद्दल काही नाही, कल्पनासुध्दा नाही अशी मोठी शक्ती आहे. ईश्वरशक्ती म्हणतात.

त्या ईश्वरशक्तीच ज्ञान ज्यांना झालेल आहे अशा प्रकारचे माहात्मे लोक हे ईश्वराच्या भजनामध्ये सबंध आयुष्य घालवतात. इकडे त्यांच लक्ष नाहीये. संसार जरी असला तरी संसारामध्ये काही आसक्ती नाही. सर्वही विश्व ज्यांनी निर्माण केलेल आहे, तो विश्वाचा मालक आहे. त्या विश्वापेक्षा एखाद घर, एखादी जमिन माझी म्हणायची म्हणजे काय? सगळच त्याच आहे. ही तरी माझी कस म्हणायची? पण व्यवहारामध्ये मात्र ते माझ, माझ म्हणाव लागत. नाहीतर कुणीतरी आपल घेतल म्हणजे काही म्हणायच नाही असा त्याचा अर्थ नाही. व्यवहारातल शिक्षणही दिलेल आहे. तर हेही ईश्वरस्वरूप आहे. परमात्मा श्रीहरी त्याची शक्ती या महात्म्यांनी जाणलेली आहे.

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृति माश्रिता: ।
भजन्ती अनन्यमनस: ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ।।

सर्वही पंचमहाभूतांना निर्माण करणारा, विश्व निर्माण करणारा हा आहे, हेज्ञान त्यांना आहे. म्हणून त्यांना अहंकार काही नाही, आसक्ती नाही आणि जास्तीत जास्त त्या ठिकाणी प्रेम उत्पन्न होत. ज्ञानपूर्वक भक्ती या ठिकाणी दाखवलेली आहे, भगवंतांनी. सर्वांचा कर्ता आहे. सर्वांना कारण आहे. असा परमेश्वर आहे हे जाणून ते भक्ती करतात. त्यामुळे त्यांची भक्ती कधीही अस्थिर नाही.

ईश्वराकड लक्ष असणारी मंडळी आहेत. पुष्कळ आहेत. नाही अस नाहीये. पण संकट आली, दु:ख आली म्हणजे देवाची आठवण होते. देवाकडे जायचे, देवाला मागायचे, किंवा काहीतरी आपल हे करायच. माझ एवढ काम झाल कि मी अमूक सत्यनारायण करीन, अमूक करीन तमूक करीन.

त्याला कुठ सत्यनारायण पूजेची आवश्यकता आहे? काहीच नाहीये. अगोदर कुणी करत नाहि मात्र। अगोदर सत्यनारायण करून माझ काम व्हाव अस म्हणणारे कमी आहेत. बहुतेक नसतीलच मला वाटत. सर्व झाल्यावर करायचे. ते सुध्दा तो साधुवाणी विसरून गेला. स्वभाव आहे जीवाचा.

तर हे जे माहात्मे, संत आहेत. ईश्वराला पूर्ण त्यांनी ओळखलेल आहे. आणि त्यांची भक्ती दृढ आहे, तिकडच आहे.

अनन्य मनस: मुदित:।

अन्य ठिकाणी त्यांच मन जातच नाही. परमेश्वराच अखंड स्मरण त्यांच चाललेल आहे. आणि तेच देवाजवळ ते मागून असतात.

तुझा विसर न व्हावा।

एवढ द्या म्हणतात. संपूर्ण भागवत सांगून झाल्यावर शेवटी आणखी या भगवंताच्या स्मरण भक्तीचे विवेचन केलेले आहे–

अविस्मृती: कृष्ण पदारविंदयो:।
क्षिणोती अभद्राणि शमं तनोतिच।
चित्तस्य शुध्दिम् परमात्म भक्तिम्।
ज्ञानं च विज्ञान विरागयुक्तम्।।

भगवंताची भक्ती केली म्हणजे काय मिळत? देवाच्या भक्तीच फल काय आहे? कशाकरता करायच? आपला उद्योगधंदा कशाला सोडायचा? असे काही काही मनामध्ये विकल्प उत्पन्न होतात. संतांची संगती असली म्हणजे उत्पन्न होत नाहीत. कारण नेहमी ईश्वर स्मरण त्यांना असत. ते ईश्वराच चरित्रच नेहमी सांगत असतात. त्यामुळे ईश्वराबद्दल आपल्या मनामध्ये काहीही विकल्प सत्संगती असेल तर येत नाहीत.

जे ईश्वरापासून नेहमीच बाजूला आहेत, मी कर्ता आहे, ईश्वरोऽहम्, मीच ईश्वर आहे, मी सगळ करणारा आहे, असा अहंकार ज्यांना उत्पन्न झालेला आहे म्हणून ईश्वर स्वरूपाची त्यांना बिल्कुल जाणीव नाही. कधीही नाही. त्यांची संगती घडली म्हणजे तिथे तसच होणार. ईश्वर नाही हेच ऐकायला मिळणार.

तर संतांच्या संगतीमध्ये असताना आणि ईश्वराच अखंड स्मरण आपल्याला होते. चरित्र ऐकायला मिळतात. आणि ते दिव्य चरित्र आहे ईश्वराच, कोणते कोणते अवतार भगवंतांनी घेतले, कोणत्या भक्तांना आणखी संकटातून मुक्त केले, कस उध्दार केला त्याचा, हे सगळ आपण ऐकल्यानंतर आपल्या मनामध्ये प्रेम उत्पन्न होते. मनामध्ये असलेले पाप, दोष दूर होतात. आणखी त्या मनामध्ये ईश्वराबद्दल प्रेम निर्माण होत. ते वाढल पाहिजे.

भगवद्भक्तीसुध्दा सोपी नाहीये. भक्तीमार्ग फार सोपा आहे अस काही लोक म्हणतात. फार कठीण आहे. कर्ममार्ग तर कठीणच आहे. ज्ञानमार्ग तर फारच कठीण आहे. योगमार्ग तर त्यापेक्षाही कठीण आहे. भक्तीमार्ग मात्र सुलभ आहे अस म्हणतात. पण नाहीये. भक्ती केव्हा निर्माण होते याबद्दल भगवान सांगताहेत अर्जुनाला–

येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।
ते व्दंव्दमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रता:।। ७.२८।।

पापक्षय झाला पाहिजे. ज्ञानाप्रमाणे भक्तीच आहे.

बहुत सुकृताची जोडी ....

ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत. अनंत जन्म जर सुकृत घडली असली आपल्या हातून तर पाप क्षय होतो. आणखी मन आपल ईश्वराकडेच तन्मय होऊन जात. प्रेम निर्माण होत. पुण्यकर्म केली पाहिजेत. आणि त्या पुण्यकर्मांनी पापक्षय होतो. आणि नंतर " ते व्दंव्दमोहनिर्मुक्ता भजन्ते " हे भक्तीच स्वरूप आहे. कोणत्याही रीतीने सांसारीक मोह अंत:करणात असून उपयोगी नाही. म्हणजे ती खरी भक्ती आहे.

ईश्वराची भक्तीही करायची. इकड संसारही करायचा. संसारात अनुकूलता जर टिकली तर ईश्वराची भक्ती टिकणार. देवाची आमच्यावर दया आहे. आमच सगळ कल्याण आहे. आमची संकट दूर करतोय. आणि झाली नाही तर! मग ईश्वराच स्मरण नाही. त्या करता अनन्य मनस: होण म्हणजे ईश्वराच स्वरुप, त्याची शक्ती कशी आहे हे समजल पाहिजे.

त्याकरता असे ज्ञानी माहात्मे असतील त्यांची संगती झाली पाहिजे. ते समजावून सांगतात. ईश्वर साक्षात्कार त्यांना झालेला आहे. त्यामुळे ते सांगत आहेत. वाचून नाही नुसत. त्यामुळे त्यांच्या वाणीमध्येही सामर्थ्य आहे. पटत आपल्याला. टिकण हे निराळ आहे. तेच त्यांच्या कृपेने, ईश्वराच्या कृपेने टिकवतील प्रेम. आणि अस जर अखंड स्मरण अंत:करणामध्ये उत्पन्न झाले, निरंतर ईश्वरस्मरणावाचून एक क्षणही जाणार नाही, अखंड स्मरण आहे, तर त्याच फळ सांगताहेत. " तुझा विसर न व्हावा " का मागितल तुकाराम महाराजांनी? ईश्वराच विस्मरण होऊ नये म्हणजे अखंड स्मरण घडाव.

तर त्याची ही फळे सांगताहेत भागवतकार --

अविस्मृती: कृष्णपदारविंदयो: ।
क्षिणोती अभद्राणि शमं तनोतिच ।।

पहिल पद आहे. सगळी अभद्र, अमंगल काहीही होणार नाही. ईश्वराची भक्ती करायला प्रवृत्त जो झालेला आहे, ईश्वराचे अखंड स्मरण ज्याला मिळालेल आहे त्याची सगळी अभद्र दूर होतात. मंगलमय जीवन होत. आणि " शमं तनोति च " तिथे "शम" म्हटलेल आहे. ज्ञानमार्गामध्ये. वासना मनातल्या मनात कमी कमी होणे हा शम शब्दाचा अर्थ आहे. आचार्य महाराजांनी सांगितलय ---

सदैव वासना त्याग: शम

मनातल्या मनात वासना कमी कमी होत चालल्या म्हणजे पूर्ण शांति आहे. त्याच्या नंतर तिसर फळ भगवत् स्मरणाच म्हणजे " चित्तस्य शुध्दिस्" चित्त शुध्द होण. स्मरण होण्याला अगोदर चित्त शुध्द झालच पाहिजे त्याशिवाय स्मरण हे होणार नाही. पण त्या स्मरणानंतर होणारी चित्ताची शुध्दि काही विलक्षण आहे. शुध्द बुध्दि झालेली आहे. आणि त्या शुध्द बुध्दिमुळे ईश्वराची जी आज्ञा आहे त्या आज्ञेपासून केव्हाही बाजूला तो होत नाही. नेहमी ईश्वराज्ञा पालन करण्याकडे त्याच लक्ष असत.

धर्मराजाच उदाहरण आहे. वनवासामध्ये पांडव असताना धर्मराजाला एक दिवस तहान लागली होती. पाणी प्याव आणि पाणी [illegible] याव त्या भांड्यातून, म्हणून त्या तलावाजवळ गेल्याबरोबर पलीकडच्या बाजूला [illegible] धिप्पाड मोठा यक्ष बसला होता. " भीमा हात लावू नकोस पाण्याला. हा तलाव माझा आहे. " आता तो भीम काय ऐकणार! तो म्हणाला, " अशी कुठ पाण्यावर सत्ता असते काय? पाणी देवाचे आहे. ईश्वराने निर्माण केलेल आहे. तुझा तलाव म्हणजे? ऐकले नाही. " बघ म्हणाले. चांगलं होणार नाही. " पाणी प्यायला तो आणि मरून पडला.

अर्जुन आला. त्यानेही ऐकले नाही. तो एवढच म्हणाला, " मी तुम्हाला विचारतो प्रश्न त्याची उत्तर द्या आणि नंतर पाणी प्या. " भीम, अर्जुन, नकुल, सहदेव चारही बंधू, तहान लागलेली, उन्हाळ्याचे दिवस, पाणी प्यायले आणि मरून पडले. काय झाल? हे आले का नाहीत म्हणून धर्मराज स्वत: तिथ आले. आणि त्या यक्षाने सांगितले "धर्मराज, हे चारही बंधू तुझे, माझ न ऐकल्यामुळे यांना मृत्यु आलेला आहे. माझ्या प्रश्नांची उत्तर द्या आणि मग पाणी प्या एवढेच मी सांगितले. तू माझ्या प्रश्नांची उत्तरे जर देशील तर तुला पाणी पिण्याची मी आपखी संमती देईन. "

आता केवढी परिस्थिती आहे. चारही बंधू, अतिशय पराक्रमी, ते चारही बंधू मरून पडलेले आहेत. काय मनाची अवस्था झाली असेल! बारा वर्षाचा वनवास संपवून आपल्याला जायचय, आपल राज्य घ्यायच आहे जिंकून युध्द करून.

आता कुणाच सहाय्य होणार? ती आशा संपली. पण अशाही स्थितीमध्ये त्यांनी सांगितल्याप्रमाणे आणि कबूल केले. विचारा म्हणाले, प्रश्न. त्याची उत्तरे मी देतो.

असंमोह म्हणून दहाव्या अध्यायामध्ये ईश्वराच्या ताब्यात काय काय आहे ते सांगितले आहे. 'लोकमहेश्वरन्- सर्वांचा तू नियामक आहेस ते स्पष्ट करण्याकरता-

बुध्दिर्ज्ञानमसंमोह: क्षमा सत्यं दम: शम: ।
सुखं दु:खं भवो भावो भयं चाभयमेव च ।।४।।
अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशो यश: ।
भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधा: ।। ५।।

कुणीही आणखी देऊ शकत नाही. त्यापैकी असंमोह म्हणून जो आहे. कर्तव्यकर्म प्राप्त झालेल असताना बुध्दि स्थिर राहण, निर्विकार बुध्दि राहाण, मन राहाण हा असंमोह पदार्थ आहे. चारही बंधू मरून पडले आहेत. तो यक्ष म्हणतो आहे, प्रश्नांची उत्तरे देशील तर पाणी प्यायची संमति मिळेल. नाहीतर तुझीसुध्दा अशीच अवस्था होईल. विचारा म्हणाले. महाभारतामध्ये ते प्रश्न प्रसिध्द आहेत. आणि इतक्या स्थिर बुध्दिन तो सगळा शोक दूर करून आणखी शांत मनाने समर्पक उत्तर दिल्यामुळे तो यक्षराज प्रसन्न झालेला आहे. "काही हरकत नाही माझ्या इच्छेप्रमाणे मी विचारले प्रश्न, तू चांगली उत्तरे दिलीस आता तुला वर देतो. मागून घे. या चौघांपैकी कोणता तरी एक भाऊ तुझा जिवंत होईल" म्हणाले. "कोणता जिवंत व्हावा?" त्याने सांगितले, "नकुलो यक्ष जीवतु. नकुलाला जिवंत करा" तो हसला. साक्षात यमधर्मच परिक्षा करण्याकरता आलेले आहेत. धर्मराज किती धर्मनिष्ठ आहे. कसा भगवद् भक्त आहे. हे पहाण्याकरता आलेले होते.

ते म्हणाले, "अरे, नकुल जिवंत होऊ दे? नकुलाचा काय उपयोग? लहान मुलगा तो. भीम किंवा अर्जुन जर जिवंत झाला तर तुला युध्दाला सहाय्य होणार आहे ना! नकुल जिवंत व्हावा हे का मागितलस तू?"

तो सांगतो", महाराज! मला दोन माता आहेत. एक माता गेलेली आहे. एक माता सध्या जिवंत आहे. तिचा मी मुलगा आहे. म्हणजे त्या मातेच्या मनाचे समाधान आहे. दुसरी जी माता गेलेली आहे तिच्याही आत्म्याला समाधान होण्या- करता तिचा मुलगा नकुल जर जिवंत झाला तर तिला समाधान मिळेल."

मातृदेवो भव. माता नाहीये हजर. आत्ता माता हजर असतानासुध्दा आमच मातापित्यांकडे लक्ष नसत सध्या. कुठतरी वृध्दाश्रमात जाऊन रहाव त्यांनी अस वाटत. तुम्ही त्यांना ठेवून घ्या- आमच्या आईबापांना. पाचशे रूपये नाही हजार रूपये मागितले तरी मी पाठवित जाईन महिन्याला, पण तुमच्या आश्रमात ठेवून घ्या, अस म्हणतात. इथ माता जिवंत नाहीये तरीसुध्दा तिच्या आत्म्याला समाधान होण्याकरता तिचा मुलगा जिवंत व्हावा, पुढच पुढे पाहता येईल म्हणाले. युध्दाला सहाय्यकाय व्हायचे ते ईश्वराच्या इच्छेने होईल.

म्हणजे ही जी चित्तशुध्दि आहे ही भगवद्भक्तीच्या योगाने आहे. मग ते यमधर्म प्रसन्न झाले. त्यांनी चारही भावांना जिवंत केले शेवटी. पण त्याची परीक्षा आहे. धर्मनिष्ठा आहे. भगवंताची आज्ञा जशी आहे त्याप्रमाणे वागायच. तर ही चित्ताची अशी शुध्दि कि ज्या शुध्दिमुळे त्याच सगळ कार्य झालेल आहे, धर्मराजाच. कौरवांनी जी अट घातली होती बारा वर्षे वनवास. पराजय झाला कि बारा वर्षे वनवासामध्ये रहायला पाहिजे. आणि त्यापेक्षा भयंकर अट म्हणजेएक वर्ष अज्ञातवासामध्ये पांडवांनी रहायच आहे आणि अज्ञातवासामध्ये असताना ते जर उघडकिला आले तर पुन्हा बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास. बुध्दिच चातुर्य आहे दुर्योधनाच. पण चांगल्या कामात नाही. पांडवांनी जन्मभर वनवासातच राहाव अशी बुध्दि झालेली आहे. पण

त्यातही पांडव अज्ञात राहू शकणार नाहीत त्याला कौरवांनी कबुली दिलेली आहे असे म्हणावे लागेल.

श्रेष्ठ महात्मे त्यांचा कितीही छळ करायच जरी मनामध्ये आणल दुर्जनांनी तरी त्यांनासुध्दा मान्य कराव लागत पांडव हे अज्ञात राहू शकणार नाहीत. त्यांचे इतके गुण आहेत कि ते प्रकट होतील. सहज आपण त्यांना शोधू काढू. पुन्हा बारा वर्षे वनामध्ये. आणि वनात गेल्यापासून त्यांच्या पाठीमागे सी. आय. डी. खात यांच होतच. कुठ जातायत, केव्हा जातायत, कुणीकडे हे फिरताहेत, बारा वर्षानंतर कुठे जाणार आहेत. ते बिचारे वनामध्ये राहणारे, त्यांच्या जवळ काय आहे? कोण आल? कोण पाहतय? कशाला येत आहेत? तेव्हा ती जी एक वर्षाची अज्ञातवासाची अट ती जर साध्य झाली नाही, प्रगट जर झाले तर पुन्हा बारा वर्षे वनांत जावे लागेल. तर ती जी अट आहे त्याच्यातून या यमधर्मांनी त्यांना मोकळ केल. यमधर्मांनी त्यांना सांगितले, धर्मराज तुझी बुध्दि उत्तम आहे. शुध्द बुध्दि आहे. तुम्ही सगळे पांडव अगदी या रूपामध्ये . आपल्या मूळच्या रूपामध्ये जरी फिरलात कुठही तरी एक वर्ष तुम्हाला कोणीही ओळखणार नाही असा वर दिला.

पुढे ईश्वरप्रसाद संपादन करून एक वर्ष अज्ञातवासातही ते राहिले. ओळखू शकले नाही. त्या पणातून मोकळे झाले. ही चित्ताची शुध्दी आहे. कि ज्या शुध्दिमुळे देवतांचा प्रसाद आपणहून होतो. मागाव लागत नाही. आणखी पराभक्ती. ही पुढ भक्ती पुन्हा निराळी आहे. स्मरणभक्ती अखंड सुरू झाल्यानंतर पदरात पडणारी ही फळ आहेत. वासनाक्षय होतो आहे. चित्तशुध्दी होते आहे. आणि परमात्म भक्ती ही पुन्हा वेगळी आहे. पराभक्ती जिला म्हणतात. कि दुसरे काहीही मागायचे नाही. ईश्वरस्वरूपाचा साक्षात्कार झाल्यानंतर जी भक्ती आहे ती पराभक्ती आहे. आणि ही भक्ती अंत:करणामध्ये त्याने निर्माण होते म्हणतात. वासना कमी कमी होत चालल्या आहेत, चित्त शुध्द होत चालले आहे. आणखी त्यामुळे भगवंताची भक्ती ही अखंड वाढत जात आहे. आणखी पुन्हा तिकडे सांगताहेत-

ज्ञानंच विज्ञान विरागयुक्तम् ।

ज्ञान होत, विज्ञान होत आणि वैराग्यही मिळत.

संपूर्ण वेदाच सार काय आहे, शास्त्राच सार काय आहे हे समजून येण म्हणजे ज्ञान म्हणतात. "वेद तात्पर्य ज्ञानं" आणखी त्याचा अनुभव येण त्याला विज्ञान म्हणतात. श्रीधर स्वामींनी सांगितलय प्रत्यक्ष आणखी जो "वेदै: च सर्वै रहमेववेद्य:" हे वेदाचे सार आहे. त्या परमेश्वर स्वरूपाचा साक्षात्कार होण, अनुभवण म्हणजे विज्ञान आहे. आणि ते वाढण्याकरता मोठ होण्याकरता आवश्यक जे वैराग्य आहे. मनामध्ये कोणतीही इच्छा राहिलेली नाही . त्या प्रज्ञावस्थाच आहे.

प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान्
आत्मन्येवात्मना तुष्ट: स्थितप्रज्ञस्तदोच्यते ।। २.५५ ।।

सर्व कामवृत्तींचा लोप हा मोक्ष आहे. प्रल्हादजींच्या वरती नरसिंह प्रसन्न झाले आणि "काही तरी वर मागून घे बाबा" म्हणाले. तरीसुध्दा काही तरी देवाचा आग्रह पाहून त्याने सांगितले-

यदि रासीश मे कामान् वरांस्त्वं वरदर्षभ ।
कामानां हृद्यसंरोहं भवतस्तु वृणे वरम् ।।
इन्द्रियाणि मन: प्राण आत्मा धर्मो धृतिर्मति: ।
ह्री: श्रीस्तेज: स्मृति: सत्यं यस्य नश्यन्ति जन्मना ।।
विमुच्चति यदा कामान् मानवो मनसि स्थितान् ।
तर्ह्येव पुण्डरीकाक्ष भगवत्वाय कल्पते ।।

मला आपण देणार आहात का वर? मागतो म्हणाले. माझ्या मनामध्ये कोणतीही वासना कोणतीही इच्छा राहू नये. शुभ वासनाही नको. अशुभ वासनाही नको.

पुन्हा अभिमान उत्पन्न होणार नाही. चांगल्या वासना आहेत माझ्या आणि चांगला आणखी संकल्प आहे. निष्काम अंत:करण व्हाव हे मागण आहे. आणि त्याच कारण त्यांनी दिलेल आहे. कि ज्यावेळी जीवाच्या अंत:करणातल्या, बुध्दितल्या सगळया कामना नाहीशा होतील त्या वेळेला जीवभाव संपलाय तो स्वत: प्रत्यक्ष भगवत्स्वरूप आहे.

विमुच्यति यदा कामान्मानवो मनसि स्थितान् ।

तरी प्रल्हादांनी वर्णन केल आहे. मनामध्ये कोणतीही इच्छा नाही. निष्काम अंत:करण झाल्यानंतर तो जो भक्त आहे मनामध्ये काहीही इच्छा नाही. "ठेविले अनंते तैसेची रहावे" ही स्थिती मिळाली. मला अमूक झाल पाहिजे. अमूक काहीही नाही. या अवस्थेपर्यंत जाऊन पोचलेला जो जीव आहे त्याचा जीवभाव संपला. तो साक्षात भगवान झालेला, ईश्वररूप झालेला आहे. म्हणजे ईश्वरस्वरूपाची जाणीव प्रल्हादजींना आहे.

ईश्वर म्हणजे काहीही इच्छा नसणारा तो ईश्वर आहे. आणि इच्छा करणारा म्हणजे जीव आहे. त्या इच्छा करतो कर्म करतो, पुन्हा त्याच फल भागण्याकरता पुन्हा जन्म मृत्यु वगैरे सगळयात सापडतो. तर हे वैराग्य आहे. काही नाही. अनन्य मनस: । अन्य ठिकाणी त्यांच मन जातच नाही. अनंत स्वरूप जो परमात्मा त्याच अखंड स्मरण असल्यामुळे दुसरीकडे त्यांच चित्त जाऊच शकत नाही ही अशी फल संसारामध्ये मिळणे शक्य आहे का? मनातल्या वासना कमी होणं, विषयाकडे मन न जाणे, शुध्द अंत:करण होण हे जे आपल्याला पाहिजे अस सुध्दा वाटणार नाही. मग प्रयत्न तरी कसा होणार? आणि मिळणार तरी कसे?

तर ही सगळी फल जी आहेत, दुर्लभ असलेली ती ईश्वराच्या नित्य स्मरणाने प्राप्त होतात असा आणखी सिध्दांत सांगितलाय. म्हणून तुकाराम महाराजांनी

हेची दान देगा देवा तुझा विसर न व्हावा ।।

ईश्वराच विस्मरण कधीही होऊ नये हे ईश्वराजवळच मागितलेले आहे. जीवाला शक्य नाही ते प्रयत्नांनी. केव्हा मन दुसरीकडे जाईल आणि विस्मरण होईल याचा नेम नाही. दुसरा एक अभंग आहे तुकाराम महाराजांचा –

पहा ते पांडव अखंड वनवासी ।
परि त्या देवासी आठविती ।।
प्रल्हादासी पिता करीतो जाचणी ।
परि तो स्मरे मनी नारायण ।।
सुदामा ब्राम्हण दरिद्रे पिडीला ।
नाही विसरला पांडुरंगा ।।

इतकी उदाहरणे दिली आहेत. आणि शेवटी सांगताहेत –

तुका म्हणे देवा तुझा
न पडावा विसर ।
दु:खाचे डोंगर झाले तरी ।।

दु:ख झाल्यानंतर मनुष्याच लक्ष कस जाईल? पण ते देवाजवळच त्यांनी मागितले. विस्मरण होऊ नये देवाचे म्हणजे सुखाच्या अवस्थेतही होऊ नये हेही मागितले पाहिजे. सगळी प्रपंचातली परिस्थिती संगती आहे, संपत्ती आहे, सत्ता आहे, किर्ती आहे, सगळ आहे. अशा वेळेला स्मरण होण कठिण आहे. सगळ अनुकूल आहे ना! मग कुठून देवाची आठवण होणार वर जास्ती अभिमान मी कसा सुखी आहे. माझ्यासारखा कोण जास्ती सुखी आहे? अभिमान वाढत गेल्याने ईश्वराचे स्मरण होत नाही. त्या वेळेलाही होत नाही. आणि दु:खाच्या वेळेला, दु:ख असह्य झाल, सहन होत नाही त्यावेळेला कुठली आठवण येणार? पण दु:ख जरी पुष्कळ आली तरी मला आठवण पाहिजे हे त्यांनी मुद्दाम मागितलय.

पांडवांच उदाहरण दिलेले आहे. वनवासात आहेत पांडव. राज्य सोडून गेलेले आहेत. वनवास कधी माहीत नाही यांना. साम्राज्य मिळवलेले पांडवांनी. सम्राट राजा. राजसूय यज्ञ केला. आणि लगेच इकडे वनवासात जाव लागल. पण वनवासात असतानासुध्दा "देवासी आठविती" म्हणतात. तो एक आदर्श त्यांनी पुढे ठेवला, तुकाराम महाराजांनी. वनवासात असतानासुध्दा ते देवांनी विसरले नाहीत. दुसर प्रल्हादजींच उदाहरण देताहेत. पित्याने किती त्रास दिला म्हणाले. प्रत्यक्ष मुलाचा प्राण घेण्यासाठी पिताच प्रयत्न करतोय. दुसर कोणाकडे जायच त्या बालकाने, पाच वर्षाच्या मुलाने. पण काही तक्रार नाही. ईश्वराजवळ काहीही मागणार नाही. त्याने जर मागितलअसत तर लगेच हिरण्यकश्यपू राहीला असता का तिथे। उलट हिरण्य-कश्यपूचा नाश झाल्यानंतर प्रल्हादजींनी प्रार्थना केली आहे, कि देवा, माझा पिता अज्ञानी होता. शत्रु नाही तो. अज्ञानाने त्याने आपले अपराध केले, आपला व्देष केला, त्याचा उध्दार आपण करा. एवढी प्रार्थना त्यांनी केली. त्यावेळी देवांनी सांगितले, नरसिंहांनी, "बाबा, तुझ्या एकट्या पित्याचाउध्दार झाला अस नाही, एकवीस पिढ्यामध्ये याच्या पूर्वी होऊन गेलेले तुझे सगळे पूर्वज, त्या सगळयां पूर्वजांचा उध्दार झालेला आहे." त्याच कारण ते सांगताहेत, "तुझ्यासारखा भक्त मोठा जया कुळामध्ये जन्माला आलेला आहे त्या सगळया कुळामध्ये उत्पन्न झालेल्या एकवीस पिढया उध्दरुन गेलेल्या आहेत" म्हणजे त्यालाच मोठेपणा दिला.

तर असा हा प्रल्हाद. त्याचा एक आदर्श तुकाराम महाराजांनी आपल्या समोर ठेवलेला आहे. इतका त्रास देणारा हिरण्यकश्यपू पिता प्रत्यक्ष "परि तो स्मरे नारायण" अखंड नारायणाच स्मरण आहे. त्यामुळे ही दु:ख सगळी बाजूला झाली. ज्ञान आपो-आपच उत्पन्न झालेल आहे.

नैनं छिदन्ति शस्त्राणि
नैनं दहति पावक:।

शस्त्रास्त्राचे आघात अंगावर पडताहेत. आत्मस्वरुपाला त्याच्या काही वेदना नाही, दु:ख नाही. त्याचा नाश होणे शक्य नाही. हे दृढ ज्ञान पक्क झालेल आहे. त्यामुळे आपची काही चित्तावर परिणाम नाही. अखंड नारायणाच्या स्मरणामध्ये आपखी प्रल्हादजी राहीले.

तिसरे उदाहरण त्यांनी दिला -

सुदामा ब्राम्हण दरिद्री तो ।
नाही विसरला पांडुरंगा ।

घरामध्ये काही नाही. लाकूड नाही. श्रीकृष्ण शिकायला होते त्यांच्या माणूसच सुदामजी होते. गुरुमहाराजांच्या आश्रमात सगळी विद्या संपादन करुन आलेले आहेत. ज्ञानी उत्तम आहे आणि भगवद् भक्तीही उत्तम आहे. तर हे ज्ञान असले तरी सुध्दा प्रारब्धभोग निराळे आहेत. ते ज्ञान तुमला देण्याकरता आहे, सवांना ज्ञान द्यायचे पैसा नाही. पूर्वीचा जो घरामध्ये अठरा विश्व दारिद्रय आहे. काही खायला नाही. पण मन अखंड स्मरण चाललेल आहे. हे तिसरे उदाहरण मुद्दाम दिलय, त्यांनी. देवांनी त्यांनी संपत्ती दिली म्हणतात. ह्यांनी मागितली नाही. सुदामजी भेटायला गेले बायकोच्या आग्रहामुळे, श्रीकृष्णाच दर्शन होईल म्हणाले. बर झाल. पुष्कळ दिवसांनी दर्शन होईल. घरात परत निघाले. त्यांनीही काही दिले नाही. यांनीही काही मागितले नाही, तरीसुध्दा यांची वृत्ती अशीच आहे. बर झाल देवांनी मला काही दिल नाही. देवाची कृपा पूर्ण माझ्यावर आहे. या दरिद्री ब्राम्हणाला जर मी संपत्ती दिली असती तर त्या संपत्तिमध्येच याचं मन गुंतून राहिले असते, मला विसरला असता,

अस देवाला वाटल म्हणून मला संपत्ति दिली नाही. हेच विचार शेवटपर्यंत मनामध्ये आहेत. अशा भक्ताला संपत्ति दिली. त्या स्त्री करता म्हणून दिली. हीच भावना शेवटपर्यंत अंत:करणामध्ये ठेवली. संपत्ती मिळाली तरीसुध्दा देवाला विसरले नाहीत. आणि दारिद्र असतानासुध्दा देवाला विसरले नाहीत. ही इतकी दु:ख असताना हे सगळेम्हणाले, अखंड स्मरणामध्ये राहू दे आणि आपल अंत:करण ह्यांनी शांत ठेवलेल आहे. ईश्वराने त्यांना शांती दिली म्हणून देवाला म्हणताहेत. दु:खाचे डोंगर झाले तरी विसर न व्हावा, आपल विस्मरण मला होऊ नये.

स्वत: आणखी त्याप्रमाणे संतांनी हा अनुभव घेतला आणि सर्वही लोकांना त्यांनी सांगितलेल आहे. भगवंताचे अखंड स्मरण राहिले पाहिजे अनुकूल स्थितीमध्ये, प्रतिकूल स्थितीमध्ये ते स्मरण राहिले म्हणजे पारमार्थिक दृष्टीने आपली उन्नती होण शक्य आहे. म्हणून भागवतामध्ये सांगितलेला हा सिध्दांत आहे कि भगवंताचे अखंड स्मरण व्हाव. त्याकरता भागवत आहे. भागवत म्हणजे भगवंताची लिला आहे. काय शक्ती आहे ईश्वराची, कसा मोठया मोठया लोकांचा, भक्तांचा उध्दार भगवंतांनी केलेला आहे. हे सगळ, ही ईश्वराची लिला भागवतामध्ये सांगितलेली आहे. आणि त्याच्या योगाने अखंड स्मरण अंत:करणामध्ये त्या सगळया लिलांच स्मरण करायच. स्मरणभक्ती फार क मोठी आहे ना! ईश्वराची अनंत नांव आहेत. सहस्त्रनाम आपण म्हणतो पण किती तरी नांव आहेत. अनंत रूप आहेत त्याची. प्रत्येकाच स्मरण करायच म्हटल तर चोवीस तास पुरणार नाहीत. पण इकडचे सगळे विसरले पाहिजे. इकडच लक्ष जर कमी झाल, अनन्य मनस: जर होता आल तर त्या अखंड नामाच काय? रुपाच काय? कर्मही अनंत आहेत.

जन्मकर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्वत: ।
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सो र्जुन ।। ४०९ ।।

भगवान् सांगताहेत. माझे जन्म, माझी कर्म, माझी एकंदर रूप ह्यांचा जो ज्ञान करून घेतो त्याचा हा देह पडल्यानंतर पुन्हा त्याला देह घ्यावा लागत नाही. पुनर्जन्म त्याला नाही.

म्हणून अखंड स्मरण करणारे संत महात्मे त्यांच्याच कृपेने आपल्या भारतवर्षाच आणखी हे जे सौभाग्य आपण पाहतो आहोत. ज्ञानेश्वरी सांगणारी महाराजांसारखी मंडळी आजही आपल्याला भेटतात. ऐकणारी आपल्यासारखी मंडळी आहेत. आवडीन आणखी हरिनाम घ्याव म्हणतात. त्याप्रमाणे आवड निर्माण झालेली असते. ती टिकावी एवढ देवाजवळ मागायच आहे.

आणि ते अखंड स्मरण आपल्याला घडल तर त्याची सगळी जबाबदारी ईश्वरावर आहे. जीवाला तो कर्मावरती सोपवून देणार नाही. त्याची शक्ती इतकी आहे. प्रारब्ध कर्माच फळ भोगल पाहिजे. "भोगणे ते फळ संचिताचे" हे सगळ खर आहे. परंतु ज्यांनी आपल मन काढून घेतलेल आहे त्याच संरक्षण करण्याची जबाबदारी

न मे भक्त: प्रणश्यति ।

अस त्यांनीच सांगून ठेवलेल आहे.

सांदीपनी गुरुमहाराजांच्याजवळ सर्व विद्याभ्यास झाला. गोपालकृष्ण, राम, सुदामजी सगळयांचा अभ्यास संपला. आणि नंतर प्रार्थना केली, महाराज काय आपण सगळया विद्या आम्हाला दिल्यात. काही तरी आपली सेवा घडली पाहिजे. गुरु-दक्षिणा काय द्यायची? त्यावेळेला अशी पध्दत होती. सगळा विद्याभ्यास झाल्यावर मग गुरुदक्षिणेचा विचार. अगोदर डोनेशन द्याव लागत तस नाही. अगोदर इतके पैसे आणा मग प्रवेश. प्रवेशानंतर पुढचा खर्च निराळाच आहे. गोपालकृष्णांनी विनंती केली, गुरुमहाराज काय द्याव आपल्याला? आता ते जाणते होते. हे काही सामान्य शिष्य नाहीत. प्रत्यक्ष परमेश्वर आहे.

बायकोला विचारले काय मागायचे? ती म्हणाली आपला एकुलता एक मुलगा समुद्रात बुडून गेलेला आहे. तोच आणून द्यायला सांगा. असा असा मुलगा गेलेला आहे. पुन्हा आणून द्या.

लगेच रामकृष्ण हे यमलोकात गेले. आपला दिव्य पांचजन्य शंख वाजल्यावर लगेच यमधर्म आले. यमधर्मांनी नमस्कार केला. काय आज्ञा आहे महाराज। ते म्हणाले, आमच्या गुरुजींचा मुलगा इथे आलेला आहे. तो आम्हाला न्यायचा आहे. प्रारब्धकर्म वगैरे काही नाही. स्पेशल केस आहे. प्रारब्ध वगैरे नंतर पाहता येईल. आणून दिला यमधर्मांनी. घेऊन आले ते गुरुमहाराजांना दिला.

एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा
हरिकृपे त्याचा नाश आहे।

हरिकृपा ज्यांना मिळवता आली त्यांना प्रारब्धसुध्दा नाहीये असा सिध्दान्त आहे असं नाथमहाराज सांगतात. अशी फार मोठी शक्ती आहे.

आपण सगळीही मंडळी प्रारब्धाधीन आहेत. त्यापैकी चांगल प्रारब्ध शिल्लक रहाव आणि वाईट प्रारब्ध जाव याकरता ईश्वराची प्रार्थना केली पाहिजे. म्हणून वैकुंठलोकात राहणारे जयविजय यांना या जन्मामध्ये हिरण्यकश्यपू, हिरण्याक्ष, रावण, कुंभकर्ण व्हाव लागल. देवाची भक्ती करणारे असतानासुध्दा अशा प्रकारचे प्रारब्ध त्यांच कि भक्त देवाचे असताना देवाचे वैरी झाले. तीन जन्म वैर कराव लागल. हे केवढ शासन आहे। म्हणून आमच दूरीत जाव, वाईट प्रारब्ध जाव, चांगल राहू दे. त्या वेळेलासुध्दा आम्हाला अखंड स्मरण ईश्वराच व्हाव असं देवाजवळ मागायच आहे. आमच्या प्रयत्नांनी काही हे होणार नाही. भक्ती किंवा स्मरण हे जे आहे ते प्रयत्नांनी काही होत नाही. ईश्वरस्वरुप संत महात्म्यांची कृपा, ईश्वराच्या कृपेने हे सर्व मिळते म्हणून देवाजवळ हे मागितलेल आहे, संतांनी तसाच उपदेश सर्वांना केलेला आहे. आणि त्या उपदेशाप्रमाणे भारतवर्षामध्ये अद्यापि ईश्वरनिष्ठा कायम आहे. अन्य देशामध्ये अर्थ आणि काम याशिवाय दुसर काही माहित नाही. पण या देशामध्ये धर्म आहे आणि मोक्ष आहे. हाही विचार आहे. तेव्हा आपल्याला आणखी या जन्मातून आपला उध्दार करुन घ्यायचा आहे. मानवजन्म काय आहे याच महत्व आपल्याला कळून येत. आणि त्या संतांच्या उपदेशाप्रमाणे वागून स्वत:चा उध्दारही करुन घेता येतो.

तर अशी संतांची कृपा आपल्यावर व्हावी. भगवंतांनी तेवढी कृपा करावी. "संत संग देगा देवा" हे मुद्दाम मागितलेले आहे. पण हे दुसरे आणखी एक मागणे मागून घेतले. ईश्वराच विस्मरण होऊ नये हे मागितले. पण संत संगही पाहिजे म्हणाले, त्या शिवाय हे मिळाले तरी टिकायचे नाही. केव्हा चित्त बाजूला होईल, मोहामध्ये पडेल काही नेम नाही. म्हणून तीही संगती आपल्याला अखंड रहावी. हे मागून घेतलेले आहे. आणि त्या संतसंगतीचे हे महत्व आहे. ईश्वरकृपेने जे होणार आहे ते सगळही त्यांच्या कृपेने होतय कारण ते साक्षात ईश्वररुप झालेले असतात. म्हणून ही भारतावरती जी देवाची, ईश्वराची कृपा आहे, ईश्वरस्वरुप संत माहात्म्यांची कृपा आहे ती अशीच अखंड रहावी. संसारामध्ये जरी आपण राहीलो तरी सुध्दा ईश्वराच स्मरण आपल जावू नये, एवढी कृपा ईश्वराने आपल्यावर करावी म्हणजे भारताचे पूर्ण कल्याण आहे. मानव जन्माच पूर्ण आणखी सार्थक्य होणार आहे. तशी कृपा आणखी भगवंतांनी, पांडुरंगांनी करावी अशी आणखी शेवटी प्रार्थना आहे.

पुंडलिक वर दे हारी विठ्ठल ।
।। श्री गुरुदेव दत्त ।।

-:-:-:-:-

दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ।

ब्रह्मानंदम् परम सुखदम् केवलम् ज्ञानमुर्तिम् ।
व्दंव्दातीतम् गगन सदृश्यम् तत्वमस्यादि लक्षम्

दिगंबराची धून चालू असताना तन्मय अवस्था प्राप्त होणे ही ईश्वराची मोठी कृपा आहे. अस भजन म्हणा, गायन म्हणा ज्या ठिकाणी चालू असेल त्या ठिकाणी ईश्वराचा निवास असतो.

या महामंत्राचा अर्थ विषद करण्याकरता सद्‌गुरु वासुदेवानंद सरस्वति स्वामी महाराजांनी एक आरती केली आहे. त्या आरतिचा विचार आज यथामति थोडासा करावयाचा आहे. "दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा" हे शब्द मूळ संस्कृतमध्ये असल्याने मंत्ररुप आहेत. मराठी आणि संस्कृतमध्ये या शब्दांचा उच्चार सारखाच होतो.

वेदांत शास्त्राप्रमाणे दृकतत्व व दृष्यतत्व असे दोनच पदार्थ जगात दाखविलेले आहेत. ज्ञात होणारे, प्रकाशित होणारे असे एक आहे आणि दुसरे दृक - परमात्म तत्व. बहिर्मुख चित्तवृत्ती ज्यावेळेला असते - तशी सर्वदाच असते, स्वभावच आहे तो चित्ताचा, इंद्रियांचा, आणि ती चित्तवृत्ती ज्या वेळेला अंतर्मुख होईल त्यावेळा प्रकाशमान होणारा तो, प्रत्यग्‌आत्मा त्याला म्हटलेल आहे. बाहेरचे पदार्थ जसे जसे भासतात त्याच्या उलट आतल आहे. दु:खरुप आपल्याला बाहेर दिसत तर तो आतला आनंदस्वरुप आहे, विनाशी पदार्थ दिसतात बाहेरच्या जगात आपल्याला याच्या उलट हा अविनाशी आहे, अशुध्द पदार्थ सर्वत्र आहेत तर हा शुध्दच आहे. परप्रकाशी सर्व पदार्थ आहेत तर हा स्वयंप्रकाशी आहे. बाहेरचे सर्व पदार्थ विकारी आहेत तर हा निर्विकारी आहे. जन्मापासून मृत्युपर्यंत षडविकार प्रत्येक बाह्यपदार्थास आहेत आणि हा परमात्मा "भावातीतम्" म्हणजे भाव पदार्थांच्या उलट आहे.

तर असा जो परमात्मा आहे त्याच अनुसंधान करावयाच आहे. इंद्रियांची बहिर्वृत्ती असल्यामुळे देहत्रयाशिवाय दुसर काहीही आपल्याला प्रकाशित होत नाही. देहत्रयामध्ये शास्त्रकारांनी पंचकोषांची रचना केलेली आहे. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय असे पाच कोष आहेत. स्थूल देह हा अन्नमय कोष म्हटलेला आहे. आत्म्याची ओळख करुन देताना स्थूल देहालाच आत्मा म्हणून त्यांनी सांगितलेल आहे. तिथून सुरवात करायला सांगितली आहे. हाच अन्नमय कोष म्हणजे आत्मा आहे. त्याच्या नंतर प्राणमय कोष आहे. प्राणवायू, कर्मेंद्रिये हा जो विभाग आहे, हा प्राणमयकोष म्हणून सांगितलेला आहे. त्याच्या नंतर मनोमय आणि विज्ञानमय असे दोन कोष आहेत. ज्ञानेंद्रिय आणि बुध्दि, ज्ञानेंद्रिय आणि मन असे दोन विभाग म्हणजे हे दोन कोष आहेत. शेवटी आनंदमय कोष म्हणून आहे. चित्ताचा संबंध इथे संपलेला आहे. त्या ठिकाणी केवळ अज्ञान म्हणून आहे. मूळ अज्ञानशक्ती ईश्वराची आहे, कर्मशक्ती ईश्वराची आहे आणि कार्यशक्तीही ईश्वराची आहे आणि या शक्तींच्या व्दारा सृष्टीच्या नियमनाचे कार्य चाललेल आहे.

तर स्वयंप्रकाशी असा जो आत्मा आहे, प्रत्यग्‌आत्मा ज्याला म्हणतात, आपली प्रवृत्ती बाहेर आहे म्हणून तो आत: आहे अस म्हणतात. नाहीतर तो आहे म्हणजे बाहेर नाही अस म्हटल तर सिध्दांत भंग होईल. सर्वव्यापी तो आहे. ज्याला देशाची कालाची कशाची मर्यादा नाही अस ते परमतत्व आहे.

नामदेवांनासुध्दा ज्ञानी भक्तांनी या तत्व दृष्टीने कच्च ठरविले. पांडुरंगाच्या जवळ गेल्यानंतर त्यांनीही त्याला संमती दिली, हो कच्च आहे म्हणाले. त्यावर

नामदेव म्हणाले, माझ्याशी तुम्ही बोलता, माझ्या घरी येता, माझ्या हातचे जेवता, माझी कामसुध्दा करता त्यावर देव म्हणाले, पांडुरंग राऊळामध्येच आहे हे समजण कच्चेपणाचे लक्षण आहे. पांडुरंग सर्व ठिकाणी आहे, सर्वस्वरूप आहे हे ईश्वरदर्शन पूर्ण दर्शन आहे. तर याप्रमाणे अंतरात्मा, प्रत्यगुआत्मा, प्रत्यगुब्रम्ह ज्याला म्हणतात त्याच दर्शन होण्याकरता ज्या मनाच, बुध्दिच सहाय्य घ्यायच ती बुध्दि त्याच्या पर्यंत जाऊ शकत नाहीये. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय या पाच कोषा पर्यंतच त्या बुध्दिची झेप पोहचत नाहीये. आनंदमय कोषाच्याही पलिकडे असलेला स्वयंसिध्द. तो आनंदमयकोष म्हणजे सुषुप्तिच्या वेळेला जो आनंद मिळतो त्याची कोणतीही इंद्रिये नाहीत केवळ ज्याला अगदी अज्ञान म्हणतात तो अज्ञानसंमिश्रीत आनंद त्यावेळेला आहे. शुध्द आनंदरूप असे जे परमात्मस्वरूप आहे तिथपर्यंत जर मनाची गती झाली, बाहेरून मन हे परावृत्त ज्यावेळेला होईल, त्यावेळेला या कोषाचे अनुसंधान करता करता आनंदमय कोषाच्याही पलिकडे एक स्वयंसिध्द, निर्विकार आत्मतत्व आहे हे मनाला समजून येत, आणि त्या साक्षीस्वरूपाच अनुसंधान तितक उत्कटतेने होत राहिल पाहिजे. साक्ष म्हणजे दिसणारे दृश्य "मात्रा स्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्ण सुखदु:खद: । अगमा पायिनो अविद्या: तान तितिक्षस्व भारत" ही उच्च भूमिका अर्जुनाला सांगितलेली आहे. वेदांत श्रवण, मनन, निदिध्यासन करण, समाधी त्याच प्रमाणे साक्षात्कार त्या बुध्दितत्वाचा करून घेणे इतकी बुध्दिची योग्यता होण्यापूर्वी ते अनुसंधान इथून सुरु करायच आहे.

सर्वही विश्व हे आपल्या बाह्य आहे. आणि अनित्य आहे. याकरता तितिक्षेचा अभ्यास शास्त्रकारांनी सांगितला आहे. इष्ट, अनिष्ट कोणत्याही घटना घडल्या तरी समचित्त राहण हा तितिक्षेचा अभ्यास आहे." हे साधून मग स्वरूपानुसंधान करायला सांगितल आहे. याच स्पष्टीकरण महाराजांनी आत्मानात्म विवेकामध्ये केल आहे. स्वरूपानुपानुसंधान ज्या बुध्दिन किंवा मनान करायच आहे, निर्विकार जे स्वरूप आहे ते "दिगंबर" शब्दाचा अर्थ अर्थ आहे. साक्षीस्वरूप सूर्याच्या उदय व अस्तानुसार आपण पूर्व, पश्चिम दिशा वगैरे समजतो.

सूर्यनारायणाच्या [मूर्त स्वरूपानुसार] उदयाप्रमाणे पूर्व दिशा समजतो. आणि जो मूर्त पदार्थ त्या सूर्यनारायणापासून दूर असेल त्याला पश्चिम दिशा समजतात. सूर्यनारायण पासून आमच्या पाठीमागे असलेल्या पदार्थापेक्षा आम्ही जवळ आहोत म्हणून सूर्यनारायणा पेक्षा दूर असलेल्या पदार्थाला पश्चिम दिशा असे समजतात. व्यवहारामध्ये दृक तत्वा प्रमाणे विभाग केले जातात. तेव्हा इथे अंबर म्हणजे आकाशाप्रमाणे सर्वव्यापी परमात्म तत्व आहे. दिक तत्वाप्रमाणे मूर्त पदार्थ अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय किंवा स्थूलदेह आणि कारणदेह, सुक्ष्मदेह असे जे तीन देह आहेत या तीन देहांनी वेष्टीत झाले आहे. आवृत्त झाले आहे. त्याला काढायच आहे. त्यासाठी बुध्दिच सहाय्य घ्यायच आहे. शुध्द प्रकाशमान आत्मतत्वाच अनुसंधान करायचे आहे.

मी बसलो, मी उठलो, हे सगळे देहाचे धर्म आहेत. मी पहातो, मी ऐकतो, हे सर्व इंद्रियाचे धर्म आहेत. मी संकल्प करतो, माझ्या मनात राग आहे, माझ्यात दोष आहेत हे सगळे मनोधर्म आहेत. हे सगळे धर्म "मी" च्या ठिकाणी आपल्याला भासतात, आणि शेवटी त्या "अहम" ची शुध्दि होता होता देहत्रयातील देहत्रयाने होणारे सर्वही व्यवहार पाहू शकतो. या व्यवहाराची उत्पत्ती, नाश हा सर्व मला दिसतो आहे. त्यामुळे मी असंग आहे. माझा याच्याशी काही संबंध नाहीये, हे जे अनुसंधान तो "दिगंबर" या पहिल्या शब्दाचा अर्थ आहे. हे जे आत्मतत्व आहे ते सर्व वेष्टीत झालेल आहे. त्याचे जो अनुसंधान करून, बुध्दिने हे वेष्टन दूर करून, विश्लेषण करून, तसा मी आहे अशी धारणा करतो आकाशतत्वा प्रमाणे "रवम्" हे आकाशाचे नांव आहे, ब्रह्माचेही नांव आहे. पण रवम् म्हणजे आकाशाप्रमाणे असंग आहे आणि आकाशाप्रमाणे देश मर्यादा

रहीत आहे. आकाशाला दत्तात्रेयांनी गुरु केले आणि त्या आकाशापासून असंग हा बोध घेतलेला आहे. सर्वांतर्यामी असलेला प्रत्यग ब्रम्हापर्यंत आपली बुध्दि नेणे हे दिगंबर पदार्थाचे अनुसंधान करणे आहे.

प्रत्यग ब्रह्मापर्यंत आपली बुध्दि नेणे फार कठीण आहे म्हणतात. कार्तिकांना हे सापडणार नाही असे आचार्य महाराजांनी स्पष्ट सांगितले आहे. तिथे आंतमध्ये प्रवेश नाही . कारण साक्षी म्हणून जो आहे तो जगात कुठे अनुभवाला येत नाही. निर्विकारी आणि स्वयंप्रकाशी आत्मतत्वाचा बुध्दिने ठरवून अनुभव घ्यायचा आहे. त्याकरता योग मार्ग सांगितला आहे किंवा भक्तिमार्ग आहे. तर त्या स्वरूपानुसंधानापर्यंत बुध्दि आली. मी साक्षी आहे इथे सुखदु:ख वगैरे काही नाही. द्वंद्वातीतस पर्यंत बुध्दि येऊन पोहोचलेली आहे. जे तत्व ज्याला कशाचाही संबंध नाही, सुख दु:खादी होणारी द्वंद्व हा फक्त पाहातो आहे. त्या सर्वांचा मी साक्षी आहे. जसा मी साक्षी आहे तसा दुसरा एकादाही साक्षी आहे. व्यापक दृष्टी, सर्वसाक्षी, सर्वव्यापी एकच आहे. जसे जीव अनंत आहेत तसे साक्षीही अनंत होतील. साक्षीस्वरूप अद्यापि मर्यादित राहिलेल आहे. आत्मस्वरूपाचे जे निरनिराळे विभाग आहेत, अंश आहेत कल्पनेने दाखविलेले, ते सगळे अंश अजून लक्षात आलेले नाहीत. केवळ निर्विकार असंग एवढच ठरलेल आहे. या करता अनंत जन्माचा अभ्यास, सुकृत आहे, महात्म्यांची कृपा आहे. त्यामुळे बुध्दि येथपर्यंत येऊन पोहोचली आहे.

आणि साक्षी स्वरूप समजल्यानंतर ते अनेक आहे. साक्षी जो आहे, तो सर्वत्र व्यापक आहे. कालमर्यादा असेल पण देशमर्यादा त्याला नाहीये. "सर्वगत:" एवढेच समजून घ्यायचे आहे.

ते पूर्ण ब्रह्म आणि हे प्रत्यग् ब्रह्म ।

साक्षी ब्रह्म पूर्ण आहे. सर्वव्यापी आहे. सर्वत्र एकच आहे. हे दुसऱ्यांदा "दिगंबर" शब्दाच्या अर्थात त्यांनी सांगितले आहे. दिशा एक तत्व आहे, काल एक तत्व आहे, आकाश एक तत्व आहे, परंतु उपाधिमुळे त्यांच्यात भेद दिसतो. भांड्यातले, खोलीतले, ताटातले आकाश निराळे हा जो भेद दिसतो तो उपाधिमुळे दिसतो. जस काल हे एक तत्व असताना कालाची उपाधी क्रियेवरून त्यांनी मानलेली आहे. आणि त्या क्रियेवरून कालाचा भेद शास्त्रकारांनी मानला आहे. साठ सेकंदाला एक मिनिट, साठ मिनिटे म्हणजे एक तास ही नावे आपण जरी दिली असली [म्हणजे भेद केला असला] तरी वस्तुत: कालतत्त्व एकच आहे. त्याच प्रमाणे एक दिक्तत्व मानून ते जसे सर्वव्यापी आहे त्या प्रमाणे पूर्ण ब्रह्म आहे.

साक्षीभाव जो आहे तो सुध्दा नाहीसा झाला पाहिजे. मी साक्षी आहे आणि साक्ष निराळे आहे पुन्हा हा भ्रम अद्यापि शिल्लक राहिला आहेत तोही जायला पाहिजे. तर साक्षीस्वरूप सर्वव्यापी व पूर्ण आहे. हे कळण्याकरता "सचित् सुखाघन मायातीतम् ". सच्चिदानंद स्वरूप जे आहे सत् स्वरूप याचा अर्थ अविनाशी आहे, चितस्वरूप म्हणजे स्वयं प्रकाशी आहे. दुसऱ्याच्या प्रकाशाची आवश्यकता नाही. सूर्य, चंद्रादिकांना देखील त्यांच्या मुळे प्रकाश आला आहे. "यदादित्य गतम् तेजो ------- विधी मामकम्" अस भगवान म्हणताहेत. अस सर्व प्रकाशी एक तत्व आहे आणि आनंदरूप आहे. तो आनंद सर्वसिध्द आनंद आहे.

आणि "मायातीतम्" मायेने निर्माण झालेल्या भौतिक पदार्थाच्याही पलिकडचे आहे. हे दुसऱ्या "दिगंबर" शब्दाने सांगितले आहे. आणि ही दोन्ही तत्वे एकच आहेत हे दुसऱ्या "दिगंबर" शब्दाने सांगितले आहे.

श्रीपादवल्लभ हेही त्याच्यामध्ये घातलेल आहे. निर्गुण निराकार अस जे परम आत्म तत्व आहे ते परमतत्व साक्षीरूपाने आधी दाखवल गेल. पुन्हा सर्वसाक्षी सर्वव्यापी अशा परिपूर्ण रूपाने त्याचे प्रगटीकरण केलेले आहे. आगोदर साक्षीचे अनुसंधान केले. अहम ब्रह्म म्हणजे अहंम साक्षी असा मनाचा अभ्यास होण्याकरता मनाच सहाय्य फार पाहिजे. आणि हे मनाच सहाय्य होण्याकरता शास्त्रकारांनी बाकीची साधने सांगितली आहेत. त्यासाठी भक्तियोगाचा पुरस्कार महाराजांनी याठिकाणी केला आहे. श्रीपादवल्लभ हे जे सगुण स्वरूप व्यक्त झाल श्रीपादवल्लभ ज्या स्थानामध्ये राहिले त्या स्थानात राहाणाऱ्यांची-ही इष्टसिध्दी होते. श्रीपादवल्लभ ज्या स्थानात राहीले त्या स्थानात जर साधकाने निवास केला तर यज्ञ, तप, दान इत्यादि करून मिळणाऱ्या फलापेक्षा कितीतरी अधिकपट फल त्याला मिळते. त्याची प्रगती जास्त लवकर होते. श्रीपादांचे स्वरूप हे फक्त भौतिक शरीर नसून ज्ञानमय सगुणरूप त्यांनी धारण केले आहे. असा परमेश्वर स्वरूपाचा अवतार ज्या ठिकाणी राहिला ते स्थानही पवित्र होऊन जात आहे. स्थानाचे महत्व आहे. ज्ञानेश्वर महाराज सातशवर्ष झाली समाधी लावून बसले आहेत. तिथे जाणाऱ्या येणाऱ्या लोकांची कार्यसिध्दी कशी होते? त्यांना बातमी कोण पोहोचवतो? सिध्दपुरुषांच्या या स्थानामध्येच अस काही वैशिष्टय निर्माण झालय कि तिथे जाणाऱ्या भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात.

आत्मानुसंधान करणाऱ्या साधकांना निरनिराळ्या विघ्नांना तोंड द्यावे लागते. पहिले विघ्न म्हणजे झोप स्वरूपानुसंधानास बसल्यावर जर झोप आली तर मनाचा लय होतो. कसे काय मग अनुसंधान करायचे? त्यासाठी आहार विहाराचे कटाक्षाने पालन व्हायला पाहिजे. हिताहार मिताहार इत्यादी पाळले पाहिजेत म्हणजे हा लय दोष उत्पन्न होत नाही. त्यानंतरचा मोठा दोष म्हणजे अनेक प्रकारच्या वृत्ती मनात निर्माण होत आहेत. आणि त्या वृत्तितच माणूस रमून जातो. वृत्ती निर्माण होण हा संसार आहे. आणि वृत्ती नाहीशी होण हा मनोनाश आहे. वृत्ती निर्माण होऊन स्वरूपानुसंधानात विक्षेप उत्पन्न करतात. आपल्या अंत:करणांत षड्विकारादी दोष किती प्रबळ आहेत याचा पत्ता आम्हाला लागत नाही. प्रत्यक्ष ते विकार प्रगट झाल्यानंतरही ते जाणवत नाहीत. रसास्वाद हा एक मोठा भयंकर दोष आहे. ज्यांना प्रगति साधावयाची आहे ते रसास्वादाच्या मागे लागत नाहीत. आपली प्रसिध्दी आपणच आपल्या तोंडाने करायची. व्यवहारात जरी हे उपयोगी असले तरी परमार्थात हा दोष म्हणून मानला आहे. मला इतका अनुभव आलेला आहे, माझी एवढी प्रगती झालेली आहे असे स्वत:च सांगत सुटायचे. आपल्याला जो काही थोडा फार चांगला अनुभव आला त्याची आपल्या मुखानेच प्रसिध्दि करायची. प्रगति शब्दाचा अर्थ काय समजायचा साधन व्यवस्थित चाललेल आहे. ती ईश्वराची कृपा आहे असे समजायला काय हरकत आहे? आपल्याकडे त्याच कर्तृत्व घ्यायची काय गरज आहे? या रसास्वादातच सर्व काल निघून जातो. मला असा असा अनुभव येतो आहे, माझे चित्त इतक सात्विक झाल आहे. असे समजण त्याप्रमाणे ते लोकांना सांगण हा रसास्वाद घात करणारा आहे. या रसास्वाद दोषामुळे साधनेमध्ये प्रतिबंध निर्माण होतो आहे. असे अनेक दोष आहेत.

आत्मस्वरूपाचे जे अनुसंधान की मी साक्षीरूप आहे, पूर्णब्रह्म मी आहे. याचा निदिध्यास व्हायला हवा. निदिध्यास म्हणजे साक्षात्कार नाहीये. पण साक्षात्कारा-च्या जवळ जवळ असलेली ज्ञानभूमिका आहे. श्रवण हे सुध्दा ज्ञान भूमिका आहे. मनन, चिकित्सा करण ही सुध्दा ज्ञानी भूमिका आहे. त्याच्या नंतर मनाचा लय झाल्यावर आत्मस्वरूपाच अनुसंधान करण ही तिसरी भूमिका आहे. याच्यातून आपल अंत:करण अखंड त्या परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर होत गेल तर मग ती समाधी अवस्था आहे.

आणि समाधितून पुढे साक्षात्कार होतोय.

तर या अवस्थेमध्ये पोहोचण्यामध्ये येणारी जी असंख्य विघ्ने आहेत त्यांच निरसन कस होणार? ही मोठी अडचण आहे जीवाला. बुध्दी स्वतंत्र आहे. माझी बुध्दि आहे. माझी इंद्रिये आहेत. असे समजतो आपण पण तस नाहीये. जेव्हा शरिराला वेदना होतात तेव्हा त्याकडे आपण दुर्लक्ष करू शकत नाही. सर्पदंश झाल्यावरही मोठे महाराज समाधी लावून बसत होते. एकदा तर आठ तास बसले म्हणे पण तसे तरी आम्हाला कुठे जमतय? राजेश्वरशास्त्री द्रविड एकदा ग्रंथालयामध्ये जाऊन बसले की दोन दोन दिवस बसत असत. अन्न पाण्याची आठवणही येत नसे त्यांना. आनंद आहे. विद्यानंद स्वतंत्र आहे. इंद्रियानंद जरी लोकांना मोठा वाटला तरी तोऽगदी अल्प, अस्थिर आहे. पण विषयापासून, देहापासून मन परावृत्त करण्याची तयारी पाहिजे. ईश्वर दयाळू आहे. भक्तांचे कल्याण करण्यासाठी निरनिराळे अवतार झाले आहेत.

नक्र आणि गजेंद्राची कथा सर्वांना माहित आहे. नक्राने पाय धरून गजेंद्राला आत घेऊन चालला आहे. गजेंद्राच्या शरिरातील सामर्थ्य संपत आलेल आहे. त्याला कळून चुकल कि आपण काही आता बाहेर येऊ शकत नाही. मग पूर्व जन्मात त्याच्याकडून जे काही आत्मानुसंधान घडलेल होते त्याचच स्मरण करुन तो परमेश्वराला शरण गेलेला होता. परमेश्वराची मोठी स्तुती त्याने केली. त्यात परमात्म्याच्या स्वरूपाच वर्णन त्याने केल आहे. आमच्या सारख्या बुध्दिवाद्याला वाटेल. हत्ती कधी स्तुती करतो का? पण चंद्र लोकापर्यंत बुध्दि [मानव] जाऊ शकते हे अगोदर कोणी मान्य केल होत का? पण ही शक्ती आधी मान्य करावी लागते. त्या शक्तीचा विकास कसा करून घ्यायचा ती साधना आम्हाला मान्य नाही. किंवा सांगणाऱ्यावर विश्वास नाही. हा आपल्या बुध्दिचा दोष न समजता अशक्यच आपण समजतो. असंभावना हा फार मोठा दोष आहे.

हा असंभावना हा दोष बुध्दितून गेल्याशिवाय परमार्थ साध्य होणे शक्य नाही. संभावना वाटली पाहिजे, मान्य केली पाहिजे, शक्यतेची भावना निर्माण झाली पाहिजे म्हणजे मग संशय कमी होतो. संशय दोन असतात असेल किंवा नसेल पण बुध्दिवाद्याला यातले काहीच मान्य नाही. आहेही मान्य नाही, नाही असेही म्हणत नाही. त्यामुळे अर्धवट स्थिती होते. "संशयात्मा विनश्यति" होईल असे असू शकेल, असे घडणे शक्य आहे, संभावनात्मक ज्ञान म्हणजे संशयाच्या वरची पायरी आहे.

आणि त्याच्या नंतर निर्णयात्मक बुध्दि निर्णयापर्यंत जाऊन पोहोचते आहे. असा बुध्दिचा विकास होऊ शकतो आहे. आणि तो जो आहे, त्याने मागच्या जन्मामध्ये केलेल जे साधन आहे, त्या साधनाचा त्याला इतका अनुभव आलेला आहे म्हणा, त्या साधनाच महत्व इतक आहे म्हणा की, या पशुच्या [गजेंद्राच्या] जन्मामध्ये आलेला असतानासुध्दा त्या बुध्दिवर ते संस्कार कायम असू शकतात.

बुध्दितत्व हे अगदी अविनाशी आहे. जीवनमुक्ती होईपर्यंत बुध्दितत्व बरोबर राहणार आहे. शास्त्रकारसुध्दा बुध्दिनेच आत्मतत्व दिसू शकत म्हणून बुध्दितत्वाचा पुरस्कार करतात. त्या गजेंद्राचेसुध्दा शुकाचार्य महाराजांनी कौतुक केल आहे. त्या गजेंद्राने म्हणे सर्वव्यापी जे ईश्वर तत्व आहे त्याची प्रार्थना केली. सर्व जग ज्याने निर्माण केल, सर्व जीवांच्या बुध्दिला प्रेरणा करणारा जो आहे, ज्याच्या शक्तिने या सर्व विश्वाचे कार्य चाललेल आहे त्याला मी शरण आलेलो आहे अशी त्या गजेंद्राने प्रार्थना केल्यानंतर मुद्दाम शुकाचार्य वर्णन करतायत– आपल्या नावाचा अभिमान देवादिकांनासुध्दा आहे. पशुजन्माला येऊनसुध्दा गजेंद्राची बुध्दि इतकी शुध्द झालेली होती की सर्व ठिकाणी एकच परमात्म तत्व आहे याची त्याला जाणीव होती. बुध्दि बरोबर असली म्हणजे ती अशा रीतीने कोणत्याही जन्मामध्ये उपयोगी पडते.

तर या प्रमाणे श्रीपादवल्लभ जे आहे ते नाव जे प्राप्त झालेल आहे ते नक्र आणि गजेंद्र या उदाहरणावरुन झालेल आहे. नाव आणि रूप धारण करुन भगवान येताहेत. द्रौपदिच आणखी उदाहरण दिलेल आहे. द्रौपदीसारखी साध्वी स्त्री, गृहस्थाश्रमी पुरुषाचा धर्म म्हणजे देवपूजा इ. पंचयज्ञ करण, अन्नवस्त्र कोणाला हव असल्यास देण, त्याच रक्षण करण, गुरुसेवा, वेदाध्ययन इ. धर्मराजांनी सूर्यनारायणाची प्रार्थना करुन वनवासातसुध्दा गृहस्थाश्रमधर्माचे पालन करण्यासाठी ते पात्र मिळवल. द्रौपदीच जेवण झाल की ते पात्र अन्न देणार नाही, म्हणजे द्रौपदीला सर्वात शेवटी जेवायला हवे. म्हणजे कर्म करायचे तरी किती कठीण आहे। सत्वपरीक्षाच आहे. ध्येय पूर्ण करण्यासाठी मनाचा निर्धार किती पाहिजे। भक्तिमार्ग, ज्ञानमार्ग हे तर पुढचेच आहेत. पण कर्ममार्गातही निश्चित दृष्टी [बुध्दि] पाहिजे. दुर्योधनाने दुर्वास ऋषींना प्रसन्न करुन घेतले आणि पांडवाच सत्व भंग करण्यासाठी द्रौपदीचे जेवण झाल्यावर अतिथि म्हणून तिथे जेवायला पाठविले. म्हणजे दुर्योधनासारखी मंडळीही सत्संग करतात, पण त्याचा असा दुरुपयोग करतात. वास्तविक पाहाता दुर्वासऋषिंना प्रसन्न करुन घेण म्हणजे काही सोपी गोष्ट नाही. मनाचा निग्रह करावा लागला. पण ते सर्व त्याने केले. म्हणजे ही जी असूरी प्रवृत्तीची मंडळी आहेत त्यांच्याजवळ मनोनिग्रह आहे, इंद्रियांचा संयम आहे, तितिक्षा इ. सर्व साधन आहेत. दुर्वास ऋषि प्रसन्न होऊन, काय हवा तो वर मागून घे म्हणाले. दुर्योधनाने असा वर मागितला की द्रौपदीच जेवण झाल्यावर सर्व शिष्यांसह तुम्ही पांडवाच्या आश्रमात जा. म्हणजे पाहुण्यांच्या हातून साप मारायचा. पाहूणा मेला तरी चालेल, साप मेला तरी चालेल. त्यामुळे दुर्वास ऋषिंना नाईलाज म्हणून जावे लागले. पांडव योग्य आहेत, धर्मनिष्ठ आहेत. हे काही त्यांना माहित नव्हते असे नाही. ते त्यांच्या आश्रमात गेले. धर्मराज मोठा धर्मज्ञ आहे. धर्मराज अरण्यातही अतिथी धर्माचे पालन करीत होता. पण आता द्रौपदीचे जेवण होऊन गेल असल्यामुळे दुर्वास ऋषि आणि त्यांच्या शिष्य समुदायाला जेवण देणार कसे? न द्याव तर दुर्वासांचा कोप होऊन शाप देणार ते.

पण द्रौपदीही काही कमी नव्हती. सर्व भगवंताचीच शक्ती आहे, "त्वमेव सर्वम् देव देव" ही जी फार कठीण भूमिका आहे ती द्रौपदीला जमली होती. वास्तविक पाहता "त्वमेव सर्वं मम..... देव" ही भूमिका उत्पन्न होण कठीण आहे. साधनावरती विश्वास असल्यानंतर मी साधन करतो असा स्वत:वरचा विश्वास ज्याच पुढे अभिमानामध्ये रूपांतर होत आहे. पण द्रौपदीने तळमळीने श्रीकृष्णाचे आवाहन केले आहे. भगवान आलेले आहेत आणि भाजीचे पान भक्षण करुन - पत्रं, पुष्पं, फलं, तोयं-" हे स्वत: आचरणात आणून, द्रौपदीच्या प्रेमाला महत्व दिलेल आहे. आणि मग परत त्या थाळीने अन्न दिले आणि द्रौपदीच्या भक्ति भूमिकेमुळे पांडव संकटातून मुक्त झाले आहेत. भक्तीभावासाठी भगवान वाटेल त्या वेळेला येऊन संकटातून मुक्त करतात. अंबरिष राजालाही भगवंतानेच दुर्वासाच्या शापातून मुक्त केल आहे.

सकाम भक्त आहे. श्रीपादवल्लभांचा नवस फेडून सहस्त्र ब्राम्हण भोजन घालण्यासाठी कुरुगड्डीला निघाला आहे. वाटेत चोरांनी गाठून त्याचा फसवून वध केला आहे परंतु भगवंताच वात्सल्य पूर्ण शक्ती अशी आहे की भगवान त्या ठिकाणी येऊन त्या चोराला मारुन, ब्राम्हणाला जिवंत केल आहे, आणि त्याचा . तो संकल्प त्याच जन्मात पूर्ण करुन घेतला आहे. मेलेला आहे हे पाहिल्यावर देवांना तत्वज्ञान सांगता आल नसत काय? जा बाबा तुझ आयुष्य संपलेल आहे वगैरे उत्तर त्यांना देता आल असत. अशा त-हेने भक्तांना भगवंताच सहाय्य होत असत.

निर्विकार ब्रम्हरूप समजणे, त्याच प्रमाणे सर्वव्यापक ब्रम्ह जे आहे तेही समजून घेण, त्याच अनुसंधान करण, अनुसंधान करताना जरी राहील नाही तरी हरकत नाही,

सगुण कनिष्ठ, निर्गुण श्रेष्ठ असा भेदभावच तिथे नाही. भक्त कार्य करणारा भगवानच साक्षात ब्रह्मरूप आहे. निर्गुण निराकार तोच आहे. त्याची प्राप्ती मला व्हावी. अनंत विक्षेप (काम, क्रोधरूपी) चित्तामध्ये उत्पन्न होताहेत. चित्त स्थिर करण्याच सामर्थ्य माझ्याजवळ नाहीये. साधन मिळाल तरी, साधनावरती तरी तितका पूर्ण विश्वास कुठ आहे? त्यामुळे त्या साधनाचाही उपयोग मी करून घेऊ शकत नाहीये. या करता तुमची प्राप्ती मला व्हावी, तुमचसहाय्य मला व्हाव ही प्रार्थना या आरतीत शेवटी केलेली आहे. अशा रितीने सामान्यत: एकंदर तत्वानुसंधान, वेदांत सिध्दांत यात मांडलेले आहेत. त्या सिध्दांतापर्यंत आपली बुध्दी जाण्याकरीता भगवद्‌भक्तीचे महत्वही या ठिकाणी वर्णन केलेल आहे. आपण जर कृपा केलीत तरच मला आपल स्वरूप समजुन येणार आहे. माझ कर्तृत्व काहीही नाही अशी अनन्य भावाने प्रार्थना शेवटी केली आहे. याच नित्य अनुसंधान करीत राहून या आरतीच पठण अर्थाकडे जर लक्ष देऊन जर झालतर त्याच फळ आपल्याला मिळणार आहे. हे एक वाड्.मय तपच आहे. अर्थानुसंधान नाही घडल तरी जितक वाणीने होईल तेवढे करावे. त्या वाड्.मय तपाचेही महत्त्व काही कमी नाही. वाड्.मय तपाच पर्यवसान मानस तपापर्यंत होत आहे. हेच महाराजांनी याच्यामध्ये सांगितलेल आहे.

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ।।
आरती हे तव चरणी राहो ।।
आरती हे तव चरणी राहो ।। नति तति गुरुवरा ।। धृ ।।
दिग्भिरवेष्टितमम्बरमेव प्रत्यग्ब्रह्मेति ।।
खंब्रह्मेति श्रुतिरपि वदति खंब्रह्मेती श्रुतिरपि वदती दिगंबराचिति ।। १ ।।
दिगवत् चाम्बरमेव व्यापक पूर्णब्रह्मेति ।।
सच्चित्सुखघनमायातीतं सच्चित्सुखघनमायातीतं दिगंबरा वदति ।। २ ।।
श्रीपादवल्लभ नाम प्राप हि नक्रगजेंद्रमिव ।
द्रौपद्यंबरीषचोर । द्रौपद्यंबरीषचोरग्रसितद्विजमेव ।। ३ ।।
दिगंबरा गुरु वासुदेव दत्तस्त्वंब्रह्म ।।
कामक्रोधग्रसितं मां लभ । कामक्रोधग्रसितं मां लभ तथैव झटिति
वह ।। ४ ।। दिगंबरा . ।।
।। दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ।।

या अष्टाक्षरी मंत्रातले पहिले दोन शब्द दिगंबरा दिगंबरा हे दोन संबोधने आहेत. तशी सगळीच संबोधने आहेत. प्रथम " दिगंबरा दिगंबरा " या दोन शब्दांनी साक्षी स्वरूप – आत्म्याचे जे साक्षीरूप आहे, म्हणजे शुध्द " अहम " पदार्थ. जीवाचे शुध्द स्वरूप याच अनुसंधान हे पहिल्या शब्दाने आहे. आणि दुसऱ्या " दिगंबरा " या शब्दाने सर्व व्यापी, सर्व विश्वास अधिष्ठान असं जे ब्रह्म आहे, परब्रह्म ज्याला म्हणतात.

प्रत्यग् ब्रह्म आणि परब्रम्हं। अहम आणि ब्रह्म हे दोन्ही एकच आहेत. हे व्यापक ब्रह्माच स्वरूप, परब्रह्माच स्वरूप त्याच अनुसंधान दुस-या दिगंबरा या संबोधनाने केलेले आहे.

तेच ब्रह्म स्वरूप भक्तांच संरक्षण करण्याकरता- रक्षण याचा अर्थ भक्तांची बुध्दि शुध्द करून आपल्या ठिकाणी स्थिर करण. हे संरक्षण आहे. त्या करता "श्रीपादवल्लभ" हे तिसरे संबोधन आहे. "श्रीपाद" आणि "वल्लभ" असे दोन शब्द याच्यात आहेत. "श्री:पादेयस्य" -ज्याच्या चरणाजवळ श्री आहे. लक्ष्मीयुक्त परमात्मा, शक्तीयुक्त परमात्म्याचे स्मरण श्रीपाद या शब्दाने केल आहे.

तेव्हा सर्व श्री -लक्ष्मीदेवी ज्याच्याजवळ आहे आणि म्हणून तो सर्वांना वल्लभ आहे. म्हणजे प्रिय आहे. सर्वांना संकटातून मुक्त करून कल्याण करणारा आहे म्हणून तो वल्लभ म्हणजे प्रिय आहे. तेव्हां सर्व श्री मायाशक्ती ज्याच्याजवळ आहे, आणि सर्वही भक्तांना जो अत्यंत प्रिय आहे, तो प्रिय कसा आहे? भक्तांची संकट तो कसा दूर करतो? हे पुढे सांगितले आहे.

श्रीपादवल्लभ नाम प्राप हि नक्र गजेंद्रमिव।
द्रौपद्यंबरीषचोरग्रसितव्दिजमेव।

चार भक्तांची उदाहरण या ठिकाणी दिलेली आहेत. नक्र-गजेंद्र. नक्राने गजेंद्राला धरलेल आहे. अत्यंत आर्त होऊन भगवंतांना तो बोलावतो आहे. त्यावेळी भगवान त्या ठिकाणी येऊन त्यांनी त्या नक्राचा नाश करून गजेंद्राला मुक्त केल. नक्रापासून तर सोडवलच पण गजयोनीतून ही मुक्त केल. तो, वैकुंठलोकात राहाणा-या भगवत् भक्तांचे रूप मिळून, वैकुंठलोकाला गेला.

द्रौपदीचही उदाहरण आहे. द्रौपदीची विटंबना करायच ठरवल दु:शासनाने. त्यावेळेला आर्त झालेल्या द्रौपदीने हाक मारल्यानंतर तिथे येऊन तिला वस्त्र देऊन भगवंतांनी तिच संरक्षण केल.

अंबरीष राजा. दुर्वास ऋषिंचा शाप होणार पण त्याने प्रार्थना केल्यावरून, स्मरण केल्यावरुन भगवान् त्या ठिकाणी आले आणि त्यांनी त्याचा शाप स्वत: घेतला. त्याच-ही रक्षण केलेल आहे.

आणि चोरग्रसितव्दिज. गुरुचरित्राच्या दहाव्या अध्यायात जी कथा सांगितलेली आहे. श्रीवल्लभांचा कुरवपुरचा मोठा भक्त नवसाप्रमाणे अन्नसंतर्पण करायला निघाला असताना चोरांनी त्याचा नाश केला त्यावेळी श्रीपादवल्लभांनी त्या ठिकाणी येऊन त्या चोरांना मारल, त्याला जिवंत केल. त्याचा नवस त्याच जन्मामध्ये फेडला गेलेला आहे. तेही उदाहरण आहे.

तर अशा आर्त झालेल्या भक्तांना सुरक्षित ठेवण - न मे भक्त: प्रणश्यति- या आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे ही लीला भगवंतांनी केली, भक्त संरक्षण केल, "श्रीपादवल्लभ" या संबोधनामध्ये हे सर्व सुचवलेल आहे. आणि शेवटी अशी प्रार्थना केली आहे.

दिगंबरा गुरु वासुदेव दत्तस्त्वम् ब्रह्म।
कामक्रोधग्रासितम् माम् लभ तथैव झटिती वह।।

हे दिगंबरा! "श्रीपादवत् लभ" असा एक अर्थ केला. श्रीपाद ज्याप्रमाणे विष्णु-रूपानी त्या गजेंद्राला, द्रौपदीला त्याच प्रमाणे "लभ" म्हणजे मलाही आपली प्राप्ती व्हावी. कारण मीही कामक्रोधग्रासितम्. चौथ्या "दिगंबरा" चा अर्थ सांगताना गुरु स्वरूप आहे, वासुदेव रूप आहे, दत्तरूप आपण आहात। म्हणजे ही तिन्हीही रूप एकच आहेत. ईश्वराच स्वरूप ब्रह्म, स्वरूप, दत्तस्वरूप आणि गुरुस्वरूप सर्वही अनुसंधान एक रुपान या ठिकाणी केल आहे.

वासुदेव याचा अर्थही शास्त्रकारांनी केलेला आहे. "वस "धातुचा अर्थ अच्छादन करणे. सर्वही भूतांना आपल्या मायेच्या आवरणाने झाकून टाकलेले आहे. म्हणजे आपल आत्मस्वरूप त्या भूतांना काही दिसत नाही. आणि स्वतः तो प्रकाशमान आहे.. झाकून जरी टाकलेल असल तरी आत्मरूप प्रकाशमान आहे. अशा हे वासुदेवा! आणि दत्त:त्वम् ब्रह्म. आपण खरे ब्रह्मा गुरु. वासुदेव दत्तात्रेय. सर्वही आपण ब्रह्मस्वरूपच आहात. मूल ब्रह्मरूपाने अनुसंधान करून प्रार्थना केलेली आहे.

कामक्रोधग्रासितम् माम लश।।

मला आपण प्राप्त व्हा कारण कामक्रोधांनी मी ग अगदी ग्रासलेलो आहे. ह्या सर्व विकारांनी पिडलेलो आहे. म्हणून मला आपण प्राप्त व्हा. आणि त्याचप्रमाणे लवकर मला आपल्याकडे न्या. अशी शेवटी प्रार्थना केली आहे.

तर या मंत्रामध्ये "दिगंबरा" अशी संबोधन तीन वेळा आलेली आहेत. तेव्हां पहिल्या दिगंबरा या संबोधनाने जे जीवाच साक्षी स्वरूप आहे, शुध्द अहम् म्हणजे सर्व साक्षी निर्विकार अहम्. आणि दुस-या दिगंबर शब्दाने सर्वव्यापी सच्चिदानंद जे गुरुवर अधिष्ठानरूप विश्व ज्याच्या वर दिसत आहे. भासत आहे अस ते स्वरूप आहे. आणि ते आणि हे अहम् एकच आहे व त्याची प्राप्ति होण्याकरता, मनातले सर्व विकार जाण्याकरता, चौथ्या दिगंबर शब्दांनी अनुसंधान करून, संबोधन करून, श्रीपादांनी म्हणजे लक्ष्मीयुक्त शक्तीयुक्त परमेश्वराच्या स्वरूपाची, सगुणाची प्रार्थना करून आपण मला लवकर आपल्याजवळ न्या, आपल स्वरूप मला प्राप्त होऊ दे, देहभाव नाहीसा होऊ दे अशी याच्यामध्ये शेवटी प्रार्थना केलेली आहे.

असा हा एक महामंत्र आहे. या महामंत्राचे सगुण, निर्गुण, व्यापक, अव्यापक अशी जी स्वरूप आहेत त्या सर्व स्वरूपांच ऐक्य कस आहे, ते ऐक्य ज्ञान आपल्याला व्हाव आणि आणि आपण कृतार्थ व्हाव अशी प्रार्थना शेवटी यात केली आहे.

म्हणून महाराजांनी या आरतीच्या सहाय्याने या महामंत्राचे स्पष्टीकरणही संप्रदायात केले आहे.

श्री गुरुदेवदत्त।।

।। श्री गुरुदेव दत्त ।।

ब्रह्मानंदं परम सुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।
द्वंद्वातीतं गगन सदृशम् तत्वमस्यादि लक्षम् ।
एकं नित्यं विमलमचलम् सर्वधी साक्षीभूतम् ।
भावातीतं त्रिगुण रहितं सद्गुरु तं नमामि ।।

भगवान शंकराचार्य महाराज भारतवर्षामध्ये जगद्गुरु म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांनी अनेक ग्रंथ केले आहेत. वेदांत शास्त्राचा सिध्दांत "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या " - हा महत्वाचा सिध्दांत, उपनिषदाचा अभिप्राय, त्यांनी व्यक्त केला त्या ग्रंथांमध्ये. "भाष्यकाराचे वाटत संद्गुरु" म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनीही त्यांनी किंवा इतरही सर्व संतांनी त्यांच्या सिध्दांताप्रमाणे सर्वही ग्रंथ लिहिले आहेत. अनेक स्तोत्र, सर्व देवतांची स्तोत्र त्यांची आहेत. प्रसिध्द आहेत. भक्तिरसपूर्ण। शास्त्रीय सिध्दांतही त्यात मध्ये मध्ये त्यांनी आणलेले आहेत. सर्वही लोकांना म्हणता यावीत. संस्कृतमध्ये आहेत मात्र ती स्तोत्र. प. पू. नानामहाराजांच्या सानिध्यामध्ये रोज सायंकाळी आणखी महिषासुर-मर्दिनीचे स्तोत्र म्हटल जात. करुणात्रिपदी अगोदर म्हणतात आणि नंतर हे स्तोत्र म्हणतात. शंकराचार्यांचे स्तोत्र आहे ते.

त्यापैकी एक भगवान विष्णुंच स्तोत्र त्यांनी केलेल आहे. "षट्पदी" स्तोत्र म्हणतात त्याला. सहा श्लोक आहेत त्यात. त्यापैकी प्रथम श्लोकामध्ये त्यांनी ईश्वराची प्रार्थना करून काय मागायच ईश्वराजवळ ते सांगितलेले आहे. "योगक्षेमं वहाम्यहम्." म्हणून भगवान सांगतात.

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जना: पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।

ईश्वराने सगळी जबाबदारी आपल्या भक्ताची घेतलेली आहे. मी सगळा योगक्षेम वाहातो, म्हणतात. योगक्षेम शब्दाचा अर्थ संसारामध्ये सगळी अनुकूलता ईश्वर करून देतो हा आपण समजतो. योग म्हणजे आपल्याजवळ जे नाही ते मिळवून देण आणि जे दिलेले आहे त्याच संरक्षण करण म्हणजे क्षेम. असा त्याचा अर्थ आहे. संसारात पुष्कळ पाहिजे असत आपल्याला तेही मिळत. परंतु खरा पारमार्थिक योगक्षेम म्हणून जो आहे. काय पाहिजे आपल्याला परमार्थामध्ये? दोष दूर व्हावेत. दोष निवृत्ती ही अपेक्षित आहे. आणखी गुणसंपत्ती, चांगले चांगले सद्गुण. परमार्थामध्ये चित्ताच्या शांतीला ज्यांचा उपयोग होईल अशा गुणांचीही जरुरी आहे. तर हे सगळे मिळवून द्यायचे. जीवाला हे मिळवून द्यायचे. जीवाच्या या प्रयत्नाने हे मिळू शकत नाहीत. कितीही प्रयत्नवादी असला तरी केवळ प्रयत्नांनी हे मिळणार नाहीत. ईश्वराची कृपा, सद्गुरुंची कृपा असली तर हे मिळतील.

आणि ते सगळेही दिलेले गुण, त्यांच संरक्षण करण. काही काल पारमार्थिक दृष्टीने चांगला जातो आपला. बर आहे, देवाची सेवा घडतेय, सगळ घडतय. पुन्हा सगळ विसरून जातो. ते प्रथम श्लोकामध्ये देवाजवळ त्यांनी मागितलेल आहे-

तारय संसार सागरत: ।

संसारसागरातून मला आपण ताराव. हे तारण्याकरता म्हणून काय जरुर आहे ते सांगितलय-

अविनयम् अपनय विष्णो
दमय मन: शमय मृगतृष्णाम्
भूतदयां विस्तारय

चार प्रार्थना केल्या आहेत. प्रथम त्यांनी अविनयं अपनय.

मनामध्ये -सविनय -उध्दटपणा, अहंकार, अभिमान ज्याला आपण समजतो, तो अभिमान आमच्या चित्तामध्ये उत्पन्न होणारा मोठा दोष आहे. तो अगोदर दूर व्हायला पाहिजे. पहिली प्रार्थना आहे. त्याला महत्व आहे. अमानित्व म्हणून जे सांगतात भगवान. अमानित्व, अविनय, अहिंसा, शांती हे सगळे गुण आहेत.

अमानित्व जे आहे निरभिमान वृत्ती होण ज्या अमानित्वाच वर्णन ज्ञानेश्वर महाराजांनी इतक पराकोटीच केलेलेआहे-

पूज्यता डोळा न पहावी।
स्वकिर्ती कानी न ऐकावी।
हा अमूका ऐसा नोहावी।
सेची लोका।।

हे वाटायला पाहिजे. म्हणजे अविनय गेला, अभिमान गेला. कोणीही आपली आठवण करून देणं. हा अमूक एक मनुष्य आहे. समाजामध्ये अशी आठवणसुध्दा देण आपली आठवण काढण्यासारखी परिस्थिती असताना. कोणाला आठवण होत असते. त्या करिता प्रार्थना करा. कोणी विचारणार नाही. पण नको. सगळयांनीही विसरून जाव. याच नाव अमानित्व आहे. निरभिमान वृत्तीही याला म्हणतात. आणि आचार्य महाराजांनाही हीच वृत्ती हवीय.

अविनयं अपनय. अभिमान हा जो मोठा दोष आहे. असुरी संपत्तीमध्ये त्याचे स्थान आहे.

दम्भो दर्पोअभिमानश्च क्रोध:पारुष्यमेव च।
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ सम्पदमासुरीम्।।

ही सगळी असुरी संपत्ती आहे. ह्याला गुण म्हणत नाहीत. दोष आहेत सगळे. तर हा जो अभिमान म्हणून दोष आहे. दुर्योधनाचा अभिमान शेवटपर्यंत होता. म्हणजे स्वत:कडून होणारे दोष याची जाणीवच होत नाही हा अभिमान असल्यामुळे. मी नेहमी उत्तमच वागतो, आमच्या हातून कधीही चुका होत नाहीत, असच वाटत त्याला म्हणून पांडवांना इतका त्रास दिला. शेवटी अगदी त्याचा विनाश झाला. पण शेवटीसुध्दा त्याच मन बदलल नाही.

पांडवांना, धर्मराजाला त्याने सांगितले- आता करा राज्य. युध्दामध्ये आमचा विनाशझाला. म्हणून आम्ही आता स्वर्गलोकाल जाऊन राहाणार आहोत. तुम्ही राज्य करा आता. सगळे लोक गेलेले आहेत. घ्या राज्य. चला आपले बसा दु:ख करीत. हा गेला तो गेला करीत.

पांडवांचा तरी कुठ विजय झाला होता! राज्य मिळाल इतकच. तो अभिमन्यू पूर्वीच युध्दामध्ये मारला गेला. शेवटी अगदी युध्द संपल्यानंतर सगळी मुल मारली ... द्रौपदीची त्या अश्वत्थामाने. म्हणजे विजय मिळाला अस कस म्हणाव! ते त्याने सांगितले काही नाही.

म्हणजे अभिमान त्याचा शेवटपर्यंत त्याचा कायम राहिलेला आहे. शेवटीसुध्दा गेला नाही. समोर इतका विनाश झालेला आहे. सर्वस्व गेलेले आहे. मुल बाळ आप्त इष्ट सर्व गेलेले आहेत तरी काही नाही. पांडवांना दु:ख झालेल आहे. द्रौपदीला जास्तीत जास्त दु:ख झालेल आहे. द्रौपदीही अभिमानी होती. पण ईश्वराच्या सामर्थ्याची तिला जाणीव आहे. कौरवांचा नाश झाला पाहिजे, ज्यांनी माझी विटंबनाकरण्याचा प्रयत्न केला. अन्यायाची चीड आहे. अन्यायाने वागणाऱ्या

कौरव, दु:शासन, दुर्योधन वगैरे सर्वांचा नाश झाला पाहिजे तरच वेणी बांधीन म्हणाली. नाही, सुटलेली वेणी बांधली नाही तिने बारा तेरा वर्षे. तसेच मोकळे केस आहेत.

तर हा अभिमान आहे. पण ईश्वराजवळ तो अभिमान आहे. श्रीकृष्णांनी तिची ईच्छा पूर्ण केली. कृष्णाला शिष्टाईला पाठवण्याच ठरल. धर्मराजानेक सांगितल, तुम्ही एकदा जाऊन त्या दुर्योधनाची समजूत काढा. युध्द नको मला इच्छा नाहीये त्याची. शेवटी द्रौपदीने श्रीकृष्णाची भेट घेऊन सांगितले, तुम्ही संधी करु नका. युध्द होऊ दे. सर्व कौरवांचा नाश झाला पाहिजे. तह करू नका.

तो अभिमान मनामध्ये होता तो पर्यंत ही सगळी तळमळ आहे. कोणीही जिवंत राहू नये. शापच दिला आहे तो एक प्रकारचा. सतीचा शाप। सीतेचा शाप रावणाला लागलेला आहे. सर्वनाश झाला रावणाचा. तोही अभिमानी. सामर्थ्य मिळालेले आहे सर्व. संपत्ती आहे, संतती आहे. दरारा आहे, एकंदर देवादिकांनासुध्दा भीती वाटत आहे. हा खरा मोठेपणा आहे.

एवढा मोठा जरी रावण होता तरी त्याला प्रतिस्पर्धी म्हणजे वानर मंडळी भेटली कि नाही। आणि मानववेषधारी रामलक्ष्मण आले कि नाही। अभिमानामुळे ब्रह्मदेवांच्या जवळ वर मागताना बाकी सगळे देव, गंधर्व, दैत्य, दानव वगैरे कोणाकडूनही मला मरण येऊ नये म्हणून मागितले, रावणाने. मानव माझ काय करणार आहे? मनुष्य माझ्या विरुध्द उठण शक्यच नाही या अभिमानाने ते मागितले. वानर तर काय त्या त्याच्या पलिकडे. पण त्या रूपानेच आणखी त्याचा नाश झालेला आहे.

महिषासुरमर्दिनी जी आणखी झालेली आहे, त्या महिषासुरानेसुध्दा असाच वर मागितला होता. कोणत्याही पुरुषाकडून मला मरण येऊ नये म्हणाला. स्त्री काय करणार आहे? अबला आहे अशीच समजूत आहे. अभिमान। त्यामुळे स्त्री अवतार धारण करून सर्व देवांचे तेज, सर्व देवांच्या शरीरातून निघालेल एकत्रहोऊन ती महालक्ष्मी म्हणजे महिषासुर मर्दिनी उत्पन्न झाली. आणि तिन त्याचा नाश केला. अशी पुष्कळ उदाहरणे आहेत.

आणखी त्या अभिमानी मनुष्याच्या हातून फार अन्याय होतो आहे. त्याचही कल्याण नाही इतरांचही कल्याण नाही. म्हणून पहिली प्रार्थना आचार्य महाराजांनी केली –

अविनयं अपनयं विष्णो

संसारसागरातून आपण तरून जाव अशी इच्छा आहे. त्याकरता हा अविनय गेला पाहिजे. नम्रता। सर्वांच्या बरोबर आणखी नम्रतेने राहाता याव हे आम्हाला शिकवा म्हणताहेत ते भगवान शंकराचार्य महाराज. विष्णु याचा अर्थ भगवान महाविष्णु हा प्रसिध्द आहे. विष्णु म्हणजे सर्वव्यापक हा असा दुसरा अर्थ आहे. सर्व ठिकाणी जो परमात्मा। सद्गुरुही तोच झालेला आहे. अनेक अवताररूपांनीही होणारा तोच आहे. सर्व ठिकाणी राहाणारा तोच.

स्थरचर व्यापूनि अवघा।
तो परमात्मा दशांगुली उरला। म्हणतात

पुरुषसूक्तामध्ये सर्व व्यापी तो आहे अस सांगितलय. सर्व विश्व हे त्याच रूप आहे. आता विश्वात्मके देवे। येणे वाग्यज्ञे तोषावे। शेवटी ज्ञानेश्वर महाराजांची प्रार्थना आहे, कि विश्व हाच देव आहे. विश्वरूपी तो आहे.

मनोवायुरूपा ओंकारस्वरूपा ।
विश्वाचिया रूपा पांडुरंगा ।।

तुकाराम महाराजांनी सांगितलय. ही सगळी ज्ञानी मंडळी. ईश्वराच स्वरूप केवढ आहे, किती मोठ आहे म्हणजे विश्वरूपी तो आहे. सर्व विश्व म्हणजे त्याच स्वरूप आहे. त्यात केवळ मानवच येतील अस नाही. मानव आहेत त्याचप्रमाणे सगळे पशु-पक्षीही त्याचीच स्वरूप आहेत. ही वृत्ती अंत:करणामध्ये उत्पन्न झाल्यामुळे अहंकाराचा काहीही संबंध नाही. म्हणून ती निराभिमान झालेली असते त्यांची वृत्ती. अभिमान कधी पहायला सुध्दा मिळत नाही. तर हा पहिला दोष जर गेला तर आणखी परमेश्वराच्या कृपेने संसार सागरातून तो तरून जातो. त्या करता हे मागण आहे–

तारय संसार सागरत: ।

तर त्याकरता पहिला हा दोष गेला पाहिजे. हे सगळे मानसिक दोष आहेत. शरीराचे नाही मनाचे दोष आहेत.

"दमय मन:" ही दुसरी प्रार्थना आहे. मनाचा निग्रह झाला पाहिजे. कोणत्याही वासना ... मनामध्ये उत्पन्न होऊन उपयोग नाही. शुभ वासना तरी असाव्यात किंवा नाहीत, हा ही एक मोठा प्रश्न आहे. अशुभ वासनेमुळे त्याचही नुकसान आहे इतरांचेही नुकसान आहे. त्याला असुरच म्हटलेल आहे. विषयाकडे नेहमी लक्ष आहे. " विषय भोगप्रदान वृत्ती" त्याला असुर म्हणतात. तर ह्या अशुभ वासना मनामधून गेल्या म्हणजे चांगल आहे. शुभवासना असेनात का. चांगल्या चांगल्या गोष्टी, उत्सव व्हावेत, देवाच अखंड नामस्मरण घडाव, दानधर्म आपल्या हातून घडावा, काही तप कराव, कायिक वाचिक मानसिक, तप कराल, चांगल्या वासना आहेत. ह्या असायला काय हरकत आहे पण ज्ञानी महात्मा जो आहे. उच्च भूमिका. निर्वासन अंत:करण आहे. " सर्व संकल्प संन्यासी " म्हणतात भगवान त्याला. ज्ञानी पुरुष म्हणजे सर्व संकल्प संन्यासी काही नाही. हे अस व्हाव, तस व्हाव, काहीही इच्छा नाही.

पुण्याला सगळी मंडळी आश्रम तयार करायचा आहे. महाराजांना राहायला गावामध्ये पाणी झालय, सगळा चिखल झालेला आहे, ओल झालेली आहे, राहायला जागा नाही. मंडळीही पुष्कळ येतात, पुरत नाही जागा. सर्वांची इच्छा आहे. पण महाराजांच सांगण निराळ. " महाराजांची इच्छा असेल तस होईल" एवढच सांगायचे. महाराजांच्या इच्छेने कृपेन पूर्ण होईल असही म्हणत नाहीत. म्हणजे त्यातही महाराजांच्यावर सोपवायच ना । तुम्ही करा काही हरकत नाही. महाराज कृपा करतील. तुमची इच्छा पूर्ण होईल असेही नाही. त्यांच्या इच्छेप्रमाणे सगळ होईल. काही नाही. संकल्प नाही. परंतु भगवंताने या महात्म्यांना सर्व संकल्प संन्यासी जरी म्हटले असले तरी पुढे वर्णन करतात--

सर्व भूतहितेरत: ।

विरोधी आहे अस वाटेल आपल्याला. सर्व संकल्प संन्यासी जो महात्मा असतो तोच सर्वभूतहितेरत: अशा भूमिकेवर असतो. सर्वही भूतांच हित करायच. नारायणस्वामी महाराजांनी देवीच्या, दत्तात्रेयांच्या आज्ञेप्रमाणे त्या डोंगरावर अरण्यामध्ये जाऊन त्या वाघाच्या पायात मोडलेला काटा काढून त्याला आणखी व्यवस्थित करून सोडले. म्हणजे नुसत्या मानवाच हित नाही. सर्वभूतहितेरत: ।

सर्वसंकल्प संन्यासी मनुष्य आणखी सर्वभूतहितेरत: कसा होऊ शकतो? तोच होऊ शकतो. माझ, माझ मन. किंचित ममता मनामध्ये राहीली तर सर्व भूतांच हित करू शकत नाही. स्वत:च हित पाहून मग त्याला अविरोधीच जेवढ असेल तेवढ कराव, करू शकेल.

तर , सर्वही वासना ज्याच्या मनातून गेलेल्या आहेत. ईश्वराच्या आज्ञेने आपखी ते कार्य पार पडत. त्यामुळे मनामध्ये काहीही अहंकार नाही. कतृत्व नाही. चांगदेवाच हित कराव अशी इच्छा ज्ञानेश्वर महाराजांना आहे. चांगदेवालाही गुरु म्हणून शरण जायचय. पण तो मध्ये अहंकार आहे. मी मोठा आहे. पत्र लिहिताना सुध्दा नमस्कार लिहावा किंवा आशिर्वाद लिहावा या गोंधळात ते पडले. कोरा कागद पाठवून दिला. योगसामर्थ्य, योग सिध्दी किती मिळवल्या आहेत. चौदा वेळामृत्यु परतावून लावलेला आहे. चौदाशे वर्षे राहीले. इतकच नव्हे तर समाधीतून उठल्यानंतर ज्यांना ज्यांना मृत्यु आलेला आहे त्यांनाही ते जिवंत करत. हे सामर्थ्य आहे सगळ. पण "दमय मन:" ही प्रार्थना आचार्य महाराज करताहेत. मनाच दमन झाल पाहिजे. मनामध्ये अशा प्रकारची विरोधी वृत्ती कोणतीही उत्पन्न होऊन उपयोग नाही. अहंकार तर गेलाच पाहिजे. त्याच्याकरता स्वतंत्र वेगळी प्रार्थना आहे.

अहंकार ही मनाचीच वृत्ती आहे. मनाच दमन करा. यात अविनयं, अपनय येऊ शकतात. परंतु त्याच्याकरता स्वतंत्र प्रार्थना आहे. तो अविनय मोठा दोष आहे. तो घालवा आणि मनाचा निग्रह करा. तर ही ती स्थिती आहे. कोणत्याही वासना मनामध्येउत्पन्न होऊन उपयोग नाही. शुभसुध्दा उपयोग नाही. परंतु योगशास्त्र-कारांनी अभ्यास करायची जी पध्दती सांगितली आहे, ती अशी आहे- मनामध्ये शुभ आणि अशुभ दोन्हीही वासना असू नयेत. नेहमी आपखी अशुभ वासना सगळयांच्या मनात सारख्या असतात. चांगल्याही असतात. जरी स्वार्थ असला मनामध्ये, स्वार्थानि सगळयांची वृत्ती होत असली तरी सुध्दा स्वत:ला योग्य समजणारे, स्वत:ला बर म्हणणारे, स्वत:ला मान देणारे लोक आहेत. त्यांच कल्याण व्हाव अशी तरी इच्छा आहे कि नाही त्यांना ! ही काही शुध्द भावना नसते. परंतु आपल्या बरोबर त्यांना ही सुख मिळाव, आपल्याला चांगल म्हणणारे , योग्यसमजणारे त्यांच कल्याण व्हाव ही राजस वृत्ती जरी मनामध्ये असली तरी चांगलच आहे. काही हरकत नाही. मी एकटयानेच तेवढ सुखी व्हाव कोणी सुखी असो अगर नसो अशी भावना नाही.

तर हा वासनाक्षय जो आहे तो मुख्य ममतेचा आहे. मोठी भूमिका आहे. ज्ञान झाल्याच ते चिन्ह आहे. काहीही नाही. सर्वही आणखी ईश्वरशक्तीने सर्वही कार्य चाललेल आहे. हा एक मोठा विश्वास आहे, मोठ ज्ञान आहे. खर ज्ञान. सिध्दांत हा खरा कळलाय. माध्यम आपण होऊ. जीवाच कतृत्व काहीच नाही असा अर्थ नाही. मारुतिराय समुद्र उल्लंघन करुन गेले लंकेला. सीतेचा शोध केला. सीतेला अश्वासन दिल, धीर दिला आणि परत येताना एकटे आले नाहीत. एकटे म्हणजे तसेच आले नाहीत. तेवढच काम करून आले नाहीत. शत्रूची शक्ती काय आहे ती पहाण आपल काम आहे . सांगकाम्या असून उपयोग नाही राजदूत. सांगितले तेवढेच करायचे. नाही. म्हणून रावणाची शक्ती अजमावण्याकरता त्या वनाचा नाश केला. त्याचा एक मुलगा ठार मारला. सैन्य पुष्कळ मारल आहे. धरुन नेल, त्यांना पाहिजेच होत. आणि राजसभेमध्ये गेल्यानंतर " कोण आहेस रे तू " रावणाने विचारल्यावर " मी रामदूत आहे" म्हणून सांगितले. काही नाही. भूमिगत व्हायच नाही, काही नाही. कारण काय भूमिगत व्हायच ! सामर्थ्याची इतकी आणखी खात्री आहे. "रामदूत आहे" म्हणाला आणि "तुझा नाश करण्याकरता लवकरच रामचंद्र येणार आहेत. " त्याला त्याच्या सभेमध्ये त्याच्या मंत्रिमंडळाच्या समक्ष सांगून तिथून निघाले.

तर हा अभिमान आहे कि काय? अभिमान नाहीये.

लोकांनी विसरून जाव मला म्हणजे याचा अर्थ असा आपण केलेल कर्म कदाचित मोठ असल तरी विसरून गेलेले आहेत. त्यावेळेला ते अमानित्व येते. किर्तीसुध्दा नको. किर्तीची सुध्दा इच्छा नाहीये. ते अमानित्व आहे. कोण? करणारा कोण आहे? जीवात्म्याचे कर्तृत्व हे मर्यादित आहे. मान्य करतात. मारुतिरायांनी सांगितल समुद्र उल्लंघन मी करु शकत नाही. माझी शक्ती एवढीच आहे- या झाडावरून त्या झाडावर उडी मारण. समुद्राच उल्लंघन मारुतिने केलेल नाही. रामाचा प्रभाव आहे तो. म्हणजे मोठ काम झाल म्हणजे आपण आहोत ईश्वराच्या वगैरे काही नाही, ही वृत्ती जर मनामध्ये उत्पन्न झाली, माझकर्तृत्व आहे म्हणून ईश्वर अनुकूल आहे म्हणजे यालाच असूर म्हणतात. किती आणखी हिरण्यकश्यपूने तपश्चर्या केली. नुसता उभा राहिलेला आहे. ब्रह्मदेवसुध्दा आश्चर्यचकित झाले. शरीरामध्ये शरीरामध्ये रक्तमांस काहीही शिल्लक राहिलेले नाही. केवळ त्याची तपश्चर्या चाललेली आहे. प्रसन्न झाले. वर दिला. पण कृतज्ञता नाही. आम्ही तपश्चर्या केल्यामुळे ईश्वराने वर दिला. आमची तपश्चर्याही महान आहे. त्यामुळे ईश्वराने वर दिला. म्हणजे ईश्वराने वर दिला त्याच सामर्थ्य हे गौणआहे. ही वृत्ती रहाण त्याला असूर म्हणतात.

मारुतिराय म्हणताहेत. सगळी कर्मह्यांनीच केली. द्रोणागिरी आणलेला आहे. पण हे म्हणतात समुद्र उल्लंघन मी केला नाही. तुमच्या प्रभावाने झालेला आहे. ते नुसत शाब्दिक नाहीये. मनामध्येसुध्दा तो विचार नाही. आपल कर्तृत्व मनातसुध्दा नाही. याला म्हणतात निर्वासन मन. काही नाही. कर्तृत्वाची जाणीवसुध्दा नाही. स्वत:ला स्वत: विसरल्याशिवाय लोकांनीसुध्दा मला विसरून जाव, अस म्हणता येण शक्य नाही. ते शाब्दिक होणार आहे नुसत. त्यातही माझी आठवण ठेवावी म्हणूनच लोकांनी मला विसरून जाव. मी कांग्रेसचा चार आण्याचासुध्दा कार्यकर्ता नाही हे सांगायला कशाला पाहिजे? बाहेर कशाला सांगायच? निवृत्तीही सांगून उपयोगी नाही तोही अभिमान आहे. युध्दातून मी निवृत्त होणार आहे, अर्जुन म्हणाला . हा तुझा अहंकार आहे, म्हणतात भगवान्. ही तुझी दया नाही. मी मोठा आहे, अस तुला वाटतय. मी युध्दामध्ये भाग घेतला तर हे सगळे मरून जातील अस तुला वाटतय. हा तुझा अभिमान आहे. दया कसली ही!

म्हणून "दमय मन: " ही दुसरी प्रार्थना आहे. हे दमन करायच म्हणजे फारच आहे. म्हणजे शास्त्रावर विश्वास आहे. तपश्चर्या होत आहे. कष्ट आपण करतोच आहोत. पण शेवटी आम्ही तप केल म्हणून देवाने वर दिला अशी जर वृत्ती उत्पन्न झाली तर! प्रल्हादजी शेवटपर्यंत सांगताहेत आपल्या गुरूजींना. गुरुजींनी विचारल, कोणी तुला शिकवल? खर सांग. कारण त्या हिरण्यकश्यपूला शंका होती. गुरूजींना त्याने विचारले, तुम्ही गैरहजर असता वाटत शाळेतून वरचेवर. देवाकडचे लोक कोण कुठून कोणत्या वेषाने येत असतील, मुलांचा उव्देग कसा करत असतील. मुलांना आणखी हरिभजन करायला त्यांनी शिकवले आहे. तुमच लक्ष नाही शाळेकडे. असा त्यांनी गुरुजींनी दोष दिला.

मग गुरुजींनी विचारल, कोणी तुला सांगितल हे भजन करायला? तो म्हणाला, कोणी हे सांगितल? मी भजन करीतच नाही. तो अंतर्यामी जो परमात्मा आहे, सर्व व्यापी आहे. विश्वात्मा तो आहे. आत बाहेर सगळीकडे आहे. त्याच्या प्रेरणेने सगळी इंद्रिय काम करतात. मी काहीही करु शकत नाही. इंद्रिये माझी नाहीयेत.

आपुलीया बळे नाही बोलवत
सखा कृपावंत वाचा त्याची

तुकाराम महाराजांनी सांगितलय, तीच सगळ्या इंद्रियांची प्रवृत्ती. कितीही प्रेम केले

मनाने तरी त्याच्या इच्छेने झालेल आहे हीच आणखी वृत्ती शेवटपर्यंत दृढ असल्यामुळे प्रल्हादजी भक्त आहेत, आणि हिरण्यकश्यपू असूर आहे अस म्हणतात.

रावणही शिवभक्त होता. आपली दहा मस्तक तोडली काय! शीरा काढल्या काय, तंतूवाद्य तयार केल काय! गायन केल. उत्तम गवई होता. सर्व रागांच ज्ञान पुष्कळ होत. परंतु मनाच दमन नाहीये. बिभिषणाने सांगितल, मंदोदरीने सांगितल " ही परस्त्री आहे देऊन टाका तुम्ही रामाला. :" पण त्याने सांगितल " आम्ही राक्षस आहोत. सगळया स्त्रिया आमच्या आहेत. परस्त्री कोणतीच नाहीये, आमच्या दृष्टीने. " मुख्य नेताच जर म्हणायला लागला कि सर्व स्त्रिया आमच्याआहेत. वाटेल त्या स्त्रियांना आम्ही आणू शकतो. तसेच अनुयायी! मग समाजाची काय व्यवस्था होईल? त्यामुळे बिभिषणाने त्याला सोडून दिले. आधी ज्येष्ठ बंधू म्हणून वाट पाहिली, प्रार्थना केली, सगळ केल. पण "नाही" अस ज्या वेळेला रावण म्हणायला लागला, "नाही, सीता द्यायची नाही. कारण काय? आम्ही कशाला देऊ? स्त्रिया सगळया आमच्या आहेत." मग बिभिषण म्हणाला, "हा जिवंत राहून उपयोग नाही" आलेला आहे. रामाला शरण आलेला आहे. रामांनीही त्याला आश्रय दिला. मनाच दमन म्हणजे पूर्ण दमन होऊ शकत नाही. ते ईश्वराच्या कृपेन होत. इंद्रियांच्या वृत्ती सगळया आवरण हे मुख्य आहे. अभ्यास सांगितला आहे योगशास्त्रकारांनी. शुभवासना कराव्यात. "सर्वा मुखी मंगल बोलवावे" हे मुद्दाम सांगितले. आणखी तो अभ्यास केला म्हणजे आपोआप अशुभ वासनांची निवृत्ती होते. शुभ वासनाही शांत होतात. ईश्वराच्या कृपेने जे व्हायच ते होत. पण आपली प्रवृत्ती जी आहे ती प्रवृत्ती म्हणजे अंत:करण म्हणजे अहंकार मोडून कर्तृत्व अभिमान वृत्ती बंद झाली पाहिजे. म्हणजे पूर्ण त्याच दमन आहे.

तिसरी प्रार्थना.

शमय विषय मृगतृष्णाम् ।

त्याचा सिध्दांतही ते सांगतात आणि प्रार्थनाही करताहेत. विषयांची इच्छा. विषय मृग तृष्णा म्हणजे तहान लागली पाहिजे . पंचविषयांमध्ये सगळयाचा अंतर्भाव आहे. सगळी सुखसाधन याच्यामध्ये अंतर्भूत आहेत. ही शांत करा. तहान लागली आहे सारखी. कितीही प्रयत्न केले तरी ती ही तहान शांत होत नाही. पण ही मृग तृष्णा आहे. मृगाला तहान लागलेली आहे. पुढ पाणी दिसतय. त्याची तहान लागलेली आहे. ते पाणी पिण्याकरता तो धावतोय उन्हातून सारखा. थोडेसे दूर आणखी किरण पडलेले आहेत तिथे पाणी आहे म्हणून त्याला दिसतय. तिथे गेल्यावर त्याच्यापुढे आणखी पाणी दिसायला लागल. किती धावणार तो! तहान शांत कधी होणार? विषय मिळाले तर शांत व्हायचे ना; म्हणून सगळेही विषय हे स्थिर आहेत. त्याच्यापासून मिळणारे सुखही आपल्याला स्थिर वाटत आहे. मीही अजरामर आहे अशा भावातच सगळ जीवन चाललेल आहे.

एका मनुष्याने एक उत्तम बंगला बांधला. सगळया सोयी वगैरे केल्या. आणि असत मनुष्याला. आम्ही बंगला बांधला आहे. अमुक सोयी केल्या आहेत, इथे देवघर आहे, इथे अमुक आहेअस दाखवतात. त्यालाही तशीच सवय झाली. एका साधु पुरुषाला त्यान आणल. तो आला त्याच्या घरी. त्याला हा सांगायला लागला. मी घर बांधल आहे, असं अस आहे. "बर झाल" साधु पुरुष म्हणाले, हा म्हणाला "नाही यात कमी काय आहे, न्यूनता काय आहे ते तुम्ही सांगा." ते म्हणाले, "मी बोलत नाही. उगीच तुला राग येईल" हा म्हणाला, "नाही, नाही. तुम्ही सांगा मला. म्हणजे त्याप्रमाणे दुरुस्ती करु आपण" साधू म्हणाले, "बघ, विचार कर. या घरात दोन दोष आहेत. हे घर तरी तू असताना नष्ट होईल किंवा तू तरी नष्ट होशिल." ही कशी दुरुस्ती करणार तू?"

त्याला वाटल काही सुचवतील पण काही नाही. ते म्हणाले, कशाला विचारलस जातो मी."

आणि हे खरच आहे। ज्या विषय मृग तृष्णा आचार्य महाराज म्हणतात ते विषय अस्थिर आहेत. ते संपणारे आहेत. त्याच्यामध्ये पुष्कळ संग्रह आहे. तरी पण हा संपणारा आहे. तो मृग जसा पुढ पाणी आहे, पाणी आहे, सुख आहे म्हणून धावतो आहे तसच हे. सगळही अस्थिर आहे. संग्रह हा स्थिर आहे. आणि मीही स्थिर आहे ही फक्त मनोभावना आहे. ही तृष्णा थांबण किंवा थांबवण हे जीवाच्या प्रयत्नांनी काही शक्य नाही. कारण ती तृष्णा वाढतच जाते आहे. हा भ्रम आहे. ती आपली समजूत चुकीची आहे अस कधी वाटतच नाही. मग ती जावी याच्या करता प्रयत्न कसा करायचा? म्हणून आणखी तीही देवाजवळच प्रार्थना आहे. ज्ञानेश्वर महाराजा महाराजांनी ते पसायदान देवाजवळच मागितलय. हे अस करा महाराज तुम्ही. त्या शिवाय आणखी कोणीही प्रयत्नांनी करू शकणार नाही.

आणि "भूतदयां विस्तारे" ही शेवटची प्रार्थना महत्वाची आहे. दया ही जी वृत्ती आहे. दु:ख निवृत्ती व्हावी अशी इच्छा आहे. दु:ख पाहिल्याबरोबर उत्पन्न होत. स्वत:ला झालेल दु:ख- पायात काटा मोडलेला आहे, ताप आलेला आहे, डोक दुखतय. केव्हा बर होईल केव्हा बर होईल? पण त्याच प्रमाणे अ अंत:करण दुसऱ्याशी समरस ज्या वेळेला होईल त्या वेळेला त्याचही दु:ख कमी होईल. त्याचही दु:ख गेल पाहिजे.

प्रल्हादजींना नृसिंह प्रसन्न झाले. काही तरी वर मागून घ्या, म्हणाले. तेव्हा "वर मागण्याकरता मी तुमची भक्ती करत नाही" अस प्रल्हादजी म्हणाले. "एक तर मी भक्ती करतो अशी समजूत असेल, तर त्याच्यात ती निष्काम भक्ती आहे. करतो. काही हरकत नाही."

नामा म्हणे केशवा। केला पण चालली नाही।

तुमच्या कृतीन चालल आहे. करतो मी हरकत नाही. समजायला हरकत नाही. देवाच्या कृपेने हे चाललेल आहे. मी तर काही करीतच नाही, हे ज्ञानच आहे ना? भगवंताची भक्ती मी करीत नाही. त्याच्या कृपेने होते. करविणारा तो आहे. आणि तोच मुख्य असतो. कर्ता हा मुख्य नाही.

तर अंत:करणामध्ये दु:ख पाहिल्याबरोबर दया उत्पन्न होण हे ज्ञानी महात्मे, संत जे आहेत त्यांच कृपाळू हे पहिल लक्षण आहे. भागवतामध्ये तीस लक्षण सांगितली आहेत सत्पुरुष कोणाला म्हणावे? ज्ञानी कोणाला म्हणावे? ते ओळखण्याकरता सगळी लक्षण सांगितली आहेत. ती लक्षणे तपासणाराही तसाच असे पाहिजे. नाहीतर नुसत ही बुवाबाजी आहे म्हणून उपयोग नाही. भगवंतांनी सगळा खुलासा केलेला आहे. कृपाळू पाहिजे. सहनशील पाहिजे. सत्यनिष्ठ पाहिजे. शुध्द चित्ताचा पाहिजे. हे सगळे गुण सांगितले आहेत.

आणि संतसंगतीच्या वेळेला अगोदर काही दिवस राहून त्याची तपासणी करावी, अनुभव घ्यावा. चांगला असेल तर जास्ती श्रध्दा वाढेल. परिक्षा पहाण हा काही दोष नाहीये. स्वत:च जन्माच कल्याण करून घ्यायच त्याकरता तपासून घ्यायला नको काय? अगोदर श्रध्दा उत्पन्न झाली, पुष्कळ झाले. शेवटी सगळ चुकल. अमूक झाल, तमूक झाल, काय करायचय अस म्हणून। त्यापेक्षा आपल आपण कर्तव्य करीत राहण चांगल. ही दया वृत्ती अंत:करणामध्ये उत्पन्न होण फार कठीण आहे.

जे जे भेटले भूत । ते ते मानिजे भगवंत ।

सर्वत्र ईश्वर भावना ज्यांच्या मनामध्ये उत्पन्न झालेली आहे ती नुसती ऐकून वाचून नाहीये. खरोखरच आहे. ईश्वराच कार्य कस चाललेल आहे. जे जे अनुकूल किंवा प्रतिकूल आपल्याला घडते आहे, वाटतय घटना या घडताहेत, त्या आपल्या वृत्ती मुळे उत्पन्न झालेल्या आहेत. दुसरी काही तरी शक्ती आहे. हा विचार करायचा. विचार केल्यानंतर कळून येते. तर अनुकूल परिस्थितीमध्ये सुध्दा त्यांनी सांगितले आहे ना-

दु:खेषु अनुव्दिग्नमन: सुखेषु विगतस्पृह: ।

दोन्ही आहे. संसारामध्ये दु:खही आहे आणि सुखही आहे. विवेकाने साधत हे त्याला त्याला साधलेल आहे.

काही मनाला विवेक नाही. कारण ही जी दु:ख उत्पन्न झालेली आहेत याच कारण जे आहे ते पूर्व कर्म आहे. हा एक सिध्दान्त आहे. तर्कानेही सिध्द होणारा आहे. नुसत शब्द प्रमाण आहे. रामायणांमध्ये व्यासांनी लिहून ठेवलेल आहे. व्यासांनी लिहून ठेवले असल्यामुळे तो तर्क सुध्दा आहे. अकल्पित ज्या घटना घडतात. एकदम पाय घसरून पडला. फ्रॅक्चर झाले. अमूक झाल, तमूक झाल. काय त्याची इच्छा होती कि दुस-या कोणाची हा पडावा अशी इच्छा होती. इच्छा असली तरी त्याने ढकलले आहे का? इच्छा असेल याच एकदा नुकसान व्हाव. वाटत. पण अस काही नसताना एकदम जी दु:ख उत्पन्न होतात त्याला कारण काय? कारणा-शिवाय कार्य होणार नाही हे आधुनिक बुध्दिवाद्यालासुध्दा मान्य होईल. कार्य होण्याला कारण काय आहे? हा काही नास्तिकपणा नाही. चिकित्सा म्हणजे नास्तिकपणा नाहि. बरोबर विचार करावा. कारण काय आहे? हा कारण विचार सुरू केला असताना शास्त्रज्ञ, संत माहात्मे यांच म्हणण अस आहे कि याला जे दु:ख मिळालेले आहे याच याच्याच जवळ कारण आहे. भोजन तयार झालेल आहे. दुसरीकडे ताट वाढून ठेवलेल आहे, दुस-या घरात. इथ बसून याची तृप्ती झाली अस कस शक्य आहे? ज्याला तृप्ती भूक शांत करायची त्यानेच भोजन केल तर भूक शांत होईल. कार्य आणि कारण एका ठिकाणी असल पाहिजे. म्हणून याला जर दु:खभोग आहे तर याच्याच ठिकाणी त्याच कारण आहे. याची कर्म आहेत.

वाढिल्या उव्देग दु:खची केवळ । भोगणे ते फळ संचिताचे ।

तुकाराम महाराजांनी सांगितलय. इयांना काही कळत नव्हत अस म्हणता येत नाही. अत्यंत विचार करून साधू माहात्मे लिहित असतात. बोलत असतात. त्यांनाही बुध्दि आहे. त्यांची बुध्दि फार मोठी आहे.

न मिळो खावया न वाढो संतान । परी हा नारायण कृपा करो ।

तुकाराम महाराजांचा एक अभंग आहे.

विटंबो शरीर होत का विपत्ती । परि राहो चित्ती नारायण ।

किती जगाच्या विरुध्द मागणी आहे ही. कोणी तरी याला मान्यता देईल? तुकाराम महाराजांना काही कळत नव्हते. व्यवहारामध्ये सगळ वाटत. खायला प्यायला पाहिजे. संपत्ती वाढली पाहिजे. त्याच प्रमाणे विपत्ती संकट केव्हांही आमच्यावर येऊ नयेत. मान सन्मान मिळाला पाहिजे.

हे म्हणतात, सगळ मला चालेल. संपत्ती नको. धनधान्य नको. "परि राहो चित्ती" हे एवढे पाहिजे हे जे त्यांनी आपल मनोगत व्यक्त केलेल आहे, लिहून ठेवलेल आहे, प्रसिध्द आहे. यावरून तुकाराम महाराजांना खरोखर व्यवहाराची काही कल्पनाच नव्हती, ते व्यवहारविन्मुख होते असा नाही. तर्क आहेत.

तुका म्हणे सगळे रे नाशवंत। आठवे गोपाळा तेची दृष्य।
शेवटच्या चरणामध्ये त्यांनी त्याच कारण सांगितले आहे. त्या साधूने सांगितले तू तरी जाणार किंवा हे घर तरी जाणार. तेव्हा संपूर्ण नाशवंत गोष्टीची इच्छा बाळगण हा खरा बुध्दिवाद आहे कि केव्हांही ज्याचा नाश होत नाही अशा सच्चिदानंद परमात्म्याच स्मरण राहो, त्याची आठवण रहावी अस मागण, मागण हा खरा बुध्दिवाद आहे. त्यांनी सांगितल आहे उव्देग करून उपयोग नाही. दु:खाच कारण म्हणजे पूर्व कर्म आहे. हा एक तर्क सिध्दांत आहे. आणि कर्म सिध्दि एकदा अशा रितीने तर्काने सिध्द झाल्यानंतर ईश्वराची सिध्दि आपोआप होते. ईश्वर मानावा लागतो.

कर्मामुळे सुख होत दु:ख होत वगैरे समजण, ते कर्म म्हणजे काय? ते अचेतन आहे. ऑफिसमध्ये हा मनुष्य अगदी कधीही रजा घेत नाही. रोज वेळच्या वेळेवर येतो. काम चांगल करतो. असेपर्यंत कधीही कंटाळा करत नाही. आळस नाही. हे त्याच कर्म आहे. त्या क्रीयेमुळे त्याला आणखी प्रमोशन मिळते. पण नुसत्या क्रियेने होत का? तो कसा योग्य वागतो हे पहाणारा त्याच्या वरचा ऑफिसर आहे. तो सचेतन आहे. चेतन कोणीतरी मानल्याशिवाय, कर्माच ज्ञान ज्याला आहे. त्या प्रमाणे कर्माच फळ ज्याला देता येत तो शिफारस करतो याला वरची जागा द्या.

चांगल वागाव जीवांनी चांगल्या वासना कराव्यात. एवढयानेच काम होत नाही. त्याच फळ देणारा ईश्वर आहे. ईश्वराची भक्ती केली पाहीजे. म्हणजे कर्माने सगळ अखंड विश्वास कार्य चाललेल आहे. त्या कर्माचा ज्ञाता तो सर्वज्ञ आहे. त्याच ऑफिस फार मोठ आहे. त्या ईश्वरासंबंधी आणखी त्याची कल्पना, त्याची सिध्दि, तर्क आणि चिकित्सेने मिळते. आपोआप नव्हे.

आणि हा सिध्दांत विचारपूर्वक त्या संतांनी समजून घेतला आणि त्यामुळे ते सुखी झाले. जरी कर्माने मिळाल असल तरी ती कर्म, सुखदु:ख ही जाणारी आहेत. हा एक सिध्दांत आहे. ज्ञानाने धीर येतो किंवा मनाला काहीही दु:ख होत नाही, दु:ख भोगत असताना याच कारण गीतेमध्ये आरंभालाच हा सिध्दांत सांगितलेला आहे.

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुख-दु:खदा:।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत।।

हे फक्त सहन करायच. जाणारीच आहे ती. तेजे धैर्य आहे, तितिक्षा आहे, सहनशक्ती आहे त्यामुळे त्या विचारांनी हेही जाणार आहे. सुखही जाणार आहे आणि दु:खही जाणार आहे. या विचारांनी, या वृत्तीनेसुध्दा मनुष्य सहन करतो. बरा होईन मी. औषध चाललेल आहे. या नुसत्या विचारांनी सुध्दा मनुष्याला समाधान वाटत. वेदना उद्या याच्यापेक्षा कमी होईल. त्या आशेवरच आपण जगत असतो ना! व्यवहारामध्ये समाधान मानतो. तेच समाधान या ठिकाणी विवेकाने विचार करुन मानायला सांगितल आहे. हा संतांचा बुध्दिवाद आहे आणि तशी वृत्ती अंत:करणामध्ये उत्पन्न होण्याकरता म्हणून हा सगळा कर्मविचार. त्यानंतर सर्वज्ञ जो ईश्वर आहे त्या ईश्वरासंबंधी विचार करून त्याच्याबद्दल जर प्रेम निर्माण झाल मनामध्ये तर हा सुखी होऊन राहील.

त्यालाही दुसऱ्याबद्दल ही दया वाटावी लागते. पूर्ण विचार करून ज्यांनी आपल्या कर्माच फळ आपल्याला सुख किंवा दु:ख मिळत तस दुसऱ्यालाही सुख दु:ख मिळते हे एकदा पटल्यानंतर आणखी त्याच्याही सुखदु:खाशी हा समरस होतोच होतो. हा एक अभ्यास आहे.

करता येतो विचारांनी. त्यातही ईश्वराची कृपा, ईश्वरावरती श्रध्दा, विश्वास बसला तर ईश्वराला प्रार्थना केल्यानंतर तो तशी शक्ती आपली करून घेतो.

तर ही "भूतदया विस्तारे" म्हणतात आचार्य महाराज. भूतदया जितकी जितकी वाढेल वाढू दे. हे मागण आहे. काही मागायच नाही. देवाजवळ काही मागायच नाही हे वेगळ आहे. पण ही इच्छा आहे. भूतदया सगळया जगामध्ये वाढवावी. मला एकट्याला भूतदया नको. भूतदयेचा विस्तार झाला पाहिजे. म्हणजे अहंकार कमी झाला पाहिजे. ह्या सगळया एकात एक प्रार्थना आहेत.

मीच मोठा आहे. माझीच सत्ता आहे. माझच सगळया लोकांनी ऐकायला पाहिजे, अस अहंकारी लोकांना वाटत. त्याचा भूतदयेचा काही संबंध येत नाही. मी नियामक आहे. प्रत्येक ठिकाणी आहे. कुटुंबामध्ये काय, गावामध्ये काय, तालुक्यामध्ये, देशामध्ये ही नियामक बुध्दि जी आहे. मी नियामक आहे. हे सगळे नियम्य आहेत. माझ ऐकायला पाहिजे. एखादा रागीट मनुष्य असतो. त्याच ऐकल नाही कि रागावतो. मुलावर रागावण, पत्निवर रागावण, कशान होत हे? नियामक मी आहे. कुटुंब प्रमुख मी आहे. माझ ऐकल पाहिजे हा अभिमान आहे. तो अयोग्य असला तरी हरकत नाही. अयोग्य असला तरी स्वत:बद्दल विचार नाही. दुस-याबद्दल मात्र हे चुकिचे आहे, चुकलेले आहे हे बोलायचे. दुस-याचे फक्त दोष दाखवायचे.

तर हे सगळे दोष बाजूला झाले पाहिजेत. आणि भूतदयेचा विस्तार सगळीकडे झाला पाहिजे. म्हणजे सर्वत्र निरहंकार वृत्ती झाली पाहिजे. मनाच दमन करता आल पाहिजे. हे सगळेही शेवटच्या प्रार्थनेत आहे. ही प्रार्थना करणारे संत माहात्मे अत्यंत विचारपूर्वक प्रार्थना करतात. म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनी–

वर्षत सकळ मंडळी। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।
अनवरत भूमंडळी। भेटो तया भूता।।

ही देवाजवळ प्रार्थना केली आहे. अशा संतांची विवेकसंपन्न पूर्ण तितिक्षा आहे. पूर्ण मनाच दमन आहे. अविनय बिलकुल नाहीये. दया तर, उत्तम दया आहे. काही नाही स्वत:कडे लक्ष नाही.

तर अशा रितीने हे जे गुण आहेत ते सगळे गुण मनामध्ये उत्पन्न होण्याकरीता ईश्वराची प्रार्थना ज्ञानेश्वर महाराजांनी आचार्य महाराजांनी केली आहे. समाजातले सर्व गुण आपल्या एकट्याकरता नाहीत. सर्व समाजामध्ये असणारा अविनय दूर झाला पाहिजे. सामाजिक आहे, प्रार्थना. केवळ व्यक्तिश: नाही. वैय्यक्तिक कार्य सगळे साधुसंत करतात, समाजाच्या उपयोगी पडत नाहीत, अस म्हणतात लोक. काय नुसत अध्यात्मिक! परमार्थ आपल्याकरता आहे. लोकांकरता नाही ही एकदा आक्षेप घेण्याची सवय लागली. ज्ञानेश्वर महाराजांनी सामाजिक कार्य केलय ना! किती ग्रंथ केले! सातशे वर्ष झाली अजून चाललेल आहे.

परवा एका ठिकाणी दर्शन झाल आम्हाला, त्यांच्या पालखीच. एका गावी गेलो होतो. लक्षावधी लोक बरोबर आहेत. दुपारी यायच. कुठ असेल तिथ पाणी प्यायच. व्यवस्थाही तिथील लोक खाण्यापिण्याची करतात. आपल्याबरोबर पीठ वगैरेघेऊन जाणारे लोक लगेच आपल्या चुली मांडतात. दगड मांडतात. करतात. खातात व पुन्हा चालायला लागतात. हे जे चाललेल आहे कार्य स्वत:करता काही नाही किती लोकांना मार्गदर्शन केलेल आहे, सातशे वर्षापूर्वी ते अजून चाललय ना! ग्रंथ रुपाने ज्ञानेश्वरी आहे, अमृतानुभव आहे, चांगदेव पासष्टी आहे. विचार करणारा जो खरा अधिकारी माहात्मा त्याला त्याच महत्त्व समजून येतय.

"एक तरी ओवी अनुभवावी" नामदेव काय सांगतायत. ते त्यांच्या जातीचे आहेत म्हणून सांगतायत. आम्ही त्यांचे महत्त्व ओळखू शकतो काय? इतक कार्य केलेल आहे. लोकांना सन्मार्ग दाखवलेला आहे. आता सभा घेतल्या असतील. काही अमूक प्रसिध्दी करणं म्हणा वर्तमान पत्रात. ते जाऊं दे. त्याची प्रसिध्दी काही काळापुरती असते. जास्तीत जास्त पांच वर्षापुरती होईल. पुन्हा काय? काही नाही. अशी काही स्थिती नाहीये. काही नाही. अखंड चाललेल आहे. त्यांची आज्ञा पालन करायचे.

परंतु एक कल्पना झालीये. संतांनी सर्व राष्ट्राला निष्क्रिय बनवलेले आहे. ज्ञानेश्वर महाराजांवर आक्षेप काय तर इतक्या लहान वयातच ज्ञानेश्वरी का केली? आणखी त्यांनी काही दिवस का राहू नये? म्हणजे हे काही तरी आक्षेप घ्यायची सवयच लागलेली आहे. इतक्या वयात त्यांनी इतक करून ठेवल त्याचा तरी किती उपयोग आपण करुन घेतो? मग ते राहिले असते तर काय केल असत? काय करायच हेच समजत नाही.

निवृत्त होणे हा सुध्दा एक मोठा अधिकार आहे. ते साधत नाहीये. निवृत्त झाल्यानंतरसुध्दा जो अभिमान शिल्लक राहातो. "सेवा निवृत्त सेशन जज्ज" म्हणू एका ठिकाणी पाटी होती. काय उपयोग? सेशनसेसन जज्ज म्हटल्यानंतर सेवानिवृत्त कसा असेल? सेवा निवृत्त झाल्यानंतर तो सेशनजज्ज कसा असू शकेल? परस्पर विरोधी आहे. पण ती पाटी दिसली पाहिजे. नोकरीत असताना ती लावली असली तरी हरकत नाही. पणअसताना लावण्याचे कारणच नव्हत. प्रसिध्दच आहे तो. पाटीने प्रसिध्दी नाहीये. पण ही जी मनोवृत्ती आहे. प्रसिध्दी व्हावी हे सर्व लोकांमध्ये आल पाहिजे.

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात –

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो ।<br>
भूता परस्परे पडो, मैत्र जीवांचे ।

राज शासन करु शकत का? कितीही लष्कर असो, कितीही संपत्ती असो, काहीही असो. नाही होऊ शकत. ती त्या सर्वेश्वराजवळ, विष्णुजवळ, सर्वव्यापक अशा परमेश्वराजवळ, प्रार्थना करतायत. तशाच प्रकारे ईश्वरस्वरूप झालेले माहात्मे, त्यांच्या प्रार्थनेमुळे हे होत आहे.

पंधरा दिवस तरी हा संसार विसरला जात आहे. शरीरही विसरले जात आहे. हे पहायचे आहे. प्रत्यक्ष प्रयोग आहे. ज्ञानेश्वर माऊलींची पालखी आली म्हणजे त्या पुलावर सगळया प्रकारचे लोक येतात. विद्यार्थी येतात, स्त्रियापण येतात, प्रोफेसर येतात. सगळे येतात. काय आहे? ज्ञानेश्वर म्हणजे काय आहे? सातशे वर्षे ज्यांच नाव जे अखंड राहीलेल आहे. नको आम्हाला, काही नको. यश सुध्दा नको. ते खर त्यांनी मनापासून सांगितलय म्हणून त्यांच्या पाठीमागून यश चालत आलेले आहे. त्यांचच यश व्हायला पाहिजे अस देवाला वाटत. यशाकरता प्रयत्न करून यश मिळत नाही. हे सगळ देवांनी माझ्यापासून मिळाव म्हणून सांगितलय दहाव्या अध्यायात. सुख दुःख, यश अपयश तशीच ही सुध्दा प्रार्थना आहे. वैय्यक्तिक प्रार्थना आहे. आणि व्यक्तिशः कार्य केले असा अभिमान असला तरी तो असा असू नये. एका व्यक्तिचे कार्य चालू आहे. सत्कर्म चालू आहे. चांगल आहे. तरीसुध्दा

सर्वेषु सुखिनः संतु । सर्वे संतु निरामयः ......

या प्रार्थनेमध्ये हा स्वत:सुध्दा येतो. कि नाही. कि मला सोडून बाकिच्या सगळयांना सुखी करा म्हणायचय. ते तरी बर दिसेल का? तुकाराम महाराजांनी घरी काही नाही तरी थोड देवाजवळ मागायच. देव वाटेल ते द्यायला तयार आहे. शिवाजीराजांचा नजराणा. नको. घेऊन जा. उचला. काही नाही. विष आहे. आपली मनोवृत्ती खंबीर, कायम राहीली पाहिजे. ईश्वराबद्दलचा विश्वास हा पूर्ण झाला पाहिजे. यत्किंचित कमी होऊ देऊ नये. याला ते जपत आहेत. हा गुण आमच्याजवळ राहाणारा आहे. नाशवंत आहे नजराणा तुमचा. राजे देताहेत. राजाश्रय मिळालाय. ईश्वराचा आश्रय कमी झाली. सुटला. आम्हीच सोडला. ईश्वराला काय? कोणीही मागायला जा. सोडून दिले. पुन्हा गेल. या काही हरकत नाही. त्याला काही अभिमान नाही, काही नाही. इतके दिवस मला विचारले नाही. आता कशाला आलात? अस ईश्वर म्हणत नाही. सर्व समृध्द आहे तो.

तर ते तुकाराम महाराज! एका मळ्यामध्ये गेले म्हणतात. उन्हात जात होते. काही कामधाम केले होते. त्यांनी बिचाऱ्यांनी पुष्कळ ऊस घेतले. मोळी करुन डोक्यावर घेऊन आले दुकानात. गावाच्याजवळ आल्यानंतर सगळी मुल धावत आली. महाराज, आम्हाला एक ऊस द्या. आणि नुसत म्हटल नाही तर एकेक ऊस काढून घेतला त्यांनी. जाऊ दे. काही हरकत नाही. ईश्वररूप आहेत. बाळ म्हणजे ईश्वराची रूप आहेत. ज्ञानी मनुष्याने सुध्दा बालवृत्तीचा अभ्यास करावा. रागव्देश नाही. उभ्याने मलमूत्र विसर्जन करणे याचा अर्थ बाल नाहीये. भांडण होईल मुलांच पण लगेच संपेल. मनांत सुध्दा राहाणार नाही. हा त्यांचा केवढा विनय आहे! कसा त्यांनी मिळवला असेल! कुठ अभ्यास केला असेल. कुठ वाचन केल असेल? काही नाही स्वभावच आहे. तशा वृत्तीने रहावे. ज्ञानी पुरुषाने बालवृत्तीने रहावे असे म्हणतात.

एक ऊस उरलेला आहे. घरी घेऊन आले. बायको त्रासून गेली होती बिचारी. काय एकच ऊस घेऊन आलात. काय त्यांना तोच ऊस मारला असेल, काही झाल असेल ह्याचा अर्थ असा काय की आपल्या घरच्या मुलांना काहीही द्यायच नाही आणि या बाहेरच्या मुलांनाच [illegible] पाहिजे. हा आग्रह म्हणजे दंभ आहे. हे ज्ञान नाही. यांची मुल अशी [illegible] आली असती तरी ह्यांनी नको म्हटले नसते.

ज्ञान कोणत आणि अज्ञान कोणत? अभिनिवेष कोणता आणि ढोंग कोणते हे समजायला पाहिजे. आपल्या लोकांवर गोळीबार करायचा. दुसऱ्या लोकांवर काही नाही. ही काय दया आहे? समबुध्दि आहे? दंभ आहे हा. आपण चांगले आहोत अस त्यांनी म्हणायच.

तर हे ज्ञान आहे. मुल त्यांची आली नाहीत त्यावेळेला त्याला ते काय करणार? "भोगणे ते फळ संचिताचे" म्हणून ते मोकळे झाले. मुलांनाही सुखदु:ख त्यांच्या संचिताने मलाही सुखदु:ख माझ्या संचिताने. काही नाही. मोकळे आहेत ते. म्हणून हेही उपयोगी नाही. "सर्वेषु सुखिन संतु" त्यात आपणाही समावेश मानायला हरकत नाही, आहेच आहे. त्यांची मोठी व्यापक बुध्दि आहे. माहात्मा म्हणतात त्यांना महान आत्मा म्हणजे बुध्दि ज्यांची फार मोठी झालेली आहे. त्यामुळे प्रार्थनासुध्दा त्यांची. त्यात वैय्यक्तिक स्वत:चा अंतर्भाव होतो, परंतु स्वत:ला विसरुन जाऊन केलेली आहे. मनाच मिळाल पाहिजे.

व्यक्तिश: मला . मी सुखी व्हाव अशी इच्छा म्हणजे त्यात दुसरा येऊ शकत नाही. आला तरी तो नुसता दाखविण्यापुरता असतो. आम्ही सगळ्यांकरताही करतो पण मुख्य इच्छा आपल्याकरता असते. ही एवढी वृत्ती गेली. करायच. सर्वामुखी मंगल बोलवावे हे सांगताहेत. त्या सर्वामुखीम्हणजे आपलाही आंतर्भाव आहे. आपणही साधन करायच. साधनेच फळ आपल्यालाही मिळाल पाहिजे. मलाही सर्वांनाही. प्रल्हादजींनी सांगितल, माझ्या एकट्याचा उध्दार करून सर्वांचा उध्दार करावा. त्यात मी आलोच. मला एकट्याला उध्दार करून घेण्याची इच्छा नाही. मी एकटा तुमच्याकडे येणार नाही.

तर अशी त्यांची वृत्ती असते, संतांची, म्हणून त्यांनी सर्वांच कल्याण, विश्वास कल्याण होण्याकरता ही प्रार्थना आचार्य महाराजांनी केलेली आहे. आणि तशीच प्रार्थना --

वर्षत सकळ मंगळी ।ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटो तया भूता ।

ईश्वरनिष्ठांचा समाज एकत्र व्हावा. समाजात ईश्वरनिष्ठांची अनेकांची संगती लाभावी सर्वांना हे काम या ठिकाणी आणखी चालू असल्याच आम्हाला पहायला मिळतय, महाराजांच्या कृपेने. ईश्वरनिष्ठांची मांदीयाळी म्हणजे सिध्द माहात्मे असाच त्याचा अर्थ होतो. साधक जरी असला. ईश्वराबद्दल थोडी जरी श्रध्दा, प्रेम मनामध्ये असल तरी पुरे. हळू हळू होईल. "मोटके निमिष भरी जे" ईश्वराने त्याला जवळ घेतले.

तर ही ईश्वरनिष्ठ मंडळी भेटावीत, ही ज्ञानेश्वर महाराजांची प्रार्थना आहे. इच्छा आहे, संकल्प आहे. सर्व लोकांना अशा ईश्वरनिष्ठांची संगती घडावी. सर्वामुखी मंगल बोलवावे, समर्थ सांगताहेत. आणि त्यांची संगती सर्वांना घडावी. "अविनयं अपनय विष्णो ...... भूतदया विस्तारे" या गुणांची समृध्दि सर्वत्र व्हावी या करता आहे. ही महाराजांची कृपा आहे. संतांच्या संकल्पामध्ये मोठी शक्ती असते. कोणीही व्यक्ति माध्यम असली तरी सुध्दा त्या व्यक्तिच्या भावना, भावनेच कार्य चाललेल असत. कर्तृत्व नाहीये. ईश्वराने हे कराव अस वाटतय आम्हाला? मी करतो अस वाटतय होतय.

पूर्ण ज्ञान आणि पूर्ण शक्ती ईश्वराची आहे. त्या शक्तीने सर्व काही चाललेल आहे. सद्गुरूंची शक्ती आहे. म्हणजे कराव, हे व्हाव अशी इच्छा करण म्हणजेअभिमान नाहीये. आणि हे वैय्यक्तिक कार्य अस होऊ शकत नाही. सर्वांनी हे कराव यात आपल्या बरोबरही घडाव, साधकावस्था आपल्याला यावी, सर्वांना यावी आणि साध्य म्हणजे सिध्दावस्था सर्वांना मिळावी, ही प्रथमपासून शेवटपर्यंत आणखी समुदाय समष्टीत उपासना आहे. ह्या समष्टीच्या उपासनेत स्वत:चाही अंतर्भाव आहे. त्यात काही अनमान वगैरे नाही.

ज्ञानेश्वर महाराजांची प्रार्थना आजही सफळ होत आहे. सातशे वर्षापूर्वी त्यांनी प्रार्थना केली आणि ती आजही सफल होते आहे. त्यांचा संकल्प आहे. तर ही समृध्दि राहीली पाहिजे. समाजाला पूर्ण सुख आणि शांति मिळवण्याकरता हेच मुख्य साधन आहे. ईश्वराशी संबंध जोडला गेला पाहिजे. तो तुटलेला आहे. अनेक जन्मांचा आहे. ईश्वर आहे. कर्तृत्व अभिमानामुळे चांगल कामसुध्दा मीच केल अस समजतात.

स्वराज्य मिळाल्यानंतर, दोन महिने आम्ही तुरुंगात जाऊन आलेलो आहोत, अर्ज केल्या बरोबर पाचशे रुपये पेन्शन सुरु होतय. हा कर्मयोग आहे कि काय म्हणायच याला!

अशी ही वृत्ती एकंदर वाढली पाहिजे. हे संतांच्या डोळ्यापुढे आहे. त्यांना ही समाजाची सुधारणा अशी व्हायला पाहिजे. अंतरंगापासून सुधारणा व्हावी. बाहेर संपत्ति मिळण, सत्ता मिळण, काही अधिकार मिळण यात काही महत्त्व नाहीये. समाधान नाहीये. तेव्हां अशा रीतीने महाराजांच्या कृपेने, परमेश्वराच्या कृपेने सर्वत्र अशा प्रकारच हे सत्कर्म व्हाव. "सत्कर्म योगे वय घालवावे" एका व्यक्तीला उपदेश नाही. सगळ्यांना आहे. सर्वांनी सत्कर्म करीत राहाव. ईश्वराच अखंड नामस्मरण, चिंतन रहाव म्हणजे मनाची सर्व सुधारणा होते. भूतदया विस्तारे याचच ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. "भूता परस्परे पडो मैत्रजीवाचे" सगळ्या लोकांच्या मनामध्ये दया उत्पन्न झाली पाहिजे. म्हणजे सगळ्याची परस्परांशी जीवाभावाची मैत्री उत्पन्न झाली पाहिजे. अस स्पष्टीकरण ज्ञानेश्वर महाराज देतात. तर हे असे दिव्य गुण समजले पाहिजेत. हे गुण आहेत म्हणून समजले पाहिजेत. गुणांना दोष समजण्याची जी वृत्ती आहे ती असुरी वृत्ती आहे. गुणसुध्दा दोष दिसता कामा नयेत. संतांनी सांगितलेल सगळ चुकीच आहे. काही त्यात अर्थ नाही. चंद्रावर लोक गेलेले आहेत आता. काय करायचय आळंदी व पंढरपूर करुन. असे विचार मनामध्ये येतात. संत जे सांगताहेत ते अनुभवाने सांगताहेत. त्यांना पूर्ण ज्ञान आहे. आणखी स्वत: आपण सांगतो याचही स्मरण नाही काही नाही. आपला मानसन्मान व्हावा याचीही त्यांना इच्छा नाही. सर्व समाजाला, सर्व जीवांना उपकारक, वृत्तीला उपकारक अशा प्रकारच संतांच सांगण असत. त्या संत वचनावर, ईश्वर आज्ञारुप शास्त्रवचनावर पूर्ण विश्वास ठेवून त्यांच्या सांगण्याप्रमाणे आपल साधन व्हाव हीच परमेश्वराची, सद्‌गुरुंची कृपा ही सर्वांच्या वरती अशीच अखंड रहावी एवढीच आणखी गुरुमहाराजांच्या जवळ प्रार्थना.

।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ।।

-:-:-:-:-:-

# अनुक्रमणिका - २

## खंड ३ रा


| प्रवचन क्रमांक | पृष्ठ क्रमांक | स्थान | विषय |
|---|---|---|---|
| 13 | 96 – 107 | रत्नागिरी डिसेंबर 1986 | श्रीमद् भगवद् गीतेतील बुद्धितत्व विचार |
| 14 | 108 – 118 | मुलुंड 27 डिसेंबर 1986 | समर्थांची शिकवण - उपासनेला दृढ चालवावे ---- |
| 15 | 119 – 134 | बडोदा | भगवद् गीता व भागवत यामध्ये वर्णिलेले ईश्वराचे स्वरूप |
| 16 | 135 – 155 | रत्नागिरी | श्रीमद् भगवद् गीतेतील बुद्धि तत्वविचार |
| 17 | 156 – 169 | चेंबूर २६ जानेवारी 1987 | व्यावहारिक व पारमार्थिक जीवन जगण्यासाठी महाभारतात व आचार्यांनी केलेला उपदेश, मार्गदर्शन |

//श्री गुरुदेव दत्त//

दत्तात्रेय महामाय वेदगेय हतामय ।
अनसूया त्रितनय ममापायं निवारय ।।

श्री दत्तात्रेयांची परंपरा, विशेषत: जी महाराष्ट्रामध्ये चालू आहे, इतरत्रही आहे. मूळ दत्तात्रेयांचे अर्चन वगैरे, त्या संबंधी काही विषय मांडायचा आहे. गुरु चरित्र हा जो ग्रंथ महाराष्ट्र भाषेमध्ये एका कर्नाटकी भक्ताने प्रसिध्द केला आहे.

गाणगापूर येथे नृसिंह सरस्वती महाराज जाऊन राहीले. विदर्भ प्रांतातल्या कारंज्याला त्यांचा जन्म झाला. अवतार झाला. आणि नंतर संन्यास दीक्षा धारण करुन फिरत फिरत पुढे गाणगापुरात येऊन ते शेवटी राहीले, आणि त्यांचे चरित्र नंतर लिहिले गेलेले आहे.

त्या चरित्रामध्ये काही भाग आहे. शास्त्रीय भाग आहे. कर्मयोग, ज्ञानयोग, अष्टांगयोग असे जे आपले भारतीय योग म्हणजे उपाय ज्याला म्हणतात, साधन म्हणतात अशी साधन, असे उपाय भारतामध्ये प्रसिध्द आहेत. त्याच्याबद्दल शास्त्रीय ग्रंथही निर्माण झालेले आहेत. संतांचेही पुष्कळ ग्रंथ त्याच्यावर आहेत. ज्ञानेश्वरी, तुकाराम महाराजांची गाथा आहे. भागवत.

या सर्व ग्रंथामध्ये-दासबोधामध्ये सुध्दा - या सर्वही उपायांचे स्पष्टीकरण केलेले आहे, त्या संत माहात्म्यांनी. त्यांनी जो जन्मभर अभ्यास केलेला आहे, आणखी इश्वराची उपासना केली आहे. हा जो अभ्यास केला. त्या अभ्यासामुळे त्यांच्या बुध्दिमध्ये जो प्रकाश झालेला आहे, तो बुध्दिमध्ये झालेला प्रकाश ग्रंथरुपाने त्यांनी लोकांच्या पुढे मांडलेला आहे.

प्राचीन सर्वही महर्षी तपस्या करण्यामध्ये निमग्न झालेले - त्यांच्या चरित्रा वरुन आमल्याला कळत आहे. वेदशास्त्र म्हणून जे वाङ्मय आहे आपल्या भारतामध्ये आणि त्याची परंपरा आत्तापर्यंत आहे. अल्प प्रमाणांत राहीली आहे आत्ता. उपनयन झाल्याबरोबर वेदाध्ययन करणारी मंडळी होती पूर्वी. ब्राम्हण असो, क्षत्रिय असो, वैश्य असो. सर्वही मंडळी आणखी वेदाभ्यास करणारी होती, शास्त्राभ्यास करणारी होती. गुरुकडे असायची. मोठ्या मोठ्या ऋषिंचे आश्रम अरण्यांत असायचे. आणि त्या आश्रमामध्ये समाजातली ही सगळीही मुलं, विद्यार्थी तिथे जाऊन राहात होते. कुलपति म्हणून त्या वेळेला जे मोठे मोठे महर्षि असायचे, कुलपति म्हणजे नेमणूक झालेली नाही. सध्याचे कुलपति नेमणूकीने असतात. परंतु दहा हजार विद्यार्थ्यांची बुध्दि, त्यांचे शरीर, सर्वही आणखी सुरक्षित ठेवणं, त्यांच्या बुध्दिला अनुसरुन त्यांना मार्गदर्शन करणं, विद्याभ्यास शिकवणं हे सामर्थ्य ज्याला आहे तोच कुलपति होउ शके. असे मोठे मोठे ज्ञानी महात्मे होते.

आणि हे समाजाचे कार्य आहे. ज्ञानार्जन होण्यासाठी आपल्या शास्त्रकारांनी ब्रम्हचर्याश्रम सांगून ठेवलेला आहे. त्या ब्रम्हचर्याश्रमामध्ये ब्रम्हचर्य पालन करुन, गुरु सेवा करुन त्यांच्यापासून ज्ञान मिळवावयाच आहे. सर्व प्रकारच ज्ञान। ते ज्ञान मिळवावयाच आणि विद्याभ्यास संपल्यानंतर मग अधिक संशोधन करणं, अधिक ज्ञान मिळवणं. ज्ञानाला अंत नाही, समाप्ती नाही. त्याकरता प्रयत्न करणारी काही मंडळी ही आपली स्वतंत्र केवळ ज्ञानार्जन यावज्जन्म करण्यामध्ये आपला काळ घालवतात. काही ज्ञान संपन्न, ज्ञान संग्रह केलेली मंडळी समाजामध्ये जाऊन समाजाला योग्य मार्गदर्शन करीत असतात.

पूर्वी राजसत्ता होती. परंतु राजा ही काही एक व्यक्ती नव्हती. एक व्यक्तीच्य हातात सत्ता असा त्याचा अर्थ नाहीये. त्यांचही मंत्रीमंडळ असायच. ही जी सगळी ऋषी मंडळी असायची, त्यांच मंडळ हे त्या राजाला अर्थ शास्त्र काय, त्याचप्रमाणे धर्म शास्त्र, एकंदर सर्वही समाज व्यवहारामध्ये राजाच कर्तव्य काय आहे हे त्याला समजावून सांगून ख्खाद्या वेळी राजाचा संयम राहीला नाही तर त्याला शासनही करण्याच सामर्थ्य त्या ऋषिमंडळींच्या जवळ होत. दुसरा राजा नियुक्त करायचा. तो काढून टाकून म्हणा.

तर अशा प्रकारची ही ज्ञान परंपरा ही आपल्या भारतामध्ये मुख्य आहे. प्राचीन सगळी शास्त्र म्हणजे ज्ञानाकरताच आहेत. वेगळे वेगळे विभाग सगळे त्याच्यामध्ये आहेत. जन्माला आलेला जो मनुष्य आहे, मनुष्याकरता हे सगळ ज्ञान आहे. ज्ञानाचा उपयोग करून घेणारी बुध्दिही मनुष्याच्या जवळ आहे. इतर आणखी प्राणी जे आहेत-पशुपक्षी वगैरे-त्यांच्यामध्ये काही ही अशी बुध्दि नाहीये. "अंत:करण तत्व" म्हणून जे आहे हे "बुध्दि तत्व" हे फक्त मानवाच्या जवळ आणखी ईश्वरानी निसर्गत:च प्रगत असलेल विशेष शक्ती, ज्याच्यामध्ये ठेवलेली आहे असं बुध्दितत्व मनुष्याला मिळालेले आहे.

आणि त्या बुध्दिच्या व्दाराने, माध्यमाने सर्वही एकंदर जीवन हे आपल सुखी करायच आहे. हा बुध्दिवाद आहे. प्राचीन शास्त्रज्ञांच्या समवेत हा बुध्दिवाद आहे. बुध्दिवाद श्रेष्ठ आहे असं तेही मानतात. बुध्दि तत्व हे अत्यंत श्रेष्ठ आहे. बुध्दिनेच सर्व व्यवहार किंवा परमार्थ जी जी काही क्षेत्रं आहेत तो योग्य निर्णय करण्याची शक्ती बुध्दिमध्येच आहे. हे त्यांनाही मान्य आहे.

परंतु केवळ बुध्दिवाद घ्यायचा का त्याच्या जोडीला आणखी काही पाहिजे? जरूर आहे? इतकाच आणखी विचार विषय आहे. आधुनिक बुध्दिवाद आहेच आहे. विज्ञान म्हणा. चंद्रापर्यंत लोक गेलेले आहेत. जाऊन आलेले आहेत. संशोधन चाललेल आहे संशोधन क्षेत्र म्हणजे बुध्दिचच क्षेत्र आहे. त्या बुध्दिने सर्व निर्णय करता येतो हे त्यांनी दाखीवलय आत्ता. तसच पूर्वी सुध्दा बुध्दिने निर्णय करावा हे मान्य आहे. परंतु ती बुध्दि जी आहे ती संस्कृत बुध्दि पाहिजे. संस्कृत बुध्दि असली पाहिजे, हे त्यांच म्हणणं आहे. संस्कार बुध्दिवरती करून त्या बुध्दिचा वापर करावा. तर तो निर्णय हा वैयक्तिक, सामुदायिक हितसाधक होतो.

संस्कार शब्दाचा अर्थ शंकराचार्य महाराजांनी केलेला आहे —

संस्कारोहि दोषापनयनम् गुणाधान नाम ।।

बुध्दिमध्ये असलेले जे दोष आहेत ते बाजूला करण, निर्दोष बुध्दि करण. आणि विशिष्ट गुणसंपत्ती जी आहे त्या गुण संपत्तीचा आधार त्या बुध्दिमध्ये करणे, त्या बुध्दि मध्ये निर्माण करणं अशी बुध्दि म्हणजे संस्कृत बुध्दि.।

आणि या संस्कृत बुध्दिने सर्वही निर्णय करता येतात. कालिदासांनी सांगितलं∠"धि" मान जे आहेत, निर्दोष आणि गुणी बुध्दि ज्यांनी कमावलेली आहे, मिळवलेली आहे, असा बुध्दिविकास ज्यांनी करून घेतलेला आहे त्या बुध्दिमान पुरूषांना कोणतही अविषय नाही. चंद्रावर काय कुठेही जाऊ शकेल. त्या बुध्दिने सर्वही ज्ञान हे संपादन करता येत वाढिवता येत. सर्व कार्य-वैय्यक्तिक जीवन काय सामुदायिक जीवन काय-सर्व ही आणखी सुव्यवस्थित करण्याच सामर्थ्य त्या बुध्दि मध्ये निर्माण होऊ शकत.

∠ न खलुं कश्चित् धिमताम् अविषयो नाम ।।

3/...

तर बुद्धिमध्ये कोणते कोणते दोष आहेत हे बुद्धिनेच समजून घेता आल तर हरकत नाही, चांगल आहे. पण तस सहसा होत नाही. समर्थांना मनोबोध त्या करता करावा लागला. मन किंवा बुद्धि हे स्वभावत: चांगल आहे. उपनिषदामध्ये मन जे निर्माण झालेले आहे त्या पंचभूतांच्या सत्वांशापासून अंत:करण मन किंवा बुद्धि हे त्यापासून झालेल आहे. शुद्ध सत्वापासून झालेल आहे. चांगल आहे. " मना सज्जना" म्हणून संबोधन केलेल आहे. मन हे सज्जन आहे. पण काही संगतीमुळे,

संसर्गजा दोष गुणं भवन्ति "

दोष किंवा गुण हे संसर्गापासून उत्पन्न होतात. तो दोष संसर्ग ठेवायचा कि गुण संसर्ग ठेवायचा, हा विचार ज्या बुद्धिला करता येत असेल त्यांनी स्वत: विचार करायला हवा. परंतु दोषांचा संसर्ग ठेवायचा कि गुणांचा संसर्ग ठेवायचा हे आपल्याला बुद्धिने कळू शकत नाही.

देवांनाही मार्गदर्शन करणारे बृहस्पति आहे. दैत्यांना मार्गदर्शन करणारे शुक्राचार्य आहेत. ही सर्व ज्ञानी मंडळी आहेत. संयमी मंडळी आहेत. भारताचा संयम हा मोठा गुण आहे. संयमाला प्राधान्या आहे. जरी पुष्कळ पराक्रमी असला तरी संयम जर नसेल, क्षमा ज्याला म्हणतात, तो संयम जास्तीत जास्त वाढवण्याचा प्रयत्न भारता मध्ये या तपस्वी पुरुषांनी, ऋषि मंडळींनी केला आहे. संयमाचा अर्थ क्रोध कमी किंवा अजिबात नसावा असा नाही. अगदी पूर्ण ज्ञानी जो मनुष्य आहे, त्या ज्ञान भूमिकेवर गेलेला जो आहे. त्याच्याजवळ कसे विकार ! निर्विकार चित्त झालेल आहे. कोणचाही क्रोध नाही लोभ नाही. अहंकार नाही. कोणचाही विकार ज्याच्या चित्तामध्ये नाही आनंद पूर्ण अस मन आहे. शुद्ध मन आहे.

परंतु व्यवहारामध्ये असणारे जे लोक आहेत, द्वंद्वातीत अवस्था ही शेवटची आहे. त्या अवस्थेला पोहोचे पर्यंत द्वंद्वातच राहून आपल्याला साधना वगैरे जी करायची ती करायची. संसार चांगला व्हावा. पारमार्थिकही काही कल्याण आहे. त्याचाही विचार करावा. हे सगळ आणखी द्वंद्वात राहूनच करायचय. कुठही घरदार सोडून जाऊन होत असा अर्थ नाही.

त्या करता आपल्या गुणदोषांचा विचार करावा. जास्तीत जास्त दोष आपल्या बुद्धिमध्ये असतात. वाटत मात्र आपल्याला माझ्याजवळ गुण जास्ती आहेत. दोष नाहीत, दोष कमी आहेत. इतकच नाही तर दोष नाहीच आहेत माझ्या जवळ कधीही आम्ही चुकत नाही, अस मोठे मोठे लोक सांगतात. आमच्या हातून चूक कधीच घडत नाही.

तर ही जिथ स्थिती आहे ! अशा अवस्थेत बुद्धितत्व आहे, मन जो पर्यंत आहे तो पर्यंत त्या मनाला स्वत:च्या गुणदोषांचा किंवा इतरांच्या गुणदोषांचा विचार करायचा अधिकार तरी कसा असेल ? आणि तो झालेला विचार बरोबर तरी होतो कि नाही, हे कसं समजायच ?

म्हणून निर्विकार ज्यांच चित्त झालेल आहे. अशा प्रकारचे जे महात्मे आहेत अथवा अशा प्रकारच वाङ्मय असेल- निर्विकार ! ज्याच्या मध्ये काहीही आणखी विकार नाहीये.

नाही श्रुति परौति माऊली जगा ।

ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत. वेद म्हणजे माऊली आहे. हिताचा मार्ग दाखवणार ते शब्द प्रमाण आहे. त्या शब्दप्रमाण असणा-या वेदांमध्ये शास्त्रामध्ये सर्वही विचार केलेला आहे.

जीवाच्या समोर दोन मार्ग आहेत. उद्देश दोन आहेत. एक अभ्युदय आणि निश्रेयस. शास्त्रामध्ये सांगितले आहे. अभ्युदय म्हणजे आपला संसार. संसारामध्ये आणखी किती आपला विकास करुन घेता येतो ह्याची कल्पनाही आपल्याला नाहीये. सुखाची मीमांसा जी उपनिषदामध्ये केलेली आहे - मानुषानंद आहे. देवांचा आनंद आहे, गधँवाचा आनंद आहे, इंद्राचा आनंद आहे, बृहस्पतिचा आनंद आहे. ही आनंद मीमांसा सुखाची मीमांसा उपनिषदामध्ये केलेली आहे. त्रैत्तिरीय उपनिषदामध्ये . एका पेक्षा एक शतपटीने असलेले हे आनंद आहेत. अर्थात त्या त्या सुखाची साधन ही तशीच असली पाहिजेत.

अभ्युदयाची ही कल्पना आधुनिक बुध्दिवादामध्ये नाहीये. ही जी कल्पना केली गेलेली आहे, हे जे काही विचार मांडले गेलेले आहेत ते प्राचीन ग्रंथात उपनिषद् भागात दाखवले गेलेले आहेत. तर या अभ्युदयाकड प्रवृत्ती असण निसर्गत:च आहे. सर्वांची प्रवृत्ती आपण जास्तीत जास्त अभ्युदय करावा अशीच असते. उन्नती व्हावी.. उन्नती कोणची हे आपण आपल्या मनाने ठरवू शकत नाही ना। कशी उन्नती असावी। उन्नती शब्दाचा अर्थ काय करायचा ? हेच पुष्कळ वेळा कळत नाही. सुख म्हणजे काय हे समजू शकत नाहीये. सर्वही साधन सामुग्री किंवा धन ज्याला म्हणतो. धन हे सुख आहे किंवा सुखाच साधन आहे. पण त्या उपनिषदामध्ये सुखाचा विचार मांडताना प्रत्येक वेळेला त्यांनी सांगितल आहे. शतपटीन एकेक आनंद सांगत सांगत ते गेले. आणि प्रत्येक ठिकाणी अकाम हर जो श्रोत्रीय आहे त्याला हा आनंद आहे. सर्व वेदशास्त्राच पूर्ण ज्ञान ज्याने मिळवलेल आहे. ते ज्ञान बुध्दिने मिळविता येत. शब्दज्ञान का असे ना.

शब्दज्ञानाला नांव ठेवतात लोक, काय नुसत शाब्दिक आहे म्हणतात. शाब्दीक सुध्दा उपयोग होतो ना।

नैनं छिदन्ति शस्त्राणि
नैनं दहति पावक: ।

आत्मस्वरुपाच वर्णन भगवंतांनी गीतेमध्ये केलेले आहे. गीतेच पठण करणारे, गीतेवर विश्वास ठेवणारे क्रांतिकारक फाशी देण्याकरता नेताना सुध्दा आनंदात होते.

नैनं छिदन्ति शस्त्राणि
नैनं दहति पावक: ।

आम्ही मरु शकत नाही. आम्हाला मृत्यु नाहीये. शब्दज्ञान आहे. प्रत्यक्ष त्यांना कळल अस नाहीये. परंतु त्या शब्दावर विश्वास आहे आणि भगवंतांचा तो शब्द आहे अर्थात आम्ही अमर आहोत. आम्हाला मृत्यु नाहीये. ह्या विश्वासाने फाशी गेलेले लोक आहेत.

शाब्दज्ञान. त्याचाही उपयोग होतो. चांगल झाल पाहिजे मात्र. व्यवस्थित ज्ञान झाल पाहिजे. यथार्थ ज्ञान झाल पाहिजे. ते जे ज्ञान आहे. शब्द ज्ञान आणखी संपादन करण्याचा प्रयत्न करणारे पुष्कळ आहेत.

आणि दुसरा विभाग त्यांनी दाखवला आहे--

आत्यन्तिक दु:ख निवृत्ती : ।

ह्याला मोक्ष असे नांव आहे शास्त्रामध्ये. अनेक अर्थ आहेत मोक्षाचे. संस्कृत शब्द आहे तो. पारिभाषिक शब्द आहे. शास्त्रीय शब्द आहे. दु:खाची पूर्ण निवृत्ती. आत्यंतिक

पुन्हा दु:ख कधीही न होणे. संपूर्ण दु:खाचा विनाश हा मोक्षप्रद आहे. दु:ख संपला म्हणजे पुन्हा कधीही दु:ख उत्पन्न होणं. तात्कालीक दु:खाची निवृत्ती तात्कालिक उपायांनी इथं होती आहे. आजारी आपण पडलो. निरनिराळ्या प्रकारचे रोग आहेत. काही निदान होत नाही. पण पुष्कळ असे रोग निवृत्त होतात. जातात. परंतु ती दु:खनिवृत्ती ही कायमची नाहीये. पुन्हा दु:खं उत्पन्न होत. पुन्हा काही आणखी शारीरिक दु:ख, व्याधि, रोग वगैरे ज्याला आपण म्हणतो ती पुन्हा पुन्हा उत्पन्न होतात. मानसिक तर दु:खं आहेतच. आपली जी मनाची धारणा आहे त्या धारणेप्रमाणे जर अनुकूल परिस्थिती आली नाही, जी मंडळी जवळची असतील त्यांच्या कडून अनुकूलता आपल्याला लाभली नाही. आपल्या मनासारखं झालं नाही तर दु:खच आहे. मनाला काही बर वाटत नाही. तर ही जी अशी दु:ख परंपरा आहे, ही सर्वही दु:खाची निवृत्ती होऊ शकते असं शास्त्रकार सांगतात. अनुभवी जे लोक आहेत, तशी दु:ख निवृत्ती ज्यांनी मिळवली आहे, तेही सांगतात. काही नाही. दु:ख नाही, काही नाही. " चित्ती असू द्यावे समाधान" म्हणून जे सांगणारे महात्मे आहेत ते समाधान आणखी ज्याला मिळवता आलेले आहे, राखता आलेले आहे, कशाने परिस्थिती निर्माण केलेली आहे ? त्या करता बुध्दिमध्ये वेगवेगळी साधन शास्त्रकारांनी सांगितली आहेत. त्या आणखी शास्त्रीय साधनांचा अवलंब करून समाधान स्थिती कायम ठेवणारी जी मंडळी आहेत. असं त्यांचही सांगणं आहे, कि दु:ख आम्हाला नाहीत.

आम्हाला अनुभव नाहीये. काही ना काही तरी कोणच ना कोणच तरी दु:ख आमच्या वाट्याला आलेले असत. त्यामुळे दु:ख निवृत्ती कायमची अशी अवस्थाच असू शकणार नाही. असंभव आहे. प्रमेय असंभावना हा मोठा दोष आहे. ईश्वर नाहीच. असंभावना हा मोठा दोष आहे. ईश्वर नाहीच आहे. पापपुण्य काहीच नाही. पण ते तरी पक्के आहे कि नाही कोणास ठाऊक.

गुण्यांची गोष्ट सांगतात, गुणं मोठे होते. टिळकांचे गुरू म्हणा कोणी तरी. काही नाही. ईश्वर नाही काही नाही. लोकमान्य कि कोणी तिथे गेले तेव्हा ते तिथे विष्णुसहस्त्रनाम वाचत होते. त्यांनी विचारलं, तुम्ही जर ईश्वर वगैरे काही मानत नाही मग विष्णुसहस्त्रनाम कशाला वाचता ? ते म्हणाले, खरं आहे. मला मान्य नाही. पण जर ईश्वर असला तर ? म्हणून म्हणतो म्हणाले.

तर ही जी प्रमेयाची असंभावना आहे. ती बुध्दिचा स्वभाव आहे. पटत नाही म्हणतो आपण. न पटणे म्हणजेच असंभावना. जिज्ञासा बुध्दिमध्ये त्यामुळे राहू शकत नाही. प्रत्येक प्रमेय, कोणचही शास्त्राने किंवा शब्दप्रमाणाने सांगितलेलं प्रमेय, हे नाहीये शक्य नाही. असंभवनीय आहे असच जर बुध्दिला वाटायला लागलं तर जिज्ञासा संपली. जिज्ञासा एक मोठा गुण आहे. काय आहे ते पाहू या तरी. त्याच ज्ञान मिळवू या. ज्ञानाची साधन आहेत. ज्ञान होऊ शकतं. प्रमाण जर नसेल तर प्रमेय नाही असं म्हणावं. प्रमाण जर आहे तर ह्या प्रमाणांचा विचार केला पाहिजे. म्हणजे प्रमेय समजून घेता येतं. बुध्दिमध्ये जिज्ञासा असणं हा मोठा गुण आहे. ती जिज्ञासा आमची, आता स्वराज्य मिळाल्यानंतर असे म्हणायला हरकत नाही कमी कमी होत चालली आहे. सर्वही एकंदर जे काही वाङमय आहे, प्राचीन वाङ्मय. स्मृती ग्रंथ आहेत. सगळ्या ऋषिंनी विचार करून आणखी प्रत्येकाची कर्तव्य कर्म सांगून ठेवलेली आहेत. ते राहूं दे. धर्मशास्त्राचा विषय राहू दे. रामायण महाभारता सारखे ग्रंथ आहेत. इतिहास ग्रंथ आहेत मोठे मोठे. परंतु त्याचाही अभ्यास कुठं होतो आहे? शंकराचार्यांच्या सभेमध्ये आंध्र, मद्रास प्रांतातले मंत्री आपल्या भाषणामध्ये शंकराचार्यांचे श्लोक म्हणायचे. अर्थात त्यांनी अभ्यास केलेला आहे. मंत्री असला तरी जिज्ञासा असू नये असा अर्थ नाही.

जिज्ञासा जिथं नाही तिथं काहीच नाही. सगळच असंभवनीय आहे असं म्हणून टाकून दिलेले आहे. त्याचा विचारच कधी केलेला नाही. म्हणून मोक्ष ज्याला म्हटलं आहे शास्त्रकारांनी तो एक आहे. ते एक फल आहे. उद्दीष्ट आहे. ध्येय आहे. तेही ध्येय आणखी दाखवून दिलेले आहे. ते असू शकेल कि नाही ? त्याची साधन काय आहेत ? त्याचा जिज्ञासा असेल तर विचार होऊ शकतो. तो विचार केल्यानंतर त्याच ज्ञान होऊ शकत. त्याची प्राप्ती करून घेण्याकरता अधिक अधिक जर ज्याचा विचार सुरु केला - संशोधन ज्याला आपण म्हणतो - तर त्याची प्राप्ती होऊ शकते.

तर अशा रीतीने हे जे दोन मार्ग आहेत - अभ्युदय आणि निश्रेयस, ह्या दोन्ही मार्गांचा विचार सर्व संत माहात्म्यांनी पूर्ण केला आहे. आपल्या शास्त्रामध्ये केलेला आहे. त्या शास्त्राच ज्ञान करून घेऊन आपल्या बुध्दमध्येसुध्दा आणखी त्याच संक्रमण करण, आपल्या बुध्दला ते पटवून घेण शक्य आहे. बुध्दमध्ये असलेले दोष त्या शास्त्रीय साधनांनी दूर करता येऊ शकतात. सर्वही एकंदर अभ्युदय किंवा निश्रेयस, संसार किंवा परमार्थ दोन मार्ग आहेत. संसारात पूर्णता यावी हा एक मार्ग. त्याचे कोणते उपाय आहेत. ते जे उपाय आहेत, त्यांच्या संबंधी विचार करून, ते समजून घेऊन त्याप्रमाणे संसार पूर्ण करण्याकरता प्रयत्न करण, त्याचाही विचार झाला पाहिजे. त्यालाही जिज्ञासा पाहिजे. ज्ञान मिळवल पाहिजे.

आणखी पारमार्थिक दृष्टीन विचार तर आवश्यकच आहे. ते तर सगळच अदृश्य आहे, पहिल्यापासून. ईश्वर तत्व म्हणते काय आहे ? त्यानंतर एकंदर त्या ईश्वराची शक्ती कशा प्रकारची आहे ? त्याच ज्ञान कोणत्या साधनांनी होत ? त्या करता किती तरी काळ अभ्यास केला पाहिजे, ज्याला तप असं म्हणतात. तप म्हणजे अभ्यासच आहे. तपश्चर्या पाहिजे. तोही एक अभ्यासच आहे. आलोचन करायचे. विचार करण तो विचार करून आणखी त्या दृष्टीने ते तप झाले अभ्यास झाला, तर तेही आपल्याला कळू शकत, त्या फळाची प्राप्तीही होऊ शकते.

तर अशा रीतीने हे सगळे आपल्या बुध्दला संस्कार करण्याकरता म्हणून हे सगळे उपाय आहेत. बुध्द संस्कृत व्हावी. दोष निवृत्ती बुध्दतली व्हावी. ती दोष निवृत्ती करण्याकरता कोणचे उपाय आहेत ते समजून घ्यायचय. कर्मयोग म्हणून जो पहिल्या प्रथम भगवद् गीतेमध्ये सांगितला आहे. भगवंतांनी कर्मयोग, ज्ञान योग भक्ती योग आणखी अष्टांग योग - त्याला म्हणतात. असे स्थूल मानाने चार योग म्हणजे चार साधन - योग म्हणजे उपाय. हे चार उपाय भगवद्गीतेमध्ये दाखवलेले आहेत.

कर्मयोग म्हणून जो सांगितलेला आहे. शास्त्रीय कर्मयोग आणि व्यावहारीक कर्मयोग हा वेगळा एक आहे. व्यवहारामध्ये कस वागायच ? प्रत्येक विषय भिन्न भिन्न विषय आहे. व्यापार निराळा आहे. विद्या क्षेत्र निराळे आहे. विद्या क्षेत्रामध्ये ही सगळे भाग असतात. शिल्प शास्त्र निराळ आहे. कृषिशास्त्र वेगळ आहे. प्रत्येक विषयाच ज्ञान कर्मच आहे की, प्रयत्नवाद आहे ना, प्रयत्न कसा करायचा. तर शास्त्रीय प्रत्यत्न म्हणून हा वेगळा सांगितला आहे. ती ती कर्तव्य वेगळी वेगळी आहेत. उपनयन झाल्या नंतर ब्रम्हचाऱ्यांनी कस वागायच, त्याची कर्तव्य निराळी. गृहस्थाश्रमाची कर्तव्य निराळी. संन्याशाची निराळी. स्त्रियांची निराळी. विद्यार्थ्यांची निराळी. अशी वेगळी वेगळी कर्तव्य त्यांनी सांगितली आहेत.

जो उपाय आपला आपण करायचा आहे कर्मयोग म्हणून त्या कर्मयोगाचे अनेक प्रकार शास्त्राने दाखवलेले आहेत. व्यवहारामध्येसुध्दा तसेच वेगळे वेगळे प्रकार आहेत.

..2/-

वकिली करायची असली तर तो विभाग वेगळा. ते ज्ञान संपादन केल पाहिजे. त्यातही जास्तीत जास्त बुध्दिचा विकास करून घेण्याकरता जरी एलेलबी ची परिक्षा दिली तरी कोणत्या तरी वकीलाच्या हाताखाली राहिल पाहिजे. त्यातल एकंदर मर्मज्ञान सूक्ष्मज्ञान होण्याची आवश्यकता आहे. ती मिळवण्याकरता पुन्हाही अभ्यास करावा लागतो. आणि नंतर प्रत्यक्ष ती ती कार्य करायला सुरवात केल्यानंतर आपल्या बुध्दिचा जास्तीत जास्त विकास त्या विषयापुरताच होऊ शकतो. असा सगळाही कर्मयोगाचा विषय, कर्मयोगाच्या दृष्टीने, आणि शास्त्रीय कर्मयोग वगैरे जो आहे, सर्वही एकंदर प्रत्येकाची कर्म सांगितलेली आहेत. त्यात भक्तीयोगाचा संबंधीही विशेष दाखविला आहे त्यांनी.

इश्वराच अस्तित्व मान्य करून आणि त्या ईश्वराच्या भक्तीन कर्मयोगाची पूर्णता होऊ शकते. मग ती व्यावहारीकअसो अगर शास्त्रीय असो.

यत्करोषि यदश्नासि
यंज्जुहोषि ददासि यत्।
यत्तपस्यसि कौन्तेय
तत्कुरूश्व मदर्पणम्।।

सगळीही व्यवहारीक कर्म आहेत. त्यात तपस्य एक घातलेल आहे. पण "यत्करोति" जे तुझ्या हातून शरीरान, वाणीन मनान कर्म होईल. सुध्दा घातलेले आहे खाणेपिण वगैरे. होम करण, तपश्चर्या करण. जे जे कर्म शरीरानी, वाणीन, मनान बुध्दिन वगैरे होईल " तत्कुरूष्व मदर्पणम् " हा भक्तीयोगाचा संबंध कर्मयोगातही त्यांनी आणला आहे. कर्मयोग हा पक्का होण्याकरता, कर्मयोगाने बुध्दिचे दोष दुर होण्याकरता म्हणून "मदर्पणम्" म्हणजे ईश्वरार्पणम् बुध्दि भगवद्गीते मध्ये मुख्य दाखवली आहे.

आमच्या बुध्दिने एखाद आम्हाला पटल म्हणा. काही कर्तव्य कर्म आपण करू लागलो. जपयज्ञ करायचाच, नामस्मरण करायचच, गुरुचरित्र वाचतात बरीच मंडळी वाङ्मय तप आहे, शारीरिक तप आहे, मानसिक तप आहे, ही कर्म जरी आमच्या बुध्दिन समजून घेऊन आणखी करावीशी वाटल्यानंतर करायला लागल तरी सुध्दा त्याच्या बरोबरच ईश्वरार्पण बुध्दिही असलीच पाहिजे. संपूर्ण व्यवहार ईश्वरार्पण करणारी मंडळी आणखी होऊन गेलेली आहेत. "वाहातो हा संसार देवापायी" म्हणतात ना तुकाराम महाराज। ईश्वरार्पण सर्व संसार करून निश्चिंत असलेले. भरताने जे राज्य सांभाळले चौदा वर्षापर्यंत, त्याच्या आईन ते राज्य भरता करता मिळवून ठेवल. रामचंद्राना अभिषेक करण्याच्या वेळेला तिच्या मनामध्ये काष्ठ निर्माण झाल. हा जो बुध्दिवाद आहे. संस्कृत बुध्दि या करता पाहिजे. बुध्दिमधले दोष घालवण आणि मग त्याच्यामध्ये संपादन करण असा अभ्यास करून जर ती बुध्दि चांगली झाली असेल तर त्या बुध्दिने सहसा अशा प्रकारच कर्म घडणार नाही. रामान चौदा वर्ष वनामध्ये जाव हा एक वर मला या म्हणाली ती आणि दुसरा वर म्हणजे भरताला राज्य मिळाल पाहिजे. अर्थात् त्याची माताच ती होती. मुलाला राज्य मिळाल पाहिजे अस कोणत्याही आईला वाटण साहजिकच आहे. त्या प्रमाण ते क्षम्य कदाचित ठरेल.

तर त्या भरताला त्याच्या आईन दशरथाला धर्म संकटात टाकून ते राज्य मिळविल. दोन्ही वर द्यावे लागले त्याला, इच्छा असो अगर नसो. धर्म बुध्दि जी आहे. कबूल केलेल आहे दोन वर मी देणार आहे. ती उपयोगी पडलेली

होती युद्दामध्ये, आई. तिला कबूल केल होत आणि ते दोन वर बरोबर असे मागितले. तर जे कबूल केलेल आहे. सत्यनिष्ठा आहे ना. सत्यनिष्ठा पालन करण हा मोठा गुण आहे. सत्यनिष्ठ बुध्द असणं. त्यामुळे राजाला काही करता आल नाही. ते दोन वर मिळाले. त्यात त्याचही प्राणोत्क्रमण झाल राजाच.

आणि भरत आल्यानंतर त्याला हे समजलेल आहे. राम तर गेले होते वनवासाला. पण हे राज्य जरी त्याला मिळाल तरी राज्य त्याला नको आहे. माझ राज्य नाहीये. ही धर्मबुध्द आहे. मिळालेल राज्य म्हणजे अधिकारी राम तिथ नाहीये. ते गेले वनवासाला. चौदा वर्ष येणार नाहीये. हेही निश्चित ठरलेल आहे. अशा स्थितीमध्ये राज्य करायला पाहिजे. सगळया मंत्रिमंडळाने, वसिष्ठांनी सांगितल, " तुला राज्य केल पाहिजे. तुझ्या आईनही सांगितलय. वर दिलेला आहे तुझ्या पित्याने " पण "नको" म्हणाला. रामचंद्रांना तर परत आणण्याचा प्रयत्न त्यान केला. चित्रकूट पर्वतावर जाऊन रामचंद्र जिथ राहात होते. पुष्कळ विनंती केली "नाही" म्हणाले "तूही सत्यनिष्ठ राहील पाहिजेस आणि मलाही सत्यनिष्ठ राहील पाहिजे. पित्याची आज्ञा पालन करण हेच आपल कर्तव्य आहे. पुत्र कर्तव्य आहे. तेव्हा मला चौदा वर्ष वनाच्या हद्दी बाहेर जाता येणार नाही." चौदा वर्ष रामानी अगदी वनवास म्हणजे वनवासच सोसला.

सुग्रीवाला राज्याभिषेक केला. वालीला मारल. सुग्रीवाला राज्य मिळवून दिल. आणि राज्याभिषेकाला तुम्ही या म्हणून विनंती केली. किष्किंधा राजधानीमध्ये या. मला येता येत नाही, म्हणाले. लक्ष्मणाला सांगितल जा तू, त्याच्या राज्याभिषेकाला. थोडा तरी परमार्थ कर. निर्बंध नाहीत काही नाही. लंकेमध्ये रावणाला मारल. बिभिषणाला राज्य दिल. तिथून लगेच परत आले. संपली होती चौदा वर्ष. पण अगदी कबूल केल्याप्रमाणे चौदा वर्ष वनवास मला पत्करला पाहिजे. मी काही राज्य करू शकणार नाही. तूला केल पाहिजे.

म्हणजे आईन राज्य आणखी मिळविलेल आहे. पित्याने अनुज्ञा कशी तरी का होईना दिलेली आहे. आणि राम अधिकारी तेही म्हणताहेत, तुलाच केल पाहिजे. इतकी सगळी परिस्थिती आलेली आहे. राज्य ताब्यामध्ये आहे. परंतु त्याची बुध्द कशी ! रामचंद्राच्या पादुका त्याने मागून घेतल्या. पादुका सिंहासनावरती ठेवलेल्या आहेत. छत्र, चामर, सगळी राजचिन्ह पादुकांवर आहेत. आपण सेवक म्हणून राज्य केलेले आहे. चौदा वर्ष राज्य ताब्यामध्ये घेताना राज्य सोडण्याची मुदतही सांगून दिलेली आहे. रामांना. चौदा वर्षाची शेवटची रात्र संपली. पंधराव्या वर्षाच सूर्योदय होई पर्यंत भरत राहिल म्हणाला. नाही तर राहाणारसुध्दा नाही.

हा जो त्याग आहे. हे संस्कृत बुध्दच लक्षण आहे. धर्मबुध्द ज्याला म्हणतात इतके संस्कार बुध्दमध्ये झालेले आहेत. तो धर्म किंवा ते कर्तव्यकर्म जे आहे तो कर्मयोग. हया कर्मयोगाच आचरण भरतान केलेल आहे. पण रामाच स्मरण ठेवून !

मां अनुस्मर युध्यच

भगवान सांगताहेत. युध्द कर तू. काही दोष नाही तुला. अर्जुनाची परिस्थिती मनाची जी बिघडलेली होती. आपल्या नुसत्या बुध्दनच विचार करून त्यानं ठरविल. हे चांगल नाही. इतक्या लोकांना मारायच ! मला सगळ ज्ञान आहे. मी जर आणखी युध्दात भाग घेतला तर सगळे लोक मारले जातील. हे सगळ पाप मला लागेल. आपल्याच बुध्दन सगळा विचार केला. आणखी गोपालकृष्णांच्या जवळ त्यानं आपली बाजू मांडलेली आहे. त्यांनी सांगितल " तुझ हे कर्तव्य आहे. कर्तव्य कर्म जे नेमून दिलेल आहे ही ईश्वराची आज्ञा आहे. ईश्वराची आज्ञा म्हणून आणखी कर्म

करायच आहे." संसार ईश्वराची आज्ञा म्हणून करायचा आहे. आणि हीच ईश्वरार्पण बुद्धि आहे. तर अशी ईश्वरार्पण बुद्धि मनामध्ये ठेवून संसार केला, राज्य केल भरतांनी पण रामचंद्र आल्यानंतर त्यांच त्यांना राज्य देऊन टाकल. रामाचच राज्य मी करतो आहे. सेवक आहे या बुद्धिने हा एक झाला विचार.

आणि कौरव पांडवांच्या वेळेला ? राज्य अगोदरच चांगल्या न्यायांनी मिळविल नाही. कपट द्यूतक करून. त्याला खेळायला येत नव्हत. द्यूतक्रिडेत आव्हान केल्यावर धर्मराजाला यायला पाहिजे. आणि त्या शकुनीन कपटांनी सगळ राज्य हिरावून घेतल. मिळवल ते आधी कपटांनी मिळविल असल्याने. बारा वर्ष वनवास. तेरा वर्ष अज्ञातवास, हे सगळ ठरल. त्यातूनही ते सुटून आले. नंतर राज्य द्यायची तयारी नाही. राज्य मिळवितानाच ते केवळ आपल्याच ताब्यांत राहाव असाच प्रयत्न त्यांनी केला. एक वर्ष अज्ञातवासाची अट त्यांनी जी घातलेली होती ती इतकी भयंकर अट होती कि पांडव जर ज्ञात झाले अमूक ठिकाणी पांडव आहेत हे त्या तेराव्या वर्षी जर समजल तर पुन्हा बारा वर्ष वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास. हा बुद्धिवादच आहे. पण हा बुद्धिवाद कसा ? पांडवांनी नेहमीच वनामध्ये रहाव. आणि तेही राज्य शेवटपर्यंत आपल्याच ताब्यामध्ये रहाव, ही बुद्धि आहे.

परंतु यांनी जरी आणखी कपटांनी म्हणा अशा विचारांनी म्हणा त्यांना वनवासात ठेवण्याचा प्रयत्न केला तरी पांडव हे कधीच अज्ञात राहू शकणार नाहीत त्याची कबूलीच कौरवांनी दिली आहे असे म्हणण्यास हरकत नाही. पांडवांच राज्य शेवटपर्यंत आपण घ्यायच अशीच ही बुद्धि आहे. परंतु त्या बुद्धिने हे ही कबूल केलय कि पांडवांना आम्ही केव्हाच शोधून काढू. पांडव हे गुप्त राहू शकणार नाहीत. त्यांचे गुणच असे आहेत. त्याला कबूली दिल्यासारख नाही का? अज्ञातवासाची अट घालण म्हणजे.

पण तिकड त्यांच लक्ष नाहीये. म्हणजे इकडे कौरवांची बुद्धि राज्य मिळवतानाही अन्यायाने मिळवून तेरा वर्षानंतर युद्धाशिवाय राज्य द्यायच नाही अशीच आहे त्यामुळे समाधान नाहीये. भरताची स्थिती अशी आहे. ईश्वरार्पण बुद्धि आहे. राज्य रामचंद्राच आहे आपण फक्त त्याचे सेवक आहोत. ही बुद्धि मनामध्ये ठेवून आणखी राज्य करण आणि राज्य माझ आहे अशी बुद्धि ठेवून राज्य केल्यानंतर मनाची स्थिती कशी राहती हे सुद्धा विचार करण्यासारख आहे. ममता उत्पन्न झाली संसाराबद्दल ईश्वरार्पण बुद्धि नाही. ईश्वराचा काही संबंध नाही. माझ आहे फक्त. हे माझ आहे अशी बुद्धि उत्पन्न होऊन संसार करण्यामध्ये किती तरी दोष निर्माण होतात.

पहिला दोष म्हणजे त्याच्याबद्दल एक भीती मनामध्ये कायम असते. हे टिकेल कि नाही आपल. ही भीती त्याच वेळेला असते. पैसा मिळवितो आपण. माझा पैसा आहे, माझ राज्य आहे. त्यानंतर अनुकूल प्रतिकूल ही स्थिती प्रत्येक ठिकाणी असते. काल जो आहे तो नेहमीच काही अनुकूल असतो अस नाही. तेव्हा कोणीही राज्य मिळविल्यानंतर सुद्धा तिथे प्रतिकूल वागणारा मनुष्य जो आहे त्याला आपण काही शासन केल तो विरुद्ध झाला तो माहितगार असतो त्यान आणखी जाऊन काही कारस्थान करून त्रास देण्याचा प्रयत्न केला ही भीती आहे. तेव्हा प्रथम पासूनच "तत् कुरुष्व मदर्पणम्" म्हणून जे भगवान म्हणताहेत ही जर बुद्धि असेल.

प्रयत्न दोन्हींचा आहे. संसार करायचाय. राज्य करायचय. पण ते माझ आहे राज्य. मीच त्याचा स्वामी आहे. ईश्वर बिश्वर काही नाही. शिवा दुसरा कोणी नाही. अशा समजुतीन, अशा बुद्धिन राज्य करण्यामध्ये काय आणखी प्रकार आहे, तोच स्वामी आहे. तोच सांभाळणारा आहे. मी सांभाळणारा सेवक आहे. परंतु सेवक जरी असलो तरी सुद्धा माझ्याकडून राज्य आणखी त्याच्याच

शक्तीन चालू राहणार आहे. म्हणून त्याच स्मरण ठेवून राज्य करायच आहे किंवा संसार करायचा आहे.

कर्मयोग, ह्या कर्मयोगामध्ये ईश्वराच अनुसंधान याला विशेष महत्व आहे. म्हणजे त्या कर्मयोगान शांति मिळती, मनाचे दोष सगळे निघून जातात, "चित्ती असू द्यावे समाधान" हे त्या वेळेला प्राप्त होते.

त्याग किंवा भोग. बुध्दिमध्ये कोणता दोष आहे ? भोगबुध्दि हा मोठा दोष आहे. आणि त्याग बुध्दिचा गुण आहे. संग्रह करण हा साम्यवादाच्या दृष्टीने एक दोष मानला गेला आहे सध्या. अजून सुध्दा ते म्हणतायत आमचा प्रयोग चाललेला आहे. साम्यवाद आमचा काही पूर्ण झालेला नाही. आम्ही प्रयोग करतो आहोत. ज्या दिवशी खाजगी संपत्ति एकाही माणसाची राहीली नाही अशी स्थिती येईल त्या वेळेला साम्यवादाचा आमचा प्रयोग पूर्ण झाला, असे आम्ही समजू. तो पर्यंत आम्ही प्रायोगिक स्थितीत आहोत. अस त्यांच मत आहे.

परंतु अर्थसंग्रह हा दोष नाहीये, शास्त्रकारांच्या दृष्टीन. संग्रह पाहिजे. राष्ट्रालासुध्दा संग्रहाची आवश्यकता आहे. वैश्यवर्ग जो सांगितलेला आहे त्याच कर्तव्य म्हणजे धनार्जन करण. वैश्यांच कर्तव्य ठरविल आहे त्यांनी. आणि "अतुष्ट: अर्थपिच:" म्हणून सांगताहेत, आणि खरा व्यापारी, खरा वैश्य म्हणजे कितीही पैसा मिळाला तरी मनाच समाधान कधीही ज्याला मिळत नाही. तो खरा व्यापारी आहे. हे त्याच लक्षण आहे. त्याशिवाय संग्रह कसा व्हायचा ?

परंतु त्याचा विनियोग करायचीही बुध्दि आहे. मिळविण्याची जशी बुध्दि आहे तशी विनियोग करायचीही बुध्दि आहे. त्याप्रमाणे जर असेल, त्याग बुध्दि जर असेल, त्यागा करता संग्रह करायचा जर असेल तर त्या ठिकाणी साम्यवाद बिलकुल य येणार नाही. मी मिळविलेल आहे द्रव्य, मी मालक आहे, मी याचा भोग घेणार आहे, मला एकट्यालाच सगळ पाहिजे. अशी बुध्दि असा साम्यवाद अलिकडेच निर्माण झाला आहे अस नाही. पूर्वीपासून आहे, मन ज्या वेळेपासून आहे. त्यावेळेपासून हे सगळेहि आणखी वाद आहेत.

मनामध्ये जर ममता, भोगबुध्दि निर्माण झाली तर त्या भोगबुध्दिन साम्यवाद उत्पन्न होतो. अशांति निर्माण होती. आणि त्याच मनामध्ये जर त्याग असेल, हा त्याग निर्माण होण्या करता ईश्वरार्पण बुध्दिची आवश्यकता आहे. भरताने त्याप्रकाणे राज्य केलेल आहे. आणि रामरायापेक्षा त्याची किर्ती ज्यास्ती झालेली आहे अस म्हणायला हरकत नाही. वाल्मिकी महर्षिंनी हे जे रामचरित्र पुढे मांडलेले आहे भारताच दायभाग आहे. परंतु कोणीही त्याचा विचार करत नाहीये. मनन करत नाहीये. रामायणामध्ये जे जे कोणी पुरुष आहेत – रामचंद्र आहेत, भरत आहे. सीतादेवी आहेत मारुतिराय आहेत. काय काय आदर्श पुरूष त्यांनी मांडले आहेत. भरताचा त्याग मोठा का रामचंद्राचा त्याग मोठा, त्यागाचाच विचार आहे. त्याग हा गुण आहे. पण त्याच त्यागाचा विचार करायला लागल्यावर रामाचा त्याग मोठा कि भरताचा त्याग मोठा ? रामाला अजाधि राज्य मिळाल होत कि नाही ? अभिषेकाची तयारी चालली होती. इतक्यात आणखी त्याला वनवासात जाव लागल. म्हणजे राज्य मिळालच नव्हतं त्याला. त्याग कसला केला रामाने ? बर केला असे समजू आपण. पण भरताला राज्य मिळालेल होत. त्याच्या आईन मिळवून दिल होत, सगळ्यांनी त्याला मान्यता दिली होती. रामांनी दिली होती स्वत: मग दुसरे काय बोलणार आहेत. लक्ष्मण रागावला म्हणून काय झाल ? आईही रागावली. "तुला रागवायच कारण नाही. म्हणाले "आमच्या दोघांची कर्तव्य आम्हा दोघांना पालन केली पाहिजेत. मी वनवासात जाणार

त्यानी राज्य करायच." म्हणजे राज्य मिळालेल असतांना सुध्दा चौदा वर्षे त्यांनी त्याचा भोग घेतला नाही. राम जर वनामध्ये दुःखी आहेत, कुठे तरी वनामध्ये झाडाखाली पानावर निजणार तर मी सुध्दा शय्येवर निजणार नाही. ही बुध्दि आहे. त्याप्रमाणे खाणेपिणे. गोमूत्रामध्ये सातूच पीठ घालून ते खायच. सगळे भोग जवळ आहेत. पण नाहीये. रामांना वनवासात जाव लागल्यामुळे त्याग झालेला आहे. आणि ह्याला राज्य मिळालेल असून त्याग झालेला आहे. म्हणजे त्यात कोणाचा त्याग मोठा ? रामांनी कबूल केल. तुझा त्याग मोठा आहे. कैकेयीच प्रेम माझ्यावरच जास्ती आहे अशी रामांनी तिची समजूत काढलेली आहे वनांत जातांना. लोक म्हणेनात का म्हणाले, कैकेयीने ह्याला राज्या बाहेर घालवल. पण नाही. कैकेयीच खर प्रेम माझ्यावर आहे. हे त्यांनी पटवून दिलेल आहे. काय, म्हणाले, रानामध्ये मी एकटा. माझ्यापुरत संरक्षण करून राहायच. खाण्यापिण्याची व्यवस्था मिळेल तिथे. फळ मिळतील. काही मिळेल. मी माझ्या एकट्या पुरता. आणि भरताच्या डोक्यावर राज्याचा भार दिला आहे त्याच्याआईन. हा टेलिफोन आला. तिकडच्या प्रांतात परिस्थिती बिघडली. सुख आहे काय राज्य करणाऱ्याला ? हा सगळा भार आपल्या मुलाच्या डोक्यावर देणारी कैकेयी आणि मला त्यातून सोडवणारी कैकेयी, कोणावर तिच प्रेम जास्ती ? असे विचार त्यांनी मांडले. ही समाधानाची वृत्ती दोघांचीही आहे. दोघेही त्यागीच आहेत.

तर याप्रमाणे कर्मयोग म्हणून जो शास्त्रकारांनी मांडलेला आहे - तो व्यावहारीक असो संसारीक असो- किंवा परमार्थिक दृष्टीन असो- जे काही आपल्या हातून होतय. साधन वगैरे. ते सर्वही ईश्वराला अर्पण करण. त्याची आज्ञा म्हणून मी साधन करतो आहे. आणि साधनेचा अभ्यास किंवा साधन जे होतय ते त्याच्याच प्रेरणेन होतय, त्याच्याच शक्तीन होतय ही बुध्दि धारण करून कर्म करा एवढच ते सांगतायत.

आणि अशी बुध्दि उत्पन्न होण ही संस्कृत बुध्दि आहे. आणि त्या बुध्दिमध्ये त्याग निर्माण होऊ शकतो, इतर बुध्दिमध्ये नाही. मी मिळवू शकतो. मीच मालक आहे. कुठले पांडव आणि कुठले काय. तर अशा रीतीन शास्त्रकारांनी संत माहात्म्यांनी ज्या कर्मयोगाच आचरण केला आहे, संसार त्यांनी केला. सगळ्या संतांनी संसार केला. ज्ञानेश्वर समर्थ. समर्थांनी स्वतःचा वैयक्तिक संसार सोडून दिला पण हा संसारच आहे. सर्वही समाजाच कल्याण व्हाव अशी चिंता बाळगून त्या करता आणखी एखाद्या राजाला प्रवृत्त करण, त्याला सहाय्य करण, मार्गदर्शन करण हा संसारच आहे.

परंतु आसक्ती नाही. "तुझा तू वाढवी राजा" सांगून मोकळे झाले त्या देवीला. तुझाच राजा आहे. त्या राजाला तू सहाय्य केलस तर त्याच राज्य वाढेल. काही त्यात अहंकार नाही. मार्गदर्शन करण हेही कर्मच आहे. पण ते कर्महि ईश्वरार्पण करून टाकल. देवानी त्या राजाला निर्माण केल, स्वराज्य निर्माण झाल. देवाच राज्य आहे. पुन्हा ते मोकळे झालेले आहेत.

तेव्हा हे जे "योगकर्मसुकौशल्यम्" म्हणून जे म्हणतात. कर्माचरण करतांना हे कौशल्य जर साध्य झाल- ईश्वरार्पण बुध्दि आणि ही बुध्दि जर निर्माण झाली तर ते कर्म व्यावहारीक असो किंवा पारमार्थिक असो व्यवस्थित होऊ शकत. हा प्रयत्नवाद शास्त्रीय प्रयत्नवाद आणि व्यावहारीक प्रयत्नवाद हे दोन्हीही प्रयत्नवाद हे असे सुख पर्यवसायी होऊ शकतात.

आणि या प्रमाणे हा विचार सर्वही साधु संतमहात्मे दाखवून देतात. अनेक अडचणी येतात. त्या समस्या निर्माण झाल्यानंतर कस वागायच हे कळत नाहीये. तर त्या समस्येमध्ये सुध्दा योग्य मार्गदर्शन करून पुढे नेणारे अशा प्रकारचे माहात्मे ज्यांनी आपली बुध्दि निर्दोष बनवलेली असेल त्यांच्या त्या निर्दोष बुध्दिचा उपयोग आपल्याला

होऊ शकतो. एवढच आपल्या प्राचीन शास्त्रज्ञांच सांगण आहे. त्या कर्मयोगाचा विचार थोडासा अल्पशा प्रमाणात केलेला आहे. अशी कर्तव्य कर्म करणारी मंडळी गृहस्थाश्रमामध्ये होऊन गेली. ही अनेक अशी चरित्र व्यास महर्षिंनी पुष्कळ वाड्मय निर्माण करून त्यात दाखवून दिलेली आहेत. पहायला आपल्याला जिज्ञासा पाहिजे. सवड पाहिजे. आणि त्याच्याबद्दल विश्वास पाहिजे. विश्वासाशिवाय जिज्ञासा ही काही कार्यकारी ठरत नाहीये.

कितीतरी ज्ञान व्यास महर्षिंनी आपल्याला दाखवून दिलेल आहे. अनेक देवतांचे अवतार होऊन गेले ती सगळी चरित्र सांगितली आहेत. मोठे राजर्षि झालेत. त्यांची चरित्र सांगितली आहेत. द्रौपदीसारख्या स्त्रियांचीही चरित्र सांगितली आहेत. गुणही दाखविलेले आहेत. दोषही दाखविलेले आहेत. सगळ आणखी दाखविलेल आहे.

तर हे सगळ पाहून आणि त्या प्रमाणे व्यवस्थित ज्ञान मिळवून तस जर कर्तव्य कर्म करता आल आपल्याला आणि कर्तव्य कर्म सोडता येत नाही ना. त्याच्यामध्येच आपल्याला रहायचय. वनामध्ये जाऊन शांत राहू, सुखी राहू अस वाटत आपल्याला पण वनामध्ये गेल तरी मनामधले विकार सगळे बरोबरच असतात. हे सगळे शत्रू बरोबरच घेऊन जातो आपण. कामक्रोधादि विकार सगळे. हे सगळे विकाररूपी शत्रू बरोबर घेऊन वनामध्ये जाऊन तरी काय उपयोग आहे ? तिथ तरी ते शत्रु काय करतील याचा नेम नाही. म्हणून कर्मयोगाचा विशेष पुरस्कार प्राचीन शास्त्रकारांनी केलेला आहे. कर्म योगाकड लक्ष ना. भक्तीमार्गांनी चाला असा ब्रम्हदेवाचा उपदेश आहे. आता ज्यांची बुध्दि निसर्गत:च निवृत्ती मार्गाकड गेलेली आहे, ज्यांना आणखी विशेषत: कर्मत्याग करून राहाता येण शक्य आहे. असे जे ज्ञानी माहात्मे असतील ते असे निवृत्तीमार्गानि गेल्याचीही उदाहरणे आहेत.

परंतु जास्तीत जास्त प्रवृत्ती मार्गाकड जाव असं सृष्टीकर्त्याच-ब्रम्हदेवाच-सांगण आहे. आणि त्या कर्मयोगाच आचरण मात्र याप्रमाणे करा. ईश्वरार्पण बुध्दि ठेवा. ईश्वराच अस्तित्व मान्य करा. सगळ्या संतांचा उपदेश या करता आहे.

किंबहुना सर्व सुखी ।
पूर्ण होऊनी तिन्ही लोकी ।
भजजो आदि पुरूषी अखंडित ।।

हे सोडू नये कोणी. सगळी सुख मिळू देत म्हणाले. पण त्या ईश्वराच भजन त्यांनी सोडू नये. अस देवाजवळ मागण मागितल आहे ज्ञानेश्वर महाराजांनी आज एकदशी आहे.

उद्या आता ज्ञानयोग आहे भक्तीयोग आहे, पुष्कळ आणखी किती तरी साधन वेदशास्त्रांनी, संत माहात्म्यांनी प्रत्यक्ष त्याचा अनुभव घेऊन. प्रयोग शास्त्रच आहेत. ती सगळी साधन म्हणजे प्रयोगच आहेत. ते ते प्रयोग शेवटपर्यंत आपली स्वत:ची बुध्दि त्या बुध्दिला मार्गदर्शक असतील जे माहात्मे त्यांची बुध्दि या सगळ्यांचा एकत्र समन्वय करून त्यांनी ते प्रयोग केलेले आहेत. तो विश्वास मनातली उत्कट भावना कायम राहाण या सगळ्यामुळे ते आणखी शक्य झाल. असे प्रयोग करून ते कृतार्थ झाले आहेत. त्याचा थोडासा विचार दोन तीन दिवस इथ असेपर्यंत करायचा आहे.

अवधूत
चिंतन
श्रीगुरूदेवदत्त

रत्नागिरी
8. 12. 1986

।। श्रीगुरुदेव दत्त ।।

उपासनेला दृढ चालवावे। भूदेव संतांसी सदा नमावे।
सत्कर्म योगे वय घालवावे। सर्वां मुखी मंगल बोलवावे।।

समर्थांनी हा उपदेश केलेला आहे. मनुष्य जन्म प्राप्त झाल्यानंतर काय कराव. हे आपल्याला कळत नाही. संतांची बुध्दि ही निश्चित बुध्दि आहे. आपली बुध्दि अनिश्चित आहे. चंचल आहे. त्यामुळे एका वेळेला एक करावस वाटत नंतर ते नको वाटत. दुसरच काही करावस वाटत. पण संतांनी आपल्या निश्चित बुध्दिने जे काही कल्याणाचे साधन त्यांनी सांगून ठेवलेल आहे त्याचा विचार करायचा आपण. आणि त्याप्रमाणे आचरण करण्याचा प्रयत्न करायचा.

ईश्वराची उपासना करावी हे सर्वहि संत सांगतात. तोच पहिला आणखी उपदेश आहे. "उपासनेला दृढ चालवावे" हा सर्वसाधारण सर्वांना उद्देशून उपदेश आहे. अमूकच एकाला आहे अस नाही. स्त्री असो, पुरुष असो, बाल असो, वृध्द असो, सर्वांना, सर्व सामान्यांना हा उपदेश आहे.

ईश्वराची उपासना करावी आणि ती चालू ठेवावी. नित्यकर्म म्हणतात याला. ईश्वराची उपासना, भक्ति ही नित्यकर्मे आहेत. रोज काही तरी शरीरान, वाणीन मनाने अशा प्रकारची उपासना ही नित्य चालवावी म्हणतात. आणि ती दृढ असावी. मध्ये मध्ये करण, सोडण अस होऊ नये. धरसोड वृत्ती म्हणतात त्याला. म्हणजे न थांबवता चालू असावी. असा पहिला उपदेश आहे.

आणि ही ईश्वराची उपासना झाल्यानंतर "भूदेव संतांसी सदा नमावे." संत महात्मे हेच भूदेव आहेत. स्वर्गामध्ये राहणारे देव आपल्या पुण्यकर्माने स्वर्गात गेलेले असतात. पण त्या ठिकाणी काही उपासना वगैरे संबंध नाही. पुण्याने अनुकूल परिस्थिती मिळालेली असते. माणसाला, देवांना मिळालेली असते. जास्तीत जास्त अनुकूल परिस्थिती मिळाल्यानंतर ईश्वराच स्मरण राहाण कठिण आहे. जास्तीत जास्त आणखी विषय वासना मनामध्ये उत्पन्न होतात. आणखी तिकडच माणसाच मन हे नेहमी तिथच राहाते. म्हणून "भूदेव संतांसी सदा नमावे." हे मुद्दाम सांगताहेत. संत हे भूदेव आहेत. भूमिवर असणारे देव आहेत. त्यांच्या बरोबर रहाव, त्यांची संगती घडावी, नम्रपणे वागाव, त्यांच्यापासून काही आणखी मार्गदर्शन मिळवाव हा दुसरा उपदेश आहे.

ईश्वराची उपासना ही प्रथम आहे. आणि त्या ईश्वराच्या कृपेन संत जे आहेत, मार्गदर्शक अशा प्रकारचे, सद्गुरु, त्यांची भेट होण. आणि ती भेट झाल्यानंतर हे संत आहेत, ह्यांच्यापासून आपलाकाही तरी फायदा होईल अशी श्रध्दा विश्वास मनामध्ये उत्पन्न होऊन त्यांची संगती करण हे विशेष आहे.

देवादिकांच्या परिस्थितीमध्ये सगळे देव असे नाहीयेत. एखादे कोणी असले हा विचार करणारे तर. सहसा तो विचार होत नाही. आणि संतांची भेट त्यांना तिथे कशाला होईल? ते काही स्वर्गलोग वगैरे कशाचीही इच्छा न करणारे संत असतात. ही कर्मभूमि आहे भारतवर्ष म्हणजे. या भारत वर्षामध्ये संतांचा पुष्कळ संचार ठिकठिकाणी आहे. अनेक तीर्थ क्षेत्र आहेत. भगवान गोपालकृष्णांनी रामचंद्रांनी अवतार धारण करून त्या त्या ठिकाणी कार्य केलेले आहे. अशा पवित्र भूमिमध्ये त्यांचा संचार असतो.

तर त्यांच्यापासून मार्गदर्शन मिळाल पाहिजे आपल्याला, हे महत्वाच सांगण आहे. संतांची संगती घडण आणि त्यांच्यापासून मार्गदर्शन मिळण हे सुध्दा कठिण आहे. म्हणून ईश्वराची उपासना त्यांनी अगोदर सांगितलेली आहे. ती चालू

असायचीच नेहमी म्हणजे ईश्वराच्या प्रेरणे प्रमाणे कस वागाव आपण, संतांपासून आपल्याला मार्गदर्शन कोणत्या बाबतीत मिळवायच आहे, काय आहे, हे सगळ समजल पाहिजे. त्याकरता ईश्वराची उपासना केल्यानंतर ईश्वराची प्रेरणा ही आपल्याला होतेय. साधुसंत महात्मे असतात, सद्गुरु यांनाही प्रेरणा होते. आणि त्याप्रमाणे जे मार्ग असतील आपल्याला त्या मार्गाचे ज्ञान होत आहे.. परमार्थ मार्गामध्ये आपल्याला पुष्कळ शिकायच आहे.

संसारामध्ये जे मन गुंतून राहिलेल असत ते गुंतून राहिलेल मन काढून घ्यायच आहे आपल्याला. तेच कठिण आहे. संसार सोडायचा असा त्याचा अर्थ नाही. त्या संसारामध्ये आपल मन आसक्त झाले आहे ते अनासक्त होणं. आसक्ती ममता ही त्याच्यातली कमी होण ही मनाची तयारी करायची आहे. आणि परमार्थ हा सगळा मनाच्याच प्राधान्याने होत आहे. व्यवहारातसुध्दा मनाची योग्यता ही लागतेच आहे. ती योग्यता असल्याशिवाय व्यवहारातही आणखी, व्यवहारात तरी आपले कार्य कसे यशस्वी होईल. पारमार्थिक दृष्टीने मन तयार करणे, शुध्द करणे याची आवश्यकता सांगितलेली आहे. मनामध्ये काय दोष आहेत, ते अगोदर कळले पाहिजेत. ते कळले तर ते मान्य झाले पाहिजेत. आम्हाला ते मान्य होत नाहीत. अहंकार जो आहे या अहंकारामुळे. जरी आपल्या हातून काही चुका झाल्या तरी आम्ही कधीहि चुकत नाही असच आम्ही समजतो. आणि सांगतोही तसच लोकांना. आमच्या हातून चुक कधीही होत नाही. झालेल्या असतात पुष्कळ चुका. वैयक्तिक, सामुदायिक पुष्कळ नुकसान झालेल असत. पण ते दोष मान्य होत नाहीत आपल्याला. हा दोष आहे अस वाटल्यानंतर तो घालवला पाहिजे. कसा घालवला जाईल? कोण याचा आणखी उपाय सांगेल? ही तुमची एकंदर विचारसरणी आहे.

तेव्हा मनामध्ये असणारे हे दोष दूर करण्याकरता ही संतसंगती आणखी पारमार्थिक दृष्टीने अत्यंत श्रेष्ठ सांगितली आहे. दोष ज्ञान आपल्याला करून देणारेही तेच असतात. कोणते दोष आहेत तेही ते सांगतात. कारण त्यांनी आपले स्वत:चे दोष घालवले असतात ना! त्यांच्याजवळ कोणतेही दोष नाहीत. त्यांच मन शांत आहे. क्षमाशील आहे. आणखी अशा प्रकारच मोठ मन त्यांच बनलेल आहे. त्यांनी बनिवलेल आहे. त्यामुळे कोणते दोष कसे घालवता येतील सगळी माहिती त्यांना आहे. ज्ञान आहे आणि शक्तिही आहे. मनातले दोष ज्यांनी दूर केलेले आहेत, मन शांत एकाग्र ज्यांच झालेल आहे त्यांना सगळ्या सिध्दी मिळतात, अस योगशास्त्रकार सांगतात.

सिध्दी म्हणजे मानसिक शक्तिचा विकास आहे. आमच्या मनाची शक्ती जी संकुचित झाली आहे त्या शक्तीचा विकास म्हणजे सिध्दी आहे. समुद्राच्या पलिकडे लंकेत जायचे ठरले. वानर मंडळींना समजले. त्या जटायूच्या बंधूने सांगितले, समोर लंका दिसते आहे मला, त्यांच्यामध्ये सीता आणखी बसलेली आहे. तिच्या सभोवती राक्षसींचा पहारा आहे. ते समजल खर पण जायच कोणी? सीतेचा शोध लावायचा म्हणजे काय परत अस जाऊन सांगायचय. संपातिने पाहून सांगितले तिथे सीता आहे. त्याने पाहून सांगितले म्हणजे काय शोध लावण्याचे काम झाल अस नाही. तुम्ही काही गेलात का? बोललात का तिच्याशी? तिला काही धीर दिलात का? अस रामांनी, सुग्रीवाने विचारले तर काय सांगायचे? म्हणून प्रत्यक्ष कोणीतरी तिथे जायला हव. तर ती जाण्याची शक्ति कोणाची आहे? हा एक प्रश्न आहे. वानर मंडळी समर्थ होती पुष्कळ. एक जण म्हणाला, मी दहा योजने

जाईन. अंगद म्हणाला मी शंभर योजने जाईन पण परत यायच सामर्थ्य माझे नाही. अशी प्रत्येकाने आपापली शक्ती त्या वेळेला सांगितली. परंतु शेवटी मात्र सर्वांनी मारुतीरायांचीच योजना केली. त्यांची शक्ति मोठी आहे अस मान्य केल. सर्व मान्य झालेली ही शक्ति मारुतिरायांना मिळाली कशी? सगळे वानर मोठेच होते. चांगला अभ्यास केलेले होते. मारुतिरायांचा तर संस्कृत भाषेचा अभ्यास उत्तम झालेला होता. रामाच्या पहिल्या भेटीत ते संस्कृतमध्ये त्यांच्याशी बोलले आहेत.

त्यांनाही आश्चर्य वाटले. ते म्हणाले, "हनुमान व्याकरण शास्त्राप्रमाणे एकही चूक याच्या भाषेमध्ये दिसली नाही. इतक शुध्द भाषण केले." अस ते लक्ष्मणाला म्हणाले. अस ज्ञानही आणि समुद्राच्या पलिकडे जायच सामर्थ्यही आहे. सामान्य कुठल्या खेडयात जाऊन यायच नाहीये. रावणाची राजधानी आहे. किती कडेकोट बंदोबस्त तिथे असेल? त्यातून सीतेचा शोध करायचा आहे. तिच्या बरोबर बोलायच आहे. सगळया राक्षसींचा पहारा असतानाहि आणखी तिला धीर द्यायचा आहे. आणि रावणाला तर समजून उपयोग नाही. हे सगळ व्यवस्थित करायच आहे. "बुध्दिमतां वरिष्ठम्" म्हणतात त्यांना. तस मारुतिरायाच ध्यान आहे. तर ही जी शक्ति त्यांना मिळाली, बुध्दिचा इतका विकास त्यांचा झालेला होता त्यामुळे ते जाऊ शकले.

शंभर योजन म्हणजे चारशे कोस. संबंध पाणी. त्या पाण्यावरुन जायच आहे. देवांना विमान असतील. त्या वेळेला पुष्पक विमान होत. सगळ काही वर्णन आहे रामायणामध्ये. पण ह्या वेळेला मारुतिरायांना कुठल विमान मिळणार? ते आपल्याच सामर्थ्याने जाणार आहेत. मनामध्ये सामर्थ, शरीरामध्ये सामर्थ्य. मी जाऊ शकतो म्हणाले. आणि जाऊन सीतेचा शोध करुन येतो, अस त्यांनी आश्वासन दिल. सगळया वानर मंडळींची खात्री होती हे एकटेच जाऊ शकतील. रावणाच्या राजधानीत जाऊन परत जायच आहे. हे सामर्थ्य दुसऱ्या कोणाकडे नाही. काय करतील ते राक्षस याचा नेम नाही. शत्रुचा हेर सापडल्यावर कोण त्याला दया दाखवणार ?

त्या वेळेला तस हे बंधन होत. शत्रुकडचा दूत म्हणून आलेला असला तर त्याला मारायचे नाही. अशी धार्मिक वृत्ति होती. तर हे जे काम त्यांनी केल ही शक्ति म्हणजे मानसिक शक्ति आहे. शरीरामध्ये शक्ति ही नंतर आहे. पण मनामध्येच अगोदर शक्ति नसते. कस होईल? काय होईल? मला कोणी मारल तर काय करायच? हे सगळे विचार जर एखाद्याच्या मनात यायला लागले तर त्याच्याकडून काही व्हायच नाही. व्यवहारातही होणार नाही आणि पारमार्थिक दृष्टिने म्हणा तसही होणार नाही.

स्वामींच कार्य करायचय ही एक बुध्दि आहे. रामचंद्र हे आपले स्वामी आहेत. आणि त्यांची पत्नि रावणाने म्हणजे राक्षसाने पळवून नेलेली आहे. त्यामुळेही मन अतिशय प्रक्षुब्ध झालेल आहे. त्याला शासन केले पाहिजे ही मनाची तयारी आहे. आणि त्याप्रमाणे आकाशातून जायच आहे. खाली संबंध समुद्र आहे. आणि तिथ लंकेमध्ये जायच आहे. तिथ सगळयांना आणखी न समजता कार्य करायच आहे. किती हेर असतील रावणाचे! तो राक्षसांचा राजाच होता ना. मायावी होता राक्षस. राक्षसांचे सुध्दा आणखी निरनिराळया प्रकारचे मंत्र तंत्र असतात. पण अशाही परिस्थितीमध्ये मारुतिरायांनी कार्य केलेले आहे.

बुध्दिमतां वरिष्ठम् एकाच शब्दात त्यांनी सांगितल. अत्यंत श्रेष्ठ बुध्दि आहे इतकी की, त्या बुध्दिला असाध्य अस काही वाटतच नाही. हे मोठ आहे. हे होईल कस अस काही म्हणायच नाही आणि रामांचाही मोठा विश्वास त्यांच्यावर होता. सगळी वानर मंडळी निघाली तरी मारुतिरायांना ह्यांनी बोलावल आपल्या बोटातली अंगठी काढून मारुतिरायांच्या जवळ दिली. ही सीतेला दाखिव म्हणून सांगितले. म्हणजे हाच काम करणारा आहे हे त्यांनी ओळखल. नाहीतर, म्हणाले, वानरांच्यावेषात हा रावणच आला नसेल कशावरुन, अस सीतेला वाटल तर ती तुझ्याशी बोलणार सुध्दा नाही. म्हणून ही अंगठी दाखव म्हणजे विश्वास बसेल.

म्हणजे रामचंद्रांचीही खात्री होती कि हा आपला दूत श्रेष्ठ आहे. कार्य करणारा आहे. अशी जी मंडळी आहेत त्यांच्या मनाची ही शुध्दी आहे. याच्यामध्येच सत्कर्म त्यांनी सांगितलेले आहे, समर्थांनी.

सत्कर्म योगे वय घालवावे हे एक महत्वाच सांगण आहे. आयुष्य असेपर्यंत सत्कर्म करावीत आपण. कमी असतील, लहान मोठी का असेनात. पण सत्कर्म करण्याकडे लक्ष पाहीजे. मनान, वाणीन, शरीरान चांगली पुण्यकर्म घडावीत तर त्या पुण्यकर्माच फलम्हणजे मनाची शुध्दि. मनाच्या शक्तिचा विकास. हे सगळ मिळतय. "बुध्दिमतां वरिष्ठम्" त्या वेळेला होता येत आपल्याला.

ते मारुतिरायांनी दाखवलेल आहे. जाऊन मोठ रूप धारण केल होत त्यांनी म्हणतात. समुद्रावरुन जायच आहे, उडी मारायची आहे. अतिशय मोठ रूप आहे. महाभारतामध्ये एक गोष्ट आलेली आहे.

हे सगळे पांडव वनामध्ये असताना भीम अस एकदा कुठ फिरायला गेला होता. आणि रस्त्यामध्ये हे मारुतिराय त्यांना भेटले. बसले होते आपले वृध्दरूप धारण करून म्हाता-यासारखे. त्यांच शेपूट रस्त्यामध्ये पसरलेले होते. भीम जरासा अहंकारी, आपल्या सामर्थ्याचा गर्व असणारा. " हे तुझ शेपूट काढून घे " म्हणाला. "तूच उचलून ठेव " म्हणाले. त्याला काही ते उचलतासुध्दा आले नाही. मग त्यान विचारल, " तुम्ही कोण आहात?" ते म्हणाले, "मी तुझाच भाऊ आहे. मारुताचा मुलगा. " मरुत म्हणजे वायू. मग त्यांची ओळख झाली. भीम म्हणाला, "तुम्ही समुद्र उल्लंघन करायच्या वेळी धारण केलेल विराट रूप मला दाखवा." ते म्हणाले, "तुला पाहता येणार नाही." भीम म्हणाला, "दाखवा तरी, बघू. या" मग त्यांनी ते रूप इतक वाढवल कि शेवटी भीमाने डोळे झाकून घेतले. "नको" म्हणाला, "पहिलच आपल बर आहे." म्हणजे मारुतिरायांच विराट रूप पाहण्याची शक्ति सुध्दा नाही भीमासारख्यांची. मग त्यांच्या

सारख कार्य करण्याची शक्ती आपल्यात कुठून येणार?

म्हणून हे सगळ आणखी आपल्याला अशक्य आहे. असंभवनीय आहे, अशा कल्पना होतात. हे होणच शक्य नाही. तर त्यांनी ते कार्य करून दाखीवलेल आहे. त्यांचा इतिहास सगळा वाल्मिकी मुनींनी लिहून ठेवलेला आहे. कस कार्य केले. रामायणातले सुन्दर कापड म्हणजे मारुतिचच आहे. अनेक प्रकारच्या शक्ति आहेत. कितीही मोठा शत्रु असला तरी काही भय नाही. त्याकरता सत्कर्म हे एक मोठ साधन आहे. शुध्द कर्म, पुण्य कर्म. चांगली पुण्य करायची शुध्द बुध्दि पाहिजे आणि त्याप्रमाणे जेवढी कर्म घडतील ती सत्कर्म म्हणावीत. ते जे बळ मिळत त्यामुळे मानसिक शक्तिचा विकास होतो.

आणि "जितेंद्रियम् बुध्दिमताम् वरिष्ठम् " हनुमान जे आहेत ते जितेंद्रिय आहेत. पूर्वीचे मोठमोठे योगी हे सगळे ईश्वराची उपासना करणारे आणि जितेंद्रिय आहेत. इंद्रिये ताब्यामध्ये असणे हे मोठे सामर्थ्य आहे. म्हणजे सगळया मानसिक शक्तिचा विकास आहे. भगवत् गीतेमध्येहि भगवान सांगताहेत-

श्रध्दावान लभते ज्ञानम् ।

श्रध्दा पाहिजे. उपासना दृढ भावनेने चालू पाहिजे. पुण्यकर्म करावीत. इंद्रियांकडून चांगली कर्म करावीत. केवळ विषयांचा उपभोग सगळेच घेत आहेत. शास्त्रकार मोठमोठे महर्षि यांनी संयतेंद्रिय होण्याकडे लक्ष दिले. मनुष्य जन्मामध्ये हे करता येण्यासारखे आहे ना? हाच विचार सगळा. पशुपक्ष्यांना विचारच नाहीये. विचार करण्याची पात्रताच नाही. समोर काय दिसेल ते खायच. मग ते आपल असो दुसऱ्याच असो. काठी मारल्यावर मग जायच. तो पर्यंत खाणारच ते. दुकानात असो, कुठही असो. त्यांना ती बुध्दिच नाहीये. त्यामुळे त्यांच्यात पापपुण्याचा विचारच नाहीये.

पापपुण्याचा विचार मनुष्यांकरता केलेला आहे. शास्त्राने माणसांना हे सांगितले. त्याना विचार आहे. बुध्दि दिलेली आहे. बुध्दिची शक्ति आपली कमी आहे कि जास्ती आहे ह्याचा विचार करता येतो त्यांना. जास्ती कशी वाढवायची हे सगळ ठरविता येत. म्हणून त्यांनी जर सत्कर्म केली तर बुध्दिचा पुष्कळ विकास होऊ शकतो. न्यायाने वागणारा जो आहे त्याला यश मिळत, जय मिळतो. हेच सांगितले आहे रामायणामध्ये.

राम लक्ष्मण दोघेच होते ना, पंचवटीत राहात होते. आणि सीतेला घेऊन गेला रावण. कोण आला, कोणी सीतेला नेल याचा पत्तासुध्दा नाही. तो पत्ता शोधून काढायचा . तो कुठ असेल शत्रु तिथ जायच, त्याला शासन करायच हे त्या दोघांनी ठरविल. किती कठीण होत. तो काही इथ राहाणारा नव्हता. समुद्राच्या पलीकडे राहाणारा. परंतु हळू हळू निश्चय असल्यानंतर मनामध्ये आणखीधर्माबद्दल जर पूर्ण विश्वास श्रध्दा असेल आणि अधर्माबद्दल जर चीड असेल, राग येत असेल, अधर्माबद्दल राग आला पाहिजे. दुसरा अधर्माने वागतो, दुसरा पापकर्म करतो ते बर वाटत नाही हे कोणाला शक्य आहे कि जो स्वत: पाप करीत नसेल, त्याला राग येईल.

रावण चांगला वागत नाही हे बिभिषणाने सांगितले. बिभिषणहि त्यापैकीच असता तर तो कशाला सांगेल? सगळे एकाच माळेचे मणि झाल्यावर कोण कोणाला उपदेश करणार?

म्हणून स्वत: आणखी "सत्कर्म योगे वय घालवावे" हा एक सिध्दांत लक्षात ठेवून आपली मानसिक शक्ती उत्तम झाली पाहिजे. मारुतिरायांसारख काम करण्याचा प्रसंग आला तर तस कराव कि काय त्या बद्दल नाही. परंतु आपल्याला जे ईश्वराच दर्शन करायच आहे. काय सृष्टी म्हणजे काय आहे? ईश्वराने केवढी सृष्टी

केलेली आहे, काय ज्ञान आपखी सृष्टीमध्ये आहे हे सगळ समजून घ्यायच अशी जर जिज्ञासा असेल तर त्याकरता मानसिक शक्तिचा विकास झाला पाहिजे. तर ते ज्ञान होऊ शकत. त्या करता ईश्वराची उपासना पाहिजे. हे सगळ मनुष्या करताच आहे. "उपासनेला दृढ चालवावे" हे मनुष्यच करु शकणार आहे. ईश्वर म्हणजे कोण आहे काही सामान्य तरी कल्पना पशुपक्ष्यांना कधीच नाहीये. देवांना सुध्दा जिथ येत नाही. देव झाले तरी जीवच आहेत कि नाही, आपल्या प्रमाणे. मनुष्य जरी नसले, काही विशेष मोठी शक्ति असेल त्यांच्या जवळ. पुण्यबलाने काही सामर्थ्य त्यांनी मिळवलेले असेल. अदृष्य होण, एकदम दृष्य होण, कुठहि दूर निघून जाण, अशा काही शक्ति असतील त्यांच्याकडे परंतु ईश्वर दर्शन व्हावे अशी इच्छा नाहीये. आपल्याला मिळालेल्या सुखामध्येच आणखी मग्न झाले आहेत.

जितेंद्रियम् बुध्दिमतां वरिष्ठम् ही स्थिती तिथ नाहीये, देवांच्याजवळ सुध्दा. म्हणून आणखी मानव जन्म जो आलेला आहे त्यात ईश्वराचा संबंध आहे. संत महात्मे जे आहेत सद्गुरु यांचा संबंध आहे. आणि स स्वत:च कर्म जे आहेते चांगल आहे कि नाही ते पाहिल पाहिजे. अशा तीन गोष्टी मनुष्य जन्मामध्ये मुख्य सांगितल्या आहेत. आणि इतकी सगळी स्थिती आल्या नंतर सुध्दा "सर्वा मुखी मंगल बोलवावे" हे शेवटी सांगताहेत, समर्थ.

सर्वांच्या कडून आणखी मंगल जे आहे ते वदवून घ्या. ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे हा सर्वांना उपदेश नंतर करायचा अगोदर आपली स्वत:ची तयारी पूर्ण करून घेतली पाहिजे. आपली इंद्रिय आपल्या ताब्यामध्ये आली पाहिजेत. त्यापैकी मन हे ताब्यात येण अतिशय कठिण आहे. मनाचा निग्रह हा ज्याला साध्य झालेला आहे त्याला सगळ साध्य झालेल आहे. प्राणाचा निग्रहही त्याचा होऊ शकतो. प्राणवायूही त्याला थांबवता येतो. मन स्थिर झाल्यावर प्राणवायूही स्थिर होतो.

दोन मार्ग आहेत.

सांगितलेला आहे. त्याने प्राणवायू स्थिर करण. कुंभक ज्याला म्हणतात. श्वासोच्छ्वास घेतो आपण, बाहेर जाण, आत येण आणि थांबण. बाहेर गेल्यानंतर थांबण हा बहिर्कुंभक आहे आत घेतल्यावर थांबण हा अंतर्कुंभक आहे. आणि असा नुसता प्राणवायू जर स्थिर झाला, थांबू शकला तर त्याच्या योगेकिती तरी मोठ्या शक्ति उत्पन्न होतात. हे एक प्रयोगशास्त्र आहे. अभ्यासाचे प्रकार आहेत. सांगणारे लोक पाहिजेत. त्या रितीने मनाला स्थिर करता येत. किंवा विचार करून संताच्या संतांच्या संगतीने, ईश्वराची चरित्र, साधुपुरुषांची चरित्र वाचून , संतांचे अनेक ग्रंथ आहेत. त्या ग्रथांवरून मार्गदर्शन मिळवून जर मन हे ह्याच मार्गानि स्थिर झाल तर प्राणवायूही स्थिर होईल. त्या योगाने मानसिक शक्तिचा पुष्कळ विकास होतो.

हा सगळा शक्तिविकास पूर्ण झाल्यानंतर मग "सर्वां मुखी मंगल बोलवावे" हे आहे. उगीचच सर्वांना काही उपदेशकरण, सभा सम्मेलन, प्रवचन ठेवण. काय उपयोग आहे? अगोदर तुमच्या जवळ काही आहे का?

मग दुस-यांना वाटा. अगोदर आपल हित साधून घेतल्या नंतर ईश्वराच्या आज्ञे-प्रमाणे कार्य करण. ईश्वर सगळ्यांच्याकडून ते कार्य करून घेतो आहे. किती तरी त्याच, ईश्वराच कार्य जगामध्ये चालू आहे.

काही तरी दोन तीन महिन्यापूर्वी नाशिकची, ब्राह्मण मंडळी अमेरिकेत गेली. तिथे काहीगणेशाच्या शंकराच्या मूर्ति स्थापन करायच चाललेल आहे. तर तिकडे सुध्दा अशा प्रकारच कार्य चाललेल आहे. कोणी तरी तसा ईश्वरभक्त असतो. त्याला प्रेरणा होते. ईश्वराचा आदेश होतो त्या प्रमाणे. सर्व ठिकाणी चाललेल आहे. मोठी मोठी मंदिर होत आहेत. चाललेल आहे, परदेशातसुध्दा.

तर अशा रितीने वैयक्तिक उध्दार वैयक्तिक कल्याण साधण हे मार्ग आहेत. ईश्वराची उपासना अखंड चालू राहाण. नामस्मरण म्हणा. जपयज्ञ आहेत. तो जपयज्ञ चालू राहाण. अमूकच कार्य कराव अस काही नाही. सर्व काल करता येत, नामस्मरण, नामजपयज्ञ. कधीहि. ईश्वराची उपासना आहे. नवविधा भक्ति आहे. ईश्वर भक्तिचे नऊ प्रकार सांगितले आहेत, शास्त्रकारांनी. श्रवण करण. नुसती श्रवण भक्ति. ईश्वराची अनंत लीला आहे. किती अवतार घेतले ईश्वराने. काय काय अवतार घेऊन काय काय केले, कुणा कुणाचा कसा कसा उध्दार केला हे नुसत ऐकल तरी सुध्दा श्रध्दा आपल्या मनामध्ये उत्पन्न होते. जास्ती दृढ होते. ईश्वर प्रेम निर्माण होते. आणखी खरी उपासना त्याच्या नंतर घडते. त्या उपासनेमध्ये काय गुणदोष आहेत ते घालवण्याकरता संत महात्मे आहेत. त्यांची संगती करून त्यांच्या जवळ नम्रपणे वागून यथाशक्ति सेवा करून सतत मार्गदर्शन मिळवण आणि ते मिळवल्या नंतर सत्कर्म आपण करीत राहण , नियमीत. हे तीन मार्ग वैयक्तिक उध्दाराचे आहेत.

आणि याच्या नंतर मग सर्वा सुखी मंगल बोलवावे. समाजाकडे लक्ष नंतर द्यायचे आहे. समाजाला उपदेश करायला तितकी योग्यता पाहिजे ना. उपदेश करण्यापेक्षा आपल्या एकंदर मनाकडे, इंद्रियांकडे निरिक्षण करून आपल्या जवळ काय दोष आहेत ते घालवण. कोणते गुण पाहिजेत ते मिळवण. हा प्रयत्न आणखी मुख्य करायचा आहे. म्हणून वैयक्तिक आणि सामुदायिक दोन्हीही गोष्टी संतांनी सांगून दिलेल्या आहेत. समाजाकडे लक्ष नाही अस नाही. पुष्कळ संतांच कार्य तर समाजाकरताच झालेल आहे. त्यांनी ईश्वराची उपासना करून आपल्या मानसिक शक्तिचा विकास इतका करून घेतलेला आहे. त्यांची शक्ति इतकी मोठी आहे की, त्यांना जरी एखादा कोणी अज्ञानी म्हणा, पापी मनुष्य जरी भेटला तरी त्याचा उध्दार करण्याची शक्ति त्यांच्या कडे आहे. चांगल वागाव असा नुसता उपदेश करून काय उपयोग आहे. खर बोलतचला अस चारचौघांना नुसत सांगून काय उपयोग?

मनामध्ये निरनिराळे विचार येतात आणि मन आवरल जात नाही. त्यामुळे कामक्रोधादिक विचार जे मनामध्ये उत्पन्न होतात त्यांनीही काही पातके आपल्या हातून घडतात. ती पाप न घडू देण्याची शक्ति संतांकडे आहे. ईश्वराची शक्ति त्यांनी मिळविलेली आहे. त्यांच सत्कर्म इतक चाललेल आहे अखंड कि त्यामुळे त्यांची शक्ति संपतच नाही. ईश्वरशक्तिशी त्यांचा संबंध जोडून गेलेला आहे. महानदीशी जोडणारा एखादा कालवा काढल्यावर महानदीतल पाणी शेतात काय किंवा कालव्यात काय अखंड येत राहणार आहे.

अनेक ग्रंथ संतांनी करून ठेवलेले आहेत. कोणते दोष आहेत, कोणतेगुण आहेत. हे सगळ त्यांनी आणखी व्यवस्थित आपल्या पुढे मांडून ठेवलेले आहेत. महाराष्ट्राचे तर किती तरी भाग्य आहे. ज्ञानेश्वरी काय, भागवत काय, दासबोध काय, किती

तरी संतांचे पुष्कळ ग्रंथ मराठीमध्ये आहेत. त्यामुळे आपल्याला सहज मार्गदर्शन होऊ शकते. आणि हे एकदा समजून आल्यानंतर त्याप्रमाणे कोणते दोष माझ्याजवळ आहेत हे आपल्याला ओळखता येईल. आपण दुस-याचे दोष पहायचा अभ्यास करतो ना । स्वत:च्या दोषाची आम्हाला काही जाणीवच नाही. आमची चूक कधीही होत नाही अशीच कल्पना आम्ही करून घेतली आहे. दुस-याची चूक मात्र काढतो.

जर स्वत:चे दोष पहाण्याचे ज्ञान झाल किंवा तशी प्रवृत्ती झाली तर सुधारणा आहे. दुस-याचे दोष पाहून आणखी ते घालवण्याची शक्ति नसेल तर ते दोष पाहून आणि बोलून दाखवून काय उपयोग ? राग द्वेषभाव उत्पन्न होतात. त्यापेक्षा आपल्या मनाचे आत्म निरीक्षण करून अनावर दोष कोणते, आवरता येण्यासारखे दोष कोणते हाही विचार केला पाहिजे. अनावर दोषांकडे जास्ती लक्ष दिले पाहिजे. ते आवरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शरीर असे पर्यंत आपल्या मनामध्ये उत्पन्न होणा-या कामक्रोधाचा वेग जो आवरतो कामक्रोध टाकतो - ज्यांनी कामक्रोध टाकूनच दिले ते फारच मोठे आहेत. पण कामक्रोध आवरणारा खरा योगी आहे. आणि ते पाहिजे. व्यवहारामध्ये त्याची जरूरी आहे. कामक्रोध संपूर्ण च जर गेले तर कोणी व्यवहारात तरी कस वागेल ? कोणाला उपदेश करायचा झाला तर त्याला राग आलाच पाहिजे. रागाशिवाय दुस-याला कस बोलणार? म्हणून काम, क्रोध, लोभ वगैरे जे विकार आहेत त्यांना आवरण्याची शक्ति ज्याच्याजवळ आहे तोच योगी आहे. तोच सुखी आहे.

तर मनुष्याला हे सगळ करता आल पाहिजे. त्याच्या शक्तिचा विकास करून घेण्याची त्याची इच्छा असेल तर तो होईल. इच्छाच नसेल त्याला काही उपयोग नाही. गीता ज्ञान काय सगळ्यांसाठी थोडच आहे. जो तसा जिज्ञासू असेल, आपल्या मनामध्ये उत्पन्न होणारे दोष ज्याला दूर करायचेत, त्याचे काही उपाय सांगणारे कोणी आहेत हे ज्याला कळाव अस वाटत त्याच्या सारख्यांकरता हे सगळे ग्रंथ आहेत. भगवद्गीता काय किंवा इतर कोणतेही ग्रंथ काय, संतांनी लिहिलेले सगळे ग्रंथ त्याच्याकरता आहेत.

ज्यांना ती इच्छाच नाही, आपल आपल चाललय, कशाला दुसरीकडे लक्ष द्यायच, देवाचे नुकसान असे म्हणणा-यांसाठी हे नाहीच आहे. सगळी अनुकूलता आहे. वाटेल तितकी संपत्ती आहे, वाटेल तितका ऐष आराम, सगळ आहे तिथे काही नाही. हा विचारच नाही. त्यामुळे आणखी आपला उध्दार करून घ्यायचा ह्याचे ज्ञानच नाही. "बुध्दिमतां वरिष्ठम्" होता येतय कि नाही, होता येणशक्य आहे का, त्याच्याकरता काय उपाय आहे हे आपल्याला समजले पाहिजे. समजल्या नंतर संतांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागण्याची तयारी पाहिजे. प्रयोग करून पहायचा आहे ना ।. औषध देणारा उत्तम तज्ज्ञ आहे. डॉक्टर आहे, वैद्य आहे. आणि त्याने रोग जाणलेला आहे. त्या रोगाचे औषध त्याला माहिती आहे. ते औषध घेण्याचे काम रोग्याचे आहे.

पण तोच जर चिकित्सा करत बसला तर काय उपयोग? जाईल कि नाही रोग असाध्य जर तो विचार करु लागला तर त्याला डॉक्टर वैद्य काय करणार? त्यांचा काही दोष नाही.

तर अशा रितीने आत्मकल्याण करण्याकरता हे उपाय सांगितलेत संतांनी. आणि नंतर समाजाचे कल्याण करण्याची शक्ती त्यांच्याजवळ उत्पन्न होते. ईश्वराची शक्ति त्यांच्या पाठीमागे आहे. मारुतिराय एकटे गेले पण त्यांनी भिती वाटली नाही. दुर्योधन फारच त्रास द्यायला लागला. द्रोणाचार्यांनी चक्रव्यूह तयार केला. अर्जुन त्या वेळी दुसरीकडे लढाईत गुंतला होता. मग अभिमन्यू म्हणाला, आत जाण्याच ज्ञान आहे मला पण बाहेर पडायच नाही. मोठ मोठ्या योध्द्यांची फळी मोडून मी आत जाऊ शकेन पण परत यायच ज्ञान मला नाही. थांबले नाहीत धर्मराज. ते म्हणाले, जा. आज आपला पराजय होण्याची पाळी आली आहे. अर्जुन सध्या इथे आपल्यात नाही तेव्हा तू जा. हे मोठ मोठे वीर तुला सहाय्य करायला येतील. पण ते सहाय्याला जाऊ शकले नाहीत. अभिमन्यू एकटा सापडला. आणि त्याला सगळ्यांनी मिळून मारल. पांडवाचा मोठा प्रतापी वीर होता.

तर अस जर "बुध्दिमतां वरिष्ठम्" व्हायच असेल तर त्याकरता सगळी साधन, मारुतिराय, रामचंद्रांसारख्या आदर्श पुरुषांची चरित्र आपल्या समोर ठेवली आहेत. हे अस होऊ शकत, असू शकत हा आपल्याला विश्वास वाटण्याकरता आदर्श पुरुषांची चरित्र आहेत. आणि ते जसे वागले त्याप्रमाणे आपण वागण्याचा प्रयत्न केला तर आपल्यालाही तशी स्थिती प्राप्त करून घेता येण शक्य आहे. अशा मोठमोठ्या चरित्रावरून ते दिसत आहे. पुष्कळ पुराणे केली व्यासांनी. पण आता तिकडे कोणाच लक्ष नाहीये. स्वराज्य मिळाल्याबरोबर हिंदू कोड तयार झाला. त्याच्यावर सगळा प्रयोग झालेला आहे. ऋषिंनी तयार केलेल्या स्मृती, आचार संहिता इकडे लक्ष नाही. हिंदू कोण असतील त्याप्रमाणे निर्णय द्यायचे अशी स्थिती आहे. आपला उध्दार करुन घेण्याकरता श्रेष्ठ पुरुषांनी काय सांगितल आहे ते पहाण, समजून घेण आणि त्याप्रमाणे आचरण करण्याचा प्रयत्न करण. त्यामुळे त्यांचा जो आदर्श आहे तो खरा आहे. तसे होण्याचे जे उपाय आहेत ते खरे आहेत. असा ज्याला अनुभव यायला लागला तो ईश्वराच्या दर्शनाने, आज्ञेने उपदेश करु शकतो आणि त्याप्रमाणे लोकांचेही कार्य होऊ शकते.

एकदम कोणी मारुतिराय होणार नाही. एकदम रामाप्रमाणे होणे शक्य नाही. परंतु अनेक जन्मांचा अभ्यास आहे. मनुष्य जन्म आलेला आहे हा काही पहिला जन्म नाही किंवा शेवटचा जन्म नाही हे आपल तत्वज्ञान आहे. हे पुष्कळ काळ चालणार आहे.

तेव्हा मानव जन्माला येऊन वाईट संस्कार कोणते आहेत, चांगले कोणते आहेत हे जाणण्यासाठी आमच्या मनाचे निरीक्षण जर आम्हीच केले नाही तर दुसरा कोण करणार? म्हणून आमच्या मनाच निरीक्षण करून आणि त्याप्रमाणे गुणदोष जे असतील ते सगळे व्यवस्थित रीतीने घालविण्याचा प्रयत्न करण हेच आवश्यक आहे. ऋषिंच म्हणण हेच आहे कि आपल्या बुध्दिकडे लक्ष द्या. मन वगैरे जे आहे ते कोणाला आवरण्यासारख आहे, मानसिक शक्तिचा विकास होऊ शकतो. अशक्य नाही. सगळ खोट आहे अस म्हणायला हे सगळ खोट आहे अस मानायच? त्यांनी एकदा सांगितलेल आहे खोट कशावरून आहे हे ठरविण कस शक्य आहे. इतके मोठे महर्षि लिहिताहेत त्यांना खोटे म्हणजे लोकांना फसवायच काम करायच का? त्यांनी घडलेली हकिकत लिहून ठेवली. त्यांना त्याच काय!

आपण आपल कल्याण करण्याचा प्रयत्न करायचा हेच सगळ्या संतांना सांगायच आहे. आणि ते सांगितलेल खोट ठरत नाही हा महत्वाचा शोध आहे. उपासनेला दृढ चालवावे, भूदेव संतांसी सदा नमावे। सत्कर्म योगे वय घालवावे हा एक भाग म्हणजे वैय्यक्तिक सगल कल्याण त्याच्यामध्ये आहे. ईश्वरदर्शन ज्यांना झालेल आहे अशा भूदेव संतांची संगती करुन, त्यांच्या मार्गदर्शनाने आपण शुध्द कर्म करायची. समाजाला उपदेश करण्याचा अधिकार शेवटी आहे, आपल वैय्यक्तिक कल्याण ज्यांनी करुन घेतलल आहे त्यांना. पूर्ण हित ज्याने साध्य करुन घेतल आहे तोच दुस-याला उपदेश करु शकतो. त्याने केलेला उपदेश सफल होतो. नाहीतर होणार नाही. नुसत सांगून काही उपयोग नाही.

अशा रीतीने आपल्या भारत वर्षामध्ये ईश्वराची उपासना ही अखंड चाललेली आहे. ईश्वराचे अस्तित्व हे भारतवर्षाचे भाग्य आहे. आणखी ईश्वर दर्शन ज्यांनी घेतल आहे अशा संतांच महत्व हेही भारतवर्षामध्ये आहे. ईश्वराची उपासना आणि संतांची उपासना असे दोन उपाय आहेत भारतात. आपली बुध्दि सर्व कार्य करु शकत नाहीये. आपली बुध्दि अस्थिर आहे. स्थिर नाहीये. सर्व जाणू शकत नाहीये. एक व्यक्ति अधिकारी असो किंवा अनेक लोकांची लोकशाही असो त्यांना सुध्दा हे कार्य करता येत नाही. सगळ्यांची बुध्दि मिळून जरी कार्य करीत असली तरी होत नाही. काही तरी वेगळी नियामक शक्ति मानावी लागते. म्हणून भारतामध्ये ईश्वर दर्शन झालेल्या माहात्म्यांची शक्ति मान्य आहे. आपल्या सारख्या सामान्य लोकांना ह्या दोन उपायांची कास धरावी लागणार आहे. प्रसंग आल्यावर साम्यवादी लोकांनाही इतरांना सांगाव लागत. - करा आता तुम्ही काही तरी उपाय. चीनशी युध्द सुरु झाल्यावर नेहरुंनी काशीच्या पंडितांना मोठा यज्ञ करा, अमूक करा असे सांगितले. त्यांनी उत्तर दिले यज्ञ करायला, तुमची अगोदर भूमि तरी शुध्द आहे का. यज्ञाला भूमि शुध्द पाहिजे. ह्या भूमित असंख्य गोहत्त्या चालू आहेत. केवळ अर्थशास्त्र सांगणारे तुम्ही. धर्मशास्त्र तुम्हाला मान्य नाही. पुष्कळ गायी मारल्या म्हणजे त्यांच्या मासाच्या निर्यातीने तुम्हाला पुष्कळ परकिय चलन मिळते त्यांना हे केवळ अर्थशास्त्र आहे. अशा भूमिमध्ये धर्मकार्याचा काहीही उपयोग होणार नाही, हे स्पष्ट सांगितल.

तर हा सगळा सांगोपांग विचार करणारी बुध्दि आणि त्याप्रमाणे हे सगळ धर्मकार्य करायच, सामाजिक कार्य करायच किती कठिण झालय. म्हणून केवळ राज्यसत्ता मिळाली म्हणजे अर्थ आणि काम एवढयापुरतीच सत्ता मिळाली. त्यातही पुष्कळ दुःखे आहेत. सर्व दृष्टींने अनुकूलता ही स्वराज्य मिळाल्या नंतर सुध्दा होऊ शकत नाहीये. किती हत्त्या घालल्यात, किती अतिरेक्यांची नावे सांगून येतात काय, काय चाललय. इथ राष्ट्रपती काय करु शकतात का? एकदम शक्य आहे का?

आमच्या धर्मात म्हणून ईश्वर शक्ति मानलेली आहे. आपल्या शक्तिचा काही उपयोग करायचा नाही असा त्याचा अर्थ नाही. मारुतिरायांनी केलाय की। न्यायी मनुष्याकरता आपल्या शक्तिचा उपयोग करायचा आहे. रामाच्या करता आपल्या शक्तिचा उपयोग करायच त्यांनी ठरवल. बिभीषण जरी रावणाचा भाऊ होता तरी त्यानेसुध्दा रावणाला सोडून दिल होत.

रावणाचा पक्ष हा न्याय पक्ष नाहीये.

"सत्कर्म योगे वय घालवावे" नुसत वाचून आणि ऐकून होत नाही. कोणत सत्कर्म आहे ते मी सत्कर्मच करणार आहे. तसच कर्म करणार आहे. रामशास्त्री प्रभुण्यांनी त्या पंतप्रधानांनाही सांगून दिले कि तुमच्या हातून ब्रह्महत्या झालेली आहे. मी या पुण्यामध्ये पाणीसुध्दा पिणार नाही. आणि राजीनामा देवून टाकला. सभेमध्ये सांगितलेले आहे. त्याना धरा, मारा म्हणून आदेश दिलेला आहे. मग दुसरे जे कोणी होते शिंदे बिंदे त्यांनी समजावले. त्यांच्या केसाला धक्का लागला तर आम्ही तुम्हाला मारु म्हणून. त्या सभेमध्ये हे येणार. मग ते रामशास्त्री सुटले. त्यांना तिथ एकट मारल असत. स्पष्ट बोलणारा मनुष्य. पण इतक धैर्य पाहिजे ना। ते धैर्य कस मिळणार ? धैर्य उत्पन्न होण्याकरता ही ईश्वराची उपासना आहे. ती शक्ति मान्य केली पाहिजे.

मानसिक शक्तिचा उत्तम आणि कितीतरी विकास होतो. दुसऱ्याच्या मनावर तो परिणाम करु शकतो, आपल्या वाणीन म्हणा आचरणाने म्हणा. हे सगळ आणखीसाध्य होऊ शकत. आपल्या भारतामध्ये सर्व संतांनी ईश्वराची अखंड उपासना करण्याचा प्रयत्न केला. प्रार्थना केली. ज्ञानेश्वर महाराजांनी प्रार्थना केली - किंबहुना सर्व सुखी, पूर्ण होऊन तिन्ही लोकी, भजी जो आदी पुरुषीअखंडीत।। सगळी सुख मिळाली आहेत. आणि काही नको. सगळी सुख मिळू देत सगळयांना. परंतु सुख मिळाल्यानंतर सुध्दा ईश्वराची उपासना त्यांनी सोडू नये एवढी प्रार्थना आहे. त्यांची बुध्दि जागेवर ठेवा. ईश्वरापासून जर बुध्दि बाजूला झाली तर त्याचा काही उपयोग नाही. म्हणून समर्थांच हे सांगण आहे. ज्ञानेश्वर काय किंवा एकनाथ महाराज काय हेच सांगितलय सगळयांनी. ह्याचा विचार आपल्या मनामध्ये रहावा म्हणून तर संतांचे ग्रंथ वाचायचे. अगदी मराठीमध्ये आहेत. बुध्दिवाद, बुध्दिवाद म्हणजे काय? हे कठिण आहे म्हणून सोडून द्यायच. वाचनाचेही कोर्स निघाले आहेत. अर्थ भाषांतर केलेले आहेत. सगळ केलेल आहे.

प्रयत्नांनी एकदा समजायला लागल म्हणजे सगळ समजत. पुष्कळ आणखी विधी इथ आहेत. ताई दामल्यांच चरित्र म्हणजे वरदान म्हणून लिहिल आहे. ओवीबध्द नीलाताईंनी लिहिलेल आहे. त्यांनी अखंड ज्ञानेश्वरीचा अभ्यास केला. अलिकडच्या काळात त्या होऊन गेल्या. अठ्ठयाण्णव वर्ष वय त्यांच होत. अखंड ज्ञानेश्वरीचा अभ्यास आहे. संसारामध्ये कितीतरी स्त्रियांना त्यांनी धैर्य निर्माण केले. त्यांचे संसार चांगले केले.

ठेविले अनंते तैसेची रहावे। चित्ती असू द्यावे समाधान।

म्हणतात तुकाराम महाराज. हे शिकवल त्यांनी आम्हाला. हे ज्ञानेश्वरीच्या बळावरच त्यांनी शिकवल. सगळया संतांनी आणखी याप्रमाणे बळ मिळवलेल असत. आणि लोकांना उपदेश करीत असतात. त्यांना काही स्पेशल मोटार राजशासनाकडून लागत नाही किंवा त्यांची काही व्यवस्था करावी लागत नाही. पायांनी जायच, यायच. काही कुणाच्या जवळ मागायच नाही. उपदेश करायचा म्हणजे गावातही कुणाजवळ मागायच नाही. रात्रभर रहायच आणि दुसऱ्या दिवशी निघून जायच. त्यांच हे कार्य सारखचाललेल आहे. ईश्वराच्या कृपेन हे आपण पाहून आणि त्याप्रमाणे आपण परस्पर प्रेमाने रहाव. आणखी हे करायच आहे. देवतेजवळ प्रार्थना म्हणून करायची आहे, कि हे जरी सांगीतलेले आहे ईश्वराची शक्त आमच्या पाठीशी रहावी आणि आमच्या हातून पुण्यकर्म घडावीत. एवढ धैर्य आणि एवढी शक्ति आम्हाला द्यावी एवढीच प्रार्थना ईश्वराजवळ आहे.

मुलुंड २७.११.९६.

।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ।।

-:-:-:-:-

श्री गुरुदेव दत्त ।।

देव्या यया ततमिदं जगदात्मशक्त्या
निश्शेषदेवगणशक्ति समूहमूर्त्या ।
तामम्बिकामखिलदेवमहर्षिपूज्यां
भक्त्या नताः स्म विदधातु
शुभानि सा नः ॥

आचार्य श्री जगन्नाथ शास्त्रीजी पद्दे यांच्या पुण्यदिनानिमित्त हा उत्सव प्रतिवर्षाप्रमाणे चालू झालेला आहे. या प्रसंगी व्यवस्थापकांनी काही सेवा करण्याकरता आम्हालाही याच्यामध्ये सहभागी केल. या बद्दल प्रथमत: त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून विषयाचा परामर्श घ्यायचाय.

आचिनोतिच शास्त्रार्थान् आचारे स्थापयत्यापि।
स्वयमाचरतेयस्तु स आचार्य इति स्मृत:।।

आचार्य शब्दाची व्याख्या शास्त्रकारांनी या प्रमाणे केली आहे. संपूर्ण शास्त्रार्थ संग्रहकरण, शास्त्रार्थाच ज्ञान घेणे ही पहीली भूमिका आहे, आचार्यांची आणि त्या ज्ञान प्रभावाने "आचार्य स्थापयत्यपि". व्यक्तीला मिळालेल ज्ञान या ज्ञानाचा उपयोग सर्वही अज्ञानी जीवांना होण योग्य आहे. त्या करता इतर जे लोक आहेत त्यांना त्यांचे त्यांचे आचार समजावून देऊन त्यांच्या त्यांच्या कर्तव्याच्या ठिकाणी स्थिर करण, ही दुसरी आचार्य भूमिका आहे. आणि याच्यापेक्षा तिसरी महत्वाची म्हणजे "स्वयमपि आचरे :" स्वत: त्या ज्ञानाप्रमाणे आचरण करण. "ज्ञान कर्म समुच्चय " हा सिध्दान्त दृष्टया मान्य नाहीये आचार्यांना, परंतु ते ज्ञान निराळ आहे. कर्माच ज्ञान तर आवश्यक पाहिजे प्रथमत: त्या शिवाय कर्मानुष्ठान व्यवस्थित होऊ शकत नाही.
जर तपानुष्ठान झाल तरच "वीर्यवत्तरे भवती" अस त्याच फल उपनिषदामध्ये सांगितल आहे.

हा ज्ञानकर्मसमुच्चय आवश्यक आहे. कर्माच व्यवस्थित ज्ञान संपादन करून आणि त्या प्रमाणे कर्मानुष्ठान जर . झाल तर त्याच फल हे पदरामध्ये पडू शकत.

तर हे आचार्य म्हणून जे झालेले आहेत, आचार्य शब्दाच महत्व सांगितल आहे, शास्त्रकरांनी, त्या इच्छा शक्ती, ज्ञानशक्ती आणि क्रियाशक्ती या तिघांचाही समन्वय या आचार्यांच्या मध्ये झालेला आहे. ज्ञानार्जन करताना तर इच्छाशक्ती पाहिजे, जिज्ञासा ज्याला म्हणतात. तीव्र जिज्ञासा असल्याशिवाय ज्ञानार्जन होऊ शकत नाही. सध्या जिज्ञासाच कमी कमी होत चालली आहे, भारतामध्ये ही फार खेदाची गोष्ट आहे. प्राचीन काली अनेक बुध्दिशक्तींचा विकास करून घेऊन जितक ज्ञान आपल्याला मिळवता येईल तितक ज्ञान मिळविण, ज्ञानधन होण या करता प्रयत्न होत असत. तर ती जिज्ञासाही त्याला तितकीच पाहिजे. संक्षिप्त शारीरक वरती मधुसूदन सरस्वतींनी टीका केलेली आहे. त्या ठिकाणी एका श्लोकात उल्लेख करताना शाबर स्वामी बद्दल त्यांनी सांगितलय

सहस्त्र शाखा:अर्थतोपि वेत्ति
शाबर स्वामी इति ऐतिह्यम्।

सहस्त्रशाखा अर्थत: अपिवेत्ति म्हणजे शब्दाच तर ज्ञान आहेच आहे परंतु अर्थाचाही रहस्य ज्ञानं शबरस्वामींना होत अस म्हणतात. तर ही जी बुध्दिची शक्ती आहे, ही ज्ञानशक्ती वार्धिवण्याकरता जिज्ञासा-- इच्छाशक्ती जिला म्हणतात तीही पाहिजे. आणि त्या नंतर त्या इच्छाशक्तीच्या प्रभावाने ज्ञान प्राप्त करून घेऊन आणि ज्ञानशक्तीन सर्वही लोकांच अज्ञान दूर करायच, आणि त्यांच्या कर्तव्याच्या ठिकाणी त्यांना स्थिर करायच, ही दुसरी अवस्था आणि स्वत:ही त्या प्रमाणे आचरण करायचआदर्श म्हणून पाहिजे. या दृष्टीने आचार्य शब्दाचा अर्थ आचार्य जगन्नाथ शास्त्रीजी पदे यांच्या ठिकाणी अत्यंत योग्य लागतो आहे. त्यांनी मिळवलेल ज्ञान, आणि ते ज्ञान मिळवण्याकरता त्यांना मिळालेली ईश्वर दत्त अशी बुध्दिशक्ती. बुध्दिशक्ती शिवाय ज्ञानार्जन तरी होणार कसं? सांगणारे जरी असले तरी सुध्दा "विपरती गुरु प्राज्ञे विद्याम् यथैव तथा जडे।" म्हणून भवभूतींनी सांगितलेल आहे. ज्ञान देणारे समर्थ जरी असले तरी ग्रहण करणारी बुध्दि ज्या प्रमाणे असेल त्या प्रमाणे ज्ञानसंक्रमण होत. पण यांच्या जवळ निसर्गत:च ईश्वर दत्त बुध्दि आहे. इतरही त्यांच्या मार्गदर्शना प्रमाणे, सर्वही विषयांच मर्मज्ञान त्यांनी मिळवल होत, त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून घेत. आणि स्वत:ही त्याप्रमाणे आचरण करत. ह्या आचार्य शब्दात सांगितलेल्या तीन भूमिका त्यांच्या ठिकाणी असल्यामुळे संपूर्ण भारतामध्ये त्यांच अशा प्रकारच वैशिष्टय होत. सर्व लोकांना ते कळून आलेल नाही म्हणा तरी ही सर्व मंडळी त्यांच्या ह्या भूमिका जाणणारी आहेत. ह्या जाणिवेप्रमाणे त्यांच स्मरण प्रतिवर्षी आपल्याला राहाव म्हणून या उत्सवाची योजना त्यांनी केलेली आहे.

विद्याभ्यासनं व्यसनं
अथवा हरिपाद सेवनं व्यसनं।।

असे जे सांगतात अभियुक्त ही दोन व्यसन आचार्य भूमिका जर प्राप्त करून घ्यायची असेल, केवल दुसऱ्याला सांगण्याकरता वाक्शक्ती किंवा ज्ञानशक्तीचा उपयोग नाहीये. "सर्वा मुखी मंगल बोलवावे" समर्थांनी जरी सांगितलेल असल तरी स्वत: त्याप्रमाणे आचरण केल पाहिजे. त्याला विशेष महत्व आहे. मिळवलेली ज्ञानशक्ती ही तेजस्वी राहाण्याकरता म्हणूनही स्वत: त्याप्रमाणे आचरण केल पाहिजे. त्यालाही प्रयोजन आहे. ज्ञान शब्दाची व्याख्या आचार्य महाराजांनी --

तद ज्ञानं प्रशमकरं यद इंद्रियाणां।

अशी केलेली आहे. ही भूमिका प्राप्त करून घेण्याकरता आचार्य भूमिका प्रयोदस आहे. यात प्रयाच समर्थन केल पाहिजे. तरी ही भूमिका प्राप्त करून घेण्याकरता - विद्याभ्यसनं व्यसनं अथवा हरीपाद सेवनं व्यसनं हे मुख्य त्यांनी सांगितल आहे. यालाही व्यसन शब्द वापरला आहे त्यांनी. पण या व्यसन शब्दाचा अर्थ थोडा निराळा आहे. लौकिक, व्यवहारात व्यसन शब्दाचा अर्थ वेगळा आहे.

अस्य ते विशेषेण अस्य ते क्षिप्यते अनेन

श्रेयत: क्षिप्यते असल व्यसन हे व्यवहारिक व्यसन आहे. आणि विद्या व्यसन किंवा हरिपादसेवनं हे जे व्यसन आहे, "आश्रेयस:अस्य ते अनेन" अशा प्रकारच आहे. श्रेयापासून दूर करणार हे विद्या व्यसन किंवा हरिपादसेवनं हे व्यसन अश्रेयसापासून दूर करणारे. तेव्हा ही अशी दोन्हीही व्यसन पदेशास्त्रीजींना होती. हे सर्वांना माहीती आहे. पूर्ण भगवतभक्ती त्यांच्या ठिकाणी होती. म्हणून भगवद्गीतेचा विशेष अभ्यास करून पुष्कळ वर्षे या ठिकाणी प्रवचने वगैरे केली, अस सर्व मंडळींनी सांगितलेल आहे. जिज्ञासू मंडळी, आताच व्यवस्थापकांनी सांगितल्याप्रमाणे, मुख्य श्रोते म्हणून बसत होती. अशा जिज्ञासू मंडळींची जिज्ञासा व्यवस्थित रीतीने पूर्ण करून भगवद्गीतेचे मर्म समजावून सांगता येईल अशी ज्ञानशक्ती त्यांनी मिळवली होती. त्यामुळे त्यांच्या या स्मृती दिनी यथामति काही तरी वाङ्मय सेवा करायची. ते विभूतीरूप मानायला हरकत नाहीये. ही जी ज्ञान शक्ती त्यांनी ईश्वराकडून मिळवली आहे, त्याचा उपयोग इतरांच्या करताहि त्यांनी शेवटपर्यंत केलेला आहे.

आणखी अमानित्व कायम राखून केलेला आहे. त्याला विशेष महत्त्व आहे. हे विभूतीचेच लक्षण आहे. त्या करता तीन दिवस हा जो विषय निवडलेला आहे- भगवद्गीता आणि भागवत याच्यामध्ये जो ईश्वर स्वरूपाचा विचार केलेला आहे- त्याबद्दल काही तरी थोडस चिंतन करायच आहे.

मोठ मोठी ज्ञानी मंडळी जी होऊन गेली तार्किक असो वा ' अस्तो ईश्वरा बद्दल निष्ठा सर्वांच्या चित्तामध्ये आहे. उदाहरणार्थ वेदान्तशास्त्रामध्ये सर्वही ग्रंथकार प्राय: संन्याशी झालेले आहेत. काही थोडेसे गृहस्थाश्रमी असतील – वाचस्पती मिश्र म्हणा, अप्पय्या दीक्षित वगैरे- परंतु संन्यास घेऊन, सर्वसंग परित्याग करून अखंड वेदांताचे चिंतन करणारी अशी मंडळीच पुष्कळ आहेत. आणि सर्वही शास्त्रांचा समन्वय वेदान्त शास्त्रामध्ये आवश्यक आहे. म्हणून ही सगळीही संन्यासी मंडळी व्यवहार सोडून देऊन केवळ ज्ञान मिळवण, ज्ञान भूमिका- श्रवण, मनन, निदिध्यासन, साक्षात्कार अशा क्रमान- प्राप्त करून घेण्यासाठी यांचे प्रयत्न सारखे चालले आहेत.

तर उदाहरणार्थ -अद्वैतसिध्दीचे टीकाकार ब्रह्मानंद सरस्वती म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांनी ब्रह्मानंदी ग्रंथ लिहून झाल्यावर शेवटच्या श्लोकात असे म्हटले आहे-

य:पूर्णानंदमग्नो प्यनुगतमनसो बल्लवीतां विधेयो ।
य:चैंद्रादेनियन्ता विजयहपतनूमार्जसे सावधान: ।
यश्च श्रीश: सुदाम्न: पृथुककणगणा स्वादनाभ्य
तस्य श्री पादुकाया: भवतुकृति मालिका मल्लिकाया: ।

ब्रह्मानंदी या मोठया ग्रंथात किती तरी महत्त्वाचे विचार त्यांनी मांडले आहेत अव्दैतसिध्दी सारख्या ग्रंथावर टीका लिहायची म्हणजे तो काही सामान्य ग्रंथ नाही. परंतु इतक ज्ञान ज्यांच आहे त्यांनी आपली ही सगळी कृती परमेश्वराच्या चरणी अर्पण केलेली आहे. म्हणजे ही जी काही ईश्वर भावना त्यांच्या अंत:करणामध्ये आहे त्या ईश्वरभावनेमुळे निर्माण झालेल सर्व वाड.मय त्यांनी ईश्वराला अर्पण केल आहे. असे मोठे मोठे अनुभवी तर्कनिष्णात, शाब्दज्ञान निपुण ग्रंथकार-"शाब्दे परेच निष्णातौ" अशी जी भूमिका आचार्य महाराजांनी सांगितलेली आहे त्या भूमिकेवर असणारी ही मंडळी. प्रतिपक्षाचे संपूर्ण खंडन करूनही ते आपल वाड.मय त्यांनी ईश्वराला अर्पण केल आहे.

अशी ही पुष्कळ मंडळी आहेत, तार्किक मंडळी आहेत, वेदान्ती मंडळी आहेत. तर असे जे मोठे मोठे पंडीत ग्रंथकार होऊन गेले, सर्व दर्शनांचा समन्वय. अभ्यास त्यांनी केलेला आहे. अशा मंडळीची प्रथमपासूनच ईश्वरनिष्ठा आहे. आणि शेवटी सुध्दा सर्व कृती त्यांनी ईश्वराला अर्पण केलेली आहे.

तर भगवद्गीतेमध्ये भगवंताचे स्वरूप कस आहे? भागवतामध्ये काय स्वरूप आहे. याचा आपल्याला या दोन तीन दिवसांमध्ये विचार करावयाचा आहे. भगवद्गीता ही भागवतच आहे- भगवतात् प्रोक्तं भागवतम्- या दृष्टीन. भगवद्गीता भगवंतानीच सांगितली आहे त्याला ही भागवत म्हणता येईल. आणि भागवताला भगवद्गीता म्हणता येईल. भागवतही भागवतात् प्रोक्तं. भगवंतानीचतो उपदेश आरंभाला ब्रह्मदेवाला केला. त्यांच्यापासून नारदाला असे सांप्रदाय त्यात दाखिवले आहेत.

या दृष्टीन निरनिराळी नांव जरी प्रसिध्द असली तरी सुध्दाभगवद्गीता ही भागवत होऊ शकते. आणि भागवतही भगवद्गीता होईल. रुढीच्या दृष्टीन भगवद्गीता निराळी, भागवत निराळ, अस आपण समजतो. परंतु प्रमेयाच्या दृष्टीन विचार केला असता दोन्ही ठिकाणच प्रमेय एक आहे.

भगवद्गीतेच प्रमेय काय आहे? भगवद्गीतेमध्ये काय सांगितल आहे? याचा आरंभाला बहिरंग विचार आपल्याला करायचा आहे. भगवद्गीतेमध्ये गीता सांगितल्यानंतर तो जो

श्रोता आहे अर्जुन, हा मोहमुक्त झालेला आहे, शेवटी. नष्टो मोह: अशी त्याने कबुली दिलेली आहे.

आणि भागवत श्रवण करणारा जो परिक्षित राजा आहे तो विदेहमुक्त झाला आहे. मोहमुक्ती एकाच प्रयोजन आपल्याला दिसत आणि विदेहमुक्ती हे दुसर प्रयोजन आपल्याला दिसत. विदेहमुक्त होण म्हणजे अत्यंत कठिण काम आहे. देहसंबंध अजिबात सुटण हे अतिशय कठिण आहे. गौतम महर्षिंनी सांगितल्याप्रमाणे देह संबंध सुटण्याला म्हणजे कर्माचा संबंध सुटला पाहिजे. जीवाची जी कर्म आहेत त्याचा संबंध सुटल्याशिवाय देहसंबंध सुटू शकत नाही.

तर ही सगळी जी कर्म आहेत ती संपायची कशी? मानव जन्मामध्ये कर्म संबंध सुटण्याकरता काही तरी साधन वगैरे करता येण्यासारख आहे. शास्त्र मानवांच्याकरता निर्माण झालेल आहे. तो सगळा कर्माचा संबंध सुटण अतिशय कठिण आहे. तर हा कर्मसंबंध जो पर्यंत आहे तो पर्यंत देह संबंध अनिवार्य असल्यामुळे आणि देहाच्या संबंधातून कायमच मुक्त होण हे जे फळ मिळालेल दिसतय त्या परिक्षित राजाला हेहि काही विलक्षण आहे.

ही कर्मफलमुक्ति जीवाच्या प्रयत्नांनी होईल अस सांगता येत नाही. मोहनिवृत्ती जी अर्जुनाची झालीती काही त्याच्या प्रयत्नांनी नव्हे. कारण जास्ती जास्ती मोहामध्ये मनुष्य सापडत जातो.

वनवासात गेल्यावर प्रत्यक्ष व्यास महर्षिंनी धर्मराजाला सांगितल. "तुम्हाला पुढे युध्द करण्याचा प्रसंग आहे, राज्य मिळवायच आहे त्या करता अर्जुनाने काही उपासना करावी, देवांच्यापासून अस्त्रविद्या संपादन केली पाहिजे." अस व्यास महर्षिंनी पांडवाकडे जाऊन मुद्दाम सांगितल. आणि धर्मराजाला उपदेश करून त्याच्याव्दारे अर्जुनाला मंत्रदीक्षा द्यायला लावली आणि नंतर अर्जुन देवलोकाला अस्त्रविद्या शिकण्यासाठी गेलेला आहे. शंकरांची उपासना त्याने केली. शंकर प्रसन्न झाले आणि त्यामुळे स्वर्गलोकात तो जाऊन राहिला अशी कथा आहे महाभारतामध्ये.

तिथ चार पांच वर्ष राहून सर्व देवांच्यापासून अस्त्रविद्या त्याने संपादन केली. देवांनाही त्यांनी सहाय्य केले. संगीत विद्याही तो तिथे शिकला अस वर्णन आहे.

कशाबद्दल वैराग्य पाहिजे आणि कशाबद्दल नको हाही मोठा एक विवेकाचा प्रश्न आहे. आम्हाला ज्ञानाबद्दलच वैराग्य उत्पन्न झालेल आहे. संस्कृत भाषेमध्ये जे ज्ञान आहे त्या संस्कृत भाषेबद्दलच वैराग्य उत्पन्न झालेल आहे. आणि ते सुध्दा स्वातंत्र्य मिळाल्यानंतर उत्पन्न झालेल आहे. ही एक विशेष आश्चर्याची गोष्ट आहे.

तर ज्ञानाबद्दल वैराग्य उपयोगी नाही. ज्या ज्ञानाने आपल्या चित्ताला शांति मिळविता येती, इतरांनाही शांति मिळवून देता येती, ते ज्ञान जितक जितक आपल्याला मिळेल तेवढे कल्याणकारकच आहे. शब्दज्ञान असू दे पण जर ते शाब्दज्ञान दृढ असेल तर त्या शाब्दज्ञानाचा आपल्याला पुष्कळ उपयोग करून घेता येतो.

म्हणून अर्जुनाने तिथे ज्ञान मिळवल. देवांचीही त्याच्यावर कृपा झाली. आणि इतक सगळ ज्ञान मिळवून तो परत आलेला आहे. ते ज्ञान, ती अस्त्र विद्या कशी होती हे त्याने अज्ञातवासाच्या शेवटी दाखवून दिलेल आहे.

भीष्म द्रोण अशी मोठमोठी मंडळी असलेल कौरवांच सैन्यआलेल असताना सुध्दा तसच अयोग्य सारथि त्याला मिळाला असताना देखिल एकट्या अर्जुनाने सर्वांचा पराजय केला. सर्व कौरव सैन्याला परत जाव लागल. मिळवलेल्या ज्ञानाचे काय फल मिळत हे यावरून त्याने दाखिवलेल आहे. म्हणजे त्याच्या मनामध्ये पूर्ण आत्मविश्वास आहे आणि आपण शत्रुचा पराजय करू अशी खात्री आहे.

अशी सर्व अनुकूल स्थिती आहे. परंतु ज्या वेळेस पुन्हा प्रत्यक्ष युध्दाला आरंभ होण्याचा प्रसंग आलेला आहे अशा वेळी एकदा त्या त्या लोकांकडे पाहिल्यावर त्याच्या मनामध्ये मोह उत्पन्न झाला. अविनय ज्याला म्हणतात. मोहवैचित्य आहे. चित्तवृत्ती एकदम आपखी मोहग्रस्त झाली आहे. हे सगळे माझेच आप्तेष्ट लोक आहेत, या लोकांना मीच मारायच, वगैरे

निरनिराळे विचार त्याच्या मनामध्ये, विवेक नाहीसा झाल्यामुळे उत्पन्न झाले. आणि आपल्या बुध्दिने त्याने निर्णय घेतला- हे युध्द करून उपयोग नाही. श्रीकृष्णासमोर त्याने आपलेहे मत, विचार मांडलेले आहेत. एक तर ह्या सर्व स्त्रियांच्या ठिकाणी दोष उत्पन्न होईल. स्त्रियांच संरक्षण करणार जर कोणी राहिल नाही तर स्त्रिया नष्ट होतील.

स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकर: ।

हे सगळ त्याने आणखी मत प्रतिपादन केल. त्या करता मीच युध्द करायच बंद केल म्हणजे हे युध्द थांबेल. कोणाचाही नाश होणार नाही अशी समजूत त्याने करून घेतली. स्वत:चेच विचार. त्याच्या मनावर झालेल्या परिणामांमुळे आपले हे विचार बरोबर आहेत, आपलाच बुध्दिवाद बरोबर आहे, अहिंसा परमो धर्म: हेच बरोबर आहे अस भगवान् श्रीकृष्णांना त्याने सांगितले.

इतकी स्थिती झाल्यावर झाल. "विसृज्य सशरं चापं" धनुष्य बाण खाली ठेवून स्वस्थ बसून राहिला. "रथोपस्थ उपविशत्" अशी स्थिती झाली. इतका मोह उत्पन्न झाला. इतक्या सगळ्या लोकांचा नाश आपल्याकडून होईल या विचारीने शोक उत्पन्न झाला. ह्या दोन दोषांमुळे - मोह आणि शोक - अर्जुनाची कर्तव्यबुध्दि दूर झाली आहे. भिक्षा मागून राहण चांगल आहे पण हे युध्द बरे नाही. क्षत्रियांच कर्तव्य हे युध्द करण असताना सुध्दा आणि ज्याने आत्ता-पर्यंत ते युध्द करायच अस ठरवून देवलोकामध्ये जाऊन सर्व अस्त्रविद्या मिळवली ती त्याची बुध्दि एकदम गेलेली आहे. सामर्थ्य असताना तो सांगतो आहे युध्द करायच नाही. त्याकरता त्याला भगवंतानी उपदेश केलेला आहे.

भगवंतांनासुध्दा वस्तुत: उपदेश करण्याच काही कारण नव्हत. परंतु अर्जुनाची जर तशी आग्रही वृत्ती असती, अहंकार जर त्याचा पराकोटीला गेला असता तर भगवंतांनी सांगितली असती कि नाही गीता कोणास ठाऊक. परंतु शेवटी त्याने जरी आपल्या बुध्दिप्रमाणे ठरवून आपल मी युध्द करणार नाही हे मत मांडल तरी अखेरीस त्याच्या मनाला वाटायला लागलेल आहे.

कार्पण्य दोषोपहतस्वभाव:
पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेता: ।
यच्छ्रेय: स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे
शिष्यस्ते हं शाधि मां त्वां प्रपन्नम् ।।

शेवटी आणखी शिष्यभाव धारण करून तो भगवंतांना शरण गेलेला आहे. मला हे समजत नाही, म्हणाला. अगोदर सगळ अहंकाराने प्रतिपादन केलेल आहे - हे सगळ सदोष आहे, शास्त्र प्रमाणान जरी आणखी सांगितल असल तरी युध्द करण बरोबर नाही. शास्त्रप्रमाण सुध्दा त्याला बरोबर वाटेना. स्वत:ची बुध्दि श्रेष्ठ आहे आणि आपल्या बुध्दिने त्याने निर्णय घेतलेला आहे. तरी आपल्या बुध्दिने जरी त्याने निर्णय घेतला तरी शेवटी त्यान कबुल केलय, मला काही समजत नाहीय नाहीये. स्वत:च अज्ञान त्याने त्या वेळेला कबुल केल. खरा सेव्यभाव त्याने जेव्हा प्रगट केला त्यावेळेला गीतेच्या उपदेशाला सुरुवात झालेली आहे. नाहीतर असे किती अर्जुन आले आणि गेले. हा एक अर्जुन गेला म्हणून काय युध्द थांबल असत अस थोडच आहे! भगवंताची इच्छा होतीच. ते सर्व गीतेच्या पुढल्या अध्यायात सर्व दाखवलेल आहे.

तर अर्जुनाला निर्माण झालेला हा जो मोह आहे आणि त्यामुळे उत्पन्न झालेला शोक. त्यामुळे चातुर्य भ्रष्ट झालेला अर्जुन त्याची मोह निवृत्ती करायची आहे. आणि त्या मोहातून शेवटी तो मुक्त झाला. ही जी मोहमुक्ती, ही काही जीवाकडून शक्य नाही. सर्वांच्याकरता गीताज्ञान सांगितले अस आचार्य महाराज सांगताहेत. अर्जुन नुसता निमित्त आहे. सर्वही जीव शोकमोह ग्रस्त होतात त्यावेळी ते स्वधर्म त्याग आणि परधर्म स्वीकार करायला ते प्रवृत्त होताहेत. त्यांना आणखी योग्य मार्ग दाखविण्या करता, त्यांचा मोह दूर करण्याकरता, अशा सर्वांच्या करता गीता सांगितली आहे. अर्जुन एक निमित्त झालेला आहे.

बाह्य दृष्टीन जरी आपण विचार केला तरी अर्जुन हा मोहातून दूर होऊ शकतो. गीता ज्ञानाच प्रयोजन जे आहे- जो मोहामध्ये सापडलेला अर्जुन आणि हेच माझ बरोबर आहे अस म्हणणारा परंतु तो शेवटी कबुल झालेला आहे कि मला मोह झालेला होताआणि तो मोह आता माझा दूर

झालेला आहे, कर्तव्यबुध्दि मला उत्पन्न झालेली आहे. "करिष्ये वचनं तव " १८.४३. हे आणखी त्याने शेवटी सांगितलेल आहे.

म्हणजे अर्जुना सारख्याची बुध्दि बदललेली होती. त्या बुध्दिची सुधारणा करण्याकरता त्याला उपदेश करणारी जी व्यक्ति आहे ती व्यक्ति जीवकोटीतली असली पाहिजे कि दुस-या कोणच्या कोटीतली असली पाहिजे हाही विचार करण्यासारखा होता. कि एवढा मोठा अर्जुन एकदा त्याच्या बुध्दिने झालेला निर्णय दुस-या कोणाच तो ऐकणार होता, दुसरा त्याला सांगणारा तरी कोण होता, आणि तो तरी मी शरण आलेलो आहे, तुमचा शिष्य आहे अस दुस-या कोणाला कशाला म्हणायला जाईल? ते शक्य तरी आहे का? म्हणून या दृष्टीने आणखी ईश्वरानेच हा उपदेश केलेला आहे आणि त्या उपदेशाप्रमाणे त्याच्या बुध्दिच आणखी परिवर्तन होऊन गेलेल आहे. ईश्वराने आपल्या शक्तिचा उपयोग केला अस म्हणायला हरकत नाही.

तर या बहिरंग दृष्टीनसुध्दा मोह निवृत्ती करण्याच कार्य इतर कोणी करु शकणार नाही. हा एक विषय आहे.

महाभारतामध्ये सुध्दा परिक्षित राजासारखा अत्यंत सुकृतसंपन्न माहात्मा आहे. जन्माला येताना ज्याच्यावरती अश्वत्थाम्याने ब्रह्मास्त्राचा प्रयोग केलेला आहे. मनामध्ये उत्पन्न झालेले रागव्देषादिक विकार - या विकारांमुळे मिळविलेल ज्ञानसुध्दा कस प्रतिबध्द होत, त्याच हे उदाहरण आहे.

साक्षात द्रोणाचार्यांचा पुत्र अश्वत्थामा. उत्तम वेदशास्त्रांच ज्ञान त्याला मिळाल असताना सुध्दा त्याची बुध्दि इतकी व्देषमय बनून गेलीये कि पांडवांचा वंशसुध्दा ठेवायचा नाही. वास्तविक द्रौपदीने त्याला जीवदान दिलेल आहे. पांडवांची सगळी मुल व्देषाने त्याने शेवटच्या दिवशी मारली. दुस-या दिवशी ते समजल्यावर द्रौपदीला किती शोक झाला असेल। परंतु शेवटी सर्व पांडवांनी आणि श्रीकृष्णांनी तिलाच विचारल - ह्याला शिक्षा काय करायची? त्यावेळेला द्रौपदीन सांगितल, याला तुम्ही मारु नका, सोडून द्या.

त्याची कारणे सांगतानाहि तिने सांगितलय - कि सर्वहि अस्त्रविद्या धनुर्वेद ज्यांच्यापासून आपण मिळवलत ते साक्षात द्रोणाचार्यच याच्या रुपान तुमच्या पुढ उभे आहेत. याचा नाश करण म्हणजे द्रोणाचार्यांचा नाश केल्यासारख होईल. हे तुमच कर्तव्य नाही.

शोक आवरुन तिन हे सांगितल. पुत्रशोक ज्याच्यामुळे उत्पन्न झाला तो शोक बाजूला ठेवून कर्तव्यबुध्दि जी आहे-दैवी संपत्ति ज्याला म्हणतात- ती दैवी संपत्ति द्रौपदीच्या ठिकाणी आहे. तिन सांगितल्यामुळे सर्व पांडवांनी अश्वत्थाम्याला सोडून दिल.

परंतु जीवदान मिळाल्यानंतर सुध्दा त्याची बुध्दि काही बदलली नाही. कारण काय तर "प्रकृति" यान्ति भूतानि" म्हणून भगवान सांगताहेत. जी प्रकृति घेऊन जन्माला आलाय जीव त्या प्रकृतिप्रमाणेच कार्य होणार. कोणी कितीही उपकार करो त्याचा काहीही परिणाम बुध्दिवर होत नाही. त्या द्रौपदीन जीवदान दिल तरी त्याचा व्देष कायम राहिला. आणि पांडवातला एक जीव शिल्लक राहिला तोहि नाहीसा करण्याकरता ब्रह्मास्त्राचा प्रयोग त्याने गर्भावर केलेला आहे.

वस्तुत: पूर्ण ब्रह्मास्त्राच संपूर्ण ज्ञान त्याला नव्हत. प्रत्यक्ष अस्त्र प्रयोग करण वेगळ. प्रयोग करण आणि उपसंहार करण या दोन्हींच ज्ञान पाहिजे अस जे सांगितलय कालीदासांनी ते दोन्हीच ज्ञान अश्वत्थाम्याला नव्हत. तरीसुध्दा त्याने त्याचा प्रयोग केला व्देष बुध्दिने.

पण भगवंतांनी त्या गर्भाला त्या अस्त्रापासून मुक्त केल. ईश्वराला कोणाचही कर्म नाही, कर्मविपाक नाही, अशा ईश्वराने सुध्दा कर्म नसताना गर्भामध्ये प्रवेश केला, गर्भवास स्वत: पत्करला हे कशा करता तर त्या परिक्षित राजाला जिवंत ठेवण्याकरता. पांडवांच संरक्षण करायच. "न मे भक्त: प्रणश्यति" या प्रतिज्ञेप्रमाणे पांडवांचा वंश सुरक्षित ठेवण्याकरता स्वत:ला गर्भवास नसतानाही गर्भवास पत्करला.

म्हणजे परिक्षित राजा किती पुण्यवान आहे त्याच हे निदर्शक आहे. ईश्वर गर्भापासून त्याच्याबरोबर राहिला, गर्भापासून ईश्वराचा साक्षात्कार त्याला झाला. हे त्याच एक सुकृत

आहे. शेवटी त्याला आणखी ज्यावेळेला शाप त्यावेळी प्रायोपवेशन करून, सगळं राज्य मुलांच्या ताब्यात देऊन, गंगातीरावर जाऊन बसला. सातव्या दिवशी आपला नाश होणार.

अशा परिस्थितीमध्ये प्रत्यक्ष शुकाचार्यांसारखा ब्रह्मज्ञानी महात्मा त्याला मुक्त करण्याकरता आपण होऊन त्याच्याकडे आला. म्हणजे हेहि त्याच केवढ पुण्य आहे! मृत्युच्या वेळेला ब्रह्मज्ञानी सद्गुरु आपण होऊन त्याच्याकडे येतात. जन्माच्या वेळेला त्याच संरक्षण करण्याकरता प्रत्यक्ष परमेश्वर गर्भात शिरून त्याचे प्रतिबंध दूर करतात. इतका तो परिक्षित राजा सुकृतसंपन्न आहे. त्या परिक्षित राजाची बुध्दि बदलल्यामुळे त्याला शाप झाला. प्रसिध्द आहे ती कथा. त्या परिक्षित राजाला शुकाचार्य महाराजांनी सर्व भागवत सांगितल आणि त्या भागवताच्या श्रवणाने परिक्षित राजाला विदेहि मुक्ति मिळाली आहे.

विदेहि मुक्ति होण्याकरता सर्व कर्मक्षय सुध्दा त्याचा झाला. सर्व ज्ञान मिळाल. परोक्ष ज्ञान तर त्याला होतच होत. भगवद्भजन, पुण्यकर्म तो करीतच होता. आणि ती भक्ति त्याच्या चित्तामध्ये इतकी होती की कृष्णचरित्र श्रवण करण्याच्या वेळेस त्याने सांगितले मला संपूर्ण कृष्णचरित्र आपण सांगा, तहान नाही, भूक नाही.

नैबाति दु:सा: क्षुन्माम् त्यक्तोतम अपि बाधते।
पिवन्तम् तन्मुखाम्भोजच्युतम् हरिकथामृतम्।।

तर ही ज्याची भूमिका आहे. अशा प्रकारचा परिक्षित राजा. भगवद्भक्ति, भगवद्प्रेमामुळे भगवत् चरित्र श्रवण करण्याच्या वेळेला त्याच देहाकडेहि लक्ष नव्हत. म्हणजे क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक ज्याला म्हणतात ती मोठी भूमिका त्याला मिळालेली आहे. ईश्वराची कृपा आहे. सद्गुरु शुकदेवांची कृपा आहे. त्या कृपेमुळे क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक ज्ञान पूर्ण झाल्या-मुळे

सांगू लागलेला आहे. आरंभाला मृगयेहून परत आला असता तहान लागली. पाणी मागतोय. शेवटी ऋषिंच्या बद्दल त्याला राग आला. त्यांच्या गळयात साप घातला वगैरे कथा आहेत आणि म्हणून त्या ऋषिकुमाराने शाप दिला.

म्हणजे क्षुधातृषा याच्यामध्ये सांपडलेला तो होता. आनंदमय, प्राणमय, मनोमय कोशापैकी अन्नमय कोशामध्येहि होता प्राणमय कोशामध्येहि होता. तृषा ज्याअर्थी तो सहन करु शकत नाही त्याअर्थी त्या प्राणमय कोशाशी त्याचे तादात्म्य टिकूनच राहिले आहे. आणि अन्नमय कोशाशी तर तादात्म्य आहेच आहे. अशा स्थितीत असतानासुध्दा एकदम त्याच सुकृत म्हणा, सद्गुरु शुकदेवांची कृपा म्हणा त्यामुळे त्या कोशातून तो बाजूला झाला. मला तहान नाही, मला भूक नाही, मला संपूर्ण कृष्णचरित्र सांगा अस म्हणतो आहे. दोन चार दिवसात एवढी भूमिका तयार झाली कशी ?

तर ही स्थिती जी आहे. शुकदेव साक्षात् भगवत् स्वरूप आहेत. भगवंताचीच ती कृपा आहे. सामान्य जीवभाव ज्यांचा नाहीसा झालेला आहे अशा प्रकारचे हे महात्मे आहेत. स्थितप्रज्ञाची लक्षण भगवंतांनी सांगितली आहेत दुसऱ्या अध्यायात भगवत्गीतेच्या त्या लक्षणांच प्रतिपादन करीत असताना आचार्य महाराजांनी सांगितलय. ही स्थित-प्रज्ञांची लक्षण म्हणजे स्थितप्रज्ञांची साधन नाहीयेत स्वाभाविक आहेत. ज्ञान प्राप्त झाल्यानंतर निसर्गत:च

प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान्
आत्मन्येवात्मना तुष्ट: स्थितप्रज्ञस्तदोच्यते।।
सर्व काम निवृत्ती। कोपचीच वृत्ती नाही.
दु:खेषु अनुव्दिग्नमन:। सुखेषु विगतस्पृह:।

ही जी सर्व लक्षण आहेत, ही ज्ञानी माहात्म्याची नैसर्गिकच लक्षण आहेत. ईश्वराच जस

स्वरूप आहे त्याप्रमाणे ज्ञानी मनुष्य असतो. सुरेश्वराचार्यांनी जे वर्णन केल आहे एका ठिकाणी

अव्देष्टा सर्वभूतानां मैत्र: करूण एव च।

ही जी भगवद्‌भक्ताची लक्षण सांगितली आहेत बाराव्या अध्यायात याचा अभ्यास करायला किती दिवस लागतील? योग शास्त्रामध्ये अहिंसा, अपरिग्रह, अस्तेय हे जे यम नियम सांगितले आहेत – त्या एकेकाचा अभ्यास करुन ते सिध्द व्हायला किती काल लागेल काही सांगता येईल आपल्याला? हा काय महाविद्यालयातला पांच सहा वर्षांचा कोर्स आहे का। कि झाली अहिंसा सिध्दि झाली अपरिग्रह सिध्दी. "अहिंसाप्रतिष्ठायां तत्संनिधौ वैरत्याग: " वगैरे जी फल दिलेली आहेत म्हणजे ते ते सिध्द झाल्याच एक गमक आहे. तर इतकी सिध्दि होण्याला किती काळ गेला पाहिजे. मनोभूमिकेप्रमाणे दोष दूर होत गेले पाहिजेत. त्याच्याकरता काय काय सहाय्य कोणाच घ्याव लागेल. किती प्रयत्न करावा लागेल।

तर हे सगळे हि जे गुण आहेत, स्थितप्रज्ञाची लक्षण, भगवद्‌भक्ताची लक्षण, गुणातीताची लक्षण, ही सर्वही लक्षण आचार्य महाराजांनी सांगितली. ही साधकांची साधने आहेत आणि ती मिळवण्याकरता साधकांनी प्रयत्न केला पाहिजे. आणि ईश्वरस्वरूप झालेले सिध्द माहात्मे जे आहेत, त्यांची स्वयंसिध्दी नैसर्गिक अशी आहे.

वनोधस्य ह्यव्देष्ट्रत्वदयो गुणा:। उत्पन्नात्मा नस्य यव्देष्टत्वा गुणा:।
अयत्नतो भवन्तस्य नतु साधनरुपिष:।।

सुरेश्वराचार्य सांगताहेत. हे जे गुण जे म्हणतात ते अयत्नत: म्हणजे निसर्गत:च त्यांच्या ठिकाणी आहेत. त्यासाठी त्यांना प्रयत्न करावा लागत नाही. म्हणजे अज्ञानी साधक जे आहेत त्या अज्ञानी साधकांकरता ही सर्व साधन म्हणुन आहेत. आणि ज्ञानी जो माहात्मा आहे तो ईश्वररूप झालेला आहे. ब्रह्मरूप झाल्यामुळे तो स्वयंसिध्द आहे. ज्ञानाच हे फल आहे. ज्ञानाचाच हा विकास आहे. हे सगळे गुण म्हणजे साक्षात्काराचा विकास म्हणून झालेले आहेत.

शुकाचार्य महाराज म्हणजे असे ब्रह्मज्ञानी माहात्मे आहेत. आरंभापासून ते निर्गुण निर्विकार अशा परमात्म चिंतनामध्ये निमग्न होते. परंतु व्यास महर्षिंनी त्यांना आणखी सगुण साकार समाधिमध्ये, सगुण भक्तिमध्ये आणलेल आहे. तिकडेही ते आणखी रंगून गेलेले आहेत. तर साक्षात ईश्वरस्वरूप झालेले शुकाचार्य आहेत त्यांनी आणखी परिक्षित राजाला उपदेश केल्यामुळे तो विदेहमुक्त स्थितीला प्राप्त झालेला आहे.

चार दिवसापूर्वी आणखी तहान लागून अन्नमय, प्राणमय कोशाच्या पलिकडे तो जाऊ शकत नाहीये, राग लोभ निर्माण होतोय, पाणी न दिल्याने ऋषिंच्याबद्दल मत्सर निर्माण होतोय, माझा तहानेने व्याकूळ होऊन प्राण जावा म्हणून मुद्दाम हे समाधि लावून बसलेत अस ज्याला वाटत, तोच परिक्षित राजा चार दिवसानंतर एकदम असा कसा झाला? एकदम त्याची बुध्दि अशी शुध्द झाली कशी? मग हे ईश्वर कृपेचे निदर्शक वाटत. शुकाचार्यांच्या उपदेशाने आणखी तो सुध्दा विदेहमुक्त होऊन गेला.

अर्जुन सुध्दा मोहात सापडल्यामुळे धर्मत्याग करायला प्रवृत्त झाला.

आचार्य महाराज सांगतात ही मोहाची स्थिती त्याला मिळालेली आहे.

गुरूनहत्वा हि महानुभावान्
श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके।

अस म्हणायला लागला. तर या बहिरंग दृष्टीन जरी विचार केला तरी हा उपदेश ज्याला मिळाला त्यापैकी एक मोहमुक्त झाला, एक विदेहमुक्त झाला. तर हे जे फल त्यांना मिळाल ते देणारा असामान्य कोणीतरी असला पाहिजे, अस एक आपल्याला

मानाव लागत. साधारण मनुष्य कोणी असला तर तो अशा प्रकारच काही करु शकत नाही दीपच दीप निर्माण करु शकतो ना। जो स्वत: पंचकोशात, देहत्रयामध्ये सापडलाय तो दुस-याची मोहमुक्ति ,देहमुक्ति कशी करु शकणार? विदेह मुक्ति सारख मोठ फल त्याला कस देऊ शकणार? म्हणून या केवळ बहिरंग दृष्टीन जरी आपण विचार केला तरीसुध्दा ईश्वराच स्वरूप याच्यामध्ये व्यक्त होतय, अस म्हणायला हरकत नाही.

आता भगवद् गीतेमध्ये ईश्वराच्या स्वरूपाबद्दल, हे बहिरंग दृष्टीन पाहिल आपण श्री भगवानुवाच म्हणून प्रत्ये क वेळेला व्यासमहर्षिंनी मुद्दाम उल्लेख केलेला आहे. काही काही पदार्थांची सिध्दी करण्याकरता प्रत्यक्ष प्रमाणे जी आहेत. त्याप्रमाणे आणखी शब्द प्रमाण हे तर आहेच आहे. ईश्वरस्वरूपाबद्दल उपनिषद म्हणा पुराण म्हणा ही तर आहेच आहेत. परंतु व्यवहारामध्ये जे शब्द आहेत त्या शब्दांवरून सुध्दा काही काही पदार्थांची सिध्दि करता येते.

न्यायशास्त्रामध्ये काल तत्व किंवा दिक् तत्व सांगताना त्यांनी लक्षण जी सांगितली आहेत- अती तादि व्यवहार हे कार: व्यवहार शब्द प्रयोग: अतीत: अनागत: हा जो शब्द प्रयोग रुढ आहे लोकांमध्ये, हा शब्द प्रयोग ज्याच्यामुळे रुढ झालेला आहे असे एक काल तत्व मनायच आहे. अशीच त्यांनी व्याख्या केली. कार्यकारण भावावरुनच व्याख्या केली जाते शब्दाची. कोणचही लक्षण कार्यकारण भावावरून करतात तसाच कार्यकारण भाव मांडताना त्यांनी हा जो लोकांमध्ये रुढ असलेला शब्द प्रयोग ज्याच्यामुळे होतो तो काल.

दिक व्यवहार म्हणून दिक् तत्वाची त्यांनी व्याख्या केली. प्राच्य: अतिच्य: हा जो व्यवहार केला जातो, शब्दप्रयोग, त्या शब्दप्रयोगावरुनच त्यांनी अशा प्रकारचे दिक् तत्व आहे हीच व्याख्या शिकवली आहे.

म्हणजे भगवानुवाच हा जो शब्दप्रयोग आहे आणि भगवद् शब्दाची व्याख्या शास्त्रकारांनी केलेली आहे "ऐश्वर्यस्य समग्रस्थस्य धर्मस्य यशत: श्रिय: । ज्ञान वैराग्ययोश्चैव शण्णाम् भगव्दतीगणा: हे जे सहा गुण आहेत सर्व ऐश्वर्य आहे, संपूर्ण नियामक शक्ती आहे. त्याचप्रमाणे संपूर्ण ज्ञान. संपूर्ण धर्म, संपूर्ण वैराग्य यश हे ज्याच्या ठिकाणी आहे, यत्किंचीतहि न्यूनता जिथे नाही, त्याला भगवान म्हणाव. हा जो भगवान शब्द शास्त्रामध्ये रुढ आहे चालू आहे, शास्त्रीय व्यवहारामध्ये का असेना. तो जो रुढ झालेला आहेत्यावरूनही केवळ भगवानुवाच या शब्दावरूनसुध्दा अशा प्रकारच ईश्वरस्वरूप काही तरी असल पाहिजे हे मान्य केल जात, न्यायशास्त्रात त्यांनी व्याख्या केलया आहेत त्याप्रमाणे

आणखी आता अर्जुनासारखा योध्दा मोहग्रस्त झालेला आहे. त्याला उपदेश करण्याकरता गीताशास्त्राची प्रवृत्ती सुरु झाली. सांगता सांगता चौथ्या अध्यायाच्या आरंभी भगवान् सांगताहेत-

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।
विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ।।

हा जो योग आहे तुला सांगितलेला- कर्मनिष्ठा, ज्ञाननिष्ठारूपी योग- हा योग मी पूर्वी सुर्यनारायणाला सांगितला. म्हणजे संप्रदाय आहे हा. नविन काही सांगितलेल नाही. असाच संप्रदाय चालत आलेला आहे पूर्वीपासून. संरक्षण करणारा मी आहे.

आता अर्जुनाच्या मनात शंका उत्पन्न झाली. गीता काय एकाने सांगितली कि दोघांनी सांगितली कि तिघांनी सांगितली असे विचार मनामध्ये येतात. त्याच कारण हे आहे कि इथ हे सांगतात- "प्रोक्तवानहमव्ययम्" हा अहम् पदार्थ कोण आहे? बोलणारे जे आहेतते श्रीकृष्ण समोर दिसताहेत. त्या श्रीकृष्णांच दर्शन अर्जुनालाही झाल, त्याच्याही मनामध्ये ही शंका आली. श्रीकृष्णाच्या बद्दल अर्जुनाच्या मनात भक्तिपूर्ण आहे. परमेश्वर आहे ही भावना नाही अस नाही. परंतु आज मात्र यांनी सांगितल कि मी सूर्य-नारायणाला उपदेशकेलाय. हा "अहम्" कोण? पण समोर दिसणारे श्रीकृष्ण म्हणजे

"अपरं भवतो जन्म" देहबुध्दिने तो विचारतो आहे, आक्षेप घेतो आहे. "तुमचा जन्म तर अलिकडचा आहे, आणि सूर्यनारायणाचा जन्म तर किती तरी प्राचीन आहे. आणि या देहानेतुम्ही सूर्यनारायणाला उपदेश केलात?" म्हणजे या देहालाच तो "तुम्ही" समजतो आहे. "अहम्" पदार्थ म्हणजे देह आहे. त्या देहबुध्दिनच तो आणखी विचारतो आहे. तर क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक ज्याला म्हणतात, देहबुध्दि. विवेकाचे अनेक पुष्कळ प्रकार आहेत. नित्यानित्य विवेक आहे, क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक आहे, हेयोपादेय विवेक आहे. अनेक प्रकारचे विवेक आहेत.

तर या अर्जुनाला क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक नाहीये. त्यामुळे तो म्हणतो आहे, "तुमचा जन्म अलिकडचा, तुम्ही[वयाने] लहान आहात आणि तो सूर्य नारायण कितीतरी मोठा आहे. हा जो लहान मोठेपणा आपण जो म्हणतो आहोत तो शरीराच्या दृष्टीन आहे. जास्ती काल देह संबंध ज्या शरीराला झालेला आहे तो मोठा समजतो. आणि कमी काल संबंध ज्या देहाला आलेला आहे तो लहान समजतो. कोणीही मोठा मनुष्य त्याच्यापेक्षा वयान लहान असणाऱ्या माणसाला म्हणतो, तुझ्यापेक्षा चार पावसाळे जास्त पाहिले आहेत. मी काय सांगतो ते ऐकून घे.

त्याचा अर्थ असाच आहे. हे जे परत्व अपरत्व उत्पन्न झालेल आहे हे शरीराच्या दृष्टीन आहे. ज्येष्ठ कनिष्ठ भाव हा शरीर दृष्टीन उत्पन्न झालेला आहे. आणि शरीर दृष्टीन ज्येष्ठ कनिष्ठ भाव समजून व्यवहार करतो याचाच अर्थ त्याला क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक झालेला नाही. क्षेत्रज्ञाला बाजूला ठेवून केवळ क्षेत्रप्रधान दृष्टीन त्याचा विचार चालू आहे. चांगदेवांसारख्यांना अशा प्रकारची स्थिती उत्पन्न झाली. नामदेवांना म्हणा, चांगदेवांना म्हणा. त्यांना सुध्दा क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक संपादन करण्यासाठी प्रयास पडलेले आहेत. त्यांच अज्ञान आड आलेल आहे. विवेक नाहीये. क्षेत्रप्रधान दृष्टी कायम राहिल्याने ज्ञानेश्वर महाराज आपल्यापेक्षा लहान आहेत त्यांना नमस्कार कसा लिहायचा आणि त्यांना मोठ म्हणायच तर मी त्यांच्यापेक्षा[वयान] मोठा आहे. ज्ञानेश्वर तर लहान. लहानाला नमस्कार सुध्दा करता येत नाही. वर ज्यांना शरण जायचय, ज्यांच्या पासून ज्ञान घ्यायचय त्यांना आशिर्वाद तरी कसा लिहायचा? ज्ञान त्यांच्याकडे आहे मान्य आहे पण त्यांचे वय लहान आहे.

तेव्हा ज्ञान मिळवण्याची इच्छा असून सुध्दा वयान लहान म्हणून त्यांना नमस्कार कसा लिहायचा? केवळ शरीर दृष्टीने ते लहान आहेत आणि शरीरदृष्टीन मी मोठा आहे. ही बुध्दि धारण करून त्यांनी कोराच कागद पाठवून दिला ती कथा प्रसिध्द आहे. मग निवृत्तीनाथांच्या आदेषाप्रमाणे ज्ञानेश्वर महाराजांनी लिहून टाकल. त्यांची दृष्टी अशी नाहीये. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक पूर्ण ज्यांना झालेला आहे अशा प्रकारचे ज्ञानी माहात्मे त्यांचा व्यवहार होण्याला काहीही प्रतिबंध आड येत नाहीत. अहंकारादि दोष नसतातच त्यांच्यात. त्यामुळे ज्ञानेश्वर महाराजांनी लिहून पाठवल वटेश्वर चांगदेवांच स्वस्ति असो. इथ लहान मोठा हा भेद सगळा बाजूलाच काढलेला आहे. वटेश्वर चांगदेव मोठे असले तरी त्यांच स्वस्ति चिंतन करण लहानांना वावग नाहीये. लहान जरी समजत असले तरी मोठ्यांनी लहानाच स्वस्ति चिंतन करण चांगलच आहे.

तेव्हा व्यवहारीक दृष्टीनसुध्दा त्यांनी स्वस्तिचा उल्लेख केलेला आहे. आणि दृष्टी त्यांची देहदृष्टी नाहीये. "जो लपोनि जगदा भासू दावि मज ग्रासू प्रगटीला करी" अस ज्ञानेश्वर महाराज लिहितात. म्हणजे वटेश्वर चांगदेवांच्याकडे आत्मस्वरूपाच्या दृष्टीन ते पहाताहेत. आत्मस्वरूप जर आच्छादित आहे अस लक्षात घेतल तर जगदाभास निर्माण होतो. आणि जर आत्मस्वरूप प्रगट झाल तर "दावि मज ग्रासु प्रगटीला करी" जगदाभासाचा ग्रास होऊन जातो. म्हणजे ज्ञानी माणसाची दृष्टी ही अशी आहे. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक पूर्ण आहे. हे जे नित्यसिध्द आहे त्यामुळे त्यांना कोणच्याही प्रकारचा

संदेह निर्माण होत नाही.

अर्जुन म्हणतो आहे, "तुम्ही सूर्यनारायणाला उपदेश केला, तुम्ही माझ्या बरोबरीचे आहात, लहान आहात. लहान आहे तुमच वय आणि तुम्ही सूर्यनारायणाला उपदेश कसा केलात? म्हणजे फक्त देह दृष्टीनच तो पाहतो आहे.

परंतु भगवान सांगताहेत "प्रोक्तावानहमव्ययम्". "अहम्" पदार्थ भावाने श्रीकृष्ण हा देह समजायचा का? ईश्वरभाव वेगळा समजायचा? ईश्वरभावाने गीता ज्ञानाचा उपदेश केला आहे, अशी प्रसिध्दि आहे. प्रत्यक्ष भगवंतांनी त्याच्याकरता ईश्वरभाव धारण करून तो उपदेश केलेला आहे.

तर हा "अहम्" पदार्थ अर्जुन समजू शकलेला नाही. त्यामुळे श्रीकृष्णांना स्पष्टपणे सांगाव लागल-

बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप।।

तुझेहि पुष्कळ जन्म झाले, माझेही पुष्कळ जन्म झाले, तसेच इतरांचे सर्वहि जन्म मला माहित आहेत. हे स्पष्ट कराव लागल भगवंतांना. म्हणजे अर्जुनाची भूमिका ही अद्यापि "क्षेत्रक्षेत्रज्ञविवेकशून्य" आहे. त्यामुळे तो मोह उत्पन्न झाला ना!

मारणार म्हणजे शरीरालाच मारणार ना तो. म्हणजे भीष्म द्रोण शरीररूपी आहेत त्यांची हत्या होणार माझ्याकडून. म्हणून त्याला वाईट वाटल. नरकात जावे लागेल वगैरे वाटल त्याला. परंतु भगवंतांची- उपदेश करणाऱ्याची भूमिका मात्र पूर्ण विवेकसंपन्न आहे. आणि पूर्ण ज्ञान आहे.

तर या ठिकाणी या दृष्टीन भगवंताच सांगण झालेल आहे ते क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेकयुक्त आहे आणि तशा रुपाने मी सूर्याला उपदेश केलेला आहे, अस भगवान सांगताहेत. अर्जुनाला ते स्पष्ट करून सांगायची पाळी आलेली आहे.

दुसरी कृष्णा नदीची गोष्ट आलेली आहे आरंभाला. भागवताची रचना व्यासांनी कशा करता केली ते सांगण्याकरता त्यांनी ती कथा सांगितली आहे. व्यास महर्षिंनी वेद विभाग केलेले आहेत. बुध्दि शक्ती कालमानाप्रमाणे कमी कमी झाल्यामुळे वेदसंप्रदाय तर राहिलाच पाहिजे पण एक संपूर्ण वेद होता त्याचा अभ्यास सगळयांकडून होईल असे नाही. म्हणून वेदाचे चार विभाग करून शिष्यांना उपदेश वगैरे केला. त्यांच्या त्यांच्या बुध्दिशक्ती प्रमाणे त्यांनी त्या त्या विभागाचा अभ्यास केला, तरच हा संप्रदाय राहील म्हणून ही व्यवस्था वेदव्यासांनी केली. म्हणजे संपूर्ण वेदाचे विभाग त्यांनी करून दिले. हे मोठ कार्य आहे. केवढी ज्ञानशक्ती आहे.

त्याच्या नंतर सगळया एकंदर वेदार्थाच प्रतिपादन करण्याकरता, स्पष्टिकरण करण्याकरता इतिहास पुराणादि ग्रंथ लिहिले आहेत. वेदांचा अभ्यास करण्याकरता, इतिहास पुराणांच्या अभ्यासाचीहि जरुरी आहे. वेदाभ्यास पूर्ण होण्याकरता म्हणून त्या इतिहास पुराणरूपी अंगांचा अभ्यासहि आवश्यक आहे. इतिहास पुराणाच्या अभ्यासाची परंपरा पुरातन काळी होती. काशीला सांगत असता काही प्रवचनकार कि आमच्याकडे पुराणांचाहि अभ्यास करणारे विद्यार्थी असायचे. निरनिराळया शास्त्रांबरोबर पुराणांचाही अभ्यास करणारे विद्यार्थी आणि त्याचप्रमाणे त्या पुराणांचे रहस्य समजाऊन सांगणाऱ्या योग्य अध्यापकांची परंपरा आमच्या इकडे होती. ती आता परंपरा संपलेली आहे. केवळ आपल विकल्पित मनाने पुराणांचा अभ्यास करण आणि त्याप्रमाणे आपल्या बुध्दिने त्याचा निर्णय घेण वगैरे असा प्रघात सध्या सुरु झालेला आहे.

त्यामुळे पुराणांबद्दल निर्माण होणारे जे संशय आहेत ते दूर होण अत्यंत कठिण आहे. धर्मशास्त्राचा अभ्यास करतानासुध्दा जी पध्दती आहे. - धर्मसिंधू वगैरे ग्रंथांचा अभ्यास गुरुंजवळ राहून गुरुमुखातून ते ज्ञान श्रवण करून केला तर उपयोग होऊ शकतो. स्वत:च्या बुध्दिन आणखी समजायला वेळ लागतो. समजून येणार नाही अस नाही. पुष्कळ अभ्यास

करायला पाहिजे. परंतु गुरुंच्याजवळ राहून केल्यामुळे लगेच त्याच स्पष्टीकरण होऊ शकत. तर अशी ही परंपरा प्राचीन काळी होती. पुराणांची निरनिराळी रहस्य सांगणारे ग्रंथ त्यांनी केले आहेत. वेदार्थ निर्णय करण्याकरता हे त्यांनी लिहिल आहे. हा उद्देश त्यांनी सांगितला आहे. तर वेदव्यासांनी अभ्यास समजून वेदाचे चारी विभाग केले आहेत. अभ्यास करण्याची परंपरा राहावी हा त्याचा उद्देश आहे.

एका ठिकाणी सर्व ज्ञान राहील कि नाही ते मात्र सांगता येत नाही. त्याच्या नंतर वेदांचा अभ्यास सुकर व्हावा म्हणून पुराणांची रचना केली. महाभारतासारखा ग्रंथहि त्यांनी आरंभी करून ठेवलेला आहे. तरी सुध्दा त्याच्या मनाला शांति मिळाली नाही असा उल्लेख केला आहे आहे. आता इथ "शांति" पदार्थ काय आहे? हाच मोठा प्रश्न आहे.

तूष्णिम् अवस्था परमोपशांतिः।

हे आचार्य महाराज सांगताहेत. चित्ताची तूष्णिम् अवस्था मनोनाश म्हणून जो एक प्रकार आहे, अभ्यास करण्याचा. ज्ञानानंतरसुध्दा तत्वज्ञान मनोनाशः वासनाक्षय एव च हा अभ्यास विदेहि मुक्ति प्राप्त होईपर्यंत. जीवन्मुक्त ही अवस्था जर प्राप्त करून घ्यायची असेल तर या तिन्हीचा अभ्यास झाला पाहिजे.

चतुर्थ भूमिकेवरती ज्ञानप्राप्ती होते तरी ते ज्ञान दृढ होण्याकरता म्हणून पुढेही तो अभ्यास चालू ठेवला पाहिजे. वासनांमुळे निरनिराळया मनाच्या वृत्ति निर्माण होतात. आणि जीवन्मुक्ति, सुख काही प्राप्त होत नाही. पुन्हा जन्म नाही हे सगळ खर आहे. परंतु जीवन असेपर्यंत दुःखेषु अनुव्दिग्नमनः सुखेषु विगतः स्पृहः ही भूमिका दृढ होण्याकरता मनोनाश, तत्वज्ञानाचा अभ्यास पुढेहि अखंड चालू ठेवावा लागतो. त्याकरता योगाभ्यासही पाहिजे.

तर या दृष्टीन त्यांना शांति मिळाली नाही म्हणजे मनोनाश झालेला नाही अस म्हणायला हरकत नाही. मनामध्ये आणखी हे विचार उत्पन्न झाले. अशांति उत्पन्न झाली अशा वेळेला नारद महर्षि तिथ आले. नारदांनी विचारल तुम्ही दुःखी दिसताहात. तुमच्यासारख्यांना आणखी कसल दुःख आहे? शाब्दज्ञान जर मिळालेल असेल तर ही स्थिती संभवते कारण शाब्दज्ञानामध्ये शांतिचा संबंध नाहीये. शब्दाने आणखी ज्ञान मिळाल्या-नंतर कदाचित पूर्व सुकृतवशात श्रध्दाधान हे होऊ शकेल हे एक त्याच प्रयोजन मानायला हरकत नाही.

धर्मराजांना इतके कष्ट पडले, इतक दुःख झाल तरी धर्मनिष्ठा त्यांची कायम राहिलेली आहे. त्यांना काही अपरोक्ष ज्ञान झालेल नाहीये परंतु परोक्ष ज्ञान असताना सुध्दा त्यांची श्रध्दा इतकी दृढ आहे कि शेवटपर्यंत आपल्या धर्मापासून ते बाजूला झालेले नाहीत. द्रौपदीने वारंवार त्यांना म्हणाव, तुमच्या धर्माचरणाचा काय उपयोग झाला? अधर्माने वागणाऱ्या दुर्योधनाने सगळ साम्राज्य मिळवलेल आहे. मग तुमच्या धर्माचरणाचा काय उपयोग?

हाच सवाल आहे. सध्या आपण असेच आक्षेप ऐकतो. धर्माचा काय उपयोग?? धर्माने काय सुख मिळालय? व्यक्तिला काय किंवा समुदायाला काय. म्हणून तर धर्मातीत राज्याचा विचार चाललेला आहे. तर अशा स्थितीत द्रौपदीने वारंवार असा आक्षेप घ्यावा. पण धर्मराजांची निष्ठा अशी आहे-"धर्माच काही फल मिळाव म्हणून मी धर्माचे पालन करीत नाही. हे धर्माच वाणिज्य केल्यासारख होईल" म्हणाले.

खरे जे धर्मवादी पुरुष आहेत धर्मज्ञ, धर्मशील माहात्मे आहेत त्यांच्यादृष्टीन फलाच्या आशेने धर्माचरण करायच नाहीये. ही जी दृढ भूमिका धर्मराजाला उत्पन्न झालेली आहे, धर्मशील जो बनलेला आहे, ही धर्मशील वृत्ती जी त्याला मिळाली त्याच कारण म्हणजे त्याने मिळवलेले ज्ञान आहे. अनेक ऋषि मंडळी भेटायची. आणि त्या ऋषि मंडळीच्या जवळ जिज्ञासू बुध्दिने आणखी चर्चा करायची आहे. ज्ञानप्राप्ति करता चर्चेचाही उपयोग सांगितला आहे भगवंतांनी. चर्चेनसुध्दा ज्ञान उत्पन्न होऊ शकत.

तर हा ज्ञानसंग्रह ह्यांनी पुष्कळ केलेला आहे. आणि त्या ज्ञानाचा उपयोग म्हणजे त्याची धर्मश्रध्दा बळकट झालेली आहे. नास्तिक बुध्दि त्याला उत्पन्न झालेली नाही. बुध्दिभेद होण्याचा प्रयत्न होत होता. भीमही बोलायचा, द्रौपदिही बोलायची. तरी तरी सुध्दा त्याची धर्मनिष्ठा जी कायम राहिलेली आहे त्याला कारण म्हणजे योग्य प्रकाराने त्याने मिळवलेल परोक्ष ज्ञान. आणखी त्याप्रमाणे विचार केलेला असेल तर त्याची श्रध्दाही उत्पन्न होते.

तर इथ नारदांनी व्यासमहर्षिंना विचारल "तुम्ही परोक्ष ज्ञान मिळवल असताना सुध्दा तुमच्या मनाला शांति मिळाली नाही हे कस काय?" हा प्रश्न त्यांनी केला त्या वेळी व्यासांनी सांगितल, " आहे, स्थिती आहे तशी. का झाल नाही मला काही सांगता येत नाही. पण शांति मला मिळाली नाही." अद्यापि मनोनाश वगैरे झालेला नाही. योगाभ्यास त्यांचा झालेला होता. समाधि अवस्था केव्हाही त्यांना प्राप्त करून घेता आली असती. परंतु व्युत्थानदशेमध्ये अशी ही अशांती आहे. समाधि अवस्थेमध्ये कशाचाच काही संबंध नाहीये. चित्तवृत्तिचा निरोध केला असल्याने त्यावेळी दुसर काहीच नाही. शांति आहेच आहे.

परंतु शांति अशांति हा जो विचार आहे तो समाधि व्युत्थान दशेमध्ये आहे. दु:खेषु अनुव्दिग्नमना: सुखेषु विगत स्पृह: ह्या विचार बलाने तो राहू शकतो, विवेक बलाने किंवा समाधिचा लाभ जर त्याला करता आला तशी जर त्याची तयारी असेल तर त्यातही तो राहू शकतो.

तर अशा परिस्थितीमध्ये व्यास महर्षि नारदांना म्हणताहेत, "मला मिळालेली नाही शांति काय उपाय आहे? न्यून काय आहे?" त्यावेळी नारदांनी सांगितल- "तुम्ही धर्मार्थ काम मोक्षांचा पुष्कळ विचार केला आहे. महाभारतासारखा दिव्य ग्रंथ केला आहे. सर्वहि विषय त्याच्यामध्ये घातले आहेत. परंतु वासुदेवाचा महिमा तुम्ही वर्णन केलेला नाही." हे नारदांनी त्यांना मार्गदर्शन केल. आणि तशी स्थिती झालेली होती. भागवत अद्यापि तयार झालेल नाहीये. बाकीची सगळी पुराण, महाभारता- सारखे ग्रंथ, वेद विभाग वगैरे सगळे तयार झाले आहेत. इतक वाङ्मय तयार करून ठेवलेल आहे त्यांच्या मनाला शांति का मिळाली नाहीयाच कारण नारद महर्षि सांगताहेत- "वासुदेवाचा महिमा तुमच्या हातून वर्णन केला गेलेला नाही." समाधि अवस्थेत जाऊन वासुदेवाच्या संपूर्ण चरित्राच चिंतन तुम्ही करा आणि नंतर ते चरित्र लिहा म्हणजे तुमच्या मनाला शांति मिळेल." असा उपदेश त्यांनी केला आणि वासुदेवाच्या चिंतनाने मला शांति कशी मिळाली, सिध्दावस्था कशी प्राप्त झाली हे सांगण्याकरता स्वत:चेहि चरित्र त्यांनी त्यावेळेला सांगितलेल आहे.

नारद म्हणाले, "पूर्व जन्मामध्ये एका खेडेगांवामध्ये एका दासीचा पुत्र होतो. पाच वर्षांच वय माझ होत. आणखी काही सज्जन मंडळी चातुर्मासाकरता आमच्या गावाबाहेर उतरली होती. मी रोज त्यांच्याकडे जात होतो. हे सगळ चरित्र, आत्मानात्म विचार वगैरे मला त्यांच्या तोंडून ऐकायला मिळाल." अधिकार होताच त्यांचा तसा, अस नाही. "त्यामुळ मला आणखी पूर्ण समाधान झाल. चातुर्मास्य संपल्यानंतर ती मंडळी निघून गेली. मला जरी त्यांच्या बरोबर जाण्याची इच्छा असली तरी माझी असल्यामुळे मला काही जाता आले नाही. आईला सोडून जाता येईना. मग काही दिवसांनी सर्पदंश होऊन माझ्या मातेला मृत्यू आला. मग म्हणाले मी इकडे आलो. निघालो. सर्पदंश झाला त्यावेळचे त्यांचे उद्‌गार आहेत-

तदा तदहमीशस्य भक्तानां शमभीप्सत:।
अनुग्रहं मन्यमान: प्रातिष्ठं दिशमुत्तराम्॥ १. ६. १०

ईश्वराचा मला अनुग्रह झाला अस मी समजलो. हे माझ जे कर्तव्य होत मातृसेवा करण्याच

त्या कर्तव्यातून ईश्वरान मला वाचवल. अस त्यांनी सांगितल. कर्तव्यत्याग करून नारद जाऊ शकले नाहीत. राहिले. त्या संत मंडळींच्या बरोबर राहाण्याची इच्छा होती, त्यांच्यात राहिले. नंतर मात्र ते गेले. तर ईश्वरानेच मला त्यातून मुक्त केले अस ते म्हणताहेत. म्हणजे आई मरावी अशी नारदांची ईच्छा होती असा अर्थ नाहीये.

धर्माचरण करण, कर्तव्य कर्म करण, वैराग्य याला सुध्दा काही मर्यादा आहेत. ते असल वैराग्य नारदांच्या जवळ नाहीये. कर्मत्याग अधिकार नसताना येणार वैराग्य शास्त्रकारांना मान्य नाहीये.

आणि नंतर निघालो, म्हणाले. उत्तर दिशेला जाता जाता अरण्यामध्ये एका ठिकाणी मी राहीलो. आणखी आसनस्थ बसलो असताना ईश्वर दर्शन मला झाल म्हणाले. ध्यानामध्ये ईश्वर स्वरूपाच दर्शन मला झाल. आनंद झाला मला. तशाच अवस्थेमध्ये मी उठलो आणि ते स्वरूप अदृष्य झाल. पण परत आपल्याला त्याच दर्शन व्हाव म्हणून मी पुन्हा प्रयत्न करायला लागलो. पण मी त्यावेळेला मला काही दर्शन झाल नाही. त्यावेळी आकाशवाणी झाली आणि सांगितल-

हन्तास्मिजन्मनि भवान्मा मां द्रष्टुमिहार्हति।

आता या जन्मात तुला पुन्हा माझ दर्शन होणार नाही.

अविपक्वकषायाणां दुर्दर्शो हं कुयोगिनाम्।।

ईश्वरस्वरूप प्रत्यक्ष नाही आहे म्हणून ईश्वर स्वरूप नाही अस म्हणतो हा तर्क काही बरोबर नाही. जे दिसत नाही ते नाही. जे दिसण्याच्या योग्यतेच असत ते तरी कुठ दिसत आपल्याला? प्रत्यक्ष प्रमाणांच्या इंद्रियांची शक्तिसुध्दा पुष्कळ मर्यादित आहे. इंद्रियांच्या समोर जो विषय असेल त्याच्याशी संबंध आल्यावाचून त्याच दर्शन होत नाही.

त्यांनी जे सांगितलय सांख्य कारिकेमध्ये- पदार्थ नाही म्हणून दर्शन होत नाही अस जे एकदम आपण मत प्रगट करतो ते चुकीच आहे. पदार्थ प्रत्यक्षअस्तित्वात असतानासुध्दा इतके प्रतिबंध असतील तर आपल्याला त्या पदार्थाचे ज्ञान होऊ शकत नाही.

सीतेच्या शोधासाठी चांगली चांगली मंडळी दक्षिण दिशेला पाठवली. "बुध्दिमताम् वरिष्ठम्" त्याच्या मध्ये एक होते. त्यांच्यावर विशेष विश्वास होता रामरायांचा. त्यांच्याजवळ आपली मुद्रिका दिली. आणि "सीतेच दर्शन झाल तर तिला ही मुद्रिका दाखवा म्हणजे तिचा तुमच्यावर विश्वास बसेल. , नाहीतर पुन्हा रावणच तुमच्या रूपाने आला आहेअस वाटल तर बोलणारसुध्दा नाही तुमच्या बरोबर." अस त्यांना सांगितल. अशा रीतीने चांगली चांगली मंडळी दक्षिण दिशेकडे पाठवली आहेत. ती त्या दक्षिण समुद्राच्या किनाऱ्यावर येऊन बसली आहेत. समोर अथांग सागर पसरलेला आहे. आता कुठ जायच कुठ? चारी दिशांना वानर पाठवले होते. वानर राजाची ताकीद आहे. एक महिन्याच्या आत तुम्ही परत यायला पाहिजे. शोध लागला किंवा न लागला काय असेल ते परत येऊन सांगा. नाहीतर तुमचा शिरच्छेद केला जाईल. महीना तर संपून गेलाय. आता आपण प्रायोपवेशन करून देहत्याग करावा म्हणून ही मंडळी इथ बसली आहेत.

एवढयात तो, जटायूचा बंधू, संपाती तिथे आला. त्याने चौकशी केली, कशासाठी आलात? ते म्हणाले, सीतेच्या शोधासाठी आम्ही आलोय. तोम्हणाला, समोर सीता दिसतेय मला. रावणाची राजधानी आहे त्यातल्या उद्यानात अशोक वनात एका झाडा-खाली ती बसलीये. तिच्या सभोवती सगळया राक्षसींचा पहारा आहे. तुम्हा कोणाला जायच असेल तर जा, म्हणाला.

आता त्याला काय म्हणायच? नाही म्हणायच? तो पाहून सांगतो आहे. आमच बहुमत आहे. आम्हाला कोणाला दिसत नाही तुला एकटयाला कशावरून दिसली? बहुमताने इथे निर्णय कसा करणार? तो म्हणतोय, मला दिसतेय म्हणून तुम्हाला मी सांगतोय.

म्हणजे प्रत्यक्ष दर्शी जो महात्मा आहे त्याचा जो शब्द आहे. दूरचा पदार्थ आपल्याला दिसत नाहीये. पण ह्याला ती दिसतेय. ह्या बाकिच्यांना लंका राजधानी सुध्दा दिसत नव्हती मग सीता कुठली दिसायला. पण त्या संपातीला ईश्वराने दूरदृष्टी दिलेली आहे त्यामुळे तो सांगतो आहे. पण त्याच्या शब्दावर विश्वास ठेवल्यामुळे ह्यांचं कार्य होउ शकले ना। नाहीतर हे कुठले पाहू शकत होते.

तर केवळ प्रत्यक्ष प्रमाणाने आणखी ईश्वरसिध्दी होत नाही. ईश्वर दिसत नाही म्हणून प्रत्यक्ष नाही अस जे आपण समजतो ते चुकीच आहे. असलेला पदार्थसुध्दा दूरत्व सामिप्य वगैरे दोषांमुळे दिसू शकत नाही, हा अनुभव आहे अस शास्त्रकार सांगतात.

त्याप्रमाणे आणखी नारदाला सांगितले, तुला पुन्हा दर्शन नाही. ज्यांच्या मनामध्ये असलेल्या वासना दूर झालेल्या नाहीत आणि ज्यांच अंत:करण निर्दोष झालेल नाही त्यांना मी दिसणार नाही एवढच सांगितल. तर नारद म्हणाले, ईश्वराचे नामस्मरण करीत मी जन्म घालविला. नंतर मग ब्रह्मदेवांचा पुत्र होऊन मी आलो. म्हणजे भगवंतांची कृपा झाल्यानंतर माझा उध्दार झालेला आहे. आणि त्या ज्या वेळी मी ध्यानाला बसतो त्या त्या वेळी-

आहूत इव मे शीघ्रं दर्शनं याति चेतसि।।

हा त्यांनी आपला अनुभव सांगितला.

त्याकरता सर्वही लोकांच्या पुढ ईश्वराचा महिमा तुम्ही वर्णन करा, अस व्यासांना सांगून नारद गेले आणि नंतर व्यासमहर्षिंनी समाधि अवस्थेमध्ये राहून संपूर्ण भगवच्चरित्राच चिंतन केलेल आहे. ईश्वराच्या मायाशक्तिच चिंतन केलेल आहे. आणि त्यानंतर भागवत तयार झाल अशी त्या भागवत चरित्राची हकिकत व्यासांनी लिहिली आहे.

म्हणजे व्यास महर्षिसारख्यांच्यासुध्दा मनामध्ये कोलाहल सुरु झालेला होता. पण नारदांसारख्यांनी येऊन त्यांना हे मार्गदर्शन केलेल आहे. तेव्हां ईश्वराच चरित्र जे आहे त्याच चिंतन करण्याची शक्ती व्यास महर्षिजवळ होती. ती त्यांनी वापरली. समाधि अवस्था त्यांनी प्राप्त करून घेतली होती.

वाल्मिकी महर्षिंनी रामायण लिहिलेल आहे- म्हणजे मारुतीराय त्या लंकेमध्ये गेले, अंत:पुरामध्ये जाऊन सगळया स्त्रिया पाहू लागले, त्यांच्या मनामध्ये काय विचार आले हा जो सगळा मनोवृत्तींचा परिणाम वाल्मिकी महर्षिंनी लिहिलेला आहे, हे काय केवळ कार्य आहे काय। बरोबर त्यांच्या मनामध्ये असलेले विचार वर्णन केलेले आहेत. ज्यांना अशा प्रकारची स्थिती प्राप्त झालेली आहे, ज्ञान शक्ति ज्यांनी मिळविलेली आहे, निर्दोष अंत:करण झाल्यामुळे सगळ ज्ञान ज्यांना झालेले आहे, त्यामुळे संयमाने अशा त-हेच सर्व ज्ञान त्यांना होऊ शकत. त्या माहात्म्यांनी ही चरित्र लिहिलेली आहेत. त्यामुळे ही सर्व काल्पनिक काव्य रचना आहे अस कस म्हणता येईल?

काही लोक म्हणतात "दु:खेषु अनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृहा:" हे सगळ काल्पनिक पुरुषाचे वर्णन करायला गीता म्हणजे काय काव्य आहे की कादंबरी आहे? प्रत्यक्ष भगवंतांनी वर्णन केलेली भूमिका आहे ती काल्पनिक कशी होणार?

तर व्यास महर्षि हे समाधि अवस्थेपर्यंत जाऊ शकत होते. पूर्ण योगसिध्दी त्यांना होती. आणि त्या समाधि अवस्थेमध्ये जाऊ शकत असतानासुध्दा त्यांची अवस्था कशी आहे. ईश्वराची संपूर्ण लिला वर्णन करून ईश्वराच स्वरूप समोर मांडायच आहे. हे जे त्यांनी भागवताचे वर्णन केल आहे . हरिची लीला फक्त आहे. सृष्टी, स्थिती, प्रलय वगैरे सगळ भागवतामध्ये आलेल आहे. तर ही सगळी हरिलीला वर्णन करायची आहे. आणि ही आनंदस्वरूप हरिची लीला वर्णन करण्याकरता भागवत आहे.

तेव्हां ईश्वराच स्वरूप जे आहे ते कोणच स्वरूप आहे? आरंभापासून कोणच स्वरूप लागत आणि मुख्य ईश्वराच स्वरूप कस आहे वगैरे सगळ समजावून सांगण्याकरता भागवताची

रचना व्यास महर्षिंनी केलेली आहे. आणि नंतर त्यांना शांति मिळाली असं उदाहरण त्यांनी मुद्दाम दिलं आहे, कि भगवान ईश्वराचं स्वरूप कसं आहे त्याचं चिंतन करणं, त्याच्याबद्दल भक्ति अंत:करणामध्ये उत्पन्न होणं, त्याची वृध्दि होणं या योगानेही शांति प्राप्त होते हे सुध्दा आरंभाला आपलं चरित्र व्यास महर्षिंनी भागवतामध्ये मुद्दाम सांगितलं आहे. यावरूनही भागवतामध्ये आरंभापासूनच ईश्वरस्वरूपासंबंधी दिग्दर्शन आहे. पहिला श्लोकच मुळी ईश्वरस्वरूप व्यक्त करणारा आहे.

आता बराच वेळ झालेला आहे. उद्यापासून आणखी भागवतामध्ये ईश्वर स्वरूपा-संबंधी ईश्वरभक्ति संबंधी काय काय उल्लेख आहेत. ते आणखी तर्कसिध्द आहेत कि नाहीत, प्रमाणसिध्द होऊ शकतील कि नाही त्याचाही विचार तसेच भगवद् गीतेमध्ये काय आहे ह्या दोन्ही दृष्टीनं, उद्या आणि परवा, यथामति चिंतन आपल्याला करायचं आहे.

।। अवधूत चिंतन श्रीगुरूदेव दत्त ।।

-:-:-:-:-:-:-

बडोदा

यन्नामस्मरणाद्दैन्यं पापं तापश्च नश्यति
भीतीग्रहार्तिदु:स्वप्नं दत्तात्रेयं नमामि तम्

प्राचीन धर्मशास्त्रज्ञांनी आत्मोद्दार करण्या करता कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग असे तीन उपाय सांगितलेले आहेत. भगवद्गीतेमध्ये या तिघांचेही स्पष्टीकरण केलेले आहे. वेळ थोडा होता त्या वेळेला. दोन्ही सैन्य समोर समोर येऊन उभी राहिली होती. सेनापति तयार आहेत, दोन्ही बाजूंचे. आणि अर्जुनाची दृष्टी त्या सैन्यावर पडल्याबरोबर त्याची बुध्दि आणखी बदलून गेली. त्याच धैर्य गेलं, भीती निर्माण झाली बुध्दिमध्ये. केवढी हिंसा माझ्या हातून आज होणार आहे असं त्याला वाटायला लागले. आणि मी युध्द करू शकणार नाही, मला युध्द करायच नाहीअसे त्याने भगवंतांच्या जवळ सांगितलं. त्या वेळेला त्याला हे सगळे उपाय त्यांनी सांगितलेले आहेत.

उपाय जरी असले तरी सर्व काही त्याचे अधिकारी नाहीयेत. महाविद्यालयामध्ये विद्येच्या शाखा अनेक असतात म्हणून काही प्रत्येक विद्यार्थी सगळ्या शाखेत जाऊ शकत नाही. ज्याला ज्या विषयाचा अभ्यास करायचा आहे, तो अभ्यास करण्याची योग्यता आहे तो तो त्या त्या विषयांचा अभ्यास करतो. तसंच पारमार्थिक दृष्टीने हे जे उपाय आहेत कर्म, ज्ञान, भक्ती, अष्टांगयोग वगैरे. यातही अधिकारी आहेत. अधिकार याचा अर्थ योग्यता. कोणीही कोणत्याही विषयाचा अभ्यास करावा असे नाहीये. "अधिकार तैसा करू उपदेश" संत सांगताहेत.

उपदेश करताना, मार्गदर्शन करतानासुध्दा त्याचा अधिकार काय आहे. अधिकार याचा अर्थ योग्यता कोणची आहे. ती परिक्षा करत असतात ते. त्याच्या वर्तनावरून त्याच्या बोलण्यावरून त्याची बुध्दि कशी आहे इतकी सगळी परिक्षा होती. अंत:करणामध्ये जे भाव असतील ते बाहेर मुद्रेवरूनही कळून येतात आणि ती योग्यताकोणाची कोणीकडे आहे तसा मार्ग त्याला दाखवतात. शास्त्राने तसेच मार्ग सांगितले आहेत. कोणीही कोणचा मार्ग स्वीकारावा असं नाहीये.

म्हणून अर्जुनला जरी सर्व मार्ग सांगितले. कुठ पर्यंत जायच आहे. जीव जो आहे हा जीव कुठपर्यंत जाऊ शकतो. त्याचीशेवटची भूमिका काय आहे हेही सांगितले आहे. आत्मा जो आहे- जीवाला तो कसा आहे. काय आहे हे समजून सांगून त्याला ज्या मार्गाने जायच आहे शेवटी जिथे जाऊन पोहोचायच आहे ती शेवटची भूमिकाही सांगितली आणि त्याची सगळी साधन सांगून दिलेली आहेत.

अर्जुनाला मात्र सांगितले - कर्मण्येवाधिकारस्ते- तुझा अधिकार तुझी योग्यता कर्म करण्याची आहे. तू कर्म कर. हे मी सांगतो म्हणून करं असे नाही. शास्त्र आहे, म्हणाले. जीवाला सर्वहि आणखी एकंदर मार्ग दाखविणार- अभ्युदय काय किंवा निश्रेयस काय- या दोन्हीही मार्गांचा विचार शास्त्रकारांनी केलेले आहे. आणि ते मार्ग कोणी करावेत, काय करावेत हेही सांगितलेले आहे. योग्यताहि प्रत्येकाची दाखविलेली

आहे. ज्ञानयोगाचा अधिकारी फार आहे. सर्वसंगपरित्याग करुन भिक्षा मागून राहतो. अर्जुन म्हणाला. तुला होणार नाही म्हणाले. प्रकृतिचा विचार करुन सर्व शास्त्र बनविलेल आहे. स्वभाव ज्याला म्हणतो आपण. ही प्रकृति पूर्व जन्मानुसार ठरलेली आहे. पूर्व जन्मामध्ये जसा जसा अभ्यास आपल्याकडून झाला असेल तसे तसे ते संस्कार आपल्या प्रकृति मध्ये म्हणजे बुध्दिमध्ये असतात. त्यामुळे या जन्मामध्येसुध्दा तशीच प्रकृति प्रवृत्त होते. तीच या जन्मात आहे. बुध्दि तीच आहे. शरीर जरी बदलले बाहेरच हे स्थूल शरीर, पांचभौतिक शरीर बदलणार आहे - त्याचा काल ठरलेला आहे. आयुर्मर्यादा, आयुष्यमर्यादा ज्याला आपण म्हणतो ती या शरीराच्या दृष्टीन आहे. आत्म्याला आयुष्य वगैरे काही संबंध नाही. शरीर हे एक त्याच साधन आहे.

कोणच्या मार्गान जायच आहे त्या मार्गान जाण्याकरिता आत्म्याला शरीराची जरुरी आहे. हया बाहय शरीराला स्थूल शरीर म्हणतात आणि हा देहच आत्मा आहे अशी (प्राय: नव्याण्णव टक्के) लोकांची समजूत आहे असं म्हटलं तरी हरकत नाही. देहापेक्षा मी वेगळा आहे अशी समजूत काही होत नाही. तत्व असेल. पण तत्व सगळयांना समजत अस नाही. समजल तरीनेहमी त्याची जाणीव राहाती असही नाही. पुष्कळ चांगले विचार आपण वाचतो, ऐकतो, परंतु तेव्हया पुरत ते समजत, बर आहे असं वाटत. पण त्या प्रमाणे आचरण करायला पाहिजे, त्याचे स्मरण करण हे फार कठिण आहे.

प्रकृतिम् यान्ति भूतानि

तू क्षत्रियांची प्रकृति घेऊन जन्माला आलेला आहेत. तुझ्या वरती क्षात्र संस्कार सगळे आहेत तू युध्द सोडून राहू शकणार नाहीस. हे त्याला बजावलेले आहे. त्यापेक्षा कर्तव्यकर्म जे तुझ आहे, आत्तापर्यंत तू जे ठरविलेलं होतस बनवासामध्ये पांडव जरी होते. तरी व्यास महर्षि ऐके दिवशी त्यांना भेटण्याकरता तिथ आले. आणि त्यांनी सांगितलं धर्मराजाला या अर्जुनाने तपश्चर्या करावी आणि सर्व देवांपासून अस्त्रविद्या मिळवावी. तुम्हालाच पुढे युध्द करावं लागणार आहे. युध्दाशिवाय तुमचं राज्य तुम्हांला मिळणार नाही. त्या करता तयारी करायला पाहिजे. तर ती तयारी म्हणजे अर्जुन त्याला योग्य आहे. अर्जुनानी जाव, तपश्चर्या करावी, शंकरांना प्रसन्न करुन घ्याव आणि सगळया देवांच्या पासून त्यांची अस्त्रविद्या मिळवून आणावी. म्हणजे तो अर्जुन समर्थ ठरेल.

म्हणून व्यास महर्षिनी त्याला मंत्र दीक्षा दिली आणि तो अर्जुन गेला तपश्चर्येला चार पांच वर्ष स्वर्गलोकांत जाऊन राहिलाहोता. त्याची आपल्याला आज कल्पना नाहीये. स्वर्गलोक म्हणजे काय, पाताळ लोक म्हणजे काय, भूलोकाची तरी कुठे सगळी कल्पना आलेली आहे ही जी काही चार पांच खंड सामान्यत: भूगोला मध्ये आहेत म्हणजे भूगोल काय एवढाच आहे ही जी भूगोला मध्ये दिलेली खंड तेवढीच भूगोलामध्ये आहेत. किती किती तरी आणखी पुष्कळ आहेत. अशी मोठी मोठी अरण्य आहेत कि जिथं पर्यंत कोणी जाऊ शकलेलं नाही. संशोधन झालेल नाही. ही भूगोलाची रचना सगळीच समजलीये असा अर्थ नाहीये. विज्ञान वाढलेल आहे. ज्ञान वाढत चाललेल आहे. जितपत वाढलेले

आहे? त्याचा उपयोग चांगला होणार आहे कि वाईट होणार आहे ? हा मुद्दा मोठा प्रश्न आहे.

विध्वंसक विज्ञान वाढलेले आहे. हा बुध्दिचा उपयोग आहे. बुध्दिनं हे सगळ विज्ञान वाढलेलं आहे हे मान्य आहे. पांच मिनिटामध्ये आणखी लाख लाख वस्तीच शहर उध्वस्त करता येईल, असे अणु बॉम्ब निर्माण झालेले आहेत. पण समाधान कुठय ? त्याच्या पेक्षाहि अधिक विध्वसंक अस्त्र बनवण्याचा प्रयत्न चाललेला आहे. संयम नाहीये. आपण याला आणखी आवर घातला पाहिजे अशी बुध्दि अजूनि होत नाहीये. म्हणून विज्ञान वाढलेले आहे त्याचा अर्थ सदुपयोग होणार आहे कि दुरूपयोग होणार आहे त्यावरून ठरवायचे.

तर अर्जुनाने ते अस्त्रज्ञान सर्व मिळविल. त्याच्या करता तपश्चर्या पण केली त्याने. तपश्चर्येशिवाय ती अस्त्रविद्या मिळत नाही. सध्याच विज्ञान - हे मोठ मोठे अणुबॉम्ब निर्माण करायला कोटयावधी रूपये लागतात. संशोधन करायच त्या प्रमाणे ते सगळे प्रयोग करून ती शस्त्र तयार करायची. त्यासाठी कोटयावधी काय अब्जावधी रूपये लागतात. ते जर बंद झाल तर जगात एकही बेकार राहाणार नाही. अर्थशास्त्र दृष्टीने किती अर्थ खर्च होतो. पण हे थांबवण्याची कोणाची इच्छ नाही. बेकारीझाली, अमूक झाल तमूक झाल, त्याच कारण हेच आहे ना. किती पैसा जातो त्याच्यात. शेवटी त्याचा उपयोग काय होईल ? जगापैकी अर्ध जग नाहीस होईल म्हणतात.

तर हे जे अर्जुनान मिळविलेल अस्त्रज्ञान हे तपश्चर्या करून मिळवल. पैशाचा तिथ संबंध नाही. मानसिक संयम ज्याला म्हणतात, मनाची, बुध्दिची योग्यता त्यांनी वाढिवलेली आहे. तो बुध्दिविकास करून घेऊन आपल्या बुध्दिन ते सर्व विज्ञान त्यांन मिळवलेल आहे. एकटया जवळ सर्व विज्ञान आहे. एकटया अर्जुनाची सर्वांचा संहार म्हणला पराजय म्हणा, करायची योग्यता होती. इतक ज्ञान त्यांना मिळवलेल होत.

परंतु त्याच बरोबर संयमहि त्याच्या जवळ होता. शस्त्र त्याच्या हातामध्ये नाहीत. त्याच्या अंगावर शस्त्र टाकायच नाही. युध्दाच्या वेळेला जरी परस्परांचे वैरी असले तरी युध्दाचे सुध्दा नियम आहेत. तर त्या प्रमाणे वागण्याला बुध्दिचा संयम पाहिजे. मनाचा निग्रह पाहिजे. कोणच्या वेळेला कोणावर शस्त्र टाकायच, हे समजल पाहिजे. मन आवरता आल पाहिजे. त्याशिवाय कस होईल ?.

तर तीहि तयारी आहे. म्हणून त्याला सगळया देवांनी आपली अस्त्र विद्या दिलेली आहे. तर या प्रमाणे आपली जी बुध्दि आहे ती अशी कार्य करायला समर्थ पाहिजे. बुध्दिवरून सामर्थ्य ठरवायच. योग्यता ही बुध्दिवरून ठरवितात. ती त्याची बुध्दि कशी आहे - चांगल्या मार्गाने जाणारी आहे कि वाईट मार्गाने जाणारी आहे.

हे आणखी समजून घेऊन त्याच्या योग्यतेप्रमाणे त्याने अभ्यास करायचा असतो. तो करत असतो. म्हणून अर्जुनाने वनवासात गेलेअसतांना सुध्दा तपश्चर्या करून सगळया देवांना प्रसन्न करून ती अस्त्र विद्या मिळविलेली आहे. युध्दाचीच त्यान तयारी केलेली आहे. ती त्याची प्रकृति आहे. स्वभाव आहे, ती त्याची बुध्दि आहे.

आणि ऐन वेळेला आता म्हणतोय मला युध्द करायच नाही. कोणती बुध्दि खरी ? वनवासात असतांना ज्या बुध्दिन इतक ज्ञान मिळविल,कौरवांचा एकट्याने पराजय केला तेराव्या वर्षी शेवटी आणि आता ऐन युध्दाच्या वेळेला हे मला बर वाटत नाही म्हणतोय अशी जी अस्थिर बुध्दि आहे. पूर्वी कशी बुध्दि होती. मन कस होत आणि आता मनात काय विचार आहेत. हया मनाच ऐकायच कि आणखी कोणीतरी नियामक म्हणून जो आहे त्याच ऐकायच? हाच प्रश्न आहे. आमच्या मनाला,बुध्दिला जे वाटत ते बरोबरच आहे अस त्या वेळेला वाटत. मी म्हणतोय तस झाल पाहिजे. हे सगळे विकार आहेत ना मनाचे त्या विकारामुळे त्या बुध्दिन झालेला निर्णय दुसरा एखादा विचारी मनुष्य तो चुकीचा ठरवितो आहे.खालच्या कोर्टाने दिलेला निर्णय हायकोर्टमध्ये बदलला जातो. हायकोर्टाचा निर्णय सुप्रीम कोर्टात बदलला जातो. म्हणजे सुप्रिम कोर्टातील न्यायाधिशांच्या बुध्दिची योग्यता, हायकोर्टातील,खालच्या कोर्टातील न्यायाधिशांच्या बुध्दिची योग्यता वेगळी वेगळी मानावी लागते. एकाच्या बुध्दिला ते बरोबर योग्य वाटल तर वरच्या कोर्टात निर्णय का फिरतात ? तेहि बुध्दिनच काम करतायत ना म्हणजे बुध्दि बुध्दिमध्ये सुध्दा एकमत नाहीये. याचाच अर्थ बुध्दिमध्ये स्थिरता नाहीये. आज एक बरोबर वाटल तर उद्या त्याच बुध्दिला तो निर्णय चुकीचा वाटतो. आपल्या स्वत:च्या बुध्दिला सुध्दा.

अर्जुनाची स्थिती झाली नाही अशी. पूर्वी किती उत्साहाने तपश्चर्या केली,अस्त्रज्ञान मिळविल,सगळया कौरवांचा भीष्मद्रोणांचा बृहन्नडा वेषामध्ये असतांनासुध्दा एकट्याने सगळयांचा पराजय केला. विराट राजाच सैन्य दुस-या बाजूला युध्दात गुंतलेल होत. भीम, नकुल,धर्मराज,सहदेव सगळे दुसरीकडे गेले होते. हा एकटा होता आणि तो सारथी सुध्दा रडका मिळाला त्याला. भित्रा,पळून जायला निघाला,त्याला धरला,इथे बैस,म्हणाले स्वत:चापरिचय करून दिला. मी कोण आहे हे लक्षात ठेव.तुला मी मरू देणार नाही. आणि मीहि मरणार नाही. असा तसला सारथी घेऊन ज्याने लढाई केली आणिभीष्म द्रोण,कर्ण यांना परत जावं लागलं. ही इतकी ज्याची बुध्दि काम करणारी होती,असा ज्याचा निर्णय झालेला होता तीच बुध्दि युध्दाच्या वेळेला बदललेली आहे.

म्हणजे बुध्दितत्त्व जे आहे, मन म्हणून जे आहे ते स्थिर नाहीये. निर्णय स्थिर नाहीये. कस वागाव आपण हे आपल्या बुध्दिन ठरवून भागत नाहीये. स्थिर बुध्दि ज्यांची झालेली आहे अशा प्रकारचे जे श्रेष्ठ माहात्मे आहेत त्यांचा निर्णय केव्हाही बदलू शकत नाही. कोणीही दुसरा माहात्मा असो तो बदलू शकत नाही.बरोबरच त्याला पटवून देतात ते. आणि स्थिर बुध्दिने खरा निर्णय होतो.

अस्थिर बुध्दिने निर्णय होऊ शकत नाही. शास्त्र हे स्थिर आहे. ईश्वराने ते सांगितलेलं आहे. आपल्या बुध्दिच्या सहाय्याने त्याचा विचार करायचा आणि आपले बदलणारे निर्णय थांबवायचे. आपल्या बुध्दिने तर्कवितर्क आपल्याला करता येतात. युक्तीवाद पुष्कळ मांडला येतो. पण ते सगळे युक्तिवाद योग्य निर्णय करू शकत नाहीत.

म्हणून आणखी ज्ञानमार्ग जो आहे त्याच्या करता बुध्दिची स्थिरता अत्यंत आवश्यक आहे. ती स्थिर बनविली पाहिजे. चंचल मन थांबल पाहिजे. स्थिर झालं पाहिजे. हे मुख्य ज्ञानमार्गाचं लक्षण आहे. अर्जुनाने सुध्दा कबूल केलं– मला हे मन काही आवरता येत नाही, म्हणाला. ज्यावेळेला आले अगोदर सांगितलं, मी युध्द करणार नाही, हे चुकीच आहे, केवढी हिंसा होणार आहे. "अहिंसा परमो धर्म:" पुष्कळ व्याख्यान दिलयं त्याने पहिल्या अध्यायात. ऐकून घेतलं भगवंतानी, शेवटी अर्जुनच म्हणाला – मला काही सुचत नाही.

कार्पण्य दोषोपहत स्वभाव:
पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेता:
यच्छ्रेय: स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे
शिष्यस्ते हं शाधि मां त्वां प्रपन्नम्. // २.७

तुमचा शिष्य आहे मी. माझ्या बुध्दिमध्ये धर्मसंमोह निर्माण झाला आहे. कोणचा धर्म आहे. हिंसा धर्म आहे कि अहिंसा धर्म आहे. मला कळत नाही काही. आणि ते कळत नसल्यामुळे माझं कल्याण कसं होईल, कोणचा माझा कल्याणाचा मार्ग आहे तो मला सांगा. तुमचा मी शिष्य आहे. अशी अहंकार सोडून जिज्ञासा ज्यावेळेला त्याने व्यक्त केली तेव्हा गीताज्ञानाच्या उपदेशाला सुरूवात झाली. असे अर्जुन किती तरी गेले. त्यांना काय आहे त्याच. जगाच काम त्यांच थांबत नाहीये. अर्जुन युध्दातून गेला म्हणून काय लढाई थांबली असती काय ती तर होणारच होती. ईश्वराचा संकल्प होता.

परंतु त्या अर्जुनाची बुध्दि अस्थिर आहे. सदोष आहे हे त्याने कबूल केलं. मला निर्णय करता येत नाहीये. मी बोललो असेन पण मला माझा निर्णय योग्य वाटत नाही. खर काय आहे ते मला समजावून सांगा. अशी आणखी निरहंकार वृत्ती त्यांन प्रकट केली त्या वेळेला गीताज्ञान प्रकट झालेल आहे. वाटेल त्याला गीताज्ञान मिळायचं नाही. मग त्याला सर्व समजावून सांगितल. तो त्याचाच भक्त होता. मोठा भक्त असला तरी बुध्दि अत्यंत स्थिर होण म्हणजे शेवटचीच अवस्था आहे ती. शेवटची भूमिका. मग त्या बुध्दिमध्ये कोणचाहि विकार नाहीये.

कोणचीही वासना नाही, हे ज्ञान मार्गाचे अगदी शेवटचे अंग आहे. निर्वासन मन होण म्हणजेच ज्ञान आहे. तेव्हा जरी आपल्याला काही दिसत असलं तरी सुध्दा आणि दिसत नसलं म्हणून हे नाही जे दिसत तेच तेवढ खर आहे हे वाटणे साहजिकच आहे. कोणीही म्हणल. त्याच्या करता काही विचार करायची जरूरी नाही. दिसत नाही ते नाही.

सामान्य शेतकरी, पहिल्या इयत्तेत जाणारा कोणीही म्हणेल मला जे दिसत नाही ते नाहीचे पण तेच मोठयांनी - विचार करणाऱ्यांनी म्हणायच का ? आणि त्या करता ज्यांनी विचार मांडलेले आहेत ते विचार समजून तरी घेतले पाहिजेत ना. दिसत नाही, का दिसत नाही ज्या डोळयांनी आपण पाहतो, सगळे पदार्थ आपल्याला दिसतात ते डोळे तरी दिसतात का. असं विचारलं तर/ दिसत नाही म्हणून आम्ही मानत नाही. पापपुण्य वगैरे कुठं आहे? दिसत नाही काही नाही. कसंहि वागलं तरी काय हरकत आहे? शूचिता ज्याला आपण म्हणतो, शुध्दता. पवित्रता हा पदार्थ दिसणारा नाहीये. शब्दप्रमाणं आहे शास्त्रानेच सांगितले आहे. फुलाचा वास घेतल्यानंतर ते फूल अपवित्र झालं, देवाला ते अर्पण करता येत नाही. काय झालं? काय वाळून गेल नाही ते. आत्ताच काढल आम्ही ते. वास घेतला आणि दिलं. ते अपवित्र का ?

तर शास्त्रीय प्रक्रिया/जी आहे, त्या शास्त्रीय प्रक्रियेप्रमाणे ईश्वराला ते अर्पण करता येत नाही. हे दृश्य म्हणजे डोळयाचे दाखविता येत नाही. डायबेटिस झाल्यानंतर अमूक तुम्ही खाऊ नका, पदार्थ, असं डॉक्टर सांगतात. काय आहे त्याच्यामध्ये, दाखवा आम्हाला असं म्हटलं तर डॉक्टर काही दाखवू शकतो का? साखर खाल्ली म्हणून काय झालं? खाऊन बघा म्हणजे समजेल, पुन्हा आमच्याकडे येऊ नका असे तो सांगणार. म्हणजे त्याची जी आज्ञा आहे, त्याचा जो शब्द आहे त्या शब्दानेच निर्णय होणार ना ? कोणच्या रोगामध्ये आणखी काय पथ्य आहे. कोणच खायच नाही काय करायच नाही हे तो सांगणार त्याप्रमाणे वागल पाहिजे. इथं रोग्यान त्याच्या बुध्दनं निर्णय केला तर काय होईल अवस्था ?

म्हणून हे बुध्दिमत्त्व जे आहे ते चांगल आहे. बुध्दिन सगळे निर्णय करता येतात. हे सगळ शास्त्रकारांना माहित आहे. परंतु त्याच्यातल्या गुण दोषांची तपासणी झाली पाहिजे. ती तपासणी करण्या करता शास्त्रप्रमाण आहे, माहात्मे आहेत. त्यांची बुध्द अत्यंत स्थिर झाल्यामुळे दुसऱ्यांच्या बुध्दितले गुणदोष ते समजून घेऊ शकतात, समजून सांगू शकतात, काढूनही टाकू शकतात. इतकी त्यांची शक्ती आहे.

म्हणून त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवायचाच आणि तो विश्वास ठेवण्याकरता त्यांची संगती काही दिवस करून पाहिली पाहिजे. हेही सांगितल आहे. नुसते कोणी तरी सांगितल हे चांगले आहेत, मोठे आहेत, नुसत्या सांगण्याने ऐकू नका. काही दिवस त्यांच्या संगतीत राहून त्यांचे गुण किती आहेत, आपल्या जवळ असलेले दोष त्यांच्याकडे आहेत कि नाही ही परिक्षा करायला काय हरकत आहे. विवेकानंदांनी रामकृष्ण परमहंसांची प्रथम परिक्षा केली. ते बुध्दिवादीच होते. परिक्षा करून मग सर्वस्व अर्पण केलेले आहे. विवेकानंदांची काय स्तुती करत, म्हणाले असे हजारो विवेकानंद निर्माण करणारी शक्ति भरतवर्षामध्ये आहे, सांगत होते ते. इतकी आणखी श्रध्दा आपल्या सद्गुरूबद्दल निर्माण झाली. परीक्षा करावी.

तर या प्रमाणे बुध्दितत्वाचा उपयोग हा सर्व ठिकाणी होऊ शकतो. व्यवहारामध्ये परमार्थामध्ये सगळीकडे होऊ शकतो. कर्मयोगही बुध्दिनं घेता येतो. भक्तियोगही आहे, ज्ञानयोगही आहे. तर त्या त्या विषयाचा अभ्यास करत असतांना तो अभ्यास कसा केला पाहिजे हे मात्र समजून घेतलं पाहिजे. तिथे आपण स्वत:च्या बुध्दिनं निर्णय घेऊ शकत नाही. म्हणून शास्त्रप्रमाण किंवा शास्त्रज्ञ जे संत महात्मे आहेत त्यांच प्रमाण त्यांचा उपदेश त्यांच शब्दप्रमाण हे मान्य करांव लागत.

भगवान शंकरांनी ह्या सगळ्या विद्या प्रगट केल्या आहेत. "सर्व विद्यानाम् ईश्वर:" असं त्यांच वर्णन आहे. सगळे विद्या संप्रदाय त्यांनी आपणांी सांगून दिलेले आहेत. नाथ संप्रदाय तर आहेच. मोठ योग्य सामर्थ्य ह्या संप्रदाय मध्ये पहायला मिळत. ज्ञान मार्ग जो आहे हा ज्ञान मार्ग म्हणजे शंकराचार्य रूपाने शंकरांनीच अवतार घेऊन तो उपदेश केलेला आहे. परंपरेस आलेला आहे. भगवान श्रीकृष्णांनीही आपणांी तोच ज्ञानमार्ग भगवद्गीता रूपाने ,सगळ्या उपनिषदांचे सार म्हणून सगळे सिध्दान्त त्यांनी भगवद्गीतेमध्ये त्यांनी मांडलेले आहेत. त्या गीतेचा अर्थ कोणता आहे काय आहे त्याबद्दल वादविवाद जरी असले तरी त्याच्यात काही हेतु असतो.

कर्मयोगच गीतेमध्ये सांगितला आहे असं लोकमान्यांच म्हणणं आहे. पण ते का सांगतात? सगळ्यांनी आपल वेदांताचा, ज्ञानमार्गाचा अधिकार नाही काही नाही, त्याला जे वैराग्य पाहिजे वासनाक्षय झाला पाहिजे, वासना कमी कमी झाल्या पाहिजेत तोच ज्ञानमार्गाचा अधिकारी आहे. विचार करू शकतो. तर सगळ्यांनीच आपला वेदान्त ऐकायचा, सोडून द्यावयाची कर्तव्य कर्म अशी सगळी परिस्थिती त्यांनी पाहिली. म्हणून कर्मयोगाचा पुरस्कार त्यांनी केला. हेतु आहे.

तर शंकराचार्य जे आहेत आपल्या भारतवर्षामध्ये त्यांच्या कालाबद्दल मतभेद आहेत. सातव्या शतकात झाले असं सांगतात, बौध्दाच्या पूर्वी झाले असेंहि सांगतात. असू दे तो मतभेद. त्यांच्या वाङ्मयाचा विचार करावा. त्यांनी तो मार्ग दाखवलेला आहे. जीवात्मा म्हणून जो आहे, त्या जीवात्म्याने कुठं जायचं आहे, सध्या जीवात्मा काय करतो आहे, स्वत:ला तो काय समजतो आहे, पहिल्यापासून विचार मांडले आहेत. देह म्हणजेच माझं रूप आहे अशी सर्व सामान्य कल्पना आहे. चार्वाकाच मत आहे. देहात्मवाद ज्याला म्हणतो आपण. म्हणजे अचेतन आहे. स्वत:ला अचेतन समजतो. कारण त्याच्यातल्या प्राणवायुचा संबंध सुटल्यानंतर त्याला काहीच किंमत राहात नाही. प्राणवायु जो पर्यंत आहे, सगळी इंद्रिय मन वगैरे अंत:करण तत्व जोपर्यंत त्याच्या मध्ये आहे तो पर्यंत शरीर आपणांी कार्यकारी आहे. त्याची जरूरी आहे. त्याला टिकविलं पाहिजे. त्याच्या करता काय काय प्रयत्न आहेत ते आपण करतो.

परंतु त्याचा संबंध सुटल्यावर शरीर हे विनाशी आहे हे नंतर कळत आपल्याला. तो पर्यंत पटत नाही. दुस-याच्या शरीराचा नाश झाला म्हणजे त्याच्या शरीराच दहन केल जात. घरात काही कोणी शरीर ठेवत नाहीत कोणच्या तरी रुपाने त्याची विल्हेवाट लावावी लागते. म्हणजे अर्थात ते काही कायमच राहाणार नाही. शरीर स्थूल देह. स्थूल शरीरापेक्षा आणखीही काही काही तत्व आहेत. शरीरामध्ये आणखी काही पदार्थ आहेत. त्याचाही विचार वेदान्त शास्त्रामध्ये ज्ञानयोगामध्ये केला आहे. ज्ञान ज्ञान जे संपादन करायच आहे, आत्मा म्हणून जो पदार्थ आहे. ~~[परमात्मा]~~ परमात्मा म्हणा. तो आहे कोण ? मी कोण आहे ? हा प्रथम विचार करावा म्हणतात. रमण महर्षिंचा हाच उपदेश आहे. मी कोण आहे हे अगोदर ठरवा. म्हणाले, देह मी आहे अस म्हटल्यानंतर त्या देहाला उद्देशून कोणी बोलत चालल तर लगेच राग येता आम्हाला. मला का बोललास? काही देहाचा अपराध झाला. देहाला कोणी मारत म्हणजे मलाच मारल असे वाटून आणखी फौजदारी वगैरे सगळे पुढचे मार्ग अवलंबतात.

परंतु हे संत महात्मे जे आहेत, त्यांच्या जवळ जी क्षमावृत्ति आहे. शांत वृत्ति आहे. कोणीहि कितीही अपराध केला तरी शांतता जी त्यांच्या जवळ आलो आहे ती शांतता कशी आली? हा एक मोठा प्रश्न आहे. आम्हाला कोणी अरे म्हटल्यानंतर आम्ही लगेच का रे म्हणणार. त्यांच तस नाहीये. म्हणून त्याच प्रेम आहे. ज्ञानपूर्वक प्रेम आहे. अनुभव घेऊन त्यांच प्रेम आहे. नुसतीच अंधश्रध्दा नाहीये. हा एक प्रकार.

सर्व कर्माचा कर्ताही तो आहे. भोक्ताही तो आहे, बुध्दिला प्रेरणा करणारी शक्ती तीच आहे. सेनापतिचा विजय झाला किंवा राजाचा विजय झाला अस म्हणतात. प्रेरणा त्याची आहे. सर्व सैन्याला कुठल्या बाजून जायच कस जायचतो सांगतो. त्याची बुध्दि सर्व कार्य करणारी आहे. बाकिच्या सैन्याची बुध्दि कार्य करु शकत नाही. त्याच्या आज्ञा मात्र त्यांनी मान्य केल्या पाहिजेत. तर विजय मिळेल. नाही तर सर्वनाश.

तर हे जस सैन्यामध्ये आज्ञापालन आहे तसच आपल्या शास्त्राची आज्ञापालन आहे तसच आपल्या शास्त्राची आज्ञा पालन करण म्हणजे सगळे मार्ग त्यांनी दाखविलेले आहेत. त्यात भक्तिमार्ग हा मोठा दाखविलेला आहे. ईश्वराची भक्ती उत्पन्न झाली असे आपण समजतो पण भक्तिला आरंभ होण्याला सुध्दा पुष्कळ काळ लागतो.

येषां त्वन्तगतं
पापं जनानां पुण्यकर्मणाम् /

ते व्दंव्दमोहनिर्मुक्त: भजन्ते मां दृढ व्रत: //

भक्तिचा अधिकार प्राप्त होण्याला सुध्दा किती तरी काल जातो. ती बाहय साधन भक्ति म्हणून करतो आपण. खरी भक्ति जी आहे. शुध्द प्रेम अंत:करणामध्ये उत्पन्न झाल्यानंतर होते. तुकाराम महाराज भंडारा पर्वतावर जाऊन बसायचे. काही काळजी नाही. जय जय रामकृष्ण हरि म्हणून सुरुवात झाली कि गेल देहभान/ पांडुरंगाकड लक्ष लागलेल आहे. तहान नाही. भूक नाही, किती काल गेला भान नाही. सात सात दिवस तशा अवस्थेमध्ये राहात होते. पॉल्तन शोध

करावा त्यांचा. कुठ गेले कुठ ? घरामध्ये ती शिव्या यायची म्हणतात. परंतु त्यांना जेवायला घातल्याशिवाय आपण जेवायची नाही. शिव्या यायची म्हणजे प्रसंगच तसा आहे ना. नेसायला नाही. खायला नाही, मुलाबाळांना काही नाही. काय तुमच्या भक्तिचा उपयोग आहे. ती विचारायची. पण तशाहि परिस्थितीमध्ये यांना काळजीच नाहीये. चिंता जी आहे ती त्याने करायची आहे. ज्याचा संसार आपण समजतो. त्याचा संसार आहे त्याने चिंता करायची आहे.

हा एक त्यांचा दृढभाव असल्यामुळे स्वत:च्या देहाची तहानभूक सुध्दा ते विसरून जात होते. तहान आणि भूक ही जन्मापासून सुरू झालेली आहे. या व्दंद्वातून बाजूला होणं फार कठिण आहे. त्याच्या करता तर सगळं चाललेलं आहे. सगळे प्रयत्न जे जगामध्ये जे चालू आहेत ते पोटा करता. पोट भरलं पाहिजे. पोट भरलं पाहिजे असं म्हटलं तरी चालेल. पण जे आजच भरलं तरी पुरे असं वाटत नाही आपल्याला. जीवन असे पर्यंत आपलं पोट भरलं पाहिजे. पण तिथ पर्यंत तरी थांबतो का? मुलांचं भरलं पाहिजे. नातवांचं भरलं पाहिजे.

ही जी काही भूमिका आमच्या चित्ताची आहे त्यामुळे ईश्वराची भक्ति ही होऊ शकत नाही. अनेक जन्मांचं दुरित जे आहे. "दुरितांचे तिमिर जावो" ज्ञानेश्वर महाराज प्रार्थना करताहेत. दुरित क्षय झालं पाहिजे. ( वैयक्तिक ,सामुदायिक किती दुरित चाललेलं आहे, होत आहे. साचत आहे. त्यामुळे इच्छेप्रमाणे फल मिळू शकत नाही. इच्छाशक्ती तेवढी प्रबळ होत नाहीये.

ईश्वरभक्तांची संकल्पशक्ति फार मोठी आहे. सत्य संकल्प म्हणतात. संकल्प झाला कि ते झालच पाहिजे. सृष्टी निर्माण करतांना नुसता संकल्प झालेला आहे. आणि संबंध इतकी सृष्टी निर्माण झाली आहे. युक्तिवादहि पुष्कळ आहे.

ईश्वराला का मानायच या बद्दल महिम्न स्त्रोत्रामध्ये एक युक्तिवाद मांडला आहे.

अजन्मानो लोका: किमवयववन्तोऽपि |
जगतामधिष्ठातारं किं भवविधिरनादृत्य भवति// //

सर्व जे काही सृष्टीतले पदार्थ आहेत ते उत्पन्नच झालेले नाहीत. आहे तसेच पहिल्यापासून कायम आहेत. उत्पन्नच जर झाले नाहीत तर उत्पन्न करणारा कशाला पाहिजे? उत्पन्न झाले नाहीत असं कसं होईल? सावयव पदार्थ आहेत ते. ज्याचे अवयव आहेत तो पदार्थ उत्पन्न झालेला आहे. ज्याला अवयव नाहीत असा पदार्थ उत्पन्न झालेला नाही असे म्हणा तुम्ही हवं तर/ पण प्रत्येक पदार्थाचा जर अवयव विभाग दिसतो आहे आपल्याला तर ते कार्य आहे. कार्य म्हणजे जन्य, उत्पन्न झालेले आहे. "अजन्मान:" म्हणताहेत. उत्पत्ति मानली पाहिजे सावयव पदार्थांची. मग कोण उत्पन्न करणारा आहे?

अधिष्ठाता किम् भवति नित्य भवति

केवळ निसर्गाने झालेल आहे, निसर्गाने झालेले आहे एकच उत्तर शेवटपर्यंत आमच्या बुध्दला सापडल. जगाचा एक निर्माता, अधिष्ठाता, नियमन कर्ता, शासन कर्ता कोणीतरी असल्याशिवाय जग निर्माण झाल कसे म्हणायचे ? म्हणून कोणी तरी नियामक असला पाहिजे. उत्पत्ति कर्ता हेहि युक्तिवादाने सिध्द झाल आहे.

कोणी तरी जीवाने आपल्या बुध्दिन निर्माण केल असेल. जीव अनिश आहे, असमर्थ आहे. मग तो एक जीव असो किंवा जीव समूह असो. आधुनिक समाजवादाप्रमाणे समाज असो. पण जीव समुदायसुध्दा एवढ मोठ कार्य करू शकणार नाही. महासागर आहेत, मोठी जंगल आहेत, मोठे डोंगर आहेत. अशा असंख्य गोष्टी जगामध्ये आहेत. तेव्हा सगळेही जीव अनिश आहेत. जगाचा निर्माण कर्ता कोणीतरी असल्याशिवाय सगळ निर्माण झाल काय? बंगला बांधलाय आणि कोणी त्याचा बांधणाराच नाही. आपोआप झाल काय/ निर्माण ? एका वर एक वीट बसली, दगड बसले, दारे बिर सगळी आपोआप लागली ? निसर्ग याचा अर्थ काय आहे?

म्हणून कोणी तरी कर्ता असला पाहिजे. सामान्य कार्य कोणतेही जरी असल तरी कर्त्याशिवाय होत नाही. मग हे ईश्वर कार्य जे आहे त्याचा कर्ता नाही अस कस म्हणायच?

अनीशो वा कुर्याद्भुवनजनने क: परिकरो

यतो मंदास्त्वाम् प्रत्यमरवर संशेरत इमे /76//

संशय घेतात म्हणाले. मंद आहे बुध्दि त्यांची. त्या शक्तीची जाणीव ज्यांना झालेली आहे अशा प्रकारचे माहात्मे त्याच्या वरती आणखी प्रेम करताहेत. विश्वास ठेवताहेत. त्यांची अनुशक्ती पराभक्ति आहे. सर्वोच्च अनुशक्ती आहे. अनुराग सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे. बाकिच्या वस्तूंवरचे प्रेम हे तात्पुरत आहे. मुख्य प्रेम परमेश्वरावर आहे. म्हणून तो सर्व कर्माचा भोक्ता आहे, कर्ता आहे. प्रेरक असल्यामुळे, नियामक असल्यामुळे हे ज्ञान झाल पाहिजे. ईश्वर ज्ञान हेच ज्ञान आहे. सर्वही कर्माचे कर्तृत्व ईश्वराच्या ठिकाणी आहे. "अहम् सर्वस्य प्रभव: मत्त: सर्वम् प्रवर्तते" लहान मोठी सगळीही कार्य माझ्यापासून होताहेत. आता ही सगळी कार्य व्हायची म्हणजे केवढी शक्ति असली पाहिजे/ किती तरी फिर्यादी कोर्टात होतात त्यांचे नंबर लागायलाच चार चार पाच पाच वर्षे लागतात. इतकी कार्य, इतक सगळ, अस शक्यच नाहीये. किती तरी फिर्यादी पडलेल्या आहेत. तारखा पडत असतात पडतात का पाडतात कोणाला माहित.

तर या प्रमाणे सर्वत्र नियामक असणा-या त्या ईश्वर शक्तीची जाणीव ज्यांना झालेली आहे ते निश्चिंत आहेत, त्याच्यावर विश्वास टाकून. त्या ईश्वराच स्वरूप कस समजून घ्याव सांगताहेत भगवान्-

सर्व लोक महेश्वरम्

सर्व जे लोक आहेत, ब्रम्हादि देवसुध्दा त्यांचाही कोणी तरी मोठा नियामक आहे. जरी देव झाले तरी जीवच आहेत ते. ते सर्वही जीव नियम्य आहेत. ही जाणीव

आमच्या बुध्दिला होत नाही. पटत नाही, आम्हाला. आम्हीच सगळं कार्य करतो. आम्हीच सर्व मिळवितो. मग दुसरा नियामक कुठला ? आम्हीच सर्व नियामक आहोत. आम्हीच कुटुंब प्रमुख आहोत. आम्ही समाजाचे नेते आहोत. आमच्यामुळे सर्व कार्य चालल आहे. पांच वर्ष सुध्दाआसन स्थिर राहात नाही. वस्तुत: नियम आहे-- निवडून आल्यावर पांच वर्ष तरी राहायला हव कि नको. तितक सुध्दा राहात नाही. आणि आम्हीच नियामक आहोत म्हणायच. "सर्व लोक महेश्वरम्" ही एक जाणीव आहे. भीति आहे.

आणि शेवटच जे कार्य त्यांनी सांगितलं आहे.

सुहृदम् सर्व भूतानाम

सर्व लोक नियामक आहेत. त्याचप्रमाणे सर्वांना प्रेरणा करणारा आहे, इतकी ज्ञानशक्ति, क्रियाशक्ती आहे. अस असून "सर्व भूतनांम सुहृदम्" सर्वांचा तो सुहृद आहे. त्यामुळे भक्तियोगाची प्रवृत्ती आहे, नियामक आहे, सगळ करणारा आहे म्हटल तरी भीतीने काही इतकी प्रवृत्ती होत नाही. पण सर्वांचा तो मित्र आहे. सुहृदम् शब्दाचा अर्थ शंकराचार्य महाराजांनी केलेला आहे.

प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारिणम्

संस्कृत भाषेतले प्रत्येक शब्द विशेष अर्थ दाखविणारे आहेत. इतकी ती भाषा समृध्द आहे. पण ती समृध्दच आम्हाला नकोशी झालेली आहे. मेघ शब्द आहे. तो शब्द त्याची ती अवस्था दाखवतो. मेघ शब्द नुसता आपण पाहातो. मिह सिंचने. मिध धातूचा अर्थ सिंचन करणारा म्हणजे आता पाऊस पडणार आहे अवस्थेमध्ये त्याला मेघ असे म्हणतात. वारावाह म्हणजे नुसत पाणी वाह म्हणायच. मेघ म्हणायच नाही.

तर या प्रमाणे प्रत्येक पदार्थांच्या निरनिराळ्या अवस्था दाखवणारे शब्द ज्या भाषेत आहेत ती किती समृध्द असली पाहिजे. ज्या भाषेचा अभ्यास करण्याची इच्छा विदेशा मध्ये सुध्दा अजूनि आहे. आमचीच ती इच्छा नाहीशी झाली आहे. इंग्रजांच्या वेळेला सुध्दा आवश्यक भाषा म्हणून होती. शिक्षणक्रमामध्ये इंग्रजी प्रमाणे संस्कृतही आवश्यक भाषा म्हणून असे.

तर " सुहृदम् सर्व भूतानाम्"

सुहृदम् म्हणजे प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारिणम्. उपकारी म्हणजे दुसऱ्याने उपकार केला तर आपण करायचा. बहुतेक अशीच आणखी स्मृती आहे. तो आपल्या उपयोगी पडला तर आपण पडायच. पण उपकाराची अपेक्षा नाही. मी त्याच्यावर उपकार केल्यावर त्याच्यापासून काय आपलाफायदा होईल ही त्याला अपेक्षा नाही. केवळ उपकार करायचा "अनुकूल" त्याच नांव आहे.

अनुकूल: शतावर्त: पद्मीपद्म — निम्बशोक /

विष्णुसहस्त्रनामामध्ये "अनुकूल" हे एक ईश्वराचे नांव आहे. नेहमी अनुकूल आहे. "सुहृदम् सर्व भूतानाम्" ईश्वर हा सर्वांचा मित्र आहे. त्याच सगळ्यांकड लक्ष आहे. सर्वत्र

समदृष्टी त्याची आहे. ही ईश्वर स्वरूपाची ओळख करून देण आवश्यक आहे. अशी जर ओळख झाली, ज्ञान झाल तर

ज्ञात्वा मां शान्ति

त्याच्या चित्ताला पूर्णशांति आहे. सगळ द्वंद्व संपलेल आहे त्याच. म्हणजे त्याच्या वर त्याने भार टाकलेला आहे.

हा जो एक अभ्यास आहे किंवा कर्माच फल आहे. पुण्यकर्म ज्या वेळेला होत त्या पुण्यकर्माने बुध्दित असणारे दोष दूर होतात. सत्वांश अधिक अधिक वाढत जातो आणि त्यामुळे ईश्वर प्रेम निर्माण होत. त्याच्या प्रेमाकरता त्याच्या नामस्मरणाकरता देहभानही विसरून जातात त्याचे भक्त. आपल्या संसाराकडे लक्ष नाही, आपल्या देहाकडेही लक्ष नाही. खाण्यापिण्याकडेही लक्ष नाही. अखंड "रामकृष्ण हरि" करणारे तुकाराम महाराज. हे शिक्षण कुठ घेतल त्यांनी ? आणि अस आपल्याला होता येईल का?

निंदा आम्ही करू. काय त्याचा उपयोग आहे ? काय भजनाचा उपयोग आहे ? पंढरपूरला जाण्याचा काय उपयोग आहे ? वगैरे म्हणतो आपण. रोज रोज जेवणाचा तरी काय उपयोग आहे ? अस म्हटल तर. रोज जेवायच ? पुन्हा भूक आहेच आपली. भूक आणि तहान कमी करण्याचा प्रयत्न आमच्या बुध्दिन शक्यच नाही. हा प्रयत्नच आमच्या डोळ्यासमोर येण शक्य नाही. ते त्याच्या करता प्रयत्न करत नाहीत. "बहुत सुकृतांची जोडी म्हणूनी विठ्ठली आवडी" स्पष्ट सांगितलय त्यांनी. ईश्वराची भक्ति पापक्षय झाल्या शिवाय उत्पन्न होणार नाही.

त्यामुळे त्या प्रेमामध्ये मन गुंतुन गेल्यानंतर आपल्याला आणखी काही नाही. तहान नाही. भूक नाही. झोप नाही. काही नाही, व्यवहारातसुध्दा रात्रपाळी आहे दिवस पाळी आहे आपण कष्ट मानतो का ? ज्या उद्देशाने आपण नोकरी करतो. रात्रपाळीसुध्दा करतो झोप नसली तरी सुध्दा आपण करतो कि नाही ? म्हणजे एका ठिकाणी तन्मय लक्ष झाल, ध्येयाच्या प्रेरणेने आपण वागू लागल्यानंतर ही सगळी दुःख किंवा काही अवस्था असल्या तरी आपण विसरून जातो म्हणा, सहन करतो म्हणा. तहान भूक देहाला आहे. देहाच्या अवस्था आहेत. प्राणमय कोश जो आहे. प्राणवायु चोवीस तास काम करीत असतो. बाकीची इंद्रिय चोवीस तास काम करणारी नाहीत. दमणारी आहेत. प्राणवायु दमत नाही. चोवीस तास सारखा चालू आहे. म्हणून तो सगळ्या मध्ये मुख्य आहे. त्याची उपासना, ते एक ईश्वराचे स्वरूप आहे, शास्त्रामध्ये- उपनिषदामध्ये सांगितली आहे. अनेक स्वरूपांनी जगताच संरक्षण करण्याच कार्य ईश्वरा कडून चालू आहे.

सूर्य चंद्र आदि सुध्दा ज्या आहेत त्या अधिकारी देवता आहेत. ईश्वराने आपल्या सृष्टीमध्ये नेमलेले हे अधिकारी आहेत. ते सुध्दा जीवात्म आहेत. पूर्व जन्मामध्ये ज्यांच्या हातून विशेष काही पुण्यकर्म झाल असेल ते या ठिकाणी कोणी इंद्र होतो, वरुण होतो, चंद्र होतो. स्थान आहेत ती. राष्ट्रपति म्हणजे काय एक व्यक्ति

नव्हेयि. राष्ट्रपति हे स्थान आहे. पंतप्रधान हे स्थान आहे. त्याच्यावर त्या त्या वेळेला येणारी व्यक्ति राहातीतिथे. पण ते पद आहे. तस इंद्र, चंद्र, वरुण ही संगळी स्थान आहेत, पद आहेत. त्या पदावर येणारा जो जीवात्मा आहे तो आपल्या विशिष्ट पूर्व कर्माने येतो. आपापल्या योग्यतेनुसार त्या त्या स्थानावर तो जाऊ शकतो. त्या सृष्टीमध्ये त्याला तसा विशेष अधिकारही इतर जीवापेक्षा त्याला मिळू शकतो. आणि अशा अनेक रूपाने या सृष्टीच्या संरक्षणाच कार्य चाललेल आहे.

तर सर्वांह जीवांच्या बुध्दिला प्रेरणा करणारा ईश्वर आहे. ही ईश्वराची ओळख पहिली करून घेतली पाहिजे. सर्वांचा नियामक तो आहे. त्याच्यावर महाभारतकारांनी एक कथा लिहिली आहे. बुध्दिला प्रेरणा करणारा आहे आणि सर्वांच्या बुध्दिच नियमन करणारा आहे. कर्ण आणि अर्जुन यांच वैर आहे. कर्णाने मुद्दाम आणखी दुर्योधनाने सहाय्य केल, त्याला अंग देशाच राज्य दिल. त्याला साजा केला. आपला मित्र म्हणून ... सांभाळ केला. मानसन्मान केला. अर्जुनाचा नाश त्याच्या हातून व्हावा हा उद्देश आहे. कर्णाजवळ असलेले जे काही आहे, कवच कुंडल त्याची नेली इंद्रानी मागून घेऊन आणि सूर्य नारायणाने त्याला सांगितल होत इंद्र येणार आहे उद्या ब्राम्हण वेषात. जन्मत:च तुझ्या अंगावरती असलेल कवच तू त्याला काढून दिलस तर तू काही जिवंत राहणार नाहीस. तुला धोका आहे.

पण ह्याचा दानीच स्वभाव आहे. दुर्योधनाच्या संगतीमुळे म्हणा पूर्व दोषामुळे म्हणा कर्ण पुष्कळ पांडवांच्या विरूध्द वागला आहे. कर्णीह आणखी पुष्कळ भित्रा होता. सहनशीलता त्याची कमी होती, क्षत्रिय असून सुध्दा. असेहि पुष्कळ महाभारतामध्ये आहे. पण त्याच मोठ उदार मन आहे. कोणीहि मागायला आल्यानंतर काय असेल ते देऊन टाकायच. हा फार मोठा गुण आहे. त्यानी दिली ती कवच कुंडले. तरी त्याच्याकडून एक वासवी शक्ति मागून घे, म्हणाले. म्हणजे त्याचा तरी तुला उपयोग होईल. इंद्राने दिली. पण एकाच व्यक्तिचा नाश होईल, म्हणाला. नंतर माझ्या कडे ती परत येईल. आणि कर्णाने ती वासवी शक्ति अर्जुनाला मारण्याकरता आपल्या जवळ ठेवली.

महाभारतकारांनी त्या युध्दाच्या वेळेच वर्णन केलेल आहे. कर्ण जेव्हा सेनापति झाला तेव्हा प्रसंगाने कर्ण अर्जुनाची समोरा समोर गाठ पडली. युध्द झालेल आहे. शेवटी दोघे ही दमले. संध्याकाळी कर्णाच्या शिबिरामध्ये दुर्योधनाने जाऊन विचारले. तुझ्या समोर अर्जुन आला होता. त्यावेळी तुझी वासवी शक्ती वापरून तू त्याला का ठार का मारल नाहीस? तो म्हणाला, विसरलो. मला काही स्मरण राहिल नाही.

म्हणजे अर्जुनाला मारण्याकरता त्याने शक्ति मिळवली. अर्जुन समोर आलेला आहे. अशा वेळेला विसरलो म्हणण हे योग्य आहे का ? पण विसरला खरा. शेवटी त्या शक्तीचा उपयोग घटोत्कचावर करावा लागला त्याला, त्यांना आवरेना तो - पांडवांच्या पक्षातल्या. त्याला मारल त्याने.

आता ही जो घटना आहे.

मत्तस्मृतिर्ज्ञानमपोहनंच म्हणून भगवान म्हणताहेत. स्मृति किंवा ज्ञान अज्ञान हे सर्व माझ्यामुळे होतं. तर सर्वांच्या बुध्दया नियामक म्हणून परमेश्वर आहे. कर्णासारख्या महान योध्याला आणखी विस्मरण व्हावं. नेहमी जी गोष्ट आठवणीत राहिली पाहिजे तीच कशी विसरला ? तर अशा रीतीने स्मृति किंवा विस्मरण हे सगळे बुध्दिचे जे गुणधर्म आहेत त्यांची प्रेरणा शक्ति वेगळी हे या वरुन सिध्द होतं.

आणि अशा प्रकारच ईश्वरस्वरुप जरी असल तरी हुकूमशहा नाहीये. हे त्यांनी मुद्दाम सांगितलय. त्याच्या ताब्यात सगळ आहे हे दाखविल. ईश्वराच्या स्वाधीन सगळ आहे. तरी सुध्दा " सुहृदम् सर्व भूतानाम्" प्रेम आहे. वात्सल्य आहे म्हणून संतमहात्मे संसार वगैरे सोडून देऊन त्याच्या प्रेमामध्ये दंग होतात.

हा एक भक्तिमार्ग स्वतंत्र आहे आणि तो सर्वांना पोषक आहे. कर्ममार्गामध्ये पुष्कळ आणखी चुका होतात. मंत्र चांगले यायला पाहिजेत. त्याचप्रमाण आहुति वगैरे व्यवस्थित टाकल्या गेल्या पाहिजेत, दक्षिणादान झाल पाहिजे, अन्नदान झाल पाहिजे व्यवस्थित.

विधीहीनम् मसृष्टान्नम्<br>मंत्रहीनम् दक्षिणम् /<br>श्रध्दा विरहितम् यज्ञम् ता.सं परिचक्षते//

प्रत्येक कर्माचे विभाग त्यांनी दाखविले आहेत.

देशे कालेच पात्रेय दीयते/ तद्दान सात्विकं स्मृतं अनुपकारीणे //
आपल्याला जे द्रव्य मिळालेल आहे त्यात सर्वांचा भाग आहे. आपल्या परिवारातल्या माणसांचाहि आहे समाजातल्या माणसांचाहि आहे. ही जर बुध्दि उत्पन्न झाली, संग्रह करणा-यामध्ये आणि त्याप्रमाणे जर कार्य झाल तर कशाला साम्यवाद निर्माण होईल? कोणाचाहि संबंध नाही. मी माझ्या बुध्दिन,सामर्थ्यान सगळ मिळवल आहे. मीच मालक आहे म्हटल्यावर साम्यवाद येणारच. त्याला काही प्रचार,उपदेश करायची जरुर नाहीये. आपोआपच येतो.

तर ही जी स्थिती आहे. ईश्वराच मात्र अस आहे कि अंत:करणामध्ये जीवांच्या प्रेम निर्माण झाल्यानंतर त्या प्रेमाशिवाय ईश्वराला कशाचीहि जरुरी नाहीये. शुध्द कृतज्ञता आहे. प्रेम याचा अर्थ कृतज्ञता आहे. बुध्दिवादाने शरीर निर्माण केल जात नाही. शरीर कोण निर्माण केल? गर्भामध्ये शरीराचा परिणाम कसा कसा दिसून येतो. नुसत निसर्ग हे उत्तर शोभत नाहिये बुध्दिवादाला. कोणीतरी एक शक्ती आहे असे बुध्दिवादाला का/ मान्य नाही? आम्हाला अस का वाटत ? निसर्ग अस आपल सगळयाला उत्तर देवून गप्प बसतो आपण. गर्भ,शरीर जे उत्पन्न होत आहे ते कस उत्पन्न होतय? शरीरामध्ये किती पदार्थ आहे, किती नाडया आहेत, इंद्रिय कशी आहेत त्याचप्रमाणे ज्ञानेंद्रिय कोणची आहेत, कर्मेंद्रिय कोणची आहेत, प्राणवायु काय किंवा पंचप्राण काय हे आहेत तरी काय? हे शरीरामध्ये राहतात कसे? किती दिवस राहतात ? आमच्या इच्छेन राहतात? आमची इच्छा नसतांना जात का? शरीरही ठेवत नाही आम्ही. असे सगळे किती तरी विचार पुढे येतात.

या दृष्टीने विचार करणारे संत आहेत. त्यामुळे त्यांच प्रेम त्या शक्तीवरती अधिकाधिक आहे. आणि त्या प्रेमामुळे त्यांना कृतज्ञता आहे. ज्याने आम्हाला हे शरीर दिलेले आहे, ज्याने ही इंद्रिय दिलेली आहेत त्याबद्दल आपण काहीही करत नाही. त्याला काही इच्छा नाही ही गोष्ट निराळी. परंतु कृतज्ञता म्हणून काही तरी करायला पाहिजे कि नको. त्याच निदान स्मरण तरी करायला पाहिजे. आठवण तरी ठेवली पाहिजे. ह्या कृतज्ञता बुध्दिन त्यांच प्रेम भक्ति अधिकाधिक वाढत असते, अनुभवहि त्यांना येत असतो आणि त्याअनुभवामुळे त्यांच्या मनातल्या इच्छा सगळ्या संपून गेलेल्या असतात.

पंढरपूरला सगळे साधुसंत जात होते म्हणतात. तुकाराम महाराजहि जात होते. बाकिचे साधुसंत आले कि तुमची कशी काय व्यवस्था आहे, काय पाहिजे तुम्हाला वगैरे पांडुरंग विचारायचे. तुकाराम महाराज आले कि मात्र पांडुरंग खाली मान घालून बसायचे. बाकीच्या संतांनी विचारल अस का? तुकारामांच्या समोर खाली मान घालून का बसता? पांडुरंग म्हणाले तो आला म्हणजे काही मागतच नाही. न मागणा-याच्या पुढ मान खाली घालावी लागली. काही नकोय त्याला.

ही /काही बुध्दिची तयारी आहे. मला हे पाहिजे, मला ते पाहिजे, किती कार्य, प्रयत्न चाललेले आहेत. किती युनियन होताहेत. करा. संप करा. इथ ह्यांच्या तुकारामांच्या मनांत काही नाहीये. देव देण्याला समर्थ आहे ना/ समर्थ असतांनासुध्दा काही नाहीये. त्यामुळे देवाला सुध्दा कौतुक वाटत. नियामक असणारी शक्ति /होते. अनुसूया माता केवळ कर्तव्यनिष्ठ आहे. "अतिथी देवा भव". अतिथीलाच देव समजत होती. केवळ कर्तव्यनिष्ठ आहे. दुसरा कोणी मोठा देव दिसत नसला तरी अतिथी हे त्याच एक प्रतिक आहे. ही धर्मशास्त्राची आज्ञा पालन करणारी अनुसूया माता ईश्वर हे त्रिमूर्ति रुपाने तिची परिक्षा पाहाण्याकरता आलेले आहेत. त्या परिक्षेतूनहि ती उत्तीर्ण झाली. सर्व विश्वाच्या नियामकाला तिने नियम्य बनविले. पुत्र म्हणून बनवले. तिची आज्ञा पालन करावी लागली दत्तात्रेय रुपाने ही शक्ति जीवाच्या जवळहि आहे. जीवाच्या बुध्दिमध्ये ही शक्ति आहे. "नर/ करे सो नर का नारायण हो जाय" नारायण सुध्दा तो होतो.

पण ह्या बुध्दिचा विकास झाला पाहिजे. सगळही पसायदान ज्ञानेश्वर महाराजांच बुध्दिविकास दाखवणार आहे.

जे खळांची व्यंकटी सांडो
तया सत्कर्मी रति वाढो
भूता परस्परे घडो मैत्र जीवाचे //

बुध्दितले दोष अगोदर गेले पाहिजेत. ही ईश्वराजवळ प्रार्थना आहे. ताप अंगात

असे पर्यंत देता येत नाही. अगोदर दोष गेला पाहिजे म्हणून योगशास्त्राकारांनी अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह, हे जे पाहिजे यम म्हणून सांगितलेले आहेत. यम म्हणजे दोष निवृत्ती. हे पहिले दोष घालवा म्हणतात. अहिंसा म्हणजे हिंसा निवृत्ती. दुस-याला पीडा करणं ही जी प्रवृत्ती आहे, वाणीन मनान परपीडा न करण म्हणजे अहिंसा तर परपीडेपासून निवृत्त होणं हा पहिला अभ्यास आहे. दोष घालवण्याचा पहिला अभ्यास योगशास्त्रकारांनी सांगितलेला आहे. बाकीचे गुण पुढे आहेत. सत्य म्हणजे खर बोलल पाहिजे असं त्यांना सांगायच नाहीये. खोट बोलू नये हे सांगायचय. वाणीला दोन्ही सवय आहे. जास्तीत जास्त खोट बोलायचीच सवय आहे. बोलणे हा वाणीचा विषय आहे. खर बोलणं किंवा खोट बोलणं. त्यात एक विभाग त्यांनी काढून टाकायला सांगितला आहे. असत्य वाणी बोलू नये. असत्य बोलण बोलू नये. सत्य बोलायच असेल तर बोला नाही तर असत्य तरी बोलू नका. हा अभ्यास आहे.

अस्तेय. चोरी न करणं.

अपरिग्रह. साम्यवाद पूर्वीसुध्दा आहे. पूर्वीपासून भारतामध्ये साम्यवाद आहे. तो काही दुस-यांनी नवीन काढलेला नाही.

शरीराच संरक्षण होण्याकरता जेवढा आवश्यक आहे तेवढाच संग्रह करणं. जास्ती संग्रह न करण हा अपरिग्रह आहे. संग्रह निवृत्ती ही पूर्वीपासूनच सांगितली आहे. त्याचा संग्रहाचा दुस-याला उपयोग होईल ना/ ह्यानेच सगळा संग्रह केला तर: . . . .

" अपरिग्रहस्थैर्ये जन्म कथंता संबोध: //

अशी जर दोष निवृत्ती झाली, हिंसा पूर्ण गेली, मनातून गेली, वाणीतून गेली. कोणालाहि मर्मभेदक बोलायच नाही. मर्मभेदक बोलल्यानंतर वाणीन हिंसाच झाली. प्रत्यक्ष काठीनं मारणं म्हणजेच हिंसा नाही. तर ही सर्व प्रकारची अहिंसा स्वत: हिंसा न करण, दुस-या कडूनही न करण अहिंसेचे अनेक प्रकार आहेत. मनानेसुध्दा हिंवा न करण. अमंगल दुस-याच चिंतन न करणे. दुसरा हिंसा करतो आहे त्याला अनुमोदन देणं ही सुध्दा हिंसा आहे. तसही होऊ नये. अशा सर्व प्रकारच्या हिंसेची पूर्ण निवृत्ती ज्याची झालेली आहे त्याला -

अहिंसा प्रतिष्ठायाम् तत्संनिधौ वैरत्याग: //३५

हे योगसूत्रकार त्याच फल सांगताहेत. पूर्ण अहिंसामय ज्याची वृत्ति झाली. शरीर, मन, वाणी इ. सर्व दृष्टीन हिंसा ज्याची दूर झाली परपीडा कधीही शक्य नाही त्याच्याकडून. त्याच्या संन्निध येणारा जो मनुष्य आहे त्याच्या हि अंत:करणातली हिंसा दूर होतेय. वैर त्याग: हे त्याच फल आहे.

पुराणामध्ये ऋषिंच्या आश्रमाच वर्णन आहे. वसिष्ठ ऋषिंच्या आश्रम विश्वामित्रांचा आश्रम आहे. आश्रमांत गेल्या बरोबर वाघ आणि गाय एका ठिकणी फिरतात. एका ठिकाणी पाणी पितात, साप व मुंगूस एका ठिकाणी राहताहेत. जन्मत:च

ज्यांच वैर आहे अशा प्रकारच्या प्राण्यांच्या मनातलं वैर दूर झालेल आहे. हे केवळ आपल्या बुध्दला अतिशयोक्ति वाटण्याचा संभव आहे. उगीच आपली पुराणे अतिरंजित काही तरी आहेत.

पण तस नाहीये. अतिशयोक्ति कशालाअसेल ? बुध्दशक्तिच ते वर्णन आहे. ज्याच्या बुध्दतली हिंसा पूर्ण दूर झालेली त्याच्या सान्निध्यामध्ये येणा-या प्राण्यांच्या मनातली सुध्दा हिंसा दूर होते आहे. हे त्याच सामर्थ्य आहे. नुसत्या अहिंसेचा सांगून काय उपयोग? वाणीन त्याच वर्णन करता येणार नाही. प्रयोग आहेत. अहिंसा हिंसा त्याग: हा प्रयोग आहे. सत्य भाषण हा प्रयोग आहे आणि त्याचा अभ्यास करण्यामध्ये किती तरी काळ जाणार आहे.

म्हणून आपल्याला ते असंभवनीय आहे. प्रत्यक्ष त्याचे प्रयोग दिलेले आहेत. अपरिग्रह जर सिध्द झाला शरीराला आवश्यकतेशिवाय इतर कशाचाहि संग्रह करायचा नाही ही जर मनोवृत्ती तयार झाली तर -

जन्म: कथ-तासंबोध: //

मागचा जन्म कोणचा होता, पुढचा जन्म कोणचा येणार आहे. स्वत:चाच नाही तर दुस-याचाहि त्याला समजतो. त्याच्या बुध्दचा ज्ञानशक्तिचा इतका विकास होतो. हे सगळ फळ शास्त्रकारांनी दोष निवृत्तीच सांगितलं आहे पहिल्या प्रथम. मग गुण वगैरे पुढ आहेत. हा जो अभ्यास आहे हा अभ्यास जीवात्मा करू शकतो का? आक्षेप घ्यायला हरकत नाही. कारण आपल्या हातून होतच नाही काही. काही तरी आपले आक्षेप घेतो आपण. शक्तिच नाही आमची. हा जर अभ्यास करायचा म्हटला तर कोण्या मोठ्या महापुरूषाच सहाय्य नको का? कि जो बुध्दमध्ये सुध्दा परिवर्तन करू शकतो. बुध्दमध्ये असलेले दोषहि दूर करू शकेल. जीवांना उत्तम शांति वगैरे देऊ शकेल. असा जर कोणी असेल तर त्याच सहाय्य घ्यायला काय हरकत आहे.

अगोदरच नाही नाही म्हणून बाजूला रहायच आणि ते दोष जास्तीच वाढायचे आमच्या बुध्दतले. संकर जास्ती वाढायचा. भूता परस्परे पडो मैत्रजीवाचे ही मागणी काय राष्ट्राला उपयोगी नाही काय? संत राष्ट्राकरता काही करत नाहीत म्हणतात. निष्क्रिय त्यांनी बनविलेल आहे असा आक्षेप घेणारे ज्ञानेश्वरांचा अभ्यास करणारे बुध्दवादी आहेत भारतामध्ये. तस लिहून ठेवल आहे. केवढी मागणी आहे ही. सर्व भूतांच परस्पर सौहार्द असाव अशी देवाजवळ मागणी केली आहे. राज शासन हे करू शकणार नाही. आज अनुभव आपल्याला येतोय. एकाच प्रांतामध्ये सौहार्द भावना रहात नाही. सर्व भारतामध्ये सौहार्द भावना आहे. कायद्याने किंवा वट हुकूमाने संपादन करता येण शक्य आहे काय? ती शक्ति येण्याकरता अशा प्रकारची बुध्दशक्ती मोठी पाहिजे कि ज्याच्या बुध्दमध्ये उत्पन्न झालेला संकल्प, ज्याच्या वाणीतून निघालेली आज्ञापालन केलीच जाते. कधीही त्या आज्ञेचा अवमान होणार नाही. अशी शक्ती निर्माण झाली पाहिजे.

त्या करता आणखी सर्व प्रेरक, सर्व नियामक अशा प्रकारची ईश्वर शक्तीही आहे. अशी जाणीव मनामध्ये ठेवून ते संत महात्मे प्रयत्न करत असतात. दैवी संपत्ति म्हणतात याला. राक्षसी प्रकृति, आसुरी प्रकृति आणि दैवी प्रकृति असे प्रकृतिचे विभाग भगवद्गीते मध्ये दाखवलेले आहेत. राक्षसी आणि आसुरी प्रकृतिच्या लोकांच काहीही नाही. त्याची निंदाच केली आहे नवव्या अध्यायामध्ये.

मोघाशा / मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतस: /
राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिता: //

हे मोहामध्येच फसतात. राक्षसी प्रकृति आणि असुरी प्रकृति यामध्ये थोडा फरक आहे. विध्वंसक प्रकृति. दुस-याचा नाश करायचा. ही बुध्दि राक्षसी प्रकृति आहे. असुरी बुध्दि म्हणजे भोगप्रधान प्रवृत्ती ध्वंसप्रधान प्रकृति ही राक्षसी प्रकृति. नाश करायचा सगळा. जाळपोळ करायची. असुरी प्रकृतिमध्ये जाळपोळीला प्राधान्य नाही. भोग प्राधान्य आहे. मला किती भोग मिळेल. माझे किती कल्याण होईल, इकडेच लक्ष आहे. पण तीहि त्याज्य मानली आहे.

आणि दैवी प्रकृति मात्र श्रेष्ठ म्हणून भगवान सांगताहेत. दैवी प्रकृतिचे जीवात्मे हे ईश्वराच भजन करतात.

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिता: /
भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् //

ज्ञानपूर्वक भजन अंधश्रध्दा नाहीये. संपूर्ण पंचमहाभूतांचा जो आदि आहे निर्माण कर्ता आहे हे ज्ञान त्यांना आहे. म्हणून माझ्या भजनाकडे त्यांच लक्ष आहे. "अनन्य मनसा" म्हणतात. दुसरी कडे कुठेही त्यांचे लक्ष जात नाही. मनाची स्थिरता त्यांच्या ईश्वर स्वरुपाच्या ठिकाणी झालेली आहे. ही स्थिरता होण्याकरता ईश्वराची उपासना पाहिजे. किंवा ईश्वर स्वरुप सद्गुरु महात्मे यांची उपासना पाहिजे. त्याशिवाय आणखी नुसत्या वाचनाने, ऐकण्याने, श्रावणाने काही होत नाही. पटत त्या वेळेला. हे असं व्हावं, चांगल आहे पण ते ऐकण, वाचन संपल कि पुन्हा आपल पहिल्या प्रमाणे सर्व सुरु. स्मशानामध्ये गेल्यावर तेवढया पुरत वैराग्य निर्माण होत. काल होता बघा. काल त्यांच माझ भाषण झालं. गेला कि आज. तेवढया पुरत पोहोचवून यायच पुन्हा आमचे आपले सगळे उद्योग सुरु झालेले आहेत. मी अजरामर आहे. मला मरण नाही.

त्यांच संपूर्ण वय सत्कर्मामध्ये, पुण्यकर्मामध्ये गेलेल असत. "सत्कर्मे योगे वय घालवावे." म्हणून सगळा दुरितक्षय त्यांचा झालेला असतो. मन, बुध्दि अत्यंत शुध्द झालेली असते. त्यामुळे त्यांना ईश्वर शक्तिची जाणीव होते आणि म्हणून त्यांच अंत:करण तिथ जात. प्रल्हादजींना केवढी आणखी त्यांच्या वडिलांची भीती होती / त्यांनी विचारलं कां तू हरिच भजन करतोस ? तो म्हणाला, मी भजन करीतच नाही."

माझ्या अंतर्यामी जो आहे तो मला प्रेरणा करतो. भजन करवून घेतो. ख-या जाणीवेतून दिलेल ते उत्तर आहे. नुसते फसविण्याकरता दिलेलं नाही. अंतर्यामी म्हणून एक ईश्वरशक्ति आहे. सगळयांहि इंद्रियांना प्रेरणा करणारी शक्ति आहे. आमच्या बुध्दि शक्तिन सगळ होत नाहीये.

एकदम डोळे बिघडतात. एकदम कानाने ऐकू येण बंद होते. एकदम रसनेंद्रियावरती काही तरी परिणाम होतो. एकदम एक बाजू जाते. चालतच नाही शरीर. का होत है ? आमची शक्ति सगळी आहे अस म्हटल्यानंतर हे अस का व्हावं? डॉक्टरची शक्ति आहे अस म्हटलं तरी अस का व्हावं? लगेच बर का होऊ नये ? ह्याची उत्तर काय त्यांची ? सगळयांना "निसर्ग" हेच उत्तर. म्हणजे निराशा उत्पन्न करणार उत्तर आहे हे.

म्हणून काही तरी एक असलेल्या शक्तिच अस्तित्व मान्य करण्याकरता संतांचे प्रयत्न झालेले आहेत. बुध्दिला प्रेरणा करणारी, सर्वहि कार्य करण्याला समर्थ असणारी अशा प्रकारची एक पूर्ण शक्ती आहे. त्यात अपूर्णता काहीही नाहीये. म्हणून त्यांचे प्रेम त्याच्या वरती आहे. आणि त्या प्रेमामुळे त्याच्या ठिकाणी दोष दिसतच नाहीत.

मधुराधिपतेरखिलम् मधुरम् /

वल्लभाचार्यांच म्हणण आहे. प्रेम त्याच्या ठिकाणी असल्यामुळे तिथं दोष नाहीच आहेत. ज्यांना ह्या भक्तिमार्गाची कल्पना नाही. भारतीय संस्कृतिची कल्पना नाही असे जे लोक असतील पाश्चात्य देशातील लोकतेही आता हरे राम हरे कृष्ण करायला लागले आहेत. काही इथून संतांनी जाऊन उपदेश केल्यामुळे, त्यांनाही पटायला लागलेल आहे. पण ज्यांना हे काही माहिती नाही त्यांनी आणखी रामाला नांव ठेवावीत, कृष्णांना नांव ठेवावीत. माहिती नाही त्यांनी नांव ठेवली तर हरकत नाही पण या देशामध्ये जन्माला येऊन रामांना कृष्णांना नांव ठेवणारे लोक निर्माण झालेले आहेत. केवढ दुर्दैव आहे/

बुध्दि स्वातंत्र्य, बुध्दि स्वातंत्र्य त्याला काही मर्यादा आहे कि नाही. आपली शक्ति केवढी आहे, काय आपण करु शकतो, काही काही कल्पना नाही. आपल्या इच्छेप्रमाणे कितीतरी गोष्टी घडून येत नाहीत हा अनुभव येत असतानासुध्दा ईश्वर नाही म्हणायच /

तर अशा संत माहात्म्यांनी दैवी प्रकृति मिळवलेली आहे. आपली बुध्दि दैवी करण्या करता त्यांनी प्रयत्न केले आहेत. राज्य गेल तरी हरकत नाही पण वनवासात गेले पाहिजेत पांडव. परंतु कृष्णभक्ति त्यांची कायम आहे. द्रौपदीची तर कृष्णभक्ति मोठीच होती. प्रसिध्दच होती. दुर्वास ऋषि आले असता धर्मराजाच्या धर्मापेक्षा द्रौपदीचा भक्ति योग श्रेष्ठ ठरलेला आहे. गोपालकृष्णांना बोलावल. हे एवढ संकट दूर करा. म्हणाली. तिच्या प्रेमामुळे येऊन, त्यांनी दूर केल. "अनन्य मनसा:" अन्य ठिकाणी मन कधीही जात नसत या दैवी प्रकृतिच्या लोकांच. जे खरे भक्त आहेत त्यांच दुसरीकडे कुठेहि लक्ष नाहीये. माझ काहीही नाही. हे विश्व माझ नाही.

तस्यैवाहम् ममैवासम् / स एवाह इतित्रिधा /
भगवत शरणं त्वम् स्यात् साधनाभ्यासयोगत: //

तीन भूमिका आहेत. तस्यैवाहम् ही पहिला भूमिका आहे. मी त्याचाच आहे. " सत्यपि भेदा
आचार्य महाराज सांगताहेत.
नाथ तव अहं नमाम् किन्त स्यात्
सामुद्रोहि तरंग: क्वचन समुद्रो न तारंग: //

तरंग हा समुद्राचा तरंग आहे. तरंगाचा समुद्र नाही. समुद्र विस्तर्ण आहे त्याच्यात लाटा आहेत. तस मी सर्व व्यापि सर्व शक्ति ईश्वराचा मी दास आहे ही पहिली भूमिका आहे.

त्याच्यानंतर " ममैवासौ" ही त्याच्या पेक्षा प्रेम वाढल्यानंतर हा माझाच आहे परमात्मा, दुस-याचा नाहीये. ही जास्ती प्रेमाची भूमिका आहे.

आणि शेवटी "स एवाहम्" सोऽहं ही भूमिका आहे. अहमेहि इकडचा गेला तिकडचा आणखी तो नियम्य नियामक भाव आहे. व्दंद्व संपलेल आहे. ही शेवटी बुध्दि उत्पन्न होती आणि त्याच समाधिमध्ये तो निमग्न असतो. पूर्ण आनंद त्याला त्या वेळेला मिळतो. प्राथमिक अवस्थेमध्ये जीवदशा जो पर्यंत आहे तो पर्यंत पूर्ण आनंद नाहीये. हे सगळे अनुभव सिध्द आहे.

म्हणून संत माहात्म्यांचा उपदेश आहे -
किंबहूना सर्व सुखी
पूर्ण होऊनी तिन्ही लोकी
भजिजो आदि पुरुषी अखंडित ॥

दहा वाजून गेलेले आहेत. पुरे आज आता. पुष्कळ विषय मोठा आहे भक्तियोगाचा किती तरी संताचे ग्रंथ हे दाखविणारे आहेत. युक्तिवाद आहे त्याच्यामध्ये. सगळ दाखवलेल आहे. बुध्दिला पटवून देण्याकरता त्यांनी उपदेश केलेला आहे. आणि त्यांची जी अनुभव शक्ति आहे, तप:शक्ति आहे, पुण्यशक्ति आहे त्या पुण्यशक्तिचाहि त्यामध्ये वाचन करण हे हितकारक आहे. अगदी मराठी भाषेमध्ये करून ठेवलेले आहेत, सगळ्यांकरता केवढे त्यांचे उपकार आपल्यावर झालेत. त्यांच्या वाचनाने आपल्याला मार्गदर्शन होऊन त्या मार्गाने जाण्याची बुध्दि जर ईश्वर प्रसादाने आपल्याला झाली. त्याप्रमाण वर्तन झाल तर ही सगळी सुधारणा होण शक्य आहे. "भूता परस्परे पडो मैत्र जीवाचे" याची जरूर आहे आज. ते मिळत नाही. काही तरी दोष आपण काढतो. जाती पुष्कळ आहे, अमूक पुष्कळ आहे, काही तरी नाव ठेवतो अ पण.

एका जातिचे लोक कशाला भांडताहेत तिकडं? त्यांच्या त्यांच्यामध्ये. एकच जात आहे ना ती. [ इराण-इराक] काही तरी युक्तिवाद करायचा आणि आभासात्मक युक्ति. ती खरी युक्ति नसती. तेव्हां एक मुख्य लक्षात ठेवून परस्परांची मैत्री

व्हावी हे ज्ञानेश्वर महाराजांनी देवाजवळ मागितलेल आहे. देवाय कार्य आहे. देवाच्या कृपेने, त्याची प्रार्थना करून बुध्दला प्रेरणा त्याने करावी, परस्पर सौहार्द्र भावना निर्माण व्हावी, बुध्दीविकास कसा कसा झाला पाहिजे हे सगळ त्यांनी पसायदानामध्ये सांगितले आहे. बुध्द कशी असावी. असो.

// अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त //

रत्नागिरी
डिसेंबर १९८६

*********************************************
* ह्रस्व, दीर्घ अथवा अन्य कोणत्याहि *
* दुर्लक्षाबद्दल वाचकांनी क्षमा करावी *
*********************************************

दत्तात्रेय त्वां नमामि प्रसीद
त्वं सर्वात्मा सर्वकर्ता न वेद ।
कोऽप्यंतं ते सर्वदेवाधिदेव
ज्ञाताज्ञातान्मे पराधान्क्षमस्व ।।

भगवान शंकराचार्य महाराजांनी सर्व देवतांची स्तोत्रे केलेली आहेत. गणेश आहे, देवी आहे. शंकर. विष्णु, सूर्य नारायण सर्वत्र एक परमेश्वर आहे हा त्यांचा सिद्धान्त आहे. म्हणजे जीवसुद्धा निराळे नाहीत. ईश्वराची अनेक स्वरूपे आहेत. पण ती एकच ईश्वर आहे, अनेक रूपांनी. इतकच नव्हे तर जगा मध्ये दिसणारे सर्व जीवसुद्धा परमेश्वर स्वरूपच आहेत. ईश्वररूप सगळ जग आहे, अस पहाव, असा अभ्यास करावा अस उपनिषदामध्ये सांगितलेले आहे.

म्हणून जरी भिन्न भिन्न देवता आपल्याला व्यवहारात दिसतात, ज्याच्या त्याच्या आवडी प्रमाणे जो तो भक्ति करत असतो. तरी सर्वत्र एक परमात्मा आहे. जगाची उत्पत्ति करण, तारण करण आणि संहार करण ही कार्य त्या ईश्वराकडून चालू आहेत. भिन्न भिन्न रूप त्याने धारण केली. ब्रम्हा, विष्णु, महेश.

विष्णुंनी सर्व जगाच संरक्षण करण्याच कार्य आणखी घेतलेल आहे. सगळ्यांच पालन करायच. भयकृत भयनाशन: दोन्ही त्याची रूप आहेत. भय निर्माण करतो. भय दूरही करतो. आणि ते सगळंहि संरक्षण आहे. भय निर्माण केल तरी ईश्वराच ते संरक्षणच आहे, अशी भक्तांची भावना असते.

पांडवर वनवासामध्ये गेले. बाहय व्यवहार दृष्टीन त्यांच साम्राज्य कौरवांनी घेतलं. आणि त्यांना वनवास पत्करावा लागला. व्यवहार दृष्टीन हे किती तरी विपरीत दिसते. पुष्कळ कष्ट पडले, दु:ख झाल, अस आपण समजू. परंतु वनामध्ये असे पर्यंत पांडवांचा जसा गृहस्थाश्रम चालू होता तसा दुर्योधन राजाला सुद्धा करता येत नव्हता. मोटे मोटे ऋषि कुटी मध्ये यायचे. त्यांच्याबरोबर चर्चा करावी. धर्मशील धर्माधर्माचा विचार प्रत्येक दिवशी त्यांनी करायचा.

प्रत्येकाने करावा अस सांगितलय, रात्री झोपेच्या वेळेला. सकाळी उठल्यापासून आत्तापर्यंत आपल्याकडून काय काय पुण्य झाल आणि काय पाप झाल याचा विचार करुन निजाव म्हणतात. आपण सत्पुरुषांच्या प्रमाणे वागलो का पशुप्रमाणे वागलो. आत्मनिरिक्षण कराव.

त्याप्रमाणे धर्मराज आणि त्याचे सगळे बंधू वनामध्ये गेले. काही ऐषआराम नाही. कुट तरी आपल झोपडी बांधून राहायचं. परंतु इतक पुण्य त्यांच्याकडून घडल. इतक अन्नदान घडल. त्या द्रौपदीन केलेल आहे. सूर्य नारायणाने पात्र दिलेल होत. आणि सूर्योदय झाल्याबरोबर त्याची पूजा केली कि त्याच्यातून वाटेल तितक अन्न मिळायच. काळजी नाही. आज इतकी मंडळी जेवायला येणार. स्वयंपाक व्यवस्थित झालाय कि नाही. कमी पडणार तर नाही ना । काही काळजी नाही. सूर्य नारायणाची प्रार्थना त्याकरताच धर्मराजांनी केली. येणारे जे काही ऋषि मुनि वगैरे आहेत, त्यांना अन्न मिळाल पाहिजे. ही भावना आहे.

अधिदैवी विभाग म्हणून जो आहे आपल्या संस्कृतीमध्ये. अधिभौतिक विभागाकडेच आपल लक्ष आहे फक्त. पण अधिदैविक विभागहि असतो. देवता हया पुष्कळ आहेत. आपल्या इंद्रियांच्या. प्रत्येक इंद्रियाच्या देवता आहेत. वेगळया वेगळया देवता. त्यांच्याशी संबंध त्या देवतांचा असतो, तो पर्यंत कार्य त्या इंद्रियांकडून होत राहात. तो अधिदैवी विभाग तिकडहि लक्ष देणारे आणखी पांडव होते. अध्यात्मिक तर आहेच आहे.

आत्मा, परमात्मा, ईश्वर कोण आहे याचाहि विचार करणारे ते होते. तर व्यवहारामध्ये वनात जाऊन राहाणे म्हणजे काही सुख नाहीये. राजवाडयामध्ये राहाणारे हे, त्यांना वनामध्ये सुख कस असेल ! परंतु त्यांची जी दृष्टी होती ती धर्म दृष्टी, पुण्य दृष्टी होती. लोमश ऋषि आहे. चला, म्हणाले, तीर्थ यात्रेला जाऊ या, तीर्थयात्रेला निघाले. राज्यावर असते तर रथ, सैन्य वगैरे घेऊन गेले असते इथ काही नाही. पायांनीच तीर्थयात्रा. इथ जवळ साधन सामुग्री काहीय नाही ना ! पायांनी आणखी तीर्थयात्रा. शरीराचेहि श्रम आहेत. वाणीनहि भगवंताच नामस्मरण चाललेल आहे. मनान चिंतन चाललेल आहे. अशी तीर्थयात्रा संबंध भारत-वर्षामध्ये केली.

काया वाचा मनाने जे पुण्य घडले ते पुण्य हे सुद्धा एक मोठ त्यांना अनुकूलच झाल कि नाही ! जरी अशी परिस्थिती आली असली तरीसुद्धा वनामध्येहि ईश्वराने त्यांच्याकडून धर्माचरण करून घेतले. अधर्माच कधीहि आचरण नाही. सामुग्रीच नाही जवळ. वाहानाची व्यवस्था नाही. पायांनीच तीर्थयात्रा करावी लागली. म्हणजे साम्राज्य गेले ते बर झाल का आणखी वाईट झाल ? हाहि एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

साम्राज्य मिळविल त्यांनी स्वतः राजसूय यज्ञ केला. सगळी एकंदर पृथ्वी जिंकली. आणि गेलं. संपल. परंतु ते साम्राज्य जवळ नसतानासुद्धा आणखी त्यांच्या हातून किती-तरी सत्कर्म झाली. अहोरात्र देवाच नामस्मरण चाललेल आहे. बारा वर्ष वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास. तेरा वर्ष काढावी लागली. पण त्याच्या मध्ये कितीतरी पुण्य-संचय झालेला आहे. अन्नदान करीत होते. कुणी पैसे मागायला आला तर त्यांच्याजवळ काही नाही. काही व्यवस्था असेल. परंतु राज्यावर असताना जितक धन देता येईल तितक या वेळेला कस देता येईल.

तर हे सगळे दोष, मनाचे, वाणीचे, शरीराचे, कोणतेहि दोष राहू नयेत या करता जी काही सत्कर्म शास्त्रकारांनी सांगितली ती सगळी सत्कर्म त्यांनी केलेली आहेत. ही ईश्वराची कृपा समजले. वनामध्ये आपण राहिलो ही देवाची कृपा आहे अशीच त्यांची समजूत होती. एकाधा वेळेला वाटायच त्या द्रौपदीला. पण तिने काही धर्म सोडला नाही शेवट पर्यंत. शत्रूने राज्य घेतल कपटान आपण मिळवलेल राज्य, असे एखाद्या वेळेला विचार येत असतील मनामध्ये. परंतु समाधान होत, कृष्णभक्ति होती. त्यामुळे तिच्या मनाच समाधान होत. म्हणून तेरा वर्षाच्या त्या दिव्यातून ते पार पडलेले आहेत.

पांडवांचा शोध करण्याकरता कौरवांनी पुष्कळ प्रयत्न केले. कारण त्यांनी ठरवल होत. एक वर्ष अज्ञातवासामध्ये पांडव राहिले पाहिजेत. त्या वर्षी जर पांडवांना शोधून काढल कौरवांनी, पांडव अमूक ठिकाणी आहेत अशी जर बातमी मिळाली आणि जर त्यांचा शोध लागला तर पुन्हा बारा वर्ष वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास. अशी अट होती तरी धर्मराजाने ती कबूल केली म्हणजे जन्मभर वनवासामध्ये राहा-ण्याची पाळी आली असती. परंतु भगवान गोपालकृष्णांची इच्छा आहे. त्या ईश्वराच्या इच्छा शक्तिने सगळी कार्य होत असतात. जरी त्याचे (दुर्योधनाचे) हेर त्यांच्या पाठीमागे होते, कुठ जातात पांडव, कुठ राहातात, काय करतात. बारा वर्ष संपत आल्यानंतर तर जास्तीच हेरांचे जाळ होत. कारण तेराव्या वर्षी कुठ राहतात ते शोधून काढायची ती सोय होती.

पण पत्ता लागला नाही. पांडव कुठ गेले ते कुणालाहि कळल नाही. एक वर्ष राहिले. त्यांचा शोध कसा लागेल म्हणून चिंताग्रस्त होते सगळे, दुर्योधन वगैरे, कौरव मंडळी. भीष्म द्रोणांनी सांगितले, पांडवांचा शोध तुमच्या सी. आय. डी. खात्या-कडून होण शक्य नाही. सापडणार नाहीत ते. त्यांना तर यमधर्मांनी वरदान दिल

होत. दुर्गादेवीन वरप्रदान केलं होत. तुम्ही आपल्या मूळच्या वेषात जरी फिरलात तरी तुम्हाला कुणीहि ओळखणार नाही.

एक वर्षापर्यंत हा एक देवतांशी संबंध त्यांचा होता म्हणून तर ते अन्नदानाचे पात्र त्यांना मिळाले त्याने त्यांनी अन्नदान केल. तर अशारितीने पांडवांना जन्मभर आणखी वनामध्ये राहाता याव अशी व्यवस्था जरी कौरवांनी केली असली तरी बारा वर्ष पर्यंत पांडव कुट राहातात कोणत्या वनामध्ये राहातात कुट तीर्थयात्रेला गेलेले आहेत हे सगळ त्यांना कळत होत. पण शेवटच्या वर्षी पत्ता नाही कुट गेले पांडव. म्हणून भीष्म द्रोणांनी सांगितल पांडवांचा शोध असा लागणार नाही. कसा लागेल ? ज्या देशामध्ये लोकांची मनोवृत्ती धर्मानुकूल झालेली आहे, गुणग्राहक लोक आहेत, केवळ दोषाकडे पाहाणारे लोक ज्या देशात नाहीत त्या देशात पांडव असतात, म्हणाले. हे त्यांनी सांगितल. पांडवांच्या गुणांचा विकास ज्या ठिकाणी झालेला असेल तिथ तुम्हाला पांडवांचा शोध निश्चित लागेल.

पण तशी स्वतःची बुद्धि नाही, कोण लोक, कसे आहेत, धर्मशील कसे आहेत, त्या दृष्टीने चौकशी करायला पाहिजे. तर ही अशी जी भगवत् भक्ति त्यांच्या जवळ होती त्यांनी जे ईश्वराला आनंद व्हावा, संतोष व्हावा असे गुण मिळवले होते आणि गुणांकडे त्यांचे लक्ष होते. ते गुण कायम राहिले पाहिजे. काही चांगल्या संगतीमध्ये असे पर्यंत चांगले गुण असतात. पुन्हा दुसरी बिघडली संगती कि पुन्हा गुण जातात. तर गुण उत्पन्न होण ते अधिकाधिक वृद्धिंगत होण्या करता पांडवांचा प्रयत्न अहर्निश चालू आहे. राज्याकडे विशेष लक्ष नाही. मिळवल राज्य त्यांनी शेवटी.

गोपालकृष्णांची तशी इच्छा होती धर्मराज राजा झाला पाहिजे, भरतवर्षाचा. त्यांची इच्छा होती. ईश्वराची इच्छाशक्ति आहे. त्या इच्छाशक्तिपुढे कोणालाहि जाता येत नाही. जरी दुर्योधनाने, कौरवांनी पुष्कळ सैन्य जमल. तर ही भगवंताची इच्छा, धर्मराज राजा व्हावा, अशी का झाली ?

युद्धाच्या ऐन वेळेला अर्जुन अगदी भिऊन गेला. काय, माझ्या हातून केवढ पाप होणार ! सगळया लोकांना आणखी माराव लागणार. अर्जुनाने मारल असत त्यांना. युद्धाचेहि काही आणखी नियम आहेत. धर्मयुद्ध म्हणून करायच आहे. युद्ध जरी करत होते लोक तरी युद्ध संध्याकाळ झाल्या बरोबर युद्ध बंद झाल म्हणून एकमेक जाण येण अस चालू होत. हे काही कपट नाही, अधर्म नाही. शस्त्र हातातून खाली पडलेल आहे, निःशस्त्र झालेला आहे आपला प्रतिस्पर्धी त्याच्यावर शस्त्र सोडायच नाही. युद्ध बंद करायच असे सगळे नियम पाळत होते.

जरी पुष्कळ मोठी मोठी अस्त्र जवळ असली तरी वाटेल त्याच्यावरती सोडायची नाहीत. संयम होता त्यांचा. संयमाशिवाय धर्माचे पालन होऊ शकत नाही, धर्माचरण होऊ शकत नाही. संयमाची जरूरी आहे. मन मोकळ सुटल आहे. इंद्रिय आणखी सगळी अनावर झाली आहेत. अशा वेळेला धर्माचरण होत नाही. आणि ते जरी झाल तरी ईश्वराचा प्रसाद, संतोष होऊ शकत नाही.

पांडवांच्या जवळ संयमहि पूर्ण आहे त्याशिवाय 12 वर्षे वनवासात कसे राहिले ? आम्ही राहाणार नाही म्हटल असते मध्येच. कबूल केलेल आहे आणखी राहाणार नाही अस कस म्हणता येईल ? तर त्यांनी तो संयम पाळलेला आहे. त्यामुळे त्यांचे बल जास्तीत जास्ती वाढत चाललेल आहे. मनाचा संयम झाला पाहिजे, निग्रह झाला पाहिजे, म्हणतात. पाणी वाहातय सारख, त्याला जर बांध घातला, सेतु बांधला तर त्या पाण्याची शक्ति पुष्कळ वाढते आहे. किती तरी त्याचा उपयोग करून घेतात. वीज निर्माण होते. किती तरी कार्य होते.

त्याप्रमाणे मनाच्या प्रवृत्ती ज्या बाहेर जात आहेत हा जो प्रकार सारखा बाहेर चाललेला आहे तो जर आवरला, मनाच्या वृत्ती जर थांबविता आल्या, तर त्या त्या मनाची शक्ति किती तरी वाढणारी आहे. निरोध त्याला म्हणतात. चित्तवृत्ती निरोध. निग्रह करण.

अर्जुनाला निग्रह करता आला नाही. धर्माधर्माचा विचार करता आला नाही. आणि माझ्या हातून /होणार. इतक्या लोकांना मी मारणार. त्यापेक्षा /हिंसा युद्ध न करता वनामध्ये जाऊन राहातो. आत्तापर्यंत वनातच होता, बारा वर्ष. ते वनात राहाण नि-राळ आहे. आणि आत्ता युद्धाकरिता उभा राहिलेला असताना वनात जाऊन राहावेसे वाढते ही चूक झाली, म्हणाले भगवान. त्यांना समजूत करावी लागली.

हे वनांत जाण नाही. हा अधर्म आहे. समोर सगळे आणखी शत्रु येऊन उभे राहिलेले आहेत. आणि त्या वेळेला अहिंसा म्हणून निघून जायच हा अधर्म आहे. हा धर्म होणार नाही. म्हणून संपूर्ण गीताज्ञान त्याला सांगून, / दाखवून आणखी त्याची खात्री करून दिली आणि त्याच्या मनाला स्वच्छ केले. निग्रह केला. हिंसा करावी का अहिंसा करावी ? काय कराव ? त्याचे सगळे विचार चालले होते. ते विचार स्थित झालेले आहेत. बुद्धि स्थिर झाली. / विश्वरूप

आणि मग तो उठलेला आहे युद्धाला. "करिष्ये वचनं तव" तुमची आज्ञा मला मान्य आहे. ज्या वेळेला अर्जुनाच्या मनातला मोह निघून गेला, विचार सगळे निघून गेले, निर्मोह अंतःकरण झालेल आहे. स्थिर झाल चित्त. आपल कर्तव्य काय आहे याची पूर्ण जाणीव झाली. त्यावेळी मात्र त्या संजयाने धृतराष्ट्राला शेवटी हेच सांगितल. त्यांचाच मंत्री होता तो, संजय. त्याने सगळी गीता ऐकली. त्याची ऐ ऐकण्याची सगळी व्यवस्था केलेली होती. व्यास महर्षिनी. त्यांच्या मनाचा संयम, मनाच्या वृत्तीचा निरोध, सगळ असल्यामुळे. दूर श्रवणाच यंत्र काही तिथ नव्हत. पण तो बसल्या जागेवरून संबंध लढाईतील /ह रोज सांगत होता. दिसत होत त्याला. गीता भगवंतांनी सांगितली अर्जुनाला रणांगणावर, संजयाने ऐकली इथे /ह हकिकत राजवाड्यात आणि धृतराष्ट्राला सांगितली. आणि शेवटी त्यान निर्णय दिलेला आहे.

अर्जुनाच्या मनातला मोह ज्याने दूर केला, अर्जुनाच्या मनाचा निग्रह ज्याने करून दिलेला आहे. तो ज्या बाजूला आहे त्याच बाजूला विजय मिळणार –

यत्र योगेश्वर : कृष्ण यत्र पार्थो धनुर्धर: ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ।8.78।।

हे माझे मत आहे, म्हणाले. त्यांच्याच मंत्र्याने त्यांना – धृतराष्ट्राला – अशा प्रकारच सांगितल आहे. तुम्हाला विजय मिळणार नाही. त्या बाजूला विजय मिळणार. हे सगळ त्याने निरिक्षण केल आहे. बाहय भौतिक शक्ति मोठी का मानसिक शक्ति मोठी हा विचार करणारे ते होते, संजय. चांगला उत्तम मंत्री होता. जरी कौरवांचा मंत्री असला तरी सुद्धा मनाचा आणखी ताबा होता, विचारी होता. धृतराष्ट्राला – आपल्या मालकाला बर वाटेल अस सांगायच अस नाही. विजय त्यांना मिळणार आहे अस कुणी सांगेल काय । त्यांचा मंत्री, त्याला ठेवतील का । पण काही भीती नाही.

याच कारण अस आहे कि पांडवांनी जी काही शक्ति मिळविली होती, मोठे धनुर्धारी होते पांडव. अर्जुन आहे – यत्र पार्थो धनुर्धर :- याचाहि त्याने उल्लेख केला आहे. ईश्वराची शक्ति तर आहेच आहे, म्हणाले. "यत्र योगेश्वर कृष्ण" त्या बाजूला ईश्वरशक्ति आहे. आणि धनुर्धारी, व्यवहारामध्ये असणारी आवश्यक ती शक्ति तीही त्या बाजूला आहे, म्हणाले, अर्जुनाच्या रूपाने. तुम्हाला विजय कसा मिळेल ? काय तुमच्या

बाजूला आहे ? अर्जुनाने किती तरी वेळेला तुमचा पराजय केलेला आहे पूर्वी. त्याला ते अशक्य काही नाही.

त्या महाभारतामध्ये एका अध्यायात एकदा सगळी मंडळी बोलत बसली होती. भीष्माचार्य, द्रोणाचार्य, अर्जुन, सगळे होते. हे इतकं सैन्य किती वेळात मारता येईल हा विचार चालला होता . भीष्म म्हणाले, मला एक आठ दहा दिवस लागतील. कारण मारायच म्हणजे नुसत मारायच नाही. सगळ नियमाने केले पाहिजे. कुणाजवळ शस्त्र नसेल त्या वेळेला युद्ध बंद करायच. मग लवकर कस मारता येईल. अश्वत्थामा म्हणाला, एक महिना लागेल.

अर्जुन म्हणाला, डोळे झाकून उघडे पर्यंत हे सगळे सैन्य मी मारून टाकेन पण नाही. मला तस करता येत नाही. अस्त्र शक्ति त्याने मिळवली होती. ईश्वराची कृपा आहे. गुरुकृपा आहे. द्रोणाचार्य महाराजांची. सगळी अस्त्रविद्या त्याच्याजवळ आहे. त्यामुळे तो अगदी आत्मविश्वासाने बोलतोय. बोलता बोलता त्याने आपली शक्ति सांगितली. पण तस करायच नाही. भीष्माचार्य काय, द्रोणाचार्य काय, मोठे मोठे वीर होते. परंतु त्यांनी आपल्या शक्तिला आवरलेल आहे. मनाच दमन केले. मनाचा निग्रह केला आणि युद्ध केल. ईश्वराच्या शक्तिचाहि सहाय्य पाहिजे. आणि स्वतःच्या मनाचाहि सहाय्य पाहिजे. हया दोन्ही प्रकारच सहाय्य आणि शक्ति पांडवांना मिळालेली आहे. त्यांच्या जवळ दया आहे. मनाचा निग्रह आहे. नम्रता आहे. कृतज्ञता आहे. गुरुजनांच्या विषयी अत्यंत आदरभाव मनामध्ये आहे. हे सगळे गुण मिळवण्याकरता त्यांनी प्रयत्न केला.

सात्त्विक प्रकृति दैवी प्रकृति, दैवी संपत्ती ज्याला म्हणतात ती संपत्ती जास्तीत जास्त आपण मिळवायची. मनुष्य जन्म त्या करीता आहे. बाहेरच्या संपत्तिला विशेष महत्त्व नाहीये. दैवी संपत्ती गीतेच्या सोळाव्या अध्यायात सांगितलेली आहे. सात्त्विक प्रकृती. आपली बुद्धि सात्त्विक बनली पाहिजे. त्या करता मनाच्या संयमाची, निग्रहाची अत्यंत जरूरी आहे.

पण अर्जुनासारखा योद्धा. त्याने सांगितले मनाचा निग्रह मी करू शकत नाही.

चंचलं हि मन: कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ।।

अर्जुनाने हात टेकले आहेत त्या मनापुढे. केवढा ईश्वर भक्त होता अर्जुन । नामस्मरण अखंड चाललेल आहे. अर्जुन नीजला म्हणजे त्याच्या केसातून "कृष्ण, कृष्ण" असे ऐकू यायच म्हणे. अखंड नामस्मरण आहे. गुरुभक्तिहि तशीच आहे.

द्रोणाचार्यांची भक्ति केली म्हणून सगळी अस्त्रविद्याहि द्रोणाचार्यांनी त्याला देऊन टाकली. आपल्या मुलालाहि त्यांनी दिली नाही. अश्वत्थाम्यापेक्षाहि जास्त आणखी प्रबल अर्जुन होता. द्रोणाचार्यांच्या मनाला पूर्ण समाधान आहे. समोर द्रोणाचार्य युद्धाला आल्यानंतर आरंभाला पायाजवळ दोन बाण मारायचे. सोडायचे फक्त हळूच. लागायचे नाहीत. म्हणजे नमस्कार करायचा त्या रूपाने. आणि मग युद्ध.

युद्धाच्या वेळेलासुद्धा मनामध्ये काही मत्सर, द्वेष नाहीये. आलेत. प्रसंग आलेला आहे. त्या बाजूला आहेत आपले गुरु महाराज आणि युद्धाला आलेले आहेत. म्हणून करायच युद्ध. पण सगळा संयम पाळून करायच आहे.

तर असा एवढा मोठा अर्जुन असून त्याने सांगितल कि- चंचलं हि मनः कृष्ण. अत्यंत बलवान आहे. त्याचा निग्रह करण म्हणजे अतिशय अशक्य वाटतय मला.

"वायोरिव सुदुष्करम्" वाऱ्याला जसं बांधून ठेवणं अशक्य आहे. त्याप्रमाणे मनाला आणखी बांधून ठेवणं, स्वस्थ बशिवणं हे अशक्य आहे. मग भगवंतांनी त्याला उपाय सांगितला. मनाचा निग्रहसुद्धा होऊ शकतो म्हणाले —

अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येणंच गृह्यते ।

मनाच्या निग्रहाचा एक अभ्यास पाहिजे. आणखी वैराग्य ज्याला म्हणतात. विषयाकडे धावणारे जे मन आहे त्याला थांबविता आले पाहिजे म्हणजे विषयाची तृष्णा हा एक मोठा दोष आहे मनाचा, तो कमी केला पाहिजे. म्हणजे आपोआप मन स्थिर होतं. एकाग्रता उत्पन्न होते. ध्यान करण्याची भूमिका त्या मनाची तयार होती आहे. मनाची एकाग्रता असल्याशिवाय ध्यान होऊ शकत नाही. एकाग्रता भूमिकेवर मन गेलं म्हणजे मग ध्यानाचा अभ्यास सुरू होतो. निरोध करणं किंवा एकाग्रता करणं. निरोध म्हणजे कोणती हि वृत्ती नाही. सगळया वृत्ती शांत होणं. हा एक प्रकार आहे.

आणि एकाग्रता म्हणजे एकाच ठिकाणी मन हे स्थिर होऊन राहाणं. ज्याला स्थिर होण्याच कधीहि माहिती नाही. चंचल मन आहे म्हणतात. अतिशय. त्याला स्थिर करता येतं म्हणतात. एक अभ्यास, प्रयत्न चालू पाहिजेत. गीतेच्या सहाव्या अध्यायामध्ये सगळा अभ्यास सांगितला आहे.

तर विषयाकडे जे मन चाललेलं असते, विषयापासून आपल्याला सुख मिळेल ही जी एक विचार सरणी आपल्या मनामध्ये दृढ झाली आहे, अनेक जन्माचे ते विचार आहेत. त्यामुळे धन पाहिजे आणि सुखाची सामुग्री म्हणून जी ठरविलेली आहे, आपण ती सामुग्री जमविली पाहिजे. त्याच्या करता धन पाहिजे. याच विचारामध्ये मन गुंतून गेल्यामुळे मनाचा निग्रह होऊ शकत नाही.

अर्जुनसुद्धा म्हणाला, मी काही समर्थ नाहीये. म्हणजे मनाचा निग्रह झाल्याशिवाय धर्माचरण होऊ शकत नाही. सुखाकडेच सारखं लक्ष असतं. धन पाहिजे. सुखाचे साधन धन आहे. ते मिळविण्याकरता जर प्रयत्न सुरू झाला तर धर्माधर्माचा विचार कसा रहाणार मनामध्ये ? जास्तीत जास्त धनाचा संग्रह करायचा हाच विचार मनामध्ये असल्यामुळे मनाचा निग्रह नाही. मन सारखं त्या विषयाकडे धावते आहे. सर्व सुखं साधनांचा संग्रह केल्यानंतर आपण सुखी होतो अशी समजूत आहे. त्यामुळे सुख साधन सगळी पाहिजेत. त्याला धन पाहिजे.

आणि धनाचा विचार मनामध्ये आल्यानंतर काही धर्माकडे लक्ष लागत नाही. जितकं मिळवता येईल तितकं धन मिळवायचं. नीती अनितीचा विचार हा मनामध्ये येतच नाही. आणि त्या वेळेला मन हे अतिशय उद्दाम बनून गेलेलं असतं. सत्ता मिळाली आणि त्या सत्तेचा उपयोग धन मिळविण्याकरता करायचं ठरलं. त्यावेळेला मनातले विकार — औद्धत्य, अहंकार हा कमी कमी होत नाही. जास्ती जास्ती वाढत जातो. आपल्या सत्तेचा उपयोग धनाचा संग्रह करून घेण्याकरता करायचा. मनामध्ये औद्धत्य, अतिशय अहंकार उत्पन्न झाल्यावर ईश्वर भजन किंवा धर्माचरण हे होऊ शकत नाही. मनाचा निग्रह होऊ शकत नाही.

अनेक विषयांच्या वासना या वाढत जाताहेत. त्या थांबत नाहीत. त्यामुळे मनही आपलं अनावर होत आहे. अहंकारही वाढतो आहे. म्हणून शंकराचार्य महाराजांनी विश्व संरक्षक जी मूर्ती आहे भगवान् विष्णूंची हे आपण ध्यानात घ्या म्हणाले. देवा जवळच त्यांनी प्रार्थना केली. ज्ञानेश्वर महाराजांनी ज्याप्रमाणे पसायदान मागितलं असं शंकराचार्यांचे हे पसायदान आहे.

अविनय अपनय विष्णो
दमय मन शमय विषय मृगतृष्णा
भूत दयां विस्तारय
तारय संसारसागर सुखो ।

संसार सागरातून तरून जायच आहे. संसार काही सामान्य नाहीये. सागरा सारखा पसरलेला आहे. एका जन्माचा नाहीये. अनेक जन्म चालू आहे.. किती जन्म झाले. किती येणारेत. काही पत्ता नाही. हे वासना म्हणून जे बीज आहे. अनंत वासना मनामध्ये आहेत. या जन्मामध्ये त्या वासनांची पूर्ती हया वासना आणखी तृप्त होतील अस शक्य नाही. वाढतच असतात. सारख्या. शेतामध्ये हरळी येतात, पुष्कळ गवत उगवलेल असत. उन्हाळयामध्ये नांगरून टाकतात जमीन.

सबंध गवत गेल अस वाटत आपल्याला. आता गवत राहिल नाही धान्य चांगल उत्तम होईल. मध्ये गवत वगैरे काही येणार नाही. सगळी जमिन नांगरून टाकल्यामुळे गवत ∠अस जरी वाटल तरी एक पाऊस पडल्यावर पुन्हा ती हरळी उगवते. ती काही कायमची गेलेली नसते. ∠ येईल

तस मनुष्य जन्म म्हणजे संसार संपला अस नाहीये. ते वासनेच बीज जो पर्यंत आहे तो पर्यंत संसाररूपी हरळी म्हणा धान्य म्हणा जास्ती जास्ती वाढत आहे. चांगले गुणही वाढतील. पण त्यात अहंकार त्यांच्या जवळ असणार. रावणा-जवळ चांगले गुणही होते. उत्तम वेदाभ्यास त्याने केलेला होता. उत्तम गाणारा होता. चांगल्या विद्या, कला हया त्याच्याजवळ होत्या. परंतु अविनय मोठा.

'अविनय अपनय विष्णो: ।
जे खळांची व्यंकटी सांडो ।

पहिली प्रार्थना ती आहे. ज्ञानेश्वर महाराज आणि आचार्य महाराज दोघांनीहि ही प्रार्थना प्रथम केली आहे.

हा जो मनामध्ये अविनय उत्पन्न आलेला आहे. गर्विष्ठपणा अहंकार वगैरे त्यामुळे लोकांचा आणखी पाणउतारा होतो. मानहानी आपण करतो, लोकांचा उपमर्द करतो. तो मनातला अविनय दूर झाला पाहिजे. ही पहिली प्रार्थना आहे.

आणि तो जितका जितका कमी होईल तितकी "दमय मन" ही दुसरी प्रार्थना नंतर केली आहे. मनाच दमन झाल पाहिजे. मनामध्ये ज्या अनेक वासना उत्पन्न होतात.

विषय मृगतृष्णा शमय – तिसरी प्रार्थना आहे. विषय ही मृगतृष्णा आहे. मृगजल आहे, म्हणाले. पण हरिणाला ते मृगजल वाटत नाही. हरिणाला तहान लाग-लेली आहे. समोर आणखी दिसतय पाण्यासारख. सूर्य किरणांवरच पाण्याचा भास होतो आहे. आणि तो हरिण धावतो आहे. जिथ पाणी दिसत नाही तिथ पर्यंत गेल्या-नंतर तिथून तितकच लांब तसच पाणी दिसायला लागल. किती धावणार तरी किती ?

त्याप्रमाणे विषयाच्या मागे जो धाव चाललेली आहे आपल्या मनाची त्याच्यात सुख आहे. ती काही थांबवता येत नाही. किती मिळाल म्हणजे सुख मिळेल ते काही सांगता येत नाही. जास्ती जास्ती अशी तृष्णा ही वाढत जात आहे. त्यामुळे अमूक इतका विषय संग्रह मिळाला. विषयाचा स्वीकार आपण केला म्हणजे सगळे भोग मिळाले, म्हणजे सगळ सुख मिळाल आता काही याच्या पुढ नाही अस काहीही सांगता येणार नाही. जास्ती जास्ती वासना वाढत जाताहेत.

म्हणून "विषय मृगतृष्णां शमय" ही प्रार्थना केलेली आहे. विषयापासून आपण सुखी होऊ ही समजूत गेली पाहिजे. गाढ झोप लागली असता किती आनंद असतो. त्यासाठी कोणी झोप येण्याकरता औषध देतात. त्याने दु:ख विसरावं त्या रोग्याच. त्याला झोप लागावी म्हणून औषध आहे. म्हणजे झोपेत आनंद आहे. एकदम कोणी गाढ झोपेतून उठवल्याबरोबर त्याला राग येतो. किती आनंदात होतो. कशाला उठवलस म्हणतो, रागावतो.

हा आनंद किंवा हे जे सुख मिळत आपल्याला झोपेत त्या सुखाची साधन आपण जी ठरवली आहेत व्यवहारामध्ये, जागृतीमध्ये, त्यापैकी कोणच सुखाच साधन तिथ आहे ? धन नाही, सत्ता नाही. काही याला कल्पनाच नाही. गाढ झोप लागली. सगळ विसरून गेला. शरीरहि विसरून गेला. ज्या इंद्रियांनी आणखी विषयांच सुख उपभोगायच ती इंद्रियहि सगळी त्या वेळेला विलीन झालेली आहेत. काही इंद्रियांचा संबंध नाही. मनही निर्विकार झाल आहे.

तर एकही व्यावहारिक सुखाचे साधन तिथ नसताना हा आनंद कोणता आहे ? तो आत्माच आनंदरूप आहे, मुळात. पण आपलच स्वरूप तो विसरला आणि बाहेर विषयामध्ये सुख आहे, आनंद आहे अशा समजूतीने तो आणखी वागतो आहे. हा प्रतिबंध दूर झाला पाहिजे. आपण काही करू शकत नाही या करता ईश्वराजवळ प्रार्थना केली. ईश्वराची जर इच्छाशक्ति असेल तर त्या इच्छा शक्तिने हे कार्य होईल.

पुन्हा शेवटची प्रार्थना आहे. भूतदयां विस्तारे आचार्य महाराज ही प्रार्थना करताहेत. सर्वांच्या करता ही प्रार्थना आहे. सर्वही प्राणीमात्रां विषयी दया मनामध्ये उत्पन्न झाली पाहिजे. कोणाचाहि दु:ख दृष्टीस पडल तरी वाईट वाटल पाहिजे. स्वत:ला दु:ख झाल्यानंतर केव्हा दु:ख जाईल, काय याचा प्रतिकार कसा करायचा, कोण मला भेटेल, ही सारखी धडपड चाललेली आहे. त्या प्रमाणे मनाची तयारी दुसऱ्याला दु:ख झालेल असताना ते दु:ख दूर करण्या-करता आपल्या स्वत: प्रमाणे जर झाली तर ही एक देवाजवळ प्रार्थना आहे.

मोठा गुण आहे आणि हा देवानेच द्यावा. "भूतदयां विस्तारे" "भूता परस्परे पडो मैत्र जीवाचे" ज्ञानेश्वरांच्या पसायदानामध्ये हीच प्रार्थना आहे. सर्वांच्या मनामध्ये एकमेकांबद्दल मैत्री भावना, प्रेम भावना, दया भावना ही निर्माण झाली पाहिजे. "एकमेका साहय करू" ही वृत्ती निर्माण झाली पाहिजे. ते गुण आहेत. वैयक्तिक आणखी सामुदायिक राष्ट्रीय सुख ज्याला म्हणतात त्या राष्ट्रौन्नतीला व्यक्तिच्या उन्नतीला, सगळयांना या गुणांची जरूरी आहे.

आणि हे गुण मिळविण्याचा प्रयत्न पांडवांनी केला. ईश्वरमान्य गुण आहेत. ईश्वराचा प्रसाद त्यामुळे त्यांच्यावर झालेला आहे. अन्नदान करणारी द्रौपदी जेवत नव्हती. सूर्यनारायणांनी ते पात्र देताना धर्मराजाला सांगितले, याच्यातून वाटेल तितक अन्न मिळेल. पण द्रौपदीच जेवण झाल कि अन्न बंद होईल. जबाबदारी आता द्रौपदीवर आलेली आहे. आपल्याला भूक लागली आणि आपण जेवण केल तर त्या दिवशी अन्न नाही. दुसरे दिवशी सूर्योदयानंतर मिळेल. पण मध्ये कोणी आले तर ?

त्या दुर्वास ऋषिनी त्याच वेळेला गाठल त्यांना. दुर्योधनाने मुद्दाम दुर्वास ऋषिना पाठवून दिलेल आहे. द्रौपदीच जेवण आटोपलेल. अशा वेळेला ते ऋषि, त्यांची शिष्य मंडळी आली परंतु त्या द्रौपदीन मनाच दमन करण, विषयांची जो काही धांव आहे, विषय वासना त्या कमी करण, ते देवाजवळ मागून घेतल. तसा प्रयत्न केला. म्हणून ईश्वराचा प्रसाद इतका तिच्या वरती झाला होता कि मध्य

रात्री तिने बोलावल्याबरोबर गोपालकृष्णांनी येऊन त्या संकटातून त्यांना मुक्त केल.

हे जे मनोबल आहे ते मनोबल वाढविण्याकरता त्यांनी प्रयत्न केला. आणि त्या मनाच बल हे निग्रहाने, निरोधाने, संयमाने उत्पन्न होते. आपल्याला वाटत एकादशी आलेली आहे. काही निर्जला एकादशी म्हणून लिहिली असते पंचांगामध्ये. आणि तशी निग्रही माणस असतात. पाणीसुद्धा घ्यायच नाही. तीर्थ फक्त घ्यायच. खाण्याची वेळ झाली, भूक लागली. चहाची वेळ झाली व त्याची जरूरी आहे अस वाटत आपल्याला. परंतु तपश्चर्या करणारे जे माहात्मे आहेत त्यांनी मनाची तयारी अशीच केलेली आहे. काही मिळणार नाही. म्हणजे हे पाहिजे ते पाहिजे अशी जी संवय मनाला सारखी लागलेली आहे ती संवय बंद करण्याकरता काही घ्यायच नाही. नाही. त्यामुळे मनातल्या त्या वासनाच कमी कमी होऊन गेल्या. कष्ट आरंभाला झाले परंतु सगळया वासना काही राहिल्या नाहीत. ही ईश्वराची कृपा आहे.

ईश्वराच्या कृपेशिवाय निग्रह होऊ शकत नाही, मनाचा निग्रह साधत नाहीये आणि तो अहंकार दूर होत नाही. विषयांच्या वासना कमी कमी होत नाहीयेत. आणि हे सगळ झाल तर भूतदया ही आपोआप होत आहे. दुस-याला दुखः असल तरी हरकत नाही, आपल तेवढ दु:ख जाऊं देत, असाच प्रयत्न करतो आपण. दुस-याकडे आपल लक्ष नाही. तर स्वतःच दु:ख सहन करून दुस-याची दुखः दूर करण्याचा प्रयत्न करणारे आणखी महापुरूष असतात, होत असतात.

तर या प्रमाणे वागणारे जे आहेत. आपल्या शरीराचा निग्रह, मनाचा निग्रह आणि वाणीचा निग्रह हा सगळा साध्य झाला पाहिजे. निदान तो व्हावा अशी इच्छा तरी पाहिजे. तळमळ पाहिजे म्हणजे ईश्वराच्या कृपेन ते साध्य होऊ शकत. मनाला, वाणीला, शरीराला आवरण जर सोडून दिल आपण, त्यात आपल्याला काही दोष दिसले नाहीत. हे बरोबर आहे. आपण वागतो हे सगळ बरोबरच आहे. आपण काही चूक करत नाही अशीच समजूत जर आपली वाढत गेली तर सुधारणा होणार तरी कशी ?

म्हणून पांडव आणि कौरव यांच्या मध्ये जे अंतर त्यांनी दाखवलेल आहे, व्यासांनी महाभारत ग्रंथ लिहून या करता पुढ केलेला आहे. काया, वाचा, मन यांचा निग्रह करणारे पांडव दु:ख आल तरी त्या अवस्थेतहि त्यांनी याचा अभ्यास कायम ठेवला. कौरवांचा तो अभ्यास नाहीये. जास्तीत जास्त हे सुख मिळाल पाहिजे. आपण कपटाने राज्य घेतल हे त्यांच्या लक्षात सुद्धा येत नाही. राज्य आपल्याला मिळाल ना आता, ते कायमच टिकल पाहिजे. म्हणून पांडवांनी जन्मभर वनामध्ये रहाव ही व्यवस्था त्यांनी करून ठेवली होती. एक वर्षाचा अज्ञातवास त्यांच्या पदरात टाकला होता. ती अट घातली. त्यांना शोधून काढून पुन्हा त्यांना वनामध्ये घाडायच.

तर हे दोन प्रकारचे अभ्यास आहेत. दोन प्रकारच्या मानसिक वासना आहेत. एक दुर्वासना आहे एक सद्वासना आहे. पांडवांना दु:ख देण्याचा प्रयत्न कौरवांनी वनात पाठवून सुद्धा केलेला आहे. त्या घोषयात्रेच्या निमित्ताने आपल्या सगळया सैन्याला, वगैरे घेऊन आपल ऐश्वर्य दाखविण्याकरता दुर्योधन वगैरे गेले आणि तिथ त्या चित्रसेन गंधर्वानि त्यांचा पराजय करून दुर्योधनाला कैद करून तो चाललेला आहे. मग त्याचेच लोक धर्मराजाला शरण आहे आणि म्हणाले

L बायकांना

"दुर्योधनाला गंधर्वांनी कैद केल आहे. युद्ध झालेल आहे. पराजय झालेला आहे. त्याला तेवढ सोडवा. त्याची सुटका करा."

भीम त्यांना म्हणाला, "बर झाल. आम्ही जे काम करणार होतो त्यांना कैद करण्याच, त्यांचा पराजय करण्याच. ते आपोआप गंधर्वांनी केल, बर झाल कि." हे ऐकून धर्मराजाने आणखी त्याला उपदेश केला. नीतिशास्त्राच्या दृष्टीने ही चूक आहे. ∠ . दृष्टीन ही फार मोठी चूक आहे. स्वत: तुम्हाला कैद केल असत तर कस वाटल असत ? दुर्योधनाला कैद करून तो घेऊन चाललालय. दुर्योधन आपल्या पैकीच आहे, ही बुद्धि पाहिजे. भावांच वैर असेल आपल, ते आपल आपण पाहून घेऊ. आपल्यामध्ये वैर भाव असताना आपण पांच आणि ते शंभर. पण तो दुसरा जर कोणी आला, ति-हाईत आणि तो आपल्या पकी कुणाला त्रास देऊ लागला तर नीतिशास्त्रदृष्टीने दोघांनी मिळून त्याचा पराजय केला पाहिजे.

तेव्हा एकी पाहिजे. फूट असली तरी सुद्धा ती बंद केव्हा करायची हे सुद्धा त्यांनी शिकविलेल आहे. हा तिसरा शत्रु आलेला आहे. तिसरा शत्रु आलेल्या वेळेला आपल्यामध्ये असलेला जो भेद आहे तो टाकून दिला पाहिजे. ती संवय पाहिजे. नंतर भांडत बसा तुम्ही. तिसरा आल्या नंतर भांडू नका. तो एकेकाचा पराजय करील. तुम्हालाहि राज्य मिळणार नाही. भावालाहि मिळणार नाही. तिसराच घेऊन जाईल. हा नीतिशास्त्राचा उपदेश आहे.

त्याच्याहि पुढे अध्यात्मिक धर्म जो आहे त्या भूमिकेवर धर्मराज असल्यामुळे सर्वही भूतांच्या बद्दल त्यांची समदृष्टी राहिली. म्हणून "भूतां परस्परे पडो मैत्र जीवाचे" हा उपदेश भीम, अर्जुनाला त्यांनी केला. आणि अर्जुनाने जाऊन त्या चित्रसेन गंधर्वाचा पराजय करून दुर्योधनाला सोडवून आणल आहे. म्हणजे वनामध्ये पांडव गेले असतानासुद्धा जास्ती त्यांना दु:खी कराव आपल ऐश्वर्य दाखवून ही इच्छा करणारा दुर्योधन, साम्राज्य मिळाल्यानंतर सुद्धा त्याच्या मनाच समाधान झाल नाही. हा प्रयत्न आहे. यांच साम्राज्य गेलेल असताना सुद्धा यांनी आपल्या मनावर ताबा ठेवलेला आहे. दुर्योधन सापडला, बर झाल, त्याच राज्य गेल, त्याला घेऊन गेला. काही इच्छा सुद्धा त्यांना उत्पन्न झाली नाही. हा एक दोघांच्या वृत्तीचा फरक आहे.

काय प्रयत्न करायचा मनुष्याने हे चांगल कळत नाही, आपल्याला. म्हणून दुर्योधनासारखे जे आहेत कौरव. ह्यांना बाह्य सुख जे आहे, सत्ता मिळाली पाहिजे. धनधान्य, सगळी समृद्धि आपल्या ताब्यात पाहिजे, हे आपल सुख आहे अस समजणारे कौरव होते. पांडव तसा विचार करत नव्हते.

मुख्य सुख जे आहे ते म्हणजे अहंकार नाहीसा झाला पाहिजे, मनाचा निग्रह साध्य झाला पाहिजे. विषय वासना कमी कमी झाल्या पाहिजेत आणि सर्वांच्या बद्दल मनामध्ये दयावृत्ती निर्माण झाली पाहिजे. हा अभ्यास करून सुख मिळवाव आणि ते मिळते.

पांडवांना मिळाल. कारण तेरा वर्ष वनवास भोगून जरी पांडव आले तरी युद्धाची त्यांना इच्छा नव्हती. धर्मराजाने मुद्दाम श्रीकृष्णांना दुर्योधनाकडे पाठवलेल आहे. संधि करण्याकरता. युद्ध नको. दुर्योधनाने कबूल केल तर आमच अर्ध राज्य द्या. त्यांच अर्ध राज्य ते घेऊ देत. ते कबूल नसल तर आम्हाला एकेकाला एकेक गांव जरी दिल तरी हरकत नाही. पांच गावांमध्ये आम्ही समाधान मानू. इतकी त्यांनी आणखी तडतोड केली. त्या वनवासातून मोकळे झालेल आहेत. तरी सुद्धा त्यांनी युद्ध कराव आणि राज्य मिळवाव अशी दुर्योधनाची इच्छा आहे.

∠ अध्यात्मिक

भूतदयां विस्तारे - आचार्य महाराज सांगताहेत. तिकड त्यांची दृष्टी आहे. केवढा संहार होईल. कौरव पांडवांच ते युद्ध झाल्यानंतर सबंध तरूण पिढी नामशेष झाली. पानिपतच्या लढाई नंतर जशी स्थिती झाली होती तशी स्थिती झाली. संहार झाला. त्याचा विचार धर्मराजाने केला. दया पाहिजे. तो जरी चुकीचा वागला तरीसुद्धा आपण तस वागण बरोबर नाही. म्हणून गोपाल-कृष्णांनाच त्यांनी मध्यस्थी करायला पाठवल आहे. तरी सुद्धा दुर्योधन त्याला कबूल झाला नाही. युद्धाशिवाय काहीही मिळणार नाही. अविनय आहे. त्या अविनयामुळे नुकसान झाल आहे. उद्धटपणा. कृष्णांनासुद्धा त्याने सांगितल काही मिळणार नाही.

कृष्णांना कैद करण्याचा त्याने प्रयत्न केला. कृष्ण हे दूत म्हणून आलेले आहेत. राजधर्माप्रमाणे, नीतीशास्त्राप्रमाणे दूताला कैद करायच नाही. पण काय ! बाह्य सुखाकडे बुद्धि गेली, मन गेल्यानंतर बर वाईट हा विचार करण्याची मनाची पात्रता राहात नाही. कृष्णाला कैद करून आपण ठेवू म्हणजे झाल. पांडवांच्या बाजूला कृष्ण काही सहाय्य करायला नाही. अपराध पांडवांचा आहे ही बुद्धि आहे. कैद करू शकला नाही तो. त्यांनी आपल ते तेज दाखवल आणि निघून आले. तर अविनय अपनय ....... दुःखमय संसार आहे ना. "सुख पाहाता दवा पाड दुःख पर्वता एवढे " ते विचार करणारे माहात्मे असा सिद्धान्त मांडतात.

सुख नाही अस म्हणत नाहीत. पण थोड आहे. दुःख जास्ती आहे. उत्तम आणखी पक्वान्न आहे. पण त्यात विष थोड पडलेल आहे. उत्तम बासुंदी आहे पण पाल पडली एवढच. ते समजल्यानंतर कोण घेईल. तस ते दाखवतात. अगदी दुःख नाही आणि केवळ सुख आहे असा कुणाचा अनुभव आहे ? "जगी सर्व सुखी असा कोण आहे"? म्हणून आणखी त्यांनी सवाल केलेला आहे. मुद्दाम. तिथहि त्यांनी उत्तर दिलेल आहे. "विचारी मना तूंची शोधूनी पाहे".

पण कोण सुखी आहे ? विचारी जो आहे तो सुखी आहे. विकारी जो आहे त्याला सुख मिळण कठीण आहे. तो भगळा अभिमान आहे. मी विजयी होणार आहे अस शेवटपर्यंत दुर्योधन समजत होता. भीष्माचार्य पडले दहा दिवसांनी. तरी अजून द्रोणाचार्य आहेत कि. आपल्या बाजूला काय कमी लोक आहेत. पांच दिवसांनी द्रोणाचार्यहि गेले. कर्ण आहे अजून. मी विजय देणार नाही. कर्ण दोन दिवसांत गेला. शल्य अर्धा दिवस राहिला तोही गेला. शेवट पर्यंत मी विजयी होणार आहे हा अहंकार मनामध्ये आहे. जरी दुःख येऊन कोसळली तरीसुद्धा आपल्या अहंकाराने तो सांगतोय कि नाही हेहि दुःख मी दूर करीन. त्याचा अहंकार इतका होता कि शेवटी अठराव्या दिवशी भीम दुर्योधनाच गदायुद्ध झाल. आणि मांडीवर गदा मारली जोराने त्या भिमाने. तो खाली पडला. सगळ संपलेल आहे. आता सगळे भाऊ गेले, सगळ सैन्य गेले, सेनापति गेले, आपणहि पडला तरी अहंकार कमी नाही.

त्याने धर्मराजाला सांगितले, तुम्ही आता राज्य करा. तुमचेहि गेले लोक. आमचेहि गेले लोक, कोण आहे ? तुम्हाला कसल राज्याच सुख मिळणार ? लढाई करता करता मला मृत्यु आला. मी आता स्वर्गाला निघालो. तुम्ही इथच बसा आता. रडत बसा, हे गेले, ते गेले. म्हणजे शेवटी सुद्धा त्याने अशी अहंकाराची भाषा केली.

तर विचार नाहीये. विचार नसल्यामुळे ते सुख मिळत नाही. आणि विकार ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी अर्धसुद्धा सुख हे असल तरी सुद्धा त्यामुळे मनाच समाधान मिळत नाही. हा उपदेश आचार्य महाराजांनी मुद्दाम केलेला आहे. आणखी संसारामध्ये जी अवस्था आहे, दुखः जास्ती आहे कि सुख जास्ती आहे ? सुखाकड आपल लक्ष कमी असल तरी थोड जरी सुख मिळाल तरी जास्त जास्त समजूत आपण जास्तीत जास्त प्रयत्न करतो. मनाच्या विरुद्ध पुष्कळ गोष्टी घडून येतात. तरीसुद्धा तिकड आपल लक्ष नाहीये.

या करता विचार चांगला उत्पन्न झाला पाहिजे. आणखी मनाची चांगली तयारी झाली पाहिजे. जरी क्रोधादिक विकार उत्पन्न झाले तरी सुद्धा ते आवरण्याची शक्ति त्या मनाच्या जवळ उत्पन्न झाली पाहिजे. विकारी मन होत विचारीही मन बनल पाहिजे. तशी शक्ति मनामध्ये अभ्यासाने जर उत्पन्न झाली तर ईश्वराच्या कृपेने तर त्याला कुठेही सुख आहे. सर्वांची दु:ख ती दूर करण्याचा प्रयत्न करतो आहे. आपल्या सुखदु:खाची जशी आपल्याला काळजी आहे त्याप्रमाणे दुसऱ्यांच्या सुखदु:खाचीहि काळजी त्याला उत्पन्न होते. आणि सर्वही जगाच्या उपयोगी तो पडतो आहे. ईश्वर कृपेने हे अशा प्रकारचे माहात्मे दुसऱ्याची दु:ख निवारण करु शकतात. त्यांच्या जवळ तशी शक्ति, सामर्थ्य आहे. नुसती बोलण्यापुरती भूतदया नाहीये. त्यांच्या मनामध्ये दया उत्पन्न झाल्यावर ते आपल्या शक्तिन ईश्वराच्या कृपेन दुसऱ्याची दु:ख दूर करु शकतात. ही शक्ति त्यांनी मिळविलेली असती. त्याकरता हा एक प्रयत्न आहे.

ती दैवी संपत्ती आपल्याला मिळावी या करता पांडवांचा प्रयत्न जन्मभर चाललेला होता. कौरवांच मात्र दैवी संपत्तीकडे लक्ष नाहीये. कुणीकडून तरी आपल्याकडे सत्ता राहीली पाहिजे. राज्य आपल्या ताब्यात राहिल पाहिजे. राज्य आपल्या ताब्यात राहिल पाहिजे. मग कितीहि लोक जावोत. जिवंत राहोत किंवा मरोत. आसुरी संपत्ती. स्वत:च्या भोगाकडे आणखी नेहमी लक्ष असण. आपल्याला सुखभोग मिळाला पाहिजे. आपण सुरक्षित राहिल पाहिजे. दुसरे गेले तरी हरकत नाही ही असुरी वृत्ती आहे.

सर्वेत्र: सुखिन: सन्तु । सर्वे सन्तु निरामय: ही जी वृत्ती आहे ही दैवी प्रकृति आहे. सामान्यहि सुखी झाले पाहिजेत. हा प्रयत्न करणारा माहात्मा तो स्वत: सुद्धा सुखी असू शकतो. सर्वांमध्ये त्याचाही अंतर्भाव होतो. सर्व आरोग्य संपन्न राहोत, कोणालाहि दु:ख राहू नये असा प्रयत्न करण्याची बुद्धि आणि शक्ति ज्यांना मिळालेली आहे ते माहात्मे सर्व जगाच कल्याण करु शकतात. जगाच कल्याण संतांच्या मुळे, विभुतींच्या मुळे होत. सर्वहि जीव परमेश्वराचे अंश आहेत. ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन: । तरी अंश निराळे आणि विभूती निराळ्या. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती म्हणतात.

ईश्वराच्या शक्तिचा विशेष रुपाने अविर्भाव ज्या ठिकाणी झालेले आहेत त्या सगळ्या विभूती आहेत आणि ते विभूती म्हणून असलेले संत, माहात्मे जगाच्या कल्याणाकरता प्रयत्न करत असतात. त्यांचा तो स्थायी भावच झालेला आहे ना । ते काही दाखवण्याकरता प्रयत्न करतात असे नाही. परोपकाराकडे त्यांचे लक्ष असत. लोकांना सांगण्याकरता ते काही करत नाहीत. त्यांची मनोवृत्तीच तशी राहाते.

एक बाई रानातून लाकडाचा भारा घेऊन आली. तुकाराम महाराजांनी पाहिल्यावर तिला म्हणाले, "तू दमलेली आहेस, मी घेतो थोडा वेळ". आता गावात राहाणाऱ्या लोकांनी हे पाहिल्यावर काही जरी म्हटल तरी तिकडे लक्ष नाही. तुकाराम बुवा इतके चांगले आहेत, महात्मा आहेत, अभंग करतात, किर्तन करतात पण त्या बाईच ते दु:ख पाहून तो भारा घेतला आणि चल, म्हणाले,

अशी मनाची वृत्ती बनवण्याकरता मनुष्य जन्म आहे. कोणती वृत्ती बनवायची. दोष वाढवायचे कि गुण वाढवायचे, हे समजल पाहिजे. कोणते दोष मनामध्ये आहेत, कोणते गुण आहेत. किती कमी आहेत, किती जास्ती आहेत हे सगळ आपल्या मनाच निरिक्षण करुन ते दोष घालवण्याकरता, सद्गुण संपन्न मन करण्याकरता, मन:शुद्धि करता ते संत माहात्मे प्रयत्न करतात, त्यांच्यावर ईश्वराचा प्रसाद होतो. ईश्वराच सहाय्य त्यांना होत. आणि जरी दुख: आली तरीसुद्धा त्यात ते समाधाना राहू शकतात.

तेच महाभारतामध्ये आहे. धर्माने वागण. न्यायाने वागणारा सुखी होतो. रामायणाच हेच सार आहे. न्यायाने वागणा-याला धर्मशील माहात्म्याला पशु-पक्षीसुद्धा सहायय करतात. वानरांनी सुद्धा रामरायांना सहायय केल. दोघे होते बंधू. रामलक्ष्मण. सीतेला घेऊन गेला रावण. त्यावेळेला त्यांच्या जवळ काय होत ? कोणती अनुकूलता होती ?

अमूक एक मोठा आपला पक्ष आहे, त्या पक्षात मी आहे, त्या पक्षाचा मी अध्यक्ष आहे, इतके लोक माझे अनुयायी आहेत इतर सैन्य आहे वगैरे काही नाही. तशा स्थितीच वाल्मिकींनी वर्णन केलय. प्रत्यक्ष मूर्तिमंत धर्म म्हणजे राम आहे. पुढे सीतेला आणल्या नंतर रावणाने त्या कुंभकर्णाला जागे केल. कुंभकर्णाला काय संकट आलय याची कल्पना आली. कुंभकर्ण म्हणाला, तुला वाटेल ते रूप धारण करता येत रावणा. तू रामाच रूप धारण करून सीतेकडे का गेला नाहीस ? म्हणजे सीता आपोआप तुला वश झाली असती.

ती रावण म्हणाला, मी रामाच स्वरूप धारण केल्यावर माझा रावण-पणा सगळा जाईल कि. मी सीता देऊनच टाकणार पुन्हा. अस रामाच स्वरूप जर घेतल तर प्रत्यक्ष मूर्तिमंत धर्मच आहे राम. मी रामाच स्वरूप धारण करणार नाही.

रामरायांना रावणासारख्या मोठ्या शत्रुची भीती नाहीये. दैवी संपत्ती आहे रामचंद्राकडे. आपण एकटे आहीत, आपल्याला कुणाच सहायय नाही, काही नाही. मारुतिराय एकटेच होते. गेले लंकेमध्ये. सगळया लंकेचा शोध घेतला. सीतेला भेटले. आश्वासन दिलेल आहे. आपली एकट्याची शक्ति रावणालाहि दाखवली. लंका दहन करून आले. संख्याबळ हे केवळ बळ नाहीये. मनोबल मुख्य आहे. ईश्वराची शक्ति. ईश्वराला प्रसन्न करणारे जे गुण आहेत ते जर मनामध्ये उत्पन्न झाले तर ती मोठी शक्ति आहे. शेवटी त्यांनी सांगितल, न्यायाने वागणा-याला, धर्ममार्गाने जाणा-याला पशुपक्षी, सगळे वानर मिळाले, सुग्रीव राजा मिळाला. सगळ सहायय झाल आहे.

उलट धर्ममार्ग ज्या रावणाने सोडला आहे त्याने पुष्कळ शक्ति मिळवली. सगळे देव काय, गंधर्व काय सगळे त्याब्यात आहेत. ना. केवढी सत्ता मिळाली । त्याची गणनाच नाही. मनुष्यापासून मला मरण येऊ नये हे त्याने मागितलच नाही देवाजवळ. देव, गंधर्व वगैरे सगळ्या ज्या मोठ मोठया शक्ति आहेत त्या सर्वांना मी अजिंक्य असा झाली पाहिजे. मनुष्य माझ काय करणार आहे ? म्हणून मनुष्य रूपाने याव लागल देवाला. असा इतका समर्थ रावण असतानासुद्धा सत्ता पाहिजे. संपत्ती पाहिजे. पुष्पक विमान आहे. सगळ आहे. ते भावाकडूनच बळजबरीन आणल होत. कुबेराला दिल होत ब्रह्मदेवाने. असा मार्ग ज्याने सोडला आहे . त्या रावणाला रामायणकार सांगतात त्याचा सख्खा भाऊसुद्धा त्याला सोडून जातो. तो सुद्धा त्याच्या सहाययाला येत नाही. बिभिषण निघून गेला. प्रयत्न केला त्याने आरंभाला. रावणाची समजूत करण्याचा प्रयत्न केला. ऐकल नाही.

तर हे सगळ मुख्य सार आहे. मनोबल मुख्य आहे. म्हणून समर्थांनी मनाला उपदेश केला. मनाची सुधारणा, बुद्धिची सुधारणा झाली पाहिजे. भारतीय संस्कृती मध्ये बुद्धिबल वाढविण्याकरता जास्त प्रयत्न केलेला आहे. सगळया मानवांचा जन्म हा त्या करता आहे. आपल्या मनाच, बुद्धिच सामर्थ्य जास्ती वाढल पाहिजे. समाजाची काम, राष्ट्राची काम करायची अस नाही. जास्तीत जास्त लक्ष इकडे

दिल म्हणजे आपोआप सगळ्या विषयी परस्पर दया उत्पन्न होते. मग एकमेकांच्या सहाय्याला कोण जाणार नाही ? एकमेकांवर प्रेम करण्यासाठी राष्ट्रपतींचा वटहुकूम काढून उपयोग होईल का ? सर्वांचे मन सुधारण्याची शक्ति शासनाजवळ नाहीये.

म्हणून धर्मशास्त्र ही ईश्वराची आज्ञा जी आहे त्याप्रमाणे वागणारे जे आहेत ते शेवटी सुखी होत आहेत. निर्भय होत आहेत. निर्दोष बुद्धि, मन ज्यांनी केल तेच निर्भय होतात आणि लोकांना आदर्शभूत होतात. लोकांचे संरक्षण करू शकतात. हे सगळ आचार्य महाराजांनी मांडलेल आहे म्हणून त्या भगवान विष्णु दत्तात्रेय जे आहेत त्यांच्याजवळ हीच प्रार्थना करायची आहे.

अविनय अपनय विष्णो........

अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त

Ø00000000000Ø

श्री - बोडस (डोंबिवली)

## अनुक्रमणिका

### खंड ४ था


| प्रवचन क्रमांक | पृष्ठ क्रमांक | स्थान | विषय |
|---|---|---|---|
| 18. | 170 – 180 | माटुंगा<br>17.1.1988 | साधक साधना, आत्मानात्म विचार आत्म परिक्षण |
| 19 | 181 – 194 | मुलुंड<br>28.11.1986 | संध्यावंदन, गायत्री जपाचे महत्व |
| 20 | 195 – 209 | थेऊर<br>6.11.1987 | दिगंबरा दिगंबरा या महामंत्रावर निरूपण |
| 21. | 210 – 220 | रत्नागिरी | भगवद्गीतेतला ज्ञानयोग |
| 22. | 221 – 237 | बोरिवली<br>8.7.1987 | आचार्यांची शिकवण साधक साधना |
| 23. | 238 – 262 | बोरिवली | साधक, साधना तत्वविचार |


000000

दत्तात्रेय महामाय वेदगेय हतामय।।
अनसूया त्रितनय ममापायं निवारय।
नमो नमस्ते जगदेकनाथा।
नमो नमस्ते सुपवित्रगाथा।
नमो नमस्ते जगताधीशा।
नमो नमस्ते स्तु परावरेशा

भारतवर्षामध्ये ईश्वरीशक्तीसंपन्न असे अनेक सत्पुरुष होऊन गेलेले आहेत. मोठे मोठे महर्षि प्राचीन कालामध्ये. ते सर्वही उपासक होते. ईश्वराची उपासना करणारे होते वेदाभ्यास आहे, शास्त्राभ्यास आहे, हे सगळ चालू होत त्यांच. वेदाभ्यास करण्याकरिता ब्रह्मचर्याश्रम हा मुद्दाम ठेवलेला आहे. ब्रह्मचर्याश्रमामध्ये पूर्वी गुरुकुल पुष्कळ होती. अरण्यामध्ये अनेक ऋषिमंडळी राहून शिष्यवर्गानासर्वही ज्ञान देत होती. निरपेक्ष बुध्दिने समाजामध्ये असणारी सर्वही मंडळी आपल्या मुलांना त्याच्याकडे पाठपत होती. आणि तिथे सगळाही खर्च त्यांचा त्यांनीच करायचा. गायरि पुष्कळ असायच्या. त्यांच्या आश्रमामध्ये. गायीच दुध सात्त्विक आहारही त्या विद्यार्थ्यांना मिळायचा. चांगली हवा, पाणी, सगळंही अगदी उत्तम. आणि त्या सद्गुरुच्या जवळ राहून ज्ञानार्जन करायच अशी व्यवस्था होती. लहानपणापासूनच ईश्वराची उपासनाही चालू असायची.

ईश्वराच स्वरूप पूर्णपणे समजून येण्याकरता पुष्कळ काल घालवावा लागतो. मनाने सर्व समजून घ्यायचे आणि मनानेच ध्यान करायचे. ते जे मन किंवा बुध्दि ज्याला म्हणतात, ते जे अंत:करण तत्व आहे शरीरामध्ये राहणारच. सर्व इंद्रिये ही आपल्या शरीरामध्ये आहेत त्याच प्रमाणे हे अंत:करणही शरीरामध्येच आहे. ते असे पर्यंत शरीर धारण होत, राहू शकत. ही सर्वही साधन आपल्याला जी मिळालेली आहेत ईश्वराच्या कृपेने, ती शरीरामध्ये असेपर्यंत या साधनांचा उपयोग करुन घेतला पाहीजे. आणि तो उपयोग म्हणजे ईश्वराची खरी उपासना करणं. त्या ईश्वर स्वरुपाच चिंतन करणं. चिंतन करण्याकरिता अंत:करण आहे. मन ज्याला म्हणतो आपण. अनेक विचार मनामध्ये उत्पन्न होतात. अनेक जन्मांचे बरे वाईट संस्कारही त्या मनावर झालेले असतात. होत असतात. त्या संस्काराप्रमाणे ते ते विचार मनामध्ये येतात आणि तशी बरी वाईट कार्यही आपल्या हातून घडत असतात. त्या संस्कारामुळे नाना प्रकारचे विचार मनामध्ये उत्पन्न होतात. आणि हा एक मोठा प्रतिबंध आहे. मनोराज्य ज्याला आपण म्हणतो. अनेक विचार तरंग उत्पन्न होतात. अशा वेळेला मनाने आणखी ईश्वरतत्वाचे ध्यान करणे हे कठीण होते. नाना प्रकारच्या वासना, संस्कार, विचार तरंग मनामध्ये येतात आणि ईश्वराचा विचार बाजूलाच राहातो.

त्या करता मनावर चांगले संस्कार व्हावेत, ईश्वर विषयक चिंतन व्हाव, आत्म स्वरूप म्हणजे काय आहे, आपण कोण आहोत, हाही विचार केला पाहिजे. जगत् कर्ता म्हणजे ईश्वर कोण आहे, त्याची शक्ती काय आहे, त्याने उत्पन्न केलेल हे जगत आहे त्याचा विचार करायचा. त्याच्या कर्तृत्वाचाही विचार करायचा, आणि पहाणारा जो द्रष्टा म्हणजे आपण जीव त्याचाही विचार करायचा. हा मुख्य विचार आहे.

आणि हा सगळा विचार संतानी आपल्या ग्रंथातून करुन ठेवलेला आहे. अनेक ऋषिमंडळींनी, शास्त्रज्ञांनी अनेक ग्रंथ लिहून ठेवले आहेत. ते संस्कृत भाषेमध्ये आहेत.

आपल्या मनामध्ये तीन मुख्य दोष असतात अस भगवद्गीतेमध्ये - सांगितलेले आहे. अज्ञान विषयाच अज्ञान आहे. शरीराच्याआत काही तरी तत्व आहेत. सगळी साधन आहेत, याच आपल्याला काही ज्ञान नाहीये. शास्त्र ग्रंथामध्ये ते सगळ सांगितलेल आहे. आणि अनुभवही येतो तस ऐकल्यानंतर, विचार केल्यानंतर त्या साधनाच अस्तित्व शरीरामध्ये असल्याचा अनुभव येतो. वेगळ आहे ते. या शरीरापेक्षा ती साधन वेगळी आहेत. ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, पंचप्राण, मन, बुध्दि वगैरे. अंत:करणतत्व हे निराळ आहे अस सांगतात. त्यांची कार्य झालेली अनुभवाला येतात. सर्व पदार्थ आपण पाहू शकतो. ज्ञान होत. त्या ज्ञानाच साधन काहीतरी आपल्या जवळ आहे हे अर्थातचसिध्द होत ना. कोणचाही पदार्थ, कोणत्याही आकाराचा रंगाचा दृष्टीला दिसतो आपल्या. तेव्हा ते रूपदर्शन आपल्याला कोणत्या - साधनाने होत ? तस साधन आपल्या जवळ आहे ना. या स्थूल शरीरापेक्षा ते निराळ आहे. कारण डोळ्यामध्ये काही विकार उत्पन्न झाला, त्याला दिसेनासे झाले म्हणजे रूपदर्शन होत नाही. शरीरामध्ये असणारा जो वरचा भाग आहे, डोळे ज्यालाआपण समजतो, त्या डोळ्यांनीच काही दिसत नाही त्या वेळेला. म्हणजे तो भाग म्हणजे डोळे नाही. शरीरामध्ये दृष्याचे ज्ञान करुन देणारा जो भाग आहे तो डोळे नाही. ऐकायला येणार जे इंद्रिय आहे, ज्याच्यामुळे ऐकायला येत, श्रोतेंद्रिय म्हणतो आपण. सगळे शब्द ऐकायला येतात. ध्वनि किंवा भाषात्मक शब्द. त्याच अर्थज्ञान हे मनान होत. ऐकायला आल्याशिवाय ~~मनाने~~ आपल्याला विचार कसा करणार? तेव्हा कोणाचीही भाषा, शब्द श्रोतेंद्रियांनी/समजतो त्याच्या अर्थाचा विचार आपण वाचून म्हणा ऐकून म्हणा, मनाने आपण करु शकतो. तर श्रोतेंद्रियसुध्दा निराळ आहे. बाहेरचे कान जे आपल्याला दिसतात ते शब्दज्ञान करुन देत नाहीत. हा सगळाही विचार करायचा असतो.

वेदान्त शास्त्र म्हणजे हेच आहे. दुसर कार्य. आपल्याजवळ काय ~~काय~~ आहे, त्याचा उपयोग आपण कशाकरता करतो आहोत हे नंतर समजून घेत आहे.

तर ही सर्वही इंद्रिय, ज्ञानेंद्रिये आहेत, कर्मेंद्रिये आहेत. प्राणशक्ति आहे, सगळी क्रियाशक्ति शरीरामध्ये असणारी, आणि ज्या सर्व इंद्रियांकडून होणाऱ्या कामाचा विचार करणार मुख्य जे अंत:करण आहे, ज्याला बुध्दि अस म्हणतात हे अत्यंत श्रेष्ठ अशा प्रकारच आहे. ते वेगळ आहे.

स्थूल शरीर वेगळ आणि स्थूल शरीरामध्ये राहणारा हा सूक्ष्म शरीराचा साधन वर्ग जो आहे, हा वेगळा आहे. याच्या सहाय्याने जीव जो आहे शरीरात राहणारा जीवात्मा हा या शरीरामध्ये आज आलेला आहे. पुढेही त्याला हा साधन वर्ग घेऊन दुसऱ्या शरीरात जाव लागेल. त्याच्या इच्छेप्रमाणे सर्व घडून येत नाहीये. त्याच्या कर्माप्रमाणे घडून येत आहे. कर्मसुध्दा इच्छेप्रमाणे घडत अस नाहीये. कोणची इच्छा आपली प्रबल असेल त्या इच्छेप्रमाणे घडून जात. वाईट कर्महीं घडत आहेत. म्हणून आपल्या मनामध्ये आपण जर चांगले संस्कार वाढवले, स्थिर केले तर तशीच इच्छा उत्पन्न होऊन तशीच क्रियमाण कर्म आपल्या हातून होतात. म्हणून सत्संगती सांगितली आहे. ज्या पुरुषांनी सगळी इंद्रिय ताब्यात ठेवली आहेत, अशांची.

रसनेंद्रिये हे मुख्य सांगितल आहे. हे जिंकले म्हणजे तो जितेंद्रिय झाला म्हणतात. अशीच सगळीही इंद्रिय आणि मन ज्याच्या ताब्यामध्ये आहे स्थिर झालेल आहे, समाधि अवस्था त्यांनीच प्राप्त करुन घेतली आहे. ती आपल्या सर्वांना काही कळत नाही. फक्त आपण वाचू शकतो, ऐकू शकतो. समाधि अवस्था काय आहे. शब्दांनी त्याच फक्त ज्ञान होत. समाधि अवस्था म्हणजे मनाची पूर्ण स्थिरता आहे. तशी मनाची स्थिरता जर झाली तर त्या अवस्थेमध्ये ईश्वराच स्वरूप आणि जीवाच स्वरुप काय आहे, त्याच चिंतन, ध्यान वगैरे करणे शक्य आहे.

तर मन स्थिर झाल. त्याच्यातले अनंत जन्मांचे संस्कार ज्याच्यामुळे अस्थिरता जी मनाला आली होती ती थोडी कमी झाली. त्यामुळे बाहेरचे विचारही सगळे बंद झाले. स्थिरता लाभायला लागली आणि त्या स्थिरतेचे पर्यवसान समाधिमध्ये झालेल आहे. पूर्ण स्थिर मन झाल. त्याला जो विषय मिळालेला आहे, परमात्मा किंवा आत्मस्वरूप त्याच चिंतन ते मन करत राहात. जीवात्मासुध्दा आनंदरूप आहे. आणि ईश्वरही आनंदस्वरूप आहे, अस आपण ऐकतो. तर ते स्वरूपानुबंधान कराव अस, सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी काही दोनशे ओव्यांच एक स्तोत्र केलयं, त्यात म्हटल आहे. आत्मचिंतन किंवा परमात्मचिंतन.

स्वरूपानुसंधान घडल पाहीजे. काही वेळ तरी मन स्थिर झाल-पाहीजे. मनाची स्थिरता साध्य झाल्यानंतर सगळ्या सिध्दीसुध्दा मिळतात. योगसिध्दी, संयम त्यांनी म्हटलय. धारणा, ध्यान आणि समाधि. कोणत्या तरी एका वस्तूवर मनाची धारणा करणं. म्हणजे त्या वस्तूचचिंतन सुरु होत ही धारणा झाली . त्या वस्तूच्या ठिकाणी मन स्थिर होण म्हणजे ध्यान होते. आणि त्या ध्यानाची पराकाष्ठा, अत्यंत स्थिर मन झालं., प्राणवायूही स्थिर होतो- कुंभक ज्याला आपण म्हणतो प्राणही स्थिर झाला आणि मनही स्थिर झाल अशी जर अवस्था प्राप्त झाली. त्यासाठी किती अभ्यास करायचा याचा नियम नाही. पण त्या करता ईश्वराची कृपा पाहीजे, उपासनाही चालू पाहीजे. विघ्नही पुष्कळ येतात. शरीरामध्ये सुध्दा काही बिघाड होतो. मनही काम करू शकत नाही. असे अनेक दोष उत्पन्न होतात.

ते सगळे दोष जाण्याकरता म्हणून ईश्वराची उपासना ही योगाभ्यास करतानासुध्दा उपयोगी पडते आहे. योगाभ्यास हा एक प्रयत्नवाद आहे. प्रयत्नांनी आपण सगळ मिळवायला हरकत नाही उत्साह शक्ती पाहीजे निश्चय पाहीजे. अशा निश्चयाने जर प्रयत्न केला तर त्या प्रयत्नांच फल म्हणजे समाधि अवस्थेपर्यंत जाता येण शक्य आहे. प्रयोगशास्त्राच आहे ते. पण त्या प्रयोगाची सिध्दी होण्याकरता म्हणून ईश्वराची उपासना पाहीजे, कृपा पाहीजे. योग साधनेमध्ये येणारी अनेक विघ्ने ही केवळ ईश्वरकृपेने दूर होतात.

भीष्माचार्य त्या बाणाच्या शय्येवर पडलेले आहेत. दहाव्या दिवशी त्या शिखंडीला पुढे केलेल आहे. आणि मागे अर्जुन राहीलेला आहे. बाण मारतो आहे. शिखंडी पुढे आल्यानंतर भीष्माचार्यांनी युध्द बंद केल. तो शिखंडी स्त्रीचा पुरूष झालेला आहे. मी त्याच्या बरोबर युध्द करणार नाही. अशा वेळी अर्जुनाने बाण मारलेले आहेत. सगळ्या शरीरात बाण शिरलेले आहेत. भीष्माचार्य रथातून खाली पडले आणि तसेच बाण शय्येवर निजून राहीलेले आहेत. गाद्या गिरद्या आणल्या असतील दुर्योधनाने त्याची जरूरी नाही म्हणाले उशी पाहीजे होती. अर्जुनाने बाणाचीच उशी करून दिली. सगळ्या शरीरात बाण घुसले असताना पडून राहणं म्हणजे किती व्यथा होत असेल, वेदना होत असतील याची कल्पनासुध्दा आपल्याला करता येणार नाही. पण भगवान श्रीहरिंनी, श्रीकृष्ण परमात्म्यांनी त्याच्याकडे कृपादृष्टीने पाहील त्यामुळे त्याच्या सगळ्या व्यथा दूर झाल्या. सगळी आयुधाची व्यथा दूर झालेली आहे आणि तशा वेळेला धर्मराजांनी त्यांनी उपदेश केला.

धर्मराजांच्या मनाची स्थिती सुध्दा अशीच झाली. संसारामध्ये अनुकूल प्रतिकूल प्रसंग निर्माण होतात. अशा वेळेला मनाची स्थिरता राहण किती कठीण आहे हे प्रारब्धकर्मच आहे. पूर्वीच्या काही कर्म-दोषामुळे मन अस्थिर होऊन देऊन उपयोगी नाही.

केवढी स्थिरता धर्मराजांच्या मनाची अत्यंत स्थिर बुध्दिन धर्माचरण त्यांच चालू होत. त्याचा कधीही बुध्दिभेद झाला नाही सगळ राज्य गेल तरीसुध्दा धर्म वाईट आहे अस त्यांना एकदा सुध्दा वाटल नाही द्रौपदीला वाटायच भीमाला वाटायच, काय धर्माचरण करुन तुम्हाला मिळाल अस त्यांनी वारंवार म्हणावं पण याची बुध्दि स्थिर आहे.. ईश्वराची आज्ञा आहे त्याप्रमाणे वागून आपल कल्याण करुन घ्यायच आहे, याच बुध्दिन ते धर्माचरण करीत होते पण शेवटी त्यांच्याही मनावर परिणाम झाला.

युध्द संपल आणि अठराव्या दिवशी रात्रीच्या वेळी अश्वत्थाम्याने सेनापती धृष्टद्युम्न आणि सर्वही सैन्य मारुन टाकल. द्रौपदीची पांचही मुल त्यान मारली. म्हणजे विजय मिळालेला आहे. अठरा दिवस युध्द झाल. सगळ सैन्य गेल कौरवाच सेनापती पडले. पांडव विजयी झाले अस वाटणारच सगळयांना ढका रात्रीमध्ये ती सगळी परिस्थिती बदलून गेली.

यांच्याही बाजूची सगळीमुलं गेली. अभिमन्यू तर पूर्वीच गेला होता युध्दात. चक्रव्यूह रचना केली. फक्त अभिमन्यू म्हणाला मी जाऊ शकतो. अर्जुन दुस-या युध्दात गुंतलेला होता. त्याला एक चक्रव्यूह भेद करायची माहीती होती. आज पांडवाकडचा कोणी तरी वीर मारायचा म्हणून द्रोणाचार्यांनीच ती चक्रव्यूहाची रचना केली होती. आणि त्या वेळेला आत जायाला पांडवांकडे कोणीही समर्थ वीर नाही. भीम असेल पण त्याला ही माहीती नाही. अभिमन्यूला फक्त चक्रव्यूहात जाण्याची माहीती होती. तेवढेच त्याला श्रीकृष्णाच्या मुखातून कळल होत. परत येण्याच काही त्याला ज्ञान नव्हत. तो गेला आत . भीम वगैरे मंडळी जायला निघाली. त्यांना जयद्रथाने अडविल. जाऊ दिल नाही. अभिमन्यू एकटा सापडला. आणि सर्वांनी मिळून त्याचा नाश केला. तो एक मोठा अतिरथी महारथी गेला. बाकीची पांच मुल होती तीही नाहीशी झाली. काय राहिल ? कोणाचा विजय झाला ?

धर्मराजांच्या मनावर इतका परिणाम झाला कि म्हणाले, कशाला इतक युध्द केल आम्ही ? काय राज्य घेऊन करायचय आता ? कोण राहीलय आमच्या पैकी ? राज्य सोडून जातो मी वनामध्ये. असच बोलू लागले. सगळया भावानी त्यांना समजावल. मग भीष्माचार्यांकडे धर्मराज्य गेले. आणि त्या बाणावर पडलेल्या अवस्थे मध्ये त्यांनी धर्मराजाला उपदेश केलेला आहे. ते सगळ ज्ञान त्यांच्या मनामध्ये बुध्दिमध्ये किती स्थिर झालेल होत हे त्यांच्या उपदेशावरुन कळून येत. अशा शरशय्येवर पडलेल्या वेळेला ते सगळ ज्ञान आठवून आणि त्या धर्मराजाची बुध्दि चांगल्या मार्गावर आणायची आहे. शांत मनाने ते सगळ आठवून सगळा उपदेश त्यांनी केलेला आहे. महाभारतातल "शांतिपर्व " म्हणजे भीष्माचार्याची ज्ञान शक्ति किती मोठी होती याच उदाहरण आहे. धर्मराजाच अज्ञान , अस्थिरता दूर झालेली आहे. अज्ञान मोठा दोष आहे. ते सगळ त्याला माहीत करुन दिलेल आहे भीष्माचार्यांनी. आणि मग राज्य करण हे कर्तव्यकर्म आहे, श्रीकृष्णांची आज्ञा आहे; त्यांच्या आज्ञेप्रमाणे तू वागत जा, असे सांगितले. आणि उत्तरायण मकरसंक्रात लागल्या बरोबर वाणी बंद केली. इच्छामरणीच ते होते. मृत्यूसुध्दा मनाच्या, इच्छेच्या स्वाधीन आहे. इतक ताब्यामध्ये मन आहे समाधि अवस्थाच पाहिजे अस नाहीये.

एक काही अलौकिक शक्ति आहे. चांगले संस्कार चांगली बुध्दि अनंत जन्म ज्यांनी बुध्दिन कार्य केलल आहे ती बुध्दि अशी स्थिर असू शकते. इतक धैर्य असू शकत. सगळी सहनशीलताही असू शकते तर धर्मराजाची बुध्दि स्थिर करण्याच कार्य भीष्माचार्यांच्या उपदेशाने झाल.

अर्जुनाची बुध्दि श्रीकृष्णाच्या उपदेशाने स्थिर झाली.

तर ही अशी बुध्दि किंवा मन हे अंत्यत स्थिर करणं, आपलजे जे कर्तव्य कर्म आहे ते स्थिर, बुध्दिने करत राहायच. त्यातूनच आणखी काही तरी मार्ग निघातो. आपल्याला काही काही श्रवण घडते आणि ते सगळ श्रवण केल्यावर आत्मस्वरूप काय आहे, मी कोण आहे हे समजून घ्यायच आणि नंतर त्या स्वरूपाच अनुसंधान म्हणजे ध्यान कराव म्हणतात ईश्वरस्वरूपही समजून घेऊन त्याचही ध्यान करायच आणि त्या ध्यानाचीच पराकाष्ठा म्हणजे समाधि अवस्था आहे. अत्यंत स्थिर मन होणं, तहान नाही, भूक नाही. म्हणजे शरीरावरच लक्षच कमी झालेल आहे. शरीरामध्ये मन गुतूंन राहीलेल आहे. शरीर म्हणजेच मी आहे हे तादात्म्य झालेल आहे शरीरापेक्षा मी वेगळा नाही. तिथून मन बाजूला करायच. शरीरापेक्षा वेगळा, शरीरात राहण्याकरिता आलेला, मी आहे. यातूनही मला पुढे जायचय. माझा जे आनंदस्वरूप ~~ आणि निर्विकार रूप जे आहे तो मी आहे. हे समजून आल्यानंतर शब्दांनीच त्याच अनुसंधान अखंड घडल पाहीजे. अस सांगतात महाराज. पण ते अनुसंधान करायला मनाची स्थिरता जरूर आहे. मन पुन्हा काही विषयामुळे त्या विषयांचा विचार करण्याकडे जात ना ?. लगेच बाहेर जात. ते संस्कार सगळे कमी कमी होत जाऊन या आत्मस्वरूपाच्या ठिकाणी जास्तरी स्थिरता होणं कोणाचीही बाहेरची चिंता दूर होणं जर घडल तर. आत्मचिंतन होईल. तर ते आत्मस्वरूपाच चिंतन हे अखंड झाल पाहीजे म्हणतात. आणि त्याच्या करता सगळी साधन आहेत.

जेजे येथे ये घडोन । ते ते सर्व मिथ्या जाण ।।
सर्व व्यापार सोडून । स्वरूपानुसंधान करी तू ।।
स्वरूपानुसंधान । व्हाया कीजे मन:शोधान ।
देवगुरूसेवन । सदाचरण अनासक्ते ।।

हे महाराजांनी सांगितल. स्वरूपानुसंधान, आत्मस्वरूप जीवात्म्याच स्वरूप, आपण कोण आहोत. हे खर समजून घ्यायच. आणि त्याच अनुसंधान म्हणजे ध्यान करायच. किंवा ईश्वरस्वरूपाच ध्यान करायच ईश्वराची अनंत रूप आहेत. पण ती एकाच ईश्वराची आहेत हेही कळून आल पाहीजे. अनेक स्वरूपांनी असणारे अनेक ईश्वर असा त्याचा अर्थ नाहीये. तेही चांगल समजून घेतल पाहीजे. त्याबद्दल असणारे सगळे संशय दूर झाले पाहीजेत. म्हणून शब्दज्ञानाला सुध्दा महत्व आहे. नुसते शब्द फेकायचे, शब्द वाचायचे, अस करायचे याचा ? काय उपयोग असा आक्षेप घेतात काही बुध्दिवादी. त्यांचाही उपयोग आहे प्रमाण आहे. शब्द आहेत उपनिषदे आहेत, पौराणिक वाड.मय आहे- उपनिषदांचा अर्थ स्पष्ट करण्या करता. ते शब्द म्हणजे काही सामान्यशब्द नाहीत. ज्यांच्या मनाची पूर्ण स्थिरता झालेली आहे अशा स्थिर मनाने ज्यांनी खरा विचार केलेला आहे आणि खर ज्ञान ज्यांना झालेल आहे, त्यांनी सांगितलेल ते शब्द आहेत. त्याच्यामध्ये चूक राहाणार नाहीये

अगोदर आपल्या मनामध्ये श्रध्दा, भक्ति उत्पन्न झाली पाहीजे. आणि त्या शब्दांनी कळून आलेल जे जीवाच किंवा ईश्वराच स्वरूप आहे त्याच अनुसंधान घडण्याकरिता म्हणून ही पुढची सगळी साधन आहेत.

मन:शोधान हे पहिल साधान सांगताहेत- व्हाया किंजे मन:शोधान. शुध्द मन झाल पहिजे. मनामध्ये असणाऱ्या वासनांचा नाश झाला पाहीजे. वासना म्हणजे बरे वाईट संस्कार. हे वर आहे, ते वर आहे अस आपल्याला वाटतय. हे सगळ मनातले संस्कार, विचार थांबले पाहिजेत. आणि ते तसे थांबू शकतात. मन चंचल आहे म्हणून अर्जुनाने आणखी सांगितल मला निग्रह करता येणार नाही.

तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम्

अर्जुनासारखा पराक्रमी योध्दा पण मनाचा निग्रह म्हणजे अशक्य आहेअस तो सुध्दा म्हणाला. जस वायूला आवरण, एका ठिकाणी कोंडून ठेवणं कठीण आहे तस मनाचा निग्रह करण अशक्य आहे. तस मनाचा निग्रह करण अशक्य आहे. भागवान म्हणाले, "खर आहे. प्राथमिक अवस्थेमध्ये विचार करायला लागल्यानंतर मन आवरण कठीण आहे अस वाटत.

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलं ।
पण अभ्यासेन तु कान्तेय वैराग्येण च गृहयते ।।

पण त्याचा निग्रह होऊ शकतो. मनाला थांबवता येत. त्याचा स्वभाव बदलता येतो. अभ्यास पाहिजे आणि वैराग्य पाहिजे.

अभ्यास एकशब्द वैराग्याभ्यां तन्निरोधा: ।।

भागवंतानी योगसूत्राकारांनी तेच सांगितल आहे. अभ्यास म्हणजे चंचल मन स्थिर करायचा प्रयत्न. मन बाहेर जात आहे. मनामध्ये विषाय विचार उत्पन्न होत आहेत. पण त्या मनाचा निग्रह करायचा प्रयत्न करून त्याला दुसरा विषाय द्यायचा - ईश्वराच अनुसंधान म्हणा. ते मनाने होण्याकरिता ईश्वराची चरित्र कथा वगैरे ऐकायचा, त्याचा विचार करायचा, हा विषाय मनाला दिल्यानंतर मग बाहेरच्या विषायांपासून मन बाजूला होत आहे. आणि त्या मनामध्ये ईश्वरप्रेम निर्माण होत आहे. ते प्रेम जस जस अधिकाधिक वाढत जाईल त्याच्या करता आहारशुध्दि पाहिजे. मनाची शुध्दि मनाच संशोधान हे आहार शुध्दिवर अवलंबून आहे. सात्विक आहार कोणाचा, राजस आहार कोणाचा , तापस आहार कोणाचा हे सगळंहीत्यांनी सांगितल आहे.

शरीरामध्ये जो आहार आपण घेतो त्यापैकी राजस, तामस आहाराने तशी तशी मनाची तयारी होते. अन्न ग्रहण केल असताना त्यातल्या अत्यंत शुध्द सत्व, शुध्द अंश जो आहे त्या अंशाने मन तयार होते. म्हणून स्त्रियांनी स्वैपाक करावा अस सांगितल आहे. बाहेर त्यांना स्वतंत्रता द्यायचीच नाही, परतंत्रच ठेवायचा उद्देश नाहीये. चांगला आहार, चांगल पवित्र अन्न त्यांनी तयार करायच आणि ते पवित्र अन्न आपल्या पतिला, मुलांना, आप्तेष्टांना द्यायच. म्हणजे त्यांची मन तयार करायची जबाबदारी स्त्रियांच्यावर टाकलेली आहे. पवित्र अन्नाने पवित्र मन तयार होत आहे. म्हणजे समाजामध्ये असलेली सर्वही मन ही चांगली पवित्र करण्याची जबाबदारीही स्त्रियांच्यावर मुद्दाम सोपविलेली आहे.

मारुतिरायाचं जे उदाहरण आहे, एकटे गेले मारुतिराय लंकेमध्ये. कोणीही बरोबर येऊ शकल नाही. शक्तीच नाही दुसऱ्यांची. रावणाच्या राजधानीमध्ये गेलेत एकटे. सीतेची भेट झाली. सगळं काम झाल पण त्यांनी ठरविल आहे कि हा रावण कसा आहे, त्याची शक्ति ही काय आहे हे पाहिल्याशिवाय जायच नाही. ही केवढी मोठी कामगिरी आहे! सुग्रीवांनी किंवा रामांनी हे काम सांगितल नव्हत. पण मारुतिराय मोठे मंत्री होते काम आटोपल. सीतेच दर्शन झाल. ती रामरायाची मुद्रिका

सीतेला दिली. रामांचाच हा दूत आहे अशी तिचीही खात्री पटलेली आहे. तिनेही आपल्या केसातला मणि त्यांच्याजवळ दिला. "रामांना नेऊन द्या. म्हणाली. हे काम झालेल आहे. सीतेला आश्वासन दिले. "आम्ही लवकरच सैन्य घेऊन येतो. " पण रावणाची शक्ति समजून घेऊन जायचय हा केवढा विचार आहे मनांत. आणि एकटे आहेत तिथे. तर एकटे असतानासुध्दा त्यांनी ती शक्ति अजमावण्याकरिता त्या सगळ्या वनाचा नाश केला, त्याच आलेल सैन्य मारल, त्याचा एक मुलगा मारला. इंद्रजितने त्यांना/ त्यांनाही स्वत:ला बांधून घेतल कारण त्यांना रावणाच्या सभेत जायच होत. "मी रामदूत आलेलो आहे आणि लवकरच आम्ही येऊन तुझा नाश करणार आहोत. " हे त्याच्या तोंडावर सगळया मंत्रीमंडळासमोर सांगितल. काही भीती नाही. याला कारण म्हणजे सगळा तत्वविचार मनांत झालेला आहे शरीर म्हणजे मी नाहीच आहे. शरीरापेक्षा जो अंतरात्मा आहे तो वेगळा आहे. तो अजरामर आहे. त्याचा नाश नाही काही नाही. गीतेच नुसत शब्दश: पठण करणारी क्रांतिकारक मंडळी -

नैनं छिन्दान्ति शस्त्राणि<br>
नैनं दहति पावक: ।

आत्म्याचा नाश कोणत्याही शस्त्राने होणार नाही. ते शब्दांनी झालेले ज्ञान मनावर ठसलेल आहे. त्या मनोबलाने आनंदाने फासावर चढलेले आहेत. आम्हाला मरण नाही हीच त्यांची धारणा होती. मारुतिरायांच कर्तव्य ठरलेल आहे. रामचंद्राची सेवा करायची आहे. भक्ति करायची आहे. रावणाच काय आणखी कोणी असला तरी भिण्याच कारण नाही. हे सगळे विचार स्थिर मनाने करुन मन शुध्द, सात्विक बनलेल आहे. कंदमूळे, फळाचा आहार आहे.

शंकरांना रामाची सेवा करायची होती कोणाच रूप घ्याव असा विचार करता करता हे वानराच रूप बर वाटल. वनामध्ये पुष्कळ वृक्ष असतात. त्याची फळ वगैरे मिळतिल नदीच पाणी प्याव आणि सेवा करावी. पगार वगैरे काय मिळेल हा विचारच नाही. रामचंद्राची दास्यभक्ति करण्याकरिता हा रुद्रांनी अवतार घेतला.

शुध्द आहारामुळे त्यांच मन सात्विक बनलेल आहे. अंजनीमातेच दूध त्यांना मिळालेल आहे. आणि त्यामुळे परंपरेन ती शुध्दता सगळी आलेली आहे. शुध्द आहाराने मनाची शुध्दता आपोआप होऊ लागते. आहारशुध्दि नंतर सत्वशुध्दि होते . मनाच संशोधन होऊ शकत. मनामध्ये कोणचे विचार येतात- चांगले कि वाईट , चांगले विचार मनात येण्याकरिता काय केलपाहीजे काय ऐकायला पाहीजे, काय वाचायला पाहीजे या सगळ्याकडे लक्ष देऊन विचार चिंतन करणे हाच अभ्यास आहे. हे सगळ ठरवून त्या प्रमाणे वागायच. हा काही चार पाच वर्षाचा कोर्स नाहीये. अनेक जन्मांचे संस्कार घेऊन ते मन किंवा अंत:करणतत्व आलेल आहे. शास्त्राप्रमाणे, ईश्वरी आज्ञेप्रमाणे त्या मनाला शुध्द करायचा प्रयत्न चालू ठेवायचा आहे. आपणही अविनाशी आहोत. प्रयत्न करणाऱ्याचा कधी नाश होत नाही. एक शरीर गेल दुसर शरीर मिळेल. जशा वासना, संस्कार असतात तसे शरीर मिळते. [जन्म मिळतो] असे अनेक जन्म गेले तरी अभ्यास होऊ शकतो. आणि स्वरूपानुसंधान करता करता ती समाधि अवस्था प्राप्त झाली-

म्हणजे साक्षात्कार होतो. प्रत्यक्ष ज्ञान होते. हे त्या अभ्यासाच फळ आहे. समाधिपर्यंत प्रयत्नच फक्त आहेत. ज्याला आपण आत्मसाक्षात्कार किंवा ईश्वरदर्शन म्हणतो ते मनानेच किंवा बुध्दिनेच होऊ शकत. त्याच्याकरता समाधि अवस्था प्राप्त झाली पाहीजे.

ते अनुसंधान होण्याकरिता मनाच संशोधान झाल पाहीजे. आणि त्यासाठी — देवगुरु सेवन ।
सदाचरण अनासक्ती ।।

देवाची भक्ति घडली पाहीजे. गुरुंची भक्ति झाली पाहीजे. आणि कर्माचरणही झाल पाहीजे. कर्मयोग आहे. उपासना योग आहे. ज्याला आपण विचार म्हणतो तो ज्ञानयोग किंवा अष्टांगयोग. मनाच्या कोणाच्या वृत्ति चांगल्या आहेत कोणाच्या वाईट आहेत, त्या चांगल्या कशा होतील हा सगळा अभ्यास म्हणजे योगमार्ग आहे. आत्मस्वरुप हे अविनाशी आहे. हा पक्का निश्चय झाला पाहीजे. शरीर म्हणजे मी आहे ही बुध्दि कमी होण्याकरिता हा अभ्यास सांगितला आहे. आणखी वैराग्य म्हणजे ममता दूर व्हायला पाहीजे. शरीराला उपयोगी अस जे जे असेल— चेतन असो अचेतन असो — ते माझा आहे ही बुध्दि असते प्रत्येकाच्या मनामध्ये त्यामुळे स्वत:च हित करण्यामध्ये, जे जे असेल ते सुरक्षित ठेवण्याकरिता प्रयत्न करण्यातच सगळा वेळ जातो. घ. दार वगैरे अचेतन पदार्थांच्या ठिकाणीही ममता आहे. त्या शिवाय हे पाहीजे ते पाहीजे असे सारखा चाललच आहे. ती ममता, त्या इच्छा कमी कमी झाल्यापाहीजेत फार मोठा अभ्यास आहे. त्या करता ईश्वराच्या साहाय्याची जरुरी आहे. तेवढयासाठी ईश्वराची उपासना झाली पाहीजे.

काही अनुकूल परिस्थिती असती. पुष्कळ पैसे मिळताहेत. सुखाची साधान म्हणून जी आपण समजतो ती आपण जमा करतो आहोत म्हणजे सुख मिळतय आपल्याला, अशी आपली समजूत असते. अनुकूल परिस्थिती असल्याने काळ चांगला जातोय. परंतु आपल्याला कायमचा आणि पूर्ण आनंद मिळवायचा आहे. सध्याचा जो आनंद आहे तो अपुर्ण आहे. शरीरामध्ये शक्ति असेपर्यंत हा आनंद आहे. शरीरामध्ये काही बिघाड उत्पन्न होतो. पंच पक्वान्न आहेत पण डॉक्टर सांगतात खाऊ नका. साखर खायाची नाही. फळाचा रस घ्यायचा नाही. पैसा आहे, रस घ्यायची पक्वान्न खायची इच्छा आहे. पण नाही. खाताच येत नाही. प्रतिकूल परिस्थिती उत्पन्न होत नाही तो पर्यंतच हा आनंद आहे. पण जो अविनाशी खरा आनंद आहे तो साधान परतंत्र नाहीये.

ईश्वर आनंदरुप आहे आणि त्याचा अंशरुप असणारा जीवात्माही आनंदरुप आहे. हे समजून घेण्याकरता त्याच प्रत्यक्ष ज्ञान होण्याकरता हा प्रयत्न आहे. अभ्यास आणि वैराग्य हा प्रयत्न सांगितलेला आहे. मनाचा निरोध झाल्याशिवाय ते सुख कळत नाही. त्या आत्मानंदामध्ये मन राहूच शकत नाही. मनाला सतत बाहेर जायचीच सवंय लागली आहे. अनेक जन्मांची सवय आहे. याच्या विरुध्द अभ्यास करायचा म्हणजे ईश्वराची कृपा पाहीजे. त्याच्या कृपेने बाहेर गेलेल मन एकदम आत वळू शकत ना। तुलसीदासजी चा मन एकदम बदलल ना.

कस बदलल ? बायकोवर किती प्रेम त्याचा। गेले, रात्रीच्या वेळेला नदीतून गेले. सर्पाला दोरी समजून धारुन वर चढले. आणि त्या स्त्रीने त्यांना उपदेश केला. म्हणाली "माझ्या स्वरुपाच्या ठिकाणी इतकी कशी आसक्ती तुमची ? इतक कस मन गुतून राहिल आहे ? हेच मन जर त्या

परमात्याकडे रामचंद्राकडे वळल तर किती चांगल होईल. तुमच कल्याण होईल." त्या स्त्रीच्या फक्त एका उपदेशाने त्यांचे मन आत वळून एकदम स्थिर झालेल आहे.

हे कशाने झाल ? "सदाचरण अनासक्ते" हे मुददाम सांगून ठेवलेल आहे. "सत्कर्म योगे वय घालवावे" याचा उपयोग असा एकदम होतो आहे सत्कर्म करुन जे पुण्यधान साठवलेल असेल तर त्या पुण्याच्या योगाने, कोणाच्या तरी शब्द निमित्त मात्र होऊन, एकदम मन बदलून जात. आणि तो अभ्यास सुरु झाला कि मग झाल. क्रमाक्रमाने ईश्वराच्या कृपेने तिकडेच लक्ष जात. प्रल्हादजी काय ध्रुव काय त्यांनी अगदी लहान वयातच हे सर्व . साध्य करुन घेतलेल आहे. त्यांच्या किंवा संताच्या चरित्राच चिंतन केल असता त्यांनी काय साधना केली, किती दुःख भोगल, किती कष्ट सोसले हे सगळ आपल्या लक्षात .. येत. आणि आपल मनही हाच प्रयत्न करण्याकरिता स्थिर होत. मन स्थिर होणे याचा अर्थ मनाचा पक्का निश्चय होणे. मनाचा पक्का निश्चय झाला म्हणजे मन स्थिर होतं मग मार्गाला लागत एकदा ध्येय ठरल म्हणजे तो प्रयत्न सुरु होतो. ठरायलाच वेळ लागतो. म्हणून मनःशोधन झाल पाहीजे. मनातले सगळे रजोगुण तमोगुण हे कमी झाले पाहीजेत. विषयाकडे जाण्याची जी मनाला सवय लागलीये ती बदलली पाहीजे. म्हणजे ते स्थिर होईल. आणि मग त्या स्थिर मनाकडून त्याला जे ईश्वर स्वरुपाच ज्ञान झालंय त्याच चिंतन होईल त्याच्या वरचे इतर कुसंस्कार नाहीसे होतील.

त्या करता योगरहस्य आणि बोध रहस्य महाराजांनी लिहीले आहेत. काय बोध करुन घ्यायचा, कसा घ्यायचा ? योगाभ्यास कसा करायचा x कोणचा आहार घ्यायचा ? सगळ त्याच्यामध्ये त्यांनी सांगितल आहे. म्हणून काही काल तरी चांगल श्रवण झाल पाहीजे. सत्शास्त्र श्रवण. त्या श्रवणाने खरा टिकणारा अविनाशी आनंद कोणचा आहे हे समजून येत. आणि बाह्य विषयांच्या ठिकाणी मन जाणं कमी कमी होतं. निश्चयात्मक बुध्दिने झालेला प्रयत्न कधी फुकट जात नाही.

ईश्वराच आश्वासन आहे. ८. जन्म चांगल्या शरीरात येतो आणि त्या ठिकाणी सुध्दा पूर्वी सारखाच त्याचा प्रयत्न सुरु होतो. म्हणाले आधीच्या जन्मात केलेला प्रयत्न फुकट जात नाही. तसा पक्का निश्चय झाला म्हणजे तसा प्रयत्न होतो. ईश्वराच्या कृपेने मनाची बहिर्वृत्ती नाहीशी होऊन अंतर्मुखता साधली कि त्या मनाला विचार करण्याची शक्ति मिळते. विचारांनी मनातले दोष घालवता येतात. दोष गेले म्हणजे मन स्थिर होऊ शकत. आणि स्थिर झालेल्या मनाले चिंतन करता येते.

जे आपल्याला समजलय त्याचच अखंड चिंतन करायच. त्यालाच ध्यान असेहि म्हणतात. त्या ध्यानाच परिपाक म्हणजे समाधि अवस्था आहे. मनाची अत्यंत स्थिरता झाली आहे. आणखी समाधि म्हणजे अत्यंत दृढ ध्यान सुरु झालेल असताना एकदम साक्षात्कार त्या चित्तामध्ये होऊन जातो आहे. पूर्ण आनंदस्वरुप मी आहे. " तो पूर्ण आनंदस्वरुप मी आहे " तो पूर्ण आनंद गुरु समर्थ सदगुरुच आणि ईश्वराच स्वरुप एकच आहे, अस या स्तोत्रामध्ये महाराजांनी सांगितल आहे. वेदांत सिध्दान्त हे सर्व सांगितलेले आहेत. म्हणून हा एक प्रयत्नवाद आहे. अभ्यास आहे.

प्रपंचामध्ये आपण प्रयत्न करतो. परमार्थामध्ये काही प्रयत्न नाही. नुसत भजन करायच आहे. काय त्याचा उपयोग आहे अस वाटत आपल्याला आरंभाला. पण उपयोग व्हायचा म्हणजे लगेच कसा उपयोग होणार. एखाद्याला नोकरी मिळाल्यानंतर लगेच कायम करीत नाहीत.

कस काम करतो, कसा वागतो हे सगळ पाहूनच निर्णय होतात. व्यवहारात सुध्दा परीक्षा आहे. त्याची योग्यता दिसून आल्या नंतरच त्या जागेचा तो अधिकारी समजला जातो आणि मग कायम होऊ शकतो. त्याला स्थिरता येऊ शकते. कायम झाल्यानंतर सुध्दा बढती मिळायला वेळ लागतो. कायम झाला कि लगेच प्रमोशन असे नाही. त्याच काम त्याने योग्य रीतीने करून दाखावल पाहीजे. त्याल त्याची बुध्दि तयार झाली पाहीजे. तितका काळ गेला पाहीजे हा उद्देश आहे. एकदम कोणचही काम होत नाही. व्यावहारीक प्रयत्न सुध्दा एकदम सफल होत नाहील हा तर मोठा. प्रयत्न आहे हाही योग्य प्रयत्नवाद आहे. संसारातल्या सर्व सुखांकडे पाठमोर होऊन ती सगळी सुखं बाजूला टाकून हे सगळे संत जाताहेत. काहीतरी त्यांना त्यात लाभ झाला आहे. उगीच वेडेपणाने, अज्ञानाने ते या मार्गाने गेलेले आहेत. अस म्हणता येत नाही. त्याच्या प्रयत्नाप्रमाणे त्यांना लाभ झालेला आहे. म्हणून हे सर्व [संसार] सुटून गेलेल आहे. सोडल नाही त्यांनी आपोआप सुटलेल आहे. त्यांनी जी प्रयत्नाची परांकाष्ठा केली त्याला ईश्वरी सहाय्य झालेल आहे. ज्या मनाने हा प्रयत्न करायचा त्याची स्थिरता होण महत्वाच आहे. त्या स्थिरतेला असलेले प्रतिबंध दूर झाले की नाही कस समजणार आपल्याला ? आपल्या हातून पूर्वी काही दुष्कर्म झाली आहेत त्यामुळे चंचलता निर्माण होती, मनामध्ये विक्षेप निर्माण होतात. आपल्याला कळू शकत नाही ते. विक्षेप उत्पन्न झाल्यावर काय कराव अस वाटत. त्याचे उपायही संतानी सांगितलेले असतात. ईश्वराच्या कृपेने ते प्रतिबंध दूर होऊन मन स्थिर होऊ शकत. तसेच बाहय शारिराची व्यथा सुध्दा दूर होऊ शकते.

भीष्माचार्यांच्या बाहय शारीराची व्यथा भागवंताच्या दृष्टीक्षेपाने दूर झालेली आहे. म्हणून तर ते धर्मराजाला उपदेश करु शकले. प्रथम त्यांनी भागवंतांना सांगितल, मला वेदना होताहेत मी काय उपदेश करणार तुम्हीच सांगा. भागवान श्रीकृष्ण म्हणाले, नाही. तुम्हीच ..
याला उपदेश करा. आणि मग भागवान श्रीकृष्णांनी भीष्माचार्यांवर कृपादृष्टी टाकल्यावर भीष्माचार्यांनी धर्मराजाला संपूर्ण उपदेश केला आणि त्यांची बुध्दि स्थिर केली.

श्रेष्ठ पुरुषांची बुध्दि स्थिर झाल्यानंतर बाकीच्यांची बुध्दि आपोआप स्थिर होते आहे. म्हणून समाजातल्या श्रेष्ठ पुरुषांची बुध्दि बिघडू नये यासाठी ईश्वराचे अवतार होतात. श्रेष्ठ जे आहेत त्यांची बुध्दि चांगली राहीली पाहीजे. अर्जुनाची बुध्दि चांगली रहावी, तो कर्तव्य निष्ठ व्हावा ही देवाला इच्छा उत्पन्न झाली म्हणून देवांनी त्याच्या बुध्दितला मोह दूर केला. त्याला संशय निर्माण झाला होता. काय करायचय राज्याकरता युध्द करून, सगळ्या लोकांना मारायच, त्या पेक्षा वनामध्ये जाव भिक्षा मागावी अस वाटू लागल.

पण भागवंत म्हणाले, हा मोह आहे. अहंकार आहे. ही दया होत नाही. तुझ्यासारख्या अधिकारी पुरुषाने दयेचा विचार करायचा नाही. क्षत्रिय आहेस तू. कशाला घेतोस आपल्याकडे कर्तृत्व. सर्वही कर्तृत्व ईश्वराच आहे.

अशा रीतीने उपदेश करुन धर्माच महत्व पटवून दिल आणि त्याची बुध्दि कर्ममार्गात स्थीर केली मग त्याच अर्जुनाने युध्द केल. भागवंताच्या कृपेने त्याला यश मिळाल. प्राण जाण्याचे कितीतरी मोठेमोठे प्रसंग अर्जुनावर आले असताना भागवंतानी त्याला वाचविलेले आहे. ही त्याची प्रथम पासून कृपा आहे. अशी ही कृपा जन्मापासून मिळण्याकरता ईश्वराची

-उपासना अखंड चालू पाहीजे. त्याच्याबद्दल मनांत संशय वगैरे काही मनांत आणून उपयोगी नाही. म्हणजे जन्मापासून ईश्वराच सहाय्य आपल्याला मिळत. कोणाच्या ना कोणाच्या तरी रुपाने. त्याला मार्गदर्शन होत. आणि पुन्हा व्यवस्थित मार्गाने त्याचा अभ्यास चालू होतो. त्याच कार्य हे पूर्ण होत आहे. म्हणून महाराज म्हणतात स्वरुपानुसंधान हे मुख्य झाल पाहीजे. केव्हाही, कोणत्याही वेळी ते करता आल पाहीजे. ज्ञानी, इंद्रिय निग्रह, मनोनिग्रह ज्यांचा झालेला असे महात्मे संसारी असून सुध्दा कोणत्याही वेळी भागवद् भजनाला सुरवात करतात. तुकाराम महाराजांनी एकदा "जय जय रामकृष्ण हरि " म्हणून भजनाला सुरुवात केली की सगळ विसरायचे. संसाराचे भान नाही. देहभान सुध्दा नाही. सात सात दिवस भजन करीत बसायचे. हे कस शक्य आहे ? हे सगळ खोटं आहे, काही आहे अस म्हणून त्याचा निर्णय करणे योग्य नाही. जे घडलेल आहे ते सत्य आहे अस समजल पाहीजे, आम्हाला जरी पटल नाही तरी सुध्दा. अन्न नाही, पाणी नाही अशा अवस्थेत ते आनंदाने राहू शकतात. सांसारिक परीस्थिती सुध्दा किती विचित्र आहे. सुखाची साधान म्हणून जी समजली गेलीत ती काही नाहीत त्याच्या संसारात तरीसुध्दा आनंद आहे. दुस-यांना आनंद देताहेत अर्थात त्याचा हा प्रयत्न योग्य दिशेने चालला असला पाहीजे, एवढी समजूत तरी आपण करुन घेतली पाहीजे. त्यांचा प्रयत्न योग्य आहे की अयोग्य आहे, ते संसाराकडे लक्ष देत नाहीत अस म्हणून उपयोगी नाही. संसाराकडे लक्ष देऊनही आपल्या इच्छेने सर्व अनुकूल परिस्थिती येते का ? हा ही विचार केला पाहीजे. सुखासाठी, आपल दुःख दूर होण्यासाठी आपले कीती प्रयत्न चाललेले आहेत. पण त्या प्रयत्नांना आपल्या इच्छेप्रमाणे फल काही आपण मिळवू शकत नाही. हे प्रत्येकाला कबूल कराव लागत. म्हणून संताची चरित्रे, ईश्वराची चरित्रे ही अखंड वाचून, त्याचा निदिध्यास करायचा आहे. म्हणजे मनाची स्थिरता होते. मनातले दोष दूर होतात. ईश्वरप्रेम निर्माण झाल्यानंतर सर्वहि पातकांचा दुरितांचा क्षय होणे आहे. आणि दुरित क्षय झाला म्हणजेच मनाची स्थिरता होती. तो क्षय झाल्याशिवाय मन स्थिर होऊ शकत नाही. चंचलता हा त्याचा कायम स्वभाव होऊन गेलेला आहे. म्हणून त्या करता संतांनी सांगून ठेवलेल आहे- देवगुरुसेवन। सदाचरण अनासक्ते।। हे करायच. मनाच संशोधन करायच. मनाच संशोधन करुन वासनाक्षय झाला म्हणजे मन अगदी स्थिर होत. त्या स्थिर मनाला "नारायण" विषय मिळाल्यानंतर त्याच आनंदात ते निमग्न होते. "विषय तो त्यांचा, झाला नारायण" आणि त्यांची उपेक्षा नारायण कधीही करीत नाही हेहि तितकच खर आहे. ज्यांची तितकी तयारी झालेली आहे त्याची "योगक्षेम"वहाम्यहम" ही जबाबदारी त्याने [ईश्वराने] घेतलेली आहे. ईश्वराच्या शक्तिवर पूर्ण विश्वास असल्याने संत महात्मे त्याच्या अखंड चिंतनात निमग्न असतात. आपण चुकलो, आपला मार्ग योग्य नाही अस कधीही त्यांना वाटत नाही. म्हणून त्यांचे जे ग्रंथ आहेत ते निश्चित मार्गदर्शक आहेत. आणि त्या प्रमाणे इतर पुण्यशील मानवांची बुध्दिसुध्दा स्थिर होती. त्यांच्या त्यांच्या अधिकारा प्रमाणे -कर्मयोग, ज्ञानयोग, उपासनायोग असो- योग्य ठरलेल्या मार्गाकडे त्यांची बुध्दि वळती. आणि त्याप्रमाणे निश्चित बुध्दिने त्यांचेही प्रयत्न सुरु हो-तात. आणि त्यामध्ये त्यांना यश मिळत. असा हा एक परमार्थ मार्ग आहे. संताचा मार्ग आहे. त्या मार्गाचा विचार हा जितका होईल तितका आणखी करायचा.

- अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त -

४/७/८८

"श्री गणेशदत्तगुरूभ्यो नमः"

नित्यं स्मरामि ते पादे हतखेदे सुखप्रदे
प्रदेहि मे शुध्दभावं भ.वं यो वारवेदेंद्भुतम्

गायत्रीचे २४ लक्ष पुरश्चरण करून त्याच सर्व देवतांना हवन म्हणून गायत्री यज्ञ करतात. त्यावेळी सर्व देवतांचे पूजन करतात. भारतामध्ये सर्वहि लोकांच्या मनामध्ये ईश्वराच्या अस्तित्वाची खात्री व्हावी/ सर्वांच्या मनात श्रध्दा उत्पन्न व्हावी, या करता सगळ्याहि संत महात्म्यांचे सदैव प्रयत्न झाले आहेत आणि होत आहेत. ईश्वराच अस्तित्व मान्य केल्याशिवाय पूर्ण सुखाची प्राप्ती होणार नाही. जरी सर्व सुख मिळाली तरी ईश्वराचे भजन, पूजन कधी आपल्याकडून सुटू नये अशी ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानाच्या शेवटी प्रार्थना केली आहे. ईश्वराचे अस्तित्व मान्य करायचे म्हणजे आधी ईश्वर म्हणजे कोण आहे हे समजून घेतले पाहिजे. याचा उपदेश भारतवर्षामध्ये या गायत्रीच्याव्दाराने आठ वर्षाच्या मुलाला केला जातो. इतर कोणत्याहि देशामध्ये ही कल्पना नाहीये. ही गायत्रीमंत्राची दीक्षा दुस-या कोणत्याही देशामध्ये नाहीये. तिथे काही तत्त्वज्ञानी मंडळी होऊन गेली असतील त्यांनी काही ग्रंथहि लिहिले असतील. पण आज हजारो वर्षे भारतवर्षामध्ये आठ वर्षाच्या मुलाला उपनयनाच्या वेळेला ईश्वराचा हा मंत्र सांगितला जातो आणि त्या दिवसापासून ही ईश्वराची कल्पना त्याच्या मनामध्ये राहावी आणि त्याने आपल्या जीवनाचे साफल्य करून घ्यावे अशी त्याच्या मागची इच्छा आहे. हे भारतवर्षाच मोठ वैशिष्ठय आहे. सर्वांच्या बुध्दिला प्रेरणा करणारी अशी एक शक्ति आहे एवढीच जाणीव त्यांनी करून दिली आहे. ईश्वराचे दर्शन करून घेणा-या महात्म्यांनी किती तप केल असेल, किती त्याग केला असेल, किती/ अनासक्ति असेल त्यांच्या ठिकाणी देहाकडे पहायच नाही, संसाराकडे लक्ष नाही. किती कष्ट घेतले असतील त्यावेळेला त्यांना ईश्वराच दर्शन झालेल आहे.

भारतवर्षामध्ये होऊन गेलेले मोठ मोठे संत महात्मे ईश्वरसाक्षात्कारी होते. "आधी केले मग सांगितले" ही त्यांची पध्दती आहे. उगीच सांगायला जात नाहीत कुणाला. अगोदर करायच, त्याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायचा अस त्याच होत. भारतवर्षामध्ये भक्तिमार्ग किंवा योगमार्ग हे प्रयोग शास्त्र आहे.

मोठ मोठया संतांनी हे प्रयोग करून, त्याचा अनुभव घेऊन नंतर उपदेश केलेला आहे. तर या गायत्रीमहामंत्रामध्ये जे ईश्वराच स्वरूप सांगितल आहे त्याचा अर्थ समजावून घेऊन त्या प्रमाणे जर जप झाला तर ती ईश्वराची मोठी उपासना आहे.

सर्व संतांनी भक्तिमार्गाचा प्रसार केलेला आहे. भक्तिमार्ग सोपा समजतात. या गायत्री मंत्राच्या व्दाराने बालवयातच ईश्वराच स्वरूप समजावून दिल जात. आरंभापासून त्याच्यावर पालकांचहि लक्ष पाहिजे – बालकाने संध्या केली कि नाही, जप केला कि नाही. उपनयनाच्या वेळी त्याला गायत्री मंत्राचा उपदेश केला म्हणजे कार्य संपल अस नाही. परवा आम्ही नाशिकला एका गृहस्थांकडे पाहिल. आजोबा आपल्या दोन नुकत्याच मुंज झालेल्या नातवांना पहाटे लवकर उठवून त्यांच्याकडून स्नानसंध्या गायत्री जप वगैरे करवून घेतात आणि काही खाऊनच ती मुल ७–३० वाजता शाळेत जातात. म्हणजे आज असहि उदाहरण पहायला मिळत. उपनयन झाल्यानंतर तो अधिकारी झालेला आहे. त्याला त्या मंत्राचा अर्थ समजावून सांगण, त्याच्याकडून जप करवून घेण हे महत्वाच कार्य आहे. अगदी बालवयापासूनच जर हे झाल तर पुढे त्याच्या आयुष्यात त्याला व्यावहारीक कल्याणहि साधता येईल आणि पारमार्थिक अधिकारहि प्राप्त करून घेता येईल. तर अशा रीतीने ईश्वराची उपासना करण हे भारतवर्षाचे वैशिष्टय आहे.

तिकडे पाश्चात्य देशातहि आता मंदिरे होऊ लागली आहेत. परवा नाशिकची काही मंडळी अमेरिकेला जाऊन आली. त्यांनी गणेशमूर्तीची स्थापना तिकडे केली. केवळ अर्थाजन करण आणि विषयभोग घेण यांनी काही समाधान नाहीये अस त्यांनाहि आता वाटायला लागलय. आपल्याला वाटत पुष्कळ संपत्ती मिळावी. पुष्कळ पगार मिळावा. म्हणजे आपण सुखी होऊ पण किती तरी संपत्ती ज्या देशामध्ये आहे त्या देशातली मंडळी सुखी नाहीयेत. त्यांना या मार्गाकडे येण्याची बुध्दि होऊ लागलेली आहे. मार्गदर्शन करणारे संत महात्मे भारतवर्षातून तिकडे जातात, त्यांना उपदेश करतात.

उपासनामार्ग हा खऱ्या सुखाचा मार्ग आहे. ईश्वराची उपासना. "उपासनेला दृढ चालवावे" अस समर्थानी सांगितल आहे. व्यक्तिशः आपलं कल्याण करुन घेण्याकरता ईश्वराची उपासना सतत चालू पाहिजे. महाभारता-मध्ये द्रौपदीचे उदाहरण दिलेल आहे. धर्मराज मोठे धार्मिक होते. सत्यनिष्ठ

होते, अजातशत्रु होते. हे सगळ जरी खार असल तरी ज्या वेळेला दुर्वास ऋषी त्या ठिकाणी आले. वनवासात गेल्यावर धर्मराजांनी सूर्यनारायणाची प्रार्थना केली. काही तरी गायत्री मंत्राची उपासना त्यांची असली पाहिजे. सूर्यनारायण प्रसन्न झाले. आपल्या आश्रमात निरनिराळे ऋषि मुनि तपस्वी पुरुष येणार. मध्यान्हकाली आलेल्या अतिथींना तसच विन्मुख कस पाठवायच ? आम्हालाच खायला नाही तर अतिथींना कुठून घायच वगैरे असले विचार त्यांच्या मनात आले नाहीत. मुख्य जे अन्नदानाचे व्रत आहे ते वनवासात असतानासुध्दा आपल्या हातून पाळल जाव यासाठी त्यांनी सूर्यनारायणाची उपासना केली आणि सूर्यनारायणाने त्यांना ते पात्र दिल. सूर्योदयानंतर पूजा केल्यावर या पात्रातून वाटेल तितक अन्न तुम्हाला मिळेल पण द्रौपदिचे जेवण झाल कि अन्न बंद होईल, अस त्यांना सांगितले. आता द्रौपदिने जेवायचे केव्हां ? धर्मराजाने सगळी तयारी करुन ठेवली. म्हणजे धर्मराजांना जे धर्माचरण करण्याची इच्छा होती त्यात द्रौपदिच सहाय्य भरपूर झालय अस म्हणायला हरकत नाही. रात्री १०/१२ वाजेपर्यन्त तिने जेवण करू नये. कारण जेवण झाल्यावर अन्न बंद झाल्यानंतर कुणी अतिथी आले तर आणि तसच झाल. दुर्योधनाच्या सांगण्यावरुन दुर्वास ऋषि तिथे आले ना. द्रौपतिच जेवण झाल्यानंतर तुम्ही त्यांच्या आश्रमात जा आणि जेवायला घा म्हणून सांगा अस दुर्योधनाने त्यांना सांगितल आणि त्यांनी ते कबूल केल.

त्या दिवशी रात्री ११/१२ वाजले. आता कुणी येणार नाही अशा विचाराने द्रौपदिने जेवण केले आणि पात्र घासून पुसून ठेवून दिल. आणि नेमके त्याच वेळेला दुर्वास ऋषि आपल्या सगळ्या शिष्यमंडळींसह जेवायला आले. आता कुठल अन्न घायच. सत्वपरिक्षाच होती. पात्र तर घासून ठेवलेल आहे. जेवण झालेल आहे.

धर्मराज जरी मोठे धर्मशील असले तरी या अशा प्रसंगी काय करणार ? धर्मराजांच्या धर्मशीलतेच उदाहरण महाभारतकारांनी दिलेल आहे. त्यांचे चारी बंधू गतप्राण होऊन पडलेले असताना त्या यक्षाने विचारलेल्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली आणि ते चौघेहि बंधू जिवंत झालेले आहेत. ही त्यांची शक्ति आहे. पण या वेळेला काय करणार ? आत्ता जेवण कुठून घालणार ? तर त्या वेळेला द्रौपदिची परिक्षा आहे. द्रौपदि धर्मराजांना सर्वतोपरि सहाय्य करणारी जरी असली तरी गोपालकृष्णांची मोठी भक्त होती ती. गोपालकृष्णांवर प्रेम होत तिच. त्या प्रेमाने गोपालकृष्णांना तिने हाक मारली आणि देव तिथे आले. त्या संकटातून त्यांची मुक्तता केली. द्रौपदिने दिवसभर उपाशी राहायचे म्हणजे

.......

तिला भूक लागतच नव्हती. अन्न समोर असताना खायच नाही भूक लागली तरी. कारण आपण जर जेवलो तर हे अन्न बंद होणार आणि मग दुसरी मंडळी कोणी आली तर त्यांना काय देणार. ही धर्मभावना जर मनात असेल तर धर्माच आचरण होत. ते धैर्य आपोआप निर्माण होत. अन्नपाणी काहीही न घेता ती बिचारी अन्नदान करीत होती. आणि ते सहाय्य धर्म राजांना वनवासामध्ये मुख्यत्वेकरून झालेल आहे.

गृहस्थाश्रमाचे व्यवस्थित पालन हीसुध्दा ईश्वराची उपासनाच आहे. आलेल्या अतिथीला विन्मुख पाठवायच नाही. याच व्रताच आचरण करून अनसूया मातेने ब्रह्मा, विष्णु, महेशांना लहान बालकांचे रूप घ्यायला लावल. गृहस्थाश्रमी पुरूषां-करता "अतिथी देवो भव" हा नियम मुद्दाम सांगितला आहे. तर धर्मराजांनी आपत्कालातहि या व्रताच पालन केल. माझ्या घरी आलेला कोणीही अतिथी उपाशी जायचा नाही. सूर्यनारायणांनीही सहाय्य केल त्यांना. द्रौपदिनेहि सहाय्य कल. म्हणून त्यांचा गृहस्थाश्रम वनवासातदेखिल व्यवस्थितरीत्या पार पडला. सत्वहानि झाली नाही. सत्वपरिक्षेतून ते पार पडले. तर गृहस्थाश्रमी पुरूषांना अस काही व्रत करता येत नाही अस नाही. तितक धैर्य मात्र पाहिजे. तेवढे धैर्य नसेल तर मात्र धर्माचरण व्यवस्थित होऊ शकत नाही.

या ठिकाणी, ज्या महामंत्रामध्ये ईश्वराच स्वरूप, त्याची शक्ति दाखवली जाते, त्याचे अनुष्ठान हया मंडळींनी केले. त्याची सांगता आज या ठिकाणी झाली आहे. शेवटी शेवटी तपस्विनी, मोठया भगवत् भक्त ताई दामले म्हणून ज्या होऊन गेल्या त्यांचे वास्तव्य या ठिकाणी होते. त्यांनी संसारात राहूनसुध्दा आपली योग्यता कशी वाढवली, ईश्वराची उपासना कशी केली, ज्ञानेश्वरांचा अभ्यास त्यांचा किती होता हे सर्व हया मंडळींना माहीत आहे. ज्ञानेश्वर महाराजांच म्हणण काय आहे ते समजावून घेऊन त्यांनी मांडल. वेदशास्त्राची धर्मशास्त्राची जी आज्ञा आहे त्याचप्रमाणे सर्वांनी आचरण करावे हाच त्यांचा उपदेश होता. त्या ताईच्या संकल्पाप्रमाणे हे कार्य घडून आलेल आहे अस आत्ताच व्यवस्थापकांनी सांगितल. म्हणजे एका तपस्विनी स्त्रीने संकल्प केला, सर्वांच्या बुध्दिला प्रेरणा झाली. सर्वांच सहाय्य मिळाल आणि अनुष्ठान पूर्ण झाले. गायत्रीमंत्राचा हाच अर्थ आहे. सर्वांच्या बुध्दिला प्रेरणा करणारी शक्ति म्हणजे ईश्वराची शक्ति.

लोकशाहीमध्ये अनेकांच्या बुध्दिला प्रेरणा देणारे कायदे करतात, पण तस असत का ? हाही विचार केला पाहिजे. जो कोणी बुध्दिमान् मान्यवर

म्हणून जो असतो त्याची इच्छा जशी असेल तस काम होत. त्याची एकट्याचीच बुध्दी. तो सांगेल त्याप्रमाणे त्याच्या पक्षाच्या माणसांनी मत द्यायची. सगळे कुठ विचार करताहेत ? वस्तुत: लोकशाही अशी दिसतच नाही. अशाप्रकारच अनुष्ठान करायची सर्वांना प्रेरणा झाली आणि सर्वांनी यथाशक्ति त्याला सहाय्य करुन ते कार्य पार पडलेल आहे. हाच गायत्रीमंत्राचा अर्थ आहे. वट हुकूम काढून अशी कार्य घडत नसतात. सर्वांच्या बुध्दिला प्रेरणा करणारी शक्ति. तर सर्वांच्याच बुध्दिला ज्याअर्थी प्रेरणा झालेली आहे त्याअर्थी ईश्वराचीच ही पेरणा आहे. त्याचच कार्य आहे. समष्टि म्हणजे ईश्वर आहे हे आपल्या शास्त्रकारांनी सांगितलेल आहे. शेवटच्या पसायदानामध्ये ज्ञानेश्वर महाराजांनी बुध्दि कशी असावी, कशी बनवावी हेच सांगितल आहे ना बुध्दिचा विकास कसा झाला पाहिजे, तरच त्या व्यक्तिच कल्याण आहे, समाजाच, राष्ट्राच कल्याण आहे. असा बुध्दिविकास झाला पाहिजे. "भूता परस्परे पडो मैत्र जीवाचे" हीच प्रार्थना ज्ञानेश्वर महाराजांची आहे. सर्वांनी सौहार्द्र भावाने राहाव, सर्वांचे परस्परांवर प्रेम असाव हे काय राजशासनाला करता येण शक्य आहे काय ? तसा वट हुकूम काढून त्याप्रमाणे होणार आहे का ? ज्ञानेश्वर महाराजांनी केलेली प्रार्थना राष्ट्र कल्याण करणारी आहे. ते परस्परांबद्दलचे ऐक्य नष्ट झाल तर काय भयानक परिस्थिती निर्माण होते ते आपण रोज वाचतोच आहोत पेपरमध्ये. [पंजाब] कोणी काय बुध्दिभेद निर्माण केला समजत नाही. सर्वांनी एकमेकांवर प्रेम कराव अस काय कायदा करुन शक्य होईल का ? त्याकरता बुध्दिला प्रेरणा करणाऱ्या ईश्वराची शक्ति जर मान्य झाली, त्याची प्रार्थना झाली तर त्या प्रार्थनेला अनुसरुन सगळ्या मंडळींची बुध्दि एकत्र येऊ शकेल. परस्परांचे सौहार्द्र निर्माण होऊ शकेल. राष्ट्रहिताच कोणतहि कार्य सर्वांची बुध्दि एकत्र आल्याशिवाय होण शकानाही. बुध्दिला प्रेरणा करणारी कोणी तरी शक्ति आहे अस मान्य केल म्हणजे आपोआप सगळ कोड सुटत. त्याकरता ज्ञानेश्वर महाराजांनी देवाजवळच प्रार्थना केली. ईश्वरानेच मला हे पसायदान द्यावे अशी प्रार्थना करुन त्यांनी हे मागण मागितल आहे. "आता विश्वात्मके देवे -------- भूता परस्परे पडो मैत्र जीवाचे."

तर आजहि हे "भूता परस्परे पडो" हे जर घडले नाही तर राष्ट्र धोक्यात येईल. हे सर्वांना मान्य करायला पाहिजे. त्या करता सर्वांनी एकमेकांवर प्रेम केल पाहिजे. म्हणजे तसा ठराव किंवा कायदा करुन भागणार नाही. परस्परांवर प्रेम करायच म्हणजे त्यात काहीतरी त्याग आलेला आहे. आपल्या स्वत:च्या फायद्याकडे जो पर्यन्त लक्ष आहे तो पर्यन्त हे प्रेम वगैरे वरकरणी आहे. म्हणून

संत महात्म्यांनी जे काय मागायचे ते देवाकडे मागितले आहे. त्यांची जी मागणी आहे ती राष्ट्रहिताची आहे. सर्व समाजाच्या हिताची आहे. केवळ व्यक्ति करता नाही. संतांनी भगवद् भक्तिचा प्रसार करुन राष्ट्र निष्क्रिय बनवल असं मोठ मोठ्या बुध्दिमान लोकांनी लिहून ठेवल आहे. काय ? निष्क्रिय म्हणजे नेमक काय आहे ? काही तरी उपासना मार्ग दाखवला आहे. ईश्वरशक्तिची उपासना करुन शांती मिळते कि नाही पहा असं त्यांनी स्वत: अनुभव घेऊन सांगितल. ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानामध्ये सांगितलेला बुध्दिविकास वेगळा आहे. हल्ली जो बुध्दिवाद आपण पहातो - ईश्वर नाही, परलोक नाही, धर्म नाही, धर्मातील राज्यच पध्दति करुन टाकण - हा बुध्दिवाद नाही. आपल्या बुध्दिला प्रेरणा करणा-या ईश्वरशक्तिची उपासना करण, ध्यान धारणा करण, तिचे ज्ञान मिळवण असं किती तरी संतांनी सांगितले आहे. त्या उपासनेच्या योगाने मानसिक शांती मिळते, आरोग्य लाभते. म्हणून संतांनी हा उपदेश केलेला आहे. कोणी कबूल करा किंवा न करा. दुस-यांची समाजातल्या लोकांची दु:ख त्यांना पहावत नाही. दयाळू असल्यामुळे सर्व जीव दु:खातून दूर व्हावेत असं त्यांना वाटत आणि तसे ते प्रयत्न करतात. त्या दयेमुळे हा उपदेश ते करीत असतात. आणि तो उपदेश ज्यांना पटलेला आहे ते त्या मार्गाने जाऊन शांति व सुख प्राप्त करुन घेतात.

तर स्मृतीकारांनी मुद्दाम सांगितलय, केवळ गायत्रीची उपासना जरी झाली तरी सुख प्राप्त होते. शास्त्राने सांगितलेले सर्व नियम पाळून नियमाने जर गायत्रीची उपासना झाली तर तो उपासक श्रेष्ठ होतो. केवळ अर्थार्जनासाठी वेदांचा अभ्यास केलेला असला तरी त्याला किंमत नाहीये. नुसत्या ज्ञानाला हि महत्व नाही. तप पाहिजे, काही तरी आचार पाहिजे. नुसत सांगणारा, बोलणारा [पण स्वत: मात्र आचार न पाळणारा] खरा पंडित नाही. त्या-प्रमाणे वागणारा जो आहे तो खरा पंडित आहे. तर ज्ञान जरी मिळाल तरी ज्ञानाप्रमाणे आचरण घडल पाहिजे. आपल्या प्राचीन आचरण पध्दतीमध्ये तिकडे फार लक्ष दिल आहे. अगोदर ब्रहमचर्याश्रमामध्ये सर्व वेदशास्त्राच ज्ञान करुन द्यायच. उत्तमोत्तम ज्ञान. व्यक्तिधर्म कोणाचे आहेत, समाजाचे धर्म कोणाचे आहेत, राजधर्म कोणाचे आहेत, सगळं धर्माच ज्ञान शास्त्रकारांनी सांगितल आहे. आणि राजावर तर फारच मोठी जबाबदारी आहे. सगळ्या लोकांच धर्माच ज्ञान त्यांनी करुन द्यायच आहे. आणि त्या त्या प्रमाणे सगळे प्रजाजन वागताहेत कि नाही हे पहायचे आहे. ते आस्तिकतेने वागताहेत कि नास्तिकतेने

वागताहेत ही तपासणी राजाने करायची आहे. त्यासाठी राजाला सर्व ज्ञान पाहिजे ना मनु मोठे समाज शास्त्रज्ञ होऊन गेले.

महाभारतातल्या शांतिपर्वात धर्मराज आणि भीष्माचार्यांचा संवाद झालेला आहे. धर्मराजाला शेवटी पश्चाताप झाला. उगीच मी लढाई केली इतके लोक मारले गेले त्यांची हत्या माझ्या डोक्यावर आली वगैरे वगैरे. म्हणजे युध्द सुरु होण्याच्या वेळेला अर्जुनाच्या मनाची जशी स्थिती झाली होती त्याचप्रमाणे युध्द संपल्यानंतर धर्मराजाच्या मनाची स्थिती झाली. अर्जुन म्हणाला, मी युध्द करणार नाही. माझेच लोक माझ्या हातून मारले जातील. त्यापेक्षा मी आपला वनात जाऊन भिक्षा मागून राहिन. धर्मराजालाहि तसच वाटल. म्हणाले, मी राज्य करणार नाही. माझ्या हातून पुष्कळ युध्द झाली आहेत. मला नरकामध्ये जावे लागेल. मला राज्य नको. मी आपला वनामध्ये जातो.

अशी त्याची स्थिती झाल्यावर श्रीकृष्णांनी, त्याला भीष्माचार्यांकडे जाऊन मग सगळा निर्णय घे, अस सांगितल. भीष्माचार्य मोठे राजकारणी, उत्तम योध्दे आणि पूर्ण ज्ञानसंपन्न होते. त्याचबरोबर त्यांच्याजवळ भगवद् भक्तिहि पुष्कळ होती. भीष्माचार्यांचे निर्याण म्हणजे - भगवान श्रीकृष्ण समोर आहेत. त्यांची स्तुति करता करता भीष्माचार्यांचे प्राणोत्क्रमण झालेल आहे.

प्राचीन इतिहासकारांनी असे आदर्श पुरुष महाभारतासारखे वाङ्मय निर्माण करून आपल्यासमोर ठेवले आहेत. रामराज्य झाल पाहिजे वगैरे अजूनहि लोक म्हणतात. पण रामराज्य म्हणजे काय होत केवढ धैर्य होत रामरायांच सीतादेवींना रावण घेऊन गेला. कोणी सीतेला नेल याचासुध्दा पत्ता नव्हता. कोण शत्रु आहे, कुठ राहातो, काही माहीत नाही. पण रामरायांनी मनाचा निश्चय केलेला आहे - हा शत्रु कुठेहि असूं दे त्याला शोधून काढून शासन केल्याशिवाय राहायचे नाही. हयांच्याजवळ काय होत ? हे फक्त दोघे बंधू होते. सैन्य नाही, शस्त्रास्त्र नाहीत, सहाय्य करायला कोणी नाही. अशाहि स्थितीमध्ये आपल्या शत्रूला शासन करायचा निश्चय पक्का आहे. अधर्माने वागणा-याला शिक्षा करायच त्याहि परिस्थितीत त्यांनी ठरवल. म्हणजे हा मनाचा एक पक्का निश्चय आहे, त्या प्रमाणे धैर्य आहे. सर्व एकंदरीत शास्त्रज्ञान आहेच आहे. आणि अशा निश्चयाने ते पुढे निघाल्यावर सुग्रीवाची भेट झाली, हनुमान भेटले, सर्वांची भेट झाली. आपण धर्माप्रमाणे वागत आहोत, अधर्माने वागणारा शत्रु कितीहि मोठा असला

तरी त्याला शासन केल्याशिवाय रहायच नाही. हा एक मोठा निश्चय आहे. मोठ धैर्य आहे. त्याप्रमाणे वागून त्यांनी आपला आदर्श सर्वांपुढे ठेवला. वाल्मिकीनी रामायण तेवढया करता लिहिल. श्रेष्ठ पुरूष कसा पाहिजे. त्याचा आचार बघून इतर मंडळी वागत असतात. लोकांच्या पुढे आदर्श कसा असला पाहिजे हे समजण्या-करता रामायण लिहिल आहे. रावणाला मारल्यानंतर लंकेच राज्य बिभिषणाला दिल. सीतादेवीला आणल बिभिषणाने,पण तिचा ते काही स्वीकार करेनात. मग सीतादेवीने आपले पावित्र्य सिध्द करण्याकरता अग्निप्रवेश केला. साक्षात अग्निनारायण प्रगट झाले आणि त्यांनी सीतादेवी पवित्र आहे अस सांगितल. रामराय म्हणाले, हा जो अन्यायी राजा होता त्याला शिक्षा करण्याकरता मी आलो आहे. बिभिषणाने रावणाला पुष्कळ समजावल होत, अरे ही परस्त्री आहे त्यांची त्यांना देऊन टाक. अस हे चांगल नाही हा अधर्म आहे. रावणाने बिभिषणाला सांगितल, आम्ही राक्षस आहोत. आम्हाला जगामध्ये कोणतीच स्त्री परस्त्री नाही. वाटेल त्या स्त्रिया आम्ही आणू शकतो. हया उत्तरामुळे बिभिषणाने रावणाची संगती सोडली आणि तो रामरायांना शरण आला. म्हणजे सर्वच स्त्रिया आमच्या आहेत अस म्हणणारा रावण आणि त्याच्या अनुयायांची संस्कृती जगात राहिली असती तर काय झाल असत ? अशी संस्कृती जगामध्ये होऊ नये. त्या अधर्माचरण करणा-यांना शासन झाल पाहिजे त्यासाठी प्रयत्न केले. सीता जर शुध्द असेल तर तसे तिने स्वत: दाखवल पाहिजे. मी अपराधी नाही हे ज्याच त्याने सिध्द करून दाखवल पाहिजे हे त्यांना दाखवायच आहे. अमक्या मंत्र्याचा, अधिका-याचा फोन आला आणि अपराधी-निर्दोष सुटला अस जर होत राहिल तर अपराध नेहमीच होत राहणार. आपली शुध्दता आपण सिध्द करायची प्रजाजनांची वृत्ती कायम राहिली पाहिजे. हे रामरायांना दाखवायच होत.

तर अशा रीतीने राज्य कारभार त्यांनी केला आणि त्यांचा आदर्श वाल्मिकीमुनींनी आपल्यासमोर ठेवला आहे. द्रौपदीची ईश्वरनिष्ठा कशी आहे हे व्यास महर्षिंनी दाखवलेल आहे. हे सर्व आपल्याला समजून सांगण्यासाठी सर्व संतांनी प्रयत्न केले आहेत. महाराष्ट्राचे हे मोठे भाग्य आहे कि कितीतरी मोठ मोठे संत महात्मे इथे होऊन गेले आणि त्यांनी ज्ञानेश्वरी,एकनाथी भागवत, गाथांसारखे ग्रंथ लिहून ठेवले. हे ग्रंथ उत्तम मार्गदर्शन करणारे आहेत. जीवनात

शांती, समाधान मिळवण्याचे सगळे उपाय संतांनी सांगून ठेवले आहेत. अनुभवाने सांगितले आहेत. लायब्ररीत जाऊन पुस्तक वाचली आणि त्याच्यावर आधारीत ग्रंथ लिहून दिला अस नाहीये. तुकाराम महाराजांच्या अभंगाच्या वहया इंद्रायणीत बुडवल्या त्या वेळेला १२/१३ दिवस तुकाराम महाराज अन्नपाणी न घेता तिथेच एका झाडाखाली बसून राहिले. त्यांना काय वाटत होत ? अभंग गेले आता माझी किर्ती कशी राहाणार अस त्यांना वाटल कि काय ? आपले अभंग गेले म्हणून ते बसले नाहीत. आपण अभंग केले अस ते समजतच नाहीत. ही त्या पांडुरंगाचीच वाणी आहे. सर्व इंद्रिय त्याची आहेत. सर्वांना प्रेरणा करणारी शक्ति ईश्वराची आहे. त्या पांडुरंगाच्या प्रेरणेने, त्याच्या शक्तिने झालेले अभंग गेले तर लोकांच काय होईल ही तळमळ मनामध्ये असल्या-मुळे देवानेच निर्माण केलेली वाणी राहिली पाहिजे या तळमळीने ते १२/१३ दिवस उपाशी राहिले. आणि मग पांडुरंगाच्या कृपेने त्यांना त्यांचे अभंग परत मिळाले. हे सगळ आपल्या बुध्दिला पटणार नाही. आमचा बुध्दिवाद म्हणजे "पटत नाही." प्राचीन ऋषिमुनी किंवा प्राचीन शास्त्रांचा अभ्यास करणारे केवळ अंधश्रध्दा ठेवणारे नाहीत. तेहि बुध्दिवादीच होते. पुष्कळ युक्तिवाद त्यांनी मांडला आहे. ईश्वर नाही म्हणणाराहि युक्तिवाद त्यांच्याकडे आहे ईश्वर आहे अस सिध्द करणारा युक्तिवादहि त्यांच्याकडे आहे. परंतु आधुनिक बुध्दिवादी आम्हाला हे पटत नाही हे एकच उत्तर देऊन मोकळे होतो. त्यामुळे हे सगळ अशक्य आहे अस वाटत आम्हाला. असंभवनीय अस वाटत. आमची बुध्दि इतकी संकुचित झाली आहे कि, चमत्कार म्हणून जे वाटतात ते "आम्हाला पटत नाही" एवढच उत्तर देऊन आम्ही मोकळे होतो. परंतु वाटेल तितका बुध्दिचा विकास होणं शक्य आहे हेच प्राचीन शास्त्रज्ञ सांगताहेत. प्राचीन शास्त्रज्ञांनासुध्दा बुध्दिवाद मान्य आहे. नुसत वेदशास्त्राचे अनुसरण करुन ते जातात अस नाहीये.

कालीदासांनी सांगितलय कि खरे जे बुध्दिवादी असतील त्यांना जगामध्ये अविषय कोणाचाच नाही. वाटेल त्या विषयामध्ये ते आपल्या बुध्दिने कार्य करु शकतात. हा बुध्दिवाद कालीदासांनी मांडलेला आहे. चाणक्यानेसुध्दा आपल्या बुध्दिने बुध्दिवादाचा चमत्कार दाखवलेला आहे. नऊ मोंगल राज्यांचा निःपात करुन चंद्रगुप्ताची स्थापना भारताच्या साम्राज्यावर त्याने केली. केवळ बुध्दिवाद आहे. पण बुध्दिवाद नको अस तो सांगत नाही. परंतु तो बुध्दिवाद म्हणजे भगवंतांनी गीतेत सांगितलेला आहे — तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्य अकार्य काय आहे याचा विचार करुन शास्त्राच अनुसरण करुन तुम्ही आपली बुध्दी

......

चालवा. शास्त्राचे संस्कार त्या बुध्दिवरती व्हावेत ही त्यांची इच्छा आहे. बुध्दिनेच सर्व कार्य व्हायचय ना ! व्यवहारातील कार्यालाहि बुध्दिच मुख्य आहे. बाकीची इंद्रिये अधिकारी आहेत. आधी बुध्दिने निश्चय केल्यानंतर कार्याला सुरवात होती आणि कार्य होत. परंतु ती बुध्दि मात्र शास्त्र संस्कारयुक्त असावी. बुध्दि कोणाचे कोणाचे दोष आहेत ते दूर करणं, त्याच्यात गुण मिळवून गुणयुक्त बुध्दि मिळवणं असा संस्कार शब्दाचा अर्थ आचार्य महाराजांनी केला आहे. अशी बुध्दि तयार झाल्यानंतर तुम्ही आपली बुध्दि वापरायला हरकत नाही.

आज "आमची बुध्दि चांगली आहे" ही आमची कल्पना आहे. पुष्कळ चुका होतात. नंतर चुका कबूल करतो आपण. मोठ मोठे नेते आधी चुका करुन नंतर जाहीरपणे सांगतात "हो झाल खर अस त्या वेळेला" काही काही मोठे नेते तर "आम्ही कधीच चुकत नाही" अस हि सांगतात. परंतु हा फाजील विश्वास आपल्या बुध्दिवर ठेवल्यावर चुका ह्या होणारच. म्हणून व्यवहार किंवा परमार्थ उत्तम रीत्या साधण्यासाठी बुध्दिच सहाय्य आवश्यक आहे हे प्राचीन शास्त्रज्ञानांहि मान्य आहे. परंतु ती आमची बुध्दि जशी आहे तीच बरोबर आहे असा जर अहंकार उत्पन्न झाला तर त्या बुध्दिने काहीही कार्य होऊ शकत नाही. व्यक्तिगतहि होणं शक्य नाही आणि सामाजिकहि कार्य होणे शक्य नाही. म्हणून ही परिस्थिती झाली आहे ना: आमच्या बुध्दिने झालेला निर्णय तोच बरोबर आहे मग अनेक पक्ष होण्याच कारण काय ? स्वराज्य मिळण्याच्या वेळी निरनिराळ्या पक्षांच ऐक्य पाहिजे होत ते तेवढया पुरत झाल, स्वराज्य मिळाल. परंतु स्वराज्य मिळाल्यानंतर अनेक पक्ष होण्याच कारण काय ? अनेक पक्ष याचा अर्थ आमचीच बुध्दि चांगली आहे आणि ती चांगलीच बुध्दि आहे. संस्कृतमध्ये एक म्हण आहे त्याचा अर्थ असा कि माझ्याकडून झालेल योग्यच आहे. माझच बरोबर आहे. असे जर बुध्दिमध्ये दोष असले आणि ते दोष आपल्याला आढळून आले व ते जर दूर झाले नाहीत तर अशा सदोष बुध्दिकडून कार्य होणं शक्य नाही. वैय्यक्तिक नाही, सामाजिक नाही एवढच काय पण राष्ट्रीय कार्यहि अशा बुध्दिने होणं शक्य नाही. म्हणून नेता कसा असावा, नेतृत्व कस असाव हे दाखवण्याकरता वाल्मिकींनी रामांच चरित्र पुढे ठेवल आहे. रामायण त्या करता आहे. नेत्यांनी ज्ञान मिळवण्यासाठी पुष्कळ वाचन केल पाहिजे. आंध्र प्रांतात आजहि संस्कृतचा अभ्यास केलेले मंत्री आहेत. ते बोलायला उभे

राहिले म्हणजे भाषणात मध्ये मध्ये शंकराचार्यांचे श्लोक सांगतात. आमच्याकडे नुसत रामायण आणि महाभारत आहे म्हणायच. त्याचा अभ्यास कोण करतय ? नेतृत्व मिळायला ह्या चांगल्या ग्रंथांचा अभ्यास व्हायला नको का ? कशी बुध्दि पाहिजे, कशी युक्ति पाहिजे. जितेंद्रियम् बुध्दिमतां वरिष्ठम् मारुतिरायांना म्हणतात. बुध्दिमतां वरिष्ठम् झाले कसे ? काय त्यांनी कसा अभ्यास केला असेल ? हे आम्ही पहातच नाही. संस्कृत भाषा तर अगदी मागेच पडलीये. स्वराज्य मिळाल्यानंतर हा मोठा लाभ झालाय आमचा. स्वराज्या पूर्वी इंग्रजांच्या राज्यात इंग्रजी प्रमाणे संस्कृत भाषा आवश्यक ठरली होती. तिचा अभ्यास चालू होता, थोडया प्रमाणात का होईना. प्राचीन दृष्टीने संस्कृतचा पुष्कळ अभ्यास आहे. शास्त्राचा अभ्यास आहे. वेदांचा अभ्यास आहे. तितक जरी नसल तरी वाड्.मय म्हणून का होईना थोंड फार संस्कृत राहिल होत. विद्यार्थ्यांची इच्छा असेल तर संस्कृत घ्या अस जर म्हटल म्हणजे विद्यार्थ्यांच्या इच्छेप्रमाणे अभ्यासक्रम ठरवायचा. अभ्यासक्रम ठरवणाऱ्यांची सुध्दा काही इच्छा पाहिजे कि नको.

तर ह्या अशा आपल्या बुध्दिमध्ये असणारे दोष आपल्याला समजले पाहिजेत. आपल्या स्वत:च्या बुध्दिने समजण शक्य नाही आणि दुसऱ्या कोणी दाखवले तर ते मान्य होत नाहीत. अहंकार वगैरे आड येतो. म्हणून शास्त्राचे संस्कार ज्या बुध्दि-वरती झालेले आहेत ती बुध्दि योग्य निर्णय घेऊ शकते. योग्य विचार करु शकते. वेदशास्त्र वगैरे जे वाड्.मय आहे ते ईश्वराने निर्माण केलेले आहे. ज्याला निर्माण होऊन ५,००० वर्षे झाली कि, १०,००० वर्षे झाली कि लाख वर्षे झाली हा निर्णय अद्यापि आधुनिक बुध्दिवाद्यांना करता येत नाहीये. काशीमध्ये वेद म्हणणारे आणि रामेश्वरमध्ये वेद म्हणणारे अद्यापि जशेच्या तसेच वेद म्हणतात. याच पाश्चात्यांना सुध्दा आश्चर्य वाटतय. ते जरी चंद्रलोकापर्यन्त गेले असले तरी ही ज्ञानाची परंपरा भारतवर्षामध्ये इतकी हजारो वर्षे राहिली कशी याचा त्यांना देखिल विस्मय वाटतोय. १०/१० हजार श्लोक कंठस्थ, पाठ करणारी मंडळी भारतामध्ये थोडे तरी आहेत. ऱ्हास होत चाललेला आहे. नुसत टेप रेकॉर्ड करुन ही विद्या काय राहाणारी आहे काय. जिवंत ज्ञान बाळगल पाहिजे. बुध्दिस्थ ही सगळी विद्या ठेवली पाहिजे. ही परंपरा कायम आहे आज भारतामध्ये. एक हजार वर्षापूर्वी सोमनाथ छिन्नविछिन्न झाला होता. आज एक हजार वर्षांनी त्याच मंत्रांनी प्राणप्रतिष्ठेच्या वेळी आवाहन करता आल. हजार वर्षानंतर या भारतामध्ये सोमनाथ पुन्हा आलेले आहेत. ईश्वराने निर्माण केलेल्या वेदविद्येचे संस्कार अद्यापि बुध्दिवरती थोडया फार प्रमाणात का होईना पण आहेत.

हे सर्व विचारात घेऊन ते संस्कार आपल्या बुध्दिवर करा आणि आपल्या ...

बुध्दिची सुधारणा करुन घ्या. आणि नंतर बुध्दिवाद वापरा तुम्ही. प्राचीन शास्त्रज्ञ तुम्ही बुध्दिवाद वापरु नका अस कधीही म्हणत नाहीत. त्यांना बुध्दिवाद मान्य नाही ही सगळ्या लोकांची गैरसमजूत आहे. बुध्दिवाद नंतर. आधी प्रमाण कोणत आहे, प्रमेय कोणत आहे ते समजून घ्या अस शास्त्र सांगत. संत महात्म्यांची त्या करता आवश्यकता आहे. शास्त्रावर किंवा संतांच्या शब्दावर विश्वास ठेवा एवढच ते सांगतात. आणि तो विश्वास ठेवून त्यांच्यापासून जर मार्गदर्शन झाल— आपल्या बुध्दिची सुधारणा कशी करायची, कोणचे त्याला उपाय आहेत, सुधारणा कितपत आहे, किती दोष आहेत, किती गुण आहेत, हे समजून येत, म्हणाले. आत्मनिरीक्षण करणारे – उध्दरे आत्मानात्मनं जरी भगवंतांनी सांगितल असल तरी तसे – अधिकारी फार थोडे असतात. आपला आपण उध्दार करुन घेण अशक्य आहे. म्हणून संत महात्म्यांच्या शब्दावर विश्वास ठेवा. शास्त्रावर विश्वास ठेवा. आणि त्या शास्त्राच्या व्दाराने स्वत:च्या बुध्दिची सुधारणा करुन घ्या. नंतर ती बुध्दि उत्तम प्रकारे कार्य करु शकते. तशा प्रकारे आपल्या बुध्दिचा विकास होण्याकरता गायत्री मंत्राचा फार मोठा उपयोग आहे. साक्षात् ईश्वराची ही उपासना आहे. ही उपासना घडण्या करता भारतवर्षामध्ये उपनयन संस्कार सांगितला आहे. सर्वांच्या बुध्दिला प्रेरणा करणारी अशी कोणी तरी एक शक्ति आहे याची बालपणापासून त्यामुळे जाणीव होते.

गायत्रीचे अनुष्ठान दीर्घ काल चालणारे असते. ह्या कालात प्रकृति बिघडू नये म्हणून आहार विहारावर नियंत्रण असावे लागते. आहाराची शुचिता ही बुध्दिवर चांगले संस्कार करण्याच्या दृष्टीने फार महत्वाची आणि आवश्यक आहे. आहार शुचितेची जबाबदारी स्त्रियांवर टाकलेली आहे म्हणजे पुरुषांवर नाही असा त्याचा अर्थ नाही. मनु म्हणतो जमाखर्च हा स्त्रियांनी ठेवावा. त्या गृहिणीला किती पैसे जमा होतात आणि किती खर्च होतात हे समजले पाहिजे. त्यानंतर शुचिता, पवित्रपणे राहाणे. आपणच पवित्र राहिले म्हणजे घरचे सगळे वातावरणच पवित्र राहाते. मन किंवा बुध्दि ही अन्नापासून तयार होत असते. प्रत्येकाच मन हे पोटात गेलेल्या अन्नाच्या सात्त्विक अंशापासून तयार होत असत. त्या करता अन्न पवित्र पाहिजे. नैवेद्य दाखवून ते पवित्र करुन मग ते सेवन करावे. अस मुद्दाम सांगितलेले आहे. ज्यांना आपल मन तयार करायचय त्यांना त्याची जरुरी आहे. आपलेपणाने, प्रेमाने, शुचितेने बनवलेले अन्न मुले, पति, आप्तेष्ट इ. ना. खायला मिळाल तर त्याच मन चांगल बनत आहे. म्हणजेच राष्ट्रातील

मुल, तरूण इतर पुरुष मंडळींची मन तयार करण्याचे काम स्त्रियांच्यावर सोपवलेल आहे. घरात भांडीकुंडी किती आहेत, सोनेनाणे, कपडालत्ता किती आहे अशा सगळया गोष्टींकडे लक्ष द्यायची जबाबदारी स्त्रियांची आहे. अशा रीतीने हे सगळे स्त्रीधर्म शास्त्रकारांनी सांगितले आहेत. पण हे सगळे चुकीचे आहेत अस आम्ही आमच्या बुध्दीने आता सांगतो. पण शास्त्राने अस का सांगितलय, त्याचा अभिप्राय काय आहे, त्या मागची भूमिका काय आहे, उद्देश काय आहे या सगळया गोष्टी जर समजून घेतल्या, बुध्दिला पटल्या व त्याप्रमाणे वर्तन झाले तर किती तरी कल्याण होण्यासारखे आहे. परस्परांचा भेद वगैरे काही निर्माण होणार नाही. हा भेद निर्माण केलेला आहे. भारत राष्ट्र हे परतंत्रच राहिल पाहिजे अस त्यांना वाटल्यामुळे त्यांनी हा सगळा बुध्दिभेद निर्माण केला. इंग्रजांनी स्त्री पुरूषांपासून अनेक प्रकारचे भेद निर्माण केले. ते अजूनहि कायम आहेत.

तर आपण आपल शास्त्र काय आहे हे सगळ समजून घेऊन आपली बुध्दि चांगली तयार करायची आहे.

दुष्यन्त राजा कण्व ऋषिंच्या आश्रमात गेला. कण्व ऋषी कुठे बाहेर गेले होते. शकुंतला तिथे होती. शकुंतलेला पाहिल्याबरोबर त्याला मोह उत्पन्न झाला. त्याला वाटल ही तर ऋषिंची कन्या दिसते आणि माझ मन हिच्यावर गेल हे बरोबर नाही. शेवटी त्याने असा विचार केला कि ज्याअर्थी माझ्यासारख्या आर्याचे मन हिच्यावर गेल त्याअर्थी ती ऋषिंची ब्राहमण कन्या नसून क्षत्रिय कन्या असली पाहिजे. त्याप्रमाणे त्याने तिला विचारल्यावर शकुंतला म्हणाली हो, मी क्षत्रिय कन्या आहे. म्हणजे मनाने निर्णय करता येतो पण ते मन आर्य बनल पाहिजे. संस्कृत बनल पाहिजे. दोष सगळे निघून गेले पाहिजेत. तर त्या बुध्दिने केलेला निर्णय बरोबर ठरतो.

तर अशा रीतीने बुध्दि वापरण्याकरता ती बुध्दि चांगली बनवावी. बुध्दिचा विकास करून घ्यावा म्हणजे काहीही अशक्य नाही. दुरितक्षय झाला पाहिजे, बुध्दितले सगळे दोष निघून गेले पाहिजेत. स्वधर्माचरण घडल पाहिजे. ज्ञानेश्वर महाराज त्याच फल सांगतात —

"जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात" तर हा आपल्या बुध्दिचा विकास भारताला अत्यंत आवश्यक आहे. भौतिक विकास चाललेला आहे. भौतिक विकासापेक्षा बौध्दिक विकासाला, राखण्यासाठी संबंध राज्य सोडून पांडव वनात निघून गेलेले

L जास्ती महत्व आहे बुध्दि चांगली

आहेत. द्यूत आपण खेळलो हे चुकल आपल अस त्यांनी कबूल केलेले आहे. भगवंतांनी- सुध्दा अर्जुनाला मी सांगतो म्हणून ऐक अस कधी म्हटल नाही. शास्त्र प्रमाण आहे. त्या शास्त्राप्रमाणे काय तो विचार कर आणि निर्णय घे, म्हणाले. सत्संगती म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानेश्वर महाराज, एकनाथ महाराजांची संगती मिळण्याच काही आपल्या भाग्यात नाहीये. आणि ते जर आज असते तर त्यांना कोणी विचारल असत कि नाही, कोणाला ठाऊक! ज्ञानेश्वर एक झाले कि दोन झाले अशा प्रकारचे वादविवाद आमच्या बुध्दिने निर्माण होतात. परंतु त्यांच्या ग्रंथांची संगती म्हणजे त्यांचीच वैचारिक संगती आहे. त्यांचा अभिप्राय मांडणारे भगवद्‌भक्त आजहि या जगामध्ये आहेत. आज भारत वर्षामध्ये त्यागी अभ्यास करुन त्या प्रमाणे वागणारी मंडळी आहेत. पण आमची बुध्दि शुध्द झाली पाहिजे अस आम्हाला वाटल पाहिजे ना! जिज्ञासा निर्माण झाली पाहिजे. ही जिज्ञासाच संपली आहे भारत राष्ट्राची. एकदा अनुकूल परिस्थिती निर्माण झाली कि बाकीचा अभ्यास नाही, विचार नाही, काही नाही. चार्वाकवादाप्रमाणे पुण्य नाही, पाप नाही, ईश्वर नाही, काही नाही. म्हणून वाटेल ते मी वाटेल त्या वेळेला व वाटेल तितक खाणार अस म्हणून चालेल का? नास्तिक जरी असला तरी त्याने शरीर प्रकृति चांगली राहाण्याकरता नियमाने रहायला पाहिजे कि नको?

योग्य आहार विहार असावा असच शास्त्र सांगतय. शास्त्र हितैषी आहे. हिताचेच सांगतय. हित निराळ आणि प्रिय आहे आणि नुसत प्रिय तेच करुन भागत नाही. हित हे त्याच्या पेक्षा वेगळ आहे. हित सांगणारी मंडळी फार थोडी भेटताहेत. ती जाणीव पाहिजे, जिज्ञासा पाहिजे. त्यांना आपल हित कशात आहे हे विचारल पाहिजे. नास्तिकालासुध्दा फक्त प्रियाचाच विचार करुन चालणार नाही.

हा सगळा विचार शास्त्राने मांडलेला आहे. संत महात्म्यांचे हेच सांगणं आहे. आपल्या भारतवर्षामध्ये बौध्दिक विकास अधिकाधिक होत जावा अशी त्यांची प्रार्थना आहे. तो बौध्दिक विकास ज्ञानेश्वर महाराजांनी प[illegible] मांडलेला आहे. त्याप्रमाणे ईश्वराच्या कृपेने ज्ञानेश्वर महाराजांच्य[illegible] भारत वर्षामध्ये तो बौध्दिक विकास होत आला आहे. त्याप्रमाणे [illegible] योगे वय घालवावे" या समर्थाच्या उक्तीप्रमाणे सर्वांचा बौध्दिक जास्त होऊन या गायत्री यज्ञासारखी पुण्य कर्म घडावीत अशी ज्ञा[illegible] महाराजांच्या चरणी प्रार्थना करुन ही वाङ्‌मय सेवा संपवतो.

अवधूत चिंतन
श्री गुरुदेव दत्त मुलुंड २८/११/८६

मन किंवा बुध्दि ज्याला म्हणतात. अंत:करण तत्व ज्याला म्हणतात ते आहे. बाहय साधने आणि अंत:करण म्हणजे आतले साधन आहे. बाहय विषयांचे ज्ञान करून देणारी इंद्रिय, बहिईंद्रिय ज्याला म्हणतात. बाहेरचे विषय आहेत. डोळ्याने दिसतात पदार्थ. कानाने शब्द ऐकू येतात. रसनेंद्रियाने बाहेरच्याच विषयांचा रस समजतो. घ्राणेंद्रिय आहे. त्याच्या सहाय्याने गंधाचे ज्ञान होते. आणि त्वगिंद्रिय जे आहे ते सर्वात मोठे इंद्रिय आहे, शरीरव्यापी. त्याने स्पर्शाचे ज्ञान होते.

तर हे सगळे विषय समजून देणारी ज्ञान करून देणारी इंद्रिय ही बहिरइंद्रिय आहेत. बाहेरच त्यांचे विषय असतात. मन आणखी बुध्दि ही दोन तत्व वेगळी वेगळी नाही. एक अंत:करण तत्व म्हणून जे आहे त्यालाच मन असहि म्हणतात, बुध्दि असाहि म्हणतात, वेगळ्या वेगळ्या अवस्थेमध्ये. संशयास्पद स्थितीमध्ये शास्त्रकार त्याला मन असे म्हणतात. निश्चय झाला म्हणजे ते कार्य बुध्दिच आहे अस समजतात. बुध्दि तत्व आहे. निश्चय झाल्या नंतरच कोणचहि कार्य घडत आपल्या हातून.

हया आंत राहाणाऱ्या सर्वहि पदार्थांना मिळून सूक्ष्म शरीर अस नांव आहे. हात, पाय, डोळे वगैरे जरी बाहेरून दिसत असले तरी ती इंद्रिय नाहीयेत. म्हणजे हा पदार्थ अतींद्रिय आहे. इंद्रियांनी दिसणारा नाहीये. समजणारा नाहीये. स्थूल देह इंद्रियांनी समजतो. ध्वनीचे ज्ञान करून देणारे जे इंद्रिय आहे त्याला श्रोत्रेंद्रिय असे म्हणतात. पण शब्दज्ञान करून देणारे इंद्रिय दिसत नाहीये, हे बाहेरचे कान आपण पहातो ते बहिऱ्यांनासुध्दा असतात. पण त्यांना शब्दाच ज्ञान होत नाही. म्हणून शब्दज्ञान करून देणारे इंद्रिय वेगळ आहे. ते त्याला नाहीये, अस मानाव लागत. डोळ्यांनी डोळ्यापुढे आलेले सर्व पदार्थ समजतात. पण डोळे हे जे इंद्रिय आहे ते स्वत: समजून घेत नाही. दुसऱ्याचे डोळे आपण पहातो म्हणजे डोळ्यांची जागा आपण पहातो. पण मूर्त पदार्थ समजून देणारे इंद्रिय हे तिथे दिसत नाही. पहाण्याच स्थान ते आहे.

तर अशी सूक्ष्म तत्व शरीरामध्ये किती तरी आहेत. दिसली नाहीत तरी त्यांच्या कार्यावरून त्यांच अस्तित्व आपल्याला मान्य कराव लागत. पुढे येणारा पदार्थ समजतो आणि त्याप्रमाणे आपण वागतो यावरून डोळे हे इंद्रिय आहे आम्हाला दिसला नाही पदार्थ म्हणजे नाही. त्याच अस्तित्व किंवा नास्तित्व त्याच्या कार्याप्रमाणे मानतो. अनुमान प्रमाण त्याला म्हणतात. तर ही न दिसणारी सगळी तत्व शरीरामध्ये आहेत. आत्म्याबरोबरच ती आलेली आहेत आणि ज्या देहामध्ये तो आत्मा जातो आहे त्या त्या देहामध्ये सूक्ष्म शरीराच्यारूपाने ती ... आहेत. स्थूल शरीराला कालमर्यादा आहे — ज्याला आपण आयुष्य समजतो. त्या कालमार्यादा संपली म्हणजे ते स्थूल शरीर इथच पंचतत्वांमध्ये विलीन होत आणि सूक्ष्म शरीर दुसऱ्या देहामध्ये जात. जीवात्मा, हाहि त्याच्याबरोबर आहे.

हा जो विभाग सांगितला वेदान्त शास्त्राच्या दृष्टीने – शरीरात राहाणा... जीवात्मा म्हणजे कोण आहे ? हा एक विचार उपनिषदांमध्ये केलेला आहे. वेदान्त शास्त्र म्हणजे आत्मा किंवा अनात्मा या पदार्थांचा विचार करणारे शास्त्र. वेदाचा अंत म्हणजे शेवटचा असा अर्थ नव्हे. अंत भाग म्हणजे निश्चयात्मक भाग. वेदामध्ये सांगितलेल्या पदार्थांचा निश्चय ज्याच्यामध्ये केलेला आहे असा भाग म्हणजे

उपनिषद् भाग. सगळया उपनिषदांना वेदान्त म्हणतात.

त्या वेदान्तामध्ये हा जीवात्मा कसा आहे हे सांगितले आहे, आणि तोच सिध्दांत पहिल्या "दिगंबरा" शब्दाने महाराजांनी दाखावला आहे.

दिग्भिरवेष्टितमम्बरमेव प्रत्यग्ब्रह्मेति ।
खंब्रह्मेति श्रुतिरपि वदति दिगंबराचेति ।।

ब्रह्मतत्व ज्याला म्हणतात अथवा ईश्वरतत्व ज्याला संकल्पाने सर्व जग निर्माण झालेल आहे. इतकी त्याची शक्ति आहे. एक तत्व असताना आपण बहुरूप व्हाव असा नुसता संकल्प होताच पृथ्वि, आप, तेज, वायू आणि आकाश ही पंचमहाभूते निर्माण झाली. त्यांच्यापासून इतर सगळे भौतिक पदार्थ निर्माण झाले. शरीरे काय, वृक्ष काय, सगळच तयार झाल. तर ही ज्याची संकल्प शक्ति आहे तो मुख्य परमात्मा, ईश्वर, भगवान, सगळी नांव त्याचीच आहेत, तोच जीवात्मा बनलेला आहे. सर्व रूपी तोच झालेला आहे हा मुख्य सिध्दान्त आहे. पण ती ज्ञानदृष्टी उत्पन्न झाली पाहिजे, त्याकरता प्रयत्न करायला पाहिजेत. ते प्रयत्न म्हणजे काही चारपांच वर्ष महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेण्यासारखो नाही. अनेक जन्म अभ्यास करून ती आपली बुध्दि तशी तयार केलेली असते. "मी कोण आहे ?" हे आपल्याला कळत नाही. देहाला आपण "मी" म्हणतो. इंद्रियांना, मनाला सगळयांनाच आपण मी म्हणतो. सगळी कार्य करणारा मी आहे. म्हणजे सर्व ठिकाणी मी असा शब्द आपण वापरतो. तो खरा मी नाहीये.

जीवाच स्वरूप आणि ईश्वराच स्वरूप अगोदर वेगळ वेगळ दाखावतनत, महाराज. आणि दोन्हीही एक कसे आहेत हे शेवटी सांगतात. तर हया जीवात्म्याला देहापासून "मी" म्हणायला सुरवात झाली. जीव आणि देह एकरूप होऊन गेलेले आहेत. मी उंच आहे मी काळा गोरा आहे, मी चालतो, मी ऐकतो, म्हणजे सर्व ठिकाणी "मी" भरून राहिलेला आहे. त्याच्याशी तादात्म्य पावलेला आहे. तो खरा "मी" कोणचा आहे/प्रथम सांगितल आहे—

दिग्भिरवेष्टितमम्बरमेव

प्रत्यग् ब्रह्म त्याला म्हणतात. सर्वांच्या आत आहे. म्हणजे हया देहाच्या आत सूक्ष्म शरीर जे सांगितल आहे, हया सूक्ष्म शरीरामध्ये पांच कोष म्हणून विभाग केले आहेत. जीवात्म्याचे शरीर झाकणारे म्हणून त्यांना कोष म्हणतात. तलवार म्यानामध्ये ठेवली कि कोष म्हणतात त्याला. तलवार झाकली गेलेली आहे. तसा जीवात्मा आच्छादित झालेला आहे.

पहिल आच्छादन म्हणजे अन्नमय कोष, ज्याला आपण देह समजतो. अन्नाने वाढणारा, अन्नामध्येच विलिन होणारा, इथे अन्न म्हणजे पृथ्वि असा अर्थ घेतलाय त्यांनी. तर हा पहिला कोष म्हणजे जीवात्म्याच शरीर ज्यान झाकून टाकल. आपणच पुढे येतो. माझ नांव म्हणजे माझ्या शरीराच नांव आपण समजतो. सर्व क्रिया शरीराकडून होतात म्हणजे मीच करतो असे समजतो आपण. ते बाहेरचे आच्छादन दूर झाले पाहिजे. अम्बरम् म्हणजे आकाशाप्रमाणे वेष्टित अस ईश्वर तत्व आहे. त्याला हे जे दृष्य पदार्थ समजून येणारे, मूर्त पदार्थ आहेत — हे शरीर आहे त्याच्या आतमध्ये प्राणवायू आहे, त्याच्या नंतर मन आहे, त्याच्या नंतर बुध्दि आहे. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय—

/ हे

कोष म्हणून आहे — बुध्दि आणि आनंदमय कोष म्हणून आहे. ज्ञानमय कोष म्हणून एक ईश्वराची शक्ति आहे. हया सगळयाहि दृष्य किंवा मूर्त पदार्थांनी तो झाकून गेलेला आहे.

ते जे प्रत्यग् म्हणजे आत असलेले ब्रह्मतत्व आहे ते जीवात्म्याचे खार स्वरूप आहे. तो आनंदरूप आहे, निर्विकार आहे. खरा "अहम्" समजून येत नाही आपल्याला. सर्व कार्य करणारा मी आहे. सुखी होणारा, दुःखी होणारा, कामक्रोधादिक विकार ज्याला उत्पन्न होतात, जातात अस चाललेल आहे सारखा. पण या सगळया विकारांमध्ये सांपडलेला जीवात्मा "अहम्" हा खरा नाहीये. विचार करून सत्पुरूषांच्या संगतीमध्ये राहून हे वारंवार ऐकून, त्यांच्याकडून योग्यरीतीने समजून आलेल असताना या जीवाच्या स्वरूपापर्यन्त आपण बुध्दिच्याव्दाराने जातो. हे सगळ जे आहे ते बाजूला होत, आणि प्रत्यगात्मा म्हणजे अंतरात्मा, आपल्याला, कोण ते समजत. देह हा एक आत्मा आहे. इंद्रिया हा एक आत्मा आहे. मन एक आत्मा आहे. सगळयालाच आत्मा समजतो आपण. मग खरा आत्मा कोण आहे ?

ते जे प्रत्यग्ब्रह्म म्हणजे साक्षी निर्विकार, स्वयंप्रकाशी, आनंदरूप जे आहे ते खार जीवाच रूप आहे. खरा मी म्हणजे असा आहे. पण तिथ पर्यंत बुध्दि जायलाच किती तरी काल जातो आहे. तो अहम् शुध्द सांपडला त्या स्वरूपाच अनुसंधान निरन्तर कराव म्हणून सांगतात. / वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी काही स्तोत्र केलेली आहेत. त्या स्तोत्रामध्ये हाच विषय मांडलेला आहे. आत्मानात्म विचार म्हणून. स्वरूपानुसंधान हे सारखा चालू पाहिजे.

मी निर्विकार आहे. मी सुखादुःखादि द्वंद्वातीत आहे. मी आनंद स्वरूप आहे. हया स्वरूपाच अखंड अनुसंधान झाल तर संसार बाजूलाच राहातो. त्याच्यामध्ये काही कमी जास्तीपणा झाला तरी याला त्याच सुख दुःख काही नाही. तो व्दंव्दातीत आहे. म्हणून ते आपल जे आत्म स्वरुप आहे त्याच अखंड अनुसंधान झाल पाहिजे. तर ते

स्वरूपानुसंधान। व्हाया कीजे मनःशोधन ।
देवगुरु सेवन। सदाचरण अनासक्ते ॥

ही त्याची साधना आहे. शुध्द आत्मस्वरूपाच ज्ञान होण आणि मनाने त्याचे अखंड अनुसंधान घडण हयाच्या करता पुष्कळ चित्त शुध्द झाल पाहिजे. आपली बुध्दि शुध्द झाली पाहिजे. बुध्दिमध्ये असणारे कामक्रोधादि सगळे दोष निघून गेले पाहिजेत. रजोगुण तमोगुण सगळे बुध्दितले जाऊन शुध्द सत्वगुणात्मक बुध्दि ज्या वेळेला होईल त्या वेळेला ते आत्मस्वरूप त्या बुध्दिला सांपडत. त्याच अनुसंधान मग अखंड करतात. त्या करता देवांची गुरूंची, संतांची सेवा, सत्कर्माचे आचरण हे सारखा चालू ठेवल पाहिजे. म्हणजे आत्मस्वरूपाच चिंतन होत. ते आत्मस्वरूप म्हणजे खार जीवात्मा तो आहे, प्रत्यग् ब्रह्म आहे, निर्विकार आहे.

आणखी ईश्वरतत्व. खांब्रह्मेति श्रुतिरपि वदति दिगंबराचेति सर्व व्यापक अस ईश्वर तत्व आहे. तो सर्व स्वरूपी आहे. आणि हया देहामध्ये राहाणारा जीवात्मा — सर्वहि इंद्रिय, मन, बुध्दि, प्राण या सर्वांची कार्य पहाणारा — फक्त पहाणारा आहे. त्याचा त्यांच्या कार्याशी कोणताहि संबंध नाही. ही वस्तुस्थिती या पहिल्या श्लोकात सांगितली आहे. हे दोघेहि एक आहेत, अस ~~सांगतात~~ सांगतायत

/ सद्गुरु

दिगवत् चाम्बरमेव व्यापक पूर्णब्रह्मेमेति ।
सच्चित्सुखाधनमायातीतं दिगंबरा वदंति ।।

दुसऱ्या "दिगंबरा" ह्या संबोधनात दोघेहि एक होऊन गेलेत. जीवात्म्याचे अनुसंधान, मी कोण आहे ? हे समजून घ्यायच. त्याच अखंड अनुसंधान ठेवायच. बाकी विसरुन जायच सगळ. ह्या करता त्याच अनुसंधान आहे. त्या नंतर ईश्वर-स्वरूप काय आहे ?, आकाशाप्रमाणे सर्वव्यापी ईश्वर स्वरूप आहे आणि दोघेहि परिपूर्ण आहेत.

जो सत्य आहे परिपूर्ण आत्मा ।

या गुरुस्तुतित तेच सांगितले आहे. परिपूर्ण आत्मस्वरूप (म्हणजे जीव) नाही आणि ईश्वरस्वरूपहि नाही. सच्चिदानंदघन अस जे आनंद स्वरूप, अद्वितीय अशा प्रकारच जे आहे तेच प्रत्यग ब्रह्म आहे आणि त्या रूपाने अनुसंधान करण्या-करता "दिगंबरा" ह्या दुसऱ्या शब्दाने सांगितले आहे.

त्यानंतर "श्रीपादवल्लभ" हे संबोधन आहे. आणि चौथा शब्द परत "दिगंबरा" आहे. त्याचहि विवेचन केले आहे.

श्रीपादवल्लभ नाम प्राप हि नक्रगजेंद्रमिव ।
द्रौपदीवरीचोर ग्रासित द्विजमेव ।।

श्रीपादवल्लभ या नामामध्ये इतक स्मरण झाल महाराजांना. श्रीपाद हा दत्तात्रेयांनी घेतलेला अवतार आहे. गुरुचरित्रामध्ये त्या अवताराची कथा आलेली आहे. आरंभाला ज्ञान भूमिकेवरुन विचार झाला आहे. तत्वविचार करताना देह इंद्रिय, मन, प्राण वगैरे सगळ बाजुला ठेवले. आणि त्याचा साक्षी- ज्याच्या अस्तित्वामुळे या सगळ्यांना कार्य करता येत तो अंतरात्मा म्हणजे जीवाच स्वरूप आहे. तो निर्विकार, साक्षी आहे. ईश्वराच स्वरूप सर्व व्यापी आहे. सर्व विश्वरूपी, विराट्रूपी तो आहे. आणि हे दोघेहि एक आहेत. हे दुसऱ्या श्लोका-मध्ये सांगितले आहे. ज्ञान किंवा तत्व दृष्टीने या दोघांचे स्वरूप सांगून त्यांचे ऐक्य सांगितले आहे.

आता श्रीपादवल्लभ हा अवतार झाला. श्रीपादवल्लभ हे नांव जे प्राप्त झाल आहे हे भक्तांच कल्याण कस केल त्यांनी त्या वरुन प्राप्त झालय. अवतार हा निर्मोह आहे. त्याला काही मोह नाही. पण जीवात्म्याला मोह उत्पन्न झालेला आहे. मी शरीर आहे. मी दुःखी आहे. मी मोठा आहे, श्रीमंत आहे, गरीब आहे वगैरे. हे सगळे भ्रम झालेले आहेत. ईश्वर हा सर्व व्यापी सर्व स्वरूपी आणि निर्मोह आहे. भक्तिमार्गाच्या योगाने त्या ईश्वरस्वरूपाची कृपा झाली म्हणजे हे सगळ ज्ञान होत. देहादिकापासून ते मन बाजुला होता होता आत्मस्वरूपाच्या ठिकाणी जाऊन पोहोचत आणि त्याच अनुसंधान होऊ लागत. ईश्वरकृपेन विचारानी ईश्वरस्वरूपाच ज्ञान होत आहे. आणि त्याच्या संबंधी अंतःकरणामध्ये भक्ति आणि प्रेम निर्माण होत. ज्ञानदृष्टी आणि प्रेमदृष्टी या भक्तिच्या भूमिकेवरुन हा विचार चाललेला आहे.

श्रीपादवल्लभांच म्हणजे ईश्वराच स्मरण झाल्यानंतर नक्र आणि

गजेंद्राची प्रथम आठवण येते. मगराने त्या गजेंद्राला धरल्याची कथा सर्वांना माहीत आहे. मगर जेव्हां त्याला आंत ओढून नेऊ लागला तेंव्हा त्याला ईश्वराच स्मरण झाल, त्याचे ईश्वराची प्रार्थना केली. भगवान् श्रीहरि गरुडावर बसून आले. आणि त्यांनी त्या गजेंद्राला मुक्त केले. संकटात सापडल्यावर एका ईश्वराशिवाय दुसरा कोणीही आपला त्राता नाही या भावनेने त्याला शरण गेलेला गजेंद्र, त्याच रक्षण केल.

आता दुसरी कथा सांगतात, द्रौपदि, अंबरिष आणि चोरांच्या तावडीत सांपडलेला ब्राह्मण. द्रौपदि आणि अंबरिष यांचहि संरक्षण केल भगवंतांनी. श्रीकृष्णांनी द्रौपदिच रक्षण केल. अंबरिषाच रक्षण महाविष्णुंनी केल तरी ते एकच रूप आहे. तेहि संकटात सांपडलेले होते. द्रौपदीच्या वर मोठ संकट आलेल आहे. भर सभेमध्ये तिची विटंबना व्हावी म्हणून सर्व कौरव प्रयत्न करताहेत. कोणीही तिचा त्राता नाही. सर्व पांडव तिचे पतिसुध्दा स्वस्थ बसलेले आहेत. अशा वेळेला अनन्य अंत:करण तिच झालेल आहे. अन्य जे आहे ते बाजूला करुन त्या ईश्वरस्वरूपाच्या ठिकाणी जर अंत:करण जडल तर ईश्वराच दर्शन होत, कृपा होते. तत्वज्ञानामध्येहि अनन्य व्हायला पाहिजे. म्हणून पंचकोष बाजूला करून शुध्द आत्मस्वरूपाच्या पर्यंत अंत:करण पोहोचल पाहिजे. ईश्वरस्वरूप समजून घेण आणि त्याच चिंतन फक्त आनंद म्हणून करण. ही ज्ञान भूमिका आहे. त्याच्यातहि भक्तिची आवश्यकता आहे.

ईश्वराच्या स्वरूपासंबंधी विचार चालू असताना श्रीपादवल्लभ हे भक्तवत्सल कसे आहेत हे समजून देण्याकरता गजेंद्राला मगरापासून मुक्त केल भगवंतांनी, त्याची कथा सांगितली. त्याच स्मरण केल. द्रौपदीचहि संरक्षण भगवंतांनी केल आहे. तिला वस्त्र दिली. हेहि आर्त भक्ताच लक्षण आहे. अंबरिष राजा असाच संकटामध्ये सांपडला. दुर्वास ऋषि शाप द्यायला लागले. महाविष्णु येऊन, "मला शाप द्या" म्हणाले. "तुमचा शाप भोगायच सामर्थ्य, अंबरिषाच नाही. त्याच्याकरता तुमचा शाप मी भोगतो." अनेक जन्म घ्यावे लागतील तुला. अस ते अंबरिषाला म्हणाले. महाविष्णु म्हणाले, मी घेतो त्याच्याकरता जन्म.

वस्तुत: जन्माला कारण म्हणजे कर्म आहे. पापपुण्य जे काय घडल असेल त्या प्रमाणे जन्म येतो म्हणजे नविन शरीराशी जीवात्म्याचा संबंध होतो. जुन शरीर पडण म्हणजे मृत्यु आणि / . शरीराशी जीवात्म्याचा संबंध म्हणजे जन्म आहे. हे / शरीर कोणाच मिळेल याचा काही नियम नाही. जशी कर्म असतील त्याप्रमाणे ते प्राप्त होत. जास्तीत जास्त पाप असेल तर वृक्ष योनित जन्म येतो. म्हणजे वृक्षामध्ये जीव आहे हे आपल्या शास्त्रकारांनी पूर्वीच सांगितल आहे. पुण्यकर्म असेल तर मनुष्यादिकांची शरीरे मिळतात. तर वस्तुत: ईश्वराला पापपुण्याचा काही संबंधच नाही. निर्मोह आहे. सगळ कार्य त्याच चालल आहे. आणि त्याचा त्याला अहंकार नाही. सत्कर्म जरी झाली तरी त्या कर्माचा जर अहंकार उत्पन्न झाला तर त्या संपूर्ण कर्माच फळ मिळत नाही. कर्म ईश्वरार्पण करण म्हणजे कर्तृत्व ईश्वराच आहे ही भावना जर ते कर्म करताना असेल तर ते कर्म अत्यंत शुध्द होत.

ईश्वराला त्याच काहीच नाही. संपूर्ण विश्व उत्पन्न करण, त्याच संरक्षण करण आणि पुन्हा संहार करण ही केवढी मोठी कार्य आहेत. विश्व असतानासुध्दा संकटात सांपडलेल्या अनेक जीवांना मुक्त करण, जिज्ञासू जीवांना मार्गदर्शन करण. जास्तीत जास्त जीव अर्थार्थीच असतात. मला हे पाहिजे, ते पाहिजे. त्यांच्याही इच्छा

/ नविन

पूर्ण करण्याची शक्ति ईश्वराचीच आहे. तर असे सगळेहि भक्त जे आहेत त्यांच्या योग्यतेप्रमाणे, अधिकाराप्रमाणे त्यांचं कार्य करण हे सगळ ईश्वराच सामर्थ्य आहे. पण त्याच्याबद्दल कर्तृत्वाभिमान नाहीये. वस्तुत: ईश्वराच्या शक्तिने कार्य होत असतानासुध्दा अहंकार नसण ही एक मोठी शक्ति आहे.

ज्ञानेश्वर भिंतीवर बसलेले असताना चांगदेव वाघावर बसून आले, आपली योगशक्ति दाखवण्या करता. ह्यांना नुसती इच्छा झाली, आपणहि चांगदेवांना सामोरे जाऊ या. ही इच्छा होण्याबरोबर ती दगड मातीची भिंतसुध्दा क्रियाशील झाली. ही शक्ति ज्ञानेश्वर महाराजांच्या जवळ आहे. अचेतन भिंतसुध्दा क्रियाशील झाली. चालू लागली. मग वाघ तर चेतन आहे. चेतनावर ताबा मिळवण हे काही फारस अशक्य नाही. पण अल्पशक्ति असताना तो अभिमान चांगदेवांना उत्पन्न झाला आणि इथे ज्ञानेश्वरांकडे पूर्णशक्ति असल्यामुळे अत्यंत अभिमान करण्यासारखी गोष्ट असताना अभिमान नाहीये. आपली शक्ति ही विसरून जाण हे फार मोठ सामर्थ्य आहे. केवळ खऱ्या ज्ञानी पुरुषाला किंवा भक्तालाच हे शक्य आहे. तशी ईश्वराची स्थिती आहे.

तसे ईश्वराचे विश्वाच पालन करणे म्हणजे प्रत्येकाला आपापल्या कर्माच फळ देण. ईश्वराला पाप-पुण्य नसल्यामुळे जन्म येणच शक्य नाही. पण भक्तांकरता त्याने जन्म घेतले आहेत. तिसरी कथा श्रीपादवल्लभांच्या एका व्यापारी भक्ताची आहे. तो कुरवपुरवजवळच्या एका गांवात व्यापार करीत होता. त्याने एक नवस केला. त्याप्रमाणे व्यापारात त्याला फायदा झाल्यावर तो नवस फेडण्यासाठी तो कुरवपूरला यायला निघाला. काही चोरांना हे समजल्यावर तेहि त्याच्याबरोबर यायला निघाले. आम्हीही यात्रेला येतो म्हणाले. वाटेत एका निर्जन अरण्यात त्याला मारल आणि त्याची संपत्ती घेतली. ईश्वर दिसत नाही, म्हणजे नाहीच, अशी त्यांची कल्पना. नास्तिकवाद! पण हा जो ब्राह्मण आहे हा ईश्वराला मानणारा होता. म्हणून द्रव्य जरी मिळाल तरी आपण कबूल केलेल आहे देवाजवळ जाऊन अन्न संतर्पण करायच. त्यामुळे त्या द्रव्याबद्दल त्याच्या मनामध्ये मोह निर्माण झाला नाही. हे देवाला द्यायच. तो आस्तिक होता. त्यामुळे श्रीपादवल्लभ तिथे आले त्यांनी त्या सर्व चोरांना मारल. एक चोर शरण आला. त्या ब्राह्मणाला जिवंत केल. त्याने केलेला नवस त्याच जन्मात पूर्ण करून घेतला देवाने. ही ईश्वराची कृपा आहे. त्याला जरी चोरांनी मारल तरी त्याला जिवंत करून त्याच्याकडून त्याचा अन्न संतर्पणाचा संकल्प पूर्ण करून घेतला. ईश्वराला सांगून संकल्प केल्याच हे फळ त्याला मिळाल. त्या चोरावर जशी कृपा केली तशी आमच्यावर कृपा करा अशी प्रार्थना पुढल्या श्लोकात केली आहे.

दिगंबरा गुरु वासुदेव दत्तस्त्वं ब्रह्म ।
कामक्रोधग्रासितं मां लभ तथैव झटिति वह ॥

दिगंबरा ही हाक मारली आहे. श्रीपादवल्लभ हेच दिगंबर आहेत. जीवात्मरूपी तेच आहेत. तेच परमेश्वरस्वरूप आहे. आणि दोन्ही मिळून परब्रह्मरूपी तेच आहेत. गुरु वासुदेव दत्तस्त्वं ब्रह्म म्हणताहेत महाराज. भक्ति, ईश्वराबद्दल प्रेमहि उत्पन्न झाल पाहिजे. ईश्वराच्या शक्तिची अंत:करणामध्ये जर खरी जाणीव झाली तर प्रेम, भक्तिहि उत्पन्न होते. जास्तीत जास्त भक्ति

घडण्याकरता परमेश्वराच्या स्वरूपाच्या ज्ञानाची आवश्यकता आहे. त्याच प्रतीक जरी समजून आल तर ज्ञान नसल तरी हरकत नाही, पण प्रेम मात्र अत्यंत आवश्यक आहे. त्या प्रेमाने मी [भक्त] हाक मारतो, संबोधन करतो - दत्तस्त्वंब्रह्म.

तर गुरु वासुदेव म्हणतात महाराज दत्तात्रेय स्वरूप हे गुरु स्वरूप आहे. सद्गुरूंचा हा अवतार आहे. हातात शस्त्र घेऊन कंसाला, रावणाला मारल असा अवतार नाही. तर जीवांना मार्गदर्शन करून त्यांच अज्ञान म्हणा, विकार म्हणा त्यांच्या मनांतले दूर करून मनाची शुध्दि जीवांची करायची आणि त्यांच स्वरूप त्यांना दाखवून द्यायच. म्हणजे ते मार्गाला लागले. तर हे सद्गुरु स्वरूपहि दत्तात्रेय आहेत. वासुदेव म्हणजे ईश्वराच स्वरूपच आहे. वासुदेव शब्दाचा अर्थ किंवा त्याची शक्ती, विष्णु-सहस्त्रनामामध्ये भीष्माचार्यांनी सांगितल —

द्यौ: सचन्द्रार्कनक्षत्रा खं दिशो भूर्महोदधि: ।
वासुदेवस्य वीर्येण विधृतानि महात्मन: ॥

ते मोठे भक्त होते भीष्माचार्य. हे संपूर्ण आकाश मंडल जे आहे चंद्र, अर्क, नक्षत्र हा सर्व जो खगोल आहे हे "द्यौ" आहे. "खं" म्हणजे संपूर्ण आकाश मंडल, सर्व दिशा, सर्व महोदधि ही ज्याच्या प्रभावाने राहिलेली आहेत, मर्यादित राहिलेले आहेत. आपल स्थान सोडून पडत नाहीत. सर्व नक्षत्र मंडल वर फिरतय पण खाली पडत नाही. याला धारण करणारा कोण आहे ? कोणी धरलेल आहे ? कोणाच्या शक्तिने हे राहिलेले आहेत ? तर "वासुदेवस्य वीर्येण विधृतानि महात्मन:" तो जो भगवान् वासुदेव सर्वेश्वर, विश्वरूपी झालेला त्याच्या वीर्यांनी हे सगळ धारण केलेल आहे. ईश्वराच अनुमान करणारी श्रुती म्हणून जी आहे त्यात त्यांनी दिलेल आहे — इतके वर असलेले सगळे पदार्थ, भूलोक जसा आहे तसे हे निरनिराळे पदार्थ म्हणजे लोकच आहेत. पण सूर्य मंडळ, नक्षत्रे खाली पडत नाही यावरून त्यांना धारण करणारी कोणीतरी शक्ति असली पाहिजे ही कल्पना अनुमानाने येऊ शकते.

तर हे ज्यांनी ओळखालेल आहे म्हणून वासुदेव म्हणजे ईश्वरस्वरूप, त्याचप्रमाणे गुरुस्वरूप अशा प्रकारचे दत्तात्रेय आहेत. ईश्वर आणि गुरु हे एकच झालेले आहेत. दत्तस्वरूपाच्या ठिकाणी. तर ही भावना साधकाची असावी अस त्यांच म्हणण आहे. सद्गुरु आणि परमेश्वर एकच आहे. ईश्वरापेक्षा गुरु श्रेष्ठ आहे. म्हणजे गुरुनिष्ठा उत्पन्न होण्याकरता ती वर्णन आहेत, नाही अस नाही. परंतु एकच आहेत ते. सद्गुरु शक्ती मनातले अज्ञान किंवा विचार दूर करणारी आहे. ईश्वरशक्ति ही दुर्जनांना

शासन करण, मारण, सगळ्यांच संरक्षण करण, ही कार्य ईश्वरशक्ति म्हणून चालू आहेत. म्हणून दोन्हीही शक्ति वस्तुत: एक आहेत ही भावना ठेवून, "गुरु वासुदेव दत्त:" गुरु आणि ईश्वरस्वरूप असे दत्तात्रेय साक्षात् परब्रह्म आहे.

आणखी त्यांची प्रार्थना आहे – कामक्रोध ग्रसित – – – – संबोधन करून, हाक मारून मागितल काय तर काम – क्रोध – ग्रसित मी आहे. चोरांनी ग्रसित म्हणजे धरलेल्या/मारलेल्या ब्राह्मणाला तुम्ही जिवंत केलात, त्याच्याकडून नवस फेडून घेतलात, तस मलासुध्दा कामक्रोधरूपी चोरांनी मला धरलेल आहे आणि ते मला मारणार आहेत. भागवतामध्ये ५ व्या स्कंधात जडभरत नावाच्या ज्ञानी महात्म्याची कथा शुकाचार्यांनी सांगितली आहे. त्या जडभरताने संसार हे अरण्य आहे असे व्यक्त केल आहे. कारण अरण्याच्या मार्गाने संसारातले सगळे जीव निघालेले आहेत. तिथ सुख नाहीये. सहा चोर या जीवाला मारतात आणि त्याच पुण्य वगैरे सर्वस्व घेऊन जातात. ते चोर म्हणजे काम, क्रोध, मद, मत्सर इ. तर या चोरांनी मला आता मारायच ठरविलेल आहे. तेव्हा लवकर आपण या आणि मला आपल्याकडे घेऊन चला. दिगंबरा – – – – दिगंबरा या सगळ्यांहि संबोधनामध्ये ही हाक मारलेली आहे.

मनाने हाक मारायची म्हणजे दुसरीकडे कुठेहि मन जाऊन उपयोगी नाही. आपल संरक्षण करणारी जी ईश्वरशक्ति आहे त्या ईश्वराला हाक मारताना मनाची अत्यंत आवश्यकता आहे. त्या वाणीच कार्य नुसत चालू असत. तास दोन तास, चार तास कोणीहि बसू शकत. वाणीन ज्याला बोलवायच तिकडे मन जाण्यासाठी दिगंबरा शब्दाचे अर्थ महाराजांनी सांगितले आहे. तोच जीवात्मा म्हणजे अंतरात्मा शुध्द आहे. विश्वरूपी झालेला तोच ईश्वर आहे. तोच पुन्हा एकरूप होऊन परब्रह्मरूपीही तोच आहे. आणि त्यानेच श्रीपादवल्लभ असे अवतार धारण करून भक्तांच संरक्षण केलेल आहे. अशी कार्य करणारा जो आहे दिगंबररूपी परमात्मा त्याला ही हाक मारलेली आहे. तिकडे आर्त होऊन काम क्रोधादिरूपी शत्रूंनी मला ग्रासलेल आहे, ते मारताहेत, या बुध्दिन हाक मारलेली आहे. आणि त्या वेळेला त्यांची शक्ति जर मनामध्ये आली तर जास्ती प्रेम निर्माण होत. आणि त्या प्रेमाने हाक मारल्यावर ईश्वराची कृपा होती, कार्य होत. तेवढ्यासाठी द्रौपदी, अंबरीब राजा इ. ची सगळी उदाहरणे महाराजांनी दिलीत.

तर भक्तिमार्ग आणखी ज्ञानमार्ग. ज्ञान आणि भक्ति, दोन्हीही या संत महात्म्यांच्या ठिकाणी आहे. ईश्वरभक्त जे मोठे झालेले आहेत त्यांना

ज्ञान नाही अस म्हणता येत नाही. जरी त्यांनी सगुणाच वर्णन केलेल आहे — तुज सगुण म्हणू कि निर्गुण रे । सगुण निर्गुण एकू गोविंद रे ज्ञानेश्वरमहाराजांचा अभंग आहे. तेंव्हा सगुण निर्गुण दोन्ही एक आहेत. ही दृष्टी या आरतीमध्ये दिगंबरा—— शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना महाराजांनी दिलेली आहे. स्वत: त्यांना तशी दृष्टी होती. म्हणून त्यांच्यातहि भेद ते मानत नाहीत. सगुणहि ईश्वर तोच आहे. त्याचप्रमाणे अवतार धारण करुन साकार झालेलाहि तोच आहे. मूळ स्वरुप अव्दितीय आहे. संसार नाही, जग नाही, काही नाही. इथ पर्यन्त दृष्टी गेली म्हणजे जगालाहि तो जीव विसरुन गेला. आमच्या बुध्दिमध्ये संसार आहे. तो संसार बुध्दितला गेला. नियामक ईश्वर आहे आम्ही नियम्य आहोत हीसुध्दा भावना गेली पाहिजे. प्रेमामुळे त्या स्वरुपाची चरित्र जाणून घेऊन भक्ति वाढते. द्रौपदिला त्यांनी अगदी सुरक्षित ठेवल. काय, शक्य होत ? भर सभेमध्ये तिचे पांचहि पति दास बनून खाली मान घालून बसले असताना तिच कोण संरक्षण करणार होत ? त्या वेळेला त्यांना बोलण्याची शक्तिच नव्हती. काय बोलणार दुर्योधनापुढे ? भीष्म, द्रोण तर अगदी कानावर हात ठेवून मोकळे झाले. दुर्योधनाचे आम्ही अन्न खातो, तेव्हा त्याच्या विरुध्द आम्ही काय बोलणार ?, म्हणाले. अशा स्थितीमध्ये ज्या ईश्वरशक्तिवर विश्वास ठेवून द्रौपदिने सगळा भार टाकला — "तुझ्या शिवाय माझा कोणीहि त्राता नाही" आणि त्या परमात्म्याने त्यावेळी वस्त्ररुप धारण केल. अनेक वस्त्र दु:शासन फेडतोय पण नाही, द्रौपदि वस्त्ररहित होऊ शकत नाहीये. प्रयत्नवाद ! जीवाने केला प्रयत्न त्या ईश्वरशक्ति पुढे काहीहि चालू शकत नाहीये. तर अशा रीतीने अवतार धारण केलेल्या साकार ईश्वराची जरी भक्ति केली तरी आपल कार्य होत आहे. सगुण आहे कि निर्गुण आहे ? सगुण श्रेष्ठ कि निर्गुण श्रेष्ठ हया वादात पडायच कारण नाही. एक तर ज्ञान दृष्टी किंवा पूर्ण भक्ति दृष्टी मिळवावी. आणि हया दोनहि भूमिका/ दृष्टि मिळाल्या तर भेद रहातच नाही. एकच परमात्मा आहे — तोच सगुण आहे आणि तोच निर्गुण आहे. अशी ज्ञानेश्वर महाराजांसारखी प्रेमदृष्टीहि आहे. ज्ञान दृष्टीहि आहे, ऐक्य दृष्टीहि आहे. तो एकच परमात्मा अनेक रुपधारी झालेला आहे. तोच सर्व कार्य चालवतो आहे. महात्म्यांनी हे पूर्ण ज्ञान मिळवल आहे आणि पूर्ण भक्तिमार्गहि त्यांच्या जवळ आहे. मग कोणाचाहि बुध्दिभेद होणार नाही अशा-रीतीने ते उपदेश करत असतात. ईश्वराची जी सगुण साकार रुपे आहेत त्याचीच त्यांनी भक्ति करायला सांगितले आहे. कारण सर्व सामान्य जनांना जीवात्मा

कसा आहे, निर्विकार आहे त्याचे मूळ स्वरुप काय आहे याची कल्पना नाहीये. मला जर सर्व सुखादु:खांची प्रत्यक्ष जाणीव आहे, तर मीच कर्ता आहे मग मी निर्विकार कसा असेन ? अशा त-हेचे अज्ञान त्यांच्या मनात आहे. अशा भूमिकेवर असलेल्यांचा बुध्दि भेद होऊ नये म्हणून संतांनी तो परमेश्वर अवतार धारण करतो, साकार आहे असे प्रतिपादन केले. आमच्यासारखो शरीर धारण करुन सगळी कार्ये करायची त्याची शक्ति आहे, एवढा तरी विश्वास ठेवावा जीवांनी. अज्ञानी सर्व सामान्य जीवांना तुम्हीही निर्गुण निराकार आहात ईश्वरहि निर्गुण निराकार आहे हा उपदेश एकदम कसा पटणार ? त्यांना तर काही अनुभव नाही. मूर्त पदार्थ आम्ही डोळयांनी पहातो त्यांच्याबद्दल विचार करायची बुध्दिला संवय झालेली आहे. ती संवय, बुध्दिवर झालेले ते संस्कार कायम ठेवून साकार स्वरुपाची उपासना करावी, त्याची भक्ति करावी हाच उपदेश संतांनी केलेला आहे. भक्तिमार्गामध्ये आकाराबद्दल काही आग्रह नाहीये. अमूक एकच स्वरुपाची उपासना करा असा आग्रह नाहीये. ज्या स्वरुपाच्या ठिकाणी तुम्हाला प्रेम वाटेल त्याची उपासना करा. हे स्वातंत्र्य आहे उपासनामार्गामध्ये आणि ती उपासना करता करता आपोआप बुध्दिचा विकास होऊ लागतो. आणि तो बुध्दिचा विकास होता होता सर्वच परमेश्वराचे स्वरुप आहे, अमूक एकच स्वरुप ईश्वराचे आहे असा आग्रह बुध्दित राहात नाही, मग ती विशाल ज्ञान दृष्टी मिळून भक्ति, प्रेम हे जास्तीच जास्त विकसित होत जात.

निर्गुण निराकार परमात्मा, आत्मतत्व आहे समजून घ्यायला कित्येक जन्म घ्यावे लागतात. व्दंव्दातीत अवस्थेपर्यन्त जायला किती काल लागतो. व्दंव्दाशिवाय आपण राहू शकत नाही. सगळ व्दैत आमच्या मनामध्ये भरलेल आहे. ते सगळ मोकळ व्हायला पाहिजे मनातून. निर्वासन, इच्छा, आकांक्षा, कोणचेहि संस्कार मनामध्ये राहायचे नाहीत या अवस्थेपर्यन्त जायला किती काल लागेल.

म्हणून महाराजांनी या महामंत्रामध्ये परमेश्वराला हाक मारलेली आहे. आपली बुध्दि ठिकाणी असेल त्या ठिकाणाहून हाक मारायला हरकत नाही. तो आमच्या सारखा देहधारी परमेश्वर आहे असं समजायला हरकत नाही. पण त्याच्या ठिकाणी जी ईश्वरशक्ति आहे तिची जाणीव करुन घेऊन हाक मारायला हरकत नाही. श्रीपादवल्लभ स्वरुप हे त्याकरता त्यांनी दाखावलेल आहे. त्याच्याहि पुढे जर जीवाची विकसित झालेली बुध्दि जाऊ शकली तर तो परमात्मा सच्चिदानंदघन आहे, विश्वरुपी तो आहे विश्वकर्ता तो आहे, तोच

जीवस्मी... झालेला आहे. मीसुध्दा त्याच्या स्वरूपापेक्षा निराळा नाहीये, हे ज्ञान होतय. देह, इंद्रिय, मन यांनाच "अहम्" समजतो आम्ही. त्याला बाजूला करून निर्गुण निर्विकार शब्द "अहम्" जो मी आहे तोसुध्दा शेवटी त्या परमेश्वराच्या स्वरूपातच विलीन करून टाकायचा. अशी ऐक्य बुध्दि उत्पन्न होण हे ज्ञान आहे. प्रत्यक्ष ज्ञान होण्याला पुष्कळ अवधि लागतो.

अनेक जन्म गेले अभ्यास करता करता. मन हे स्थिर झालेल आहे. देवाला हाक मारताहेत. २१ तास आपल्याला किती तरी वाटतात. एका मनुष्याला २१ तास सतत देवाला "दिगंबरा ........." म्हणून हाक मारण शक्यच नाहीये. परंतु ते जरी आमच्या हातून घडल अस समाधान म्हणा किंवा अहंकार म्हणा — सात्विक अहंकार असेल तो, काही तरी म्हणा ते होत. परंतु सगळ विसरून जाण ही भक्तिची परिसीमा आहे. एक शंकरांचा भक्त गंगातीरावर कौपीन धारण करून हात जोडून शंकरांना हाक मारतो — हे गौरीनाथ शंभो माझ्यावर प्रसन्न व्हा. अशी हाक मारता मारता अनेक वर्षे जरी गेली तरी एखादे निमिषच गेलय अस वाटल पाहिजे. अन्न नाही पाणी नाही, वस्त्र नाही, भूक नाही, तहान नाही, पूर्ण वैराग्य आहे, प्रेम आहे. शरीराकडे लक्षहि नाही. अशा अवस्थेत ईश्वराची भक्ति करण्यामध्ये कित्येक वर्षे गेली तरी ती एखाद्या मिनीटाप्रमाणे भासली पाहिजेल. अजून आणखी नामस्मरण व्हाव, देवाला हाक मारावी अस वाटल पाहिजे इतकी ज्याची बुध्दि विशाल झाली आहे असा महात्मा दुर्लभ आहे, अस भगवान् म्हणतात.

तर कितीहि सेवा झाली पण ती कमीच झाली आहे. काल कमी आहे अस वाटल पाहिजे. आपल्या हातून थोडस काही सत्कर्म घडल तर आपल्याला लगेच त्याचा केवढा अभिमान, अहंकार वाटतो. असच उत्तरोत्तर व्हाव अस वाटत. पण खऱ्या भक्तिच्या भूमिकेत विसर पडला पाहिजे. कुठ काय झाल १ थोडस काही तरी २१ तास काय ७ दिवस, १५ दिवस एवढसच काही तरी झाल अशी बुध्दि पाहिजे. ही बुध्दि अनेक जन्मांच्या अभ्यासाने मिळते.

परंतु याच जन्मात त्या भूमिकेपर्यन्त जाण्याकरता आरंभापासून सगुण भक्ति अत्यंत उत्कटतेने व्हायला पाहिजे. सगुण साकार जे भगवंताचे स्वरूप आहे त्याची उपासना करा. त्याची एखादी मूर्ति बनवून त्याची उपासना करा. त्यांनी अशी सगळी मोकळीक दिलेली आहे. मनाला कुठ तरी स्थिर करण्याचा प्रयत्न करा. म्हणून मूर्ति पूजा आहे. कितीहि सेवा झाली, भक्ति घडली तरी कमीच आहेइतकी ज्याची

बुध्दि झालेली आहे, इतका जो ईश्वराच्या सेवेत रंगून बेलेला आहे त्याला काही करायची गरजच नाही. तो मुक्तच झालेला आहे. तशी आपली मनाची स्थिरता व्हावी. ब-या वाईट संस्कारांमुळे जरी मी एवढ केल तेवढ केल अस वाटल, मी एवढा जप यज्ञ केला अस वाटल, वाटू दे. निदान त्यातूनच पुढे आपण आणखी देवाची भक्ति, उपासना करावी अस तर त्याला वाटेल. त्या करता म्हणून शास्त्रकारांनी भगवंताचे साकार-रूप मान्य केल आहे. देवाने अवतार घेतला, भक्तांचे रक्षण केले, कल्याण केले हे जे भगवंतांचे चरित्र आहे ते सर्व खोटे कस मानायच ? म्हणून अनेक रूप धारण करून तो परमात्मा येतो, भक्तांची कार्य करतो. त्याचे गुण ऐकून चरित्र ऐकून त्याच्या साकार रूपाच्या ठिकाणी आपल मन स्थिर करण, त्याची भक्ति करण आणि ते होण्याकरता त्याचीच प्रार्थना करीत राहाण अशी भूमिका संतांनी मुद्दाम घेतलेली आहे.

पंढरीला जाण्याचा उपदेश त्यांनीच केला. आषाढी आहे कार्तिकी एकादशी आहे. कोणच्या तरी यात्रेला तुम्ही जा अस जे. ज्ञानेश्वर महाराजांनी ७०० वर्षा-पूर्वी सांगून ठेवलय ते अजूनहि चालू आहे. विटेवर उभा असलेला पांडुरंग तोच परमेश्वर आहे. ही भावना जर अंत:करणामध्ये उत्पन्न झाली तर ज्ञान भूमिका न मिळून सुध्दा तो जीव मोठा अधिकारी ठरतो.

"दिगंबरा दिगंबरा..... या महामंत्रामध्ये किती तरी मोठी भूमिका संताचे देव आपल्या करणे एक चैतन्यघन L महाराजांनी आणली आहे. L ...... शब्दाने जरी आपल्याकडून दिगंबरा..... निघाल आणि त्याबद्दल भक्ति, प्रेम निर्माण झाल तर त्याचाहि अधिकार मोठा आहे. गीता सांगायला एक पुराणिकबुवा व्यासपीठावर बसले होते. इतरांबरोबर एक साधा शेतकरी ऐकायला येऊन बसला. गीता सांगणार आहेत पुराणिकबुवा हे त्याला समजल्यावर त्याच्या डोळयातून अश्रुधारा वाहू लागल्या. पुराणिकबुवांनी त्याला विचारले "शेतकरीदादा, तुमच्या डोळ्यात अश्रु कां आले ? " शेतकरीदादांनी उत्तर दिले, "भगवान् आणि अर्जुन रथामध्ये बसलेले आहेत. अर्जुनाने धनुष्यबाण टाकून दिलेले आहेत. आणि भगवान् गोपालकृष्ण त्याला उपदेश करताहेत अस मला दृष्य दिसायला लागल म्हणून डोळ्यातून अश्रु आले. " पुराणिकबुवांनी व्यासपीठावरुन खाली उतरून त्याला नमस्कार केला. ते म्हणाले, "तुम्हाला

L जे परम तत्व आहे ते घेतल आहे. वाणीने

गीता समजली. आम्हाला फक्त शब्दांचा अर्थ समजला." शब्दांचे अर्थज्ञान होणं हे वाईट नाहीये. परंतु अर्थज्ञानाच कार्य म्हणजे त्याप्रमाणे प्रेम निर्माण झाल पाहिजे.

ज्ञानभूमिका ही काही वाईट नाहीये. पण केवळ शब्दज्ञानाने प्रेम निर्माण होईल किंवा न होईल हे त्या जीवाच्या पूर्व कर्मावर अवलंबून आहे. ∠ ईश्वराबद्दल प्रेम उत्पन्न झाल तर ते प्रेम फार मोठ आहे ना! ईश्वरस्वरूपाच ज्ञान म्हणजे त्याची शक्ति केवढी आहे, अनादि, अनंत तो आहे. हे ज्ञान झाल्यानंतर जास्ती प्रेम उत्पन्न व्हाव लागत ते आपल्याला कधी होतच नाही. म्हणून शाब्दिक ज्ञानापेक्षा खर ज्ञान जर झाल तर तेहि निश्चितच ज्ञान आहे. खरा ज्ञानी हा भक्त असतोच. त्याला काही भक्ति करायला सांगायची जरुरी नाही. तो भक्तच आहे. विभक्त नाही. पण हे सर्व आपण बाजूला ठेवू. जर एखाद्या जीवाच्या अंत:करणात श्रध्दा असेल भक्ति असेल तर तो मोठा अधिकारी आहे. त्या भक्तिला दृढ करण्याचा प्रयत्न त्याने करायचा आहे. त्या करता अशा प्रकारची ही स्थाने ईश्वरी इच्छेने निर्माण झालेली आहेत. तिथे असे कार्यक्रम वारंवार होताहेत.

त्या भजनाच्या वेळी आपल्याला आनंद होतोय. काही संस्कार ईश्वराच्या कृपेने होताहेत. तेच संस्कार कसे दाढीला लागतील, त्याच फळ केव्हा मिळेल, ते द्यायला ईश्वर समर्थ आहे या भावनेने आपला बुध्दि विकास व्हावा म्हणून देवाजवळ प्रार्थना करायची आहे.

दुरितांचे तिमिर जावो,
विश्वस्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछिल तो ते लाहो
प्राणिजात ॥

अशी प्रार्थना ज्ञानेश्वर महाराजांनी देवाजवळ केली आहे. सगळी दुरित संपू देत म्हणाले. म्हणजे तुमच स्वरूप जीवाला समजेल. त्या जीवावर तुम्ही केवढे उपकार केले आहेत. शरीर दिल आहे. मन दिल आहे. वाणी दिली आहे. अंत:करण, बुध्दि विचार करण्याची शक्ति दिली आहे. बाकीच्या पशु पक्षी इ. प्राण्यांना ही देणगी नाही. खाणं पिणं आणि राहाणं या शिवाय त्यांना काहीही माहीत नाही. दुसरीकडे प्रवृत्तीच नाही त्यांची. त्यांच्या मनावर परिणाम होणं शक्य नाहीये. जर पूर्व जन्मात काही चांगले संस्कार झाले असतील, सुकृत घडत असेल आणि या जन्मात पशु-पक्षांच्या योनीत गेला तरी संतांच्या कृपेने त्यांनाहि ज्ञान होत. एखादा अपवाद आहे.

∠ ईश्वराची कृपा पाहिजे आणि नाही. त्या ज्ञानातून

तरी मनावाला अशी सर्व सोय देवाने करून दिलेली आहे. संत महात्म्यांची भेट होते आहे. त्या भेटीमुळे आपल्या मनामध्ये असणारे सर्व विकार दूर व्हावेत, ही तळमळ मनामध्ये उत्पन्न झाली पाहिजे. ईश्वराला तळमळीने हाक मारताना हे मनातले विकार दूर झाले पाहिजेत. तेवढयासाठी असा जपयज्ञ आहे. दिगंबरा.... म्हणता म्हणता ईश्वरस्वरूपाच चिंतन करायच. त्यामुळे तत्कालिक समाधान तर मिळतच पण ईश्वरस्वरूपाच अधिकाधिक ज्ञान होण्याकरता आपल्या बुध्दिची योग्यता वाढविण्यासाठीहि त्याचा उपयोग होतो. भगवंताच्या नामस्मरणाने सगळी दुरीत जाऊ शकतात. वैय्यक्तिक, सामुदायिक सगळ्या दुरितांचा क्षय होऊ शकतो. म्हणून संतांनी सर्वत्र नामसंकिर्तनाचा प्रसार जास्तीत जास्त केलेला आहे. त्यांच तेच कार्य आहे. एक तर ते सुलभ आहे आणि श्रध्देने भक्तिने नामसंकिर्तन केल्यानंतर त्याचे जे फळ आहे — दुरितक्षय, तेहि ईश्वरकृपेने मिळू शकत. स्वधर्माचरणाबद्दल प्रेम निर्माण होत आणि स्वधर्माचरण घडल्यानंतर त्याच फल — जो जे वांछिल तो ते लाभो — मिळत. भक्तिधर्माचा जर तो अधिकारी असेल तर भक्तिधर्माच आचरण, कर्मयोगाचा तो अधिकारी असेल तर शुध्द कर्माचरण तो करु शकेल. ज्ञानयोगाचा तो अधिकारी असेल तर तेहि स्वधर्माचरण त्याच्या हातून घडू शकेल.

संन्यासी असतात काही. सर्वसंग परित्याग करून आत्मस्वरूपाचे चिंतन करीत बसलेले असतात. मिळेल तेवढी भिक्षा ग्रहण करायची आणि सगुण, निर्गुण .. परमेश्वराचे होईल तेवढे चिंतन करायचे. तर स्वधर्माचरणाचे फल प्राप्त होण्याकरता दुरितक्षय होण्याची प्रार्थना ज्ञानेश्वर महाराजांनी केली आहे. आणि तो दुरितक्षय भगवंताच्या नामसंकिर्तनाने होतो आहे. "जळतील पापे जन्मांतरीची" म्हणतात. अनेक जन्मांची पापे नामसंकिर्तनाने नष्ट होतात म्हणतात.

म्हणून अशा जपयज्ञाचा पुरस्कार सर्व संत महात्म्यांनी केला आहे. तिथे तिथे असे जपयज्ञ होतील त्यात भाग घेऊन नामसंकिर्तन करण्याची तळमळ निर्माण झाली तर त्या तळमळीतून पुढे परमेश्वराला हाक मारायची बुध्दि होईल. ईश्वरस्वरूपाचे अनुसंधान म्हणजे तो जप आहे. "लवकर माझे दुरित क्षय करा, माझ्यावर प्रसन्न व्हा" अशी तळमळीने ईश्वराला हाक मारणारा हा जप

अखंड घडतो आहे. त्यामुळे जीवाची सर्वहि कार्य सिध्दी होते आहे. जीवभावहि नाहीसा होतोय. जन्ममरणाच्या फे-यातून जीव मुक्त होऊन परमेश्वररूप होऊन जातो. आपल्या वैदिक संस्कृतीची ही ज्ञानदृष्टी आहे. त्यात आकाराला हि महत्व आहे, मूर्तिलाहि महत्व आहे. सर्व व्यापी ईश्वर आहे, तो निराकार आहे, त्याची मूर्ति कुठली असणार असले उगीच वादविवाद घालण्यात काय अर्थ आहे? निराकार आहे आम्ही समजू शकतो. निराकाराचे चिंतन करायची आमच्या मनाला सवय तरी आहे का ? आकाराकडेच मन जात आमच निराकार आहे म्हणायच आणि आकाराकडे मन जात आमच, म्हणजे हेहि गेल आणि तेहि गेल. ज्ञानहि गेल आणि भक्तिहि गेली. त्यापेक्षा संतांच्या उपदेशाप्रमाणे सगुण भूमिकेवर राहून जमेल तेवढी त्या ईश्वराची सेवा करून आपली उन्नती करून घेण, त्यासाठी ईश्वराची तशी प्रार्थना करण, त्याची कृपा संपादन करण, हेच आपल मुख्य कर्तव्य आहे. हेच महाराजांनी दिगंबर शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना दाखविलेल आहे. तेव्हा अशा जपयज्ञात भाग घेऊन आपल्या बुध्दिची निर्दोषता वाढत जाईल हीच ईश्वरस्वरूप श्री महाराजांच्या चरणी प्रार्थना.

अवधूत

चिंतन

श्री गुरूदेव दत्त

xxxxxxxxxxxx

घेऊर

६ नोव्हेंबर १९८७

(श्री निंबकर यांच्या सौजन्याने)

४५/१९८८

" श्री गुरुदेव दत्त "

x....... पण त्या परिस्थितीमध्ये दुस-याच द्रव्य घ्यायच नाही, परंतु ही मनाची अशी अवस्था आहे. काही आपल्या जवळ नाही. खायलासुध्दा मिळत नाही. अशा वेळेला अगदी वाईट वाटत. काही तरी थोड मिळाल तरी बरे वाटते. वा; खायला नुसती भाजी भाकरी तरी मिळावी, हरकत नाही, अस वाटत. पण मिळायला लागल्यानंतर ते थांबत का ? मन हे इतक चंचल आहे, अस्थिर आहे कि त्याच्यामध्ये इतके दोष उत्पन्न होतात. कि नाही, तो पर्यन्त दुःख आहे. भूक तहान सुध्दा भागत नाही.

वस्त्र नाही आपल्या अंगावर घ्यायला. थंडी वारा दूर करता येत नाही. निवारण करता येत नाही. पाहिजे तेव्हां अन्नवस्त्र निर्वाहापुरत पाहिजे. पण ते मिळायला लागल्यानंतर जास्ती लोभ निर्माण होतो. याच्या पेक्षा अधिक का मिळू नये ? त्यांना जास्ती मिळत आणि आम्हाला का कमी मिळत ? मला त्याच्या सारखा का मिळू नये, त्याच्यापेक्षा जास्ती का मिळू नये ? ही जी मनाची अवस्था आहे, हा जो स्वभाव आहे हा स्वभाव बदलायचा आहे. त्याच्याकरता विचार करायला पाहिजे, तप केल पाहिजे. ईश्वराची उपासना केली आहे या सगळया संतांनी. ईश्वराची कृपा संपादन करुन हे विकार त्यांच्या मनामध्ये उत्पन्नच होत नाहीत. रोग उत्पन्न होत. तसा विचार करुन ते थांबलेले आहेत.

त्या कोणत्या कुंभाराची गोष्ट सांगतात ना. राका कुंभार. राका आणि बाका त्याची बायको. तो कुंभार सर्व मातीची भांडी तयार करणारा. एकदा त्याने आवा लावला. त्याच्यामध्ये मांजरी बाळंतीण झाली. तिला चार पांच पिल्ल झाली. ती त्या आव्यामध्ये सांपडली. त्याला वाईट वाटल. त्याने पांडुरंगाची प्रार्थना केली कि ही जर जिवंत राहिली तर मी सर्वस्व दान करुन टाकीन आणि पंढरपूरला येऊन तुमची सेवा करीन. कारण तो आवा पेटलेला आहे, दोन तीन दिवसांनी शांत होणार. तो पर्यन्त ती जिवंत कशी राहाणार ? म्हणून पांडुरंगाला विनंती केली.

आणि तस झाल म्हणे तीन दिवसानंतर ती पिल्लांना घेऊन मांजरी त्याच्या तून बाहेर आली. तिला कस लागल नाही ? ठरल्याप्रमाणे हयांनी आपल सर्वस्व

---

xप्रस्तुत प्रवचन जरी संपूर्ण नसले तरी जेवढे मिळाले तेहि बोधप्रद असल्याने सादर केले आहे.

देऊन टाकल. पंढरपुरामध्ये दोघ पतिपत्नि येऊन राहिले. आणि आता उदरनिर्वाह कसा करायचा ? जवळ अरण्यामध्ये, लाकड जमवावीत, भारे करावेत, डोक्यावरून ते आणावेत, विकावे. काय पैसे मिळतील त्याच्यातून सामुग्री आणावी, पांडुरंगाला नैवेद्य दाखवावा, आणखी कोणी यात्रेकरु जर आलेला असला, त्याचा शोध घेऊन त्यालाहि खाऊ घालाव. उरलेल दोघांनी खाव. अस त्यांच कालक्रमण चालू आहे.

उद्याला पैसा पाहिजे, परवाला पाहिजे, वर्षभर पुरला पाहिजे याकरता संग्रह काही नाही. अस कार्य चाललेल असताना रुक्मिणी देवींनी पांडुरंगांना सांगितले, "हा तुमचा भक्त सर्व टाकून देऊन आलेला आहे. तुमच्या करता आलेला आहे." त्याला काही तरी संपत्ति वगैरे द्यावी.

पांडुरंगांनी सांगितले, "त्याला इच्छा नाही तो घेणार नाही." मग रुक्मिणी "मी देऊ का," म्हणाली. "पहा," म्हणाले. "परिक्षा पाहू नकोस. त्याची योग्यता बघ." दुसरे दिवशी हे दोघेहि अरण्यामध्ये लाकड आणण्याकरता जायला निघालेले असताना तो कुंभार पुढे होता आणि त्याची स्त्री थोडीशी मागून येत होती. रस्त्यामध्ये एक मोहरांची पिशवी – तोंड मोकळ झालेल आहे, काही मोहरा बाहेर पडलेल्या आहेत — अशी कुंभाराच्या दृष्टीला पडली. आता तिथे कुणाची मालकी नाही, काही नाही. त्याला काही चोरी म्हणता येणार नाही. चोरी याचा अर्थ दुसऱ्याची वस्तू, दुसऱ्याचे स्वामित्व, ज्या वस्तुवर आहे ती वस्तू त्याला न सांगता घेणे, स्तेय ज्याला म्हणतात. ही पिशवी काही दुसऱ्या कोणाची नाही. कोणीतरी टाकली असेल म्हणा राहिली असेल म्हणा. तोहि विचार त्याने केला.

परंतु काय झाल हे घ्याव अस त्याला वाटल नाही. नको आपल्याला हे धन. धनाबद्दल जो विचार त्याने आपल्या मनांत केला असेल त्या विचारांमुळे धन हे ग्राह्य नाही. आपण ज्या दिवशी ध्येयान या पंढरपूरात येऊन राहिलो आहोत ते ध्येय या संग्रहामुळे सिध्द होणार नाही.

त्याला वाटल, त्याची इच्छा झाली तर ते धन घ्यावे. लोभ नाही मनामध्ये. परंतु त्याला अस वाटल कि पाठीमागून आपली पत्नि येतेय तिला एखाद्या वेळी हे घ्यावस वाटल तर म्हणून ती येत होती इतक्यात त्याने आणखी माती एउचलली, त्या मोहरांवती ती माती टाकून त्या मोहरा तिला

दिसू नयेत व तिलाही मोह होऊ नये. ते त्या स्त्रीच्या दृष्टीला पडले. ती म्हणाली, वा, वा, वा, वा, मातीपेक्षा सोन जास्ती श्रेष्ठ आहे अशी तुमची कल्पना अजून आहे. म्हणून ते सोन झाकल तुम्ही. सोन घ्याव अशी इच्छा का होणार ? मातीपेक्षा सोन्याची किंमत जास्ती आहे ते आपल्या संग्रही असाव अस तुम्हाला वाटत. ही अजून तुमची कल्पना गेलेली नाही. मला मोह होईल वगैरे त्याचा विचार तुम्ही करा. माती कमी दर्जाची सोन जास्त कस आहे?

म्हणाले, सोनहि जमिनीतूनच निघाल आहे, मातीही जमिनीचाच भाग आहे. न्यायशास्त्रकारांनी सुवर्ण हे तेजस् म्हणून मानलेल आहे. त्याचा जो भाग आहे, पिवळा रंग आहे, त्याचा गुरुत्व, जडपणा वगैरे हा सगळा पार्थिव भाग आहे, सोन आटत नाही. पाणी आटून जाते. पार्थिव भाग आहे तोही आटून जातो. परंतु तेज मात्र आटत नाही. कितीतरी आणखी अग्निजवळ सोने आणून लावले आहे तेवढच राहील. पातळ होईल पण पुन्हा ते घट्ट होते.

तर हा दिसणारा जो सोन्याचा भाग आहे पिवळा रंग आहे. त्याचप्रमाणे जड पदार्थ आहे वजन आहे. हे सगळे पार्थिव अंश त्याच्यामध्ये आहेत.

तेव्हां शास्त्रदृष्टीनेही तिच म्हणण बरोबर आहे, कि जमिनीतून निघालेल सोन आणि माती याच्यामध्ये अंतर काय आहे ? हा जर पक्का मनाचा निश्चय झाला तर सोन्याबद्दल कधीही अभिलाषा उत्पन्न होणार नाही. माती, सोने हे आम्हा मृत्तिके समान, हे नुसत प्रवचन करीत नाहीत हे माहात्मे. हे अनुभव सांगतात.

आपली वृत्ती कशी आहे हे स्वत: सांगतात. प्रवचनकारांनी यायच, प्रवचनात काही तरी बोलायच आणि आमच्यासारखो अस नाही आहे. तर हे मृत्तिकेसमान म्हणणारे जे आहेत. ती स्त्री एवढी कुठही शिकलेली नाही. परंतु ईश्वराच्या कृपेने तिच्या मनामध्ये तो तत्वविचार उत्पन्न झालेला आहे. ते तत्व तिने सांगितले आहे. तुम्हाला मोह उत्पन्न होण्याचे कारण काय ? तोही निर्लोभी होता. लोभ नाही त्याला पण मोह आहे. सोन्याची किंमत जास्ती आहे. तो संग्रह नको एवढ तो म्हणाला. त्याला लोभ नाही. हिला लोभहि नाही आणि मोहही नाही.

तत्वविचार आहे. प्रत्येक वस्तूच काय गूढ तत्व काय आहे तिथ पर्यंत जाऊन विचार केल्याशिवाय आणखी तत्वज्ञान होणे शक्य नाही. देहामध्येच आपण थांबून बसलेलो आहोत. देहाच्या पुढ जाण्याची आमची काही स्थिती नाही. विचारच

आम्ही करीत नाही. संसार हा देहात्मवादामुळे उत्पन्न झाला आहे. दुःख दुःख जे म्हणतात ते देहात्मवादामुळे उत्पन्न होत परंतु तत्वविचार करणारे जे माहात्मे आहेत त्यांच मन हे शांत आहे. स्थिर आहे. त्यामुळे त्यांना शांती आहे.

नाथमहाराजांची गोष्ट प्रसिध्द आहे ना, सगळया टवाळखोर मंडळींनी एका यवनाला सांगितले, "स्नानाला गेलेत नाथ ते परत आले म्हणजे त्यांना राग आण तू. तुला आम्ही बक्षिस देऊ." राग आणायच काम करायच. तोही प्रतिज्ञा करून बसला. ते आल्यावर त्यांच्या अंगावर थुंकला. पुन्हा ते स्नानाला गेले. पुन्हा स्नान करून आले. पुन्हा थुंकला. किती तरी वेळा अस झाल. पण त्यांनीहि आपल सोडल नाही. शांतपणे पुन्हा जायचे. पुन्हा स्नान करून यायचे. पण बराच वेळ झाल्यानंतर त्यालाच पश्चाताप झाला. आणि तो शरण आला. पश्चाताप होऊन म्हणाला, "मी चुकलो, आज तुम्हाला बराच त्रास दिला मी." नाथ शेवटी म्हणाले, "तुझे माझ्यावर आज मोठे उपकार झाले." त्याने विचारले "काय उपकार झाले ? थुंकण्याने ?" "हो" म्हणाले. "तू थुंकल्यामुळे मला इतक्या वेळेला स्नान झाले ना! पैठण क्षेत्रामध्ये राहून इतक्या वेळेला कधी एका दिवशी गोदावरीचे स्नान माझ्या हातून घडल नाही. एका दिवसात इतकी स्ना तू मला घडवलीस म्हणजे हे केवढ पुण्य तुझ्यामुळे मला घडलेल आहे " ही जी सहनशीलता आहे.

रामाने, काल सांगितल्याप्रमाणे, कैकयीचे माझ्यावर फार मोठ प्रेम आहे. भरतापेक्षा सुध्दा, सख्या मुलापेक्षा कारण मला नुसत वनवासात जायला सांगितल. वनवासात काय, म्हणाले, काही चिंता नाही काही नाही. काही भीती नाही, काही नाही. आपल आपण पोषण करायच. आपल्या पुरत करायच. आणि भरताला राज्य करायचे काम दिले म्हणजे सगळया प्रजाजनांच, सगळया राष्ट्राच संरक्षण करायच, सगळीकडे लक्ष द्यायला पाहिजे. त्याला झोप तरी आहे काय ? किती त्याला लक्ष द्यायला पाहिजे. ही जबाबदारी भरतावर ह्या कैकेयीच प्रेम भरतावर जास्त आहे का रामावर जास्त आहे हे त्यांनी पटवून दिलेल आहे.

विचार करणारी जी बुध्दि आहे त्या बुध्दिमध्ये रागद्वेषादि विकार राहूच शकत नाहीत. विचाराने सगळ परिमार्जन करता येत.

तर ज्ञानयोग म्हणून जो म्हणताहेत. देहापेक्षा काही तरी निराळ आहे, आत्मवस्तू . ते समजून घेतल पाहिजे. देहापेक्षा आत्मा काही वेगळा

आपल्याला दिसत नाही, हे खार आहे. परंतु अनुमान प्रमाण आहे. तर्क आम्हाला जमतो. तर्काने समजत. देहाच कार्य देहातच अचेतन आहे, वस्तुत: त्याचा नाश होतो शेवटी. त्याला टाकून देतात. त्या देहामध्ये असा कोणता पदार्थ आहे कि ज्या ज्या पदार्थामुळे देहाचे व्यवहार व्यवस्थित चालले आहेत ? कोण ? कार्य करविणारा कोणी तरी आहे काय ? हा विचार करायला काय हरकत आहे, मानायच न मानायच ती पुढची गोष्ट आहे. पण बुध्दि ज्या करता दिलेली आहे — विचार करण्याकरता — त्या बुध्दिने विचार करायला काय हरकत आहे?

श्वासोच्छवास आपण रोज घेतो. बाहेर गेलेला श्वास बाहेरच राहिला तर? आंत घेतलेला श्वास आंतच राहिला, बाहेर आलाच नाही तर काय होईल ? पण कार्य चाललेल आहे. व्यवस्थित चाललेल आहे. या वरून याचा एक कोणी तरी नियामक मानलेला आहे, शास्त्रकारांनी शब्दप्रमाणाने. ते ईश्वरतत्व म्हणून स्वतंत्र मानलेल आहे.

एक व्यक्ति असो किंवा लोकशाही राज्य असो, सर्वही दु:खाची निवृत्ती करु शकत नाहीत. याचा तीस चाळीस वर्षे आपण अनुभव घेतो आहोत. स्वराज्य मिळाल्यानंतर आपण सुखी होऊ.

सर्वम् परवशम् दु:खम्

शास्त्रकारही सांगतात. स्वाधीन सगळ असल, स्वराज्य असल म्हणजे सुख आहे. दुसऱ्याच पारतंत्र्य हे दु:ख आहे. बरोबर आहे सिध्दांत. पण त्याप्रमाणे घडते कुठे ? स्वराज्य मिळाल्यानंतर सुध्दा काही इथ सगळ सुख मिळत आणि दु:ख दूर होत अस नाही. लोकशाही राज्य आहे. एक व्यक्ति कुणी तरी राज्य करणारी आहे. त्याच्या इच्छेने सगळ चाललेले आहे. त्याला सगळ काही समजत नाही. त्याने सगळयांकडून समजून घेतल तर हरकत नाही. सगळयांच्या विचाराने. एकाच व्यक्तिच राज्य पूर्वी होत. एक राजा असायचा, आणि तो वाटेल तसा राज्य करायचा म्हणून ही सुधारणा झाली. हल्लीच हे लोकशाही तत्व आहे. आता नक्की लोकशाही आहे का एकशाही आहे कोणाला ठाऊक.

एकाने विचार मांडायचा आणि त्या L सभे मध्ये असलेल्या लोकांनी नुसती संमती द्यायची. सगळेजण विचार करत बसतात काय L करताना ? आणि विचार करण्याची योग्यता सर्वाजवळ आहे काय ? एक जो बुध्दिमान नेता ठरविलेला असेल त्याच्या पक्षाने, त्या बुध्दिमानाचे जे काही म्हणण आहे, सांगण आहे

L कायदे

त्याप्रमाणे सगळ्या गोष्टीत त्याला मत मिळत असत. त्याप्रमाणे कायदे होऊन जातात. ही लोकशाही आहे किंवा नाही हा सुध्दा संशय आहे. कुठे कुठल्या परराष्ट्रात आहे म्हणतात. तो असू दे विषय.

तर अशा रीतीने आपण देहामध्ये राहात असताना, देहामध्ये राहाणारा कोणी तरी मी एक स्वतंत्र, निराळा आहे हेच गीतेमध्ये अगोदर सांगितले आहे. अर्जुनाला उपदेश करायला सुरवात केली त्या वेळेला :—

अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ता: शरीरिण: ।
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥ २.१८॥

तूही मरत नाहीत आणि हेही मरत नाहीत. कुठली हिंसा आली, म्हणाले. माझ्या हातून हे सगळे मारले जातील अस तुला वाटल, यांचा नाश मी करणार; हे कुठल पाप ? मी पुढ घेऊ नाही, म्हणाले. हिंसा नाही. आत्मवस्तू. या शरिरात राहाणारा जीवात्मा अमर आहे. शरीर तेवढ विनाशी आहे. सगळी शरीरे विनाशी आहेत. तुझही शरीर विनाशी आहे. ह्यांचही शरीर विनाशी आहे. तेंव्हा हिंसाच नाही, म्हणाले, त्याला पटवून देण्याकरता. तुझ कर्तव्य कर्म तू कर म्हणाले. हिंसा होत नाही. तेवढयापुरत सांगितले याचा अर्थ हिंसा मानायची नाही अस नाही. देहाची हिंसा केली खून करणाऱ्यांनी. देहाला मारल, आत्म्याला कुठ मारल ? आत्मा काही मरत नाही. तत्वज्ञानाचा उपयोग असा जर करायला लागल तर ! म्हणून वाटेल त्याने तत्वज्ञान वाचूहि नये. उगीच आमची बुध्दि अगोदरच अशा प्रकारची तर्क कुतर्क करणारी. त्याचा आधार घेऊन आम्ही वाटेल तस अन्यायाने वागतो. त्या करता हे सगळ समजून घ्यायचय ना! हे समजायला किती वेळ लागणार आहे. किती दिवसांचा अभ्यास आहे. देह म्हणजे मी आहे. हे पाहिजेच की,

चांगदेवांनासुध्दा आणखी ती देहात्म बुध्दि सोडता आली नाही. ज्ञानेश्वर महाराजांची कितीर्र ऐकली चांगदेवांनी आणि त्यांना इच्छा उत्पन्न झाली. कितीतरी सिध्दी मिळालेल्या आहेत. योगसामर्थ्य आहे. योगाभ्यास आहे. शास्त्र आहे. प्रयोग आहेत. सिध्दी याचा अर्थ मानसिक शक्तिंचा विकास आहे. काहीही मनात आलेले संकल्प त्याप्रमाणे खर होणं वगैरे अशा काही सिध्दी आहेत. हे सगळ मिळाल. परंतु ज्ञानेश्वर महाराज आपल्यापेक्षा मोठे आहेत, त्यांच्यापासून काही तरी आपण उपदेश घ्यावा, ज्ञान मिळवाव, अशी

इच्छा उत्पन्न झाली चांगदेवांना. आणि पत्र लिहायला बसले. सगळ्यांना ही कथा माहिती आहे.

पत्र लिहीताना त्यांच्या मनामध्ये संशय आला कि ज्ञानेश्वर महाराजांना आता नमस्कार लिहू कि आशिर्वाद लिहू ? एवढे योगी. मृत्युसुध्दा ज्यांनी स्वत:चा चुकविला. दुस-याला मृत्यु आलेला, त्यालाहि जिवंत केले. अस सामर्थ्य असतानासुध्दा मनाची अवस्था अद्यापि मागे आहे. त्यांना नमस्कार कसा लिहायचा? ते तर माझ्यापेक्षा किती लहान. वीस बावीस वर्षांचे ते आणि मी चौदाशे वर्षांचा. चौदा वेळा मृत्यू चुकविला म्हणतात. चौदाशे वर्ष माझ्या वयाला झालेली आहेत. किती लहान आहेत ते.

त्यांना नमस्कार कसा लिहायचा? मग आशिर्वाद तरी कसा लिहिणे योग्य होईल ? त्यांच्यापासून मला आणखी ज्ञान मिळवायचे आहे. ज्ञानाच्या दृष्टीने मोठे आहेत पण वयाने लहान आहेत. ती अडचण उत्पन्न झाली. एवढे योगी आणि एवढे श्रेष्ठ असतानासुध्दा पहिल्या प्रथम पत्रात काय लिहावे हाच निर्णय झाला नाही. संदेह आहे मनामध्ये. संशयी वृत्ती आहे. संशयात्मक मन आहे. काही निर्णय होऊ शकत नाही. आणि तसाच कोरा कागद पाठवून दिला.

शिष्यांनी ते पत्र आणून दिले निवृत्तीनाथांच्या हातात. "आमच्या गुरुंनी हे पत्र दिलय" म्हणाला. त्यांनी पाहिल माग पुढ कोराच कागद आहे. ती मुक्ताबाई अगदी स्पष्टच बोलणारी होती. "चौदाशे वर्षे जिवंत राहून कोराच राहिला काय," म्हणाली. निवृत्तीनाथांनी ज्ञानेश्वर महाराजांना सांगितले कि या पत्राचे उत्तर लिहून पाठवा. त्यांना काही अहंकार नाही काही नाही. त्यांनी ओळखाल असेल का लिहिल गेल नाही. हे पत्र त्यांना समजल असेल. परंतु तो विचारच मनामध्ये नाहीये. पूर्ण ज्ञानी मनुष्याला अहंकार नाही, क्रोध नाही, व्देष नाही, काही नाही. आणि त्याच कागदावरती त्यांनी पत्र लिहून दिलेल आहे, ज्ञानेश्वर महाराजांनी. चांगदेव पासष्टी म्हणून प्रसिध्द आहे.

स्वस्ति श्री वटेशु, जो लपोनि जगदा भासू ।
दावि मज ग्रासु प्रगटीला करी ॥

पहिलीच ओवी किती महत्वाची आहे. ⌊ वटेश्वर चागदेव त्यांच नांव. व्यवहार दृष्टीने सुध्दा त्या ज्ञानाचा किती सुंदर उपयोग झालेला आहे. तुम्ही ज्ञानेश्वरांना लहान समजत असाल, लहानांनीसुध्दा मोठयांच कल्याण व्हाव अस

⌊ वटेश्वर चाँगदेवांचे स्वस्ति म्हणजे कल्याण असो.

म्हणायला काही हरकत नाही. व्यवहार दृष्टीने काही चूक नाही. ज्ञानेश्वर मोठे असले तर मोठ्यांनी लहानांच कल्याण चिंतन करायला हरकत नाही. दोन्ही दृष्टीन. लहान असो ज्ञानेश्वर मोठे असो. स्वस्ति वाचन केलेल आहे. कल्याण असो. आणि त्यांची दृष्टी अशी आहे — जो लपोनि जगदाभासु दावि मज ग्रासु प्रगटीला करी !

चांगदेव म्हणजे देह समजत नाहीयेत. आत्मतत्व, सर्वत्र एक आत्मा आहे आणि तो सर्वत्र राहातो आहे. तो आत्मा लपलेला आहे, झाकला गेलेला आहे. अज्ञानाने. आणि त्यामुळे जगदाभास निर्माण झालेला आहे. तो जर प्रगट झाला आत्मज्ञान झाल तर हा आभास नाहीसा होईल.

म्हणजे ज्ञानेश्वर सर्वत्र आत्मदृष्टीने पहातात. भौतिक दृष्टीने, केवळ देहदृष्टीने पहातच नाहीत. मी लहान आहे तू मोठा आहेस हे सगळ देहाच आहे. चांगदेव अद्यापि शरीरापर्यंतच आलेले आहेत. शरीराच्या पुढे गेलेच नाहीत. आत्मवस्तुपर्यन्त जायच आहे. मी आत्मा आहे, आनंदरूप आहे. मी निर्विकार आहे. मी आणखी असंग आहे, अजरामर आहे. हे सगळ आत्मवस्तूच ज्ञान व्हायला पाहिजे. म्हणजे किती विचार केला पाहिजे?

ज्ञानेश्वर लहान किंवा मोठे हा विचार चांगदेवांनी केला. चांगदेव लहानपणा किंवा मोठेपणा कोणाशी धरून आहेत ? हा भाऊ या भावापेक्षा लहान आणि तो मोठा आहे हे कशाने म्हणायच ? शरीरावरूनच म्हणायच ना! ज्या शरीराला कालाचा संबंध जास्ती झालेला असेल ते शरीर मोठ ठरत. श्रेष्ठ [ज्येष्ठ] त्याला आपण म्हणतो. मोठा भाऊ ज्या शरीराला कालाचा संबंध कमी झालेला आहे ते शरीर लहान ठरत. हा लहान भाऊ तो मोठा भाऊ. ते शरीराला उद्देशून आहे. कालसंबंधाने ज्येष्ठकनिष्ठ हे व्यवहारामध्ये झालेल आहे. म्हणजे चांगदेवांनी जे ज्ञानेश्वर हे लहान आहेत, मोठे आहेत हे ठरविले, शरीरामध्ये राहूनच ठरविले. त्यांच्या शरीराकडेच पाहिले. त्यांच्या शरीराला वीस वर्षे झाली आहेत आणि यांच्या शरीराला चौदाशे वर्षं झाली आहेत. आत्म्याला काही चौदाशे आणि कालाची गणनाच नाही. आत्मा अमर आहे ना! आत्मा अमूक वेळेला जन्माला आला आणि अमूक वेळेला जाणार आहे अस समजतच नाही. तो अजरामर आहे. अजरामर असलेल्या पदार्थाला कालत्रयातीत:, देहत्रयातीत: अशी [illegible] आहेत. त्याचा काळाशी संबंध नाही. आज आत्मा आहे [illegible] काल नव्हता काय ? उद्या राहाणार नाही काय ? सर्व कालामध्ये तो आहे ही दृष्टी ज्यांना मिळालेली आहे ते ज्ञानी महात्मे आहेत. त्यामुळे शरीराच्या

पुढे जाण झाल नाही चांगदेवांच असं दिसत हे लहान मोठ समजण्यामुळे.

त्या करता शरीरातून बाहेर जाणारा देहत्रयातीत आत्मा कसा आहे ते समजून घेण किती कठीण आहे? आणि त्यांच्याकरता सगळी तपश्चर्या ज्याला म्हणतो आपण, कष्ट समजतो, ईश्वराची उपासना त्या करता करायची आहे. संत महात्मे जे आहेत त्यांच्या शब्दावर त्याकरता विश्वास ठेवावा लागतो. शब्द-प्रमाण मान्य नाही असं म्हणता येणार नाही. शब्दप्रमाण आजहि व्यवहारा-मध्ये मान्य करतात. पण काही शास्त्रीय विषय, सिध्दान्त सांगायला लागल कि हे शब्दप्रमाण, शास्त्र आम्हाला मान्य नाही अस म्हणतात.

शंभर रुपयांची मनीऑर्डर मुंबईहून एकाने केली. त्या पोस्टमास्तरने शंभर रुपये आलेले आहेत अस काही तरी त्यांच्या संकेताप्रमाणे लिहिले असेल. इथल्या पोस्टात तो फक्त कागद आलेला आहे —मनीऑर्डरचा. इथल्या पोस्टमास्तरने त्याला शंभर रुपये दिले. त्या मनी ऑर्डरच्या फॉर्मनेच सांगितले ना शंभर रुपये मिळाले म्हणून. ह्या मास्तरला ते शब्दप्रमाणच आहे कि. तिथल्या मास्तरने लिहून पाठवल पैसे जमा झालेत. त्याला द्यायला हरकत नाही. म्हणजे हे शब्दप्रमाण व्यवहारात किती तरी जरुरी आहे. प्रत्येक व्यवहारात शब्दप्रमाणच धरतात कि, तर हे शब्दांचे सगळे व्यवहार चालू आहेत. पण शास्त्रीय शब्द किंवा संतांचे शब्द असले म्हणजे ते आम्हाला मान्य होत नाहीत. पटत नाही अस आम्ही म्हणतो लगेच. आमच्या बुध्दिला पटत नाही.

त्याकरता ती रामायणामध्ये गोष्ट सांगितली आहे ना. सुग्रीवाने सीतेचा शोध करण्यासाठी सगळी वानर मंडळी चारी दिशांना पाठवली. त्यात दक्षिण दिशेला मात्र चांगली श्रेष्ठ बुध्दिमताम् वरिष्ठम् अशा प्रकारची मंडळी ∴ (हनुमान) पाठवली. त्याला कारण म्हणजे तो रावण दक्षिण दिशेला गेलेला होता. त्याचा शोध दक्षिण दिशेला लागेल. त्याची राजधानी तिकडे असली पाहिजे. आणि तिथेच सीता असली पाहिजे. म्हणून त्या दिशेला चांगली चांगली मंडळी पाठवली. आणि त्यांना ताकिद दिली कि एक महिन्याच्या आत तुम्ही परत आल पाहिजे, सीतेचा शोध लागो अगर न लागो. महिन्यापेक्षा जास्ती दिवस लागले तर तुमचा शिरच्छेद केला जाईल. बाकीच्या दिशेला गेलेली मंडळी परत आली पण त्यांना सीतेचा शोध काही लागला नाही. ह्या दक्षिणेकडे गेलेल्या मंडळींना मध्ये काही अडचणी आल्या. त्यामुळे महिना संपून गेला. समुद्राच्या

तीरावर येऊन बसलेले आहेत. पुढे काही दिसत नाही. कुठली लंका न काय समुद्रापलिकडे असली तर समजा पण दिसत काही नाही. न दिसणे म्हणजे वस्तू नाही असा त्याचा अर्थ होत नाही. दूरत्व हा दोष आहे. दूर असलेला पदार्थ पहाण्याची शक्ति आमच्या चक्षु इंद्रियामध्ये नाही, हे अगदी अनुभवानेच आहे. म्हणून दूरत्व हा दोष मानलेला आहे. तसेच अगदी जवळ असणं हासुध्दा दोष आहे. डोळ्यामध्ये काजळ घातलेल आहे ते डोळ्याला दिसत का ? आरशात पाहिल्यावर दिसत. डोळ्यांनी बाहेरच्या जगातले सगळे पदार्थ आपण पहातो पण जवळचे त्याच्या मर्यादेत असलेले काजळ, ते मात्र दिसत नाही.

म्हणजे समीपता, सान्निध्य, अति सान्निध्य हासुध्दा दोष मानला पाहिजे. अतिदूरत्व हाही दोष मानला पाहिजे. काजळ डोळ्याला दिसत नाही म्हणून काजळ तिथे नाही असा निर्णय करता येईल का ? म्हणजे हे दोष आहेत. दोषामुळे वस्तुचे दर्शन होत नाही, ज्ञान होत नाही. म्हणजे वस्तु नाही अस सिध्द होत नाही. न दिसली म्हणजे वस्तू नाहीच अस समजता येत नाही. बुध्दिची योग्यता पाहिजे. दूर असलेले तारे पहाण्याकरता दुर्बिण हे माध्यम केलेल आहे. त्याच्या सहाय्याने एरव्ही न दिसणारे दूरचे तारेसुध्दा दिसू शकतात ना. त्याचाही विचार करता येतो ना. आमच्या नेत्रांमध्ये शक्ती नाही म्हणून नेत्र पाहू शकत नाहीत. नेत्रांची मर्यादाच तेवढी आहे. म्हणून दूरचे तारे आम्ही पाहू शकत नाही. म्हणजे दूर तारेच नाहीत असा निर्णय करायचा का ? त्या करता वैज्ञानिकांनी माध्यम निर्माण केलेल आहे. अस काही माध्यम आहे कि काय हा विचार करून आपल्या आणखी इंद्रियांवरती जास्ती किती विश्वास ठेवायचा हे आपण पाहिजे पाहिजे.

त्या वेळेला तो संपाती, त्या वानरांनी ठरविल्याप्रमाणे महिना होऊन गेला, त्यामुळे म्हणाले "परत गेलो आपण तर राजा देहदंड करणार आहे. इथच आपल बसू देवाच नांव घेऊन. प्राणत्याग करु." त्याने चौकशी केली. "काय असे का बसलात" वानर मंडळी म्हणाली, "अस अस झाल. सीतेचा शोध करायचा आहे." तो म्हणाला, "ही सीता समोर मला दिसतेय. लंका राजधानी आहे तिथल्या अशोक वनातल्या एका वृक्षाखाली सीता बसली आहे. तिच्या सभोवती राक्षसी आहेत." इतके सगळे त्याने सांगितले. पाहून सांगतोय.

आता पाहून सांगणा-याच्या शब्दावरती विश्वास ठेवायला पाहिजे

कि नको ? नुसता वाचून सांगणारा असता तर ठेवा अगर न ठेवा. ते सुध्दा चांगल जर व्यवस्थित वाचन केल असल तर हरकत नाही. परंतु हा स्वतः पाहून सांगतोय. त्या वेळेला जर त्या वानरांनी सांगितल असत कि आमच्या इतक्यांच बहुमत आहे आम्हाला एकालाही दिसत नाही आणि तुला एकटयालाच दिसते हे खर कशावरुन मानायच ? बहुमताने निर्णय करायची गोष्टी आहे का ती ? शक्य आहे का ? "शतकोटी अंधानाम् न पश्यति" म्हणतात. आंधळे जरी शंभर असले तरी आम्हाला दिसत नाही. म्हणून काही नाही दिसण्याची योग्यताच नाही. तुमच्या डोळ्यात, तुम्हाला डोळेच नाहीयेत. तुमच मत घेण्याची आवश्यकता काय ? तस त्या ईश्वराने त्याच्या नेत्रामध्ये दूरदर्शनाची शक्ती ठेवलेली आहे. गृध्द पक्षी तो आहे. आकाशातून वाटेल तितक्या दूरचे पदार्थ तो पाहू शकतो. एकदम झडप घालू शकतो. त्याला दिसले आहे ते म्हणून त्याच्या नेत्रांमध्ये असलेली शक्ती मान्य करून, तो डोळ्यांनी पाहून सांगतो आहे असा त्याच्या शब्दावर विश्वास ठेवला पाहिजे. तो विश्वास ठेवला वानरांनी. त्यांच्यामध्ये आणखी बुध्दिमतां वरिष्ठं असे मारुतिराय निर्माण झाले. मी जाऊन येतो म्हणाले. सगळ कार्य झाले.

तर अशा रीतीने ज्ञानयोग म्हणून जो आहे त्याचा विचार केला पाहिजे. तत्वविचार सारखा झाला पाहिजे. तो तत्वविचार करण्याकरता म्हणून बुध्दि आणखी स्थिर बनवली पाहिजे. हे खरे वाटते का ते खरे वाटते. हा विचार बरा वाटतो कि तो विचार बरा वाटतो. आज हा पक्ष चांगला वाटतो कि तो पक्ष चांगला वाटतो. काय उपयोग काय ? नेतृत्व हे याच्यावर अवलंबून नाही. एकदा जो चांगला वाटलेला आहे तो शेवट पर्यंत सोडायचा नाही. याच नांव नेतृत्व आहे. हा खरा नेता आहे. ही स्थिरता मनाची आहे. अस्थिर मनाने केलेला निर्णय व्यवहारात सुध्दा चुकीचा ठरतो. सगळ्यांना मान्य होत नाही. ज्ञानयोग हा विचाराधीन आहे. चांगला विचार मनाने करता आला पाहिजे. त्या मनाची स्थिती अत्यंत स्थिर बनवली पाहिजे. ती स्थिर बनवण्याकरता आणखी उपाय आहेत. योगमार्ग आहे, भक्तीमार्ग आहे. त्याचा विचार उद्याच्या प्रवचनांत थोडासा यथामति करायचा आहे.

अवधूत चिंतन श्रीगुरु देवदत्त

[सौ. नीलाताई जोशी, बोरीवली यांच्या सौजन्याने सर्व रत्नागिरी प्रवचने]

रत्नागिरी

" श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः "

बहलरजसे विश्वोपत्तौ भवाय नमो नमः ।
प्रबलतमसे तत्संहारे हराय नमो नमः ।
जनसुखाकृते सत्वोद्रिक्तौ मृडाय नमो नमः ।
प्रमहसि पदे निस्त्रैगुण्ये शिवाय नमो नमः ।।

प्रतिवर्षा प्रमाणे गुरुपौर्णिमेचा उत्सव आजपासून इथे सुरु झाला आहे. गिरगावांमध्ये नीलाताई वगैरे मंडळी रहात होती तेव्हां पासून हा सुरु आहे. अलिकडे या ठिकाणी हा उत्सव होतो आहे. भक्तिच वर्णन करत असताना भारत वर्षामध्ये भक्ति धर्म हा फार मोठा धर्म आहे अस सांगितल आहे. ती भक्ति अहैतुकी आणि अप्रतिहत असावी. हे विशेष करुन सांगितल आहे. भागवंताची भक्ति निर्हेतुक पाहिजे. सर्वज्ञ आहे परमेश्वर. साधकाची काय इच्छा आहे, त्याच कल्याण कस करायच याच सर्व ज्ञान आणि तशी शक्ति आहे ईश्वराजवळ. आपण मनामध्ये हेतु धरुन [करण] ही थोडी [गौण] गौण भक्ति आहे. हा एक प्रकार.

आणि अप्रतिहत पाहिजे. मध्ये कोणताहि प्रतिबंध आला तरी थांबून उपयोग नाही. अखंड भक्ति पाहिजे. अशा उत्सवाच्या निमित्ताने अशी भक्ति करायची आपल्या वाणीला, शरीराला, मनाला सवय होण्याकरता हा अभ्यास आहे. प्राचीन सर्वहि संत महात्म्यांनीहि हेच सांगून ठेवल आहे.

ज्ञानेश्वर महाराजांनी पाया घालून दिला. वारी सुरु झाली. असंख्य मंडळी जमतात. साम्यवाद भारतामध्ये यायला किती वेळ लागेल किंवा येईल कि नाही हे पंढरपूरला जाऊन आपण एकदा पाहील म्हणजे कळत. समाजातल्या सगळया थरातील मंडळी आहेत. सुशिक्षित आहेत. अशिक्षित आहेत. श्रध्दावान आहेत. तर या उत्सवाच्या निमित्ताने अप्रतिहत भक्ति घडावी, त्या वेळेपुरत का होईना आपल मन तिकडे लागाव. त्या करता संतानी हे सांगून ठेवलेल आहे.

भक्तियोग आणि कर्मयोग हे दोन वेगळे वेगळे आहेत अस नाहीये. कर्मयोगालाच भागवत धर्म म्हणताहेत. एकादशस्कंदामध्ये वसुदेवांनी नारदांना "भागवत धर्म कोणाचा ?" असे विचारले. आणि त्यांनी निमी राजाच्या यज्ञातील हकिकत सांगितली.

निमी राजाचा यज्ञ चालू झालेला असतानातिथे नऊ जीवन्मुक्त [महात्मे] योगींद्र आले. त्या नऊ वृषभदेवांच्या ज्ञानी पुत्रांना तिथे आलेले पाहून निमी राजाला आनंद झाला. त्याने भागवत धर्माबद्दल प्रश्न केलेला आहे. "भागवत धर्म कोणता ?" "भागवदभक्त काय वागतात ? कसे वागतात ? एकाच श्लोकामध्ये त्या योगींद्रानी भागवत धर्माचे रहस्य वर्णन केले आहे. तो श्लोक प्रसिध्द आहे. सगळे म्हणतात.

कायेन वाचामनसेंद्रियैर्वा ।
बुध्दयात्मना वा प्रकृतिस्वभावात ।
करोमि यद्यत सकलं परस्मै ।
नारायणायेति समर्पयामि ।।

स्वतः ज्यांच आचरण अस चालू आहे त्यांचा हा आदेश आहे. अजूनही अशी ज्ञानी मंडळी असतील. देवाला जगाची काळजी आहे त्या करता त्यांना प्रेरणा होऊन तेहि सगळीकडे जात असतात. त्यांच ज्ञानदानांच कार्य चालू आहे. जीवाच्या कल्याणाचे जे शास्त्रीय मार्ग आहेत, त्यांच दिग्दर्शन करण, उपदेश करण हे त्यांच कार्य आजही-
-चालू आहे.

अर्जुनाला संपूर्ण गीता सांगून झाली. आणि "हे सगळ तुला सांगितल याचा तू पूर्ण विचार कर" हेहि सांगितल.

प्रकृतिंयान्ति भूतानि निग्रहं
किम करिष्यसि

जाता जाता त्यांनी सांगितल. निग्रहं किं करिष्यति याचा अर्थ करीत असताना भाष्यकारांनी लिहिलय-

मया वा अन्येन क्रियमाणोपि

मी जरी निग्रह करु लागलो तरी होत नाही. दुर्योधानाने युध्द थांबवाव म्हणून धर्मराजांनी श्रीकृष्णांना " आपण जाऊन सांगा त्याला , शिष्टाई करा" अस सांगून पाठवल. सर्व विश्र्वाच पालन करण, सरंक्षण करण ही शक्ति ज्यांची आहे ते धर्मराजाचे दूत म्हणून गेले. त्यांनी पुष्कळ समजावले. " दुःष्यासनाचा वाडा तुम्हाला देतो तिथ रहायला या " म्हणाले. पण दुर्योधान म्हणाला, " नाही "! " तुमची सभेची वेळकोणाची आहे ती मला सांगा त्यावेळी मी मला काय सांगायचय ते सांगेन. आमची उतरण्याची सोय दुसरीकडे आहे " विदुराच्या घरी रहायला गेले. त्यांनी त्या दुर्योधानाला सगळा उपदेश केला भगवान प्रत्यक्ष उपदेश करताहेत. पण दुर्योधानाची बुध्दि काही बदलली नाही. "प्रकृतिः स्वभावः " अस गीतेत सांगितल आहे. जे जे कर्म होत आपल्याकडून ते सर्व आपल्या प्रकृति प्रमाणे घडत असते. पूर्व संस्कार जसे आले असतील त्याला अनुसरुन कर्म होतात. त्याच्यामध्ये बदल कोणीही करु शकत नाही. म्हणून अर्जुनाला उपदेश करीत असताना हा एक सिध्दान्त त्यांनी सांगितला आहे. "मी त्या दुर्योधानाची बुध्दि बदलावी म्हणून प्रयत्न केला पण नाही बदलली." अस भगवान म्हणाले आणि नंतर युध्दाला सुरुवात झाली. म्हणून अर्जुनाला त्यांनी शेवटी सांगितल, अर्जुनाची बुध्दि बदललेली आहे. त्याच्या चित्तामध्ये भागवद भक्ति आहे. अर्जुन मोठा कर्मनिष्ठ आहे. कर्मनिष्ठ याचा अर्थ सध्या कर्मठ असा उपहासाने करताहेत. तर तो कर्मनिष्ठ होता. गुरुभक्ति आहे, ईश्र्वर भक्ति आहे, अत्यंत सुशील आहे. शास्त्रज्ञ आहे. तरीसुध्दा त्याच्या चित्ताला मोह झाला.

विवेक नाहीसा झाला. आणि विवेक नाहीसा झाल्यावर त्याची बुध्दि उलट झाली. युध्द करण हे क्षत्रियांचे कर्तव्यकर्म आहे. सर्वांचे दुःखापासून सरंक्षण करणारा क्षत्रिय आहे. दुःखापासून सरंक्षण करण हे क्षत्रियांच कार्य आहे [ अशा अर्थाचा श्लोक कालीदासांनी दिलीप राजाच्या तोंडी घातला आहे. ] त्या करता शौर्य पाहिजे. त्याग पाहिजे. हे सगळ गुण पाहिजेत. पण इथे तर अर्जुनाची सगळीच उलटी बुध्दि झाली. "अहिंसा परमो धर्मः " म्हणायला लागला. "काही नको " म्हणाला. समोर शत्रु घेऊन उभे राहिलेले आहेत. हा रथामध्ये बसून निघालेला आहे. " दोन्ही सैन्याच्या मध्ये माझा रथ नेऊन उभा करा. कोण कोण युध्दाला आलेत ते पहायचय " अस भगवंतांना म्हणाला. इतका आवेश होता.

पांच वर्षांपर्यंत स्वर्गलोकामध्ये राहून सर्वहि अस्त्रविद्यांचा त्याने अभ्यास केलेला आहे, पुढ युध्द करायचय आपल्याला या उद्देशाने. अन्यायाबद्दल शासन करायचय. हे सगळ असूनसुध्दा ऐन वेळेला बुध्दि बदललेली आहे. परंतु भगवान श्रीकृष्ण परमात्मा त्याला गुरु भेटलेले आहेत. आणि याच्याहि मनामध्ये त्यांच्याबद्दल आदर बुध्दि आहे.

तोंडावर जरी म्हणाला, हे युध्द मला मान्य नाही, शास्त्रा मान्य नाही. वगैरे तरीसुध्दा शेवटी त्याला आपल काही तरी चुकतय अस त्याला वाटल. भगवान स्वस्थ बसून राहिले. काय काय म्हणतोय म्हणू दे, म्हणाले अर्जुनाची अप्रतिहत भक्ति चालू होती. त्याच्या केसातूनहि कृष्ण, कृष्ण अस ऐकायला यायच म्हणतात. म्हणजे इतका कृष्णभक्त तो होता. त्यामुळे त्याची बुध्दि सुरवातीला जरी बदलली तरी लगेच त्याला आपला दोष समजून आलेला आहे. आणि शेवटी " मला काही कळत नाही " अशी त्याने कबूली दिली. "धर्माधर्माबद्दल माझ्या मनामध्ये मोह उत्पन्न झाला आहे. धर्म कोणाचा आणि अधर्म कोणाचा हे मी समजू शकत नाही मला आपण मार्गदर्शन करा. मी आपला शिष्य आहे. आपल्याला शरण आलेलो आहे. निरहंकार होऊन प्रार्थना केल्यावर गीतेंतील ज्ञानाच्या उपदेशाला आरंभ झालेला आहे. आणि त्याच कल्याण झालेल आहे. त्याची बुध्दि बदलली. "करिष्ये वचनं तव " तुमची आज्ञा मलामान्य आहे अस म्हणाला शेवटी. "मला बाकिचा काही विचार करायची जरुरी नाही." बुध्दि ही बाजूला ठेवली त्याने.

ईश्वराची आज्ञा आहे. आमच्या बुध्दिचा तिथे काय उपयोग आहे ? तर ही जी भागवद भक्ति त्याच्या चित्तामध्ये होती त्यामुळे त्याच्या हातुन जे कर्म घडलेल आहे – कर्तव्य कर्म हे व्यवस्थित पणाने घडलेल आहे. आणि अस निरहंकार वृत्तीने घडलेल आहे. आणि अस निरहंकार वृत्तीने घडणार कर्म म्हणजेच भागवत धर्म आहे.

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ [९. २७]

सर्वहि कर्म मला अर्पण कर म्हणजे तो भक्ति योगच आहे. भागवत धर्म आहे. अस त्या योगींद्रांनी निमी राजाला सांगितल. कर्म ही किती साधनांनी होतात याचाही त्यांनी उल्लेख केला आहे. कायेन– शरीराने कर्म होतात. केवळ शरीराने होतात कि त्याला प्रेरक कोणी तरी आहे हा दुसरा विचार आहे. निरनिराळया कर्मांचा उल्लेख करताना कायिक, शरीराने होणाऱ्या कर्मांचा त्यांनी प्रथम उल्लेख केला आहे. मनामध्ये जरी आल तरी शरीराने होऊ नये. त्या नंतर वाचा. वाणी दिलेली आहे ईश्वराने मनुष्यांना. इतर प्राण्यांना वाणी दिलेली नाही. त्यांची वाणीत्यांना आपसात समजते. ती गोष्ट वेगळी. पण मनुष्यांच्या वाणीचा विशेष उपयोग होतो आहे. इतरांना मार्गदर्शन करता येत.

त्या प्रमाणे मन एक मुख्य कर्म साधन आहे. इंद्रियांनी कर्म होताहेत. बुध्दिने कर्म होताहेत. जीवात्माहि कर्म करतो आहे. अस मीमांसाकार सिध्दान्त मानतात. आणि पूर्व जन्मात बुध्दिवर झालेले संस्कार तसे अभिवृत्त होतात. " बुध्दि कर्मानुसारिणी " म्हणतात. पूर्व कर्मानुसार स्वभाव बनतो.

ही इतकी कर्माची साधन त्यांनी दाखिवली. यांच्या व्दाराने कर्म होतात म्हणाले, चांगली किंवा वाईट. दोन्ही प्रकारची आहेत. पाप कर्महि आहेत. पुण्य कर्महि आहेत. कोणाची पापकर्म आणि कोणाची पुण्यकर्म हे आपल्या बुध्दिने काही ठरवता येत नाही. पवित्र कोणाच आणि अपवित्र कोणाच हे शास्त्रानेच समजून येणार. फुलाचा वास घेतल्यावर ते देवाला वाहायच नाही ते अपवित्र झाल.

"त्यात काय झाल ? आम्ही वास घेऊन देवाला दिल म्हणून काय बिघडल ? चांगला वास आहे कि नाही ते पाहून आम्ही देवाला दिल." अस म्हणणार. पण ते पवित्र नाही. देवाला अर्पण करायला योग्य नाही. अस शास्त्रानेच सांगितलेल आहे. ज्यांनी पूजेची पध्दत सांगितली त्यांनीच पूजेची साधन कशी असावीत हे सांगितल. तर हा सगळाहि आपल्या बुध्दिच्या पलिकडचा विषय आहे. वेद, शास्त्र म्हणजे सगळी ईश्वराची आज्ञा आहे./ त्या सर्वहि विश्वाला समजून सांगण्याकरिता म्हणून शास्त्र आहे. न्यापक आहे. दाखिवण फक्त. कारक नाही शास्त्र . केलच पाहिजे अस शास्त्र म्हणत नाही. "यदिच्छसि तथा कुरु " म्हणून भागवानांनी सांगितलच आहे.

तर ते शास्त्र प्रमाण जे आहे त्या शास्त्र प्रमाणाने सर्वहि मार्गदर्शन करुन ठेवलेल आहे- चांगली कर्म कोणाची आणि वाईट कर्म कोणाची? जीव हा कर्माच्या आधीन आहे. कर्मामुळे जिवदशा आलेली. कर्मामुळे पुन्हा पुन्हा जन्म घ्यावे लागतात. हे सगळ्या संतानी सांगितलेल आहे. शरीराने चांगली कर्म व्हावीत . वाणीने चांगली कर्म व्हावीत. पूर्वीच्या बुध्दिला अनुसरुन . म्हणजे चांगली बुध्दि होण्यासाठी चांगलीच कर्म केली पाहिजेत. प्रकृति चांगली बनिवली पाहिजे. हा एक मार्ग आहे. इतरहि दुसरे मार्ग आहेत.

रामायणामध्ये रामाचं चरित्र आणि रावणाच चरित्रहि आहे. रामाच्याकडून वाणीचा, शरीराने, मनाने कर्म झाली आहेत. त्यांनीहि शास्त्र मान्य केलेल आहे. शास्त्राची मान्यता म्हणजे स्वत:च्या सुखासाठी तेवढ शास्त्र मान्य रावणाला. शास्त्राप्रमाणे तपश्चर्या केली रावणाने. वेदाची पद पाडली म्हणतात रावणाने. मोठा शिवभक्त होता. रावण. पण त्याचा जो स्वभाव आला पूर्व जन्मातील कर्मानुसार त्याप्रमाणे शरीराने, वाणीने, मनाने सर्व कर्म घडली. शेवट पर्यंत त्याने आणखी काही माघार घेतली नाही भावार्थ रामायणामध्ये नाथ महाराजांनी या बद्दल थोडस सांगितलय.' राम कोण आहेत हे रावण जाणून होता. देवावर भक्ति होती त्याची. नारद, सनत् कुमारांसारख्या ऋषिंना त्याने विचारल होत. त्यांनी सांगितल रामापासून मरण आल म्हणजे तू मुक्त होशील. पुष्कळ आयुष्य मिळवल होत त्याने. शास्त्रीय साधनांच अनुसरण करुन आपली उन्नती त्याने करुन घेतली. पण त्या उन्नतीचा उपयोग लोकांना आणखी अनुकूल झाला नाही. त्रास देण्याकरता झाला. अहंकार जास्ती जास्ती वाढलेला आहे. पण त्याला काय बुध्दि झाली आणि त्याने सनतकुमार , नारदांना विचारल म्हणतात- कोणापासून मरण आल म्हणजे पुनर्जन्म नाही ?? तेव्हा ते म्हणाले - विष्णूपासून . अयोध्ये मध्ये अवतार घेणार आहेत.

आता त्यांच्यापासून मरण यायच म्हणजे त्यांचा द्रोह कसा करायचा ते नारदांनी सांगितल म्हणतात, त्यांची पत्नि तू हरण कर. म्हणजे ते तुझ्या बरोबर युध्द करुन तुला मारतील. म्हणून त्याने सीतेच हरण केल असा एक उल्लेख आहे. अनेक प्रकारची रामायणे आहेत. आणि त्याप्रमाणे भेद दाखवलेत मुद्दाम. शेवटपर्यंत त्याने विरोधच केला. भाऊ गेला, मुलगा गेला, प्रधान

/ ...... विश्वाचा ...... निर्माण केले आहे

गेले, पहातो आहे सर्व. आपल्या विरुध्द शक्ति किती मोठी आहे हे पाहूनसुध्दा मानायला तयार नाही. सगळ्यांनी उपदेश केला त्याच्या पत्निनं, मंदोदरीने उपदेश (कुंभकर्णाने (केला) उपदेश केला. इंद्रजिताने उपदेश केला हुस-याची स्त्री देऊन टाका. पण तुम्ही सगळे भित्रे आहात, असच सांगितल त्याने सर्वांना तुम्हाला भिती वाटते आहे रामाची राक्षसी प्रकृति, असुरी प्रकृति आणि दैवी प्रकृति. तीन प्रकारच्या प्रकृति दाखवल्या आहेत नवव्या अध्यायामध्ये. सोळाव्या अध्यायामध्ये असुरी संपत्ति आणि दैवी संपत्ति, अशा दोनच प्रकारच्या संपत्ति दाखवल्या आहेत. पण राक्षसी आणि असुरी असा एक विभाग नवव्या अध्यायामध्ये भागवंतांनी सांगितलेला आहे.

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतस:।
राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिता:॥ [९:१२]

ही प्रकृति ज्यांची बनलेली आहे, ते प्रयत्न करतात, म्हणाले. केवढा प्रयत्न आहे! तंत्रशास्त्राचा अवलंब करुन त्या अग्नितून इंद्रजिताचा रथ उत्पन्न होत होता त्या इंद्रजिताच्या यज्ञाच्या प्रक्रीयेने म्हणतात. आगमाचा अवलंब करुन तंत्रमार्गाच्या साहयाने आपल्या शक्तिचा विकास त्याने करुन घेतला. पण त्याच्याहि पेक्षा पुढे मारुतिची शक्ति आहे. वासनांची शक्ति आहे. त्याचा अनुभव आला पुढे रावणाला. तर आपली प्रकृति चांगली राहिलेली नाही. हे रावणाला कळलच नाही शेवटपर्यंत आपण चुकलोंच नाही. आपण योग्य वागलो आहोत म्हणून शेवटपर्यंत त्याने आणखी विरोध केला. सगळ्यांचा नाश झालेला असताना सुध्दा त्याच्या मनावर परिणाम झाला नाही. ती राक्षसी किंवा असुरी प्रकृति कायम राहिली आहे. दैवी प्रकृति आपली व्हावी म्हणून प्रयत्न करणारे महात्मे आहेत. ईश्वर भक्ति आहे, गुरु भक्ति आहे, आणखी संताची संगती होती आहे. त्याचा बरोबर चर्चा विचार चाललेला आहे- योग्य काय, अयोग्य काय कोणाची कर्म चांगली, कोणाची कर्म वाईट, हा सगळा विचार नेहमी करायचा. धर्मराजांसारख्यांचा आपली प्रकृति चांगली करावी, आपला स्वभाव चांगला करावा या करता त्यांचा प्रयत्न चालला होता. धर्माचरण हे त्या करता ते करत होते. द्रौपदिनेसुध्दा मध्ये मध्ये सांगाव धर्मराजांना, तुमच्या या धर्माचरणाने धर्माबद्दल संशय येऊ लागलाय माझ्या मनात. धर्माचरण चांगल कि वाईट कुणास ठाऊक ईश्वर आपल्या भक्ताकडे लक्ष देतो कि नाही हाहि संशय मनामध्ये निर्माण झालाय, म्हणाली. तुम्ही इतक धर्माचरण करुन काय मिळाल तुम्हाला ? अधर्माने वागणारा दुर्योधन सम्राट राजा झाला आहे आणि धर्माने वागणारे तुम्ही वनामध्ये आलेले आहात. या वरुन मला संशय आला.

धर्मराजांनी म्हणाव, त्या करता मी धर्माचरण करत नाहीये. राज्याकरता धर्माचरण माझा नाहीये. भागवद् भक्ति किंवा कर्मयोग राज्याकरता नाही.

राज्य मिळविण्याकरता धार्माचरण करण हे -- माझा काम नाही. ते धर्माच वाणिज्य होईल, म्हणाले.

आसुरी किंवा राक्षसी प्रवृत्तीचे जे जीवात्मे आहेत त्याच मात्रा सगळ कर्म सहेतुक होत आहे. धार्माचरण करतात ते, नाही असं नाही. रावणाने, इंद्रजिताने, कुंभकर्णाने, सगळयांनी तपश्चर्या केली. आपल्याला ऐहिक पारलौकिक सुख मिळाव आपली उन्नती व्हावी आपल्याला संरक्षण मिळाव याच उददेशाने धार्माचरण त्यांनी केल. सकाम, सहेतुक धार्माचरण. पण धर्मराजाची वृत्ती मात्रा तशी नाहीये. भागवद् भक्ति जी करायची कर्तव्यकर्म किंवा धार्माचरणाचे अनुष्ठान जे करायच ते केवळ ईश्वराची आज्ञा समजून करायचय. ईश्वराच्या भक्तामध्ये त्यांनी तीन प्रकार सांगितले. तामस भक्त, राजस भक्त आणि सात्विक भक्त. तीन वर्ग केलेत मुददाम.

आपला जो शत्रु असेल त्याचा नाश करण्याचा प्रयत्न करायचा देवाची भक्ति करायची पण आपल्या शत्रूचा नाश व्हावा या उददेशाने करायची. इंद्रजिताला कपटी म्हटल आहे ते त्या करता. त्या गुहेमध्ये केवढी संरक्षणाची योजना केली होती त्याने, पण तिथ पर्यंत जाऊन पोहोचले बिभिषण, मारुति लक्ष्मण. अदृष्य होऊन बाण वर्षाव करायचा आणि वानरांना मारायच. ही युध्दनीती नाहीये. पण युध्दनीतीचा विचार नाहीये. धार्मिक, सात्विक प्रवृति ज्यांची आहे त्याच्यासाठी तो विचार आहे. धर्मशास्त्रा जे सांगेल त्याप्रमाणे वागायच.

धर्मराजाने दिलेली उत्तरे ऐकून यक्ष संतुष्ट झाले. ते धर्मराजाला म्हणाले, माझ्या प्रश्नांची उत्तरे तू उत्तम दिलीस. माझा समाधान झाल. तुझे चार भाऊ मरून पडलेले आहेत. यापैकी एक कोणता तरी भाऊ मी जिवंत करतो. कोणाला करु ? धर्मराज म्हणाले, या नकुलाला जिवंत करा. यक्ष म्हणाले अरे, पुढे तुला राज्य मिळवासच आहे. लढाई करायची आहे त्यासाठी अर्जुन किंवा भीम तुझ्या उपयोगी पडणार आहे. हा नकुलासारखा लहान मुलगा कसाय तुझ्या उपयोगी पडणार ? हा जिवंत व्हावा अशी तुझी का इच्छा आहे ? धर्मराजांनी कारण सांगितले म्हणाले मला दोन माता. त्या पैकी कुंती अजून जिवंत आहे. दुस-या माझ्या मातेने सहगमन केलेले आहे. तर माझ्या मातेचा मी मुलगा अजून जिवंत आहे. त्या प्रमाणे त्या माद्रीचा मुलगा हा नकुल जिवंत झाला तर तिला समाधान वाटेल. म्हणून मी नकुलाला जिवंत करा अस म्हटल.

अर्थशास्त्रा पुढ आल नाही. पुन्हा आपल्याला राज्य मिळवायच आहे. हा विचार मागे ठेवलेला आहे. तर धर्मराजांची ही धर्मशील वृत्ती पाहून यक्षाने चारही भावंडांना जिवंत केलेल आहे. त्यांना जिवंत करा अस वेगळ मागण मागाव लागलेल नाही.

तर ईश्वराची आज्ञा आहे म्हणून धार्माचरण करायच ही बुध्दि आहे शत्रूची हिंसा व्हावी, शत्रूचा नाश व्हावा या करता भक्ति करणारा वेगळा. दुर्योधनसुध्दा यज्ञयाग करत होता म्हणतात. धर्मराजांनीहि यज्ञयाग केले पण लोकांच्यामध्ये आपण धर्मशील

आहोत अशी/ कि्र्ती व्हावी म्हणून दुर्योधन धर्माचरण करीत होता. धर्माचरण दंभाने किंवा शत्रुहिंसा व्हावी म्हणून करणं ही तामस वृत्ती आहे, असं शास्त्रकार सांगतात. तामस वृत्तीचा काहीही उपयोग नाहीये. मोघाशा मोघा कर्मणा ------ भगवंतांनी सांगून टाकल आहे. त्याच्यापेक्षा थोडी श्रेष्ठ भक्ति म्हणजे सर्व सांसारीक सुख आपल्याला मिळावी, किर्ती व्हावी आपली उत्तम प्रकारच ऐश्वर्य आपल्याला मिळाव अशा इच्छेने देवाची भक्ति करणारे राजस भक्त आहेत. पूर्ण आनंद किंवा आत्यंतिक दु:ख निवृत्ति हे जे फल आहे- मोक्ष. तिसरा सात्विक भक्ताचा प्रकार अनंत जन्मामध्ये माझ्या हातून किती तरी बरी वाईट कर्म झाली असतील. ती सगळी संपली पाहीजेत. म्हणून देवाची भक्ति करायची देवाच्या कृपेने माझी सगळी कर्म संपून जावीत. संसारातून मी मुक्त व्हाव अशी इच्छा धारण करुन तो कर्म करतो आहे. ईश्वरार्पण बुध्दिने धर्माचरण करण ही ईश्वराची आज्ञा आहे. त्या आज्ञेच पालन करण हे आपल कर्तव्य आहे या बुध्दिन धर्माचरण करणारा सात्विक भक्त आहे. "मम उपात्त क्षयव्दारा श्री परमेश्वर प्रित्यर्थ " असाच संकल्प करतात. संध्या म्हणा देवपुजा करताना. दुरित क्षय व्हावा. "दुरितांचे तिमीर जावो" ज्ञानेश्वर महाराजांची प्रार्थना हीच आहे. वैयक्तिक आणि सामुदायिक दुरितांनी नाश होतो.

रावणाच्या प्रधानालासुध्दा बिभिषणाने दोषी ठरविलेले आहे. "तुम्ही केलत ते चांगलच केलत, सीतेला आणलत ते वगैरे सांगून रावणाची बुध्दि तशीच ठेवलीत तुम्ही. तुम्ही सुध्दा दोषी आहात." तर या प्रमाणे चांगली संगती घडण, चांगल मार्गदर्शन घडण, हा सगळा जो प्रयत्न करायचा आहे तो प्रयत्न म्हणजे आपली प्रकृति, आपली बुध्दि चांगली झाली पाहीजे. आणि ह्या मनुष्य जन्मात तो प्रयत्न करता येण्यासारखा आहे. चांगल किंवा वाईट दुस-या जन्मात काय समजणार आहे ? त्या फक्त भोग योनी आहेत ना मांजराने . कपाटातल दूध प्यायल म्हणून काही त्याला पाप नाही. अस जर पाप लागायला लागल तर ते जीव केव्हांच त्या जन्मातून मोकळे होणार नाहीत ना! त्या फक्त भोग योनी आहेत.

तर कर्म करुन कर्माच फल मिळवण्यासाठी ही कर्मभूमी आहे. आणि ती कर्म, चांगली वाईट समजून घेऊन कर्म केली पाहीजेत. ईश्वराची भक्ति सेवा तो कर्म योगच आहे. संपूर्ण कर्मयोग हा दास्यभक्ति मध्ये अंतर्भूत होतो. अस म्हणतात. ईश्वराची आज्ञा पालन करायची आहे. भरताने रामाची फक्त आज्ञा पालन केली. राम म्हणाले, आपल्या दोघांना आज्ञा पालन केली पाहीजे. मला वनांत जायची आज्ञा आहे तुला राज्य करायची आज्ञा आहे. हे सांगून रामांनी त्याला राज्य दिल. पण त्याची बुध्दि चांगली होती. शुध्द दैवी प्रकृतिचा भरत असल्यामुळे राज्य करतो म्हणाला. तुमच्या पादुका द्या. म्हणाला. पादुका घेऊन गेला. सिंहासनावर पादुका मांडल्या. छत्र चामर वगैरे सगळी राजचिन्हे त्या पादुकांवर ठेवली. आपण काहीही राजभोग घेतला नाही.

चौदा वर्षे फक्त राज्य करणार, म्हणाला. म्हणजे त्यागबुध्दिने त्याने राज्य ताब्यामध्ये घेतल, केल. चौदा वर्षे संपल्यानंतर मी राजा नाही म्हणाला. म्हणजे राज्य सोडायचा दिवसहि त्याने निश्चित केला होता. नंतर जिवंतसुध्दा राहाणार नाही, म्हणाला.

आणि दुर्योधनाची वृत्ति ही निराळी द्यूत क्रिडा केली. पांडवांना त्यांच्या पत्निला जिंकल, त्यांचा छळ केला, सगळ केल. पण त्या धृतराष्ट्राच्या मनावर काही परिणाम झाला. त्याने त्या द्रौपदिला सांगितल, तुला काही वर मागायचा असेल तर मागून घे. ती म्हणाली, पांडव हे दास्यातून मुक्त करा. त्यांची शस्त्रे त्यांना देऊन टाका. या पेक्षा दुसरा वर मला नको. अस झाल. सगळे पांडव निघाले पण पुन्हा दुर्योधनाने धृतराष्ट्राला सांगितले आणखी एक डाव खेळण्याची परवानगी द्या. झाल. पुन्हा धर्मराजाला बोलावले. तो आला. तोहि जास्ती धर्मशास्त्रात सापडला आहे ना. अर्थशास्त्राकडे अजिबातच पहायच नाही. आला पुन्हा. दुर्योधनाचे अट घातली. या खेळात ज्याचा पराजय होईल त्याने बारा वर्षे वनवास आणि एक वर्षे अज्ञातवासात राहायच. म्हणजे बुध्दि किती उत्तम वापरली त्याने. बारा वर्षे वनवास हरकत नाही. पण त्या अज्ञातवासाच्या अटीप्रमाणे अज्ञातवासात जर पांडव उघडकीस आले तर पुन्हा बारा वर्षे वनवास आणि एक वर्षे अज्ञातवास. म्हणजे आपल्या ताब्यात आलेल राज्य कायम आपल्या ताब्यात राहाव. पांडव अज्ञात राहाणाच शक्य नाही. हे त्यालाही माहीत होत. दुर्जनांनी जरी सज्जनांना त्रास दिला तरी सज्जनांची योग्यता त्यांना माहीत असते.

पांडव अज्ञात राहू शकणार नाहीत. पण दुर्योधनाचे हेर पांडवांच्या शोधात जाऊन आले पण त्यांना काही शोध लागला नाही. तेव्हा भीष्म, द्रोणांनी त्याला सांगितले कि पांडवांचा शोध असा बाहेरुन लागणार नाही. ज्या ठिकाणी धर्माचरण करणारेक लोक आहेत, ज्या ठिकाणच्या लोकांची प्रकृति चांगली बनलेली आहे अस जिथे आढळेल तिथ पांडव आहेत अस तू समज. अस सरळ शोधायला जाऊन पांडव सापडणार नाहीत. यमधर्माने त्यांना वर दिला होता कि तुम्ही तुमच्या नेहमीच्या रुपाने जरी फिरलात तरी तुम्हाला कोणी ओळखणार नाही.

तर दुर्योधनाची ही अशी बुध्दि आहे. जन्मभर पांडवांनी वनवासातच रहावं आणि राज्य आपल्या ताब्यात असावं भरताची बुध्दि तशी तर दुर्योधनाची अशी.

तर "कायेन वाचा मनसेंद्रिये वा -----" ही जी सगळी साधन सांगितली आहेत त्या साधनांकडून तशी सत्कर्म तरी घडावीत अशी इच्छा पाहीजे मनांत, चांगली वाईट समजून घेतली पाहीजेत. वाईट कर्माकडे जर प्रवृत्ति असेल तर ती कमी करण्याचा प्रयत्न केला पाहीजे. भक्तिमार्ग कर्माला सहाय्यभूत, पोषक आहे. भक्तियोग कर्मशुध्दि करतो. ते कर्माचरण सुध्दा शुध्द होण्याकरिता म्हणून हे साधन सांगितल आहे.

करोमि यद्यत् ..........

नारायणायेति समर्पयामि T

संतानी जरी तोंडाने एखादे वेळेस सांगितल नाही तरी त्यांच्या आचरणावरुन चांगली कर्म कोणती आणि वाईट कर्म कोणती हे समजून घेत. त्या प्रमाणे आपण आपल्याला तपासून पाहू शकतो. संत मंडळी महाजन जशी वागतील तोच धर्म आहे. एकदा आपण ते समजून घेतल्यावर त्या प्रमाणे वागणं कांही कठीण नाही. प्रकृति पूर्व जन्माप्रमाणे जी आलेली आहे ती बदलता येणं शक्य नाही. अक्रुरजींनी धृतराष्ट्राला पुष्कळ उपदेश केला पण तो म्हणाला, दुर्योधन माझा मुलगा आहे मी त्याच्या बाबत काहीही करु शकत नाही. त्याला मी बदलू शकत नाही. या सगळ्यामुळे सर्वनाश होणार आहे हे मला माहीत आहे पण मी असहाय्य आहे.

भागवंतांच विराट विश्वरुप अर्जुन पाहू शकला नाही, त्याला ते तेज सहन होईना. शेवटी तो म्हणाला, मला आपल तुमच नेहमीच रुप दाखावा. मग त्याला चतुर्भुज रुपात दर्शन दिल भागवंतांनी. तेव्हा भागवान म्हणाले मी प्रसन्न झालो म्हणून तुला हे रुप दिसल –

मया प्रसन्नेन तवार्जुनेदं
रुपं परं दर्शितमात्मयोगात् ।। [११-४७]

"प्रसाद " या शब्दाचा अर्थ आचार्य महाराजांनी –
"प्रसाद: अनुग्रह बुध्दि: "असा केला आहे भक्ताची इच्छा पूर्ण व्हावी असा सद्गुरुंचा संकल्प झाल्यावर मग अर्जुनाला विश्वरुप दिसल आहे. नाही तर दिसल नसत. परमात्म्याचे संपूर्ण स्वरुप दर्शन झाल पाहिजे ना त्या विश्वरुपाच दर्शन व्हाव, कुठ तरी आपली बुध्दि स्थिर व्हावी म्हणून प्रतिमा पुजा वगैरे सांगितल आहे आरंभाला. विभूतीयोग त्या करता भागवंतांनी मुद्दाम सांगितला आहे. ज्या ज्या ठिकाणी भागवंताचा विशेष आविर्भाव झालेला आहे त्या त्या ठिकाणी ध्यान कराव म्हणजे मग भागवंताच विश्वरुप समजून घेत.

तर ते दर्शन आपल्याला व्हाव तशी आपल्या मनाची, बुध्दिची तयारी व्हावी, आपला स्वभाव बदलून जावा अशी इच्छा करणारे, दैवी प्रकृति मिळवण्याकरता प्रयत्न करणारे धर्मराजा सारखे मोठे जीवात्मे होऊन गेले त्यांच चरित्र व्यासांना लिहाव लागल आहे. धर्मराजाच चरित्र म्हणून महाभारत आहे. "यतो धर्म:स्ततो जय: " हा सिध्दान्त त्यांनी धर्मराजाच्या चरित्रावरुन मांडला आहे.

हे सगळहि आपण समजून घ्यायच आहे. आणि समजून घेऊन त्या प्रमाणे आपला अहंकार कमी करायचा आहे. ईश्वराला सर्व अर्पण करायच याचा अर्थ कर्तृत्व सर्व ईश्वराच आहे माझ काहीही नाही ही बुध्दि ठेवायची. ही बुध्दिची तयारी होण म्हणजेच ईश्वराला कर्म समर्पण झालेल आहे. मीच करणारा आहे असा अभिमान जो पर्यंत अंत:करणामध्ये आहे तो पर्यंत योगमार्ग काय नि भक्तिमार्ग काय, प्राप्त होणार नाही. योगमार्ग तरी काय प्रयत्नवादच आहे. योगशास्त्रकारहि प्रयत्नवादी आहेत.

प्राणायामादिकांनी मनाचा निरोध होऊ शकतो अस ते म्हणतात.

त्या मुचकुंदराजाची भेट झाल्यावर भागवंतानी त्याला सांगितल, तुझी बुध्दि उत्तम आहे. सर्व शक्ति संपन्न ईश्वर आहे ही जाणीव तुझ्या बुध्दिमध्ये आहे.

अशी जाणीव, ईश्वर भक्ति, प्रेम जर मनामध्ये नसेल सर्व माझाच कर्तृत्व आहे, माझ्या शक्तिने आणि बुध्दिने मी माझा कल्याण करुन घेणार अशी जर बुध्दि असेल तर त्या माणसाच मन कधी ताब्यात येत नाही. भगवान म्हणतात प्राणायामादिकांनी मनाचा निरोध करण्याचा प्रयत्न [सुरु] झाला. कदाचित निरुध्द झाल असेल मन, पण वासनाक्षय होत नाही. वासनाक्षयाकरता ईश्वरभक्तिची जबाबदारी आहे. "अभक्तानाम्" हा सामान्य शब्द घातला आहे, त्यांनी. ईश्वराची भक्ति असो किंवा गुरुभक्ति असो भक्ति घडली पाहिजे. भक्तिच सहाय्य असल्याशिवाय कर्म हे शुध्द होत नाही. शुध्द कर्म झाल्याशिवाय आपली प्रकृति ही दैवी प्रकृति होणार नाही. आसुरी, राक्षसीमध्ये राहून किती तरी जन्म वारंवार घ्यावे लागतील. मिळेल सुख कदाचित पण ते टिकणार नाही. कर्माचरण करुन, यज्ञयाग करुनहि स्वर्गलोकाची प्राप्ति होते अस शास्त्रासांगत निदान सत्कर्माकडे प्रवृत्ती व्हावी म्हणून त्यांनी ते सांगितल आहे. पण ते जे यज्ञकर्म करुन मिळवलेल आहे. त्याला कालमर्यादा आहे. या ठिकाणी पांच वर्षाची मर्यादा आपण मानतो. कोणताही मंत्री निवडून आल्यानंतर पांच वर्ष मंत्रीपदावर राहतो. ते सुध्दा आता राहिलेल नाही. त्यातहि पांच वर्षापेक्षा कमी जास्ती होतय. तशी मर्यादा तिथहि आहे. कितीही मोठे मोठे यज्ञ करुन गेलेला असला तरीसुध्दा –

क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति

म्हणतात. ते पुण्य संपल्यानंतर तिथ राहण्याचा अधिकार नाही. पुन्हा मृत्यु लोकावर यायचं. म्हणजे अशा या प्रकृतिला जर बदलता आल तर किती तरी उपयोगी होणार आहे.

दैवी प्रकृति ज्यांनी मिळवली तेच ईश्वराच भजन करतात अहेतूक भजन. आणि अप्रतिहत भजन हे त्याच्याकडूनच चालू आहे.

ते नाथ महाराजांच्या भावार्थ रामायणात वर्णन केलेल आहे. वानरांपैकी कोणीच संपेना. मेली तरी रामांच्या पायांच तीर्थ घायच रामाचं नांव घेऊन अंगारा लावायचा आणि ती वानर जिवंत व्हायची राक्षस म्हणायला लागले, आमचेच सगळे राक्षस मरायला लागले. त्याच्या– पैकी [वानरांपैकी] कोणीच कस मरत नाही. शेवटी लक्ष्मण जेव्हा बेशुध्द पडले तेव्हा मारुतिरायांनी द्रोणागिरी पर्वत उचलून आणला, ती वनस्पती हुंगल्यावर ते शुध्दीवर आले. रावणाने सांगितले तो डोंगर आपल्या इथेच ठेवून घ्या. मारुतिला परत नेऊन ठेवू देऊ नका. त्यावर पुष्कळ चांगल्या चांगल्या वनस्पति आहेत. आपल्यालाहि राक्षसांना आपण जिवंत करुन पुन्हा युध्दावर पाठवू. पण त्याला ते काही जमल नाही. मारुतिरायांनी द्रोणागिरी हातात उचलेला असतानाच त्यांनी पुष्कळ राक्षस मारले आणि तो होता तिथे परत ठेवून आले.

मी जे काही करतोय ते बरोबरच आहे अशी बुध्दि असल्यावर चूक काय आहे, बरोबर काय आहे, न्यूनता काय आहे हे कधी कळूनच घेत नाही. कोणी दाखवून दिल तरी कळत नाही.

दुर्योधनाला अर्जुनाची केवढी शक्ति आहे हे श्रीकृष्णांनी सांगितलेल आहे. वजावून दिलेल आहे आणि त्याचा तुम्ही अनुभाव घेऊन बघा म्हणाले. त्या ग्रहणाच्या वेळेला एकट्या अर्जुनाने तुमच्या सगळ्यांचा पराभाव केला, तुम्हाला पळून जाव लागल. हे सगळे त्यांनी बजावलेल आहे. तरीहि त्याची बुध्दि काही बदलली नाही. भीष्माचार्य द्रोणाचार्यासारखे योध्दे माझ्या बाजूने आहेत. इतक सैन्य माझ्याजवळ आहे. अर्जुन काय करणार आहे. अशीच त्याची शेवट पर्यंत बुध्दि राहिलेली आहे. आणि शेवटी सुध्दा भीमाने गदा मारल्यावर तो खाली पडला. त्यावेळीहि त्याने धर्मराजाला सांगितल म्हणतात, युध्दात मृत्यू आल्यामुळे मी स्वर्गात जाणार तुम्ही/इथेच रडत बसा. तुमची माणस गेली आमची माणस गेली . घेऊन बसा राज्य आता. म्हणजे शेवट पर्यंत त्याची बुध्दि तशीच राहीली. त्याला कधीही पश्चाताप झाला नाही. त्या दृष्टीने त्याला बुध्दिमान म्हणायला हरकत नाही. बुध्दिमान म्हणजे निश्चयात्मक बुध्दि आहे. शेवटपर्यंत माझाच बरोबर आहे .

रावण म्हणाला , राम कोण ? राम एक माणूस आहे. मी जिथे देवाला शरण गेलो नाही तिथे रामाला शरण जाऊ काय ? शेवटपर्यंत त्याने आपला हेका सोडला नाही.

मन, अंत:करण , बुध्दि या पैकी अहंकार जो दोष आहे तो दूर व्हायला पाहीजे. संशयात्मक , संकल्प विकल्पात्मक मन आहे त्याच्याहि वृत्ती कमी झाल्या पाहिजेत.

चांगला सहवास मिळून ती निश्चयात्मक बुध्दि व्हायला पहीजे. ध्रुवाची , प्रल्हादाची बुध्दि शेवटपर्यंत निश्चित राहिली. भक्ति त्यांनी सोडली नाहीशेवट पर्यंत. हिरण्यकश्यपू त्याचा विरोधी होता. भजन करायच नाही हरिच. तुझ्या चुलत्याला त्याने मारल आणि त्याच भजन करतोस तू ? अस पुष्कळ बोलला, ठार मारायचा प्रयत्न केला. पण प्रल्हाद असूर नव्हता . आपल्या प्राणांच रक्षण करणारे असूर होते . प्राणाच काय पण सर्वांचच रक्षण करणारा तो परमात्मा आहे अशी प्रल्हादाची निश्चित बुध्दि असल्यामुळे अहंकार नाही. तो म्हणाला, मी भजन करीतच नाही. माझ्या बुध्दिला प्रेरणा देणारा श्रीहरी माझ्याकडून भजन करुन घेतो. आधुनिक बुध्दिवाद्यांना पटायच कस हे आमच्या बुध्दिने आम्ही भजन करतो. करवून घेणारा कोण दिसत तर नाही. दिसला नाही तर मानायच नाही. प्रत्यक्षाच प्रमाण जर मानल नाही तर व्यवहार कसा चालायचा? 'अलिकडे एक लहान मुलगी आपला पूर्व जन्म आठवून, कुठे जन्मलो होतो वगैरे प्रत्यक्ष प्रमाण आहेच पण हेहि मानायचे नसल्यास ? .

तर हा जो काही आपल्या बुध्दिमध्ये अहंकार आहे तो बाजूला झाला पाहिजे. ती बुध्दि चांगल्या स्वभावाची बनली पाहिजे. चांगले संस्कार त्या बुध्दिमध्ये घडले पाहिजेत. आयुष्य संपल तरी असे चांगले संस्कार बुध्दितले नष्ट होत नाहीत.

अर्जुनाने विचारल ,आयुष्य संपल्यावर प्रपंचहि गेला, सगळच गेल. भगवान म्हणाले, तसे जात नाहीत. पुन्हा चांगला जन्म मिळून अभ्यास सुरु होतो. चांगली बुध्दि बनविल्यानंतर दुसऱ्या जन्मातही तो चांगल्याच मार्गाने जातो. त्याला तस मार्गदर्शन करणारे संत भेटतात.

जास्ती जास्ती आपली उन्नती करुन घेतली पाहीजे. म्हणून त्या योगिंद्रांनी सांगितल सर्वहि कर्म त्याला अर्पण करा. पापकर्म झाली तरीसुध्दा. पण त्या पापकर्माच्या बाबत अस आहे कि पापकर्म झाली कि ती देवाच्या प्रेरणेने झाली अस आपण म्हणतो. आणि चांगली कर्म झाली की तेव्हा मात्र ती माझ्या बुध्दिने झाली अस आपण म्हणतो चांगली कर्म करणारा मी आहे. म्हणजे पुन्हा अहंकार आडवा येतो. सर्वच कर्म त्याच्या प्रेरणेने आपल्या हातून होतात ही भावना म्हणजेच ईश्वरार्पण बुध्दि आहे. तिथे पापपुण्य हा भेदच राहात नाहीये. शुध्द कर्म होऊन जातय. सोनाराला सोन दिल तर चांगल सोन असो वाईट सोन असो सगळ घेतो तो. मुशीत घालून सर्व एकत्र करुन त्यातले दोष घालवितो आणि चांगल सोन बनवितो. त्याला ती कला माहीत आहे सर्वहि कर्मांचा कर्ता ईश्वर आहे ही भावना मानली म्हणजे समर्पण आहे. कर्माच. आणि ही समर्पण भक्ति म्हणजे अंत:करणामध्ये ईश्वराबद्दल जाणीव असली पाहिजे.

ज्ञात्वा भूतान्मादव्ययम्

दैवी प्रकृति मिळवणारे जे महात्मे आहेत त्यांचा काही नुसता अंधविश्वास, अंधभक्ति नाहीये. ईश्वर हा सर्व भूतांना निर्माण करणारा आहे ही जाणीव त्यांना आहे. ज्ञान, जाणिवपूर्वक त्यांची भक्ति आहे. आणखी "अनन्य मनस: " म्हटलेल आहे. इतरत्र त्यांच मन जात नाही. पुष्कळ ऐश्वर्य त्यांनी पहिल असेल. प्रल्हादजीनी सांगितल, राज्य वगैरेबद्दल मला काहीच वाटत नाही. एवढा मोठा हिरण्यकश्यपू एका क्षणात धूळीलाँ मिळाला, नाहीसा झाला, हे ऐश्वर्य मला कशाला पाहिजे ? त्यांच्या मनामध्ये मोह नाहीये. म्हणून त्यांच मन हे अनन्य होते.

निदान आपल्या हातून घडलेल्या एकंदर कर्माचं अवलोकन करून निजावं. काही काही लोक डायरी लिहितात. त्यात चांगलच लिहितात कि वाईटही लिहितात कोणास ठाऊक. सगळंही लिहित असले तर बरंय. म्हणजे निदान फरक वळेला त्यावरून कळेल कि चूकही झालेली आहे. तसच स्वतःच्या सर्वही कर्माचं अवलोकन करून ती सर्वही कर्म ईश्वराच्या प्रेरणेने झालेली आहेत अशी बुद्धि उत्पन्न झाली, कळेल सगळं आपलं गेलं म्हणजे ईश्वरार्पण सगळी कर्म होतात. सर्वही कर्म भागवत धर्म होतो आहे.

गोंदवलेकर महाराजांना कोणी विचारलं म्हणतात, तुम्ही सर्वांना रामनामाचा जप करायला सांगता, तुम्ही स्वतः कुठे जप करता? महाराजांनी त्या विचारणाऱ्या गृहस्थाला स्वतःच्या पायाला कान लावायला सांगितलं. त्याला त्यांच्या शरीरातून "श्रीराम जय राम जय जय राम" ऐकू आलं. आतल्या आत नामस्मरण चालू आहे, म्हणाले. ती प्रकृतीच बनून गेलेली आहे. मनाची, इंद्रियांची, सगळ्याची प्रकृति बनवून टाकली या महात्म्यांनी. करता येतं, म्हणतात; प्रयत्न करून. ईश्वराच्या प्रार्थनेनं, ईश्वर कृपेनं सर्व साध्य होतं.

म्हणून भागवत धर्माचं रहस्य सर्वच कर्मयोग भक्तियोग रूपामध्ये पर्यवसित होण्याकरता योगींद्रांनी निमीराजाला सांगितलं आणि नारदांनी वसुदेवाला मुद्दाम सांगितलं. ते म्हणाले, कृष्ण म्हणजे आपला मुलगा आहे असं समजता तुम्ही. किती तुमची चूक आहे! इतकी लोकोत्तर कार्य होताहेत,

संसाराकडे त्यांचं मन कधीहि जात नाही. आणि केवळ ईश्वराच चिंतन, भक्ति करण्यामध्ये ते निमग्न असतात. आणि अशी भक्ति अंत:करणामध्ये असेल तर मात्र मनाचा निरोध होऊ शकतो. पण जर मनात भक्ति नसताना केवळ प्राणायामाच्या सहाय्याने [योगमार्गाने] मनाचा निरोध करण्याचा प्रयत्न केला तर वासनांमुळे मन पुन्हा आणखी संसाराकडे जात, अस श्रीकृष्णांनी मुचकुंद राजाला सांगितल. आपल्या मनाचा पूर्ण निरोध ते करु शकत नाहीयेत. पण मनामध्ये ईश्वराची सद्गुरुंची भक्ति असली म्हणजेच त्यांच्या कृपेने योगमार्गाचे फळ मिळते.

तर हे सगळे जे मार्ग आहेत हे अगोदर समजून घेतले पाहिजेत. शास्त्राचा साधु संताची संगती आपल्याला घडावी अशी ईश्वराची प्रार्थना केली म्हणजे तशी संगती घडते. परिक्षित राजा आपल नगर सोडून कुठहि गेला नाही. शेवटपर्यंत त्या एकाच ठिकाणी राहून भागवद्भक्ति करत होता. शेवटी पश्चाताप झाल्यावर नदीतीरावर जाऊन बसला. शुक्राचार्य त्याला उपदेश करण्याकरता आपोआप तिथे आले. सर्व सांगून [ज्ञान देऊन]सात दिवसात त्याला मुक्त केल आहे.

तर अशा रीतीने या भूमिकेवरुन सर्व कर्म आपल्या हातून. ईश्वरार्पण बुध्दिने व्हावीत. त्यासाठी स्वत:ला वारंवार तपासल पाहीजे ना. रोज रात्री निजता सकाळपासून आत्ता झोपेपर्यंत आपण कसे वागलो याच अवलोकन करुन निजाव म्हणतात. मी सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत सत्पुरुषां सारखा वागलो का पशुसारखा वागलो निदान आपल्या हातून घडलेल्या एकंदर कर्माच अवलोकन करुन निजाव . काही काही लोक डायरी लिहीतात. त्यात चांगलहि लिहीतात कि वाईट लिहीतात कोणास ठाऊक, सगळहि लिहीत असले तर बरय. म्हणजे निदान एखादे वेळेला त्या वरुन कळेल कि चूकहि झाली आहे. तसच स्वत:च्या सर्वहि कर्माच अवलोकन करुन ती सर्वहि कर्म ईश्वराच्या प्रेरणेने झालेली आहेत अशी बुध्दि उत्पन्न झाली, कर्तृत्व सगळ कर्म होतात. सर्वहि कर्म भागवत धर्म होतो. आहे. ती ईश्वराची भक्तिच होते आहे.

गोंदवलेकर महाराजांना कोणी विचारल म्हणतात, तुम्ही सर्वांना रामनामाचा जप करायला सांगता, तुम्ही स्वत: कुठे जप करता ?

महाराजांनी त्यांच्या पायाला हया विचारणाऱ्या माणसाला कान लावायला सांगितले त्याला – त्यांच्या –

शरीरात "श्रीराम....राम" ऐकू आल. आतल्या आत नामस्मरण चालू आहे, म्हणाले. ती प्रकृतिच बनून गेलेली आहे. मनाची, इंद्रियांची सगळयाची प्रकृति बनवून टाकली त्या महात्म्यांनी करता येत, म्हणतात, प्रयत्न करुन . ईश्वराच्या प्रार्थनेन, ईश्वर कृपेन सर्व साध्य होत आहे.

म्हणून भागवत धर्माच रहस्य सर्वच कर्मयोग भक्तियोग रुपामध्ये पर्यवसित होण्याकरिता योगिंद्रांनी निमीराजाला सांगितल आणि नारदांनी वसुदेवाला मुददाम सांगितल. ते म्हणाले, कृष्ण म्हणजे आपला मुलगा आहे अस समजता तुम्ही. किती तुमची चूक आहे ! इतकी लोकोत्तर कार्य होताहेत, केवढी बुध्दि आहे तरीसुध्दा कृष्ण आपला मुलगा आहे ही तुमची बुध्दि जात नाही. काय दुदैव तुमच ! म्हणजे श्रीकृष्ण प्रत्यक्ष परमेश्वर आहे. हे वसुदेवसुध्दा ओळखात नव्हता. सर्व यादवात/ . एकच असे होते कि ज्यांची श्रीकृष्ण हा साक्षात परमात्मा आहे अशी खात्री होती. म्हणून भगवान गोपालकृष्णांच्या जवळ असताना आपण स्वत: [ते] आसनावर सुध्दा बसत नसत. जाणीव होती ना !

तर अशी ईश्वरशक्ति बददल जर मनात जाणीव असेल तर तो जीव आपली प्रकृति चांगली बनवण्याकरता तो ईश्वराची प्रार्थना करतो. तोच एक दाता आहे. " दाता एक रघुनंदन " त्याच्याशिवाय दुसरीकड कोणा जवळहि मागायच नाही. असा निश्चयहि त्याचा असतो. देवाचीच कृपा संपादन करुन तो दैवी प्रकृति आपली बनवू शकतो. आणि दैवी प्रकृति होण म्हणजे सर्व कर्तृत्व ईश्वराच आहे आपल नाही गि निश्चय होण. " मत्त सर्वम् प्रवर्तते " भगवान सांगताहेत. सर्वहि कार्य माझ्याकडून चाललेली आहेत. केवढी मोठी ईश्वराची शक्ति आहे ! संरक्षण शक्तिबददल आपल्याला संशय आहे. जग उत्पन्न करण किंवा त्याचा नाश करण ही ईश्वराची शक्ति कदाचित आम्ही मानू. कारण आमच्याकडे ती शक्ति नाहीये . पण सरंक्षण आमच आम्ही करतो अस म्हणायला काय हरकत आहे ? तिजो-या आहेत, पहारेकरी आहेत त्याच प्रमाणे पोलीस बंदोबस्त ठेवू शकतो. ह्या सगळयाने आम्ही संरक्षण करु शकतो कि नाही ! पण संरक्षण करणाराच मारुहि शकतो हे कस काय ? [ संदर्भ - श्रीमती इंदिरा गांधी] सरंक्षणा करता केलेली योजनाच मारक झालेली आहे ना ! हे का झाल ? आमच्या बुध्दिने असं कस ठरविता येईल ? आम्हाला कस कळल नाही अगोदर ?

म्हणून संत माहात्म्यांचा सिध्दान्त असा आहे - सरंक्षकहि तोच आहे. आणि त्याला तर्कानं उत्तर दिलय. बाहेरसुध्दा रक्षण करणारा तोच आहे. गर्भामध्ये माता सुध्दा रक्षण करु शकत नाही. जरी माता श्रेष्ठ, प्रेमळ, वगैरे असली तरी मूल जन्माला

( उद्धवजी .

आल्यानंतर त्याच रक्षण करील. गर्भामध्ये माता काय करणार ? म्हणजे गर्भामध्ये त्या जीवात्म्याच संरक्षण करणारी कोणतरी तरी शक्ति आहे. तीच बाहेर रक्षण करणार नाही का ? असा निश्चय संत महात्म्यांचा असतो. त्यांची प्रकृति तशीच बनून गेलेली असते. स्वत:च्या शक्ति बद्दल काही जाणीवसुध्दा नाही. सगळी शक्ति त्याचीच आहे. म्हणून बाहेरसुध्दा तोच संरक्षक आहे. अशी त्याची निश्चित बुध्दि असल्याने त्यांच संरक्षण होऊ शकत.

तुलसीदासजींच्या वाड्याचे दरवाजे नेहमी उघाडे असायचे. राम पंचायतानावर उत्तम दागिने घातलेले. चांगली चांगली जरीची वस्त्र एक दिवस सगळे निजले असताना चोर आत शिरले. सगळे दागदागिने काढून घेतले, वस्त्र काढून घेतली आणि निघाले बाहेर. पण बाहेर निघाल्या नंतर त्यांना दोन पहारेकरी दिसले. ते म्हणाले ,आत्ता आम्ही आत गेलो तर कोणी नव्हत आणि हे कधी आले. आपण पाठीमागच्या दरवाजाने जाऊया. तिथेही पुन्हा पहारेकरी होतेच. त्या चोरांना काही बाहेर पडता आल नाही. तो पूर्वत पहाट झाली. काकडारती करण्यासाठी तुलसीदासजी आले. चोरांना पश्चाताप झाला. तुलसीदासजींची क्षमा मागितली. चूक झाली म्हणाले. तुलसीदासजींनी विचारले काय झाल ? चोर म्हणाले आम्ही चोरी करण्याकरिता आलो. तुलसीदासजी म्हणाले, ठीक आहे तुम्हाला काय हव ते मिळाल ना, घेऊन जा. ते चोर म्हणाले, नाही आम्हाला बाहेर जाता येत नाही पहारेकरी आहेत. तुलसीदासजी म्हणाले, दरवाजे सगळे उघाडे असताना पहारेकरी कुठले आले, कसे आहेत ? ते चोर म्हणाले तरुणौ रूपसंपन्नौ सुकुमारौ महाबलौ ...." तुलसीदासजी म्हणाले, अहो तुमच केवढ भाग्य आहे. तुम्हाला साक्षात रामलक्ष्मणांच दर्शन झाल.

दरवाजे उघाडे ठेवले याचा अर्थ परमात्मा संरक्षक आहे. आणि संरक्षण तरी कशाला म्हणायचे. सर्व संसार त्याचाच आहे. " बाहू हा संसार देवा पायी " म्हणून जे सांगतात.. संसार त्याचाच आहे. वेगळ्या संरक्षणाची जरूरी काय ? दक्षता आहे. जे जग आपण निर्माण केल आहे त्याच संरक्षण करण्याची जबाबदारी आपल्या वर आहे. ही दक्षता असल्यामुळे परमेश्वर अवतार धारण करुन सर्वांच संरक्षण करतो नाहीतर झाल नसत.

तर अशी बुध्दि अंत:करणामध्ये उत्पन्न झाली म्हणजे सगळा धर्म भागवत धर्म होऊन जातो आहे. या श्लोकाच्या व्दाराने योगींद्रांनी हा महत्वाचा उपदेश केलेला आहे. कर्मयोगसुध्दा भक्तियोगामध्ये अंतर्भूत होतो आहे. ईश्वराची पूर्ण कृपा असल्याशिवाय असा प्रयत्न घाडण कठीण आहे.

भगवान सांगताहेत . कर्मानुसारीणी बुध्दि ही वेगळी आहे. देवाने दिलेली बुध्दि वेगळी आहे अस मानाव लागत. आमच्या स्वभावाला अनुसरुन आमची कर्म होताहेत. कर्माप्रमाणे पुन्हा प्रकृति बदलती आहे. अस हे चक्र चाललय सारखा. पण देवाने दिलेली बुध्दि ही वेगळी मानावी लागते. ईश्वराची भक्ति

कृपा

झाल्याशिवाय संताची, सदगुरुची/ झाल्याशिवाय अशी बुध्दि मिळत नाही. त्या बुध्दिन जीवात्म्याच पूर्ण कल्याण होत आहे. अर्जुनाचा कर्तृत्व अभिमान तुटल्यावर त्याचा मोह दूर झाला. हिंसाहिंसेचा विचार धर्माअधर्माचा विचार कसा करायचा हे भागवतांनी आपल्या शक्तिन त्याला पटवून दिलेल आहे. त्यामुळे तो कर्तव्यनिष्ठ राहिला, विजयी झाला. सफळ कार्य झाल. शेवटी आत्मज्ञानहि त्याला प्राप्त झालेल आहे.

नियंता

तर बुध्दिचा/ परमात्मा आहे. हे संतानी ओळखालेल आहे. म्हणून ते उपदेश करतात-

किंबहुना सर्व सुखी पूर्ण होऊनी ....

सगळी सुख भोगा म्हणाले तुम्ही. पण त्या ईश्वराला विसरु नका. त्याची जाणीव ठेवा म्हणजे तुमच पूर्ण कल्याण आहे. देवाजवळ हेच मागणं मागितलेल आहे. अशी आपली बुध्दि बनवण्याकरता तर मनुष्य जन्म आहे.

अशा उत्सवात सद्गुरुच, ईश्वराच आवाहन केलेल असत त्यांच्या जवळ हीच प्रार्थना करायची आहे. आपल्या मनुष्य जन्माच सार्थक होण्याकरता आपल्या मनुष्य जन्माच सार्थक होण्याकरता आपल्या मनातला कर्तृत्वाभिमान दूर व्हायला पाहीजे. ही जाणीव झाली की आत्मज्ञानाची योग्यता प्राप्त होते. मग सगळी कार्य त्याच्या कृपेने पार पडतात. कल्याण म्हणजे —

सर्वेत्र: सुखिन: सन्तु
सर्वे सन्तु निरामय:
सर्वे भद्राणि पश्यन्तु
मा कश्चिद् दु:ख माप्नुयात

या चार गोष्टी म्हणजेच कल्याण ओह, आरोग्य मिळाल पाहीजे, ~~सुख~~ सुख मिळाल पाहीजे, मंगल/ पहायला मिळाल्या पाहीजेत आणि सर्व दु:ख गेली पाहीजेत. आणि सद्गुरुच्या कृपेने, ईश्वराच्या कृपेने हे सर्व मिळाव अशी प्रार्थना.

गोष्टी

// अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त //

बोरिवली
1988

" श्री दत्त "

सच्चिदानंदरूपाय विश्वोत्पत्त्यादिहेतवे ।
तापत्रय विनाशाय श्रीकृष्णाय वयं नमः ॥

भारतवर्षामध्ये शंकराचार्य महाराजांचे नांव कोणाला माहित नाही असे नाही. परदेशातसुध्दा त्यांच्या ग्रंथांचा अभ्यास करणारे लोक आहेत. संपूर्ण वेदांमध्ये जीवाच्या करता काय मार्गदर्शन केले आहे हे सांगणारा कोणी तरी लागतो. वेदांची भाषा, त्यांचे व्याकरण हे सगळ स्वतंत्र आहे. वैदिक सूत्रे निराळी आहेत. पाणिनीने वेदांच्या करता वेगळी सूत्रे केली आहेत. तर त्या वेदवाक्यांचा अर्थ काय आहे हे समजून घेता आले पाहिजे. ती योग्यता पाहिजे.

त्या काळामध्ये प्रत्यक्ष भगवान् शंकरांनीच अवतार धारण केला. शंकराचार्य तेच झालेले आहेत. आणि त्यांनी हे कार्य केल. भगवान् गोपालकृष्णांनी जी भगवत् गीता म्हणून सांगितली ती व्यास महर्षिंनी महाभारतामध्ये लिहून ठेवलेली आहे. त्यांचेही मोठे उपकार आहेत.

समरांगणावरती अर्जुनाच्या मनाला आणखी मोह उत्पन्न झाला. आणि तो सगळ सोडून जाणार म्हणाला. सगळीच निराशा पसरली असती ना! युध्द झालच नसत. अर्जुनाच्या जीवावर तर सगळ आणखी युध्द होणार होत. त्यानेही तसा प्रयत्न केला होता. मोठ्या विश्वासाने, धैर्याने, उत्साहाने प्रयत्न केला. पण ऐन वेळेला मनावरती हा परिणाम झाला. त्याच भगवत् गीतेवर आचार्य महाराजांनी भाष्य केले आहे. शब्दाचे अर्थ वेगळे वेगळे केले जातात. बुध्दिमध्ये जसे जसे संस्कार असतील त्या संस्कारांप्रमाणे त्या वाक्यांचा अर्थ वाटतो आपल्याला. म्हणून आपल्या भारतामध्ये शिक्षणाची गुरु परंपरा प्राचीन काळापासून आहे. गुरुंनी ह्या ग्रंथांचा उपदेश आपल्या शिष्यांना करायचा, त्यांनी आपल्या शिष्यांना करायचा अशी सगळी परंपरा ऋषिमंडळी पासून चालत आलेली आहे. ज्ञान हे निष्कलंक, निर्दोष व्हायला पाहिजे. आणि तस ते निर्दोष राहील पाहिजे. त्या करता हा प्रयत्न आहे. गुरुशिष्य परंपरेच

अस स्मरण करुन मग प्रत्यक्ष पाठ सुरु होत असतो. पाठाच्या अगोदर ह्या सगळ्या .....

गुरुपरंपरेचे स्मरण करायचे, मग ऐकायचे आणि नंतर सांगणा-याने सांगायचे. तर ही जी परंपरा म्हणून चालत आलेली आहे ही वेदांची परंपरा आहे. शास्त्राची परंपरा आहे. वारकरी सांप्रदायामध्ये तर ती परंपरा आहेच आहे.

ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी लिहिली. त्याप्रमाणे तिचा अभ्यास करणारी मंडळी, त्यांच्यापासून ऐकणारी मंडळी. त्यांच्यापुढे शिकणारी मंडळी, अस सगळ चालत आलेल आहे. केवळ एखाद्याच्या बुध्दिन आणखी तो [अर्थ लावण्याचा] निर्णय होऊ शकतो. स्वतंत्र बुध्दिन कोणाचही वाचायच नाही, कोणाचही ऐकायच नाही. माझी मला सगळ समजतय, समजू शकेल अशा दृष्टीने हे ग्रंथ वाचून आणि त्यांचा बरोबर अर्थबोध मनाला नीट होऊ शकत नाही. तेच ज्ञान शुध्द, दृढ अशा प्रकारच ज्ञान परंपरेने पुढे चालत आलेल आहे. म्हणून परंपरेला महत्व आहे. उपनिषदे ही वेदांचा एक भाग आहे. आचार्यांनी ह्या उपनिषदांवर भाष्य केलेले आहे. उपनिषदांचा अर्थ काय आहे, काय विषय मांडलेला आहे हे सगळ समजून सांगितलेल आहे. आणि त्यानंतर सामान्य श्रेष्ठ वर्गाची [जी] मंडळी आहेत, विचार करु शकणारी, श्रवण करु शकणारी, श्रवणाचाही अधिकारी पाहिजे.

वेदान्तशास्त्रामध्ये जे काही विषय आले आहेत त्यात काही कथा कादंब-या किंवा तत्सम साहित्य असा काही संबंध नाही. त्या साहित्यातून मनोरंजन होत काही तरी. इथे मनाची स्थिरता करायची आहे. काय ग्राह्य आहे आणि काय अग्राह्य आहे हे मनाला समजल पाहिजे. हे मनाला समजत नाही. हेही एखाद्या वेळेला बर वाटत. ही पक्ष बरा वाटतो. पुन्हा दुसरा पक्ष बरा वाटला कि हाही सोडून द्यायचा. त्या पक्षात जायच. पुन्हा त्यातून यात यायच अशी सगळी गोंधळलेली स्थिती आहे. अशी मनाची अवस्था आहे. ह्या ग्राह्य अग्राह्याला हेयोपादेय विवेक म्हणतात. हेय म्हणजे घ्यायचे काय उपादेय म्हणजे टाकायचे काय हे अगोदर समजले पाहिजे. ते निश्चित ज्ञान झाल्यानंतर मग मन त्याप्रमाणे वागायला लागत. ज्ञान मनानेच, बुध्दिनेच करुन घ्यायचे. कर्तव्य काय आहे, अकर्तव्य काय आहे हे समजल पाहिजे. आत्मा कोण आहे, अनात्मा कोण आहे हेही समजल पाहिजे. नित्य काय आहे, अनित्य काय आहे, टिकणारे काय आहे न टिकणारे काय आहे, विनाशी काय आहे हे सुध्दा समजल पाहिजे. हा विवेक म्हणजे पृथक्करण. हे मनाने करायच आहे. हे मनाच्या पुढे मांडणारा कोणी तरी पाहिजे ना, उलट झाल तर ? न टिकणारा पदार्थ टिकणारा आहे अस .....

मनाला वाटत. संसारभ्रम झालेला आहे असे संत सांगतात, ज्ञानी महात्मे सांगतात. आचार्यांच तर हेच सांगण आहे. संसार हा भ्रम आहे, संपूर्ण भ्रम आहे, आभास आहे.

चांगदेवांनी ज्ञानेश्वरांना पत्र म्हणून कोराच कागद पाठवला ही गोष्ट सगळ्यांना माहित आहे. त्यांचे दोन शिष्य ते पत्र घेऊन आले. आमच्या गुरु-महाराजांनी दिलय म्हणाले आणि ते निवृत्तीनाथांच्या हातात दिल. त्यांनी ते उलट सुलट करुन पाहिल तर त्यावर काहीच लिहिलेले नाही. कोराच कागद. त्या मुक्ताबाईने स्पष्ट सांगितले, "चौदाशे वर्ष राहून हा अद्यापि कोराच राहिला." वास्तविक आयुष्य वाढविण्याकरता मनाचा निग्रह करण्याचा त्यांनी किती प्रयत्न केला असेल ? आणि त्या प्रमाणे फळही त्यांच्या पदरात पडल. शंभर वर्षांच मनुष्याच आयुष्य शास्त्रीय प्रयत्नांनी वाढविता येत. चौदाशे वर्ष चांगदेव राहिले ही काही नुसती कथा नाहीये. कोणी तरी आपली गोष्ट सांगितली अस नाहीये. अस शास्त्र आहे. आयुष्याचीही गणना केली आहे. शास्त्रकारांनी. शंभर वर्षांच आयुष्य आहे जीवाच. ती गणना श्वासोच्छ्वासावर केली आहे. रोज २४ तासात २१,६०० वेळा श्वासोच्छ्वास होतो — २१,६०० वेळा श्वास घेतला जातो आणि २१,६०० वेळा श्वास सोडला जातो. प्राणाचे हे कार्य चोवीस तास चालू असत. झोपेमध्येही चालू असत. म्हणून प्राणदेवता जरी असली तरी ती २४ तास कार्य करु शकत नाहीत. टी.व्ही. चालू आहे म्हणून काही २४ तास कोणी टी.व्ही. पाहू शकत नाही. कंटाळा येईल पहाणा-याला, दमून जाईल. कोणाचीही हात पाय इंद्रिये २४ तास काम करु शकत नाहीत. श्रम होतात त्यांना. दमणारी आहेत ती इंद्रिये. पण प्राणवायू मात्र २४ तास काम करतो. म्हणून उपनिषदांमध्ये प्राणवायूची उपासना करायला सांगितली आहे. दत्तात्रेयांनी प्राणवायूला आपला गुरु मानल आहे, २४ गुरुंपैकी. म्हणजे चोवीस तास त्याच काम चालू आहे आणि अपेक्षा काही नाही. काहीही दिल तरी चालत. प्राणवायू शरीरामध्ये राहाण, प्राणाचा आणि शरीराचा संबंध म्हणजे जीवन आहे. जेव्हा प्राणाचा आणि शरीराचा संबंध तुटतो तेव्हा त्याला मृत्यू म्हणतात. तिथून प्राणवायू निघाला कि झाल. तो सगळ्या इंद्रियांची शक्ति तो घेऊन जातो. त्याच्यामुळे सगळ्या इंद्रियांच्या क्रिया चालू असतात. क्रियाशक्ति जेवढी आहे ती प्राणाचीच आहे. तर श्वासोच्छ्वास हे प्राणवायूचे बाहयरुप आहे.

तर प्राणायामाचा अभ्यास जो सांगितला आहे तो चांगल्या माहितगार

....

मनुष्याच्या मार्गदर्शनाप्रमाणेच केला पाहिजे. त्याच्या देखरेखीखाली केला पाहिजे. नुसत पुस्तक वाचून, नाक दाबून, तोंड दाबून धरण आणि प्राणवायू कोंडून ठेवण म्हणजे काही प्राणायाम नव्हे. शरीरामध्ये किती सूक्ष्म नाड्या आहेत. प्राणवायूचा आत बाहेर त्या सगळ्यातून संचार चालू आहे. आणि कुठे एखादे वेळेला तो कोंडून कस तरी भलत्या मार्गाने आपल जाऊन जर त्याचा विरोध केला तर कुठे तरी जाऊन बसून वेड लागायची पाळी यायची. म्हणून योग्य मार्गदर्शन करणाऱ्याच्या सान्निध्यात राहून तो अभ्यास करायचा. रो संध्या वंदनाच्या वेळेस आपण थोडा प्राणायाम करतो. उपनयन झाल्यावर त्याला सुरवात होते. तर श्वास आत घेण आणि बाहेर सोडण त्याला पूरक आणि रेचक म्हणतात. आणि मध्ये काही वेळ तो प्राणवायू स्थिर करायचा असतो, त्याला कुंभक अस म्हणतात. प्राण स्थिर झाला कि मनही स्थिर होत. अभ्यास केला म्हणजे समजत आपल्याला. प्राणवायू जर थोडा वेळ स्थिर झाला तरी मनात विचार येण बंद होत. म्हणून या मार्गाने जाणारे काही लोक आहेत. योग मार्ग म्हणजेच प्राणशक्तिचा विकास करण, प्राण स्थिर करण. प्राण स्थिर झाला कि मन स्थिर होते. पण सर्वांसाठी हा मार्ग नाहीये. सगळीच औषध काही सगळ्याच. रोग्यांना लागू पडत नाहीत. प्रत्येक रोग वेगवेगळा आहे. त्याला किती प्रमाणात कोणच औषध द्याव हे जाणणारा जो आहे तो सगळ करु शकतो. तस प्राणवायूला स्थिर करुन मनाला स्थिर करण्याचा प्रयत्न हा एक मार्ग सांगतात. चांगल कुठ तरी एका ठिकाणी मन स्थिर राहाण हा सुध्दा अभ्यास आहे. प्राणवायू स्थिर झाला तर मन स्थिर होते. तर अशी ही प्राणाची शक्ति आहे. शरीरात प्राणवायू असेपर्यन्त शरीर चांगल्या अवस्थेत राहू शकते. कुंभक फक्त झाला. प्राण स्थिर झाला. श्वास प्रश्वास बंद झाले. अशा रीतीने प्राणवायू जर स्थिर झाला तर २१,६०० या संख्येत किती तरी घट होईल. श्वासोच्छ्वासाच्या या संख्येवर तर शास्त्रकारांनी आयुष्याची मर्यादा किंवा कोष्टक बसवल आहे. तर प्राणायामाचा अभ्यास झाला, प्राणवायू निग्रहीत झाला. कुंभक जर स्थिर झाला योग्य मार्गदर्शनाने तर श्वासोच्छ्वास कमी होतात आणि तितक आयुष्य वाढत. असा अभ्यास केलेले चांगदेव होते. त्यामुळे चौदा वेळा त्यांनी मृत्यू चुकविला. ही काही नुसती ऐकायची गोष्ट नाहीये, कुठ तरी लहान मुलाला सांगावी अशी. अभ्यास आहे तो. शास्त्र आहे. मार्गदर्शन करणारे महात्मे आहेत.

परंतु प्राण स्थिर झाला तरी मन स्थिर नाहीये. मनाला शांती मिळाली ........

नाही. ती शांती मिळवण्याकरता ज्ञानाचा उपयोग आहे. ज्ञान मनाने करुन घ्यायचे. मी कोण आहे ? मी मोठा योगी आहे. इथपर्यंत आले आहेत चांगदेव. आणि योगी असल्यामुळे सर्व सिध्दी त्यांच्यापाशी आहेत. सिध्दी म्हणजे मानसिक शक्तिचा विकास. तर या सिध्दी मिळूनसुध्दा त्यांच्या मनाला शांती नाहीये. ज्ञान मिळाल पाहिजे. आत्मज्ञान हे स्वतंत्र आहे. त्याकरता योगाचा उपयोग होतो नाही अस नाही. मन स्थिर होत. कुंभक म्हणजे प्राण स्थिर झाल्यावर बाहेरचे सगळे व्यवहार बंद झाले. मनही स्थिर झाल आणि मन स्थिर झाल्यामुळे बाहेरचे जे काही निरनिराळे विकार मनामध्ये उत्पन्न होतात तेही बंद झाले. मनामध्ये नविन विकार उत्पन्न होण, आधीच्या विकारात भर पडण हे तरी बंद झाल कि नाही. आणखी जे जे काही जुने संस्कार मनावर असतील ते प्राणायामाने कमी कमी होत येतात. दुरितक्षय होतो आहे.

तर ते पत्र [कोरे] आल्यावर ज्ञानेश्वर महाराजांना निवृत्तीनाथांनी आज्ञा केली "आता उत्तर लिहून पाठवा" आता पत्रात काय लिहिल असेल त्याला अनुसरुन उत्तर लिहिण्याची पध्दत असते. आणि इथे तर काही चांगदेवांनी लिहिलेच नाही तर त्याला उत्तर काय लिहिणार ? पण ज्ञानेश्वरांनी उलट निवृत्तीनाथांना काही विचारल नाही -- काय उत्तर लिहू ? काही लिहिलच नाही तर उत्तर काय लिहू ? ज्ञानेश्वर महाराजांच मन पूर्णपणे स्थिर झालेल आहे. जी आज्ञा होईल त्या पूर्णशक्तिची [सद्गुरुरुपी] त्याप्रमाणे वागायच ही भूमिका आहे. म्हणून त्यांच्या मनामध्ये, काय करु, कस करु, असा कोणत्याही प्रकारचा संदेह नाही मनामध्ये. चांगदेवांना तो संदेह निर्माण झाला. प्राण निग्रह आहे. चांगदेव समाधि लावून बसायचे. समाधितून उठल्यानंतर जवळच्या मंडळींनी जर एखादी मृत झालेली व्यक्ति चांगदेवांच्या जवळ आणली तर तिला ते आपल्या योग सामर्थ्याने जिवंत करीत. अशी त्यांची किर्ती होती. पण मनाची स्थिरता ही प्राणाच्या स्थिरतेवर अवलंबून आहे. म्हणजे स्वाभाविक स्थिरता आहे. मनाच स्वाभाविक स्वरुप उपनिषदामध्ये सांगितलेल आहे. मन हे तत्व काय आहे ? हे सगळ समजावून घ्याव लागत ना! म्हणजे त्या मनाच स्वरुप काय आहे, कशापासून मन उत्पन्न होत ? काय कार्य त्याच असत ? त्याच्यामध्ये काय काय घटक पदार्थ आहेत ? हे सगळ कळल्यानंतर मग त्याच्यात कशी काय सुधारणा करायची इकडे लक्ष देता येईल.

तर पंचमहाभूतांपासून ही सगळी सृष्टी झाली आहे. उपनिषदांमध्ये

,......

ते सगळ वर्णन आलेल आहे. पंचमहाभूतांमध्येसुध्दा त्रिगुणात्मक सगळे प्रकार असतात. सत्व, रज आणि तम. पंचमहाभूतांमध्येसुध्दा हे तीन विभाग आहेत. ज्ञानेंद्रिये ही पंचमहाभूतांच्या सत्वांशापासून. क्रियाशक्तिमान असलेली कर्मेंद्रिय ही झाली रजोगुणांशापासून. आणि सगळ्या पंच महाभूतांच्या सत्वांशापासून मन तयार झाले आहे. रजोगुण, तमोगुण कमी आहेत. असं मूळ मन तयार झालेल आहे. ईश्वराच्या सृष्टीचा हा विचार आहे ना! ईश्वराच्या सृष्टी कशी काय निर्माण झाली आहे हे सांगणारे उपनिषद वेद वगैरे ग्रंथ आहेत. तर हे मूळ तयार झालेल मन सत्वशील आहे. "मना सज्जना भक्ति पंथेची जावे" समर्थांनी मनाला सज्जना म्हणून संबोधित केले आहे. तू सज्जन आहेत, बाबा. मूळ तुझी उत्पत्ति चांगली आहे. पण आता त्याच्यामध्ये रजोगुण तमोगुण मिसळलेले आहेत तुझ स्वरूप बदलेल आहे. ते मूळच स्वरूप मनाला द्यायचय. त्याच्यातले रजोगुण तमोगुण म कमी करायचेत. सत्वगुण जास्तीत जास्त मिळवून झाले, रजोगुण कमी झाले कि मनाची चंचलता कमी होईल. क्रियाशक्ति हे रजोगुणाचे कार्य आहे. 'काम क्रोधादिक विकार हे रजोगुणाचे स्वरूप आहेत. झोप, आळस वगैरे हे सगळे तमोगुणाचे विकार आहेत. हे सगळे विकार मनामध्ये असतील तर रजोगुण तमोगुण अधिक आहेत आपल्या मनात असं समजून येत आपल्याला शास्त्र प्रमाणाने. प्रत्यक्ष मन काही दिसत नाही. शरीर हे दिसत. शरीरात झालेला रोग पहाण्याची यंत्रे निघाली आहेत. तरीसुध्दा त्याचे अचूक निदान करण्याचा निर्णय होऊ शकत नाही. रोगाची निवृत्ती करणारी औषधे आहेत. त्याचप्रमाणे शस्त्रक्रिया होतात, सगळ होत. पण एखादा रोगी त्यातून बरा होतो एखादा जातो. एखादा तरी का जावा ? पुष्कळ बरे होतात. तीच औषधे आहेत. निदान तेच झालेल आहे. शरीराच्या आतल्या भागांचे फोटो घेणारे यंत्रही तेच आहे मग सगळ तेच असताना एक बरा व्हावा आणि एक का जावा ?

पण ही कारण मीमांसा वेगळी आहे. काही तरी याच कारण वेगळ आहे. काही तरी याच कारण वेगळ असल पाहिजे. त्या रोगाने तो गेला कि दुसऱ्या कोणत्या तरी कारणाने गेला. त्याच्या मृत्यूच कारण काही तरी निराळ मानाव लागत. तर या प्रमाणे स्थूल शरीराच्या आतमध्ये सूक्ष्म शरीरामध्ये हे मन आहे. त्याचाही विचार केला आहे उपनिषदामध्ये. ते मन स्थिर करु शकले नाहीत चांगदेव. प्राणवायू स्थिर केलेला आहे. समाधि

......

लावून बसू शकतात चांगदेव. ज्ञानेश्वर महाराज बसले आहेत ना समाधि लावून सातशे वर्ष त्या समाधि स्थानाची शिळा निवृत्तीनाथांनी लावून ते स्थान बंद केले. तिथे त्यावेळी पांडुरंग होते, सगळे होते. चांगदेवांनी त्या वेळच सर्व वर्णन करुन ठेवल आहे. प्राण स्थिर झाल्यानंतर सगळ संपलेल आहे. शरीराचा संबंध नाही. शरीर विकल होत नाही. शरीर पडत नाही. शरीर सडत नाही. काही नाही. शरीरामध्ये प्राणवायू आहे [फक्त तो स्थिर झाला आहे]. तहान भूक सगळ संपल. जमिनीमध्ये जाऊन बसायच [गुहेत म्हणा बंदिस्त स्थानात] आणि ती जमिन [म्हणजे ते स्थान] वरुन सगळी झांकून घ्यायची ही नुसती कल्पना जरी आमच्या मनांत आली तरी केवढे घाबरायला होते. भीती वाटते. कस शक्य आहे ? पण ते शरीर अभ्यासाने राहू शकत. तसाच निग्रह चांगदेवांनी केला, प्राणवायू स्थिर केला पण अद्यापि त्यांच्या मनाला शांति मिळाली नाही, समाधान मिळाल नाही, ज्ञान झाल नाही. आत्मज्ञान करुन घेण्यासाठी ते ज्ञानदेवांना शरण आलेले आहेत. पत्र लिहायला बसले होते लिहितानाच त्यांना संशय आला काय लिहाव ? नमस्कार लिहावा ज्ञानेश्वर महाराजांना का आशिर्वाद लिहावा. पहिलच वाक्य लिहिताना मनाची अशी अवस्था झाली. ज्ञानेश्वर तर वयाने लहान आहेत. माझ वय किती आहे ? १४०० वर्षाचे आहे आणि त्यांचे तर अवघे २०-२२. पण गुरु आहेत ना! त्यांच्यापासून ज्ञान मिळवायचय, शांती मिळवायचीये. मग त्यांना आशिर्वाद कसा लिहिणार? म्हणजे ज्ञानेश्वरांना लहान म्हणाव का मोठ म्हणाव याच्यातच गोंधळ निर्माण झाला. त्याच्या मनाला काही निर्णय करता आला नाही. विवेक झाला नाही. तसाच कोरा कागद पाठवून दिला.

पण ज्ञानेश्वर महाराजांनी गुरुंची आज्ञा झाल्या बरोबर लिहायला सुरवात केली. काही नाही. आशिर्वाद लिहावा कि नमस्कार लिहावा काही गोंधळ नाही. स्थिर मन झालेल आहे. सगळा विवेक झालेला आहे. काय घ्यायचय काय टाकायचय त्या मनाला समजून आलेल आहे सगळ. व्यवहार कसा करायचा. परमार्थ कसा करायचा हे सगळ त्या मनाला समजून आलेल आहे. चांगदेव पासष्टी म्हणून आहे ज्ञानेश्वर महाराजांची —

स्वस्तिश्री वटेषु । जो लपोनी जगदाभासु ।
दावोनी मग ग्रासु प्रकटीला जगी ॥

भूमिका केवढी आहे ज्ञानेश्वर महाराजांची! चांगदेवांना पत्र लिहिताहेत. चांगदेवांची दृष्टी कशी आणि ज्ञानेश्वरांची दृष्टी कशी ह्याचा विचार केला म्हणजे कळून येईल आपल्याला. पत्र लिहायला बसले चांगदेव त्यांना ज्ञानेश्वर लहान

.......

वाटले. लहान म्हणजे शरीराने लहान. लहान आहे आणि मोठा आहे हा शरीराचा भास आहे आपल्याला. लहान मोठ फार काहीच नाही. आकार ज्याला आहे अशा वस्तूमध्ये ही लहान आहे ती मोठी आहे. ज्या शरीराला काळाचा संबंध अधिक आलेला आहे ते शरीर मोठ. वडिल भाऊ, लहान भाऊ. हे लहान मोठे भेद व्यवहाराने केले जातात. ज्याच्या शरीराला कालसंबंध कमी झालेला आहे तो लहान भाऊ आहे. ज्येष्ठ कनिष्ठ हा भेद शरीराच्या दृष्टीने केला जातो. आत्म्याच्या दृष्टीने नाही. चांगदेव अद्यापि शरीराचा विचार करण्यापर्यंतच आलेले आहेत. सगळ्या सिध्दी आहेत, प्राणवायू ताब्यामध्ये आहे. त्यामुळे सगळ्या मानसिक शक्तिचा विकास झालेला आहे. पण अद्यापि मी मोठा आहे, ही भावना आहे. म्हणजे माझ शरीर मोठ आहे. शरीरापर्यंतच येऊन थांबलेत ते. ज्ञानेश्वर म्हणजेही शरीरच आहे. ते लहान आहेत. आत्मदृष्टी आहे. पण ज्ञानेश्वर महाराजांची दृष्टी सर्वत्र एक आत्मा आहे अशी आहे. सर्वत्र एक ब्रहमतत्व भरुन राहिलेल आहे. त्या ब्रहमाशिवाय दुसरे काही नाही. सर्वत्र एक वासुदेव आहे. बाहय स्वरुपही सर्व एक वासुदेव अशी वृत्ती झाली. त्या दृष्टीने ज्ञानेश्वर लिहायला सुरवात करताहेत. "स्वस्तिश्री वटेषु" वटेष्वर हे चांगदेवांचे नांव. वटेश्वर चांगदेवांचे स्वस्ति असो व्यवहार दृष्टीने सुध्दा तुम्ही आम्हाला लहान समजत असलात तरी लहान मनुष्याने सुध्दा मोठ्या मनुष्याचे कल्याण व्हावे असे म्हणायला हरकत नाही. आमच्या मातापित्यांचे किंवा गुरुजनांचे कल्याण असो अस म्हणण्यात काही चूक नाही. आपण स्वत:ला मोठे समजत असलो तर मोठ्यांनी लहानांच कल्याण चिंतायच हे सुध्दा व्यवहारात चांगलच आहे.

म्हणून "स्वस्ति" प्रयोग केलेला आहे. स्वस्तिश्री वटेषु पण वटेश्वर चांगदेव म्हणून कोण समजताहेत ज्ञानेश्वर महाराज —

जो लपोनु जगदाभासु
दावि प्रगटीला जरी ।

परमात्मा आहे. चांगदेव म्हणजे आत्मरुन आहे. सर्व विश्वरुपी झालेला जो परमात्मा आहे तोच चांगदेव आहे. तो जर लपून, आच्छादित झाला तर "जगदाभासु दावि" संबंध जग दिसायला लागेल आणि मग ग्रासु प्रगटीला जरी. तो जर प्रगट झाला चांगदेव तर संबंध विश्वाला ग्रासेल. या एका ओवीतच चांगदेवांना विश्वरुप करुन टाकल. म्हणजे ज्ञानेश्वर महाराजांची वृत्ती ही सर्वत्र आत्मरुप पहाणारी आहे. नेहमी ते आत्मस्वरुपात मग्न

.......

आहेत. त्यामुळे चांगदेवांकडे पहातानासुध्दा ते चांगदेव हे परमात्म स्वरूप आहेत असच पहाताहेत.

म्हणून तर तो चांगदेवरूपी परमात्मा जर आच्छादित झाला म्हणजे सगळ जग दिसायला लागत आणि तो परमात्मा जर प्रगट झाला तर सगळ जग व्यापून टाकतो. हे सगळ शंकराचार्य महाराजांची समजावून सांगितल आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी उपनिषदांचा सिध्दान्त या एका ओवीत सांगितला आहे तो असा कि, आत्मरूपी परमात्मा आवृत्त आहे. आत्मा आनंदरूप आहे. आत्मरूप स्वत: आनंद-स्वरूप असताना जीवाची बाहेर आनंद शोधायची किती धडपड चाललीये. वैय्यक्तिक प्रयत्न काय, सामुदायिक प्रयत्न काय, सगळ चाललेल आहे. सुखाचा शोध चाललेला आहे.

शोध केला पाहिजे. पूर्ण सुख बाहेर आहे का आत आहे ? हा विवेकच होत नाही आमचा. मी कोण आहे हा विवेकच झालेला नाही. देहापर्यन्त जाऊन थांबतो आम्ही. इंद्रियापर्यन्त जाऊन थांबायच, प्राणवायूपर्यन्त येऊन थांबायच. बुध्दीपर्यन्त येऊन थांबायच. खर जे आत्मस्वरूप आहे ते तर हया सर्वांच्या पलिकडे आहे. त्याच्या पलिकडे काही नाही. तर असा विवेक ज्या बुध्दिला झालेला आहे, तशी विवेक संपन्न बुध्दि ज्या महात्म्यांची आहे त्यांच्या बुध्दिने सगळ पृथक्करण केलेल आहे. काय घ्यायच आणि काय सोडायच हे त्यांच्या मनाला/बुध्दिला आणखी पक्के समजलेले आहे. विवेक पूर्ण झाल्याशिवाय वैराग्य होऊ शकत नाही. अनित्य म्हटल्यानंतर पाहिजे कशाला ? विनाशी आहे ना! विनाशी असल्यानंतर ते आम्हाला नकोय. संसारामध्ये सुख नाही अस म्हणत नाही परंतु ते सुख तो आनंद-सुध्दा म्हणजे आत्मानंद आहे असा सिध्दान्त आहे वेदांचा. आनंदरूप जे आहे आपल, मी आनंदरूप आहे हे कळायच झाल म्हणजे मन स्थिर व्हाव लागत. सुखाचा अनुभव घेण्याच्या वेळेला मन हे स्थिर असाव लागत आणि मनाची ती स्थिरता झाल्यानंतर तो आनंद. आपल्याला १०,००० रूपये मिळाले कि आनंद वाटतो त्या वेळेला. आनंद वाटतो याचा अर्थ तेवढया वेळेपुरत मन शांत झाल. त्या शांत अवस्थेमध्ये मनाची स्थिरता झाल्यावर तो आत्मानंद प्रभावित होतो, प्रतिबिंबित होतो. तोच आनंद मिळतोय पण तो धनाने, किर्तीने मिळाला अस आपण समजतो. मन स्थिर झाल्यावर तोच आत्मानंद बाहेरून मिळतो. काही का असेना. बाहेरच्या साधनांनी आणखी आणखी संसारामध्ये आनंद आहे.

अस जरी असल तरी तो न टिकणारा आहे. हे मात्र कोणत्याही

.......

बुध्दिवाद्याला नाही म्हणता येणार नाही. धनाने, किर्तीने, मानसन्मानाने आनंद मिळतो कि नाही ? मिळतो. पण टिकतो का ? हे विचारल्यावर त्याच उत्तर नाही असच द्याव लागत. निवडून आला. मंत्रीपद मिळाल पण पांच वर्षाचीच मुदत आहे ना! ती सुध्दा केंव्हा केंव्हा पूर्ण होत नाही. मध्येच मंत्रीपद सोडून द्याव लागत. पांच वर्षे ठरलेली असताना सुध्दा राहात नाही. म्हणजे संसारामध्ये असलेला कोणाचाही आनंद जरी आहे, बाहय सांसारीक प्रयत्नांनी मिळविता येतो अस जरी मानल तरी तो आनंद विनाशी आहे. हे जर मनाला पटल असेल तर मन तिकडे जाणार नाही. दुसरा, आत्मानंद अविनाशी आहे. कायमचा आहे. हे आनंदाच पृथक्करण ज्याच्या मनाला करता येईल त्याच मन विनाशी आनंदाकडे जाणार नाही.

जर कोणी सांगितले कि मी तुम्हाला नोकरी देतो पण ती फक्त महिनाभरच असेल, मग करायची का ? कि दुसरी चांगली कायम स्वरुपाची नोकरी मिळवण्याचे प्रयत्न करायचे. हा विवेक झाला पाहिजे, मनाचा. नको बाबा ही तात्पुरती नोकरी नको. जास्ती प्रयत्न करुन चांगली कायम स्वरुपाची नोकरी मिळवावी अस कोणालाही वाटेल. बुध्दिला, मनाला पटलेल असत, इकडे मन लागेल म्हणून हे जे वैराग्य उत्पन्न होत मनात, हे नको आहे अस वाटत. म्हणजे हे संसार वैराग्य उपयोगी नाही. हा जो संसार आनंद आपल्याला नको आहे आणि तशी अवस्था एखाद्याच महापुरुषाला प्राप्त होते, हे खार वैराग्य तत्काल पक्क होऊ शकत ईश्वराच्या कृपेने. पूर्व सुकृत असल्याशिवाय हया आनंदाकडे, ईश्वरप्राप्तीच्या मार्गाकडे तो जाऊ शकत नाही.

तुलसीदासांची गोष्ट प्रसिध्दच आहे. लग्न झाल्यावर आपल्या पत्निला त्यांनी कधीही माहेरी पाठवायच नाही. तिला माहेरची माणस सणावारी बोलवायला येत. तुम्ही या. पण, नाही. एके दिवशी मात्र माहेरची माणस बोलवायला आली मुलीला त्या वेळी तुलशीदासजींच्या आईने सांगितल, "घेऊन जा. तो कुठे बाहेर गेलाय. आल्यावर सांगेन त्याला मी." ती मंडळी मुलीला घेऊन गेली. तुलसीदासजी आल्यावर त्यांना समजल कि पत्नि माहेरी गेली. झाल ते तसेच तिकडे जायला निघाले. रात्रीची वेळ. नदीला भरपूर पाणी होत. पलीकडे जाण्यासाठी आता कुठली नांव मिळणार. एक प्रेत वाहात येत होत. काहोखात त्यालाच ते लाकडाचा ओंडका समजले. त्याच्यावर बसून पलिकडे गेले आणि पत्निच्या घराजवळ गेले. घराच्या खिडकीतून खाली त्यांना।

......

दोरी लांबकळताना दिसली. तो खरा भुजंग होता. पण त्याला ते दोरी समजून वर चढले आणि तिच्या खोलीमध्ये शिरुन भेटले. ती चकीतच झाली. तिने विचारले, इतक्या रात्री तुम्ही आलातच कसे ? ते म्हणाले तू दोरी बांधून सोडली होतीस तिला धरुन चढून आलो. तिला काही समजेना. त्यांनी मग दिवा घेऊन पाहिल तर लांबच्या लांब भुजंग लांबकळत होता.

त्या स्त्रिला वाईट वाटल. ती म्हणाली, "माझ्यावर किती आसक्ति आहे तुमची? हया शरीरावर तुमच मन एवढ जडलय. पण या शरीराच्या आत राहाणार जो आत्माराम आहे त्याच्याकडे जर तुमच मन गेल तर कल्याण तरी होईल, उध्दार होईल तुमचा." हे आपल्या पत्निचे शब्द ऐकल्याबरोबर त्यांच मन एकदम बदलल. त्या स्त्रिच्या ठिकाणी इतकी आसक्ति असताना तिच्याच भाषणावरुन ती गुरु झाली अस समजून ते वैराग्य उत्पन्न झाल. हयाला काय म्हणायच ? बहुत सकृतांची जोडी हे म्हणायलाच पाहिजे.

चांगल कर्तव्यकर्म केल असेल तर ते अस एकदम उपयोगी पडत. तत्कालिक जरी अनुभव आला नाही तरी ते जमा आहे. ते जमा करणारी ईश्वर शक्ति वेगळी आहे. त्याच ऑफिस निराळ आहे. त्या ऑफिसमध्ये कोणाच्या नावाने किती पुण्य जमा आहे आणि किती पाप जमा आहे याचा व्यवस्थित हिशोब ठेवलेला आहे. म्हणून त्याचा अनुभव सांगता येतो. कारण तुलसीदासजींची इतकी चित्तवृत्ती बदलून गेली कि संसारातून बाहेर पडलेच ते. मारुतिरायांची भेट झाली रामरायांच दर्शन झाल, सगळ झाल. तुलसी रामायण तयार झालेल आहे. केवढा आणखी विचार! तर संसार मनामध्ये असतानासुध्दा ते विवेक वैराग्य पक्क झाल. आत्मानंदाकडे त्यांच लक्ष लागल. परमात्म्याचा साक्षात्कार झालेला आहे.

तर हा जो एक स्वरुपानंद आहे हा अविनाशी आहे. त्याला नाश माहीत नाही. सहजसिध्द आनंद आहे. तो आनंद आणखी जर कळला तर विनाशी आनंदाकडे कोण जाईल ? कशाला पाहिजे तो ? आणि हा सगळा जगामध्ये असलेला आनंद त्या मूळ अविनाशी आनंदाचा एक अंश, रुप आहे. आणि हा जो पूर्णानंद आहे तो आत्मानंद अविनाशी आहे. त्या आनंदापर्यन्त पोहोचलेला जीवात्मा आनंदरुप होऊन गेला. त्याचा जीव भाव नाहीसा झाला. संसारी म्हणून जो जीव होता त्याचा संसार निघून गेला. हे वेदांनी मार्गदर्शन केलेल आहे. शेवटची भूमिका काय आहे हे सांगितलेल आहे. त्या भूमिकेपर्यन्त जाण्याची सर्व साधनेही सांगितली आहेत. सगळी शास्त्र वेदातूनच निघालेली आहेत. संपूर्ण वेदांचे, वेदमंत्राचे

.....

यथार्थ ज्ञान आपल्याला व्यवस्थित होणार नाही, मनाला करुन घेता येणार नाही, बुध्दिची तितकी तयारी नसती, योग्यता नसती म्हणून ऋषी मंडळींनी ती निवडून वेगवेगळी स्वतंत्र शास्त्र केली आहेत.

आणि त्या पैकी योगशास्त्र एक आहे. स्वतःच आत्मस्वरुप समजवून घेण्या-करता त्याचा उपयोग करुन घ्यायचा आहे. त्याचा अभ्यास करण्याकरता शरीराची आसक्ति कमी झाली पाहिजे. पहिल नियंत्रण आहारावर आहे. "आहारशुध्दी सत्वशुध्दि" अस त्याच सूत्र आहे. आहार शुध्द असेल तर मनाची शुध्दि होते आहे. मनाची शुध्दि होते याचा अर्थ मनाला स्थिरता येते. सत्वगुण वाढतात. रजोगुण, तमोगुण कमी होतात. क्रिया कमी होतात. झोप, आळस वगैरे दोष कमी झाले म्हणजे प्रथम सत्वगुण वाढतात आणि नंतर मनाची स्थिरता येते/वाढते. मनाची स्थिरता वाढल्यानंतर सगळा विचार हा व्यवस्थित होतो, विवेक पक्का होतो. विवेक पक्का झाल्यावर ग्राहय कोणत, अग्राहय कोणत हे समजत. टाकून काय द्यायच हे समजत. एकदा टाकून दिल कि तिकड परत मन जायचय नाही. ही वैराग्याची सीमा आहे. अगोदर सोडून देतो आपण. थोडया वेळाने हे थोड घेतल तरी हरकत नाही अस वाटत. पण थोड घेतल तर हरकत नाही अस म्हणून पहिल्या पेक्षा जास्त घेतो.

वैराग्याची खरी भूमिका मिळवण्यासाठी मनाच परिक्षण करण्यातच पुष्कळ वेळ जातो. खर आपण काही टाकलय कि नाही हे दुसरा सांगू शकत नाही. दुस-याच्या देखात आपण घेतल नाही म्हणजे आपण टाकल. काही खात नाही. महाराज बुवा अमूक एक काही खात नाहीत. दुस-याच्या देखात खात नाहीत एवढच. दुस-यांच्या दृष्टीला पडल नाही म्हणजे हयांना काही आहार लागत नाही अशी त्यांची समजूत झाली. पण स्वतःची भूमिका आहारशुध्द झाल्याशिवाय सत्वशुध्दि नाही हे पटल्यानंतर त्याप्रमाणे तो वागतो आहे. आहारशुध्दि पाहिजे याचा अर्थ आवडेल तो आहार घेता येणार नाही. आहारावर नियंत्रण करायचय, मनाची शुध्दि करायचीये. आणि मनाची शुध्दि म्हणजे मनाची स्थिरता करायची आहे. तो आनंद त्या मनाला मिळवून देण्याकरता मनाची स्थिरता आवश्यक आहे. त्याचच नांव शुध्दि आहे.

त्या करता शास्त्रकारांनी सुधाम सांगितलय कि संयम हा पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या बुध्दिमध्ये अधिक आहे. नियंत्रण म्हटल्यावर तो आहार कोणाचा हे त्यांनी सांगितल आहे. शास्त्राने सांगितल्या प्रमाणेच तो आहार घ्यावा

......

लागेल. रसनेंद्रियाला जो आवडेल तो आहार घेऊन चालणार नाही. सात्विक आहाराने सात्विक मन बनते. मन कस उत्पन्न झाल हेही सांगितल आणि आता मन कस तयार होत हेही सांगताहेत. आपण घेतलेल्या आहारातला अशुध्द भाग मलमूत्राच्या रुपाने निघून जातो. आणि त्यातल्या शुध्दांशापासून मन तयार होत. मनाला त्यातले सगळे अंश मिळतात. म्हणून स्मृतीकारांनी स्त्रियांवरती स्वयंपाक करण्याची जबाबदारी याकरता दिलेली आहे. सध्या आता चाललेल आहे स्त्रीमुक्ति चळवळ वगैरे. पुरुषही त्यात सामील होतात. ते फक्त मोठेपणा मिळवण्याकरता होतात का खरोखरच मुक्त करणार आहेत स्त्रियांना कोणास ठाऊक ? पण मनुने हा विचार सांगितलाय कि घरातला पाक हा स्त्रियांनी केला पाहिजे. मनु मोठा समाजशास्त्रज्ञ होऊन गेला. हिटलरसुध्दा त्याला मान देत होता म्हणे. समाजवाद खरा कसा आहे ? समाजवादाचा पुरस्कार करणा-यांनी मनुस्मृतीचा अभ्यास केला पाहिजे. समाजाची रचना कशी केली गेलेली आहे, काय केली गेलेली आहे, नुसता आपल्या बुध्दिप्रमाणे समाजवाद तयार करता येत नाही. नाही सांगता येणार. तर मनुने पाकशास्त्र हे स्त्रियांसाठी ठेवलेले आहे. मनुस्मृतीच्या काय अकराव्या अध्यायात स्त्रियांची कर्तव्ये म्हणून सांगितली आहेत. घरातला सगळा जमाखर्च स्त्रियांकडे असावा अस मनुच मत आहे. किती लोक व्यसनाधीन होतायत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पैसा पुष्कळ मिळायला लागला. तो मिळवण्याकरता साधन कोणती बरी वाईट याचा विचारही केला जात नाही. त्या पैशाचा मनाकडून कसा उपयोग होतो ? मन काही सुधारत नाही उलट बायका घराबाहेर पडतात [अधिक पैसा नोकरीच्या निमित्ताने मिळविण्याकरता] किती कष्ट करतात. मनुने त्याकरता मुद्दाम सांगितलय, पुरुषापेक्षा स्त्रियांच्या बुध्दिमध्ये संयत अधिक आहे. तो वाढवण्याचे शिक्षण त्यांना दिले पाहिजे. स्त्रियांना कोणत शिक्षण द्यावं याबद्दलचा सगळा विचार त्याने मांडला आहे. जमाखर्च हा स्त्रियांनी करावा असं मुद्दाम सांगितलय. याचा अर्थ स्त्रियांनी नोकरी करावी असा अर्थ मनुला अभिप्रेत नाहीये. स्त्रियांची इतर पुष्कळ जबाबदारीची कामे आहेत. जमाखर्च जर त्यांच्या ताब्यात असला तर खर्चाला पुष्कळ आळा बसणार आहे. हा एक प्रकार झाला.

पावित्र्य, शुचिता ही स्त्रियांनी अधिकाधिक सांभाळली पाहिजे. शरीराची पवित्रता, वाणीची पवित्रता ही सगळी जी शुचिता आहे ती सांभाळण्याची जबाबदारी मनुने स्त्रियांवर टाकली आहे. तसेच स्त्रियांनी धर्मकार्याचा अभ्यास केला पाहिजे. वैय्यक्तिक धर्म कोणचा, सामाजिक धर्म कोणचा याचा त्यांनी अभ्यास केला

.......

पाहिजे. ऐकूनही अभ्यास होतो. मोठ मोठी ऋषि मंडळी येतात, त्यांचे विचार ऐकवा त्याप्रमाणे आचरण कराव. त्या करता आणखी धर्माच स्वरूप काय आहे, त्याचा उपयोग काय आहे हे सगळ समजून घेऊन त्याप्रमाणे आपल्या स्वत:कडून आचरण करण्याची जबाबदारी ही स्त्रियांच्या वरती मनुने टाकली आहे. गृहीणी हीच घर म्हणून त्याने सांगितलेली आहे. गृहस्थाला आणखी घर म्हटलेल नाहीये. हे कोणी वाचलेल आहे का ? स्त्री मुक्तिचा प्रसार करणा-यांनी हे वाचलय का ? पूर्वजांनी काय लिहून ठेवलय, समाज शास्त्रज्ञांनी काय लिहून ठेवलय. मनुराजा मोठा समाजशास्त्रज्ञ समाजवादी आहे. सगळ्या ऋषिंना त्यांनी हे सगळे धर्म सांगितले आहेत. स्वत: तो क्षत्रिय होता, ब्राहमण नव्हाता तरीसुध्दा त्याने हे सर्व सांगितले आहे.

अन्नमय मन: अस उपनिषदामध्ये सांगितल आहे. मन हे अन्नमय आहे. मन हे अन्नापासून तयार झाल आहे. पति, मुल आणि इतर आप्तेष्ट मंडळींसाठी त्या गृहीणीन प्रेमाने अन्न तयार करायच आणि त्या अन्नापासून त्या सर्वाच मन तयार होत. म्हणजे घरात राहाणा-या किंवा समुदायामध्ये राहाणा-या सगळ्यांच्या मनाची शुध्दि करण्याची जबाबदारी स्वयंपाकाच्या निमित्ताने मनुने स्त्रियांवर सोपवली आहे. स्त्रियांना स्वयंपाक करण्याकरता ठेवल आणि पुरूषांना वाटेल तशी मोकळीक दिली असा त्याचा अर्थ नाहीये. पुरूषांनी सुध्दा त्या बाबत अनुकूल वागल पाहिजे. मुसलमानाच आक्रमण झाल्यावर हजारो स्त्रियांनी आपल्या पतिला युध्दाला पाठवून दिली. पतियुध्दात मृत्यू पावल्यावर चितेच उडया घेऊन त्या सती गेल्या आहेत. केवढी धर्मबुध्दि आहे. केवढी धर्म शीलता आहे. हे सगळे या स्त्रियांचे संयमच आहेत. हा आदर्श त्यांनी ठेवलेला आहे. इतकी मनाची जी तयारी झाली ही कशाने झाली ? आहारशुध्दि

योगशास्त्राचा अभ्यास करायचा म्हणजे मनाची स्थिरता झाली पाहिजे. स्थिरता याचा अर्थ विवेक झाला पाहिजे. स्थिरतेने विवेक होतो. शास्त्राने याला चांगल का म्हटल त्याला त्याज्य का म्हटल वगैरे सगळ आपल्याला कळून येत. आणि त्याप्रमाणे मन तयार होते. वाईट असेल ते सोडून घायच. चांगल्या मार्गाने जायच. किती तरी मोकळ झाल कि नाही मन ! हे करू कि ते करू ? हयाच्या मध्येच सगळ आयुष्य जायच ना! चांगदेव सारख्यांना तो प्रसंग पडला. अर्जुना सारख्याला तो प्रसंग पडला.

घरामध्ये नवी जुनी वस्त्र, भांडीकुंडी किती आहेत या सगळ्याची माहिती

.....

स्त्रियांना असते. अशा सगळ्या जबाबदा-या सांभाळणा-या स्त्रिया आहेत. असं तो सम्राट मनु राजा समजतोय. त्यांच मन अशा पध्दतीच आहे. संयम आहे, त्याच प्रमाणे मार्दव आहे. मन,वाणीवर संयम आहे. संयमाचा उपयोग कसा करून घेता येईल याच शिक्षण स्त्रियांना दिल पाहिजे. तस शिक्षण देण्याकरता शिक्षण क्षेत्रातसुध्दा तसा विवेक असणारी मंडळी आहेत. मुलींना कोणच शिक्षण द्यायच मुलांना कोणच शिक्षण द्यायच हे समजल पाहिजे ना!

मागे पुण्याला अशी एक गोष्ट झाली. दत्तोवामन पोधार वगैरे मंडळींना अस वाटल सहशिक्षण काही बर नाही बुवा. वेगळ वेगळ करायला पाहिजे. त्यावेळी मुलींनीच त्यांना सांगितल कि तुम्ही जरी स्वतंत्र कॉलेज आमच्यासाठी काढलत तरी आम्ही त्या कॉलेजात येणार नाही. आम्ही इकडेच [मिश्र/एकत्र कॉलेजातच] राहाणार. अगोदर करून ठेवलय तुम्ही आणि आता सुधारणा कशी होणार ? अगोदर विवेक पाहिजे. पृथक्करण करून ठरविताना, कोणताही कायदा करताना त्याचा पूर्ण विचार पुष्कळ करायला पाहिजे. परमार्थामध्येही तेच आहे. हा विवेक म्हणजे बुध्दिने पृथक्करण करण,योग्य अयोग्य ठरवून. ते ठरविण्याकरता जे श्रेष्ठ महात्मे पुरूष असतील त्याच मार्गदर्शन घ्यायचय. त्यांनी काय लिहिलय ते मुद्दाम वाचायच. उगीच स्वत:च्या बुध्दिचा फाजील अभिमान बाळगून उपयोग नाहीये. नंतर "आम्ही चुकलो" अस लिहून टाकल कि झाल. त्यात काय अर्थ आहे ? अगोदर पाऊल टाकताना वेळ लागला तरी हरकत नाही परंतु सगळ पृथक्करण विवेकसंपन्न झाल पाहिजे. व्यवहारातल कार्यही विवेकाशिवाय होऊ शकत नाही. त्याची फार मोठी जरूरी आहे. परमार्थ तर सर्व मनाच्या स्वाधीन आहे. मन व्यवस्थित असेल तर परमार्थ घडणार आहे. नाहीतर होणार नाही. म्हणून आणखी आचार्य महाराजांनी सगळ व्यवस्थित मार्गदर्शन केल आहे. पूर्वीच्या काळी संस्कृतचा पुष्कळ अभ्यास होता. ऐकूनही पुष्कळ ज्ञान होत. नाही तरी कॉलेजमध्ये जाऊन ऐकायचच असत ना! तिथ तरी ऐकूनच मिळती कि ज्ञान.

मग बाहेर ज्ञानी माणसांची संगतीत ऐकून म्हणा वाचून म्हणा पुष्कळ ज्ञान मिळत. प्रत्यक्ष कृति पर्यवसायी ज्ञान पाहिजे. विवेक संपन्न बुध्दि बनली पाहिजे— स्त्रियांची काय किंवा पुरूषांची काय.

तर आचार्य महाराजांनी या प्रमाणे सगळे ग्रंथ केले, सर्वत्र संचार केला, सगळ्यांना ते ज्ञान समजावून सांगितले. त्या वेळी धर्म विरोधी बुध्दिचे जे लोक

.....

होते त्यांच्या बुध्दिची, वादविवाद करुन, त्यांचा पराजय करुन त्यांना खर ज्ञान देऊन, सुधारणा केली. तुम्ही कसे चुकला आहात, तुमची बुध्दि चुकीच्या मार्गाने कशी गेली आहे हे दाखवून दिले. त्या बुध्दित जराशी सुधारणा करा म्हणजे सगळयांचच कल्याण आहे, हे त्यांना पटवून दिल. मनुष्याची बुध्दि ही स्वभावत: पक्षपाती नाही. ज्या वेळेला त्या बुध्दित रागव्देषादिक दोष शिरतात त्या वेळेला ती पक्षपाती होते. आमचाच पक्ष बरोबर आहे, तुमचा बरोबर नाही, तुम्हाला कोणाला कळत नाही अस सगळ चाललय. एका व्यक्तिचे दोष काय किंवा लोकशाहीचे दोष काय, ते सुध्दा एका व्यक्तिचेच — नेत्याचेच — असतात. लोकशाही म्हणायची फक्त. एक मुख्य व्यक्ति असते तिच्या प्रमाणे बाकिच्या सगळयांची बुध्दि असते. आचार्यांची शिकवण पुष्कळांना पटली. पण रागव्देषादि दोषांनी भरलेल्या त्या वेळच्या काही व्यक्तिंना ते कस पटणार? ते म्हणायला लागले, हा कुठला कोण केरळ देशातून आलेला. संन्याशी म्हणवतोय. सगळयांचा पराजय करतो. आमची शिष्य मंडळी, आमचा पक्ष बिघडून जाणार. आमच्या पक्षातले लोक बाहेर पडणार. आमच्या पक्षात कोणी राहाणार नाही. हयाला जिवंत ठेवून उपयोगी नाही. अशीही विचार करणारी मंडळी त्या वेळेला होती.

त्यांच्या चरित्रात त्या बद्दल एक कथा आहे. उग्रभैरव नावाचा भैरवाची उपासना करणारा मोठा मांत्रिक होता. तो बलिदान वगैरे तंत्रमार्गाने जाणारा होता. आचार्यांनी त्याला समजावले कि त्याचा मार्ग बरोबर नाही, शास्त्रीय नाही, बलिदान वगैरे करण योग्य नाही. आपला शुध्द मार्ग पाहिजे. पण त्या मांत्रिकाला हे कुठल पटणार! भर सभेमध्ये सगळयाच लोकांना आचार्यांच मत पटल्याने हयालाही ते पटल्यासारखे दाखवले. आणि आतून मात्र ठरविल कि, आचार्य महाराजांचा नाश केल्याशिवाय आपला पक्ष बलवान होणार नाही. ही नुसती बाहय कल्पना असते. एखादा ग्रंथ जाळल्याने त्यातले ज्ञान नष्ट होत नाही. किंवा एखाद्या ज्ञानी माणसाला मारल म्हणजे ज्ञान नाश पावत नाही. ही परंपरा आहे. हे ज्ञानाचे संक्रमण ज्ञानी माणसाने दुस-याच्या बुध्दित केलेल आहे. किंवा एखाद्याची बुध्दि तयार झाली असली आणि त्याला प्रत्यक्ष उपदेश झालेला नसला तरी तो ग्रंथ वाचून एकदम ज्ञान मिळवू शकतो. सगळयांना ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी सांगितली नाहीये. पण ती परंपरा

......

त्यांच्यापासून चालत आलेली आहे.

तर परंपरेने येत असलेल ज्ञान भारतात असल्यामुळे एकाच व्यक्तिचा नाश केला किंवा एखादा ग्रंथ जाळून टाकला म्हणजे ज्ञान संपल ही अगदी स्थूल कल्पना आहे. स्थूल बुध्दि आहे. विचारी बुध्दि नाहीये, या भैरवाची. त्यालाही काही लोक अनुकूल होते. तो करेल ते बरोबर असे समजणारी मंडळी होती. असतात प्रत्येक काळात. तेव्हा एक दिवस तो आचार्य महाराजांना भेटण्यासाठी आला. दीर्घ साष्टांग नमस्कार केला. साष्टांग नमस्कार केला म्हणजे तो जिज्ञासू असतो खरा अस नाही. परवा सांगितल हे बाहय चिन्ह असू शकत. आचार्यांनी त्याचे स्वागत केले. तो आचार्यांना म्हणाला, "गुरु महाराज, आपण सांगितलेल मला पटल. मी आता एक यज्ञ करणार आहे. आधीच तशी सुरवात केलीये. शेवटच्या दिवशी पूर्णाहूति मला द्यायची आहे. [पण शेवटी त्याने आपलाच मूळ पक्ष सांगितला] बलीदान करायच आहे. आपण क्षमा करा. आपल म्हणण बरोबर आहे. पण एकदम कसे सुटणार माझे संस्कार ? तेव्हा मला बलिदान करण्याकरता एका सर्वज्ञ मनुष्याच मस्तक पाहिजे. त्याच जर बलिदान मी केल तर माझा यज्ञ पूरा होईल मी सदेह भैरवलोकाला जाऊ शकतो. एक तर ज्ञानी माणसाचे तरी मस्तक पाहिजे किंवा सम्राट राजाचे. आता सम्राट राजाचे मस्तक बलिदानाला पाहिजे असे मी शब्द जरी उच्चारले तर माझच मस्तक जाईल. ते काही शक्य नाही. तेव्हा, सर्वज्ञ मनुष्याच मस्तक म्हणजे आपण सर्वज्ञ आहात [बाहेरून सगळा आदरभाव व्यक्त करतोय] आपल मस्तक जर मिळाल तर माझ हे कर्म सांग होईल, आणि या देहाने मला भैरवलोकाला जाता येईल. आपल्याला काही आसक्ति नाही कशाची काही नाही. देहात्मवाद काही आपला नाही." आचार्य महाराजांनी विचार केला हरकत नाही. मस्तक दिल म्हणून काय झाल. मस्तक म्हणजे शरीर नव्हे. शरीर केव्हा तरी पडणारच आहे. मस्तक हा त्याचा एक भाग आहे. शरीर राहाण याला महत्व नाहीये. म्हणजे ज्ञानी मनुष्याच्या दृष्टीने शरीर हे विनाशी आहे. याचा अर्थ आचार्य महाराजांनी आत्महत्या केली असा नाहीये. तो भैरव मस्तक मागायला आलेला आहे उलट शरीराची आसक्ति देखिल सोडलेली आहे. सुटलेलीच होती त्यांची. पूर्ण

........

आत्मनानंदात जे निमग्न झाले आहेत — आत्मसमाधित राहाणारे- त्यांना शरीराची काय पर्वा! आचार्य म्हणाले, " ठिक आहे. उद्या येऊन घेऊन जा. मी एका गुहेत जाऊन समाधि लावून बसतो. त्या वेळेला आमची शिष्य मंडळी तिकडे कोणी येणार नाहीत. तुम्ही या आणि तुम्हाला हव असलेल माझ मस्तक घेऊन जा".

काही नाही. नाही तर किती तरी शिष्य मंडळी होती. कोणालाही सांगितल नाही कोणाला काय सांगायचे । आणि मृत्युची भिती कुठे आहे ? नाहीये – मृत्यु म्हणजे अव्यक्त अवस्था–प्रकृति आहे. पुन्हा जीवन नविन सुरु होणार आहे. आचार्यांनी विचार केला –त्या भैरवाच काम होतय आपल मस्तक दिल्याने ठिक आहे, घेऊन जाऊ दे याच्या मताच खंडन केल, पुष्कळ उपदेश केला सगळ झाल तरी हा पुन्हा पहिल्यासारखाच वागतो आहे. काही तरी ईश्वराच अस्तित्व याच्या बुद्धिमध्ये आहे. तो चांगला मार्गाने जाणारा असो किंवा वाम-मार्गाने जाणारा असो – ईश्वर मानणारा आहे. असूं दे. येऊं दे त्याला.

आचार्यांना खास एकांतात भेटून त्याने हे सांगितले त्यामुळे बाकिच्या कोणालाच हे माहीत नाही. शरीरात राहणारा आत्मा अमर आहे, याची खात्री आहे त्यांची. अपरोक्षज्ञान, साक्षात्कार झालेला आहे त्यांना. आत्म्याला जन्मही नाही आणि मृत्युही नाही. तो मी म्हणजे शरीर नाही. शरीर, इंद्रिय या सगळ्यापेक्षा मी वेगळा आहे, साक्षी आहे. मी सर्व पाहू शकतो. माझ्या अस्तित्वामुळे सगळ्यांच कार्य चाललेल आहे. मी अमर आहे. मला मृत्युचे भय नाही. शरीर पडणारच आहे. ही इतकी निर्भयता आहे ना । प्रत्यक्ष आत्मज्ञान झाल्यामुळे पूर्ण निर्भयता आहे.

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि
नैनं दहति पावकः ........

गीतेत भगवंतांनी सांगितलय. आत्म्याला कोणीही शस्त्राने तोडू शकत नाही, जाळू शकत नाही. नुसते गीतेतले श्लोक वाचून सुद्धा फासावर गेलेले हे देशभक्त आहेत. या शाब्दिक ज्ञानाचा परिणाम झालेला आहे. आनंदाने फांशी गेले. त्यांना जर नुसत्या शाब्दिक ज्ञानाने ही अवस्था मिळाली मग इथे तर प्रत्यक्ष अपरोक्ष ज्ञान आहे. हा झाला एक विचार.

आचार्यांची शिष्य मंडळी संन्यासी होती. सगळ्यांच्या मनाची स्थिरता झालेली आहे. विवेक झालेला आहे. संसार सुटलेला आहे. वैराग्य आहे. शांती आहे सगळ आहे. अस प्रत्येक शिष्याच मन तयार आहे. पण त्यांच्या मध्ये गुरुभक्ति हा एक मोठा गुण

....

आणखी आहे. सद्गुरूंची सेवा करायची आहे. सद्गुरूंच्या बद्दल दृढ श्रद्धा आहे. त्यांची आणखी सेवा घडावी अशी त्यांच्या मनांत तीव्र इच्छा आहे. त्या शिष्यांपैकी पद्मपादाचार्य हे त्यांचे पहिले पट्ट शिष्य होते. पद्मपादाचार्य नरसिंहाची उपासना करीत होते. गुरूभक्ति आहे शिवाय नरसिंह भक्तिही आहे. पण नरसिंह आणि गुरु वेगळे नाहीत. वेगळेपणा कुठ करायचा आणि कुठ करायचा नाही हे सुद्धा मनाला समजल पाहिजे. विवेक म्हणजे पृथक्करण. ते मनानेच कळत. चांगल कोणच, वाईट कोणच, टिकणार कोणच हे सगळ पृथक्करण करायचय मनाने. तस इथ ईश्वर वेगळा आहे, गुरू वेगळा आहे हे पृथक्करण नाहीये. इथे मात्र एकच शक्ति आहे. ईश्वरशक्ति आणि गुरुशक्ति एक आहे. इतकच नव्हे तर सर्वही ठिकाणी गुरू शक्ति एकच आहे. माझ्या ठिकाणी असलेली शक्तिसुद्धा तीच आहे. माझी शक्ति स्वतंत्र नाही. इथे पृथक्करण उपयोगी नाहीये. पूर्ण अद्वैत पाहिजे. अशी पद्मपादाचार्यांची दृष्टी आहे. नरसिंहांची उपासना आहे. आणि ती उपासना अशी सिद्ध झाली आहे त्यांची. उपास्य देवता स्वरूप होण हे उपासनेचे शेवटचे साध्य आहे.

बीड जिल्हयात गांव म्हणून आहे तिथे भृशुंडी ऋषि म्हणून होऊन गेले. जसा वाल्या कोळी होता तसे ते होते, नामा कोळी म्हणून. असच जंगल होत. आल्या गेल्या वाटसरूला लुबाडायचे, मारायचे. एकदा त्यांची मुद्गल ऋषिंची भेट झाली. त्यांनी हयाला मंत्रोपदेश वगैरे केला आणि त्या मंत्राचा जप तो करीत राहिला. त्याने इतका जप, उपासना केली गणपतीची कि भ्रूमध्यातून त्यांच्यासोंड उत्पन्न झाली शुंड म्हणजे सोंड. म्हणून भृशुंडी नांव त्यांना पडल. म्हणजे उपास्य देवतारूपच ते होऊन गेले. "आशापूर्व गणेश " त्याला म्हणतात. पुष्कळ लोक जातात त्या स्थानाला. यात्रा वगैरे भरते. तर उपासनासुद्धां अशी झाली पाहिजे. मी देवच आहे. पूजा करणाराही मी आहे आणि पूजा घेणाराही मीच आहे. मग कर्तत्व अभिमान कशाला उत्पन्न होईल ? पूजा करणारा मी वेगळा आहे म्हटल्यानंतर कर्तृत्व अभिमान उत्पन्न होतो. माझी पूजा चांगली झाली आहे. मी सगळयांच्या पेक्षा चांगली पूजा करतो. ईश्वर स्वरूपापेक्षा मी वेगळा नाही ही भावना घरून पूजा केली तर तिथे अभिमान नाही, फलाची इच्छा नाही तर कर्तृत्वाभिमान कशाला उत्पन्न होईल ?

त्या प्रमाणे ते पद्मपादाचार्य पूजा आटोपून नरसिंहाचे ध्यान करीत बसले आहेत. तो उग्र भैरव मांत्रिक तलवार घेऊन आचार्यांचा शिरच्छेद करण्या-

.....

करता निघालेला आहे. आचार्य एका गुहेमध्ये समाधि लावून : बसलेले आहे आत्मानंदात निमग्न होऊन. "देह जावो अथवा राहो" देहाकडे लक्षच नाहीये. भैरवाला आनंद झाला तो मनात म्हणाला हा माझा शत्रु, माझ्या पक्षाच्या विरुद्ध उठलेला, याचा शिरच्छेद करून याचे शिर अग्निमध्ये टाकले कि झाले. मग माझाच पक्ष बलिष्ठ होणार. ही स्थूल भूमिका आहे. स्थूल विचार आहे हा. तो तिकडे निघालेला आहे.

इकडे पद्मपादाचार्यांचे कर्तव्य गुरु महाराजांच संरक्षण करायचं आहे. गुरु महाराजांची सेवा करायची म्हणजे छायेप्रमाणे त्यांच्या जवळ राहायचे आणि ध्यान करता करता समाधि अवस्थेमध्ये एकदम त्यांना ते सगळ दृष्य दिसायला लागले – आचार्य महाराज समाधि लावून बसलेले आहेत. आणि कालचा तो मांत्रिक तलवार घेऊन त्यांना मारण्याकरता निघालेला आहे. एकदम त्या ध्यानावस्थेमध्ये त्यांनी नरसिंह रूप धारण केले. तितकी उपासना झाली असली तर उपास्यरूप धारण करता येते. पद्मपादाचार्यांचे शरीर नाहीसे झाले आणि नरसिंहरूप त्या ठिकाणी दिसू लागले. गर्जना करायला लागले. निघाले. धावत धावत निघाले. सगळी मंडळी धावत आली. काय झाले. पद्मपादाचार्य ध्यानाला बसले होते ते कुठे गेले, दिसत नाहीत. नरसिंह रूप कसे दिसायला लागले. म्हणजे नरसिंह अवतार ह्या वेळेला होता. धावत जाऊन त्या भैरवाला आचार्यांच्या जवळ जाण्यापूर्वीच धरले. खाली पाडले, त्याचे पोट फाडले आणि त्याचा नाश केला. गर्जना करताहेत. आचार्यांची समाधि उतरली. समोर पहाताहेत तो नरसिंह आचार्यांनी त्यांची स्तुति वगैरे केली.

आणि ब-याच काळानंतर त्यांची (पद्मपादाचार्यांची) समाधि अवस्था संपली, ते नरसिंहाचे रूप अदृष्य झाले आणि पुन्हा पद्पादाचार्य दिसू लागले. जागृतावस्थेत आल्यावर त्यांनी गुरु महाराजांना नमस्कार केला.

म्हणजे गुरु महाराजांचं संरक्षण करण हे आपले पहिल कर्तव्य आहे. तू जरी मारू लागलास तरी आम्ही तुला मारू देणार नाही. गुरु महाराज आमचे आहेत. ही ममता पाहिजे. हा विवेक तिथे उपयोगी नाही. तिथे अविवेक म्हणजे गुरु आणि ईश्वर एकच आहे. हा विवेक करायचा नाही.

गुरूदेव एक मानूनी भक्ति ।
तयाची करि त्या करी येई मुक्ति ।
सुयुक्ति अशी ही धरी नित्य चित्ता ।
त्वरे आदरे तूं स्मरे नित्य दत्ता ।।

....

या चित्तसद्बोध नक्षत्रमालेमध्ये सद्गुरु वासुदेवानंद सरस्वति स्वामी महाराजांनी हा एक मार्ग सांगितला आहे. कुछ विवेक पाहिजे कुछ अविवेक पाहिजे. ॥एक पाहिजे॥.

तर लोकांकरता कार्य करायच असताना त्यांनी अशी का परवानगी दिली ? त्यांनी परवानगी दिली त्यांच आत्मज्ञानच केवढ महत्वाच आहे. ज्ञानेश्वर महाराज इतक्या लवकर समाधि लावून बसले, विचारणारे विचारतात. तुम्हाला काय हक्क आहे विचारण्याचा । त्यांनी किती कार्य करून ठेवलेले आहे ।"एक तरी ओवी अनुभवावी" असे विठोबाशी बोलणारे नामदेवांसारखे साक्षात्कारी महात्मे सांगताहेत. इतका त्यांच्या ग्रंथाचा अधिकार आहे. लोकांकरता किती कार्य त्यांनी केलय । आणिखी काही दिवस रहायला पाहिजे होत हे कोण सांगणार तुम्ही ? आणि नाहीत कशावरून ? ते जरी समाधिमध्ये जाऊन बसले असले तरी नाहीत कशावरून ? ते गेले का समजायच ?

ते मध्ये निघाल होत नाही काही. खरोखर ज्ञानेश्वर महाराज आत आहेत कि नाही बाहेरून आधुनिक उपकरणांच्या सहाय्याने फोटो वगैरे काढून पहाव. पण शेवटी तिथल्या विचारी मंडळींनी या संशोधकांना सांगितल, "तुमच्या उपकरणामध्ये सामर्थ्य असेल. पण जर त्यामध्ये आतला फोटो आला नाही तर ज्ञानेश्वर महाराज समाधिमध्ये आता नाहीत हेच तुम्ही प्रसिद्ध करणार. आधुनिक विज्ञानाला महत्व आहे तुमच्या दृष्टीने. सगळेच अविवेकी बुद्धिवादी । सगळ्यांची खात्री होणार कि ज्याअर्थी समाधिमध्ये फोटोत ज्ञानेश्वर महाराज दिसत नाहीत त्याअर्थी ते तिथे आता नाहीत. म्हणजे किती लोकांचा बुद्धिभेद होणार । "

गुलाबराव महाराजांची गोष्ट सांगतात. गुलाबराव महाराज स्वतःला ज्ञानेश्वर महाराजांची कन्या आणि श्रीकृष्णांची पत्नि समजत होते. मोठे अधिकारी वयाच्या चौथ्या वर्षी दृष्टी गेल्याने ते अंध होते. एक फोटोग्राफर आला आणि त्यांना म्हणाला, "महाराज तुमचा फोटो काढतो". त्यांनी सांगितल, "फोटोबिटो काही काढायचा नाही" बर, म्हणाला. संध्याकाळच्या वेळेला काही मंडळी बाहेर निघाली, हेही निघाले फिरायला. त्या फोटोग्राफरने चौघांचा एकदम फोटो घेतला. बाकीच्या तिघांचा त्यातून फोटो पुसून महाराजांचा फक्त फोटो ठेवायचा असा त्याचा विचार होता. त्याप्रमाणे त्याने फोटो घेतला.

....

दुसऱ्या दिवशी सकाळी तो परत आला. महाराज त्या वेळेला पूजा करीत बसले होते. त्यांनी विचारले, काय हो, निघाला का आमचा फोटो ? त्याने सांगितले, महाराज तुमचाच फोटो गेला. बाकीच्या तिघांचे फोटो आले.

म्हणजे विज्ञानाची शक्ति मोठी आहे कि संतांच्या संकल्पाची शक्ति मोठी आहे. हा विचार नाही, लोकशाहीमध्ये हा विवेक राहीला नाही लोकांच्या बुद्धिमध्ये. विज्ञानवाद मोठा ! त्यांच्या संकल्पाने जर ज्ञानेश्वर महाराज फोटो मध्ये आले नाहीत तर तुम्ही जाहीर करणार विज्ञानवाद मोठा आहे. शेवटी ते रहीत केल म्हणतात. तर अशी त्यांची शक्ति आहे.

पद्मपादाचार्य संन्यासी आहेत. तुळसीसुद्धा तोडायच्या नाहीत. फुल तोडायची नाहीत काही नाही. नुसत पाणी घालून पूजा करायची. इतकी अहिंसा ज्यांनी पाळायची त्यांनी त्या भैरवाला ठार मारले. आणि आपल्या गुरु महाराजांचे संरक्षण केल. ही घटना ईश्वराच्या इच्छेने झाली आहे. पण त्यांनी त्याला नरसिंहरूपाने मारले आहे संन्याशी रूपाने नाही.

तर तात्पर्य अस आहे की ही जी आहारशुद्धि म्हणून सांगितली आहे शास्त्रकारांनी, मनाच्या शुद्धि करीता, प्राणवायू स्थिर करण्याकरीता आहाराला महत्व आहे. रसनेंद्रियाला आवरले पाहिजे. जिभेला आवडेल असा आहार घेता येणार नाही. आणि योगाभ्यास ज्याला करायचाय त्याने अर्धपोटी राहिले पाहिजे. प्राण स्थिर करायचा किंवा मन स्थिर करायच. प्राण स्थिर झाला तरी मन स्थिर होत किंवा मनस्थिर झाल्याने प्राण स्थिर होतो. त्याच्यामुळे विवेक, वैराग्य वगैरे सगळे गुण आपोआप निर्माण होतात. पुढचा मार्ग सगळा व्यवस्थित होतो. तर शास्त्राने सांगितल्याप्रमाणे शुद्ध आहार पाहिजे. शुचिता किंवा अशुचिता केवळ स्थूल बुद्धिने समजू नये. आम्ही अपवित्र झाला हे कशावरून ? झाडावरून काढून आणलेल्या फुलाचा वास घेतल्यावर ते फूल अपवित्र झाले. ते फूल वाहायचे नाही देवाला असे शास्त्र सांगले. आधुनिक बुद्धिवादी म्हणतात आम्ही वास घेतला तर काय झाल ? शुद्धि किंवा अशुद्धि याला फक्त शास्त्र/शब्द प्रमाणच आहे.

डॉक्टर सांगतात, अमूक एक पदार्थ खाऊ नको. रोग जास्ती वाढेल. कुठ दिसतो तो रोग ? अस जर पेशंट म्हणायला लागला तर डॉक्टर म्हणतील खा आणि मरा. त्या डॉक्टरलासुद्धा दिसत नाही तो रोग. पण पथ्यपाणी ते सांगतात. पेशंटने ऐकले तर हित आहे. डॉक्टरचा शब्द हेच प्रमाण. तस

......

शुद्धि किंवा अशुद्धि शब्द प्रमाणानेच समजून येणार. तस शास्त्राने जे हितावह आहे म्हणून सांगितलय त्याप्रमाणे वागले तर पुढे त्याचे फळ दिसायला लागत. पृथक्करणशक्ति, वैराग्यशक्ति निर्माण होते. व्यवहार कमी कमी करावासा वाटतो. आणि त्या मनाची शक्ति हळू हळू वाढायला लागते.

दुसरे दोष जो पर्यंत बुद्धित भरलेत तो पर्यंत हे सकळे गुण येतीलच कसे ? घाण पाणी भरलेल्या भांड्यात दूध कसे घेता येईल ? त्यातले आधी घाण-पाणी काढले पाहिजे ते विसळले पाहिजे, स्वच्छ केले पाहिजे मग त्यात दूध घेता येईल. तस मनातले सगळे दोष गेल्यानंतर तो पृथक्करण विवेकशक्ति निर्माण होते. परमेश्वराला मनात कस आणायचं, चिंतन करायच ही स्थिरता येते.

सगळच ईश्वररूप असताना मूर्ति ईश्वराच स्वरूप नाही हा का बुद्धिवाद ? सगळ विश्व परमेश्वराच स्वरूप आहे म्हणायच ना । मग मूर्तिला ईश्वर मानायला काय हरकत आहे. ते शास्त्रानेच सांगितले आहे. मूर्तिमध्ये देखील ईश्वर प्रकट होऊ शकतो. कोणत्या नियमांच पालन केल्याने मूर्तिच्या ठिकाणी ईश्वरत्व राहू शकत आणि कोणचे नियम मोडल्याने ते जाऊ शकत हे सुद्धा त्याच शास्त्राने सांगितल त्याच शास्त्राने पथ्यही सांगितले आहे. शास्त्र चुकले हे सांगण्याचा अधिकार यांना कोणी दिला ? त्यामुळे स्थूल दृष्टीने का होईना आमच्या चर्मचक्षूला परमात्मा दिसत नसला तरी तो दिसण्या करीता किती तरी प्रयत्न केला पाहिजे. प्रयत्नवादाला परमार्थामध्ये फार महत्त्व आहे. संतांनी भारताला निष्क्रिय बनवल असम मोठमोठे विचारवंत लोक आक्षेप घेतात. तस लिहून ठेवतात. पण यवनांचे आक्रमण झाल्यावर लोकांची बुद्धि स्थिर टेवण्यासाठी प्रयत्न केले. संतांनी उलट जास्त प्रयत्नवाद शिकिवलेला आहे. निष्क्रिय बनिवलेल नाहीये. पण विवेक सगळाच संपलाय आमच्या बुद्धितला. विचार करण्याची बुद्धिच नाहीये. आम्ही बुद्धिवादी आहोत. आमची बुद्धि मोठी आहे. आम्ही सगळ्यांचे कल्याण करणारे आहोत. समाजाच कल्याण आम्हाला करायचय. अस आपल्याच तोंडाने आपल्या गुणांच वर्णन करायच. काय होणार ?

संतोचे ग्रंथ निःपक्षपाती आहेत. निर्भय आहेत ते. कोणाची भीती त्यांना नाही. अस झाल तर अस होईल अस सांगताहेत ते. तुम्ही ऐका नाही तर सोडून द्या. काही आग्रह नाही. पक्ष आहे पण पक्षाचा अभिनिवेष नाही. काही नाही. तो भक्तिमार्ग हा अगदी स्वतंत्र आहे. धर्मातीत राज्य असून सुद्धा मंत्री महाशयांनी पांडुरंगाची पूजा केली. कशाला केली ? आम्हालासुद्धा आक्षेप

.....

घेता येईल. तुम्ही जर निधर्मी राज्य करणारे मग पूजा कशाला करता ? तुमच्या बुद्धिने हे टाकायचे ठरवलंय ना मग पुन्हा कशाला घेता ? म्हणजे टाकायच कोणच घ्यायच कोणच हे समजण्याइतकी तुमची बुद्धि विकसित झालेली नाही.

तर अशा दृष्टीने हा सगळा विवेक मनामध्ये उत्पन्न झाला पाहिजे. म्हणजे दोष वगैरे मनातले दूर होतात. मनाला स्थिरता येते. आचार्य महाराजांनी हे सगळ सांगून ठेवलेले आहे. कर्म मार्ग कसा असावा, भक्तिमार्ग कसा असावा वगैरे सगळ मार्गदर्शन त्यांनी केलेले आहे. ज्ञानेश्वर महाराजसुद्धा म्हणतात- भाष्य-कारकाला वाट पुसतो. त्यांनी ही शास्त्र काय सांगले तेच सांगितले आहे. त्यांचेच सिद्धान्त ह्यांनी सांगितलेत. आचार्य महाराजसुद्धा सांगतात - वेदामधले सिद्धान्तच मी मांडले आहेत. ते वाचन करायचा, ऐकायचा अधिकार हवा कि नको, तशी हल्ली विकसित बुद्धि आहे का ? म्हणूनच म्हणतात वेदान्त भलत्या सलत्याने ऐकू नये. साधन चतुष्टय संपत्ति मनामध्ये तयार झाल्यानंतर वेदान्त ऐकायला सुरवात होते. त्याशिवाय नाही. मनाची तयारी व्हायला पाहिजे. पृथक्करण करता आले पाहिजे. ईश्वर श्रेष्ठ आहे. सर्वोच्च आहे. पूर्णज्ञानी आहे आणि आपले ज्ञान अगदी अल्प आहे हा विवेक झाला पाहिजे. म्हणजे अहंकार जातो. मीच मोठा आहे. मीच ईश्वर आहे. सहाव्या अध्यायात भगवंतांनी सांगितले आहे. श्रेष्ठ पुरुष हे भारताच केवढ वैभव आहे । बुद्धि विकास त्यांनी पुष्कळ केलेला आहे. तो बुद्धि विकास होण्याकरता प्रयत्न झाला पाहिजे. भौतिक विकास पुष्कळ झाला तरी भारताचा तो खरा विकास म्हणता येणार नाही. त्यालाही पुष्कळ विरोधी आज टपलेले आहेत. पुष्कळ शस्त्रास्त्र तयार आहेत. पण बौद्धिक विकास मात्र झालेला नाही. ज्यांनी मनोविकास करून घेतला त्या शास्त्रज्ञांच अस सांगण आहे कि सर्वांच्या बुद्धिचा विकास झाला पाहिजे. तो होण्या करता

दुरितांचे तिमीर जावो ।
विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ।

असे ज्ञानेश्वर महाराजांनी देवाजवळ मागण मागितलय. पसायदान म्हणजे बुद्धि विकास कसा आहे ह्याच रूप आहे. सर्वांच्या बुद्धिला प्रेरणा करणारी ईश्वरशक्ति अबाधित आहे. ती समजून घ्यायचा आणि आपल्या वैयक्तिक जीवनामध्ये आणण्याचा प्रयत्न करायचा. त्या ईश्वरशक्तिकडून

....

सगळे कार्य चाललेल आहे. त्या ईश्वराबद्दल आणि भक्तिमार्गाचे मार्गदर्शन करणाऱ्या महात्म्यांबद्दल विश्वास ठेवून जर आपण चाललो तर आपल्या-लाही तो मार्ग हस्तगत व्हायला हरकत नाही. तो मार्ग आपल्याला मिळावा अशी रोज प्रार्थना करायची देवाजवळ. ती प्रार्थना केव्हां तरी रुजु झाल्या शिवाय राहाणार नाही. आणि आपली बुद्धि शुद्ध होईल. "बुद्धि दे रघुनायका " एवढच मागायचय.

" अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त "

बोरिवली
8.7.1987.

मालाकमंडलुरधः करपद्मयुग्मे
मध्यस्थपाणियुगुले डमरुत्रिशूले
यस्य स्त ऊर्ध्वकरयोः शुभशंखचक्रे
वंदे तमत्रिवरदं भुजषट्कयुक्तम्

नारदांनी राजपुत्रांना उपदेश केलेला आहे. परमेश्वराची कृपा लवकर होते. संतुष्ट परमात्मा लवकर होतो. त्याचे काय उपाय आहेत हे सांगितले आहे. ईश्वर प्रसादाची आवश्यकता आहे. प्रपंचामध्येहि आनंद असावा आणि परमार्थहि मनाप्रमाणे चांगला मिळावा. त्या करता ईश्वराचा प्रसाद आवश्यक आहे. ईश्वराच्या उपासनेने समाधि अवस्थासुध्दा प्राप्त होतो, असे योगसूत्रकार सांगतात.

आम्हाला फक्त तीन अवस्था माहीत आहेत. जागृती अवस्था. सर्व प्रपंच चालू आहे जागृती अवस्थेमध्ये. त्या नंतर स्वप्नावस्था म्हणून आहे. आणि गाढ झोप. तीन अवस्था. याच्यापेक्षा एक चौथी अवस्था आहे, मनाची. बुध्दिला, मनाला अत्यंत स्थिरता मिळाली म्हणजे ही अवस्था प्राप्त होते. पूर्ण आनंद त्या अवस्थेमध्ये असतो. ध्यानाच एक फळ सांगितलेल आहे. ईश्वराच्या स्वरूपाच ध्यान हे जर सुरू झाल – ध्यानयोग त्याला म्हटलेल आहे – तर त्या ध्यानयोगाच्या प्रभावामुळे ईश्वरकृपेने समाधि आनंद मिळू शकतो. सर्व संसाराच, सुखदुःखाच विस्मरण होऊन जाल. अशी अवस्था प्राप्त [illegible]गहि कठिण आहे. आणि टिकणहि कठिण आहे. पुन्हा पुन्हा संसार येतोच मनात. आत्मानंदाचा अनुभव आला. संसार विसरला. पण त्याच प्रारब्धकर्म अस[illegible] कि ते पुन्हा त्या मनाला संसाराकडे ओढून नेत. समाधितून उठला म्हणजे बाहेर पुन्हा आला.

ही जी स्थिती आहे त्या करता आत्म ज्ञान झाल्यानंतर सुध्दा अभ्यास त्यांचा चालू असतो. मनाला अत्यंत स्थिर बनवायच आहे. त्या करताच मानव जन्म आहे. मनाला स्थिर करण्याकरता प्रयत्न आहे. मन अत्यंत स्थिर झाल म्हणजे पूर्ण आत्मानंद प्राप्त होतो. आत्म ज्ञान झाल्यानंतर वासना मनामध्ये कसल्या राहाणार त्या वासनाक्षयाचा अभ्यास करावा लागतो, शुभ वासना आहेत, अशुभ वासना आहेत. अज्ञानी जीवांच्या मनामध्ये त्या आहेतच, ज्ञान संपन्न झालेल्या माहात्म्यांना सुध्दा वासनाक्षयाचा अभ्यास करावा लागतो.

त्याच प्रमाणे मनाच्या वृत्ती थांबिवण्याचा अभ्यास करावा लागतो. मनोनाश ज्याला म्हणतात. मनाचा नाश म्हणजे मनाच्या वृत्ती बंद करण. मन एक क्षणभर जरी स्थिर झाल तरी किती आनंद प्राप्त होतो झोपेमध्ये मनाच्या वृत्ती थांबलेल्या असतात. मन विलिन झालेल आहे. पण त्याच्या मध्ये सगळ्या वासना भरलेल्या आहेत. पुन्हा जागे झाल्यानंतर सगळ्या वासनासहित ते मन परत काम करायला लागत.

मना बरोबर इंद्रिय आली. ही सगळी त्या मनाच्या पाठिमाग येतात. त्यामुळे नुसती समाधि अवस्था, आत्मज्ञान प्राप्त होऊन भागत नाही नंतरहि त्याला अभ्यास चालू ठेवावा लागतो. मन केव्हांच बाहेर जाणार नाही. त्याच बाहेर जाण थांबण म्हणजे फार मोठी अवस्था आहे. त्या करता समाधिची सिध्दी व्हावी लागते, ईश्वराच्या कृपेने. एकदा ते मन आत्म स्वरूपाच्या ठिकाणी स्थिर होऊन बसल कि बाहेर जात नाही. सगळ्या वासना मनातल्या गेल्या पाहिजेत.

संसारातून मन त्यांनी बाहेर काढल आणि ईश्वराच्या ठिकाणी ते स्थिर करुन टाकल. ही दोनच काम त्यांची आहेत. त्यामुळे आनंदामध्ये मन अगदी स्थिर होऊन जात. आनंदापासून काही बाजूला जात नाही.

परमेश्वर आनंदरुप आहे. उपनिषदामध्ये त्याचे वर्णन केलेल आहे. त्या आनंद स्वरुपामध्ये एकदा मन जाऊन स्थिर झाल कि संसार संपलेला आहे. मन बाहेर येण्याचीहि शक्यता संपलेली आहे. पूर्ण विदेही अवस्था त्याला म्हणतात. सातवी भूमिका आहे. ज्ञानाच्या सुध्दा सात भूमिका त्यांनी सांगितल्या आहेत. साध्या भूमिका 3 आहेत. ज्ञान झालेल आहे ही चौथी भूमिका आहे. पुढच्या तीन भूमिका म्हणजे अभ्यास करता करता ते मन आत्मानंदामध्ये अगदी स्थिर झालेल आहे. देह बंधन असे पर्यंत आहे.

ही अवस्था आपल्याला मिळवायची आहे. त्या करता ही तीन साधन सांगितली नारदांनी. त्या पैकी पहिले साधन म्हणजे भूतदया. हे मोठ साधन आहे. अहंकार मनामध्ये मनामध्ये आहे, अभिमान आपल्या मनामध्ये अनेक प्रकारचा असतो. चांगल्या कुळामध्ये मी जन्माला आलेला आहे. हा एक अभिमानच आहे. त्या नंतर उत्तम आणखी ऐश्वर्य आहे, संपत्ती आहे. तोहि अभिमान उत्पन्न होतो.

ज्ञान उत्तम आहे. हाहि अभिमान आहे. जात नाही. आपल्या ठिकाणी काही दोष आहेत अस त्या ज्ञानाभिमानी पुरुषाला वाटतहि नाही. असा अभिमान उत्पन्न होतो. तो वाढत राहातो. कारण अनुकूल परिस्थिती आहे ना संपत्ति आहे, त्याचप्रमाणे ज्ञान आहे, किर्ती आहे. ही सगळी सुखाची साधन म्हणून समजली गेलेली आहेत. त्यांच्यामुळे अभिमान उत्पन्न होतो. आणि तो अभिमान कमी होत नाही उलट वाढत जातो.

म्हणून कुंतीने भगवंताजवळ हे मागण मागितले कि देवा, संकटामध्येच आम्हाला तू ठेव. संकटामध्ये अनेक दुःख भोगायला लागली म्हणजे आम्हाला तुझी आठवण तरी राहील. सुखाच्या वेळेला देवाची आठवण होत नाही. कृतज्ञता बुध्दि ही फार कमी आहे. ईश्वरान किती आपल्याला दिलेल आहे इकडे आपल लक्ष नाहीये, नविन नविन वासना निर्माण होतात आणि त्यामुळे इच्छा आणखी वाढत जातात. आणखी पाहिजे. म्हणून विवेक ज्याच्या मनामध्ये आहे त्यालाच ईश्वराबद्दल कृतज्ञता वाटते. आणि अनुकूल परिस्थितीमध्ये कोणता दोष निर्माण होण्याची शक्यता आहे हे त्याच्या लक्षात येत.

कुंतीच्या हे लक्षात आल. पांडव विजयी झाले. पण पुढ त्यांची अवस्था कशी झाली पुढ ते चांगली बुध्दि ठेवणार आहेत कि नाही. बारा तेरा वर्ष वनवासात काढली. ईश्वराच जर अधिष्ठान मनामध्ये असेल तर सर्व दोष दूर होतात. म्हणून सर्वहि संत महात्मे ईश्वरस्मरण आपल्याला निरंतर रहाव याचा नेहमी विचार करतात, देवाजवळ तेच मागतात, विस्मरणाची जी साधन असतील त्यापासून आपल मन दूर ठेवण्याचा प्रयत्न करतात.

तर दया जर असेल मनामध्ये तर दुःखी माणूस पाहिल्यावर आपल्याला दुःख झाल पाहिजे. त्याच दुःख कस दूर होईल असा मनामध्ये विचार यायला पाहिजे दुसऱ्याच दुःख दूर होण्याकरता प्रयत्न झाला पाहिजे. स्वतःच दुःख दूर व्हाव याच्याकरता कोणीहि प्रयत्न करील. ज्या प्रमाणे आपल्याला दुःख भोगताना जसे क्लेश होतात त्या प्रमाणे दुसऱ्याला सुध्दा दुःख भोगताना अत्यंत क्लेश होतात त्यातून त्याला सोडवल पाहिजे. ही मनामध्ये वृत्ती उत्पन्न होण यालाच दया अस म्हणतात.

दुःखी मनुष्याबद्दल दया उत्पन्न व्हावी मनामध्ये हा एक अभ्यास करावा असं सांगतात, योगसूत्रकार. अभिमानादि विकार मनामध्ये असताना दया उत्पन्न होणं शक्य नाही. तो स्वतःच्याच अभिमानामध्ये निमग्न असतो. त्याला दुसऱ्याच्या दुःखाची कल्पनाच नाही. ती दया जर अंतःकरणामध्ये उत्पन्न झाली "दयया सर्व भूतेषु" म्हणतायत. "भूतापरस्परे पडो मैत्र जीवाचे" ज्ञानेश्वर महाराजांनी हीच मागणी केली आहे. ती परस्परांबद्दल मैत्री, सौहार्द्र, भावना प्रत्येकांच्या मनामध्ये पाहिजे. एकमेकांच्या सुखदुःखाची भावना सर्वांच्या मनामध्ये पाहिजे. ही दया उत्पन्न होऊन वृध्दिंगत झाली पाहिजे.

भागवतामध्ये दोन उदाहरणे दिली आहेत. एक द्रौपदिचे आणि रंतिदेव राजाचे. तो राजा अरण्यामध्ये जाऊन राहिला होता. अयाचित वृत्तीने राहात होता. कोणी आणून दिलं काही तर त्याच्यावर निर्वाह करायचा. सगळीहि अयाचित वृत्ती आहे. अभिमान उत्पन्न होऊ नये या करता या सगळ्या साधनांचा उपयोग आहे. एकदा त्या राजाला 48 दिवस अन्नपाणी काहीही मिळालं नाही. तसंच राहायचं. मनाचा निग्रह आहे. आणि नंतर कुणी तरी धान्य आणून दिलं, पाणी आणून दिलं. स्वैपाक तयार झालेला आहे. इतक्यात एक कोणी तरी अतिथी आलेला आहे. म्हणाला, भूक लागली महाराज. हे ऐकल्यावर राजा स्वतःची भूक विसरून गेला. अतिथीला भूक लागलीये त्याला क्लेश होतायत इकडे लक्ष द्यायच. काही अन्न त्याला दिलं. आणि आपण जेवायला बसला. इतक्यात दुसरा एक अतिथी आला. त्याच्याबरोबर कोणी होते. त्या सर्वांना अन्न देऊन टाकलं. आता फक्त एका माणसाला पुरेल एवढच अन्न शिल्लक राहिलेलं आहे.

आता फक्त पाणी शिल्लक राहिलेलं आहे. आणि ते पाणी पिण्याचा तो प्रयत्न करतो आहे. इतक्यात एक तहान लागलेला मनुष्य आला. "मला थोडं पाणी असेल तर द्या", म्हणाला. ते पाणीहि त्याला देऊन टाकलेलं आहे. देवाची प्रार्थना केली त्या रंतिदेवाने, "सर्वहि दुःखी जीवांच्या शरीरामध्ये मला ठेवा तुम्ही. सर्वांची दुःख मला द्या. पण सर्वे पि सुखिनः सन्तु "

ही कथा ऐकण्यासारखी आहे. आपल्याला त्याचा कधी अभ्यास नाही, अनुभव नाही. हे खरं कशावरून असं वाटतं. पण त्या महात्म्यांच्या उच्च भूमिकेवर गेल्याशिवाय कळायच नाही आपल्याला. किती दया विलक्षण आहे पाणीहि देऊन टाकल्यावर, ब्रह्मा, विष्णु, महेश प्रसन्न झाले, प्रगट झाले. प्रपंचातून तू सुटलास निमित्त मात्र आहेस असा त्याला आशिर्वाद दिला.

द्रौपदिच एक उदाहरण भागवतामध्ये आहे. भारतीय युध्द संपलेलं आहे. अठरावा दिवस भीम आणखी दुर्योधन यांचं गदायुध्द शेवटी झालं. दुर्योधन खाली पडला. पांडवांना विजय मिळाला. पांडवांचं सैन्यहि बरच शिल्लक राहिलं होतं. त्यांचा सेनापति प्रथमपासून जो एक होता तोच शेवटपर्यंत होता – धृष्टद्युम्न, द्रौपदिचा भाऊ. कौरवांचे सेनापति बदलले. भीष्माचार्य पहिले सेनापति. दहा दिवस त्यांनी युध्द केलं. पुढ द्रोणाचार्य सेनापति झाले. त्यांनी पांच दिवस युध्द केलं. धृष्टद्युम्नाने त्यांना मारलं. कर्ण एवढा मोठा पण दोन दिवसात तो खाली पडला. शल्य थोडा वेळ टिकला. सकाळी सेनापति झाला दुपारी मारला गेला. धर्मराजानेच त्याला मारलं.

सेनापति सगळे गेले. सैन्य सगळं मारलं गेलं. तीन मंडळी फक्त जिवंत राहिली म्हणतात त्या कौरवांच्या पैकी. अश्वत्थामा, कृपाचार्य आणि कृतवर्मा. यादव होता. यादवांचं सैन्य घेऊन आला होता. दुर्योधनाला

दुर्योधनाला श्रीकृष्णांनी दिले होते. सैन्य पाहिजे म्हणाला. ते सगळ सैन्य मारल गेल. तो एकटा जिवंत राहिला. अश्वत्थ्याम्याच्या मनामध्ये पांडवांच्या बद्दल व्देष निर्माण झालेला आहे. पांडवांच्या सेनापतिने माझ्या बापाला मारलेल आहे. त्या सेनापतिलाहि मारायच. आणखी पांडवांचाहि नाश करायचा. त्यांच्या-पैकि कोणीहि जिवंत ठेवायचा नाही, अस त्याने ठरवल. व्देषबुध्दि मनामध्ये उत्पन्न झालेली आहे. दया संपलेली आहे. एकदा व्देष उत्पन्न झाल्यावर त्याची परिणती कशामध्ये होईल सांगता येत नाही. अश्वत्थाम्याने रात्रीच्या वेळी शिबीरामध्ये जाऊन धृष्टद्युम्नाला प्रथम ठार मारल. जय झाल्यामुळे निर्भयपणे सगळे झोपले होते. त्यानंतर द्रौपदिची जी पांच मुल होती ती पांचहि मुल त्याने ठार मारली. आणि बाहेर गेला तो.

सकाळी हे सर्व पांडवांना, द्रौपदिला समजल. ती तर अगदी मूर्च्छितच झाली. "काय," म्हणाली, "राज्याकरता एवढा प्रयत्न केला. आम्हाला तरी काय मिळाल " पांडव तरी विजयी झाले अस म्हणता येईल का पांडवांची सगळी मूल गेली. धर्मराजाच्याहि मनावर परिणाम झाला. मला राज्य करायच नाही वगैरे म्हणायला लागला. द्रौपदिची स्थिती तर काय विलक्षण झाली. बारा तेरा वर्षे बनवास भोगलेला. एक वर्ष अज्ञातवासात काढलेल. तिथहि तिच्या मागे तो कीचक लागलेलाच होता. भीमाने त्याचा नाश केला म्हणून ती बिचारी सुटली त्या कीचकाच्या त्रासातून. म्हणजे अत्यंत दुःखात बारा तेरा वर्षे काढली.

युध्दामध्ये सगळे शत्रु मारले गेले. दुर्योधन गेला, दुःशासन गेला, सगळे नाहीसे झाले. एक मनाला समाधान मिळाल. आणखी जन्मभर दुःख करायची पाळी आली. एकहि मुलगा जिवंत नाही. कृष्णार्जुन राहिला होता तो नगराच्या बाहेर पडला होता. कारण हे आपल्याला धरणार हे त्याला माहित होत. वनामध्ये जाऊन अर्जुनाने त्याला धरला आणि बांधून आणला. आणि द्रौपदि बिचारी खाली मान घालून रडते आहे.

अर्जुन म्हणाला, "द्रौपदि, हा तुझा शत्रु आणलेला आहे. याला काय शिक्षा करायची ते सांग." द्रौपदिची धर्मबुध्दि, भगवद्भक्ति किती होती याच उदाहरण आहे. आपली पांचहि मुल ज्याने मारली तो अश्वत्थामा हात बांधलेल्या स्थितीत खाली मान घालून उभा आहे. तिच्या भक्तिचा प्रभाव आहे.

निर्वैरः सर्व भूतेषु यः स मामेति पाण्डव

भगवद्गीतेमध्ये भगवंतांनी सांगितलय - माझ्या जवळ कोण येतो "कोणाही जीवाचा न घडो मत्सर /----- हे ज्याला साध्य झालेल आहे तो. कोणच्याहि जीवाचा व्देष करायचा नाही. शत्रुचा सुध्दा. सर्वत्र एक परमात्मा असलेला आहे, अशी भावना झाल्यामुळे व्देष कोणी कोणाचा करायचा

त्यामुळे अश्वत्थामा खाली मान घालून उभा राहिलेला आहे. द्रौपदिची कर्तव्यबुध्दि जागृत झाली. तिच दुःख बाजूला गेल. आणि अश्वत्थ्याम्याच्या जवळ जाऊन तिन त्याला नमस्कार केला. तिन अर्जुनाला सांगितल, "यांना सोडून द्या. जीवदान द्या." पुष्कळ धर्मज्ञ होती द्रौपदि. धर्मशास्त्राच उत्तम ज्ञान तिला होत. अर्थशास्त्राच ज्ञान होत. भगवद्भक्ति तर अंतःकरणात पूर्ण आहे. तिच्यावर गोपालकृष्णांच प्रेम होत. सुभद्रा आहे बहिण. द्रौपदि काही सख्खी बहिण नव्हती.

ईश्वराबद्धल "यथा देहे तथा देवे ।। अशी भक्ति उत्पन्न व्हावी लागते. कृष्णांनी परिक्षा पहायच ठरवल. सुभद्रेला वाटत होत माझ्यावरच कृष्णांच प्रेम जास्त आहे. श्रीकृष्णांना काही चाकू, वगैरे शस्त्र लागत, रक्त यायला लागल.

सुभद्रेन पाहिल. ती राजपत्नि होती. धावत आली म्हणाली, "अरेरे कृष्णा तुला लागल. चिंधी पाहिजे होती तेलात बुडवून लावली असती. ती चिंधी शोधायला लागली. इतक्यात द्रौपदिच्या दृष्टीला ते पडलेल आहे. आपल्या भरजरी शालूचा तुकडा तिने फाडला आणि तेलात बुडवून त्या चिंधीने ते बोट बांधून टाकले. ते रक्त बंद झालेल आहे.

ईश्वर ही भावना आहे. प्रत्यक्ष गोपाल कृष्ण म्हणजे वैकुंठपति आहेत. अत्यंत प्रेम आहे. त्या प्रेमाच हे निदर्शक आहे. भरजरीच वस्त्र. हे त्या सुभद्रेला सुध्दा करता आल असत. पण ती मोह सुटत नाही. तशी मनोवृत्ती होतच नाही ना मन सगळ वस्त्रामध्ये, शरीरामध्ये, बाहेरच्या घरादारामध्ये गुंतून राहिल आहे. आपल सगळ सुरक्षित ठेवून देवाला काही करता आल तर करायच. हरकत नाही. देव ते सुध्दा मान्य करतो. "पत्रं, पुष्पं फलं तोयं ।। पण तुमच्या मनातल हे बंधन जाणार नाही.

तर अशी कृष्ण भक्ति त्या द्रौपदिच्या अंत:करणात असल्यामुळे महा-भारतामध्ये द्रौपदिची कृष्ण भक्ति किती होती याची दोन उदाहरणे दिली आहेत. एक ते वस्त्रहरणाच उदाहरण प्रसिध्द आहे. सगळे मोठ मोठे ऋषी, ज्ञानी महात्मे, राज नीतीज्ञ वगैरे बसले असताना दुर्योधन तिच वस्त्र हरण करणार आहे. सभेमध्ये तिची आणखी विटंबना होण्याची पाळी आलेली आहे. भीष्माचार्यांना विचारल त्यांनी पण भीष्माचार्यहि काही बोलू शकले नाहीत. आम्ही याच अन्न खातो आम्ही काय बोलणार याच्या विरुध्द ! अस सांगून ते मोकळे झाले.

मग गोपालकृष्णांच स्मरण तिला झालेल आहे. आणि त्यांना तिने हाक मारली. परमात्मा सगळ्या ठिकाणी आहे. म्हणून हाक मारली. देवाला ऐकायला जाईल काय व्दारकेला अस वाटल असत तर ! त्या भक्तिमध्ये ज्ञानही आहे- देव सर्वठिकाणी आहे. म्हणून हाक मारली. देवाला ऐकू जाईल का व्दारकेला अस वाटल असत तर ! पण त्या भक्तिमध्ये ज्ञानहि आहे. देव सर्व ठिकाणी आहे. कुठूनहि हाक मारली तरी त्याला ऐकू जाते.

म्हणून अत्यंत तळमळीने माणखी हाक मारल्यावर गोपालकृष्णांनी वस्त्र-रुपच धारण केल. ही कथा मुधाम महाभारतकारांनी घातली आहे. द्रौपदिच्या भक्तिचे सामर्थ्य आहे हे. दु:शासन दमलेला आहे आणि निघून गेलेला आहे.

आणि दुसर उदाहरण म्हणजे पांडव वनामध्ये असताना दुर्वास ऋषी इकडे हस्तिनापुरामध्ये येऊन राहिले. दुर्योधनाने त्यांची मनापासून सेवा केली. ते रागावले, बोलले, मारल, तरी सगळ सहन केलेल आहे. दुर्वास ऋषि प्रसन्न झाले. "काय पाहिजे दुर्योधना तुला." संतांची संगती घडली दुर्योधनाला. पण बुध्दि मात्र बदलली नाही. त्या संगतीचा फायदा हाच त्याला घ्यायचा होता. त्याने सांगितले, "ऋषि महाराज, तुम्ही मला वर देणार आहात ना ! तर वनामध्ये पांडव आहेत. त्यांना सुर्यनारायणाने ते पात्र दिलेल आहे. द्रौपदिच जेवण होई पर्यंत वाटेल तितक अन्न त्या पात्रातून मिळत. सगळ्यांना वाढून होईपर्यंत ती स्वत: काही खात नाही. अन्नदान करते आहे. धर्माकड लक्ष आहे. धर्माचरण ईश्वराला प्रिय आहे. आपण धर्माने वागलो तर ईश्वराची कृपा आपल्यावर होईल.

म्हणून आपण जर जेवण करुन घेतल आणि नंतर जर कोणी ऋषि मुनि आले तर ! हा विचार तिच्या मनात आहे. म्हणुन रोज एकादशी तिला घडत होती. एखादि आषाढी एकादशी आम्हाला असती. कारण रात्र झाली, आता कोणी अतिथी येणार नाही अस वाटल कि मग तिने जेवण कराव.

दुर्योधनाने त्यांना सांगितल, "ऋषि महाराज, माझी सेवा पाहून प्रसन्न झालात ना ! मग असं करा. तुमचे दहा हजार शिष्य घेऊन रात्रीच्या वेळेला द्रौपदिच जेवण झाल म्हणजे पांडवांच्या आश्रमात जा आणि आम्हाला भूक लागली आहे, जेवण द्या असं सांगा ".

ही परिक्षा आहे ना सत्व परिक्षा ! आणि दुर्वासांना कबूल कराव लागल ना. दुर्वास ऋषि जरी मोठे ज्ञानी असले तरी या संगतीमध्ये सांपडल ना ! दुर्योधनाची सेवा घेतली. आता वर द्यायलाच पाहिजे त्याला. जाव लागल त्यांना. आले पांडवांच्या आश्रमामध्ये. नुकतच द्रौपदिच जेवण झाल होत. पात्र घासून ठेवलेल आहे ते. दुर्वासऋषि म्हणाले, "जेवण पाहिजे आम्हाला" धर्मराजहि चिंताग्रस्त झाले आहेत. धर्मराजहि मोठे धार्मिक होते. त्यांच सामर्थ्यहि मोठ होत. पण अशा वेळेला काय करणार द्रौपदिच जेवण झाल्यामुळे अन्न मिळण्याची वेळ निघून गेली आहे ना ! आता परत दुसऱ्या दिवशी सूर्योदयानंतर अन्न मिळणार. पात्र दिल सूर्यनारायणांनी पण द्रौपदिची परिक्षा आहे. द्रौपदिच जेवण होईपर्यंत अन्न मिळणार आहे. केव्हा आपण जेवायच हे आपल्या मनाने द्रौपदिने ठरवायच आहे. दुसऱ्याने सांगून होणार नाही.

भगवंताची भक्ति आहे. अतिथी देवो भव. दयावृत्तीचा हा अभ्यास आहे. अन्नदान करायच. भूकेने आलेला आहे बिचारा. आपल्याला भूक लागल्यानंतर किती क्लेश होतात. हे विचार मनामध्ये घेऊन आणखी अन्नदान करायच. पूर्वी भिक्षा, मधुकरी मागायची पध्दती होती. विद्यार्थी जिथे संस्कृत पाठशाळा असेल तिथे विद्याभ्यासासाठी जाऊन रहात. आणखी दुपारच्या वेळेला कोणी तरी विद्यार्थी मधुकरी मागायला आलेला आहे, ही माऊली स्वैपाक करून वाढायला आलेली आहे. तिच्या डोळ्यापुढे आपला मुलगा उभा राहिला. माझाही बाळ असाच दुपारी कुठं तरी गेलेला असेल. हे वात्सल्य तिच्या मनात निर्माण झाल आणि तिने त्या मुलाला भिक्षा घातली. मुलाच प्रेम अंतःकरणामध्ये आहे. पूर्वी हे सगळ होत.

तर त्या वेळेला धर्मराजाचहि धर्म सामर्थ्य काही उपयोगी पडल नाही. कारण त्याच धर्माचरण हे काही धराकरता चाललेल नाही. द्रौपदि आणी धर्मराज यांचा वादविवाद होत असे. अरण्यामध्ये जायला लागल आणि बाकिचे बंधू व द्रौपदिहि राहू लागली. माहेरी निघून गेली नाही. सीतादेवीला रामांनी सांगितल, तुम्ही आमच्या बरोबर वनात येऊ नका. माहेरी जा. पण त्यांनी सांगितल, नाही. मी तुमच्या बरोबर वनात येणार.

धर्मराजाच उत्तर एकच, काही फळाच्या अपेक्षेने मी धर्माचरण करीतच नाही. शुध्द भावनेने, ईश्वराची आज्ञा म्हणून मी धर्माचरण करतो. ईश्वराने काही फळ द्याव म्हणून नाही. अशी अतिशय मोठी भूमिका आहे. ईश्वराने मला धर्माचरणाच काही फळ द्याव अशी इच्छा करण म्हणजे धर्माचा व्यापार करण्यासारख आहे. मला व्यापार करायचा नाही. इतके मोठे धर्मराज पण दुर्वास ऋषि येऊन भोजन करतो म्हणाले तेंव्हा काही करु शकले नाहीत. थोड थांबा, सकाळी सूर्योदय झाल्यावर भोजन करा वगैरे दुर्वासांना विनंती करायची सोय नाही.

तसे परिक्षा पहाणारेही मोठे होते. ही काही निर्दयता नाही त्यांची. आणि यांचीही परिक्षेची वेळ आहे. द्रौपदीने भगवान गोपाल कृष्णांचा धावा केला. आले भगवान म्हणाले, काय द्रौपदी या रात्रीच्या वेळेला हाक मारलीस. मी जेवायला बसणार होतो. भूक लागलीये मला. काय खायला देतेस, द्रौपदी म्हणाली, माझ जेवण झालेल आहे. पात्र घासून ठेवलेल आहे. पात्र असत तर जेवण दिल असत.

भगवान म्हणाले, पात्र आण बघू. तिने पात्र आणलेल आहे. पात्राला एक पान राहिलेल होत (लागून) भाजीच. म्हणून भांडी घासणाऱ्या बाईने भांडी घासून आणल्यावर पुन्हा धुवून घ्यायची पध्दत आहे. आता तसच ठेवतात. स्वच्छ आहे अस समजून. मन शुध्द असल म्हणजे झाल. बाहेरून कसोहि असल तर काय झाल, अशी मनाची समजूत करून घेतो आपण.

ते भाजीच पान भगवंतांनी ग्रहण केल आहे. "पत्रं, पुष्पं, फलं, तोयं " पत्र मिळाल आणि तृप्त झाले भगवान. दुर्वासांबरोबरच्या स्नानाला गेलेल्या मंडळींना सुध्दा आपल जेवण झालय अस वाटल. आणि परस्पर ते निघून गेलेले आहेत.

हे द्रौपदीच्या मोठ्या भक्तिच उदाहरण व्यासांनी महाभारतामध्ये मुद्दाम लिहिलेल आहे. चमत्कार नाही हा. अंतःकरणामध्ये तशी जर भक्ति असेल तर सत्त्व संरक्षण परमेश्वर करतो याच उदाहरण आहे हे. तयारी ज्याची असेल त्याला तो अनुभव येतो. द्रौपदिने हा काही अनुभव मांडलेला नाही. परंतु तिच हे चरित्र आपण लिहिल पाहिजे अस व्यासांना वाटल आहे. आमच चरित्र लिहा म्हणून काय सांगायला गेले नाहीत पांडव. धर्माचरणाच, भगवद् भक्तिच काय फळ मिळत हे जगाला दाखवून देण्याकरता त्यांनी हे लिहिल आहे. अशा द्रौपदीच पूर्ण प्रेम भगवंतांबद्दल अंतःकरणामध्ये आहे. सर्वहि प्रारब्ध भोग सहन केले आहेत तिने. आणि आत्ता ही शेवटची वेळ आलेली आहे. सगळी मुल ज्याने मारली त्याला नमस्कार करून अर्जुनाला सांगते आहे, याला सोडून द्या.

काय मोठा प्रसंग आहे. द्रौपदी सांगेल ती शिक्षा करायच ठरलेल आहे. विचार बिचार नाही. त्याने मुल मारलेली आहेत. तिने पुष्कळ धर्मशास्त्रातले विषय मांडलेले आहेत. ती म्हणाली, हा ब्राह्मण आहे म्हणून तुम्हाला याला मारता येणार नाही. तुमच्या ज्या द्रोणाचार्य गुरूंकडून उत्तम अस्त्र ज्ञान संपादन करून सगळ्या जगामध्ये तुम्ही अजिंक्य ठरलात त्यांची साक्षात मूर्ति आहे हा. आणि याला तुम्ही मारणार म्हणजे द्रोणाचार्यांना मारल्यासारखाच दोष आहे. या मारल म्हणजे द्रोणाचार्यांना मारल्यासारखं होणार नाही का.

हे धर्म शास्त्र तिने मांडलेल आहे. मुल बिल गेली ते सगळ विसरून गेलेली आहे. आणि शेवटची मोठी दया, विलक्षण आहे. तिसर कारण अत्यंत विचारणीय आहे. द्रौपदीच अंतःकरण किती शुध्द आहे दया किती आहे अंतःकरणात. कृष्ण भगवान ऐकताहेत. ती म्हणते, अश्वत्थाम्याची माता अद्यपि जिवंत आहे. द्रोणाचार्य गेले. याला जर तुम्ही मारल तर ती रडत बसेल. मी आज रडते आहे. पुत्रशोकाच दुःख किती आहे मी अनुभवते आहे. ते दुःख त्या माऊलीला होऊ नये एवढीच माझी इच्छा आहे.

कबूल कराव लागल. धर्मराजसुध्दा आश्चर्य चकित झाले. धर्माबद्दल, ईश्वराबद्दल संशय बाळगणारी द्रौपदी, केवढी भूमिका आहे तिची! भगवद् गीतेमध्ये भगवान सांगताहेत -

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति यो ऽर्जुन
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः

आपल्या सुख दुःखाप्रमाणेच दुसऱ्याच्याहि सुख दुःखाचा विचार ज्याच्या मनामध्ये येतो आहे तो मोठा योगी आहे. दुसऱ्याच दुःख पाहूनही त्याच्या मनाला दुःख होत आहे. तो खरा मोठा योगी आहे. अशी मनाची तयारी ही त्या द्रौपदीची झाली होती. मग भगवान संतुष्ट का होणार नाहीत पूर्ण कृपा आहे. हे का झाल ते का झाल हे विचारायच नाही.

द्रौपदीची मुलं का गेली बुध्दिवादी, चिकित्सक लोक विचारणारच । पण त्या बुध्दिवादी लोकांसाठी दुसरा प्रश्न असा आहे कि ज्या अश्वत्थाम्याने तिची पांचही मुलं मारली असताना तिने त्याला जिवंत सोडा असं का सांगितलं याला उत्तर काय देणार बुध्दिवादी ही तिची मनोवृत्ती कशी झाली .

तर "दया सर्वभूतेषु " शत्रु का असे ना त्याच्याबद्दल दया असली पाहिजे. त्याच्या आईला दु:ख देऊ नका. ही अंत:करण वृत्ती तयार करायला किती वेळ लागेल कॉलेजमध्ये चार सहा वर्षांचा कोर्स आहे . इथेचा अभ्यास चाललाय. ईश्वराची कृपा पाहिजे. सद्गुरूंच्या, महात्म्यांच्या कृपेनेच अंत:करण असं निर्दोष होऊन जातय. वि.वेक संपन्न होतय. दया ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी विवेक पूर्ण आहे. तिनं पूर्ण विवेकानेच उत्तर दिलेलं आहे. कोणालाहि त्याच्यावर आणखी आक्षेप घेता येणार नाही.

विवेकसंपन्न अंत:करण कसं असतं याच्या बद्दल रामचंद्रांचेही उदाहरण आहे. रामांना --वनवासाला कैकेयीनं पाठविलं. त्यामुळे सगळे लोक तिची निंदा करीत होते. रामचंद्रांनी तिची भेट घेऊन सांगितलं, आणि लोकांनाही सांगितलं कैकेयीचं माझ्यावर जास्ती प्रेम आहे. कसं आहे तर मला एकट्यालाच वनामध्ये पाठवलं. माझ्यावर काही भार आहे का अरण्यामध्ये जी काही फळंबिळं मिळतील ती खावीत आणि स्वस्थ रहावं. आणि स्वत:च्या पोटच्या मुलावर कैकेयीने राज्याच्या सर्व भार टाकला आहे. म्हणजे भरताला काही झोप आहे का . झोप नाही स्वास्थ नाही. सतत राज्य संरक्षणाची चिंता करायची. का सारखा राज्याचा संरक्षणाचा विचार चांगला कि वनात जाऊन फळं वगैरे खाऊन राहाणं चांगलं . हा विचार तुम्ही करा. कैकेयीची निंदा तुम्ही करू नका. रामावर कैकेयीचं प्रेम असल्यामुळे रामावर तिनं राज्याचा भार ठेवला नाही. तुझा तू एकटा रहा वनामध्ये. हे विवेकाचं उदाहरण आहे.

अंत:करणामध्ये योग्य अयोग्य विवेक उत्पन्न झाल्याबरोबर दया उत्पन्न होते. लोकांमध्ये कैकेयीची निंदा होऊन उपयोगी नाही. तिनं जरी रामांना दु:ख देण्याचा प्रयत्न केला, व्देष केला तरीसुध्दा त्या ठिकाणी त्यांनी समर्थन केलं आहे. तर विवेक, दया उत्पन्न झाल्यामुळे परमार्थ सिध्द होतो आहे. अविवेक जो पर्यंत मनामध्ये आहे तो पर्यंत संसार आहे. पूर्ण विवेक जर मनामध्ये उत्पन्न झाला असेल तर काही नाही, संसारात राहून देखिल. त्यांच्या प्रमाणे आपण शांती मिळवावी हा विचार नाही. त्यांची शांती केव्हां आणखी जाईल, त्यांना राग केंव्हा येईल हे पहाताहेत. पण तेही खंबीर आहेत. उगीच नाही, "स्वकरे चंदन घाशी । गंगेचे पाणी कावडी भरती " त्यामुळे यांनी गंगेत स्नान करून यावं त्या यवनाने पुन्हा थुंकावे, पण काही नाही. नाथांनी पुन्हा गंगेत स्नान करून यावं. शेवटी त्याच्या मनावर परिणाम झाला. तो शरण येऊन म्हणाला, मला या लोकांनी सांगितलं. नाथ महाराज म्हणाले, त्यात झालं काय इतकी वर्ष आम्ही पैठणमध्ये राहिलो. एका दिवसात इतकी स्नानं आम्ही कधीच केली नाहीत. इतक्या स्नानांचं पुण्य तुमच्यामुळे आम्हाला मिळालं.

हा विवेक आहे । जरी दुसऱ्याने दु:ख देण्याचा प्रयत्न केला तरी विवेकाने दु:ख विसरून जाऊ शकतो मनुष्य. दयेनं विवेक उत्पन्न होतो. म्हणून दया हा पहिला मोठा गुण सांगितलेला आहे.

दुसरं साधन सांगताहेत नारद महर्षि - वैयक्तिक ही सर्व भूमिका आहे. दयेच्या योगाने वैयक्तिक उन्नति होते आहे. दुसऱ्याचही कल्याण करता येतं.

अश्वत्थाम्याच्याही मनावर परिणाम झाला त्यामुळे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्याने शस्त्रसंन्यास केलेला आहे. पुन्हा नाही, शस्त्र हातात घेतल नाही. नाही तर तसाच व्देष मनामध्ये राहिला असता तर ! द्रोणाचार्यांचा मुलगा होतो तो. संपूर्ण अस्त्र विद्या त्याला माहीत होती. एकुलता एक मुलगा परिक्षित राज्यावर बसलेला आहे त्याला मारल नसत ह्याने कशावरुन पण त्याने शस्त्रसंन्यास घेतला. त्यांच्याही मनावर परिणाम झाला.

दुसरा महत्वाचा गुण म्हणजे -

संतुष्यान् येन केन वा ।
जैशी स्थिती आहे। तैशा परि राहे ।।

हे अनुभव घेऊन, अभ्यास करम संत सांगताहेत. त्यात आनंद आहे कि नाही, शांती आहे कि नाही. स्थिती बदलण्याचा प्रयत्न करायचा. वैयक्तिक गुण आहे. सामुदायिक धर्म पुन्हा वेगळे आहेत. समुदायाने कस वागायच जैशी स्थिती आहे । तैशा परि राहे अस समुदाय वागायला लागला तर ! दुसरे समुदाय विरुध्द झाले तर ! तो विचार निराळा आहे.

पण आपली भूमिका ही जास्तीत जास्त वाढवायची आहे. उत्तम प्रकारची करायची आहे. त्यात दया आणि संतोष आणायचा आहे. समाधान ! "चित्ती असू द्यावे समाधान " समाधानालाही विवेकाची जरुरी आहे. विवेकामुळे अंतःकरणामध्ये समाधान उत्पन्न होत आहे.

धर्मराजाला आपल ऐश्वर्य दाखवण्याकरता दुर्योधन आलेला आहे. तुम्ही आणखी कसे अरण्यामध्ये राहाता . खायला नाही, प्यायला नाही. आमच ऐश्वर्य आम्ही कस मिळवल हे दाखवायच होत त्याला. चित्रसेन गंधर्वाने दुर्योधनाला कैद केलेल आहे. कर्ण पळून गेला त्यावेळेला. कैद करुन त्याला नेत असताना त्याचे दूत आले धर्मराजाला शरण, "दुर्योधनाला धरुन नेतोय गंधर्व. "

धर्मराजाने काय करायच. काय "जैशी स्थिती आहे । तैशा परि राहे " राहायच काय. नाही. भीम म्हणाला, बर झाल. आम्हाला जे काम करायच होत ते गंधर्वाने कल. आम्हाला ऐश्वर्य दाखवायला आला काय. , धर्मराज म्हणाले, "बाबा ! या वेळेला तुम्ही त्या दुर्योधनाला सोडवून आणल पाहिजे. गंधर्व परकीय आहे. कौरवांच्यात आणि आमच्यात जे काही मतभेद असतील ते आमचे आम्ही पाहून घेऊ. पण त्यात तिसऱ्याला मध्ये घेऊ नका " ही राजनीती आहे.

समाजाकरता राजनीतीचा उपयोग झाला पाहिजे. वैयक्तिक मोठी दया करायची, आणखी मोठ औदार्य दाखवायच, हे गुण नेत्याजवळ असून उपयोग नाही. त्यामुळे समाजाच आणखी कल्याण होणार नाही. तेच गेल, संपल.

धर्मराज म्हणाले, "तुम्ही आत्ताच्या आत्ता जाऊन त्याला सोडवून घेऊन या " अर्जुन गेला आणि त्याला सोडवून आणला. तो खाली मान घालून आला. " जा, बाबा, परत घरी जा " धर्मराज म्हणाले. हा विवेक आहे. त्यावेळेला जर ह्याने आम्हाला वनवासात पाठवल. जाईनात. गंधर्वांच्या हाताने, परस्पर काट्याने काटा काढावा अस झाल तर बरच, अस म्हटल असत तर ! पण राजधर्म वेगळा आहे. समाजधर्म वेगळा आहे. ह्या सगळ्या धर्मांच ज्ञान जर विवेकसंपन्न बुध्दि असेल तर होत.

आणि दया! आपल्यावर असा प्रसंग आला असतातर ! आपल्याला धरुन नेल असत तर ! दयाहि आहे. विवेक संपन्न अंतःकरण आहे. शुध्द धर्माचरण चाललेल आहे. भगवंताची भक्तिही पूर्ण आहे.

संतोष वृत्तीचा अभ्यास. संतोष हा एक वैयक्तिक गुण आहे. व्यक्तिची उन्नती करुन घ्यायला हरकत नाही. समाजकार्य करण्याकरता जरी आणखी कोणी प्रवृत्त झाला असला तरी वैयक्तिक उन्नतीकडे त्याच लक्ष पाहिजे. विशेष धर्म म्हणून जे आहेत, ईश्वराची भक्ति करण ज्याच त्याच कर्तव्य आहे. कृतज्ञता पाहिजे. इतकी चांगली इंद्रिये दिलेली आहेत, चांगली बुध्दि दिलेली आहे. चांगला विचार करण्याकरता मन किंवा अंतःकरण दिलेल आहे. हे अस कोणच्याहि कारखान्यात मिळत नाही. कोणीहि, कितीहि वैज्ञानिक असला तरी मन किंवा बुध्दि निर्माण करु शकत नाही. हे इतक ज्याने दिलय त्याच साध स्मरणसुध्दा नाही म्हणून समाजकार्य केल तरी ईश्वर स्मरण ठेवण व्यक्तिच कर्तव्य आहे. त्याचा समाजालाच उपयोग होणार आहे. पूर्ण धैर्यहि त्याच्या मनामध्ये उत्पन्न होत आहे. धर्माप्रमाणे वागणारा, ईश्वराचे स्मरण, त्याच्या आज्ञेच स्मरण ठेवणारा आणि त्याच्या शक्तिवर पूर्ण विश्वास ठेवणारा जो आहे त्याला पूर्ण धैर्य मिळत.

अफझल खान खाली येऊन थांबलेला आहे. आणि शिवाजी राजे निघाले. संभाजी राजे लहान आहेत. सर्व प्रधानांना वगैर सांगितल, "आम्ही जातो" देवीला आणि जिजामातेला नमस्कार केला. "जर आम्ही आलो परत तर तुम्ही आम्ही मिळून देश सेवा करुच. जर तिथेच गेला तर या मुलाला तयार करुन पुढच कार्य तुम्ही चालू ठेवा. समाजाच कल्याण झाल पाहिजे. धर्म रक्षण झाल पाहिजे" हे अगदी शांतपणे सांगितल कि जणु काही प्रवासालाच निघाले आहेत. हे जे धैर्य मनामध्ये उत्पन्न होत ते ईश्वर भक्तिमुळे उत्पन्न होत. प्राप्त स्थितीमध्ये समाधान मानण्यामध्ये धैर्य उत्पन्न होत. समाधान मानण हा काही दोष नाहीये.

ईश्वराच्या इच्छेनुसार आज आपल्याला थांबल पाहिजे. मान्य केल पाहिजे. हे जे समाधान आहे त्यामुळे एक प्रकारच धैर्य उत्पन्न होत. आणि त्या धैर्यामुळे सगळी कार्य होतात. म्हणुन संतोष मानावा किंवा नाही हा एक मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. वैयक्तिक दृष्टीने संतोष हा एक मोठा गुण आहे.

ज्याला ईश्वराच्या जवळ जायचय त्याला संतोष हवाच. ईश्वरावर सर्व भार घालायला शिकायचय त्याला. त्याच्या इच्छेन सगळ चालत. मला आज जेवायलाहि मिळत नाही. कही हरकत नाही. इतक अन्नधान्य, संपत्ति असली तरी ते सर्व त्याच आहे. सुदामजी दरिद्री होते. पत्निच्या आग्रहामुळे व्दारकेला जायला निघाले. व्दारकेत आले, श्रीकृष्णांची भेट झाली, राहिले तिथे, सगळ झाल आणि परत आले. त्यांनी काही श्रीकृष्णांजवळ काही सांगितल नाही. कारण काही मागण्याची सवयच नाही. "ठेविले अनंते तैसेची रहावे" ही जी समाधानी वृत्ती आहे, त्या वृत्तीमुळे काही मागितल नाही. देव आहे (श्रीकृष्ण) अशी पूर्ण भावना सुध्दा आहे. देव भेटलेला आहे. कृष्ण म्हणजे मित्र आहे अशी कल्पना नाहीये. पण ह्यांनी काही मागितल नाही त्यांनीही दिल नाही. त्यांनी मात्र ह्यांनी नेलेले पोहे मागून घेऊन खाल्ले. दिल्याशिवायच. सुदामजींनी झाकून ठेवले होते. कसे देणार एवढ्या श्रीमंत श्रीकृष्णांना हे पोहे कसे देणार

कृष्णांनी मला काही दिल नाही म्हणून त्यांच्याबद्दल मनात काही विकार उत्पन्न झालेला नाही. इतका मी दरिद्री, मला खायला नाही कि नेसायला नाही आणि याच माझ्याकडे लक्ष नाही अस मनामध्ये आल असत तर ! आपल्या येत. पण संतोषाचा अभ्यास आहे चित्तात. समाधानाचा अभ्यास आहे.

परत आलेले आहेत. पहातात तो व्दारका नगरीसारखी नगरी आहे, भरपूर नोकर चाकर आहेत. पत्निने उत्तम भरजरी कपडे आणि दागदागिने अंगावर घातले आहेत. ओवाळायला आलेली आहे. पण यांची वृत्ती तटस्थ आहे.

अहंकार नाहीये. संतोषाच्या अभ्यासाने अहंकार जातो. त्याच प्रमाणे ईश्वराबद्दल अत्यंत दृढ निष्ठा उत्पन्न होते. त्याज फळ मिळाल तरी त्याच फळ मिळाल्या नंतरसुध्दा हर्ष नाही. देवान दिल असहि म्हणायच नाही आणि देवान दिल नाही असहि म्हणायच नाही. देवाच्या फक्त आज्ञेच पालन करायच एवढच साधकाच कर्तव्य आहे. त्या करता संतोष वृत्तीचा अभ्यास सांगितला आहे.

रोज सोन्याच्या ताटात जेवण होते पण हे सर्व त्या पांडुरंगाच आहे, आम्ह काही नाही. ही वृत्ती निर्माण झालेली आहे. माझ्या वृत्तीमुळे मला देवाने दिलेल आहे अस कधीहि वाटल नाही. ही जी वृत्ती त्यांच्या अंत:करणामध्ये उत्पन्न झाली, ईश्वराबद्दल अत्यंत दृढ श्रध्दा निर्माण झाली हे त्या संतोषाच, चित्तातल्या समाधानाच उदाहरण आहे. हा एक मोठा गुण आहे. ह्या गुणांचा अभ्यास त्या व्यक्तिची उन्नती पूर्ण साधणारा आहे.

आणि तिसरा गुण त्यांनी सांगितला सर्व इंद्रियांवर संयम ठेवणे. इंद्रिय ताब्यात येत नाहीत आपल्या. परमेश्वराला हृषिकेश म्हणतात. हृषिक म्हणजे इंद्रिय, त्या इंद्रियांचा तो स्वामी आहे. त्याच्याकडे जर आपण तक्रार, प्रार्थना केली तर आपोआप इंद्रिये ताब्यात येतील. पण हे आम्हाला सुचत नाही. इंद्रिय आमच्या ताब्यात येत नाहीत, सगळ आयुष्य आमच संसारातच जात अशी आम्ही तक्रार करत बसतो. म्हणजे संतोषहि गेला आणि इंद्रिय पुन्हा ताब्यात नाहीत ती नाहीतच. त्या पेक्षा या इंद्रियांना ज्याने निर्माण केलेल आहे, त्यांच्यावर ज्याच नियंत्रण आहे त्यालाच शरण गेलेल चांगल.

विव्दान आणि शास्त्रकार इंद्रियांचा निग्रह करावा म्हणून सांगतात. मनातल्या सर्व कामना काढून टाकाव्यात. पण इंद्रियांच नियंत्रण करण हे देखिल साधन म्हणून त्यांनी सांगितल आहे. काहीही देवाजवळ मागायच नाही. सर्व संत मंडळी आषाढीच्या वारीला जायची पांडुरंगाचे दर्शन घ्यायची, देव त्यांच्याशी बोलायचे पण तुकाराम महाराज आले कि मात्र आपली खाली मान घालून बसायचे. बाकीच्या संत मंडळींनी विचारल, आम्ही आलो कि तुम्ही आमच्याशी बोलता, आमची चौकशी करता पण तुकाराम महाराज आले कि खाली मान घालून बसता पांडुरंग म्हणाले, तो काही मागत नाही माझ्या कडे, बाबांनो. म्हणून मला मान खाली घालावी लागते. " म्हणजे देवालासुध्दा खाली मान घालायला लावणारे भक्त, केवढा मोठा अधिकार असेल त्यांचा ! हा एक अभ्यास आहे. संतोष वृत्तीच्या अभ्यासाने इंद्रियजय होतो आहे.

आणि दुसर एक साधन त्यांनी सांगितलेले आहे. काम, क्रोध, लोभ, दंभ असे अनेक विकार मनामध्ये उत्पन्न होतात. प्रत्येक विकार कसा कसा जिंकावा ही साधने देखिल त्यांनी सांगितलीत. शेवटी त्यांनी एक महत्त्वाचे साधन सांगितले — ते म्हणजे गुरु भक्ति. ह्या गुरुभक्तिच्या योगाने सर्वहि विकारांचा नाश होतो. हे स्वतंत्र साधन त्यांनी सांगितलेल आहे. तशी सद्गुरुंच्या ठिकाणी भक्ति निर्माण व्हावी. सद्गुरु हे ईश्वराच स्वरुप आहे. ईश्वरस्वरुप सद्गुरु आहेत ही भावना त्यांच्या मनामध्ये उत्पन्न झालेली आहे. आणि त्या सद्गुरुंच्या ठिकाणी अत्यंत श्रध्दा निर्माण झालेली आहे. या भक्तिने किती कल्याण होते ते गुरुचरित्रातल्या दुसऱ्या अध्यायातील दीपकाच्या कथेत सांगितले आहे. त्या कथेवरुन सर्व स्पष्ट होते.

वेदधर्मा ज्ञानी महात्मा. परंतु प्रारब्ध भोग आपला आलेला आहे हे त्यांना समजल. शिष्यांची परिक्षा पहायची होती, कोणी का असे ना. सगळ्या शिष्य मंडळींना सांगितल, असा असा मला प्रारब्ध भोग, दु:ख भोगायच आहे. मला

कुष्ठ रोग होणार आहे, मी अंध होणार आहे. अशा परिस्थितीत माझं संरक्षण कोण करणार दीपक नावाचा एक शिष्य निघाला. अनेक जन्माचं सुकृत त्याच आहे, पुण्य संपत्ति इतकी त्याच्या जवळ आहे कि त्याने कबूल केलं. तो म्हणाला मलाच घा ना तुमचा प्रारब्ध भोग. तुम्ही कशाला भोगता तुमच संरक्षण कशाला करायच प्रारब्ध अस देण्या घेण्याची सोय झाली शास्त्र मध्ये तर बघायलाच नको. आपल पाप सगळ दुसऱ्याला देऊन आपण परत महापाप करायला मोकळे झाले. अशी सोय होईल कि नाही। म्हणून प्राक्तन ज्याच त्यान भोगायच. हेही ईश्वराने सुधारा ठेवलेल आहे. केलेल पाप ज्याच त्यानेच वालवल पाहिजे.

तर त्या प्रमाणे दीपकाने केल. काशी क्षेत्रामध्ये जाऊन गुरु शिष्य राहिलेले आहेत. कुष्ट रोग झालेला आहे, डोळे गेलेले आहेत, सेवा करायची, भिक्षा मागून आणायची, त्या दु:खाच्या अवस्थेमध्ये मनुष्याच्या मनावरचा ताबा जातो आहे. गुरुजी रागवायचे, बोलायचे त्याला. गुरु भक्तिमुळे सहनशीलताही उत्पन्न होते. त्याच प्रमाणे आणखी दयाहि वाटते. किती बिचाऱ्यांना त्रास होतात ।. गुरु भक्तिन सगळं आल पाहिजे. काशी क्षेत्रामध्ये राहून ईश्वराच दर्शन एकदा सुध्दा त्याने घेतल नाही. म्हणजे ईश्वर-विश्वनाथ कमी आहेत आणि आमचे गुरुजी जास्ती आहेत असा त्याचा अर्थ नाहीये.

विश्वनाथांनासुध्दा त्याची भक्ति पाहून आनंद झाला. त्याला वर देण्यासाठी आले. म्हणाले, काही तरी वर मागून घे. तो म्हणाला, गुरु महाराजांची इच्छा असेल तर मागतो. म्हणजे आपल्या सगळ्या इच्छा वगैरे तो त्यांच्या इच्छेप्रमाणे ठेवतो आहे. हे गुरुभक्तिच मोठ लक्षण आहे. त्यांची जशी इच्छा असेल त्या प्रमाणे वागायचे. गुरुजींना त्याने विचारले, विश्वनाथ आलेले आहेत. ते तुम्हाला दु:खातून मुक्त करतील. मागू का वर. गुरुजी म्हणाले, सेवा करायचा कंटाळा आला असला तर माग.

तो विश्वनाथांकडे येऊन नमस्कार करुन म्हणाला, "नाही, आमच्या गुरु महाराजांची इच्छा नाही. " सेवा करायची आहे. सेवा करतो आहे. विष्णुंना समजल. विष्णु आले वर घायला. हा म्हणाला, "कशा करता तुमच्याकडून वर मागून घ्यायचा गुरुंच्या ठिकाणी तुम्ही सगळे देव एकत्र आले असता तुमची वेगळी वेगळी उपासना कशासाठी करायची "गुरु ब्रह्मा गुरुविष्णु------" हे आम्ही रोज म्हणतो. पण त्या प्रमाणे बुध्दि आहे का आमची सगळे देव तुम्ही इथे आहात मग वेग वेगळे वर कशासाठी .

त्याने काही वावग सांगितल नाही. तुम्ही कमी आहात अस म्हणाला नाही. तुम्ही सगळे एकच आहात. ही माझी सामुदायिक उपासना आहे. सर्व देवांची एकाच रुपाने उपासना चालू आहे.

तरी सुध्दा देवांचा आग्रह पडला कि आमच्या मनाच्या समाधानाकरता मागून घे. "गुरु भक्ति होय अधिक मानसी । ऐसे ज्ञान मज घावे ।" हे मागणं आहे त्या दीपकाच. इतकी भक्ति करतो आहे. सगळे देव प्रसन्न झालेत पण हा मागतो आहे कि अस ज्ञान मला घा कि जास्ती गुरुभक्ति घडेल माझ्या हातून. इतके दिवस गुरुभक्ति चालली असताना आपण गुरुभक्ति करतो आहोत असा यत्किंचित अभिमानही याला नाहीये.

अशा कामात संतोष उपयोगी नाही. बाकिच जो काही सुख दु:ख आहेत त्याच्यात संतोष आहे. पण गुरुभक्ति माझी पुष्कळ झाली आहे इतक तरी कोण करतय माझ्या इतक तरी कोण करणार आहे {अस वाटण} हा संतोष दोष आहे.

जास्ती जास्ती गुरुभक्ति वाढवावी ही त्याची मनोभूमिका पाहिल्या बरोबर नारायण संतुष्ट झाले. गुरु महाराजही संतुष्ट झाले. त्यांचा अनुग्रह झाला. जीवन्मुक्त अवस्था त्याला लगेच मिळाली.

तर ही जी सगळी साधनं आहेत ही मनाची पुष्कळशी स्थिरता करण्यासाठी आहेत. ते मन स्थिर होण्याकरता ते बाह्य विषयांपासून बाजूला काढता आलं पाहिजे. "वित्त भ्रमा सोडीलो ते कृतार्थ" म्हणून पे सांगताहेत महाराज. वित्त आणि संसारभ्रम बाजूला करता आला पाहिजे. आणि ईश्वर स्वरूपाच्या ठिकाणी मन स्थिर होणं. अनात्म पदार्थाबद्दल असंग आणि परमात्मा बद्दल मनाचा संग. एवढे दोनच उपाय शास्त्रकारांनी आत्मज्ञानाकरता सांगितले आहेत. ते उपाय आणि ही तीन साधने. दया पाहिजे. संतोषाचा अभ्यास पाहिजे. इंद्रियांचा निग्रह पाहिजे. तो निग्रह करण्याकरता ही सगळी साधनं सांगितली आहेत. ईश्वराची उपासना, सद्गुरुंची सेवा भक्ति केली पाहिजे. ही सगळी साधने आपोआप प्रगट होतात. ती साधने माझ्याजवळ आहेत असा अभिमानही राहात नाही. साधने असून अभिमान उत्पन्न झाला तर त्याचा उपयोग व्हायला फार वेळ लागतो.

मोठ्या मोठ्या भक्तांचा अभिमान दूर केला भगवंतांनी या करता. त्यांची भक्ति निर्मळ व्हावी. म्हणून - संतुष्यान् येन केन वा --- ही साधनं सांगितली आहेत. या साधनांचा अभ्यास शक्य तितका जास्त करण्याचा प्रयत्न करायचा. सर्वांची दुःख बघून आपल्याला दुःख होतं. दया येते. पण आमची दया किती आहे दवाखान्यामध्ये आजारी मनुष्य पडलेला आहे. भेटायला §त्याला§ जातो आपण. "जाईल रोग. डॉक्टर चांगला आहे. देवाची कृपा आहे. देवाच्या कृपेने बरं होईल" तेवढ्या पुरतं समाधान करुन परत येतो आपण. पण त्याचं दुःख दूर करण्याची शक्ति आमच्या कडे आहे का. त्याचं दुःख पाहून काही तरी वाणीनं समाधान देता येईल तेवढं द्यायचं. सगळी दुःखं आपण दूर करतो असा अर्थ नाही. पण दुसऱ्याची दुःख आपण दूर करु शकत नाही म्हणून आपण दुसऱ्याच्या दुःखाकडे लक्षही द्यायचं नाही असा मनाला अभ्यास होतो.

तेव्हा दया पाहिजे. त्या दयाभावनेचा जितका जितका विकास होईल, जेवढी जेवढी भूमिका उंच उंच होत जाईल तस तसा तो जीवात्मा ईश्वर रुप होऊन जातो आहे. सद्गुरुंची प्राप्ती होते, ईश्वराचा कृपाप्रसाद होतो. म्हणून या साधनांचा अभ्यास मानव जन्मामध्ये आपल्याकडून जितका होईल तितका झाला पाहिजे. तो अभ्यास करण्याकरता शरीर, मन, इंद्रिय वगैरे सगळी साधनं देवाने दिली आहेत, ती आज तरी समर्थ दिसत नाहीयेत. ती समर्थ बनवण्याकरता ईश्वराची उपासना केली पाहिजे. ईश्वराच्या भक्तिचा उपयोग असेल तर हा आहे. ईश्वराच्या भक्तिमुळे साधकाचा आपल्या अंतःकरणावर ताबा राहातो.

कृष्णभक्त अर्जुनाची कथा दिली आहे महाभारतामध्ये. स्वर्गलोकामध्ये अर्जुन गेलेला आहे. उर्वशी गायन करती आहे. सारखा अर्जुन तिच्याकडे पहायला लागला. इंद्राने उर्वशीला सांगितलं, त्याला भेटायला जा. त्याचं तुझ्याकडे लक्ष जातय. याच्या तसलं काही मनातही नाही. उर्वशी रात्री त्याला भेटायला आली. ती अर्जुनाला म्हणाली, "माझही तुझ्यावरती प्रेम आहे." अर्जुन म्हणाला, "आईसाहेब, मी तुमच्याकडे पहात होतो याचा भलताच अर्थ तुम्ही घेतलांत. आमच्या कुळाची जननी तुम्ही आहात. तुमच्यापासून आमचे कूळ जन्माला आलेलं आहे. या आदरबुध्दिने मी पहात होतो. तुमच्याबद्दल अभिलाषा माझ्या मनामध्ये नाही." तिचा हे ऐकून मनोभंग झाला आणि तिने अर्जुनाला, "तु नपुंसक होशिल" असा शाप दिला. होऊ दे. ते काही का असेना. मग इंद्राने त्याचं समाधान केलं. अज्ञातवास तुम्हाला भोगायचाय त्या

वेळेला हा शाप तुला उपयोगी पडेल. अर्जुन पुढे उत्तम गायन शिकला. चित्रसेन गंधर्वाचा मित्र होता तो. पुढे विराट राजाच्या दरबारात अज्ञातवासात राहताना त्याला राजकन्येला शिकवताना या शापाचा उपयोग झाला.

तर सर्व इंद्रिये त्याची ताब्यात आहेत ना. भगवंताची केवढी कृपा आहे। त्यामुळे जितेंद्रिय आहे. ब्रह्मास्त्र विद्येचे पूर्ण ज्ञान त्याला होत. अश्वत्थाम्याला सुध्दा ब्रह्मास्त्र परत घेता येत नव्हत. सोडण्याच फक्त माहीती होत. प्रयोग करण आणि उपसंहार करण या दोन्हीच ज्ञान असणारा तो खरा वैज्ञानिक. प्रयोग काय पांच मिनिटामध्ये {बॉंबच्या सहा याने} एक लाख वस्तीच शहर उध्वस्त करण हा प्रयोग झाला. पुन्हा जिवंत करून दाखिवल पाहिजे. परत अस्त्र घेता आल पाहिजे ते खर विज्ञान आहे. त्या प्रमाण अर्जुनाला ती ब्रह्मास्त्र विद्या गुंरुभक्तिने प्राप्त झाली होती. पूर्ण ब्रह्मास्त्र ज्ञान त्याला होत. अश्वत्थामा प्रत्यक्ष द्रोणाचार्यांचा मुलगा असूनसुध्दा त्याला हे ज्ञान घेता आल नव्हत.

सर्व इंद्रियांचा निग्रह पाहिजे. निर्विकार मन पाहिजे. हे सगळ असल तर अस्त्रज्ञान होत ना. तर अशी अनेक उदाहरणे व्यास महर्षि, वाल्मिकी महर्षिंनी आपल्या पुढ ठेवली आहेत. ती ऐकायची, त्यांचा विचार करायचा, ईश्वराची प्रार्थना त्याकरता करायची. आणि त्या योगे अशी आपली वैयक्तिक उन्नती करून घ्यावी. "सर्वेत्र: सुखिनं: सुतं ---" म्हणून समाजाकडे, लोकांकडे लक्ष घ्यायच आणि स्वत:च काही झाल तरी हरकत नाही अस करून चालणार नाही. सर्वांच्या सुखामध्ये आपलाही समावेश आहे. मला धरून सर्वही सुखी व्हावेत. त्यामुळे वैयक्तिक उन्नतीकडे लक्ष देणारे पूर्वीचे ऋषिमुनि होते, समाजाकडे त्यांच लक्ष नव्हत असा बुध्दिवादी म्हणवणारे आक्षेप घेतात. घेऊं देत. पहिल्यापासून सगळे आक्षेप घेणारे आहेत. वैयक्तिक उन्नती करून घेऊन मग इतर समाजाची उन्नती साधायची आहे. भारत राष्ट्र हे त्यांनी टिकिवल आहे. वैयक्तिक उन्नती करून घेतली असा ज्यांच्यावर आक्षेप आहे त्यांनीच भारत राष्ट्र टिकिवलेल आहे. नाही तर केव्हांच सगळ यवनमय झाल असत.

तर ही सगळी आपली उन्नती करून घेण्याकरता भगवंतांनी ही सर्व साधन सांगितली आहेत. सद्गुरूंच्या स्वरूपामध्ये, महात्म्यांच्या स्वरूपामध्ये भगवानच सर्वत्र मार्गदर्शन करीत आहेत. कारण ते ज्ञानी महात्मे ईश्वररूप झालेले असतात. त्यांच्या व्दाराने मार्गदर्शन मिळत. तसे कोणी भेटले नाहीत म्हणा तरी जो कोणी एकनिष्ठ भक्त असेल - जो गुरूंनी शिष्य म्हणून स्वीकारले नाही तरी एकलव्याने द्रोणाचार्यांकडून विद्या मिळवली कि नाही. अर्जुनालासुध्दा ती विद्या आली नाही. समोरून भुंकत येणाऱ्या कुत्र्याच्या तोंडात त्याने असे बाण मारले कि तोंडाला इजा झाली नाही. तोंड मात्र बंद झाले. हे कौशल्य अर्जुनाला सुध्दा मिळवता आले नाही. बाण मारल्यानंतर त्याला लागणार नाही असं कस होईल. त्याने द्रोणाचार्यांना हे कौशल्य का शिकवले नाही म्हणून विचारले. ते म्हणाले, जो गुरु त्याला ते शिकवल म्हणजे, द्रोणाचार्यांनी जरी नाही सांगितल तरी त्यांच्यापासूनच एकलव्याने धनुर्विद्या मिळवली. ही त्याची निष्ठा कि तो ती विद्या ग्रहण करू शकला. तो जर पुढ कौरवांच्या बाजूने सामिल झाला असता तर किती कठिण परिस्थती झाली असती त्यामुळे अगोदरच देवाला सगळी व्यवस्था करावी लागली.

अशा सगळ्या साधक बाधक पुष्कळ गोष्टी आहेत. त्यांचा विचार करायचा. आणखी आपली निष्ठा ही अधिक अधिक वाढत गेली पाहिजे. दीपकासारखी गुरुभक्ति म्हणा. द्रौपदीप्रमाणे भगवत् भक्ति अंत:करणामध्ये निर्माण झाली पाहिजे. म्हणजे त्याच्यामुळे सगळ कल्याण आपल होत आहे. त्याला काळजी आहे आपली. आणि शक्तिही आहे. ईश्वर हा दयासागर आहे त्याची दया ही काही

शक्तिहीन नाहीये. त्याच्यामनामध्ये जर इच्छा उत्पन्न झाली तर तो आपल कितीही जन्माचं प्रारब्ध असल तरी बदलून टाकतो. आपल्या अनेक जन्मांचे दोष तो दूर करु शकतो. ही सगळी साधन – ईश्वरनिष्ठा, गुरुनिष्ठा आपल्या डोळ्यासमोर ठेवून आत्मपरिक्षण करुन आपले किती दोष दूर झाले याचाही आपण विचार करायचा. किती दोष वाढले, किती गुण आले याचा विचार करायचा. त्या करता ईश्वराची कृपा संपादन करायची. त्यामुळे सद्गुरुंच्या कृपेने, ईश्वराच्या कृपेने सर्वार्थसिध्दी प्राप्त करुन घ्यायची.

या ठिकाणी नीलाताई, कृष्णराव जोशी ही मंडळी ईश्वर कृपा संपन्न आहेत. ईश्वरभक्ति गुरुभक्ति त्यांच्या चित्तात आहे. सर्वहि मंडळींना, ज्यांच्यावर चांगले संस्कार आहेत, त्यांना बरोबर घेऊन हा गुरुपौर्णिमेचा उत्सव या ठिकाणी प्रतिवर्षी चालू आहे. याऊपर्षी [illegible] (कृष्णरावांच्या) त्यांच्या वयाला झाली त्या निमित्ताने ऐंद्री शांतीही शास्त्रोक्त पध्दतीने झाली, सगळ्यांच्या इच्छेप्रमाणे. आयुरारोग्य [illegible] शास्त्रामध्ये ते सांगितल आहे. ते आयुरारोग्य त्यांना प्राप्त [illegible]. त्या दोघांहि दंपतीचा परिवारही त्यांना अनुकूल आहे. ते संस्कार [illegible] त्यांच्या मुलांमध्ये, मुलीमध्ये, सुनेमध्ये, नातवामध्ये आले आहेत. तसेच सगळे संस्कार वाढून, हा जो भक्ति मार्ग आहे संतांना पसंत असलेला, त्या भक्तिमार्गाची अभिवृध्दि व्हावी. म्हणजे सगळ्यांवरतीच ईश्वराची कृपा होणारी आहे. [illegible] कृपेने संपन्न भारतवर्ष आहे त्या भारतवर्षाची संरक्षणा करता भारतवर्षा[illegible]च देव अवतार घेत असतात. दुसऱ्या कोणच्या देशात देवाने अवतार [illegible] व्यासांनी वर्णन केलेले नाही. म्हणून भारत वर्ष श्रेष्ठ आहे. [illegible] ईश्वरभक्ति संपन्न असे जे गृहस्थाश्रमी राहातले आहेत त्यांच्या व्दाराने, [illegible] माहात्म्य त्यांची वैयक्तिक उन्नती तर आहेत इतरांनाहि हा मार्ग [illegible] पाहून त्यांचेही या मार्गाकडे अधिक अधिक लक्ष लागाव आणि सर्वांपरही भगवान श्रीहरिची दत्तात्रेयांची, सद्गुरुंची कृपा व्हावी अशी त्यांच्या चरणी प्रार्थना.'

अवधुत चिंतन श्री गुरुदेव दत्त